पद्मभूषण

करमसी जेठाभाई सोमैया
जीवनगाथा

राजा मंगळवेढेकर

सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.
मुंबई - दिल्ली

पद्मभूषण करमसी जेठाभाई सोमैया जीवनगाथा

लेखक: राजाभाऊ मंगळवेढेकर

१६ मे २०००
(श्री करमसीभाई सोमैया यांची ९८ वी जयंती)

© सोमैया ट्रस्ट

सजावट व मांडणी
प्रमोद दिक्षित
बाळ ठाकूर
प्रकाश केरकर
हरिणाक्षी

प्रकाशक
सोमैया पब्लिकेशन प्रा. लि.
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

मुद्रक
दी बुक सेंटर लि., १०३ मार्ग क्र. २९, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

Ebook Conversion:
red temptation
http://www.redtemptation.in
info@redtemptation.in

संस्कृत अवतरणे -
क. जे. सोमैया भारतीय संस्कृति पीठम्, विद्याविहार - ४०० ०७७.

प्रस्तावना

बाळासाहेब भारदे

“प्रपंची ते भाग्य परमार्थी वैराग्य । दोन्ही यथासांग दोन्हीकडे
दोन्हीकडे सांग होता तो समर्थ । नाहीतर व्यर्थ तारांबली
तारांबली होते विचार नसता । दास म्हणे आसा सावधान”

प्रापंचिक भाग्य आणि पारमार्थिक वैराग्य याचा संगम म्हणजे समर्थ व्यक्तिमत्त्व. अशा समर्थ व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तिच समाजाला प्रेरणाला देऊन वळण लावीत असतात. मानवी नौकांना आधार देणारे हे चाहते-बोलते दीपस्तंभ असतात. या श्रेणीतील चरित्रनायक करमसीभाई होते. त्यांच्या समर्थ व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे सम्यक दर्शन घडविणारा ग्रंथ प्रसिद्ध समाजसेवक सव्यासाची साहित्यिक आणि नैष्ठिक जीवन साधक श्री. राजाभाऊ मंगळवेढेकर यांनी लिहिला आहे. हा दुग्धशर्करा योग आहे.

चरित्रनायक व चरित्रलेखक दोघेही संस्कृतीचे व सेवाधर्माचे उपासक असल्यामुळे करमसीभाईंच्या या चरित्राला एक चांगले परिणाम लाभले आहे. असे वाचकांना दिसून येईल.

धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चार पुरुषार्थ आपण मानतो. या चारही पुरुषार्थाचा चतुरंग समन्वय करमसीभाईंच्या जीवनात झालेला होता. या चार पुरुषार्थाचा जीवनात मेळ नसला तर आपले वैचारिक जीवन व सामाजिक जीवन प्रसन्न राहणारच नाही. हे सर्व पुरुषार्थ जगन्नाथाच्या दुर्दम्य इच्छेतून साकारलेले आहेत. देह म्हणून जगणे हा अर्थ, वंश म्हणून जगणे हा काम, समाजऋण म्हणून जगावे हा धर्म आणि देहरूपाने-आत्मरूपाने जगावे हा मोक्ष. संपत्तीसाठी अर्थ, संततीसाठी काम, प्रगतीसाठी धर्म आणि सद्‌गतीसाठी मोक्ष, असा हा मानवतेचा विचार आहे.

भारतीय संस्कृतीतील हा समन्वय विसरला गेला. त्यामुळे अर्थाचा अनर्थ झाला. अर्थ, काम वाल्यांनी स्वार्थासाठी मानवधर्माला चाट दिली आणि धर्म मिथ्या मानणाऱ्यांनी, आत्मसाधनेच्या नादात समाजाचा विचार केला नाही. त्यामुळे मानवधर्म विसरला गेला. विशेषत: जगातील वाढत्या भांडवलशाहीमुळे, वाढत्या हिंसाचारामुळे व वाढत्या अनाचारामुळे मानवाचे भवितव्य धोक्यात आले आहे. खुल्या स्पर्धेमुळे बडे उद्योग छोट्या उद्योगांना मारक झाले आहेत. बेकारी भयंकर प्रमाणात वाढत आहे.

राजकीय नेते, उद्योगनेते, अनेक उद्योगपती यांना उद्योगात 'योग' शब्द आहे याची जाणीव नाही; अशा परिस्थितीत करमसीभाईंसारखा उद्योगमालक व चालक 'योग'साधक व्हावा ही अलौकिक कामगिरी आहे.

आदर्श उद्योगपती म्हणून स्वर्गीय जमशेटजी टाटा, जमनालाल बजाज यांचे नाव आदराने घेतले जाते. तोच वारसा समर्थपणे चालविणारे करमसीभाई, नवलभाऊ व हस्तीमल फिरोदिया यांचे कार्य मी स्वत: जवळून पाहिले आहे. करमसीभाईंवर तर बालपणीच गरीबीचे आव्हान स्वीकारण्याची वेळ आली. अनेक अडचणींना तोंड देऊन त्यांनी कसबसे मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतले. त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. त्यांचे शालेय शिक्षण थांबले. परंतु अनुभवाचे खरेखुरे स्वयंशिक्षण सुरू झाले. स्मरणशक्तीवरच भर देणारी, शांत आणि सृजनशीलतेला चालना देणारी जीवनशाळा सुरू झाली.

'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ।' ही तुकोबांची उक्ती करमसीभाईंना लागू पडते. चरितार्थासाठी काहीतरी उद्योग हा केलाच पाहिजे व त्यासाठी वाट्टेल ते कष्ट, अडचणी सहन करून, स्व-प्रयत्नांवर दोन पैसे मिळविले पाहिजेत - तेही कुणाचे कामगार म्हणून नव्हे; तर स्वयंरोजगारावर आपण स्वयंपूर्ण झाले पाहिजे असा निर्धार त्यांनी केला. यशापयशाचे चटके खात अनेक व्यापार-उद्योगांचे प्रयोग त्यांनी मोठपणाची तसेच यशापयशाची पर्वा न करता हाताळले.

'नामा म्हणे असावे भलतिया व्यापारी । लक्ष सर्वेश्वरी ठेवूनिया।' हे संत वचन करमसीभाईंना लागू पडते. सर्व प्राणीमात्रांचा असणारा सर्वेश्वर व त्यावर श्रद्धा ठेवून हाती घेतलेले वेगवेगळे व्यापार करमसीभाईंनी सार्थ केले. हरभऱ्याच्या टरफलाच्या विक्रीचा व्यापार - किरकोळ म्हणून लोक नावे ठेवतील याची पर्वा न करता "निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ" या वचनानुसार करमसीभाईंनी अनेक व्यापारउद्योगांचे प्रयोग केले आणि परिणामी ते सफल झाले. साखरेच्या व्यापाराने करमसीभाईंना रंकाचे राव केले. साखरेची गोडी आणि करमसीभाईंच्या वाणीतील गोडी असा मेळ झाला. साखरेची वाणी असलेला हा व्यापारी साखरेचा मोठा वाणी म्हणून महाराष्ट्रात लोकमान्य ठरला.

साखर व्यापारात चांगला जम बसल्याने साखरेचा कारखाना आपणच काढावा असा करमसीभाईंनी विचार केला. बेलापूरमध्येच त्यांच्या व्यापाराची सुरुवात झाल्यामुळे त्या भागातच ऊसशेतीसाठी जमिनी घ्याव्यात असे त्यांनी ठरविले. कोपरगाव तालुक्यातही काही गावांतून त्यांनी जमिनी विकत तसेच खंडाने घेतल्या; पण केवळ शेतीवर देखरेख करून कारखान्यांसाठी ऊस विकत घेण्यापेक्षा आदर्श ऊसशेती करावी असे त्यांनी ठरविले. ऊसशेतीवर अनेक उद्योग केले आणि त्यांत ते यशस्वी झाले. आदर्श व्यापारी, आदर्श शेतकरी व आदर्श कारखानदार म्हणूनही त्यांनी मान्यता मिळवली.

इतर कारखान्यांपेक्षा गोदावरी शुगर मिल्सच्या कारखान्यात दर एकरी ऊसाचे उत्पन्न अधिक, साखरेचा उतारा अधिक, मालक-कामगारांचा स्नेहभार अधिक आणि त्या परिसराचा विकासही अधिक, अशी लोकमान्यता या कारखान्यास लाभली. त्याचा सविस्तर वृत्तांत या चरित्रात आल्यामुळे त्याची पुनरावृत्ती मी करीत नाही.

लहानपणीच गरिबीच्या चक्रव्यूहात असताना एक युवक परावलंबी, लाचारपणे पोट भरण्याऐवजी स्वयं रोजगाराचा निर्धार करतो काय! काम हलके असो, वा कष्टमय असो, त्यात कमीपणा न मानता कामापेक्षा घामाला महत्त्व देतो काय! 'अव्यापारेषु व्यापार' असे लोक म्हणत असताना सुद्धा सचोटीने, परिश्रमाने, व्यवहार कौशल्याने एक श्रेष्ठ व्यापारी म्हणून पुढे येतो काय! साखरेच्या वितरणात चांगला लाभ होत असतानासुद्धर साखरेच्या उत्पादनासाठी व ऊसशेतीसाठी, संस्करणसाठी साखर कारखान असा 'त्रिवेणी संगम' साधतो काय! ही सर्व कर्तबगारी हे त्यांना लाभलेले परमेश्वरी वरदानच आहे.

एक गरीब माणूस श्रमउद्योगाच्या कुबेर व्हाया आणि असा माणूस विद्वानांनाही गुरुतुल्य वाटावा असे करमसीभाईंचे अलौकिक कार्य आहे.

'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेंच करी ।।'

करमसीभाईंची मला विशेष आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे त्यांची आध्यात्मिक साधना. तुकाराम महाराजांच्या वचनानुसार त्यांच्या जीवनाची दिशा होती.

संपत्तीपेक्षा संस्कृतीला, भोगापेक्षा योगाला, अभिमानापेक्षा इमानाला आणि अहंकारापेक्षा परोपकाराला महत्त्व देण्याची त्यांची जीवनसाधना होती. भूतदया, गायीपशूंचे पालन व तान्हेल्याला जीवन अशी त्यांची धारणा होती.

"जनामाजी । परोपकारी वदे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी मानी।
तुका म्हणे हेच आश्रयाचे फळ। परमपद वैराग्याचे ।।"

असा हा कर्मयोग्याचा संसार होता. गोपालन, सदाचार, स्वदेशनिष्ठा असा करमसीभाईंचा गृहस्थाश्रम होता. ज्ञान, विज्ञान, मानवधर्म आणि विज्ञान असा चतुरंग

समन्वय झाला तरच एकविसव्या शतकात मानव समाज प्रसननतेने वावरू शकेल, हाच करमसीभाईंचा दावा आहे.

ज्ञान आणि विज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. ज्ञानाने आपण लोकांचे कल्याणही करु शकतो आणि लोकांची फसवणूकही करु शकतो. विज्ञानाने आपण सुखसमृद्धी आणू शकतो; या लोकांचा संहारही करू शकतो. आज यंत्रमानव, इंटरनेट, अणुबॉम्ब या संज्ञा आपणासमोर आहेत. यंत्रमानव कारखाने वा संसार चालवू लागला तर मग माणसांचे काय होणार हा यक्षप्रश्न आहे. म्हणून वैज्ञानिक उपकरणे, ज्यांची अंत:करणे चांगली असतील त्यांच्याच हातांत गेली पाहिजेत, नाहीतर सर्वनाश अटळ आहे. खुल्या स्पर्धाप्रधान अर्थनीतीमुळे मोठे उद्योग छोट्या उद्योगांना मारक ठरत आहेत. बेकारीचा भेसूर प्रश्न समोर आहे. या करिताच करमसीभाईंसारखे परोपकारी, आध्यात्मिक, मानवधर्माची जाण असलेले उद्योगपती सर्वत्र होतील तरच मानव धर्म हा एक श्रेष्ठ धर्म होईल, हाच करमसीभाईंच्या चरित्राचा बोध आहे.

आज विज्ञानाने अंतराळात प्रवेश केला आहे परंतु अंतरंगावर त्याचा काही परिणाम होणार नाही. मानव अंतराळावर चालला पण त्याच्या अंतरंगात मानवता नसेल तर ही विमान संहाराचेच काम अधिक करु शकतील.

मानवतेचे अंतरंग व्हायचे असेल तर सर्व प्रणिमात्रांमध्ये एकच आत्मा आहे. या आध्यात्मिक मानव धर्माच्या संस्कारानेच ते शक्य होईल.

आजही आपल्या देशाचा विचार केला तर खुल्या स्पर्धाप्रधान जागतिक अर्थनितीमुळे मागासलेल्या देशांत ज्यांच्याकडे साधन नाहीत अशा बहुसंख्याक गरिबांच्या देशांत गरिबांची ससेहोलपटच झाल्याशिवाय राहणार नाही.

“आम्हांला जेव्हा तोटा झाला तेव्हा जर आम्ही आमचा शब्द पाळला नसता तर ही मोठी खरेदी करण्याची संधी लाभली नसती. माझ्या या व्यापारी धोरणामुळे साखर बाजारात मला एक मानाचे स्थान व प्रतिष्ठेची पत लाभली. व्यापार कसा करावा हे मला कुणी शिकविले नाही, परंतु एक अदृश्य शक्ती माझ्या मागे होती, तीच मला मार्गदर्शन करीत होती.”

व्यापारातील या आदर्शनीतीबद्दलचे करमसीभाईंचे हे उद्‌गार अत्यंत मार्मिक असे आहेत.

सारांश, आध्यात्मिक आदर्श शक्तीची जाणीव असल्यामुळे करमसीभाईं हे उद्योगी असूनही योगी होऊ शकले. हा बोध आधुनिक चालकांनी घेतला तर जगाचे कल्याण होईल.

प्राणियांत् नर: श्रेष्ठा। तेषु भारतवासिना:

संस्कृताभ्यासकातेषू। तेषु संस्कृति शालिन:

महाराष्ट्राच्या एका संस्कृत संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी वरील स्वरचित श्लोक मी सादर केला. त्याचे प्रतीक करमसीभाईंच्या रुपाने आम्हांला मिळाले. विद्येच्या निष्ठेने त्यांनी विद्याविहार हे विद्यासंकुल उभे केले आणि संस्कृत ही भारतीय संस्कृतीची जननी असल्यामुळे तिचा प्रभाव वाढविल्याशिवाय भारतीय संस्कृतीत एकात्मता चांगल्या प्रकारे टिकू शकणार नाही, या जाणिवेतून त्यांनी संस्कृतला मोठ्या प्रमाणावर चालना दिली.

भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानाच्या दृष्टीने हे कार्य विशेष महत्त्वाचे आहे. त्यांनी 'सुरभारती' नावाची संस्था स्थापन केली. या सुरभारतीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या विद्याविहारमध्येही माझे विचार मांडण्याची संधी मला मिळाली.

करमसीभाईंच्या उद्योगांचा व संस्कृतीचा वारसा त्यांचे सुपुत्र डॉ. शांतिलालजी सोमैया हे सहजपणे चालवीत आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

मी नगर जिल्ह्यातीलच असल्यामुळे त्यांचे व्यापार-उद्योगातील कर्तृत्त्व मी जवळून पाहिले आहे. त्यांच्या-माझ्या प्रत्यक्ष भेटीचे संबंध जरी कमी आले असले तरी परस्परांबद्दलचा आदरभाव अनेक वर्षे जोपासला गेला आहे.

नगर जिल्ह्याचे राष्ट्रीय नेते रावसाहेब पटवर्धन हे माझे राजकीय गुरू असल्यामुळे व साखर कारखान्यांच्या कामगार संघटनेल त्यांचीही प्रेरणा असल्यामुळे करमसीभाईंच्या सहवासाचा अनेकदा योग आला.

'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' अशी एक म्हण आहे. त्याचे प्रतीक करमसीभाईं आहेत, हे मी स्वत: अनुभवलेले आहे. आत मात्र ही म्हण उलटी झालेली आहे, 'उच्च राहणी आणि हुच्च विचारसरणी'. आज अशा प्रकारची विचारसरणी सुविद्य लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

करमसीभाईंच्या चरित्र-वाचनाने अशा लोकंच्या विचारसरणीत अनुकूल बदल होईल व सुविद्य समाजही जीवनाचा अधिक उदात्त तऱ्हेने विचार करु लागेल असा विश्वास वाटतो.

१ मे २०००

- बाळासाहेब भारदे

लेखकाविषयी थोडेसे...

श्री. राजा मंगळवेढेकर



राष्ट्रीय भावना व सामाजिक मन लाभलेले एक मराठी साहित्यिक. गेली पन्नास वर्षे लेखन, संपादन व बालांचे मनोरंजन हेच कार्य प्रामुख्याने करीत आहेत. साने गुरुजींच्या सहवासातून बाल साहित्य लेखनाची प्रेरणा घेतली. बालांसाठी विविध प्रकाराचे विपुल लेखन केले. मुलांना गोष्टी-गाणी सांगत महाराष्ट्रभर फिरले. 'कथा आणि कथाकथन' हा प्रबंध लिहीला.

साने गुरुजींची जीवन गाथा शब्दबध्द केली. मित्राय नमः, मित्र देवो भव, मित्राय नमो नमो, तरूण मित्रा, कहाणी एका पुरुषार्थाची, आदी पुस्तके प्रसिध्द आहेत. त्यातील काहींना राष्ट्रीय व राज्य पुरस्कार मिळाले आहेत.

१९८५ साली पुणे येथे झालेल्या बाल कुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

१९९५ साली आखिल भारतीय साने गुरूजी कथा मालेचा बाल सेवा हा पुरस्कार लाभला. बाल आनंद पुरस्कार कोपरगांव येथील स्वातंत्र्य सैनिक श्री. मामा गवारे फाउंडेशनच्या वतीने देण्यात आला.

१९९९ साली महाराष्ट्राच्या संस्कृत जीवनातील प्रतिष्ठेचा गदिमा पुरस्कार लाभला.

स्वातंत्र्य लढ्यापासून राष्ट्रसेवादल, कथामाला, आनंदभारती, सर्वोदय अशा सांस्कृतिक आंदोलनाशी निकटचा संबंध, रचनात्मक विधायक कार्य, कार्यकर्ते, संस्था व पुरुषाची धडपड यांविषयी जिव्हाळा असल्यामुळे या दृष्टीकोनातून विशेष लेखन करीत असत.

कालाय तस्मै नमः

राजाभाऊ मंगळवेढेकर

मला मूलतः माणसांविषयीच अपार कुतूहल वाटते. माणसाचा स्नेह, लोभ, मैत्री मिळवून माणसाशी नाते जोडावे अशी माझी मनीषा असते. अशा जवळीकेमधूनच गुणवंत, यशवंत, नामवंत माणसांच्या निकट सान्निध्यात राहून जमल्यास त्यांच्या अंतर्मनात डोकावून त्यांचे समग्र व्यक्तिमत्त्व समजावून घ्यावे, त्यांची जडण-घडण न्याहाळून पाहावी अशी एक धडपड माझ्या मनी सततची असते.

माझे भाग्य असे की अनेक क्षेत्रांतील अनेक थोरा-मोठ्यांचा सहवास मला लाभला. त्यांच्या सौजन्याने मला त्यांच्या निकट राहता आले, मैत्र जुळले आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडले. अशा मोठ्या व्यक्तींपैकी शेट करमसीभाई सोमैया हे एक...

करमसीभाईंचे नाव आणि कर्तृत्त्व बरेच दिवस ऐकत होतो. शून्यातून कृषी औद्योगिक क्रांतीची यशस्वी ध्वजा फडकावून त्यांनी आपल्या उद्योग समूहाचे साम्राज्य निर्माण केले होते. तसेच हाती आलेल्या संपत्तीचा विनियोगही समाजहिताची बांधिलकी मानून त्यांनी केला. त्यांनी शिक्षण, संस्कृती, आराग्य आदी विविध क्षेत्रांत जे योगदान दिले, त्याने मी भारावलो होतो. सुदैवान माझे राष्ट्र सेवादलातील व समाजवादी पक्षातील मित्र साथी किशोर पवार यांनी करमसीभाईंचे चरित्र लिहिण्याबद्दल मला विचारले; तेव्हा मी आनंदाने होकार दिला.

साथी किशोर पवार हे खरे तर साखर कामगारांचे पुढारी; सोमैयांच्या साखर कारखान्यातील कामगार संघटनांचे ते नेते. म्हणजे हा खडाष्टक योगच! पण करमसीभाईं, त्यांचे चिरंजीव डॉ. शांतिलालजी आणि साथी किशोर पवार ह्यांच्यामधील आपुलकीच्या स्नेहपूर्ण संबंधास एका वेगळयाच नात्याने संबोधावे लागेल.

मी चरित्र लेखनापूर्वी चरित्रग्रंथासाठी साधनांची जुळवाजुळव बऱ्याच मेहनतीने केली, परंतु खुद्द करमसीभाईंच्या तोंडूनच त्याची जीवनकहाणी मला ऐकायची

होती; म्हणून श्री. किशोर पवार ह्यांच्यामार्फतच मी तशी इच्छा व्यक्त केली असताना करमसीभाईंनी ती त्वरेने धुडकावून लावली होती. मला तो प्रसंग आठवतो.

एकदा पुण्याहून मी किशोर पवारांबरोबर करमसीभाईंकडे गेलो. किशोर पवारांनी शेटजींना म्हटले होते. "आपण जर आता अशी मुलाखत दिली नाही, तर मी उपवास करीन." त्यावर मिस्किलपणे हसून करमसीभाई मला म्हणाले होते -

'ह्यांची प्रकृती आता चांगलीच सुधारणार, कारण हे उपवास करणार!' क्षणभर थांबून करमसीभाईं पुन्हा मला म्हणाले,

'तशीच माझीदेखील प्रकृती सुधारणार, कारण हे जेवले नाहीत तर मलाही जेवता येणार नाही; म्हणजे मलाही उपवास घडणार आणि माझीही प्रकृती सुधारणार!'

किशोर पवारांच्या ह्याही प्रयत्नाला करमसीभाईंनी वाटाण्यांच्या अक्षता लावल्या होत्या. पण त्याचवेळी त्यांची किशोर पवारांच्याबद्दलची पितृवत् भावनाही उत्कटपणाने व्यक्त झालेली होती.

त्यानंतर आणखी काही महिन्यांनी माझ्या सततच्या टुमण्यावर किशोर पवारांनी व करमसीभाईंच्या ज्येष्ठ कन्या सौ. लीलाबेन कोटक यांनी करमसीभाईंची आणि माझी मुलाखत घडवून आणणाच्या उद्देशाने एक बनाव रचला होता. त्या दिवशी सायंकाळी भोजनोत्तर त्यांच्याच बंगल्याच्या गच्चीवर आम्ही गप्पांचा कार्यक्रम योजला होता. त्यावेळी मी करमसीभाईंना म्हणालो होतो.

'आपले समग्र चरित्र लिहिण्याचे आम्ही योजले आहे. त्यासाठी...' परंतु हे माझे बोलणे पुरे होण्याच्या आतच करमसीभाई म्हणाले, 'कशासाठी माझे चरित्र लिहायचे? मी काम करून पुष्कळ पैसे मिळविले म्हणून?' म्हणजे पैसे मिळवले म्हणून मी मोठा. नसते मिळवले तर छोटा, मगा तुम्ही माझे चरित्र लिहिले नसते...!'

मी चिकाटीने परत म्हणालो;

'आपण शून्यातून जो एवढा औद्योगिक समूह उभारला आहे, त्याची माहिती इतरांना मिळाली पाहिजे.' त्यावर करमसीभाई हसून म्हणाले, 'अहो म. गांधी, पंडित नेहरू आदी मोठ्यांनी आपली आत्मचरित्रे लिहिली. इतरांनीही इतरांची लिहिली पण ती कोणी वाचतो का? मग माझे चरित्र कोण वाटणार!'

माझे प्रत्ये म्हणणे अशाप्रकारे करमसीभाई खोडत होते आणि मी चिकाटीन पुन्हा पुन्हा म्हणत होतो.

'नव्या उगवत्या पिढीला आपल्या जिद्दहची, कष्टाची, कौशल्याची माहिती मिळाली तर त्यांनाही ती प्रेरणादायी ठरेल.'

'ज्यांना काही करण्याची इच्छा आहे ते पुढे सरसावून करतातच आणि माझ्याबद्दल म्हणाल, तर मी माझ्या आयुष्यात आजच्या या क्षणापर्यंत भला वागलो,

भले केले पण उद्या सकाळी बिघडलो तर!'

करमसीभाई हे हसून म्हणाले, मी मात्र चमकलो!

माणूस स्खलनशील आहे, याची जाणीव करमसीभाईंच्या ठिकाणी मला तीव्रतेने जाणवली. करमसीभाई म्हणाले, 'म्हणून माणूस गेल्यानंतरच त्याच्यासंबंधी काय लिहायचे ते लिहावे.'

आमचा हा बनावही अशा प्रकारे त्या दिवशी विस्कटला होता.

मी मात्र चिकाटीने त्यांच्याकडून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत होतो. एकदा मी त्यांच्याबरोबर त्याच्या कारमधून नरेशवाडीला चाललो होतो. जाताना बऱ्याच विषयांवर गप्पा-गोष्टी चालल्या होत्या. साने गुरुजींसंबंधी, मी त्यांचा चरित्रकारच असल्यामुळे बऱ्याच गोष्टी सांगितल्या. करमसीभाईंनी त्या लक्षपूर्वक आस्थेने ऐकल्या आणि मला विचारले, 'त्यांचा जन्म किती सालचा!' मी सांगितले, '२४ डिसेंबर १८९९' ही त्यांची जन्मतारीख.

त्यावर करमसीभाईं म्हणाले, 'माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठे होते!'

मी पटकन् त्यांना पकडीत म्हणालो, 'म्हणजे तुमचा जन्म १९०२ सालचा.'

हसत हसत करमसीभाईं म्हणाले, 'बरोबर पकडलेत.'

मी म्हणालो,'मग आत तारीख आणि महिना सांगा!'

'नाही सांगणार, कारण मी स्वत:च ते विसरून गेलो आहे. शिवाय आता ती आठवली तर (वर आकाशाकडे बोट करीत) त्यालाही ते आठवेल आणि मग तो म्हणेल, अरे ! याला तर आपण विसरूनच गेलो होतो. लवकर नेले पाहिजे, अशीच तो तजवीज करेल. मला मात्र एवढे लवकर जावयाचे नाही, अजून बरीच कामे करावयाची आहेत.'

करमसीभाईंनी आपल्या जन्मतारखेचा पत्ता लागू दिला नाही. त्यांची जन्मतारीख निश्चितपणे माहिती नाही. आपल्या आयुष्याची जडण-घडण जो सांगायला तयार नाही अशा व्यक्तिचे चरित्र लिहायचे तरी कसे, म्हणून आम्ही हा प्रकल्प बाजूला ठेवला होता.

ते १९८३-८४ साल होते. या कालावधीत मी करमसीभाईंच्या संदर्भात विविध क्षेत्रांतील सुमारे १५० लोकांच्या मुलाखती घेतल्या होत्या. अन्य सामग्रीची जुळवाजुळव केली होती.

आणखी काही वर्षे गेली. करमसीभाईंची नव्वदी उलटून गेली होती. ते त्र्याण्णव, चौऱ्याण्णवचयाच्या घरात होते. आणि मग त्यांचे त्यांनाच वाटू लागले की आपल्यासंबंधी काहीतरी लिहून ठेवले पाहिजे. त्यांनी तसा एका स्टेनोमार्फत प्रयत्नही केला होता. पण तो अर्धवटच राहिला होता.

करमसीभाईं आता शरीराने थकत चालले होते. बोलणे जड झाले होते. बसणे उठणे, फिरणे कष्टदायक बनले होते. पण आपण आपल्यासंबंधी काहीतरी लिहिले पाहिजे ही जाणीव मात्र तीव्र झाली होती. आणि म्हणूनच त्यांनी परत किशोर पवारांमार्फत मला आपणहून बोलावून घेतले आणि जमेल तशी, आठवेल तशी. आपल्याविषयीची माहिती मला कथन केली. आणि त्यांच्यासंबंधी मी मिळवलेल्या माहितीच्या आधारे हा चरित्रग्रंथ सिद्ध केला.

करमसीभाईंना दोन तीन वेळा मजकूर वाचून दाखविला, त्यांनी काही दुरुस्त्याही सुचविल्या. चरित्रग्रंथाचे वाचन अन्य जाणकारांच्यापुढेही झाले. परंतु सर्व सिद्धता होऊनही करमसीभाईंच्या हयातीत हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध होऊ शकला नाही. करमसीभाईंचे दुख:द निधन ९ मे १९९९ रोजी झाले. त्यानंतर २६ जानेवारी २००० रोजी ह्या प्रजासत्ताक दिनी भारतच्या राष्ट्रपतींनी मरणोत्तर 'पद्मभूषण' हा मानाचा किताब देऊन त्यांनी गौरविले. आणि त्यांच्या ९ मे २००० ह्या प्रथम स्मरणदिनाच्या निमित्ताने त्यांच्याच १६ मे २००० ह्या ९८ व्या जन्मदिनी हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध करीत आहोत.

ग्रंथ सिद्धीस गेला याचा आनंद एका डोळ्यात भरून राहिलेला असतानाच दुसऱ्या डोळ्यात मात्र आता करमसीभाई नाहीत, याची खंतही दाटून राहिलेली आहे.

कालाय तस्मै नम:!

- राजाभाऊ मंगळवेढेकर

९ अशोकवन, मॉडेलकालनी

पुणे ४११ ०१६.

स्वर्गीय पूज्य श्री. करमसी जेठाभाई सोमैया

१६.०५.१९०२ - ०९.०५.१९९९

पूज्य बाईजी स्वर्गीय श्रीमती साकरबेन करमसी सोमैया

२५.०८.१९०९ - १८.०७.१९९५

संस्कृतीचा तेजस्वी वारसा धारण करणारे तीन ज्योतिर्धर
स्वर्गीय पूज्य श्री. करमसी जेठाभाई सोमैया,
डॉ. शांतिलाल क. सोमैया आणि
श्री. समीर शांतिलाल सोमैया

सोमैया वंशावळी तक्ता

समीर
शांतीभाई
वीरजीभाई
भगवानभाई
बाबुभाई
करमशीभाई
जेठाबापा
जयरामबापा
ठाकरसीबापा
वालजीबापा
पारप्याबापा
खीमजीबापा
कालजीबापा

पूर्वरंग

कुलवृत्तांत

रघूणामन्वयं वक्ष्ये।

मी रघुकुळाचे वर्णन करतो

कुलवृत्तांत

ही चरितकहाणी आहे एका उद्यमशील माणसाची. ऐन तारुण्यात तर सोडाच, पण आज शंभरीच्या घरात असतानासुद्धा हा माणूस मुंगीसारखा सतत उद्योगात गढलेला दिसतो. जेव्हा पहावे तेव्हा मुंगी आपली घाईत दिसते. उद्योगात मग्न असते. मुंगीला आळस, विरंगुळा जणू ठाऊकच नाही! याही माणसाचं तसंच आहे.

पण हा माणूस लहानखुरा नाही. आहे मूळचाच उंच, ताठ, दणकट शरीरयष्टीचा, लांबसडक हातांचा, चालत्या चक्रागत पायांचा, केतकी गौर वर्णाचा, करारी बाण्याचा, प्रसन्न मुद्रेचा!

खादीचे पांढरेशुभ्र धोतर, तसाच कुडता आणि डोईवर गांधी टोपी अशा चारित्र्य निदर्शक वेषातला!

आता शंभरीच्या दशकात कमरेत बाक आणि हातात कंपवात शिरलेला आहे, चालणे-बोलणे मंदावले आहे. पण ही तर या वयातली प्रकृतीच; विकृती नव्हे!

एक-दोन वेळा गंमत झाली. हा तरतरीत देखणा माणूस मोटारीतून चालला होता. मोटार धावत होती. रस्त्यात आडवे आले रेल्वेचे फाटक. मोटार थांबली. रस्त्यावरच्या एका माणसाने मोटारीत डोकावले आणि आश्चर्याने म्हणाला, “नेहरू!”

त्याच आश्चर्याने त्यानं आजूबाजूच्या माणसांना सांगितले, “अरे, जवाहरलाल नेहरू आहेत गाडीत!”

ऐकणाऱ्यांनाही नवल वाटले. तेही कुतुहलाने गाडीत डोकावू लागले!

तेवढ्यात फाटक उघडले, गाडी पुढे गेली.

तर नेहरूंसारखेच मुलायम, उत्फुल्ल, टवटवीत व्यक्तीमत्त्व लाभलेला हा माणूस!

या माणसाचे नाव आहे करमसी जेठाभाई सोमैया. शेठ के. जे. सोमैया किंवा करमसीभाई म्हणून उद्योगक्षेत्रात विख्यात. पुष्कळजण म्हणतात, ‘शेटजी’-त्यांना मात्र ती शिवी वाटते - पण घरातल्या सगळ्या लहानांचे ते आहेत अधा! अधा म्हणजे बाबा!

करमसीभाईंच्या चरितकहाणीसाठी मूळचा ठावठिकाणा, वाडवडील, नातीगोती यांचीही माहिती हवीच.

सोमैया घराणे गुजरातमधील कच्छ भागातले. कच्छमधल्या अभडासा तालुक्यातील तेरा नामक गावातले. कच्छ आहे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गुजरात राज्यात. कच्छचे आखात म्हणूनच हा भाग ओळखला जातो. हा भाग भारताच्या मुख्य भूमीपासून सुटा असून एखाद्या बेटासारखा आहे. तसा हा प्रदेश रुक्ष, रेताड व खडकाळ असला, तरी त्यात डोंगरांच्या रांगा, नद्यांची खोल पात्रे, लागवडीस आणलेली डोंगरखोरी व गुरेचराईची कुरणे यांमुळे त्याला वैविध्य प्राप्त झाले आहे.

असे सांगतात की, सोमैया यांचे पूर्वज बऱ्याच वर्षांपासून मध्य आशियातील उत्तरेतून भारताच्या दक्षिणेत आले आणि कच्छ प्रदेशात स्थिरावले. सुरूवातीस ते गुंदारा नामक गावात विसावले आणि नंतर तेरा नामक गावचे वस्तीकर बनले.

सोमैया घराणे लोहाणा जमातीत मोडते. लोहाणा ही कच्छमधील एक जमात आहे. या लोकांना लुहाणा असेही म्हणतात. यांची वस्ती सिंध, काठियावाड, कच्छ, मुलतान, बडोदा इत्यादी भागात आढळते. लोहाणांच्या उत्पत्तीसंबंधी बरीच मते प्रचलित आहेत. त्यातील काही अशी आहेत :

हे लोक स्वत:ला श्रीरामप्रभूंचा पुत्र लव यांचे आपण वंशज आहोत - लवापासून लोहाणा - असे मानतात.

एक आख्यायिका अशी आहे की, लखो व दामो असे दोन भाऊ होते. ते फिरत फिरत काठियावाडमधील ध्रांगध्याला आले. लखोपासून लोहाणा व दामोपासून देपला या जमातींची उत्पत्ती झाली.

एक परंपरा सांगते, की ही जमात राठोड राजपुतांपैकी आहे. कनोजचा राजा जयचंद याने त्यांचा फार छळ केला, म्हणून त्यांनी राजाविरुद्ध शस्त्र उपसले आणि राजापासून आपला बचाव व्हावा म्हणून वरुणाची आराधना केली. वरुणाने प्रसन्न होऊन त्यांना नकळत एक लोखंडी किल्ला बांधला व त्यात त्यांना आश्रय घ्यायला सांगितले. किल्ल्याच्या आश्रयाने त्यांना विजय मिळाला. पुढे एकवीस दिवसांनी तो किल्ला अदृश्य झाला. तेव्हापासून त्यांनी लोहाच्या किल्ल्यापासून संरक्षण लाभले म्हणून राठोड हे नाव सोडून लोहाणा हे नाव धारण केले.

ए.एम.टी. जॅक्सन या आंग्ल पंडिताच्या मते लवण शब्दावरून लोहाणा हा शब्द तयार झाला असावा. कारण ते लोक पूर्वी मिठाचा व्यापार करीत होते. आजही कच्छ भागात बरीच मिठागरे आहे. सोमैया उद्योगसमूहातील 'कच्छ सॉल्ट अँड अलाईड इंडस्ट्रिज लिमिटेड' हा उद्योग स्थिरावलेला आहेच.

लोहाणा जमातीचाही इतिहास आहे. त्यांची जीवनपद्धती आहे. रीतिभाती आहेत. मुंबईत कच्छी लोहाणा या जमातीमधील बरीच कुटुंबे आहेत. ही मंडळी सागरपूजक आहेत.

ठाकरसीभाई आणि वालजीभाई पारप्या हे दोघे बंधू 'तेरा' नावाच्या गावी राहत होते. वालजीभाईंना मूलबाळ नव्हते. ठाकरसीभाईंना जयरामभाई आणि जेठाभाई या नावाचे दोन मुलगे होते. भावाभावांच्या संमतीने वालजीभाईंनी ठाकरसीभाईंच्या मुलाला जयरामभाईला दत्तक घेतले. त्यामुळे जयरामभाई हे जयरामभाई वालजी आणि जेठाभाई हे जेठाभाई ठाकरसी म्हणून ओळखले जाऊ लागले. ते दोघेही वेगवेगळे राहत होते. यांच्या पूर्वजांचा व्यवसाय होता. सराफांच्या दुकानातील केरकचरा, धूळ घ्यायची आणि त्यातून सोने काढायचे. धुळीतून सोने गाळण्याचे हे काम तसे फार कष्टाचे होते. त्यांच्या त्या व्यवसायावरून त्यांना 'धूल-धूलीया' असेच म्हणत असत.

काम कष्टाचे, प्रदेश नापीक म्हणून परिस्थितीही बेताचीच. या परिस्थितीत तिथे बदल घडवून आणण्यास काहीच वाव नव्हता. म्हणून ठाकरसीभाईंनी तेरा गाव सोडून नशीब काढण्यासाठी मुंबईकडे प्रस्थान केले. मुंबई उद्योगधंद्यांचे मायपोट. विविध व्यवसायांचे माहेरघर. म्हणून दहा दिशांनी आणि शंभर वाटांनी कुठून कुठून दुरवरून माणसे मुंबईत नशीब काढायला येतात. रोजीरोटीच्या कामात बुडून जातात.

१८५७च्या सुमारास ठाकरसीभाई मुंबईत आले. उद्योग-व्यवसाय शोधू लागले. त्याच वेळी त्यांचे गोकुलभाई उकेडा यांची कन्या कल्याणबाई हिच्याशी लग्न झाले. गोकुलभाई उकेडा हे कंत्राटदार होते. समुद्राच्या पाण्यात दगड, मुरूम, मातीची भर टाकून जमीन तयार करण्याची कंत्राटे त्यांच्याकडे होती. समुद्रापासून अशा प्रकारे जमीन संपादन करण्याच्या कामाला 'रेक्लमेशन' असे म्हणतात. मुंबईतील नरीमन पॉईंटच्या जवळील भाग हा असाच रेक्लमेशनचा आहे. गोकुलभाई उकेडांचे काम मुंबईतील ओसवाल पुलाजवळच्या कोळीवाड्याजवळ होते. ठाकरसीभाई या कामातच स्थिरावले. अल्पावधीतच भरभराटीसही आले. व्यवसायात नशिबाने साथ दिली, पण दुर्दैव उभे राहिले. जुगाऱ्यांच्या जाळ्यात ते अडकले आणि तोवर जे काही कमावले होते ते सगळे घालवून बसले.

पोटाचा प्रश्न पुन्हा उभा राहिला, तेव्हा त्यांनी मुंबई सोडून कुठेतरी जाऊन नशीब अजमावण्याचे ठरवले.

ठाकरसीभाई मुंबईहून निघाले. कुठे जायचे, काय करायचे, हे काहीच ठाऊक नव्हते, ठरलेले नव्हते. पण दक्षिणेकडची वाट धरली होती. हिंडता-हिंडता मनमाड स्टेशन आले आणि ते तिथल्याच फलाटावर उतरले.

मानवी जीवन अनेक घटना-प्रसंगांनी आणि अकल्पित योगायोगांनी गुंफलेले असते! हे योगायोग ज्याचे त्यालाही कळत नाहीत, म्हणूनच तर योगायोग म्हणायचे! ते अकस्मातच

समोर उभे ठाकतात. जीवनाचा घाट पार बदलून टाकतात.

ठाकरसीभाईंच्या जीवनातही मनमाड-स्टेशनचा फलाट हा असाच योगायोगाचा बनला!

झाले असे की, मनमाडच्या फलाटावर विमनस्क स्थितीत बसले असताना ठाकरसीभाईंना एक सहप्रवासी दिसला. तो होता न्हावी, खांद्यावरच्या धोकटीसह. ठाकरसीभाईंना वाटले, "दाढी फार वाढलेली आहे, वेळही आहे, तर दाढी करून घ्यावी."

ठाकरसीभाई दाढीसाठी त्या न्हाव्यासमोर बसले. न्हाव्याने वस्त्र्याला धार लावता लावताच तोंडही मोकळे केले. जिभेसह धार परजली. न्हावी फारच बोलका होता. तसे सगळेच न्हावी त्या काळी बोलके असत आणि समोरच्या माणसाची दाढी धरून किंवा गुडघ्यात डोके दाबून त्यालाही बोलके करीत असत. त्यामुळे न्हाव्याजवळ गावातल्या अनेक बित्तंबातम्या साठलेल्या असत. अशा न्हावीकथा पुष्कळच आहेत.

तर ठाकरसीबाबांची दाढी करता करता न्हाव्याने 'काय, कुठले, कुठे चालले...' वगैरे चौकशी सुरू केली. ठाकरसीभाईंनीही बोलता बोलता मनची गोष्ट सांगितली. ती ऐकून न्हावी म्हणाला, "मग चला आमच्या गावाला मालुंज्याला. मालुंजं आहे बेलापूरजवळ. तिथं कामधाम मिळेल. आमच्या गावाला लिंब, तरवड, बाभळ, चिंच अशी पुष्कळच झाडं आहेत. त्यांच्याकडं कुणी फारसं पाहातही नाही. जमलं तर बघा."

ठाकरसीभाई हे मोठे हुशार आणि धूर्त व्यावसायिक होते. न्हाव्याच्या बोलण्यातून त्यांनी घ्यायचा तो अर्थ घेतला, मनाशी निश्चय केला आणि त्या न्हाव्याबरोबरच बेलापूरकडे निघाले. त्यावेळी दाढीचा दर एक पैसा होता, पण ठाकरसीभाईंनी खूष होऊन त्या न्हाव्याला सोळा पैसे दिले. सोळा पैसे म्हणजे त्या काळात चार आणे. अशा सोळा आण्यांचा म्हणजे चौसष्ट पैशांचा रुपया होत असे. सोळापट कमाई एका दाढीत झाल्यामुळे न्हावीही खूष झाला. ठाकरसीभाईंना मालुंज्याला घेऊन आला. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्यात राहूरी तालुक्यात बेलापूरजवळ मालुंजा होते. आता ते श्रीरामपूर तालुक्यात आहे.

या मालुंजा गावातच बापूराव आवटी यांचा मोठा वाडा आहे. या वाड्यात एक खोली भाड्याने घेऊन ठाकरसीभाईंनी आपला प्रपंच थाटला. शेतीवाडी करू लागले.

या आवटींच्या वाड्यात राहत असतानाच एक दुर्दैवी घटना घडली होती. ती अशी :

एके दिवशी रात्री दोन तीन चोरटे चोरी करण्याच्या उद्देशाने वाड्यात घुसले. रात्रीचा अंधार होता. सगळीकडे निजानीज झाली होती. चोरटे अंधारातच चाचपडत उजव्या बाजूला राहत असलेल्या ठाकरसीभाईंच्या खोलीकडे निघाले होते. पण अंधारात चुकून ते डावीकडे वळले. तेवढ्यात ठाकरसीभाईंचा मोठा नातू धारसीभाई हा रडत उठला. चोरटे घाबरले. धडपडत चालले. तेवढ्यात भांडे पडल्याचाही आवाज झाला. त्यामुळे पुढेच झोपलेले बापूराव आवटी यांना जाग आली. काहीतरी हालचाल आणि खसखस चालल्याची चाहूल

त्यांना लागली. म्हणून त्यांनी दरडावून विचारले, “कोण आहे?” आता आपण पकडले जाऊ अशा भितीने चोरांनी अंधारातच बापूराव आवटी यांच्यावर हत्याराचा वार केला. बापूराव आवटी यांची हत्या झाली. दैवगती कशी असते, हे कळत नाही.

ठाकरसीभाईंच्या अंगी व्यापारी कौशल्य भरपूर असल्यामुळे अल्पावधीतच ठाकरसीभाईंनी तिथे बरीच शेतजमीन आणि बागा खरेदी केल्या. दावणीला गाईगुरेही पुष्कळच जमा केली. आणि विशेष म्हणजे ठाकरसीभाईंनी त्या भागात पहिला किर्लोस्करी लोखंडी चरक ऊस गाळण्यासाठी आणला. जवळच बेलापूर ही त्या काळी मोठी प्रसिद्ध गुळाची बाजारपेठ होती. ठाकरसीभाईंनी किर्लोस्करी लोखंडी चरक गुळाच्या गुऱ्हाळासाठी आणण्यापूर्वी तिकडे सर्रास लाकडी चरकच वापरात होते. लाकडी चरकाऐवजी लोखंडी चरक आणून सुरू करण्यात ठाकरसीभाईंची वेधक दूरदृष्टी जशी दिसते, तसाच भविष्यातील नातवाच्या कर्तबगारीचा नियतीचा नकळत संकेतही दिसतो.

काळाच्या मानाने ठाकरसीभाई हे एक प्रगतीपर शेतकरी आणि व्यापारी बनले होते. त्यांनी परक्या ठिकाणाहून येऊन त्या गावात आणि परिसरात चांगलीच प्रतिष्ठा कमावली होती. तिथल्या लोकांशी त्यांनी चांगले जिव्हाळ्याचे संबंधही प्रस्थापित केले होते.

ठाकरसीभाईंचे निधन १८९९ साली झाले. अंतरमयी पत्नीच्या मांडीवर डोके ठेवलेले होते. पत्नीचे डोळे दु:खाश्रूंनी भरून वाहत होते. ठाकरसीभाईंच्या गालावर जेव्हा ते अश्रू ओघळले तेव्हा त्यांनी चमकून विचारले, “अशी रडतेस काय म्हणून! घर, जमीन, बागा, दुभत्या गायी, म्हशी सगळं सुखासमाधानात असताना. कधीतरी मरण येतंच, ते चुकत नाही. सुखासमाधानाने राहा.”

ठाकरसीभाईंना दोन पुत्र होते. जयरामभाई आणि जेठाभाई. जयरामभाईंना मूलबाळ नव्हते. जेठाभाईंना करमसी, आणि धारशी अशी दोन मुले होती. पुढे वंशसातत्यासाठी जयरामभाईंनी आपल्या भावाकडे दोहोपैंकी एक मुलगा दत्तक घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा मोठा मुलगा धारशी याला तर काही दत्तक देता येत नव्हते, म्हणून करमसीला दत्तक देण्याचे ठरले होते. दत्तक-विधान पुढे काही दिवसांनी होणार होते. पण तेवढ्यात जयरामभाईंना पुत्रप्राप्ती झाली आणि दत्तक विधानाचा प्रश्नच मिटला. करमसी जेठाभाई हा करमसी जेठाभाईच राहिला.

करमसी जेठाभाई सोमैया हेच या चरितकहाणीचे नायक!

करमसीभाईंचा जन्म मालुंजा या गावीच, औटींच्या वाड्यातील भाड्याच्या जागेत, १६ मे १९०२ या दिवशी झाला.

❖

बालपण

सुलभसौख्यं तावत् बालत्वं भवति।

बालपणी सुख सहजसाध्य असते.

बालपण

करमसीभाईंचे आजोबा ठाकरसीभाई यांच्या पश्चात जेठाभाई वडिलांचा व्यवसाय पाहू लागले. तेही कष्टाळू होते. कुस्त्यांचे शौकीन होते. व्यायामाची आवड होती. त्यांनी स्वत:साठी दुधाकरिता काही खास म्हशी राखल्या होत्या. परंतु जेठाभाई तापट आणि संतापी स्वभावाचे होते. शीघ्रकोपी होते. आपले वडील ठाकरसीभाई यांच्याप्रमाणे त्यांना गावकऱ्यांशी स्नेहाचे संबंध ठेवता आले नाहीत. त्यांच्या तापट स्वभावामुळे ते अनेक लोकांना दुरावले. त्यांत त्यांच्या गाई-म्हशींच्यासाठी कसदार गवत पुरविणारेही होते. ते भिल्ल होते. काही कारणांवरून जेठाभाई आणि हे भिल्ल लोक यांच्यात संघर्ष सुरू झाला आणि त्या लोकांनी सूडबुद्धीने गवतामध्ये विष कालवून दिले. गायींनी ते विषमिश्रित गवत खाल्ले आणि त्या सगळ्या गायीम्हशी मरून गेल्या. अशाच प्रकारे आणखीही नुकसान होऊ लागले, तेव्हा जेठाभाईंनी मालुंजा हे गावच सोडण्याचे ठरवले.

जेठाभाई मालुंज्याहून बेलापूरला आले आणि तिथे त्यांनी एका किराण्याचे दुकान सुरू केले. इ.स.१९०४ च्या आसपासचा हा काळ होता.

जेठाभाईंनी बेलापूरला येऊन दुकान सुरू केले, तरी मालुंज्याचे घर अजून मोडले नव्हते. पत्नी, मुले मालुंज्यालाच होती. याच काळात १९०२ साली मालुंज्याला जेव्हा करमसीभाईंचा जन्म झाला तेव्हा जेठाभाई बेलापूरला होते. मुलाच्या जन्माची वार्ता त्यांना कळली, तेव्हा त्यांनी एका चोपडीवर त्याची जन्मतारीख लिहून ठेवली होती. पण पुढे ती चोपडी कुठेतरी गहाळ झाली आणि करमसीभाईंची जन्मतारीख निश्चित अशी कळेनाशी झाली. एकदा राहुरी तालुक्याहून जन्मनोंद घेण्यासाठी जेव्हा एक सरकारी अधिकारी आला, तेव्हा त्याला अंदाजाने १ जून १९०२ ही तारीख सांगितली गेली. पण पुढे बऱ्याच वर्षांनी असाच एक पंडित ज्योतिषी घरी आला असताना त्यांनी घरच्या सगळ्यांचेच हात

पाहून त्यांच्या जन्मतारखा सांगितल्या होत्या आणि नवल असे की, करमसीभाईंनी आपल्या घरातील मुलाबाळांच्या ज्या जन्मतारखा स्मरणपूर्वक लिहून ठेवल्या होत्या. त्याच्याशी त्या मिळत्या निघाल्या. त्याचवेळी त्या ज्योतिष महाशयांनी करमसीभाईंचाही हात पाहिला होता आणि त्यांची जन्मतारीख १ जून नसून ती १६ मे १९०२ आहे असे ठामपणाने सांगितले. करमसीभाई तेव्हापासून आपली जन्मतारीख १६ मे १९०२ हीच मानू लागले. पण्र कितीतरी दिवस त्यांनी आपली जन्मतारीख कधी कोणालाच सांगितली नव्हती. त्यामुळे घरात ती कोणालाच ठाऊक नव्हती. काही वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखकाने विचारले असतानाही त्यांनी आपल्या जन्मतारखेचा सुगावा लागू दिला नव्हता. ते म्हणाले होते, "मी माझी जन्मतारीख विसरून गेलो आहे. त्यामुळे परमेश्वरही ती विसरून गेला आहे. मी जर आता ती आठवली तर परमेश्वरालाही तिची आठवण होईल आणि मग तो म्हणेल, "याची आता ऐंशी-पंच्याऐंशी झाली, याला नेले पाहिजे. पण मला तर अजून पुष्कळच काम करावयाचे आहे!"

करमसीभाईंच्या या उद्‌गारांवरून त्यांच्या ठायीच्या विनोदाची झलक जशी दिसते, तशीच त्यांची वृद्धापकाळातील उद्योगशीलतेची जिद्दही आढळून येते.

काही दिवसांनी जेठाभाईंनी मालुंज्याचे घर मोडले आणि ते बेलापूरला आणले.

करमसीभाईंना आपल्या बाळपणातील काही गोष्टी आजही आठवतात. ते सांगत होते, "मी सुमारे एक वर्षाचा असेन. माझ्या वडिलांची बहीण घराच्या पहिल्या मजल्यावरील सज्जाच्या भिंतीवर माझ्याशी खेळत होती. तेवढ्यात काहीतरी कामासाठी तिला घरातून हाक आली म्हणून ती मला सोडून तशीच लगबगीने घरात गेली. धरायला कोणीच नसल्याने तोल जाऊन मी पहिल्या मजल्यावरून खाली ओबडधोबड दगडी रस्त्यावर पडलो. परंतु देवाच्या दयेने मला कसलीही दुखापत न होता सुखरूप राहिलो."

"बेलापूरच्या शाळेत शिकत असतानाची एक आठवण आहे. सकाळी शाळेत सगळ्यांत जो आधी येईल त्याला पहिला नंबर मिळत असे. एकदा पहिला नंबर पटकावण्याच्या ईर्ष्येने मी सूर्योदयापूर्वीच, घरी आईने दिलेला आंबा आणि पोळी झटपट खाऊन, शाळेत गेलो होतो. पण शाळेचे गेट बंद होते. शाळेला सगळीकडून भिंतींचे कंपाऊंड होते आणि पुढे मोठे फाटक होते. फाटक उघडण्याचा मी प्रयत्न करीत असतानाच एक कुत्रा माझ्या दिशेने पळतपळत आला आणि माझ्या मांडीला चावला. या प्रसंगानंतर कितीतरी वर्ष माझ्या मनात कुत्र्याविषयीची भिती दडून बसलेली होती. कुत्र्याला मी फारच घाबरत असे. पण या अनुभवातूनही मला एक धडा मिळाला की, कुत्रा भुंकत अंगावर आला असता घाबरून पळू नये. जागच्या जागी कुत्र्याकडे बघत उभे रहावे. थोडा वेळ भुंकून कुत्रा निघून जातो."

“शाळेत असतानाचीच एक आठवण अशी आहे की, आम्हा मुलांची अशी समजूत होती की हाताच्या करंगळीने वीतभर जमीन खोदली की त्या खड्ड्यातून उंट बाहेर येतो! म्हणून आम्ही करंगळीने जमीन उकरण्याचा उद्योग करीत असू.

“आणखी एक आमची कल्पना अशी होती की, वाळूतले शिंपले घेऊन छातीवर मारले की आभाळात उडता येते! म्हणून आम्ही नदीच्या वाळूत शिंपले शोधण्याचाही उद्योग करीत असू. या बालिश कल्पना आता आठवल्या म्हणजे हसू येते. पण त्या काळी त्या वयात याच कल्पनांनी आमचे मनोरंजनही केले होते.

“शाळेतली गणेश चतुर्थीची आठवण आहे. त्या दिवशी पाटी घासून स्वच्छ धुवायची आणि पाटीवर मोठा ‘श्री’ काढायचा. मग पाटीपूजा करायची.

“आम्हांला शाळेत बाराखडीबरोबरच पाढेही पाठ करायला लागायचे. बे पासून औटकीपर्यंत. उजळणी तोंडपाठ म्हणावी लागत असे. याला परवचा म्हणत असत. कागदावर लिहायलाही शाई आणि बोरू असे. बोरूने पुस्ती काढावी लागत असे...”

अशा काही आठवणी करमसीभाई सांगतात. एकदा म्हणाले, “चौदा-पंधरा वर्षांचा असतानाची गोष्ट. घरी दोन घोडे होते. तांगा होता. वडील दुकानाच्या वसुलीसाठी तांग्यातून गावोगावी जायचे. एकदा मी एका खट्याळ घोड्यावर बसलो. घोडा उधळला. नाला ओलांडून गेला. लगाम खेचून परत फिरवला. पण पुन्हा उधळला. आवरता आवरेना. रिकिबीतून पाय सुटले. लगाम सुटला. घोड्याच्या मानेचे केस घट्ट धरून ठेवले; पण तेही सुटले, आणि घोड्यापुढेच कोसळलो. त्याबरोबर घोडाही ठप्प! एक जरी पाय उचलून टाकला असता तरी चिरडून गेलो असतो. पण घोडा जागच्या जागीच उभा राहिला. मी वाचलो, एवढेच नव्हे, तर मला काही लागलेही नाही. दुखापत झाली नाही. देवाची कृपा.

“सतरा वर्षांचा असेन. पावसाळ्याचे दिवस होते. बेलापूरला प्रवरा नदीला महापूर आला होता. घाटाच्या कडेला बसलो होतो. एकाने येऊन धक्का दिला. पाण्यात पडलो. पोहता येत नव्हते. पुराच्या पाण्याला जोर. वाहत चाललो. घाबरून ओरडलो. काठावरल्या एका माणसाने ऐकले आणि लागलीच उडी घेतली. बुरुजाच्या साखळीला धरून खेचले. बाहेर काढले. बुडता बुडता वाचलो. देवाचीच कृपा!”

अशा जीवावरच्या कठीण प्रसंगातून सुखरूप राहिल्याने बालवयातच करमसीभाईंच्याठायी ईश्वरनिष्ठेचे व भक्तीचे बीज रुजले गेले.

बालपणीच करमसीभाईंना पौराणिक गोष्टी वाचण्याची, ऐकण्याची गोडी लागली होती. ध्रुव, प्रल्हाद या बालभक्तांनी बालवयातच ईश्वरदर्शनाची इच्छा पूर्ण करून घेतली होती. या भक्तीप्रधान गोष्टींनीही करमसीभाईंचा मन:पिंड ईश्वरनिष्ठ बनविला.

❖

शिक्षण

क्रिया हि वस्तूपहिता प्रसीदति।

सुयोग्य विद्यार्थ्याला दिलेले शिक्षण फलद्रूप होते.

शिक्षण

“बेलापूरला हिरालालभाई मुंदडा यांच्या जागेत बिऱ्हाड होते. हे मोठे व्यासंगी आणि अनुभवी वैद्य होते. दररोज सकाळी उठल्याबरोबर ते आपली स्वत:चीच नाडी पाहत असत. तशीच दुपारी आणि रात्री झोपण्यापूर्वीसुद्धा पाहत असत. नाडीत पडणारा फरक आणि स्वत:ची प्रकृती यावरून ते वैद्यकीय चिकित्सेतील अनुमाने ठरवीत असत. त्यांच्या अचूक निदानामुळे ते त्या परिसरात वैद्य म्हणून फार प्रसिद्ध होते.”अशी आठवण सांगून आपल्या शिक्षणाविषयी माहिती करमसीभाई अशी देतात.

“याच काळात वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षी मला माझ्या वडिलांनी बेलापूरच्या मराठी शाळेत दाखल केले. शिकवणीसाठी मी अबूखा पठाण नावाच्या एका मुसलमान मास्तरांच्याकडे जात असे. पठाण हे मुसलमान असूनसुद्धा मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. ते उत्तम शिकवित असत. वागणुकीनेही पठाण मास्तर मोठे सभ्य आणि प्रेमळ गृहस्थ होते. मराठी भाषेची पहिली दीक्षा मी त्यांच्याकडूनच घेतली.

“बेलापूरच्या शाळेत मराठी दुसरीपर्यंत मी होतो. त्यानंतर माझ्या वडिलांची प्रकृती बिघडल्यामुळे माझे वडील, आजी, भाऊ धारशीभाई, माझी बहीण बसंती ऊर्फ बसनबाई आणि मी असे आम्ही सगळेच मुंबईला आलो. मुंबईतही मला एका मराठी शाळेत दाखल केले होते. तिथे मला दुसऱ्या इयत्तेत प्रवेश मिळाला होता. अशा रितीने मी दोन वेळा मराठी शाळेत दाखल झालो होतो. मुंबईला माझ्याबरोबर माझे मोठे बंधू धारशीभाईदेखील होते. आम्हांला मोहनलाल नावाचे मास्तर शिकवित असत. आम्हा दोघा भावांची दोन महिन्यांची आठ रुपये फी त्यावेळी दिल्याचे स्मरते. त्या शाळेत मी दोनच महिने होतो. वडिलांना मुंबईत सुधारणा वाटेना म्हणून आम्ही कच्छमधील आमच्या तेरा नामक गावी आलो होतो. तिथे ते आपले श्वशूर केशवजी शिवजी यांच्याकडून औषधोपचार घेत होते. सुमारे सहा महिने आम्ही तिथे होतो. आमच्याकडे गाय आणि वासरू होते. गावाबाहेरील तळ्यावर आम्ही वासराला घेऊन जात असू. वासरू खट्याळ होते. ते आवरायचे नाही,

आम्हांलाच ओढत न्यायचे. ते मोठे दणकट होते. कच्छमध्ये बहुतेक प्रत्येक गावी छानदार तळे असते.

"तेरला आल्यावर मला गुजराती भाषा येत नसतानाही गुजरातीच्या तिसऱ्या इयत्तेत लालजी मास्तरांनी प्रवेश दिला होता. तेरामधली ही शाळा लालजी मास्तर चालवीत होते. त्या गावातले ते प्रतिष्ठित नागरिक होते. मुंबईत मी दुसऱ्या इयत्तेत असताना थोडासा गुजरातीशी परिचित झालो होतो. लालजी मास्तरांना माझ्या चुणचुणीतपणावरून मी तिसरीचे गुजराती आत्मसात करू शकेन असे वाटले असावे. त्यांचा एक भाचा पाचवीत होता. "परेश विश्वेशा" अशी एक कविता होती. चार महिने प्रयत्न करूनही त्याला या कवितेच्या चार ओळीही पाठ येत नव्हत्या. लालजी मास्तरांनी ती कविता मला सांगितली आणि दहा मिनिटांतच त्या कवितेच्या चार ओळी मी धडधड पाठ म्हणून दाखवल्या. लालजी मास्तर आपल्या भाच्याला म्हणाले, "करमसीची स्मरणशक्ती किती तीव्र आहे ते बघ."

"कच्छहून मुंबईला परतल्यावर मला गुजराती म्युनिसिपल शाळेत घातले गेले. ही शाळा चुनीलाल आणि मोहनलाल मास्तर चालवीत होते. पांजरापोळ भागात त्यांची एक दळणाची गिरणी होती आणि ही शाळा थोड्याच अंतरावरील वडगादीला होती. ते आपला बहुतेक वेळ गिरणीतच घालवीत असत. आम्हा विद्यार्थ्यांना असे सांगून ठेवण्यात आले होते की, जर कधी म्युनिसिपालटीतून शाळा तपासनीस आले तर मास्तर शौचाला गेले आहेत असे त्यांना सांगायचे आणि एका विद्यार्थ्याने चटकन पळत गिरणीकडे येऊन ही बातमी मास्तरांना कळवायची. या चुनिलाल मेहता मास्तरांच्या शाळेत मी गुजराती पाचवीपर्यंत होतो.

पाचवीत असतानाच मला टॉयफाइड झाला. त्या आजरात माझे वजन खूपच कमी झाले होते. मी अशक्त, दुबळा झालो होतो; इतका मी माझ्या बोटातली सोन्याची अंगठी केव्हा गळून पडली हे मला कळलेसुद्धा नव्हते. माझ्या बोटात अंगठी नसल्याचे पाहून माझे वडील खूप रागावले होते. ते त्यावेळी बेलापूरला राहत असत. पण अधूनमधून व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईला येत असत. या आजाराने माझ्या शिक्षणातही अडथळा आला होता. शाळेचे पुष्कळ दिवस बुडाले होते. तेव्हा वडिलांनी माझा अभ्यास भरून येण्यासाठी दोन शिक्षकांची शिकवणी लावली. दोन महिने मी या शिक्षकांकडे शिकलो.

त्यानंतर मी श्री. देवजी ओधवजी चौथानी यांच्या भात बाजारातील शाळेत प्रवेश घेतला. शाळेचे प्रिन्सिपॉल नागर ब्राह्मण होते. ते बडोद्याचे होते. ते नेहमी बडोद्याच्या सयाजीराव महाराजांच्या दरबारात त्यांच्या वडिलांना केवढा मान आहे हे सांगत असत. आपल्या वडिलांच्या उपस्थितीशिवाय महाराजांची मिरवणूक निघत असे. वडिलांना जर विलंब झाला तर महाराजांची मिरवणूकही विलंबाने निघत असे इत्यादी. या शाळेतील व्यायामशिक्षक मुलांकडून शारीरिक व्यायाम करून घेत असत. परंतु मला तो मानवत नसे. घाम सुटत असे आणि तो टाळण्याचाच मी प्रयत्न करीत असे.

“त्यानंतर मी आमच्या घराजवळील कोळीवाड्यातील गोकुळदास तेजपाल या शाळेत प्रवेश घेतला. मी या शाळेत गुजराती सहावीत होतो. तेथील एक शिक्षक श्री. पी. एच. शहा हे फार चांगले, प्रेमळ, हुशार आणि गौरांग महाप्रभूचे परमभक्त होते. काळबादेवी येथील मोरारजी गोकुळदास मार्केटमधील एका घरात ते राहत असत. त्या जागेत दोन विभाग होते. एका भागात विवाहित लोक राहत असत आणि दुसऱ्या भागात अविवाहित राहत असत. आमचे शहा मास्तर अविवाहित होते. रतीलालभाई, शंकरलालभाई आणि मी अशा आम्हा तिघा विद्यार्थ्यांवर शहा मास्तरांचे विशेष प्रेम होते. ते आम्हांला त्यांच्या घरी बोलावत असत. चांगला नाश्ता देत असत आणि आमच्या अभ्यासातील अडचणीही समजावून देत असत. त्या शाळेत दर सहा महिन्यांनी परीक्षा होत असे. पहिली परीक्षा एलेमेंटरी आणि दुसरी ॲडव्हान्स. पहिल्या सहामाहीला आठ आण्यांचे बक्षीस होते आणि दुसऱ्या सहामाहीला एक रुपयांचे बक्षीस होते. पहिली परीक्षा शाळेमार्फतच घेतली जाई. दुसरी परीक्षा इन्स्पेक्टर घेत असत. काही संस्कृतच्याही परीक्षा घेतल्या जात असत. त्यात मला एकदा ऐंशी मार्क्स आणि पाच रुपयांचे बक्षीस मिळाले होते. एकदा आमची परीक्षा सुरू असतानाच शहा मास्तरांची बदली झाल्याची ऑर्डर शाळेच्या व्यवस्थापनाने अकस्मातरित्या काढली होती. हे ऐकून आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला होता. आम्ही याचा निषेधही केला. परंतु व्यवस्थापनाने काही कारण नसताना शहा मास्तरांना नोकरीतूनच काढले. आम्हांला याचे खूप वाईट वाटले.

“त्यावेळी परीक्षेनंतर शिक्षकांना मानपत्र देण्याची पद्धत होती. परीक्षा झाल्यावर सुट्टी लागली. आम्ही तिघेजण शहा मास्तरांच्या घरी गेलो आणि त्यांना मानपत्राच्या रूपाने दहा-बारा रुपये किंमतीची भेटवस्तू दिली आणि आमची त्यांच्याविषयी आदरभावना व्यक्त केली.

“सुट्टी संपल्यानंतर पुनश्च शाळा सुरू झाली. आम्ही तिघांनी असे मानपत्र शहा मास्तरांना दिल्याची बातमी व्यवस्थापनाला कळली तेव्हा त्यातील अधिकाऱ्यांनी आम्हांला बोलावून घेतले. कळलेली बातमी खरी की खोटी याची आम्हांला विचारून शहानिशा करून घेतली. मला आता आश्चर्य वाटते की त्यावेळी मी दहा वर्षांचा मुलगा असतानासुद्धा त्या अधिकाऱ्याला कसे रोखठोक उत्तर देऊन गप्प केले होते. परंतु त्यांनी आम्हांला सांगितले की यापुढे जर या शाळेत तुम्हांला शिकायचे असेल तर केलेल्या कृत्याबद्दल प्रत्येकी एक रुपया दंड दिला पाहिजे. यावर आम्ही सांगितले की शहा मास्तरांबद्दल आम्हांला फार आदर वाटतो. जिव्हाळाही वाटतो. म्हणून आम्ही दंड देणार नाही. शाळा सोडण्याची आमची तयारी आहे. आम्हांला स्कूल लिव्हिंग सर्टिफिकेट द्यावीत. ते म्हणाले की, दंड भरल्याशिवाय सर्टिफिकेट मिळणार नाहीत.

“आम्ही तिघे मित्र आता पुढे काय करायचे” याचा विचार करू लागलो. अकस्मात चुनीलाल आणि मोहनलाल मास्तरांची शाळा मला आठवली. तोवर त्यांनी प्रिन्सेस स्ट्रीट

आणि पायधुनीजवळ पीरभाई बिल्डिंगमध्ये आपली शाळा सुरू केली होती. मी माझ्या दोन मित्रांसह त्यांना जाऊन भेटलो आणि म्हणालो, 'दरमहा प्रत्येकी पाच रुपयेप्रमाणे आम्ही तिघे सहा महिन्यांचे नव्वद रुपये देतो. कृपा करून आम्हांला गुजराती सहावी पास असल्याचे सर्टिफिकेट द्यावे. त्यांनी ते मान्य केले. आम्ही तेवढी फी भरून सर्टिफिकिटे घेतली.

"त्यानंतर मी बोरीबंदरजवळील न्यू हायस्कूल म्हणजेच अलिकडचे भरडा न्यू हायस्कूल या शाळेत प्रवेश मिळविला.

"मी गोकुळदास तेजपाल हायस्कूलमध्ये असताना सतत पहिला नंबर पटकावला होता. तसेच बक्षिसे आणि भेटीही मासिक व सहामाही परीक्षेत मिळविल्या होत्या."

करमसीभाईंचया शिक्षणात अशा प्रकारे सतत अडथळे आले. शाळा बदलाव्या लागल्या. तरीसुद्धा ते जात्याच हुशार व बुद्धिमान असल्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांत त्यांची गणना होत असे. एकदा त्यांना मिळालेल्या पाच रुपयांच्या बक्षिसातून त्यांनी हेडमास्तरांकडे 'इंग्लिश टू गुजराती' आणि 'गुजराती टू इंग्लिश' अशा शब्दकोशांची - डिक्शनऱ्यांची - मागणी केली होती.

संस्कृत भाषेविषयी त्यांना शालेय जीवनापासूनच अत्यंत आवड होती. शाळेत असताना करमसीभाई संस्कृतमध्ये बोलत असत. पण पुढे व्यवसायात उतरल्यावर व्याप वाढला आणि संस्कृत संभाषणाची सवय राहिली नाही. परंतु त्यांच्या ठायीचे संस्कृत-प्रेम मात्र जरादेखील कमी झाले नाही. पुढील आयुष्यात या प्रेमानेच संस्कृत भाषेचा प्रसार करण्याच्या उद्देशाने 'सुरभारती' या नावाची एक संस्था संस्कृतप्रेमी जाणकार मंडळींच्या सहकार्याने सुरू केली.

करमसीभाईंना कच्छी, गुजराती, मारवाडी, संस्कृत, हिंदी, मराठी आणि इंग्रजी अशा सात भाषा येतात. परंतु 'आपली मातृभाषा मराठी आहे, माझा जन्म महाराष्ट्रात झाला आहे' असे ते मोठ्या अभिमानाने सांगतात.

करमसीभाईंचे इंग्रजी भाषेवरही चांगले प्रभुत्व होते. शिक्षणानंतर ते जेव्हा बेलापूरला परतले आणि व्यवसाय करू लागले, तेव्हा बेलापूरात इंग्रजी जाणणारा त्यांच्याशिवाय त्यांचाच एक मित्र अमोलक गदिया नावाचा होता. परंतु तो अहमदनगरला शिक्षणासाठी असल्यामुळे गावातील व्यापारी वगैरे मंडळी त्यांना येणारी इंग्रजी पत्रे आणि तारा वाचून घेण्यासाठी व लिहून घेण्यासाठी करमसीभाईंच्याकडे येत असत. कर्तव्यबुद्धीने करमसीभाईदेखील गावातील लोकांच्या उपयोगी पडत असत.

❖

विवाह कथा

अद्वैतं सुखदु :खयोरनुगुणं सर्वास्ववस्थासु यद-
विश्रामो हदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्यो रस :।
कालेनावरणत्ययात्परिणते यत्स्नेहसारे स्थितं
भद्रं तस्य सुमानुषस्य कथमप्येकं हि तत्प्राप्यते।।

सुखात आणि दु:खात अतूट, सर्व प्रकारच्या परिस्थितीत समरस, हृदयाचा विश्राम असणारे उदात्त प्रेम, ज्याची गोडी वार्धक्यातही अवीट असते आणि जे संकोचाचा पडदा दूर झाल्यावर परिपक्व होते ते प्रेमाचे सार ज्याला लाभते तो खरोखर भाग्यवान!

विवाह कथा

श्री. जेठाभाई सोमैया यांचे करमसीभाई हे द्वितीय पुत्र. यांचा जन्म १६ मे १९०२ रोजी मालुंजा येथे झाला. हे मागे नमूद केलेच आहे. करमसीभाईंना त्यांच्यापेक्षा चार वर्षांनी, म्हणजे १८९८ साली ज्यांचा जन्म झाला ते धारशीभाई नावाचे मोठे बंधू होते आणि बसनबाई - बसंती - नावाची धाकटी बहिण होती. तिचा जन्म ८ फेब्रुवारी १९०७ रोजी झाला होता. म्हणजेच ती करमसीभाईंपेक्षा सुमारे पाच वर्षांनी लहान होती.

करमसीभाई पाच वर्षांचे असतानाच त्यांच्या आईचा भाजल्यामुळे मृत्यू झाला. तो मृत्यू अपघाती होता, असे करमसीभाईंनीच सांगितले आहे. आई वारली त्यावेळी धाकटी बहिण बसंती ही तर सहा महिन्यांचीच होती.

करमसीभाईंच्या मोठ्या भावाला - धारशीभाईंना - त्यांचे आजोबा ठाकरसीभाई यांचा मृत्यू १८९९ साली झाल्यावर ते एक वर्षाचे असतानाच त्यांच्या आजीने त्यांना मालुंज्याहून मुंबईला नेले आणि मोठ्या मायेने वाढवले. धारशीभाईंना मातृप्रेमाची उणीव आजीने भासू दिली नाही. या संदर्भातील पुढची एक आठवण करमसीभाईंनी सांगितली आहे. ते सांगतात, “पाच-सहा वर्षांचा असतानाच मला शिक्षणासाठी मुंबईला नेण्यात आले. आजीजवळच मी आणि माझा भाऊ राहू लागलो. पण आम्हा दोघा भावांना आजीकडून मिळणाऱ्या वागणुकीत मला फरक दिसून येई. धारशीभाईला ती आपल्या मांडीवर झोपवून घेत असे. मलाही तसे तिच्या मांडीवर झोपावेसे वाटे. पण तिने मला तसे झोपण्यासाठी कधीही बोलावले नाही... माझ्या अगदी शिशुवयात, बालवयात आणि पुढे किशोरवयातसुद्धा मला माता-पित्यांचे उत्कट प्रेम अनुभवण्यास मिळाले नाही.”

करमसीभाईंची आई वारल्यानंतर त्यांच्या वडिलांनी सौराष्ट्रातील नेवासा येथील नागजीभाई यांच्या मुलीशी दुसरे लग्न केले. करमसीभाईंना काकूभाई व संभूभाई अशी सावत्र भावंडे होती. संभूभाईंवर करमसीभाईंचे फार प्रेम होते. त्यांच्या अकाली निधनाचे

दु:ख त्यांना फार झाले.

वडिलांप्रमाणे करमसीभाईंचेसुद्धा दोन विवाह झाले. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे करमसीभाईंचा विवाह चौदाव्या वर्षी कच्छमधील मस्का येथे १९१६ साली झाला होता. त्यांची ही पत्नी अल्पशिक्षित, भोळी अशी खेडूत मुलगी होती. तिच्याविषयी करमसीभाई सांगतात, "मी माझ्या पहिल्या पत्नीला चांगल्या तऱ्हेने वागविले नाही. मी तिच्याशी फारच कठोरपणाने वागलो, याची जाणीव मला १९२० साली बेलापूर येथे जेव्हा तिचे अल्पवयातच निधन झाले तेव्हा तीव्रतेने झाली. आजही इतक्या वर्षानंतर मला फार फार पश्चात्ताप होतो."

पहिल्या पत्नीच्या निधनानंतर करमसीभाईंचा दुसरा विवाह १९२२ साली झाला. या दुसऱ्या पत्नीचे नाव साकरबाई असे होते. कच्छमधील रोहा येथे त्यांचे माहेर होते. करमसीभाई हा विवाह कच्छमधीलच त्यांच्या तेरा या गावी घरीच झाला.

विवाहानंतर करमसीभाई मुंबईला आले आणि साकरबाई आपल्या माहेरी रोहा या गावी गेल्या. त्यानंतर जवळ जवळ वर्षभर त्या तिथेच होत्या. कारण त्यावेळी करमसीभाईंना पोटापाण्याचा कसलाच कामधंदा नसल्यामुळे स्वतंत्रपणे घर चालवण्याइतकी कमाई नव्हती. आणि म्हणून ते साकरबाईंना बोलावून घेऊ शकत नव्हते.

तिकडे रोह्याला त्यांचे श्वशुर, आपल्या मुलीला मुंबईला नेण्यासाठी बोलावले जाईल, याची वाट पाहत होते. शेवटी वाट पाहून-पाहून त्यांनी आपल्या मुलीला मुंबईला दयाळजीभाई नावाच्या त्यांच्याच एका नातेवाईकाकडे आणून सोडले. परंतु त्यानंतरही गृहकलहामुळे करमसीभाईंनी साकरबाईंना आपल्या बिऱ्हाडी बोलावून घेतले नाही. या प्रकारामुळे साकरबाईंची फारच कुचंबणा झाली आणि त्यातून त्या आजारी पडल्या.

करमसीभाईंचे वडील जेठाभाई हे जरी तापट स्वभावाचे होते, तरी अंत:करणाने दयाळू होते. आजारी सुनेची ते विचारपूस करत असत आणि डॉक्टरांकडून तिच्यासाठी औषधे आणून ते तिला पाठवित असत. साकरबाईंना थोडे बरे वाटू लागल्यावर सहा महिन्यानंतर घरी नेण्यात आले. कारण लग्न झालेल्या मुलीला आपल्या घरी येत नाही म्हणून त्यांचे नातेवाईकही त्यांच्यावर टीका करू लागले होते.

करमसीभाई सांगतात, "माझी सावत्र आई चांगली होती. परंतु काय असेल ते असो, काही ना काही तंट्यावरून घरात शांतता अशी नव्हती. मुंबईत आम्ही बछानवाला चाळीत राहत होतो. माझ्या वडिलांचा जन्म याच चाळीतील दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीत

झाला होता. आमच्याकडे दोन खोल्या होत्या. एक पहिल्या मजल्यावर व दुसरी दुसऱ्या मजल्यावर. पहिल्या मजल्यावरील खोलीत दिवसासुद्धा अंधार असे, म्हणून दिवा लावावा लागत असे. खोल्याही फार लहान होत्या. आणि म्हणून माझ्या पत्नीला मी तिथे राहायला आणू शकत नव्हतो."

विवाह झाला तरी करमशीभाईंना अशी अडीअडचणींमुळे संसार थाटता आला नव्हता.

❖

कर्मयोगाचे बीज

उद्योगं पुरूषलक्षणम् ।

उद्यमशीलता हे पुरुषाचे लक्षण आहे.

कर्मयोगाचे बीज

तत्कालीन सहावीपर्यंतचे म्हणजे प्री-मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण झाल्यावर करमसीभाईंनी शाळा सोडली. त्यांचे शालेय शिक्षण थांबले. परंतु जीवनाला आवश्यक असे खरेखुरे प्रत्यक्ष अनुभवाचे शिक्षण सुरू झाले. खरे तर माणसाचे आयुष्य हीच त्याची कधीही न संपणारी व जीवनाच्या अंतापर्यंत चालणारी खरीखुरी अशी एक उघडी शाळा असते!

करमसीभाई चार भिंतीच्या बंदिस्त शाळेतून अशा बिनभिंतींच्या उघड्या शाळेत आले!

करमसीभाईंचे मोठे बंधू धारशीभाई हे स्वत: चवथीपर्यंतच शिकलेले होते, पण आपल्या धाकट्या भावाने-करमसीने आय.सी.एस. व्हावे अशी त्यांची फार इच्छा होती. पण तसे होणे नव्हते. आय.सी.एस. होऊन सरकारी यंत्रणेत मोठ्या पदावरचा नोकरशहा बनविण्यापेक्षा एक आगळा-वेगळा हिंमतवान कर्मयोगी घडविण्याचे नियतीनेच ठरविलेले असावे.

शाळेला रामराम ठोकल्यानंतरच्या काळात करमसीभाई काहीच काम नसलेल्या बेकार अवस्थेत काही दिवस होते. त्यावेळी ते वछातमाळा नामक चाळीतील दोन खोल्यांच्या बिऱ्हाडात राहत होते. त्यातली एक खोली पहिल्या माळ्यावर तर दुसरी दुसऱ्या माळ्यावर होती. चाळीत स्वच्छता नावालाही नव्हती. अत्यंत गलिच्छ अशी ती चाळ होती. त्या अंधेऱ्या खोल्यांतून दिवसाही दिवे लावावे लागत असत. परंतु अशा जागेत राहत असतानाही करमसीभाईंच्या मनाचे पाखरू मुक्त भराऱ्या मारतच होते. अंधारात राहून प्रकाशाकडे झेपावत होते. हवेत किल्ले बांधीत होते.

मुख्य विचार हाच होता की, आता काय करायचे? कसला व्यवसाय करायचा?...

एकदा वाटले, की सायकलवरून ठिकठिकाणी वर्तमानपत्रे टाकावीत. त्यासाठी अनेक वर्तमानपत्रांच्या वितरणासाठी एजन्सी घ्यावी, वितरणासाठी आपणच आपल्या शाखा उघडाव्यात. उत्साही, कामसू तरुणांना कामावर ठेवावे आणि त्यांच्याकडून रोजच्या रोज

वृत्तपत्र विक्रीचे पैसे गोळा करावेत...

अशा विविध प्रकारच्या कल्पनांचा खेळ त्यावेळी त्यांच्या तरुण मनात चालत असे. करमसीभाईंच्या बाबतीत एक गोष्ट मात्र फार मोठी स्पृहणीय होती आणि ती म्हणजे त्यांना कुठल्याही कामाबद्दल कमीपणा वाळटत नसे. प्रत्येक कामाकडे ते समदृष्टीनेच पाहत असत. एखादे मोठेच काम मी करणार आणि अमुक एक काम हलक्या प्रतीचे आहे म्हणून मी ते करणार नाही, असे त्यांना कधीही वाटले नाही. हवेत किल्ले बांधतानासुद्धा त्यांनी श्रेष्ठ - आणि कनिष्ठ असा भेद कामाच्या बाबतीत केला नाही, हे वरील उदाहरणावरून स्पष्टच दिसते.

अशा प्रकारे हवेत किल्ले बांधण्याच्या काळात ते वास्तवात येणाऱ्या संधीचीही प्रतिक्षा करीत होते आणि जेव्हा जेव्हा अशा काही संधी उपलब्ध झाल्या तेव्हा तेव्हा ते त्यांना समोर गेलेले दिसतात.

एकदा त्यांनी कॉफी बनवून विकण्याचे ठरवले. त्यासाठी मग कॉफीच्या बिया आणणे, त्या भाजणे, दळणे आणि आणखी काही पदार्थ घालून कॉफीची पावडर बनवणे असा उद्योग सुरू केला. कॉफीच्या पावडरचे एकेका पौंडांचे डबे बनवले. जाहिरातही केली ती अशी होती :

Somaia's
Best
Coffee
1lb. nett Tin.
Somaia Manufacturing Co., Bombay No.3

पिण्यासाठी कॉफी कशी तयार करावयाची याची पद्धती जाहिरातीत दिली होती, ती अशी :

Directions :
Use one table spoonful of Somaia's best coffee to one pint of boiling water.
This Coffee will be found to be a brilliant liquid

अशा कॉफीचे डबे हॉटेलवाल्यांना आणि इतरांनाही विक्रीसाठी तयार करून बाजारात आणले. परंतु कॉफी-पावडर कशी बनवायची असते याचे शास्त्रशुद्ध ज्ञान किंवा माहिती काहीच नसल्यामुळे सोमैयांची बेस्ट कॉफी बाजारात चालली नाही. लोकांच्या टेस्टला ती उतरली नाही आणि म्हणून हा सगळा केलेला उपद्व्याप शेवटी गुंडाळावा लागला.

त्यानंतर 'पुढे काय?'... प्रश्न होताच. तेवढ्यात एकदा कोणी एक अर्जुन गोपाळ सोमैया त्यांना भेटला. त्याने घाटकोपरला काड्यापेट्या बनविण्याचा कारखाना - 'मॅच फॅक्टरा' - उघडली होती. करमसीभाईंनी काड्यापेट्या विकण्याची एजन्सी घेतली. त्यांना धंदाही चांगला मिळाला. दिवाळी जवळ आली होती आणि आणखी चांगला धंदा मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु तेवढ्यातच दुर्दैवाने करमसीभाईंना अर्जुनभाईंची तार मिळाली. त्यांनी कळविले होते की, कारखान्यात संप झाल्याने मालाचे उत्पादन बंद केले असल्यामुळे माल पाठविता येत नाही.

काड्यापेट्याची एजन्सीही बंद झाली आणि करमसीभाई, 'पुढे काय?'... या विचारात पडले.

बेलापूरला करमसीभाई विनाव्यवसायीच होते. काय करावे, हे कळत नव्हते. अशा अस्वस्थ स्थितीत असतानाच एका व्यापाऱ्याने त्यांना विचारले, "काय करतोयस रे?"

करमसीभाईंनी सांगितले, "काही नाही. बसून आहे."

"हरभऱ्याच्या टरफलाची विक्री करतोस?"

करमसीभाईंनी होकार दिला. स्वस्थ बसण्यापेक्षा काहीतरी केलेले बरे. त्यांनी एक-दोन आण्याप्रमाणे बारदान विकत घेतले. त्या व्यापाऱ्याच्या तळघरात हरभऱ्याच्या डाळीच्या टरफलांचे ढीग होते. करमसीभाईंनी तळघरातली टरफले बारदानाच्या भोदात भरली आणि चार आण्याला एक याप्रमाणे भोद विकले. या कामात चार पैसे मिळाले तेव्हा त्यातून सुक्या लाल मिरच्या घेतल्या आणि बाजारात जाऊन विकल्या. त्यातून चार पैसे सुटले तेव्हा खजूर घेऊन विकला... असे बारीकसारीक उद्योग त्यांनी केले, पण तेही फार दिवस चालले नाहीत.

बेलापूरला राहत्या घरासमोरच हरकचंद गदिया यांचे दुकान होते. त्यांची आणि करमसीभाईंची चांगली मैत्री होती. रिकामा वेळ, कामधंदा काही नाही. दुसरीकडे बसायला जागा नाही. म्हणून ते या मित्राच्या दुकानात बसत असत. एकदा बोलता, बोलता हरकचंद गदिया यांच्या सल्ल्याने मसाल्याचे पदार्थ विकण्याचे दुकान काढावे असे ठरले. पण जवळ भांडवल नव्हते. करमसीभाईंच्या भावाचे मित्र जेठाभाई कानजी हे मुंबईला एका मित्राच्या भागीदारीत दुकान चालवीत होते. कमिशन घेऊन माल पाठवित असत. करमसीभाईंच्या भावाने त्यांच्याजवळ ही गोष्ट काढली आणि त्यांनी क्रेडिटवर मुंबईहून बेलापूरला करमसीभाईंकडे मसाल्याचा माल पाठवला.

करमसीभाईंचे बेलापूरात मसाल्याचे दुकान सुरू झाले. दुकानातील विक्रीबरोबरच जमाखर्च. खरेदी-पुरवठा, साफसफाई इत्यादी सर्व कामे ते स्वत:च करीत असत. सगळा

कारभार एकहातीच होता.

एकदा हळदीची पोती मागवली होती, ती आली. ती वाहनातून उतरून घ्यावयाची होती. हमाल लोक त्यासाठी अवास्तव पैसे मागू लागले. तेव्हा करमसीभाईंनी धोतराचा काच्या घातला. कुडत्याच्या बाह्या मागे सारल्या आणि स्वत:च ती पोती उतरून घेतली!

बेलापूरचा आठवड्याचा बाजार दर रविवारी भरतो. अशा आठवड्याच्या बाजाराची प्रथा बहुतेक सर्वत्र तालुक्यांच्या गावी फार पूर्वीपासून आहे. या आठवड्याच्या बाजारात पंचक्रोशीतील खेडूत मंडळी जमतात आणि आठवड्याभराची मिठमिरची इत्यादी गरजेच्या वस्तू खरेदी करतात. त्यात मसाल्याचे पदार्थही असतात. बेलापूरच्या बाजारात मसाल्याचे पदार्थ विकण्याची व्यवस्था करमसीभाईंनी केली होती.

बेलापूरजवळच कोलार नावाचे एक गाव आहे. या कोलारला दरवर्षी देवीची यात्रा भरते. यात्रा मोठी असते आणि ती जवळजवळ महिनाभर चालते. या यात्रेच्या वेळी करमसीभाई आपले मसाल्याचे दुकान तिथे उघडत असत.

दुकान बरे चालले होते. पण काही दिवसांतच त्यावर गंडांतर आले. करमसीभाईच भाऊ धारशीभाई यांना सट्टा खेळण्याचा नाद होता. या धंद्यात त्यांना एकदा मोठा तोटा झाला. त्यांनी मगनलाल कालिदास यांच्याकडून काही कर्ज घेतले होते, ते फेडले नाही. तेव्हा मगनलाल कालिदास यांनी त्यांच्यावर फिर्याद लावली आणि कोर्टाकडून डिक्री मिळवली. त्यांना करमसीभाईंनी बेलापूरला दुकान काढले आहे हे माहित होते आणि सोमैयांचे संयुक्त कुटुंब आहे हेही ठाऊक होते. म्हणून त्यांनी करमसीभाईंच्या दुकानावरच जप्ती आणली. करमसीभाईंना नाईलाजाने दुकान बंद करावे लागले.

त्याच सुमारास साखर खरेदी करून ती विकण्याचा उपक्रम लक्ष्मणदास रामप्रसाद खटोड, एकनाथ सर्जाराम खटोड आणि जेठमल शंकरलाल बागडी अशा तिघा मित्रांनी भागीदारीत सुरू केला होता. करमसीभाई यांच्याकडून साखर घेऊन विकत असत. परंतु पुढे लक्ष्मणदास खटोड यांच्या दुसऱ्या धंद्यातील काही घोटाळ्यांमुळे त्यांनी आपली भागीदारी काढून घेतली. त्यामुळे करमसीभाईंना हा व्यवहारही नाईलाजाने बंद करावा लागला.

करमसीभाईंच्यासमोर पुढे काय?... हा प्रश्न पुन्हा उभा राहिला. बेलापुरात खटोड ही एक मोठी व्यापारी मंडळी होती. त्यांचा साखर खरेदी-विक्रीचा मोठा व्यवसाय होता. जिनीय प्रेस-फॅक्टरीही होती. शोभाचंद खटोड हे करमसीभाईंचे मराठी शाळेतील वर्गमित्र होते. एके दिवशी दुपारी ते आले आणि करमसीभाईंना म्हणाले, "आमच्या जिनीय फॅक्टरीमध्ये नोकरी करतोस का?" त्यावर करमसीभाईंनी तात्काळ त्यांनी सांगितले की आमचे घराणे

परंपरेने श्रीमंतीत वाढलेले आहे. आज आमचा धंदा बसलेला असला तरी मी स्वतंत्र धंदाच करून उभा राहणार. कुणाची ताबेदारी नोकर म्हणून पत्करणार नाही."

करमसीभाईंनी असे तडफदार उत्तर दिल्यावर शोभाचंद खटोड यांनी करमसीभाईंना लगेच विचारले, "मग आमच्या साखरेच्या धंद्यात भागीदार म्हणून येतोस का?" त्यावर करमसीभाईंनी तत्काळ त्यांना होकार दिला.

शोभाचंद खटोड यांनी करमसीभाईंना आपले चुलतबंधू रामधनभाऊ खटो यांना येऊन भेटण्यास सांगितले.

त्यावेळी करमसीभाई घरात एकटेच होते. त्यांच्या पत्नी साकरबाई या बाळंतपणासाठी कच्छला आपल्या माहेरी गेल्या होत्या. करमसीभाईंनी प्रवरा नदीवर जाऊन स्नान केले आणि संध्याकाळच्या वेळेला ते रामधनभाऊंना भेटले. दोघांमध्ये बोलणी होऊन खटोड हे या व्यवसायात कॅपिटल पार्टनर - भांडवली भागीदार आणि करमसीभाई बँकिंग पार्टनर - काम करणारे भागीदार राहतील असे ठरले. भागीदारीचा करार किंवा ते काय देणार, किती व्याज आकारणार, किती भांडवल गुंतवणार वगैरे गोष्टींबद्दल करमसीभाईंनी काहीही विचारले नाही. काम स्वीकारले.

माणसांच्या जीवनात काही योगायोग नियतीने योजलेले असतात. आपल्या भागीदारीच्या संदर्भात करमसीभाईंनी अशीच एक योगायोगाची गोष्ट सांगितली आहे ती अशी :

करमसीभाई एकदा कोर्टाच्या कामासाठी अहमदनगरला गेले होते. बीरजीभाई नारायणजी नावाच्या व्यापाऱ्याकडे उतरले होते. ते करसनदास मिस्त्री या फर्मच्या नावे व्यापार करीत होते. त्यांचा व्यापार अहमदनगर शहरात मोठा होता. बेलापुरातही त्यांचे काही गिऱ्हाईक होते. ते काहीसे तापट स्वभावाचे होते. बेलापूर येथील गोकूळ विश्राम नावाच्या एका व्यापाऱ्याशी देवाणघेवाण करताना काही मतभेद झाले. करमसीभाई जेव्हा अहमदनगरला त्यांच्याकडे गेले होते तेव्हा ते तसे रिकामेच होते. व्यवसाय - धंदा करीत नव्हते. म्हणून त्यांनी बेलापूरला आपल्या भागीदारीत धंदा करण्याची सूचना करमसीभाईंपुढे मांडली. परंतु त्यांचे वाक्य पूर्ण होण्याच्या आधीच करमसीभाईंनी त्यांना सांगितले, "भागीदारीसाठी माझे ग्रहमान अनुकूल नाही." आणि त्यांनी ती सूचना धुडकावून लावली. परंतु खटोडांच्या बाबतीत मात्र त्यांनी तपशीलात कसलीही चर्चा न करता त्यांची भागीदारी स्वीकारली आणि साखरेचा व्यवसाय सुरू केला. ही घटना १९२७ सालातली आहे.

खटोडांशी भागीदारी स्वीकारल्यानंतर करमसीभाई घरी आले. ट्रंक, बळकटी घेऊन त्यांनी लगेच स्टेशन गाठले आणि ते मुंबईला आले. मुंबईत त्यांनी बेलापूर शुगर फॅक्टरीचे

सोलएजंट मूलचंद मोहनलाल यांच्याकडून साखरेची पंधराशे पोती खरेदी केली. त्यानंतर करमसीभाई साखर विक्रीसाठी दौऱ्यावर निघाले. नाशिक, खानदेश, वऱ्हाड, निजाम स्टेट आणि मध्य प्रदेशातसुद्धा ते गावोगावी पोचले. ठिकठिकाणच्या व्यापाऱ्यांना गाठून त्यांनी साखर विक्रीचा उत्तम व्यापार साधला.

पहिल्या वर्षी म्हणजे १९२८ साली करमसीभाईंना साखरेच्या या व्यवहारात आठशे रुपयांची कमाई झाली, ती दुसऱ्या वर्षी १९२९ साली सहाशे रुपयांची प्राप्ती झाली. ही रक्कम तशी फार लहान होती. परंतु त्यांनी मोठ्या नेटाने व जिद्दीने हा व्यवसाय पुढे चालूच ठेवला. या व्यवसायात असताना त्यांना अनेक गावांना जावे लागले. जवळजवळ सगळा महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि काहीसा मध्यप्रदेशसुद्धा हिंडावा लागला. विविध गावे, निसर्गस्थळे, व्यापारी व अन्य लोकजीवन न्याहाळायला व अनुभवायला मिळाले. व्यवसायात विविध प्रसंगांनाही सामोरे जावे लागले. कधी नफा तर कधी तोटा असे चढउतारही अनुभवावे लागले.

एकदा करमसीभाई म्हणाले, "१९३० साल होते. भल्या सकाळीच मी बेलापूरला प्रवरा नदीवर स्नानास गेलो होतो. स्नान करून घरी परत येत असताना एक गृहस्थ मला भेटले आणि म्हणाले, "साखरेच्या बाजारात बराच चढउतार झाला आहे याची माहिती आहे काय? साखरेचे भाव बरेच चढलेले आहेत अशी बातमी आहे." हे कळताच मी बेलापूरातील दुसरे एक साखर व्यापारी जेठामल शंकरलाल बागडी यांच्या दुकानी गेलो. तेही कमिशन एजंट होते. त्यांचे भागीदार कन्हैयालाल लखोटिया हे त्यावेळी दुकानात नव्हते. परंतु कंपनीचे मॅनेजर बाबूराव खंडाळकर हे तिथे होते. मी त्यांना नेहमीप्रमाणे साखरेचे भाव विचारले. पण त्यांच्या सांगण्यावरून साखरेचे भाव वाढल्याचे त्यांना कळलेले नसावे असे माझ्या लक्षात आले. त्यावेळी बेलापूर शुगर फॅक्टरी नंबर एक आणि नंबर दोन अशा दोन प्रकारची साखरनिर्मिती करीत असे. साखरेचे ग्राहक नंबर दोनची, किंचित तांबूस रंगाची, साखर खरेदी करत असत. त्यांची अशी समजूत होती की तांबूस रंगाची ही साखर स्वदेशी असून नंबर एकची सफेद रंगाची साखर ही परदेशी आहे. परंतु त्यात तथ्य नव्हते. रंगाचा फरक सोडल्यास दोन्ही साखरेत दुसरा कसलाही फरक नव्हता. मी बाबूरावांना सांगितले की दोन्ही प्रकारच्या साखरेची बरीचशी पोती नेहमीप्रमाणे माझ्या नावे खरेदी टाकून लिहून ठेवा. त्यांतही नंबर दोनच्या साखरेची पोती मोठ्या प्रमाणावर मी खरेदी केली होती. त्यांतील माझी पहिली ऑर्डर रजिस्टरमध्ये नोंदवून घेतल्यावर मी पुन्हा आणखी काही दोन्ही प्रकारच्या साखरेची खरेदी नोंदविली. त्यानंतर पुन्हा मी आणखी काही पोत्यांची खरेदी नोंदविली. अशा प्रकारे एकूण पंधराशेच्या वर साखरेची पोती मी खरेदी करून टाकली. त्यावेळची ही मोठीच खरेदी होती. त्यावेळी साखर १० रुपये मण होती. या साखरेचे अडीच

मणांचे पोते २५ रुपयांस होते.

"त्यानंतर मी घरी आलो. काही वेळाने कन्हैयालाल त्यांच्या दुकानी गेले. बाबूरावांनी त्यांनी मी केलेल्या खरेदीची माहिती दिली. ती ऐकताच यात काहीतरी भानगड आहे अशी त्यांना शंका आली. काही वेळाने वर्तमानपत्र आले आणि त्यात साखरेचे भाव वाढल्याची बातमी कळताच त्यांच्या मनात मोठी खळबळ उडाली. त्यांनी माझ्या एवढ्या मोठ्या खरेदीवर आक्षेप घेतला. इतरही साखरेचे व्यापारी मग्निराम फकेरचंद यांच्या दुकानी गोळा झाले आणि त्यांनी हा व्यवहार मुंबईला बेलापूर कंपनीच्या ऑफिसला कळवून माझ्या व्यवहारावर हरकत घेतली. परंतु जो धंदा जसा झालेला आहे, तो आम्हांला मान्य आहे असे मुंबईहून कंपनीचे उत्तर आले. या घटनेने माझ्या जीवनाला एक मोठे वळण मिळाले.

"खटोडांच्या भागीदारीत या व्यवहारात शिरताना मी, ते किती रक्कम गुंतवणार, त्यावर किती व्याज आकारणार आणि मला किती रक्कम देणार इत्यादींची काहीच चौकशी केली नव्हती. दिवाळीच्या सुमारास फर्मचे जमाखर्च पुरे होत असत. त्यावेळी मला रुपयातील सहा आणे नफा मिळाला. गुंतवलेल्या रकमेवर नऊ टक्के व्याज आकारले होते. दुसऱ्या वर्षी नफा सात आणे आणि व्याज दहा टक्के आणि अशाच प्रकारे यात वाढ होता होता पन्नास टक्के नफा भागीदारीत मिळू लागला. माझ्या व्यावसायिक प्रगतीचे द्वार खुले झाले."

साखर-विक्रीच्या व्यवसायातही करमसीभाईंनी अनुभवातून आपली स्वत:ची अशी एक पद्धत निर्माण केली होती. ते स्वत: गावोगावी जात असत. त्या काळात रस्ते धड नसत. वाहतुकीची साधने नसत. पण करमसीभाई या अडचणींचा बाऊ न करता मिळेल तशा वाहनाने जात असत. अनेक वेळा तर ते वाहनाच्या अभावी पायीच चालत जात असत. गावात पोचल्यावर तिथल्या व्यापाऱ्यांना भेटत असत आणि त्यांच्याशी बोलून त्यांची साखरेची मागणी नोंदवून घेत असत. प्रत्येक व्यापाऱ्याशी ते प्रत्यक्ष संबंध जोडीत असत. या व्यवहारात त्यांनी चिकाटीबरोबरच सचोटी पाळण्याचा काटेकोर प्रयत्न केला होता. त्यांनी व्यापारात कधी चुकूनही गैरमार्गाचा अवलंब केला नाही. एकच भाव आणि एकाच प्रकारचा मालाचा दर्जा तो कसोशीने सांभाळीत असत. एखादे वेळी एका व्यापाऱ्याकडून जर एका भावाने ऑर्डर नोंदवून घेतली असेल आणि जर नंतर काही कारणाने दुसऱ्या व्यापाऱ्याला कमी दर दिला असेल, तर ते पुन्हा पहिल्या व्यापाऱ्याकडे जाऊन त्याचा वाढीव दर कमी करत असत आणि तशी ऑर्डर नोंदवून घेत असत. वागणुकीतला साधेपणा, निर्व्यसनीपणा आणि बोलण्यातला प्रांजळपणा याची छाप त्या व्यापाऱ्यांवर पडत असे. वरचेवर आलेल्या संबंधातून ठिकठिकाणाच्या व्यापाऱ्यांशी करमसीभाईंचे एक प्रकारे कौटुंबिक संबंध निर्माण झाले होते. त्यामुळे करमसीभाईंना जसा आपल्या व्यवसायांतर्गत

आत्मविश्वास उत्पन्न झालेला होता तसाच त्यांच्या ग्राहक व्यापाऱ्यांमध्येही त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झालेला होता.

बेलापूर शुगर फॅक्टरीप्रमाणेच करमसीभाई वालचंद शेटजींच्या रावळगाव शुगर फॅक्टरीची आणि डहाणूकरांच्या बेलवंडी व टिळकनगर येथील महाराष्ट्र शुगर फॅक्टरीचीही साखर विक्रीसाठी घेत असत. करमसीभाई हे त्यांचे फारच मोठे शुगर एजंट होते.

❖

गोरक्षण

यो वै नित्यं पूजयति गां गेहे यवसादिभि :।
तस्य देवाश्च पितरो नित्यं तृप्ता भवति हि ।।

जो गायीची घरी नित्य गवत वगैरे देऊन सेवा करतो
त्याचे पितर आणि देव नित्य तृप्त असतात.

गोरक्षण

हिंदू धर्मात गायीला मातेची प्रतिष्ठा आणि आदर दिलेला आहे. जगन्माता, भूमाता, जन्मदा, तशीच गोमाता. 'ज्याचे घरी गाय। तेथे विठ्ठलाचे पाय।।' अशी गायीबद्दलची भक्तीभावना!

करमसीभाईंच्या मनीमानसी हीच भक्तीभावना. ते तरुण वयाचे असल्यापासूनच, वसत आहे. ते परम गोभक्त आहे. गोसेवा हे त्यांचे एक व्रतच आहे. तरुणपणी ते जेव्हा व्यवसायाची नव्याने मांडामांड करीत होते तेव्हाचीच एक गोष्ट आहे :

बेलापुरात तेव्हा करमसीभाईंनी मसाल्याचे पदार्थ विकण्याचे दुकान सुरू केलेले होते. पण व्हावी तशी प्राप्ती दुकानातून अजून होत नव्हती. तुटपुंज्या मिळकतीत कसाबसा संसार चाललेला होता. पण दुष्काळातील गायींना खाऊ घालण्यासाठी गवत-चारा विकत घेण्याची कुवत नव्हती; म्हणून त्यांनी गायीचे दूधच कितीतरी दिवस वर्ज्य केले होते. ते त्या दिवसांत गायीचे दूध पीत नसत. पुढे जेव्हा गायीसाठी गवत खरेदी करण्यासारखी कमाई होऊ लागली तेव्हा गायीला चारा देऊन ते देऊन ते दूध घेऊ लागले.

१९१८ साली अहमदनगर जिल्ह्यात फार मोठा उग्र दुष्काळ पडला होता. लोकांची उपासमार होत होती. जनावरे अन्नपाण्यावाचून व्याकूळ झाली होती. गायी भुकेने व्याकूळ होऊन मरू लागल्या होत्या. करमसीभाई आणि त्यांचे काही मित्र यांना हे दृश्य पाहून फारच दुःख झाले. गायींचे प्राण वाचण्यासाठी काहीतरी केले पाहिजे असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. म्हणून त्यांनी एका मंदिरात गावातल्या मंडळींची एक सभा आयोजित केली. त्या सभेपुढे त्यांनी हा प्रश्न मोठ्या पोटतिडकीने मांडला. तेव्हा काही जणांनी गायींच्या चाऱ्यासाठी तीस-चाळीस रुपये देणगी देण्याचे आश्वासन दिले. काही जणांनी ज्वारीचा कडबा देऊ, असे सांगितले. परंतु एवढ्याने भागणारे नव्हते.

त्यावेळी त्यांच्या हाती रोख पंचवीस रुपयेच फक्त पडले होते. त्याच्या दुसरे

दिवशीच सकाळी त्यांच्यापैकीच एकाने बाजारातील गायी नाममात्र किंमतीला विकत घेऊन खाटिकखान्याकडे कत्तलीसाठी घेऊन जाणारे खाटीक लोक पाहिले. त्याने हे येऊन सांगितल्यावर करमसीभाईंनी जमवलेले पंचवीस रुपये त्या खाटकांना देऊन कत्तलीसाठी चालवलेल्या गायींची सुटका केली. आणखीही काही उपाशी गायी त्यांच्याकडे आल्या होत्या. इतक्या सगळ्या गायींना कसे पोसायचे, असा फारच मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा ठाकलेला होता. काय करावे, सुचत नव्हते, मार्ग दिसत नव्हता. करमसीभाईंनी वर सांगितल्याप्रमाणे स्वत: गायीचे दूध घेणे बंद करून टाकले होते, पण एवढ्या गायींचे प्राण वाचवायचे कसे, याची चिंता होती. विचार करताकरता त्यांना महात्मा गांधींजींचे नाव आठवले. गांधीजी त्यावेळी देशातले सर्वात मोठे नेते मानले जात होते. ते स्वत: गोभक्त होते आणि स्वराज्याच्या कामात त्यांनी खादी-ग्रामोद्योगाप्रमाणे गोसेवाही समाविष्ट केली होती. तेव्हा गांधीजी या प्रश्नावर काही मार्ग दाखवतील अशी आशा त्यांना वाटली. म्हणून त्यांनी गांधीजींचा दौरा वर्तमानपत्रात पाहून त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी पत्र लिहिले. उत्तर आले नाही, म्हणून पुन्हा पुन्हा लिहिले. पण गांधीजींच्याकडून त्यांच्या या पत्रांना उत्तरे मिळाली नाहीत. आपल्या पत्रांतून त्यांनी आपल्याकडील गायींच्या हलाखीची स्थिती गांधीजींना कळवली होती व त्यावर मार्गदर्शन करण्याची विनंती केली होती. वृत्तपत्रांतील गांधीजींच्या दौऱ्याची ठिकाणे पाहून लिहिलेल्या पत्रांना जेव्हा उत्तरे आली नाहीत, तेव्हा त्यांनी गांधीजींच्या त्यावेळच्या अहमदाबादजवळील साबरमती आश्रमाच्या पत्त्यावर पत्र लिहिले. त्या पत्राचे उत्तर मात्र आले. ते, त्यावेळचे गुजरातचे काँग्रेसचे एक नेते, खंडूभाई देसाई यांनी लिहिले होते. त्यांनी म्हटले होते की, "त्यांची पत्रे गांधीजींच्या मुक्कामावर जेव्हा पोचत असत तेव्हा गांधीजींचा मुक्काम तिथून हललेला असे आणि तो पुढे गेलेला असे." खंडूभाईंनी कळवले होते की, "गांधीजी आपल्यापरीने गाईंचे संरक्षण, आपल्या योजनेनुसार करीत आहेत. आपणही आपल्याकडील स्थानिक परिस्थितीनुसार योजना आखून गोरसंक्षणाचे काम करावे. आजच्या परिस्थितीत गांधीजी काही करू शकणार नाहीत."

खंडूभाईंच्या या उत्तराने करमसीभाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांची निराशा झाली. पण असे निराश होऊन व स्वस्थ बसून भागणार नव्हते. काहीतरी करावेच लागणार होते. म्हणून गांधीजींना प्रत्यक्ष भेटूनच सर्व सांगावे व मार्गदर्शन घ्यावे, असे ठरले.

काँग्रेसचे पस्तिसावे अधिवेशन २६ डिसेंबर १९२० रोजी मद्रासचे देशभक्त चक्रवर्ती विजय राघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला भरणार होते. शेठ जमनालाल बजाज हे स्वागताध्यक्ष होते. गांधीजी या अधिवेशनासाठी नागपूरला येणार होते. तेव्हा नागपूरला जाऊन गांधीजींना भेटण्याचे करमसीभाईंनी ठरवले. त्यांच्याबरोबर बेलापूरचाच त्यांचा तरुण मित्र अमोलख गदिया हाही येणार होता. तो शिक्षणासाठी अहमदनगरला राहिला होता. दोघांनी मिळून नागपूरला जाण्याचे निश्चित केले. परंतु ठरलेल्या वेळी बेलापूरच्या

स्टेशनवर गाडी सुटण्याची वेळ झाली तरी, तो काही आलाच नाही. म्हणून मग करमसीभाई एकटेच नागपूरला गेले.

गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीने सारा देश ढवळून निघालेला होता. एक नवीन चैतन्य देशात सळसळू लागले होते. जनतेच्या हृदयातील तोवरची दु:खे बाहेर फोडण्यास व परकीय सरकारी धोरणाविरुद्ध होत असलेल्या अंत:करणातील कोंडमाऱ्यातून मोकळे होण्यास अनुकूल आणि योग्य असे राजकीय वातावरण काँग्रेसमध्ये दिसत असल्यामुळे नागपूरला अलोट गर्दी झाली होती. शेकडो प्रतिनिधी आणि कार्यकर्ते आले होते. याच अधिवेशनात गांधीजींचा असहकारितेचा ठराव प्रचंड बहुमताने पास झाला. गांधीजींचा शब्द हाच त्या राष्ट्रीय सभेत हुकुमी ठरला. गांधीजींचे राष्ट्रीय महत्त्व अनन्यसाधारण होते!

अशा गांधीजींची एवढ्या प्रचंड गर्दीत कशी भेट व्हावी?...

करमसीभाई नागपूरला तर आले. त्यांच्यासाठी गदिया लोटा घेऊन येणार होता पण तो न आल्याने व हरकामी लोटा त्यांच्याजवळ नसल्याने त्यांनी तो नागपूरच्या बाजारात जाऊन विकत घेतला आणि लोकांच्या निवासासाठी जे तंबू उभारलेले होते, त्या एका तंबूतच आश्रय घेतला. मणीलाल गिरधरलाल जंत्रालिया या नावाचा एक स्वयंसेवक त्यांना तिथे भेटला आणि तो त्यांचा मित्रच बनला.

नागपूरला जाण्यापूर्वीपर्यंत करमसीभाई हे सर्वांप्रमाणेच परदेशी कापडाचे कपडे वापरीत असत, परंतु नागपूरला जाताना त्यांनी स्वदेशी गिरणीच्या कापडाचे कपडे बनविले होते आणि नागपूर काँग्रेसहून परतल्यावर मात्र त्यांनी शुद्ध खादी वापरण्यास सुरूवात केली. त्यावेळची खादी फारच जाडीभरडी असे.

गांधीजींना भेटण्यासाठी गर्दीतून घुसत घुसत तरुण करमसीभाई त्यांच्या निवासापर्यंत पोचले. पण तिथे गांधीजींच्या भेटीसाठी मदनमोहन मालवीय आणि इतरही देशातले मोठमोठे पुढारी तिष्ठत बसलेले होते. अशा स्थितीत गांधीजींची भेट मिळणे अशक्यच होते. तेव्हा निराश मनाने करमसीभाई आपल्या तंबूत परतले.

काँग्रेसचे अधिवेशन म्हणजे एक जत्राच होती, आणि जत्रा म्हटली की हौशे-नौशे-गौशे गोळा होतातच. तसे तिथेही हे लोक गर्दीत घुसलेले होते. गर्दीचा फायदा घेऊन त्यातील काही चोरट्यांनी तंबूत घुसून प्रतिनिधींच्या वस्तूही पळवल्या होत्या. मोठ्या प्रमाणावर चोऱ्या झाल्या होत्या. हा सगळा प्रकार पाहून, गांधीजींच्या भेटीसाठी अधिक प्रयत्न न करता, करमसीभाईंनी नागपूर सोडले.

मध्यंतरीच्या काळात मुंबईमधील 'ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन'च्या अधिकाऱ्याला

बेलापूरातील काही मंडळी गायींच्या प्रश्नावरून भेटली होती. असोसिएशनने श्री. हरिदासभाई यांना आपले प्रतिनिधी म्हणून बेलापूरला पाठविले होते. हरिदासभाई हे स्वत:च मोठे गोभक्त होते. उत्तम कीर्तनकार होते. त्यांनी बेलापूरला येऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली आणि गाई-बैलांचे प्राण वाचवण्यासाठी धडपणारे करमसीभाई आणि त्यांचे सहकारी यांना मोठीच मदत केली.

❖

गांधी प्रभाव

सत्य-अहिंसा यस्य बहुमता विविधर्मसमता।
अपरिग्रहता विश्वबन्धुता श्रीगीतामाता।।
विजयते भारतराष्ट्रपिता।।



ज्याला सत्य, अहिंसा, विविध धर्मांचा समभाव, अपरिग्रह, विश्वबन्धुता आणि माता गीता प्रिय होती - त्या भारताच्या राष्ट्रपित्याचा विजय असो.

गांधी प्रभाव

गांधीजींच्या व्यक्तीमत्त्वाचा, शिकवणुकीचा आणि आचार-विचारांचा फार मोठा प्रभाव करमसीभाईंच्या तरुण, संवेदनशील व संस्कारक्षम मनावर त्या काळी जो पडला तो वाढत्या क्रमाने उत्तरोत्तर दृढ होत गेला.

गांधीजी हे राजकारणी संत होते किंवा क्रांतीकारक संत होते.

संतांचे धर्मकारण किंवा आध्यात्मिक साधना गांधीजींनी तत्कालीन राजकारणाच्या पाठीशी उभी केली होती. राजकारणाला अध्यात्माचा पाया देण्याचा प्रयत्न त्यांचे राजकीय गुरू ना. गोपाल कृष्ण गोखले यांच्याप्रमाणेच गांधीजींचाही होता आणि म्हणूनच साध्य आणि साधन यांच्या शुचितेचा ते आग्रह धरीत असत. त्यांनी सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा अखंड उद्‌घोष याचसाठी केला आणि सत्य आणि अहिंसा या तत्त्वगुणांच्या बळावर या देशात जागृत, प्रतिकारक्षम, शूर सत्याग्रहींची एक अभिनव लोकशक्ती निर्माण केली आणि अभेद्य मानल्या गेलेल्या साम्राज्यशाहीला धक्के दिले आणि अखेरीस ती उलथून पडली.

गांधींच्या व्यक्तिमत्त्वामधले हे अद्‌भूत आणि सात्त्विक क्रांतीकारकत्व आणि 'वैष्णवजन तो तेणे कहिए। जो पीड परायी जाणे रे।।' अशा आर्त भावनेने दुसऱ्याचे दु:ख आपलेच समजणाऱ्या आणि त्याच्या निवारणासाठी झटणाऱ्या संताचे साधुत्व सज्जनांना मोहित करणारे होते. लुब्ध करणारे होते. करमसीभाईंच्या जीवनावर याचा प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही. कारण मुळात त्यांचाही पिंड अशाच तऱ्हेचा होता. त्याला पोषक अशीच गांधीजींची शिकवण होती. गांधीजींचा करमसीभाईंच्या मनावर एवढा प्रभाव पडला होता की, गांधीजींना १९२२ साली सहा वर्षांची शिक्षा ठोठावली गेली तो दिवस शनिवार होता. म्हणून तिथून पुढे गांधीजींची सुटका होईतोपर्यंत करमसीभाई दर शनिवारी निराहार पाळत असत.

नागपूर-काँग्रेसहून परतल्यावर करमसीभाईंनी गांधीजींच्या स्वदेशीचा आग्रह शिरसावंद्य मानू अंगावरील परदेशी कपड्यांचा त्याग केला. करमसीभाई खादीधारी

बनले. खादीचे जाड धोतर, खादीचा कुडता आणि खादीची गांधीटोपी असा वेष त्यांनी परिधान केला. इतकेच नव्हे तर गांधीजींच्या खादीचा लोकांत प्रचार करण्यासाठी त्यांनी स्वत:च्या दुकानातच एक खादीविक्रीचा विभाग - खादीभांडारच सुरू केले. या खादीभांडारासाठी दहा रुपयांचा एक शेअर याप्रमाणे त्यांनी दोनशे रुपये जमा केले होते. जयपूरहून खादी खरेदी करून ती त्याच किंमतीत बेलापुरात विकली जात असे. एक पैसाही नफा घेतला जात नसे; तर त्यासाठी होणारा खर्चही तेच करीत असत. मित्रांच्या सहकार्याने आसपासच्या खेड्यापाड्यांतूनही खादीचे तागे पाठीवर घेऊन, हिंडून त्यांनी प्रचार केला. त्या काळी सर्व देशभर अशा तऱ्हेची खादीच्या प्रचाराची एक लाटच उसळली होती. 'जनहो खादी वापरा, आपुला देश उद्धरा', 'चरखा चला चलाके, लेंगे स्वराज्य लेंगे।' 'अरे ही गांधीची टकळी इंग्लंडच्या बोकांडी बसली।'... अशा तऱ्हेची खादी, चरखा, टकळी यांची म्हणजेच पर्यायाने स्वदेशीचे महत्त्व गाणारी गाणी त्यावेळी गावागावातून निघणाऱ्या प्रभातफेऱ्यांमधून मोठ्या जोषाने व उत्साहाने म्हटली जात असत. गावागावांतील देशभक्त, आबालवृद्ध स्त्री-पुरुष या प्रचारफेऱ्यांत सामील होत असत. बेलापुरात निघणाऱ्या प्रभातफेरीत तरुण करमसीभाईदेखील तेवढ्याच सळसळत्या उत्साहाने भाग घेत असत.

१९२७-२८ साल असावे. गांधीजींचा दौरा नगर जिल्ह्यात सुरू होता. त्यावेळी बेलापूरलाही गांधीजींचे आगमन झाले होते आणि त्यांच्या स्वागतासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये करमसीभाई अग्रगण्य होते. रावसाहेब पटवर्धन, स्वामी सहजानंद भारती, कुंदनमलजी फिरोदिया आदी मंडळी त्यावेळी जिल्ह्यातील काँग्रेसच्या नेतेपदी होती. गांधीजींची मोठी सभा बेलापुरात झाली. त्या सभेला आपल्या पत्नी साकरबाई यांनाही करमसीभाईंनी नेले होते.

बेलापुरात येथील 'मर्चंटस् असोसिएशन'च्या वतीने गांधीजींना मानपत्र देण्यात आले होते. त्या मानपत्रात पुढीलप्रमाणे मजकूर होता. :

> प्रिय महात्माजी,
>
> आपल्या आगमनाने अत्यंत आनंदित होऊन आम्ही मोठ्या प्रेमाने आपले स्वागत करतो.
>
> व्यापारांत नावाजलेल्या समाजामध्ये आपला जन्म, स्वत:च्या व तद्द्वारा राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीकरीता झटणे हे आपल्या वर्गाचे कर्तव्य. परंतु आपल्यासारख्या असामान्य विभूतींस हे संकुचित क्षेत्र कसे पुरणार? अर्थातच आपण आपल्या अलौकिक बुद्धिचातुर्याने जगाच्या उन्नतीकरिता सारखे झटत आहात.
>
> प्रमुख धर्मातील तत्त्वे आत्मसात करून जगताची धारणा उत्तम प्रकारे होईल

अशी अमूल्य संधी आपण प्रतिपादित आहात. अखिल मानव जमातीत शांतता नांदावी म्हणून आपले जे अव्याहत श्रम चालू आहेत त्यामुळे आपले नाव या भुवनीतलावर अजरामर होऊन राहील.

परदास्यात खितपत पडलेल्या व तेजोहीन झालेल्या राष्ट्रांना आपण अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग दाखविला. या सत्याग्रहाच्या योगाने प्रबळ राष्ट्रांशी झगडून दुबळ्यांनाही स्वातंत्र्य कसे मिळविता येते ते आपण आपल्या उदाहरणाने सिद्ध केले.

सध्याच्या यांत्रिक युगात उद्योगाच्या अभावी उपाशी मरणाऱ्या कोट्यवधी गरीबगुरिबांना आपण चरख्याचा मंत्र देऊन अन्न पाण्यास लावले. हाच मंत्र सर्व लोकांत ऐक्य भाव उत्पन्न करून राष्ट्राचे आत्मबल वाढवील.

मातृभूमीच्या सर्वांगीण उन्नतीसाठी ईश्वराने आपल्याला दीर्घायुष्य व आरोग्य द्यावे अशी त्या दयाघनाच्या चरणी आम्ही अनन्य भावाने प्रार्थना करतो.

मर्चंटस् असोसिएशन
बेलापूर

साखर विक्रीचा व्यवसाय करीत असतानाच करमसीभाई अशा प्रकारे राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊन आपली देशभक्ती आणि स्वातंत्र्यप्रीती व्यक्त करीत असत.

परदेशी कापडावर जसा त्यांनी बहिष्कार टाकण्याची चळवळ चालवली होती, तशीच परदेशी साखर आणि केशर या वस्तूंवरही बहिष्कार टाकल्याची चळवळ त्यांनी त्या सुमारास चालविली होती. त्या वेळी जावा, सुमात्रा इत्यादी देशांतून साखर आयात केली जात असे. साखरेप्रमाणेच केशराचीदेखील आयात होत असे. या परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याच्या मोहिमेत तर करमसीभाईंनी सक्रीय भाग घेतला होता. त्यांचा चिरंजीव शांतीलाल हा त्यावेळी लहानगाच होता. पण त्याच्या नावाने त्यांनी खडीसाखर बनवण्याचा कारखाना सुरू केला होता आणि

'शुद्ध स्वदेशी पवित्र खडीसाखर.
बनाववानुं कारखानुं : - बेलापूर.'

अशी त्याची जाहिरातही केली होती.

इंग्रजी 'एन्सासायक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिका', 'डिक्शनरी ऑफ आर्टस्', 'शुगर मशिनरी' वगैरे युरोपियन मंडळींनी लिहिलेले ग्रंथ, डॉक्टर्स आणि विद्वान तसेच आपल्या देशातील पंडित, वर्तमानपत्रे आणि गांधीजींचे 'नवजीवन' हे वृत्तपत्र या सर्वांमधून आलेली परदेशी साखर आणि केशर यांच्या आरोग्यास हानिकारक अशा बनावटीची माहिती देणारी पत्रकेही करमसीभाईंनी, प्रेमजी हरकचंद आणि जोबानपुत्रा यांच्या सहाय्याने,

‘परदेशी साकर अने केशर हिंदुओ वास्ते धार्मिक, आर्थिक, नैतिक अने आरोग्यनी दृष्टीये त्याज्य छे.’

अशी गुजराती भाषेतून छापून प्रसारित केली होती.

अशा प्रकारे आपला व्यवसाय सांभाळीत राष्ट्रीय आघाडीवर करमसीभाई बेलापूर भागात विधायक कामात अग्रेसर होते. अर्थातच इंग्रज सरकारच्या पोलिसांचे लक्ष करमसीभाईंच्या हालचालींवर होतेच. त्यामुळे गांधीजींच्या मिठाच्या कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळी पोलिसांची वक्रदृष्टी त्यांच्याकडे वळल्याशिवाय राहिली नाही. १९३० साली गांधीजींनी मिठावरील कराचे निमित्त करून ‘मिठावरील कायदा रद्द करावा’, अशी मागणी सरकारकडे केली व त्यासाठी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. गुजरातमधील साबरमती या गावापासून त्यांनी देशातील निवडक सत्याग्रहींसह समुद्रकिनाऱ्यापर्यंत पदयात्रा काढली आणि दांडीजवळ समुद्रकाठचे मीठ उचलून ‘नमक का कायदा तोड दो’ अशी घोषणा करून सत्याग्रह केला. देशभर समुद्रकिनाऱ्यावर तिथल्या तिथल्या लोकांनी अशा प्रकारे कायदेभंग केला. सरकारने आपले पाशवी दमनचक्र चालवून अनेक ठिकाणी लाठीहल्ला, गोळीबार करून अटकसत्र मोठ्या प्रमाणावर सुरू केले. हजारो सत्याग्रही तुरुंगात गेले. देशात पुनश्च नव्याने स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले!

करमसीभाईंनी कायदेभंगाच्या चळवळीत प्रत्यक्षपणे कधीही भाग घेतला नाही, तरी अशा चळवळींना सक्रिय पाठिंबा मात्र सततच दिला.

कायदेभंगाची चळवळ फोफावत गेली आणि पिसाळलेल्या सरकारने आपले दडपशाहीचे अत्याचारी तंत्र जोरात सुरू ठेवले. चळवळीत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांना तर तुरुंगात डांबलेच, पण चळवळीत प्रत्यक्षपणे भाग न घेणाऱ्यांनाही पकडून तुरुंगात टाकले.

बेलापूरच्या पोलीस ठाण्यातून करमसीभाईंवर अटकेचे वॉरंट निघाले, पण करमसीभाई त्यावेळी बेलापुरात नसल्याने पोलिसांना ते त्यांच्यावर बजावण्याची व त्यांना अटक करण्याची संधी मिळालीच नाही. करमसीभाई त्यावेळी साखर-विक्रीच्या निमित्ताने दौऱ्यावर होते. गावोगावी फिरत होते. त्यांचे मोठे बंधू धारशीभाई यांनी या वॉरंटाविषयी करमसीभाईंना एका मुक्कामाच्या ठिकाणी कळवले, तेव्हा करमसीभाईंनी बेलापूरला परत येण्याची घाई न करता आपला दौरा तसाच पुढे चालू ठेवला. त्यांच्यावरील वॉरंट बेलापूरच्या पोलीस ठाण्यात त्यांची वाट बघत पडून राहिले होते.

कायदेभंगाची चळवळ चालू असतानाच गांधीजी आणि व्हाईसरॉय आयर्विन यांच्यात समझोत्याच्या वाटाघाडी व्हाव्यात म्हणून बॅ. जयकर आणि सप्रू हे मध्यस्थी करीत होते. त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन या वाटाघाटी सिमला येथे होण्याचे ठरले. गांधीजी सर प्रभात शंकर पटणी यांच्यासह सिमल्याला रेल्वेने निघाले असताना करमसीभाई बडोद्याच्या

स्टेशनवर होते. ते बेलापूरच्या मार्गावर होते.

सिमल्यात गांधीजी आणि ब्रिटिश व्हाईसरॉय या उभयतांमध्ये वाटाघाटी होऊन समझोत्याचा करार झाला. या करारालाच 'गांधी-आयर्विन पॅक्ट' असे म्हणतात. या करारानुसार कायदेभंगाच्या चळवळीत देशभरातील तुरुंगात डांबून ठेवण्यात आलेल्या राजबंद्यांची सुटका करण्यात आली होती.

करमसीभाई बेलापूरला पोचले आणि ते स्वत:हूनच अटक करवून घेण्याच्या उद्देशाने पोलीस ठाण्यात जाऊन उभे ठाकले. परंतु पोलिसांनी त्यांना अटक तर केली नाहीच, पण त्यांच्यावरील वॉरंटही रद्द करून टाकले.

पुढे व्यवसायाचा व्याप बराच वाढला आणि मग वेळेच्या अभावी करमसीभाईंना देशसेवेच्या कामाकडे अधिक लक्ष देता येईनासे झाले. परंतु त्यांनी सुरू केलेले साखर कारखाने आणि उसाच्या विक्रमी उत्पादनाची केलेली शेती हीसुद्धा त्यांची मोठी देशसेवाच होय. कारण या कृषि-औद्योगिक उद्योगांमुळे अनेक देशवासीयांना रोजगार-धंदा उपलब्ध झाला, त्यांचे संसार उभे ठाकले आणि देशाच्या गरजेचे साखरेचे उत्पादनही वाढले. देशाच्या समृद्धीत भर पडली. केवळ चळवळ किंवा जेलयात्रा म्हणजेच देशभक्ती नव्हे, ती तर देशभक्ती आहेच, पण देशाला समृद्धीकडे नेणारी साधने साहसाने उभारणे हीसुद्धा देशभक्तीच होय!

या अर्थाने सर्वश्री जमशेटजी टाटा, वालचंद हिराचंद दोशी, घनश्याम बिर्ला आदी उद्योजकदेखील महान देशभक्तच आहेत. देशाच्या उभारणीत अशा कल्पक, साहसी व दूरदृष्टीच्या मंडळींनी देशाला सुबत्ता व समृद्धी प्रदान करून देशाची मोठीच सेवा केलेली आहे, हे विसरता येणार नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी केलेल्या देशसेवेचा मोठ्या कृतज्ञतेने उल्लेख केला पाहिजे.

करमसीभाईंनी आपल्या परीने आपले सारे आयुष्य कृषि-औद्योगिक क्षेत्रात खपून मोठीच देशसेवा केलेली आहे.

करमसीभाईंना त्यांच्या वाढत्या व्यापामुळे जरी प्रत्यक्ष चळवळीच्या आघाडीवर राहता आले नाही तरी कृषि-औद्योगिक क्षेत्रात भरीव देशसेवा करीत असतानासुद्धा त्यांनी आवश्यक तेव्हा अनेक प्रकारांनी राष्ट्रीय चळवळीला हातभार लावलेला आहे. प्रसंगी मोठा धोका पत्करूनही आपले अमोल असे सहकार्य दिलेले आहे. या संदर्भातील एक आठवण अशी आहे :

८ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींनी येथील ब्रिटिश सत्तेला 'चले जाव' - 'क्विट इंडिया' असे निर्वाणीचे शब्द सुनावले. ८ ऑगस्टचा ऐतिहासिक ठराव मुंबईत गवालिया

टँक मैदानावर पास झाला आणि त्याच रात्रीपासून सरकारचे पाशवी दमनचक्र जोराने सुरू झाले. देशभरातील बहुतेक सर्व प्रमुख नेत्यांना पकडून कारागृहात डांबले गेले. जे बाहेर होते आणि ज्यांनी पोलिसांना झुकांडी दिली ते ९ ऑगस्टपासून भूमिगत झाले. गांधीजींनी यावेळी देशाला 'करेंगे या मरेंगे' अशा निर्धाराने अंतिम लढ्यात झुंजण्याचा आदेश दिलेला होता. देशाला 'करेंगे या मरेंगे' या निर्धानाने हा लढा पुढे चालू ठेवला आणि ब्रिटिशांचे राज्ययंत्र खिळखिळे करून सोडण्याचा अद्‌भूत व रोमांचकारी प्रयत्न सुरू केला. या भूमिगतांमध्ये अनेक थोर, त्यागी, शूर देशभक्त नेते होते. ते देशातील भूमिगत चळवळीला मार्गदर्शन करीत होते. त्यांत श्री. अच्युतराव पटवर्धन आणि श्रीमती अरुणा असफअल्ली हे नेते प्रमुख होते आणि बाकीचे नेते काही दिवसांनी पकडले गेले तरी हे दोघे अखेरपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नव्हते. त्यांना पकडून देणारासाठी ब्रिटिश सरकारने फार मोठी बक्षिसे जाहीर केली होती.

या काळात करमसीभाई मरीन-ड्राईव्ह विभागातील फ्लॅटमध्ये राहत होते. त्यांनी भूमिगत अच्युतराव पटवर्धन यांना व अरुणा असफअल्ली यांना आपल्या घरात काही दिवस ठेवून घेतले होते. पाचगणीच्या बंगल्यातही अच्युतराव पटवर्धन व मोहनलाल सोपान यांना आसरा दिना होता. अशा प्रकारे भूमिगतांना आश्रय देण्यात फार मोठी जोखीम होती, पण देशभक्त करमसीभाईंनी तरी ती मोठ्या हिंमतीने पत्करली होती.

❖

जीवन साथी

कार्येषु मन्त्री करणेषु दासी भोज्येषु माता शयनेषु रम्भा।
धर्मानुकूला क्षमया धरित्री भार्या च षाड्गुण्यवतीह दुर्लभा।।

कार्य करण्यात मंत्र्याप्रमाणे, सेवा करण्यात दासीप्रमाणे,
भोजनसमयी मातेप्रमाणे, शयनकाली रंभेप्रमाणे,
धर्मानुकूल आणि पृथ्वीसारखी क्षमाशील अशी सहा गुणांची युक्त
पत्नी मिळणे दुर्लभ आहे.

जीवन साथी

माणसाच्या जडण-घडणीत नियतीचा किंवा नशीबाचाही बराच मोठा भाग असतो. माणसाने प्रयत्न केले पाहिजेत हे खरेच. 'प्रयत्नांती परमेश्वर', हेही खरेच. परंतु अनेक वेळा अनेक तऱ्हेने प्रयत्न करूनसुद्धा यशाचा परमेश्वर पावत नाही, असे अनुभवाला येते.

करमसीभाईंनी पोटापाण्यासाठी अनेक प्रकारचे व्यवसाय करून पाहिले परंतु या ना त्या कारणामुळे किंवा नशिबाची साथ त्या त्या वेळी न मिळाल्यामुळे त्यांना यशप्राप्ती झाली नाही. दैव हुलकावण्या देत राहिले. अशा वेळी सर्वसामान्य माणूस हताश-निराश बनतो. आयुष्याचा चोळामोळा होतो.

परंतु करमसीभाईंच्यासारखी जी जिद्दीची व अपयशाला भीक न घालणारी आणि सतत अविश्रांत प्रयत्नांचीच कास धरणारी पुरुषार्थी माणसे असतात ती हताश-निराश न होता शेवटी यश खेचून आणतात.

करमसीभाईंनी उद्योग-धंद्याच्या संदर्भात बरीच धडपड केल्यानंतर त्यांनी बेलापूर गावात मसाल्याच्या पदार्थांचे दुकान थाटले. ही हकीगत मागे आलेलीच आहे.

दुकानाचे गाडे काहीसे स्थिरस्थावर झाल्यावर करमसीभाईंनी बेलापूर गावातल्या आपल्या बिऱ्हाडी साकरबाईंना मुंबईहून आणले.

साकरबाईंनी एकदा प्रस्तुत लेखकाला आपल्या बेलापूरच्या आठवणी सांगताना बालपणीच्या आठवणीही सांगितल्या होत्या. त्या आठवणी फारच रोचक आहेत. त्या आठवणींवरून त्यांच्या स्वत:च्या व करमसीभाईंच्या व्यक्तिमत्त्वावर जसा प्रकाश पडतो, तशीच त्यांच्या कुटुंबियांविषयीही माहिती मिळते. म्हणून साकरबाईंच्या आठवणी साकरबाईंच्याच शब्दांत येथे देत आहे. साकरबाई म्हणाल्या,

"माझ्या माहेरी कच्छमध्ये रोहा गावी, २६.०८.१९०९ श्रावण शुद्ध दशमी शके १८३१ रोजी माझा जन्म झाला. माझ्या वडिलांचे नाव वेलजी मोनजी सचदे आणि आईचे

नाव मेघबाई होते. मला पहिल्या तीन बहिणी व चौथा भाऊ अशी भावंडे होती. रोहा गावी माझे शिक्षण तिसरीपर्यंत झाले. दुसरीत असताना माझा पहिला नंबर आला होता.

"माझ्या आजोबांचे किराण्याचे दुकान होते. माझ्या वडिलांकडे बावन्न गावांची जहागिरी होती. माझे वडील सारा वसूल करण्याचे काम करीत असत. जहागिरदाराला वसुलीपोटी दोन हजार रुपये मिळत असत. बाकीचे पैसे भुज-संस्थानच्या तिजोरीत जमा होत असत. माझे आजोबा १०५ वर्षांचे होते. माझे पती करमसीभाई कालांतराने मोठे श्रीमंत झाल्यानंतर माझे वडील गंमतीने म्हणायचे, "आता मी सासरा शोभत नाही." यात जावयाच्या कर्तबगारीचा अभिमानच होता.

"माझ्या अकराव्या वर्षी माझा साखरपुडा झाला व बाराव्या वर्षी लग्न झाले. त्या वेळी शेटजी एकोणीस-वीस वर्षांचे असावेत. त्यांचे पंधराव्या वर्षी पहिले लग्न झाले होते. माझे लग्न झाल्यानंतर एक वर्ष तरी मी माहेरीच होते. मग एक वर्षानंतर सासरी आले. सासरी मुंबईत वडगादी येथे घर होते. घरी सासरे, सासू, नणंद होती. बेलापूरला धंदा होता. सासऱ्याचे नाव जेठाबाई व सासूबाईंचे नाव लक्ष्मीबाई, मोठ्या दिराचे नाव धारशीभाई, नणंदांची नावे बसनबाई, हिरालक्ष्मीबाई व देवकीबाई अशी होती.

"शेठजींनी बेलापूरला मसाल्याच्या पदार्थांचे दुकान टाकले होते. एकदा माझ्या दीरांनी त्यांना भागीदारीमध्ये धंदा करण्याबद्दल विचारले होते. ते स्वत: भागीदारीमध्ये धंदा करीत होते, त्यात त्यांना नुकसान आले होते. त्यावेळी शेठजींनी आपल्या भावाला सांगितले होते की, 'मी करीन तर धंदाच करीन.'

"धंद्यानिमित्त शेठजींना सतत बाहेर जावे लागत असे. कोलार येथे देवीची जत्रा मोठी भरते. शेठजींनी जत्रेत मसाल्याच्या पदार्थांचे दुकान थाटले. मी त्यांना बेलापूरहून रोज जेवणाचा डबा पाठवित असे. माहेरी खूप लाड केले जात असत. माझी आजेसासू शंभर वर्षांची होती. तिच्याजवळ सोने-नाणे होते. खूप पैसा होता.

"धारशीभाईंचे पहिले लग्न झाले होते. त्यांची पहिली पत्नी वारल्यानंतर त्यांचे दुसरे लग्न झाले. ती पत्नी पण चार-पाच वर्षांनी वारली. त्यानंतर जवळजवळ पंधरा वर्षे त्यांनी लग्न केले नाही. धारशीभाई फार सट्टा खेळत असत. त्यांचा सगळा पैसा सट्ट्यामध्ये जात असे. त्यांचे लग्न झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्र व आम्ही स्वतंत्र अशी बिऱ्हाडे केली. धारशीभाईंचे तिसरे लग्न माझ्या तिसऱ्या नंबरच्या बहिणीबरोबर झाले होते. त्या लग्नापूर्वी मला आमच्या माहेरघराकडून विचारणा झाली होती. ती माझ्या वडिलांना सांगितले, मुलगा सट्टा खेळणारा आहे. तुम्हांला पसंत असेल तर द्या.

"पुढे सट्ट्यात नुकसान झाले. माझ्या बहिणीला खूपच त्रास झाला. माझ्या माहेरच्या लोकांना पण याचा राग येत असे. आमची पण आर्थिक परिस्थिती त्यावेळी चांगली नसल्याने आम्ही त्यांना काहीच मदत करू शकत नव्हतो.

“हरकचंद गदिया व अमोलकचंद गदिया हे यांचे मित्र.

लालचंद हिराचंद यांची फॅक्टरी, तसेच बेलापूर जवळची हरेगाव येथील फॅक्टरी, येथील साखर घ्यायची व ती बाहेर पाठवायची, हे काम शेठजी करत. बेलापूरहून मालुंजाला पायीच जात असत. बेलापूरला आम्ही डाकले यांच्या घरात राहत होतो. डाकले यांच्या घरात राहण्यापूर्वी आम्ही सासू-सासऱ्यांच्या घरात राहत होतो.

“मुंबईहून मी बेलापूरला आलो तेव्हा आजारीच होते. सतत थंडीताप येत असल्यामुळे माझ्याकडे लक्ष द्यायला तसे घरी कोणीच नव्हते. बेलापूरला मी एकटीच राहत होते. डाकल्यांच्याकडील बाईंना माझ्या सोबतीला बोलावत असे.

“शेठजी साखर विक्रीसाठी गावोगाव हिंडत असत. कधी पडेगाव, मालुंजा, कधी रेल्वेने तर कधी पायी प्रवास करत असत. खूप कष्ट करावे लागत असत.

बेलापूरला आले तेव्हा मला चांगले मराठी बोलता येत नव्हते. माझी प्रकृतीही तितकीशी बरी नव्हती. आम्ही ज्या जागेत राहात होतो ती जागा फारच लहान होती. अंधारही होता. दिवसा रॉकेलचे दिवे लावावे लागत होते. गड्याला नदीवरून पाणी आणावे लागत असे.

“खटोडांशी भागीदारी केली त्याच वर्षी म्हणजे १९२७ साली शांतिलालचा जन्म माझ्या माहेरी रोह्याला झाला. त्यावेळी मी बरेच दिवस माहेरी होते. आमच्याकडे पहिल्या मुलाचे नाव ठेवण्याची पद्धत नाही. शांतिलालच्या पाठीवर १९३० साली लीलाचा जन्म झाला. शांतिलालचे शिक्षण सुरूवातीला थोडे दिवस बेलापूरला व नंतर मुंबईला आले.

“शेठजींचे दुकान असताना ते काँग्रेसच्या चळवळीत भाग घेत असत. गांधीजींच्या प्रेरणेमुळे शेठजी खादी वापरू लागले. विलायती कपड्यांवर व परदेशी वस्तूंवर त्यांनी बहिष्कार टाकला. महात्मा गांधी बेलापूरला आले होते. कस्तुरबा पण आल्या होत्या. त्यामुळे गांधीजींच्या सभेला पुरुषांबरोबर बायकांचीपण खूप गर्दी झाली होती.

“शेठजींचा काँग्रेसशी संबंध असल्यामुळे आमच्याकडे रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, डॉ. जुवेकर, स्वामी सहजानंद वगैरे काँग्रेसचे लोक वरचेवर येत असत.

“सोन्याभाऊ म्हणून आमच्याकडे एक इसम लहानपणापासून कामाला होता. तो आमच्याकडेच लहानाचा मोठा झाला. त्याचे आणि तसेच त्याच्या मुलाचेदेखील लग्न आम्हीच करून दिले. पुढे तो मुंबईत दारू वगैरे पिऊ लागला म्हणून त्याला साकरवाडीला पाठवला. त्याला म्हातारपणी थोडेच टाकून देणार होतो ? तो आता सुधारला की नाही ठाऊक नाही.

“साखरेच्या कारखान्याच्या सुरवातीपासून ‘साकरवाडी’ नाव दिले. पण मला ते ठाऊक नव्हते. ‘लक्ष्मीवाडी’ हे नाव आमच्या सासूच्या नावाने ठेवले आहे. कारखाना सुरू

झाल्यानंतर आठ वर्षांनी मी साकरवाडी फॅक्टरीत गेले.

"शेठजींना अतिशय साधी राहणी आवडते. अजून त्यांची चटई लावलेली खोली तिथे आहे."

"शेठजींशी धंद्याबद्दल बोलण्याचा प्रसंग कधी आला नाही. त्यांचा स्वभाव सरळ व प्रेमळ आहे. पण घुस्सा फार आहे. पहिल्यापासूनच स्वभाव हट्टी आहे. ते सर्व गोष्टी स्वत:च करणार. मुलांशी अगदी प्रेमळपणाने वागत असत. सगळ्यांना शिक्षण वगैरे चांगले मिळावे असे त्यांचे प्रयत्न असत. पुढच्या आयुष्यात आम्ही प्रवासही खूप केला. मला पाच मुली आणि एक मुलगा - शांतीलाल. लीलाबेन, सावित्रीबेन, दिव्याबेन, निरुपमाबेन, प्रतिमाबेन ह्या मुली. आणि दीराच्या जीनकीबेन व भारतीबेन या दोन मुलीसुद्धा आमच्या मुलींबरोबरच राहिल्या-वाढल्या. आपल्या मुलामुलींप्रमाणेच आम्ही त्यांचीही लग्ने करून दिली. वेगळेपणाचा भाव आमच्यात कधीच आला नाही. माझ्या दुसऱ्या बहिणीची मुलगी कुस्तरीबेन हीसुद्धा आई वारल्यानंतर आमच्याकडे राहायची. तिचेही लग्न करून दिले.

"बेलापूरला राहत असतानाच माझी प्रकृती आधीच ठीक नव्हती, ती आणखीनच बिघडली. पोटात खूप दुखू लागले. बरेच दिवस शेठजींना न सांगता मी हे दुखणे अंगावरच काढले. पण मग जेव्हा जास्त झाले तेव्हा सांगावे लागले. शेठजींनी मग मला पुण्याला डॉ. भडकमकर यांना नेऊन दाखवले. पुढे मिरजेला माझे ऑपरेशनही झाले. माझ्या प्रकृतीसाठी अहमदनगर, पुणे पाचगणी, देवळाली, महाबळेश्वर अशा ठिकाणी हवापालटासाठी शेठजींनी मला ठेवले होते. माझ्या आजारपणात त्यांनी माझी खूपच काळजी घेतली..."

अशा काही मागच्या व पुढच्या आठवणी सांगून साकरबाई म्हणाल्या, "आता अलिकडे जवळजवळ दहा वर्षे झाली; शेठजींनी स्वत:ला सामाजिक कार्यात वाहून घेतले आहे. नरेशवाडी येथे आदिवासी लोकांसाठी शाळा, हॉस्पिटल, शेती वगैरे कामे चालू आहेत. ठिकठिकाणी मोठमोठाले 'आय कॅम्प'ही भरविले आहेत. खूप कष्ट करतात. पायी फिरतात."

१९२२ ते १९९५ अशी ७४-७५ वर्षांची साथसंगत, १८ जुलै १९९५. आषाढ कृष्ण ७, शके १९१७ रोजी सोडून साकरबाई स्वर्गवासी झाल्या.

❖

साखरेची कहाणी

न लभन्ते विनोद्योगं जन्तव : संम्पदां पदम् ।
सुरा : क्षीरादविक्षोभमनुभूयामृतं पपु : ।।

उद्योगाशिवाय माणसांना संपत्ती मिळत नाही.
देवांनासुद्धा समुद्रमंथन केल्यावर अमृत मिळाले.

साखरेची कहाणी

एकोणीसशे छत्तीस सालच्या सुमारास साखर कारखाना काढण्याचे वेध लागताच करमसीभाईंनी उसाच्या शेतीकडे लक्ष वळविले होते. कारण साखर निर्मितीसाठी ऊस हवाच! कच्च्या मालाशिवाय पक्का माल तयार करणार कसा? हे जाणूनच करमसीभाईंनी उसाच्या शेतीसाठी जमीन शोधण्यास सुरूवात केली आणि या शोधात त्यांना बेलापूर गावापासून दोन मैल आणि बेलापूर रोड रेल्वे स्टेशनपासून दोन मैल अशा अंतरावरील एक विकाऊ जमीन आढळली. जमीन उसाच्या शेतीसाठी चांगली होती. करमसीभाईंच्या पसंतीला ती उतरली. आणि त्यांनी ती शंभर एकर जमीन घेण्याचे ठरविले.

गोवर्धनभाई पटेल नावाचे करमसीभाईंचे एक निकटचे मित्र होते. ते उसाच्या शेतीत अत्यंत निष्णात असे तज्ज्ञ होते. परंतु एका वर्षीच्या हिवाळ्यात त्या भागात इतके घनदाट धुके पडले की, त्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. करमसीभाई सांगतात, "इतके दाट धुके मी माझ्या संबंध आयुष्यात कधी पाहिले नाही." त्यावेळी या धुक्यामुळे शेतीत उभ्या असलेल्या उसाच्या पिकाचे फार नुकसान झाले. अनेक गुरे-जनावरे मृत्यूमुखी पडली. थंडीचा कडाका एवढा जबरदस्त होता की, त्यापासून वाचण्यासाठी काही शेतकऱ्यांनी आपल्या लाकडी बैलगाड्या पेटून जाळल्या आणि शेकोट्या बनवल्या. या नुकसानीमुळे गोवर्धनभाई मनाने खूपच खचले आणि उसाची शेती सोडून देण्याचा विचार करू लागले. गोवर्धनभाई पटेल आणि अंबालाल शहा अशा दोघांच्या भागीदारीत ती उसाची शेती होती. अंबालाल यांचे भांडवल आणि गोवर्धनभाईंचे कष्ट अशी ती भागीदारी होती. खटोड त्यांचे सावकार होते.

या भागीदारीतून मुक्त होण्याचे जेव्हा त्यांनी ठरवले, तेव्हा करमसीभाईंनी त्यांना आपल्या भागीदारीत बोलावले. म्हणाले, "आपण दोघे मिळून ऊस उत्पादन करू. तोटा आला, तर तो मी सहन करेन आणि नफा झाला तर तो दोघांत वाटून घेऊ." परंतु गोवर्धनभाईंचे खचलेले मन उभारी घेईना. करमसीभाई त्यांना म्हणाले, "आपल्यासारख्या

जाणकार आणि हुशार माणसाने असे निराश होता काम नये. झाले ते झाले. नव्या उमेदीने पुढे चला.” परंतु गोवर्धनभाईंनी आपला निर्णय बदलला नाही. आणि ते डहाणूकरांच्याकडे नोकरीसाठी राहिले.

करमसीभाईंनी मात्र आपला निश्चय सोडला नाही. त्यांची जिद्द ढळली नाही. त्यांनी त्या शंभर एकर रानात ऊस लावून पुढल्या फार मोठ्या उसाच्या शेतीचा जणू शुभारंभच केला!

करमसीभाईंनी साखरेचा कारखाना काढायचा असा निर्धारच आपल्या मनाशी केला होता आणि त्यासाठी कच्चा माल म्हणून उसाची फार मोठी शेती करायची अशीही जिद्द बाळगलेली होती. त्यावेळी त्यांच्या डोळ्यांपुढे, माळी मंडळींनी एकत्र येऊन सोलापूर जिल्ह्यातील अकलूजजवळ काढलेला माळीनगरचा साखर कारखाना, नाशिक जिल्ह्यातील मालेगावजवळचा रावळगाव येथील वालचंद हिराचंद दोशी यांनी काढलेला साखर कारखाना आणि खुद्द अहमदनगर जिल्ह्यात बेलवंडी आणि टिळकनगर येथे डहाणूकरांनी काढलेले साखर कारखाने प्रामुख्याने होते. साखरेच्या व्यवसायातील अनुभव तर त्यांच्या गाठीशी होताच.

करमसीभाई हे नुसताच विचार करणारे नव्हते, तर विचाराप्रमाणे आचार करणारे क्रियावानही होते. त्यांनी उसाच्या शेतीसाठी कोपरगाव आणि वैजापूर तालुक्यात खंडाने या विकत मिळतील अशा जमिनी घ्यावयास सुरूवात केली. आजच्या जमिनीच्या भावाने पाहता त्याकाळी जमिनीच्या किंमती अगदीच नाममात्र नगण्य अशा होत्या. ऐंशी ते शंभर रुपये एकर या दराने वाटेल तेवढ्या जमिनी विकत मिळत होत्या. त्याचप्रमाणे आठ ते दहा रुपये एकर या भावाने जमिनी खंडानेही मिळत होत्या. याचे कारण त्या काळातल्या इतिहासात डोकावले तर असे कळून येते की कोरडवाहू जमिनीत शेती करणेच गरीब शेतकऱ्याला मुश्किल झाले होते. पावसाअभावी ही शेती बेभरवशाची झालेली होती. पुणे आणि नगर जिल्ह्यातील काही भाग हा दुष्काळी भाग म्हणून गणला जात असे. पाऊस फारच कमी अथवा मुळीच पडत नसे. त्यामुळे वारंवार दुष्काळ हा पाचवीला पुजलेलाच असे. या दुष्काळाच्या बरोबरीला सावकारांची गांजवणूकही फार मोठ्या प्रमाणावर होती. अस्मानी आणि सुलतानी अशा कात्रीत गरीब शेतकरी अडकलेला होता. गांजलेल्या, पिडलेल्या शेतकऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष खदखदत होता. या असंतोषातूनच मग “बुभुक्षित: किं न करोती पापम्” अशा न्यायाने एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळी या भागात शेतकऱ्यांनी बंडाचा उठाव केलेला होता. सावकारांची घरे पेटवणे, कर्जरोखे जाळणे, मारहाण करणे इत्यादी प्रकार त्या बंडात झाले होते. ही बंडे ब्रिटिश सरकारने पोलिसी बळावर मोडून काढली, पण त्यांमागील कारणांचा

शोध घेऊन ती कारणे दूर करण्याचा प्रयत्नही सुरू केला. अशा प्रयत्नांतूनच दौंड-मनमाड हा रेल्वेमार्ग आणि अकोले तालुक्यातील भंडारदऱ्याचे धरण ही दोन दुष्काळी कामे म्हणून काढली. अनेक दुष्काळीग्रस्तांना काहीसा आधार मिळाला. भंडारदऱ्याचे धरण १९१८ साली बांधून झाले. शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले. परंतु शेतकऱ्यांना शेतीसाठी ते विकत घेणे परवडेना. पाणीपट्टी भरण्याची ताकद त्यांच्यात नव्हती. शिवाय शेतकऱ्यांचे पारंपरिक मन अशा पाटाने घेतलेल्या पाण्यावर शेती करण्यास धजावत नव्हते. अशा पाण्याने जमिनीचा कस जातो, जमिनी उफळतात, जमिनी टकल्या होतात अशी काही गैरसमजुती त्यांच्या मनात होत्या. शेतकरी धरणातले पाणी घ्यावे इतके घेईनात. धरणावर केलेला खर्च भरून येईना. त्यामुळे सरकारपुढेही चिंतेचे प्रश्नचिन्ह उभे राहिले. वस्तुत: धरणे बांधून व कालवे काढून शेतीला पाणी उपलब्ध करून देण्यात ब्रिटीश सरकारचा आणखी एक हेतू होता आणि तो म्हणजे साखर उत्पादन करण्याचा. कारण १९१४ ते १९१८ या पहिल्या महायुद्धाच्या काळात हिंदुस्थानात साखरेची भयंकर टंचाई निर्माण झालेली होती. युद्धानंतर ही गोष्ट लक्षात ठेवून आवश्यक तेवढे साखर-उत्पादन देशातच वाढवावे व परदेशांतून येणाऱ्या साखरेवर विसंबून रहावे लागू नये असा तो विचार होता. त्या काळी जावा, सुमात्रा इत्यादी देशांतून साखर आयात केली जात असे. परंतु हिंदुस्थान हा साखर उत्पादनाच्या दृष्टीने अनुकूल असाच देश त्यांच्या हाती होता. हे सर्व जाणूनच दक्षिणेकडल्या कालव्यांची योजना झाली होती. ऊस-उत्पादन हा त्यातील एक प्रमुख हेतू होता. परंतु कालवे झाले, पाणी दिले तरी अनुभव मात्र अनुत्साही आला. तेव्हा सरकारने बेलापूर भागात साखर कारखाना काढण्यासाठी युरोपीय उद्योगकंपनीला पाचारण केले. त्यांना त्या भागात ऊस-उत्पादनासाठी शेतकऱ्यांची बरीच मोठी - सुमारे ७,३६७ एकर जमीन अक्कायर करून दिली. तसेच पाटाचे पाणीही भरपूर उपलब्ध करून दिले. सरकार आणि कंपनी यांच्यात तसे करारमदार झाले. 'मेसर्स डब्ल्यू. एच. ब्रॅडी अँड को. लि., मुंबई' या कंपनीचा 'दि बेलापूर कंपनी लि.', हा खाजगी साखर कारखाना १९२५ च्या सुमारास उभा राहिला आणि साखरेचे उत्पादन होऊ लागले.

विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांत, म्हणजे १९३० च्या दरम्यान, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमधून प्रवरा, नीरा, गोदावरी, गिरणा आदी नद्यांवरील धरणांतील पाणी शेतीला उपलब्ध झाले होते. परंतु सर्वत्र तोच प्रश्न निर्माण झाला होता. ज्या काही शेतकऱ्यांनी पाणी घेऊन उसाची शेती केली होती त्यांच्या गुळाला बाजारातील प्रचंड मंदीमुळे यावा तसा भावच मिळाला नाही. त्यामुळे त्यांना फार मोठे नुकसान सोसावे लागले.

या सगळ्या परिस्थितीचा विचार करून सरकारने १९३१ साली आर्थिकदृष्ट्या सरकारी पाटबंधारे कसे परवडू शकतील याची पाहणी करून शिफारसी करण्यासाठी

श्री.बी.एस.कामत यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची एक कमिटी नेमली. या कमिटीने एका प्रश्नावलीच्याद्वारा सरकारी अधिकारी, लहानमोठे बागायतदार, संबंधित व्यक्ती व संस्था यांच्याकडून माहिती गोळा केली. त्याचप्रमाणे बारामती, बेलापूर, कोपरगाव आदी ठिकाणी जाऊन तसेच नीरा, गोदावरी, प्रवरा, गिरणा इत्यादी पाटाच्या परिसरातील बागायतदारांच्या भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती व साक्षी घेतल्या.

हाती आलेल्या माहितीच्या आधारे कामत कमिटीचे असे मत बनले की, पाणीपट्टीचे उत्पन्न जर सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणावर जमा व्हायचे असेल तर उसावरील जमिनीचे क्षेत्र वाढविले पाहिजे. उसाचे क्षेत्र वाढवायचे असेल तर ते ऊस उत्पादकांना परवडण्यासाठी गुळाबरोबरच उसाच्या रसातून साखर तयार करणारे कारखाने काढण्यास उत्तेजन दिले पाहिजे. साखरेला त्यावेळी बाजारात फार मोठी मागणी होती आणि गरजेपेक्षा साखरेचे उत्पादन हिंदुस्थानात त्यावेळी फारच अल्प होते. सुमारे दहा लाख टन साखर दरवर्षी परदेशातून आणावी लागत होती.

कामत कमिटीच्या शिफारशीनुसार सरकारने सवलती दिल्यावर वर नमूद केलेले साखर कारखाने महाराष्ट्रात सुरू झाले होते. त्यातूनच प्रेरणा घेऊन करमसीभाईंनी स्वत:चा साखर कारखाना काढण्याचे ठरविले.

❖

साखर कारखान्याचे वेध

यथा हयेकेन चकेण न रथस्य गतिर्भवेत्।
एवं पुरूषकारेण विना देवं न सिध्यति।।

ज्याप्रमाणे एका चाकाने रथ चालत नाही त्याप्रमाणे
प्रयत्नाशिवाय दैव अनुकूल होत नाही.

साखर कारखान्याचे वेध

साखर विक्रीचा व्यवसाय करमसीभाई मोठ्या जोमाने व कष्टाने करीत होते. २-३ वर्षांत त्यांनी या व्यवसायात चांगलाच जम बसविला होता. बहुतेक सगळ्या बाजारपेठेतील लहान-मोठे व्यापारी त्यांना 'एक सचोटीचा साखर विक्रेता' म्हणून चांगले ओळखू लागले होते.

या धंद्यात पदार्पण केल्यावर तिसऱ्या वर्षांपासूनच चांगला नफा होऊ लागला होता. प्रपंच साधून द्रव्यसंग्रह होऊ लागला होता. या यशाने करमसीभाईंचा आत्मविश्वास वाढला. आता पुढचे पाऊल म्हणजे स्वत:चा साखर कारखाना काढावयाचा, अशी एक प्रबळ उर्मी त्यांच्या मनात निर्माण झाली. आता केवळ साखर-विक्रीच करीत रहावयाचे नाही, तर त्याबरोबरच साखर-निर्मितीही करावयाची, असा ध्यासच त्यांनी घेतला. हा कारखाना ते अर्थातच खटोड आणि कंपनीच्या भागीदारीत काढणार होते. करमसीभाईंच्या धाडसी विचाराला सुरूवातीस खटोड यांनीही अनुकूलता दर्शविली होती.

करमसीभाईंनी प्रारंभी दर दिवशी शंभर टन साखर उत्पादन होईल अशा क्षमतेचा कारखाना काढण्याचा विचार केला होता. कारण याहून मोठ्या क्षमतेचा कारखाना काढण्यासाठी लागणारे मोठे भांडवल जवळ नव्हते. शंभर टनी साखर कारखाना हा फारच लहान आहे याचीही त्यांना कल्पना होती. परंतु पुढे साखरेच्या व्यवसायात त्यांना अधिक मोठा नफा मिळाला आणि त्यांनी शंभर टनी कारखान्याच्या ऐवजी दोनशे टनी कारखाना काढण्याचे ठरविले. त्यानंतर सुदैवाने त्यांच्या साखरेच्या व्यवसायात त्यांना आणखी अधिक नफा मिळाला आणि त्यांनी दोनशेवरुन तीनशे आणि तीनशेवरुन चारशे टन साखर दर दिवशी निर्माण होईल असा मोठा कारखाना उभारण्याचे ठरविले.

या व्यवहारात परदेशाहून साखर कारखान्यासाठी आवश्यक लागणारी अशी मशिनरी मागवणे, तिची किंमत, आयात कर, मशिनरीची उभारणी, त्यासाठी तज्ज्ञांचा मोबदला, ऊस खरेदी वगैरे गोष्टींसाठी मोठ्या रक्कमेची आवश्यकता होती आणि भागीदार खटोड हे फक्त सात लाख रुपयेच यात गुंतवणार होते. परंतु अशा काही आर्थिक अडचणी होत्या तरी करमसीभाईंनी

पाऊल मागे घेतले नाही. त्यांनी परदेशातील स्कोडा कंपनीकडे मशिनरीची ऑर्डर नोंदवून टाकली. हा त्यांचा दूरदर्शीपणा ठरला. कारण १९३९ साली युरोपमध्ये दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला आणि सगळेच व्यवहार ठप्प झाले. परंतु सुदैव असे की, करमसीभाईंनी नोंदविलेली मशिनरी युद्ध सुरू होण्यापूर्वीच मुंबई बंदरात सुरक्षितपणे दाखल झाली होती.

मशिनरी मुंबई बंदरात आली होती आणि ती सोडविण्यासाठी दहा हजार रुपयांची गरज होती. पण तेवढे पैसे त्यांच्याजवळ नव्हते. काय करावे, अशा चिंतेत असतानाच एक पाकीट पोस्टाने त्यांच्या हाती आले. त्या पाकिटात कारखान्याचे शेअर घेण्यासाठी नेपाळ-नरेशांकडून दहा हजारांचा चेक आला होता!

करमसीभाईंची चिंता अकस्मात मिटली. अडकलेला व्यवहार मोकळा झाला. अडचण दूर झाली.

अशा अकस्मात घटना करमसीभाईंच्या आयुष्यात अनेक वेळा घडल्या आहेत आणि त्यामुळेच त्यांचा ईश्वरी पाठिंब्यावरचा विश्वास अधिकाधिक वाढला आहे. आपल्या यशदायी कर्तबगारीचे सारे श्रेय ते मोठ्या श्रद्धापूर्वक कृतज्ञ भावनेने ईश्वरार्पण करीत असतात.

साखर कारखाना उभारण्यासाठी आवश्यक ती जमवाजमव करमसीभाई करीत असतानाच त्यांच्या या प्रयत्नांची वार्ता वालचंद हिराचंद, डहाणूकर, बेलापूर कंपनीचे मि. जोसेफ के, आदी साखर कारखानदारांच्या कानी पोचली होती. या मंडळींना करमसीभाईंनी आपल्या उत्तम प्रकारे चालवलेला साखर-वितरणाचा व्यवसाय सोडून साखर-निर्मितीचा खटाटोप करावा, हे मुळीच पसंत नव्हते. त्यांनी तसे करमसीभाईंना बोलूनही दाखविले होते. करमसीभाईंना साखरेचा कारखाना तर काढायचा होता, पण त्याचबरोबर आपल्या चांगल्याप्रकारे चाललेला साखर-विक्रीचा व्यवसायही तसाच पुढे चालू ठेवायचा होता. बेलापूर कंपनी, डहाणूकर, रावळगाव, फलटण, माळीनगर, आदी आठ-नऊ साखर कारखान्यांकडून मोठ्या प्रमाणावर करमसीभाई विक्रीसाठी साखर खरेदी करीत होते आणि त्यांनी या सर्व मंडळींशी व्यावसायिक आणि व्यक्तिगतसुद्धा फार चांगले स्नेहलोभाचे संबंध प्रस्थापित केले होते. आपल्या या नव्या उद्योगामुळे या स्नेहसंबंधात बिघाड उत्पन्न होऊन त्यांची साखर न मिळण्यात त्याचे पर्यवसान होऊ नये, अशीच करमसीभाईंची तीव्र इच्छा असल्यामुळे त्यांना या व्यवहाराच्या वेळी एकदा खोटे बोलण्याचीदेखील पाळी आली होती.

तो प्रसंग असा होता की, एकदा वालचंद हिराचंद यांनीच समक्ष करमसीभाईंना त्यांच्या साखर कारखान्याबद्दल विचारले होते. तेव्हा करमसीभाईंची मोठी पंचाईत झाली होती. खरे सांगावे तर त्यांच्याकडील वालचंद व रावळगाव शुगर फॅक्टरीची साखर मिळणार नाही अशी शक्यता; म्हणून त्यांनी यावेळी असत्याचा आश्रय घेतला आणि आपण साखर कारखाना काढत नसून आपले एक व्यापारीमित्र श्री. रणछोडभाई कोटक हे तो कारखाना

काढत आहेत, असे सांगितले व वेळ निभावून नेली.

परंतु ही गोष्ट करमसीभाईंच्या श्रद्धाळू मनाला फारच लागली होती. आपल्या हातून अशी प्रतारणा झाली व असत्य बोलावे लागले. याचा सल त्यांना आयुष्यभर सलत राहिला. आज शंभरीच्या घरात असतानासुद्धा त्यांना ही घटना आठवून फार फार खंत वाटते.

त्यावेळी तर त्यांना बोधणारा हा सल इतका तीव्र होता की त्यांनी पुढे साखर कारखाना सुरू झाल्यावर वालचंद हिराचंद यांच्याकडे जाऊन पश्चात्तापदग्ध मनाने त्यांना ही गोष्ट सांगितली व क्षमायाचना केली. वालचंद हिराचंद यांनीही मोठ्या मनाने करमसीभाईंची त्यावेळची मन:स्थिती समजूतदारपणाने लक्षात घेऊन त्यांना क्षमा केली. आपल्या स्नेहसंबंधात बिघाड येऊ दिला नाही.

श्री. रणछोडभाई कोटक हे करमसीभाईंचे फार जिवलग मित्र होते. व्यावसायानिमित्त मुंबईहून ते ब्रह्मदेशात बरीच वर्षे होते. करमसीभाई ज्यावेळी साखर कारखाना उभारणीच्या खटपटीत होते, त्याचवेळी ते ब्रह्मदेशातून मुंबईस परतले होते. कारखान्याचे सर्व प्राथमिक व्यवहार करमसीभाईंनी रणछोडभाई कोटक यांच्याच नावाने केले होते.

साखर कारखाना काढावयाचा निश्चय झाल्यावर करमसीभाईंनी हा कारखाना पुढे उभारावयाचा याचीही चाचपणी सुरू केली होती. त्यात त्यांना कोपरगाव तालुक्यातील संवत्सर नावाच्या गावाजवळची जागा पसंत होती. पण कारखान्यासाठी त्यांना १०० एकर जागा हवी होती. संवत्सरला ८० एकर जागाच उपलब्ध होती. म्हणून तिथे जमले नाही. करमसीभाईंना ऊस उत्पादनासाठी मिळालेल्या जमिनी मात्र जवळ होत्या आणि गोदावरी धरणातील पाण्याच्याखाली भिजणाऱ्याही होत्या. गोदावरी नदीवर बांधलेल्या धरणाचा डावा कालवा या भागातून वाहत होता.

योगायोग असा की याच सुमारास करमसीभाई मुंबईहून रेल्वेने बेलापूरला चालले होते. मनमाडला गाडी बदलल्यावर रेल्वेच्या डब्यातच त्यांची व श्री. पुनमचंद मुलतानचंद संचेती यांची भेट झाली. त्यांना बाबुशेठ असेही म्हणत. या पहिल्या भेटीतच त्या दोघांचे मैत्र जुळले. बाबुशेठ हे मूळचे राहणारे वारी गावचे. तिथे त्यांची पुष्कळ मोठी जमीन होती आणि ती सर्व शेती बाबुशेठच पाहत होते. बोलता बोलता करमसीभाईंनी त्यांची चौकशी केली व त्यातून ही माहिती त्यांना मिळाली. बाबुशेठ नावाने एक सचोटीचे साखर व्यापारी म्हणून करमसीभाईंना ओळखतच होतेच. करमसीभाईंनी त्यांना विचारले की, “या गावात आम्ही साखर कारखाना काढला तर चालेल का?” यावर होकार देत बाबूशेठ म्हणाले, “सहज चालेल. अशक्य काहीच नाही. कारखान्यासाठी मी तुम्हांला माझीच जमीन देतो. वारीलाच कारखाना काढा.”

करमसीभाईंनी हा शुभयोग समजून नंतर वारीला जाऊन बाबुशेठ यांच्यासह त्या भागाची पाहणी केली. कारखान्याच्या दृष्टीने त्यांची ती वारीची जमीन तर अनुकूल होतीच,

शिवाय अगदी जवळच दौंड-मनमाड रेल्वे फाट्यावरील कान्हेगाव हे रेल्वेचे लहानसे स्टेशनही होते. कारखान्यातील साखर वाहतुकीच्या दृष्टीने ही एक मोठी सोय होती. उद्योगाच्या दृष्टीने रेल्वे स्टेशन नजिक असणे केव्हाही फायद्याचे ठरते.

पाहणीनंतर करमसीभाईंनी वारीच्या भागातच स्टेशनजवळ आपला साखर कारखाना उभारण्याचे निश्चित केले. कारखान्यासाठी बाबुशेठ यांनी आपली जमीन तर दिलीच पण शिवाय त्या भागातील आसपासच्या शेतकऱ्यांकडूनही जमिनी मिळवून दिल्या. या जमिनी मिळविण्यासाठी बाबुशेठनी खूप कष्ट घेतले होते. त्यामुळे करमसीभाईंचे ते एक विश्वासू सहकारीच बनले. करमसीभाईंनी त्यांच्यावर अनेक प्रकारची जबाबदारीची कामे सोपविली आणि बाबुशेठ यांनी ती जबाबदारीने पार पाडली. त्यासाठी मोठाल्या रकमाही करमसीभाईंनी त्यांच्याकडे दिल्या होत्या. बाबुशेठ आणि त्यांचे बंधू यांच्यामध्ये इस्टेटीची वाटणी झाल्यावर बाबुशेठनी आपले घर वारीतून कोपरगावला हलविले होते. साखर कारखान्याचे प्रारंभीचे ऑफिस करमसीभाईंनी बाबुशेठ यांच्या कोपरगावच्या घरातच ठेवले होते. त्याची जबाबदारीही बाबुशेठ यांच्यावरच सोपविलेली होती. त्यावेळी या ऑफिसचे कामकाज 'आर.एस.कोटक अँड को.' या नावाने चाललेले होते, याचे कारण वर सांगितलेच आहे.

साखर कारखान्याच्या उभारणीची अशी तयारी चालली असतानाच एका मोठ्या दुर्दैवी प्रसंगाला सामोरे जाण्याची पाळी करमसीभाईंच्यावर आली. तो दुर्दैवी प्रसंग म्हणजे ज्या खटोडांच्या भागीदारीत हा साखर कारखाना करमसीभाई उभारू इच्छित होते व ज्यांनी प्रारंभी या भागीदारीला मोठे भांडवल देऊन मान्यताही दिली होती त्या शोभाचंद खटोड यांनी काही गैरसमजावरून आपली भागीदारी काढून घेण्याचे ठरविले. हा गैरसमज आर.एस.कोटक यांचे नाव कंपनीला दिल्यामुळे झाला होता. करमसीभाईंना हा मोठाच धक्का होता. त्यांनी आपल्या परीने शोभाचंद राठोड यांचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी काही ऐकले नाही व आपले भांडवल परत मागितले. तेव्हा करमसीभाईंनी 'याबाबतचा निर्णय आपणच घ्यावा व मला सांगावे त्याप्रमाणे मी आपले पैसे परत करीन.' असे त्यांना सांगितले.

खटोड यांनी अशी ऐनवेळी आपली भागीदारी मागे घेतली हा करमसीभाईंना मोठा धक्का होताच, पण करमसीभाईदेखील तसे डगमगणारे गृहस्थ नव्हते. त्यांनी कसलाही वाद किंवा भांडणतंटा न करता खटोडांना आपल्या भागीदारीतून मुक्त केले. पुढे त्यांचे सर्व भांडवल परत दिले. एवढे होऊन मूळच्या साखरेच्या व्यवसायातील आपली भागीदारी त्यांनी कायम ठेवली व खटोड कुटुंबियांशी आपल्या घरोब्याचा व्यवहार पूर्ववत जो चालू ठेवला तो आजतागायतही तसाच अढळ आहे. करमसीभाईंच्या मनाचा मोठेपणा या उदाहरणावरून दिसून येतो.

याचे आणखी एक उदाहरण श्री. नवलभाऊ फिरोदिया यांनी सांगितलेल्या हकीगतीवरून चांगले समजून येते. नवलभाऊ फिरोदिया हे अहमदनगर येथे वकिली करीत

होते. त्यावेळची गोष्ट. ते म्हणाले, "१९४०-४१ साल असावे. करमसीभाईंनी साखर कारखाना सुरू केल्यानंतर शोभाकाका खटोड यांनाही वाटले की आपण एखादा शेतीफार्म विकत घ्यावा व ऊस करावा. त्यांनी तसे करमसीभाईंना सांगूनही टाकले. करमसीभाईंनी त्यांच्यासाठी फार्म पाहून सौदा पक्का केला आणि मग ते दोघे नगरला माझ्याकडे आले आणि म्हणाले, "आम्ही हा शेतीचा सौदा केलेला आहे. त्याचा ताबा घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधीस सांगणार आहोत. आम्हांला या सौद्याची कायदेशीर बाजू समजावून सांगा."

"मी त्या शेतीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे बारकाईने पाहून करमसीभाई व शोभाकाका खटोड यांना सांगितले की, हा सौदा योग्य होणार नाही. कारण या शेतीच्या मालकाचे इतर वारसदार तुम्हाला क्लिअर टायटल मिळू देणार नाहीत.

"करमसीभाई म्हणाले, हा सौदा तसा अत्यंत किफायतशीर आहे." पण मी त्यांना सांगितले, 'व्यापारी म्हणून तुम्ही म्हणाल तर ते ठीक आहे. पण हे कायदेशीर होणार नाही असे मला वाटते."

"करमसीभाई म्हणाले, 'आपण मुंबईला जाऊन येऊ. आमच्याबरोबर तुम्हीही आले पाहिजे."

"मग आम्ही मुंबईस आलो. मुल्ला आणि मुल्ला कंपनीतर्फे जमीन मालकाला सौदा कायदेशीर होण्याच्या दृष्टीने नोटीस दिली आणि नंतर हा सौदा झाला. हा सौदा १,१०,००० रुपयांचा होता. पण पुढल्या तीन वर्षांत खटोडांनी त्यावर कितीतरी पटींनी पैसा मिळविला. हा सौदा जरी खटोडांचा होता, तरी त्यासाठी करमसीभाईंनी एवढी मेहनत घेतली की हे काम जणू आपलेच आहे असे समजून ते चिकाटीने पूर्ण केले. यातच त्यांचे मोठेपण दिसून येते!"

साखरेचा धंदा करत असताना करमसीभाईंनी खटोडांची भागीदारी अगदी कसोशीने निभावली होती. आपल्या पडत्या काळात खटोडांनी आपल्याला मदत केली आहे. आपले ते सहकारी आहेत, ही भावना करमसीभाईंनी शेवटपर्यंत जोपासली. त्यांनी स्वत:चे कुटुंबीय व खटोडांचे कुटुंबीय यात कधीच भेदभाव केला नाही. शोभाकाकांचा स्वभाव जरा तापट होता. त्यांनी अनेक वेळा करमसीभाईंना सांगितले की, 'मला आता भागीत राहावयाचे नाही. आपण आता हिशेब करून टाकू.' करमसीभाईंनी पण सांगितले की, "तुम्ही सांगाल तो हिशेब. मला भागी तोडावयाची नाही..." आणि करमसीभाईंनी अत्यंत विश्वासू सज्जनपणाने ही भागीदारी संपविली.

❖

भूसंपादन

माता भूमि : पुत्रोऽहं पृथिव्या : ।

भूमी माझी माता आहे आणि मी तिचा पुत्र आहे.

भूसंपादन

सा खरेचा कारखाना काढण्याचा निर्णय पक्का झाल्यावर करमसीभाई उसाच्या शेतीसाठी जमिनी मिळविण्याच्या कामाला लावले. त्या वेळची त्या भागातली शेतीची परिस्थिती कशी होते हे मागे सांगितलेच आहे. करमसीभाईंचा दृष्टीकोन जमिनी विकत मिळाल्या तर विकत घ्यावयाच्या किंवा खंडाने मिळाल्या तर भाडेपट्टा करून खंडाने घ्यावयाच्या असा होता. जमिनीसाठी त्यांचा त्या भागात त्यावेळी चौफेर शोध सुरू होता. या शोधात त्यांनी आपल्या अंगच्या जिद्दीने, चिकाटीने व प्रेमळ बोलण्याने, वागणुकीने जशा काही जमिनी मिळविल्या, तशीच काही उत्तम माणसेही या कामासाठी जोडली.

श्री.जी.डी.उर्फ गोवर्धनभाई पटेल हे तर करमसीभाईंचे जुने चांगले मित्रच होते. ते जसे अर्थतज्ज्ञ होते तसेच शेतीतज्ज्ञही होते. त्यांच्या सहकार्याने उसाची शेती करण्यासाठी करमसीभाईंनी श्रीरामपूरजवळ मोठी जमीन घ्यावयाची अशी योजना आखली होती. परंतु काही कारणाने ती तडीस गेली नाही व जी.डी.पटेल हे डहाणूकरांच्या साखर कारखान्याकडे नोकरीस गेले. ही हकीकत मागे आलेलीच आहे. करमसीभाईंनी साखर कारखाना काढण्याचे निश्चित केल्यावर आपल्या या मित्राकडे सहकार्यासाठी पुन्हा गळ घातली आणि जी. डी. पटेल यांनीही यावेळी सहकार्याचा हात पुढे केला. त्यांनी डहाणूकरांच्याकडील नोकरी सोडली आणि करमसीभाईंना ते येऊन मिळाले, 'दी गोदावरी शुगर मिल्स लि.' चे फार्म मॅनेजर म्हणून काम पाहू लागले. उसासाठी जमिनी मिळविण्याच्या उद्योगास तेही लागले. कंपनीचे मॅनेजर म्हणून श्री. अंबालाल शहा हे काम पाहत होते. तेही जमिनी संपादनाच्या कामात खटपट करीतच होते. परंतु करमसीभाईंना या जमिनी मिळविण्याच्या कामासाठी, या भागातील शेती व शेतकरी यांच्याविषयी माहिती व संपर्क असणाऱ्या एका स्वतंत्र माणसाची निकड भासत होती. या शोधात पटेल व शहा यांनी पुणतांब्याच्या शेतीशाळेत प्रमुख असणाऱ्या यशवंत वैद्य यांनी जनार्दन रामचंद्र कुलकर्णी या गृहस्थांचे नाव या कामासाठी सुचविले.

जनार्दन कुलकर्णी हे पुणतांब्याला पोस्टमास्तर म्हणून काम करीत होते. म्हणून त्यांना 'जनार्दन मास्तर' या नावानेच त्या भागात सगळे ओळखत होते. जनार्दन मास्तर हे शेतजमिनींचे व्यवहार करण्याच्या कामातही वाकबगार होते. करमसीभाईंच्या कामात ते कसे आले याची त्यांनीच सांगितलेली हकीगत अशी आहे...

"एकदा एक माणूस टांगा घेऊन आला व सांगू लागला, 'चला, तुम्हांला शेठजींनी बोलावले आहे.' मी टांग्यातून गेलो. साकरवाडीला पोचलो. करमसीभाईंची भेट झाली. बोलणे झाले. त्यांनी माझ्या मुलाला आपल्याकडे कामाला लावले. मी त्यांना शंभर रुपये पगार मागितला. तर त्यांनी एकशेपंचवीस रुपये देऊ असे सांगितले. माणसे जवळ करण्याची, त्यांची अशी, एक पद्धत होती.

"मग आम्ही राहुरीला गेलो. तिथे दोन टांगे करून पुसळेवाडीला सरकारी बंगल्यात गेलो. तिथे शेठजींनी मला एक नकाशा दाखवला आणि म्हणाले, 'या परिसरातील जमिनी आपल्याला घ्यावयाच्या आहेत.' मी म्हणालो, 'मला राहुरीला कोण ओळखतंय? पुणतांबा, बेलापूरला मी वाटेल ते करू शकेन.'

"त्या काळात लोक जमिनी देत होते. खंडाने आणि विकतसुद्धा. आम्ही रोज १०० ते १२५ एकर जमिनी मिळवित असू. शेतकऱ्यांमध्ये फार दारिद्र्य होते. ज्वारी अतिशय स्वस्त होती. दोन रुपयांना पोतं. सहा रुपयाला गव्हाचं पोतं, असा भाव होता. दारिद्र्यामुळे सावकारी वाढली. एकरी उत्पन्न अजिबातत नव्हते. खंडामध्ये जास्त मिळते अशी लोकांची भावना होती. टाकळीमिया गावात माझे एक नातेवाईक होते. त्यांच्याकडून तीस वर्षांच्या कराराने दहा रुपये एकरी खंड अशा दराने १५० एकर जमीन मिळाली. अशा जमिनी मिळत होत्या.

"शेठजींना चांगदेवाला जमीन घ्यावयाची होती. तिथे त्यांना लिफ्टची योजना करावयाची होती. म्हणून आम्ही राहुरीचे काम थांबवून पुणतांब्याला आलो. तिथे जमिनी खरेदी करू लागलो. साधारणतः दहा एकर जमिनीच्यावरच करार केले जात असत. तिथेपण आम्ही सुमारे ३०० एकर जमीन मिळवली.

"पुणतांब्याला ब्राह्मणांकडे जमिनी फार होत्या. आम्हांला स्टेशनपासून जवळच्या भागात जमिनी घ्यावयाच्या होत्या. या भागात बऱ्याच जमिनी मिळाल्यामुळे शेठजींचा विश्वास माझ्यावर बसला."

"कराळे म्हणून आमचा एक मित्र होता. त्याच्याकडे १०० एकर ऊस होता. त्याने संपूर्ण खातेच विकण्याची तयारी दाखविली. आम्ही उभ्या उसासह सर्व जमीन अंदाजे ९० हजाराला विकत घेतली."

"शिंगण्याला काशिनाथ बालमुकुंद नावाचा गुजराती इसम होता. मूळचा तो येवल्याचा, पण राहयचा शिंगण्याला. त्यांची शिंगण्याला खूपच जमीन होती. गोदावरी लिफ्ट होती.

आम्ही जेथून पाणी जाईल अशा भागातील जमिनी विकत घेतल्या. त्याने पण त्याप्रमाणे जमिनी विकत घेतल्या. पुढे या व्यवहारात आम्ही सरस ठरलो."

"नंतर आम्ही खानापूरकडे वळलो. तिथे फार खूपच दारिद्र्य होते. लोकांनी भराभर करार करून जमिनी दिल्या. तिथे आम्ही ९०० एकर जमिनी घेतल्या. त्यानंतर आम्ही माळेवाडीला गेलो. तिथेही बऱ्याच जमिनी खंडाने घेतल्या. खानापूर, माळेवाडी, पुणतांबा अशा भागांपैकी कोठेतरी लिफ्ट योजना करता येईल, अशी परवानगी मिळावी म्हणून आमचे प्रयत्न चालले होते. तिथेच एक काळे म्हणून सरकारी अधिकारी माझ्या एका मुलाच्या ओळखीने, माहितीचे झालेले होते. मनुष्य सरळ व्यवहाराचा होता. पैसे खाणारा नव्हता. शेठजींच्याबरोबर आम्ही त्यांना भेटलो. त्यांना आमची भूमिका समजावून सांगितली. त्यांनी आम्हांला सुमारे ९०० एकरांच्या या परिसरात लिफ्ट योजना करण्यासाठी परवानगी दिली. त्यांनी काही सरकारी नियमानुसार अटी घातल्या होत्या, आम्ही त्या सर्व अटी पूर्ण केल्या होत्या."

"पाण्याची सोय असल्यामुळे त्या भागात उसाची लागण केली."

"शेठजींनी मग मला असे सांगितले की, 'तुम्ही आता शेतीत काम करणाऱ्या लोकांची भरती करण्याचे काम पहा. या जमिनींच्या व उसाच्या कामावर देखरेख करण्यासाठी मी एखादा मॅनेजर नेमीन, त्याच्या कामावर तुम्ही देखरेख ठेवा." या शेतमजूर भरतीच्या कामातसुद्धा मी जास्तीत जास्त मदत शेठजींना केली.

"कारखान्याला लागणाऱ्या उसासाठी त्यावेळी आम्ही अंदाजे पंधरा हजार एकर जमीन मिळविली होती व तिच्यावर उसाचे उत्पादन वाढत्या प्रमाणात होत होते. हे सर्व, शासनाने या भागातील जमिनी शेती महामंडळ स्थापन करून त्याकडे सुपूर्द करण्यापर्यंत अबाधित चालले होते.

"शेठजींनी या शेतीसाठी फार कष्ट घेतले. वाहन असो, नसो, ते शेतीवर फेरफटका मारणारच. बारकाईने सर्व पाहणारच आणि दिसतील त्या उणिवा दूर करण्यासाठी मार्गदर्शन करणारच!

त्यांच्या कष्टाचे फळ त्यांना पैशाच्या रूपाने मिळाले, तरी त्यांनी पैशाची घमेंड कधी दाखविली नाही. लहानथोर सर्वांना ते अतिशय प्रेमाची वागणूक देत असत. आदरातिथ्य खूप करीत असत. घरी बोलावून जेवू-खाऊ घालीत असत. माझ्यावर त्यांचे अतिशय प्रेम होते. माझ्या मुलाच्या आजारात तिच्या औषधोपचारासाठी त्यांनी मला खूपच मदत केली."

उसासाठी जमीन संपादण्याच्या कामात कसे प्रसंग आले व घटना कशा घडल्या याची अनुभवी हकीकत जनार्दनमास्तरांनी अशी सांगितली. त्यांच्याबरोबर त्या वेळी बाळकृष्ण

यशवंत खुर्जेकर हेही होते. ते लीझिंग ऑफिसर म्हणून काम करीत होते. त्यांचे आणि करमसीभाईंचे चांगले संबंध होते. त्यांचे बंधू एम.वाय. उर्फ राजाभाऊ खुर्जेकर हे पुढे करमसीभाईंच्या साखर कारखान्यातच काम करू लागले होते. त्यावेळची हकीकत सांगताना ते म्हणाले,

"त्या काळी जमिनी घेताना लँड सिलींग कायदा नव्हता. त्यामुळे कितीही जमिनी घेऊन उसाची लागवड करणे सोयीचे होते. जमिनी संपादण्याच्या कामात माझ्या बंधूंनी मदत केली होती. त्यावेळी जमिनी अगदी स्वस्त दराने खंडाने मिळत असत. माझी स्वत:ची दहा एकर जमीन वर्षाला ३५० रुपये दराने खंडाने दिलेली होती. अगदी चांगली जमीन असनली तर एकरी दहा ते तीस रुपयांपर्यंत खंड मिळत असे. गुळालासुद्धा भाव नव्हता. माझा गूळच नऊ रुपये क्विंटलने विकला होता. साखरेचे पोते दहा रुपयांस मिळत असे. गुळाची बाजारापर्यंत वाहतूक करणेदेखील परवडत नसे. कारण बैलगाडीचे भाडेच दोन-अडीच रूपये असे. असा तो काळ होता..."

अशा त्या काळात करमसीभाईंनी आपल्या साखर कारखान्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची म्हणजेच उसाची हमखास व्यवस्था करण्यासाठी म्हणून एवढी मोठी शेतजमीन संपादन केली. यावरून त्यांच्यातील साहसी वृत्तीबरोबरच पुढच्या भविष्यातले पाहणारी दुरदृष्टी दिसून येते.

श्रीरामपूरचे एक प्रसिद्ध व्यापारी व शेतकरी रूपचंद डाकले हेदेखील एक तसेच कर्तबगार गृहस्थ होते. करमसीभाईंच्यापेक्षा सात-आठ वर्षांनी ते लहान होते. त्यांनीही अंगच्या व्यवहारी चातुर्याने व धडाडीने शून्यातून शेती व व्यापारात ऐश्वर्य कमावले होते. करमसीभाईंची व डाकले शेठजींची चांगली ओळख होती. बेलापूरला करमसीभाईंचे कुटुंब एक डाकल्यांच्या वाड्यातच भाड्याने राहत होते. डाकले शेठजींनीही शेतीच्या आवडीने व छंदाने बरीच मोठी शेती खरेदी केलेली होती. करमसीभाई जेव्हा उसासाठी जमिनी खरेदी करीत होते त्याच सुमाराची ही हकीगत आहे. ती सांगताना डाकलेशेठजी म्हणाले,

"करमसीभाईंना मी माझ्या वयाच्या अठराव्या वर्षांपासून ओळखतो आहे. साखरेचा व्यवसाय ते करीत होते. त्यानंतर त्यांनी साखरेचा कारखाना काढला. ते जमिनी मिळवीत होते तेव्हा मी त्यांना म्हणालो, 'माझा फार्म विकावयाचा आहे.' करमसीभाई म्हणाले, 'मी घ्यायला तयार आहे. पण सगळा व्यवहार एका बैठकीतच आपण संपवला पाहिजे.' मी म्हणालो, 'आपण फार्म पहा आणि मग निर्णय घ्या."

"करमसीभाईंनी फार्म पाहिला आणि हा सौदा एक लक्ष एकावन्न हजारावर ठरला, हे पैसे कसे द्यायचे याबद्दल त्यांनी विचारले, तेव्हा मी सांगितले होते, सुरूवातीला दहा टक्के

रक्कम द्या आणि मग बाकीचे पैसे व्याजासह आम्हांस दोन-तीन वर्षांत हप्त्याने द्या.”

“एक गाय, घोडा व घरातली भांडी यांखेरीज फार्म आहे त्या अवस्थेत द्यावयाचे ठरले. सौदा पक्का झाल्यानंतर मी त्यांना तिलक लावला. नारळ व मोसंबीचे फळ त्यांना दिले आणि सुयश चिंतिले.

“ह्या व्यवहाराची बातमी बाबासाहेब डहाणूकर यांना कळली. हा फार्म त्यांच्या कारखान्याजवळ असल्यामुळे आपल्याला उसाचा तुटवडा पडणार हे जाणून त्यांनी आमच्या शोभाकाकांच्या मनात पिल्लू सोडून दिले. त्यामुळे हा सौदा फिसकटला, हा सौदा होऊ दिला जाणार नाही हे करमसीभाईंच्या पण लक्षात आले व या व्यवहारातून बाहेर पडावे असे त्यांना वाटू लागले. मग आम्ही दोघांनीही समजूतदारपणे या व्यवहारातून माघार घेतली.

“१९४२-४३ च्या सुमारास टाकळीजवळ आम्ही दोघांनी मिळून भागीदारीत साखर कारखाना काढावा अशी त्यांची इच्छा होती. देखभाल - मॅनेजमेंट आम्ही करावी असे त्यांचे मत होते. पण आम्हांला मॅनेजमेंट जमणार नाही”, असे मी त्यांना सांगितले आणि हा प्रश्न तिथेच थांबला.”

असे काही तडीस न गेलेले प्रयत्नही त्यावेळी झालेले होते.

❖

उसाची आदर्श शेती

उप्तं सुकृतबीजं हि सुक्षेत्रेषु महत्फलम्।

चांगल्या शेतात पेरलेले चांगल बीज
चांगले फळ धारण करते.

उसाची आदर्श शेती

उसासाठी जमीन संपादन करण्याची मोहिम एकीकडे सुरू होती; त्याचवेळी संपादन केलेली जमीन उसाच्या लागवडीसाठी तयार करणे, उसाची लागवड करणे आदी कामे सुरू झालेली होती. गोवर्धनभाई पटेल आणि ए.ए. अमीन यांच्यासारखे शेतीतील जाणकार करमसीभाईंच्या हाताशी होते. या दोघांनीही उसाची शेती प्रथमपासूनच शास्त्रशुद्ध रीतीने करण्याची दृष्टी ठेवलेली होती. करमसीभाईं यांचा स्वभाव तर हाती घेतलेल्या प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन माहिती घेण्याचा होता. तशी माहिती ते मिळेल तिथून घेत होतेच. शिवाय आपल्या अंगच्या चातुर्याने शेती सुधारण्याचे विविध प्रयोगही ते करवून घेत होते.

संपादन केलेल्या जमिनीकडे उत्तम उत्पादन घेण्याच्या हेतूने व पाण्याच्या उपलब्धतेनुसार विविध विभाग केलेले होते. त्यांना वाड्या असे म्हणत असत. दशरथवाडी, रामवाडी, लक्ष्मणवाडी, भरतवाडी, हनुमानवाडी असे रामायणच करमसीभाईंनी तिथे सुरू केले होते. शिंगणवाडी, साकरवाडी, लक्ष्मीवाडी अशा आणखीही काही वाड्या होत्याच. साकरवाडी येथील फार्मचे नंतर तीन प्रमुख विभाग करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे होते. १. लक्ष्मीवाडी-शेतकी ऑफिस वगैरे एक विभाग. २. दशरथ, राम, लक्ष्मणवाडी हा एक विभाग आणि ३. भरत, हनुमानवाडी हा एक विभाग. प्रत्येक वाडीवर एक एक फार्मओव्हरसीयर नियुक्त केलेला असे व त्याला एक हजार एकर उसावर देखरेख ठेवावी लागत असे.

शेती हा करमसीभाईंचा एक आवडीचा धंदा होता. छंद होता. ते नामांकित व्यापारी व उद्योगपती म्हणून ओळखले जात असले तरी त्यांना स्वत:ला 'शेतकरी' म्हणवून घेण्यात समाधान वाटते. उसाची शेती करताना उसाच्या कोणत्याही जातीबद्दल त्यांना माहिती मिळाली किंवा त्यांच्या वाचनात आली की ती जात-व्हरायटी - आपल्या शेतीवर आणून नंतर त्याचे बेणे आसपासच्या बागायतदारांकडे पाठवून त्यांना या उसाच्या जातीचा वापर करायला ते लावीत असत. 'सी ओ-७४०' ह्या उसाच्या जातीची जोपासना पाडेगाव येथील

ऊस संशोधन केंद्राच्या अगोदर करमसीभाईंच्या शेती फार्मवर करण्यात आली होती व त्यांनीच ती अन्य बागायतदारांमध्ये प्रसृत करून प्रसिद्धीस आणली होती.

उसाच्या शेतीला पाणी बरेच लागते. करमसीभाईंनी शेती व कारखाना हा प्रपंच जेव्हा उभारण्याचा प्रयत्न चालविला होता, तेव्हा त्याच सुमारास गोदावरी राईट बँक व लेफ्ट बँक कॅनॉल हे सुरू झाले होते. कोरडवाहू जमिनीच्या भागात नव्या धरणयोजनेमुळे पाणी आले होते. पण शेतीसाठी पाणी वापरण्याचे ज्ञान शेतकऱ्यांना नव्हते. करमसीभाईंनी ते ज्ञान चांगल्या प्रकारे अवगत करून घेतले होते. त्याचीही एक पद्धत रुढ केली होती.

करमसीभाईंना शेतीच्या सुधारणेसाठी सतत नवनवीन प्रयोग करण्याचा छंदच होता. खताचा पुरवठा योग्य व वेळीच झाला पाहिजे; पाण्याचे नियोजन व्यवस्थित झाले पाहिजे; पिकाची मशागत चांगली झाली पाहिजे; ऊस उत्पादनातील टनेज वाढले पाहिजे, अशी त्यांची खटपट असे. या बाबतीत बहुधा दर आठ-दहा दिवसांनी ते मुंबईहून येत असत आणि आपली शेती चौकस दृष्टीने पाहून शेतकी अधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेत असत. सल्ला देत असत. आपल्याला उपयुक्त अशी माहिती जर एखाद्या वृत्तपत्रात किंवा मासिकात वाचनात आली तर त्या लेखाचे कात्रण आपल्या शेतकी अधिकाऱ्यांच्या वाचनासाठी ते आवर्जून पाठवून देत असत.

शेतीला द्यावयाच्या खताबद्दलही त्यांनी विशेष लक्ष पुरवून विविध प्रयोग केले होते. उसाच्या उत्तम वाढीसाठी शेणखताचा वापर त्यांनी करून पाहिला आणि तो प्रयोग यशस्वी ठरला. याचीही एक कहाणी आहे.

उसासाठी शेणखताचा वापर करून पाहण्याचे त्यांनी जेव्हा ठरवले तेव्हा एवढ्या मोठ्या शेतीला इतके शेणखत कोठून मिळणार, असा विचार ते करू लागले. विचार करता करता त्यांना मुंबईजवळील आरे येथील दूध केंद्राची आठवण झाली. आरे येथे फारच मोठे शासकीय दूध केंद्र उभारलेले होते. तिथे हजारो जनावरे होती. त्यांच्या शेणाचे ढिगारे जवळच पडलेले असत. त्याला त्यावेळी कोणीही विचारीत नसे. त्या दुर्लक्षित शेणाच्या ढिगाऱ्याकडे करमसीभाईंचे लक्ष गेले आणि त्यांनी ते शेण आपल्या शेतीवर नेऊन वापरण्याचे ठरवले. त्यासाठी मग त्यांनी खटपट करून शेण वाहून नेण्यासाठी रेल्वेच्या वाघिणी ठरवल्या आणि त्या वाघिणीतून आरे येथील शेण भरून ते कान्हेगावला आणले. कान्हेगाव हे साकरवाडीला जवळचे स्टेशन आहे. कान्हेगाव स्टेशनात या शेणाच्या वाघिणी लागल्या. त्यावेळी मुंबईहून अशा तऱ्हेने रेल्वेने शेण वाहून आणण्याच्या कल्पनेला काही मंडळी उपहासाने हसली होती. काहींनी तर करमसीभाईंना खुळ्यातच काढले होते. पण करमसीभाई असल्या तुच्छतेची पर्वा करणारे सामान्य गृहस्थ नव्हते. आपल्या मनाला विचारांती जे पटले त्यावर ठाम राहून तसे करण्याकडेच त्यांचा कल असे. त्याप्रमाणे त्यांनी

त्या शेणखताचा आपल्या शेतीवर वापर केला आणि त्याच्या त्यांच्या अपेक्षेप्रमाणे ऊस उत्पादनासाठी फार मोठा फायदा झाल्याचे दिसून आले आणि मग मात्र त्यांना खुळ्यात काढणारेच खुळे ठरले. लोकांच्या दृष्टीने करमसीभाईंच्या तथाकथित वेडातही एक पद्धत होती - 'There was a method in this madness'-- दोन तीन वर्षांच्या प्रयोगानंतर उसाच्या उत्पादनात झालेली लक्षणीय वाढ प्रत्यक्ष पाहिल्यावर त्या शहाण्यांच्या लक्षात आले, आणि मग त्यांनीदेखील आपल्या उसासाठी शेणखत वापरण्यास सुरूवात केली. कालांतराने आरे गौळीवाड्यास या खताची विल्हेवाट कशी लावायची या विवंचनेऐवजी शेतकऱ्यांची शेणखताची मागणी पुरवणे कठीण होऊ लागले. कोपरगावमधील शेतकऱ्यांमध्ये तर शेणखताला 'मुंबई खत' असे नावच पडले.

करमसीभाईंनी आपल्या उसाच्या आणखी एक अभिनव असा जो प्रयोग केला तो तर या भागातील शेतकऱ्यांना एखाद्या वरदानाइतकाच फलदायी ठरला. हे वरदान होते उसाच्या पिकाला पाणी देण्याच्या पद्धतीच्या संदर्भातले. १९५३-५४ साली करमसीभाईंचे चिरंजीव डॉ. शांतिलालजी सोमैया यांच्या नेतृत्वाखाली परदेशातील हवाई बेटातील उसाची शेती पाहण्यासाठी शिष्टमंडळ गेले होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर कारखान्याचे शेतीविकास अधिकारी श्री. अमीन हेही होते. त्यांनी तेथील पाहणीवरून आणि गोदावरीतील अनुभवांवरून उसासाठी एक नवीन सिंचन-इरिगेशन पद्धती तयार केली. या पद्धतीला 'ग्रेडेड फरो मेथड किंवा ले-आऊट' असे म्हटले जाते. शेतकरी तर या पद्धतीला 'कंटूर' पद्धत म्हणूनच ओळखीत होते. या पद्धतीमुळे उसाला पाणी देण्याची एक सुलभ पद्धती निर्माण झाली. जमीन संपूर्णपणे समपातळ न करता जमिनीचा उतार लक्षात घेऊन योग्य प्रमाणात लांबवर, म्हणजे सुमारे दोनशे ते अडीचशे फूट लांबीपर्यंतच्या सऱ्या पाडून उसाची रानबांधणी केली जाते. यामध्ये पाण्याची काटकसर, उसाकरिता अधिक क्षेत्र आणि कमीत कमी माणसांकडून जास्तीत जास्त उसाचे पाणी भरणे हे मुख्य फायदे आहेत. या पद्धतीचा प्रसार गोदावरीच्या शेतीतज्ज्ञांनी फक्त आपल्याच शेतीत केला असे नव्हे, तर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनाही ही पद्धत त्यांच्या शेतावर जाऊन प्रात्यक्षिकासह शिकविली. मोठमोठ्या शेतकऱ्यांनीसुद्धा ही पद्धत उचलून धरली. भारतीय शेतकऱ्याला एखादी चांगली गोष्ट अनुभवाने पटल्यावर तो पारंपरिक पद्धतीचा त्याग करून नवीन हितावह पद्धत स्वीकारण्यासाठी पुढे येतो. त्यांच्या दृष्टीने गोदावरीची ऊस-शेती म्हणजे 'नमुना शेती'च - 'मॉडेल फार्म' बनली होती!

१९४५ साली बी.एस.सी. (ॲग्री) पदवी प्राप्त केल्यानंतर जादवभाई नरशीभाई पटेल हा गुजरातमधील भडोच जिल्ह्यातील निकारा गावचा, शेतीची लहानपणापासूनच आवड असलेला शेतकऱ्याचा विशी-पंचविशीतला एक तरुण गोदावरी शुगर मिल्सच्या नोकरीत आला. तिथे शेतीवर ओव्हरसियर म्हणून काम करू लागला आणि सुमारे

पन्नास वर्षे अत्यंत निष्ठेने काम करून अंगच्या गुणाने तो तिथेच जनरल मॅनेजरही बनला. गोदावरीच्या परिसरात श्री.जे.एन.पटेल यांना प्रत्येक शेतकरी ओळखू लागला. इतकेच नव्हे तर आपल्या घरातीलच एक अशा आप्तभावनेने त्यांच्याशी वागू लागला. कारण पटेलसाहेबांनी या कालावधीत आपली गोदावरीचीच शेती उत्कृष्ट बनवली असे नाही, तर आजूबाजूच्या अनेक शेतकऱ्यांनाही शेती कशी करावी, हे शिकवून त्यांचीही शेती सुधारून दिली. नुकतीच त्यांनी आपल्या वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केली. आपल्या नोकरीच्या दीर्घकालीन अनुभवांबद्दल सांगताना जे.एन.पटेल म्हणाले :

"मी सावळीविहीरवाडीला १९४६ साली ओव्हरसीयर म्हणून काम पाहू लागलो. तिथे अमीनसाहेब हे अनुभवी शेतकी अधिकारी होते. ते मला माझ्या वाडीवर घेऊन जात असत. तसेच इतर वाड्यांवरही ही त्यांच्याबरोबर जात असे. मी रोज पहाटे पाच-साडेपाच वाजता उठून तयार होऊ लागलो. शेतीवर देखरेख करण्यासाठी आम्हांला घोडे दिले जात असत. कारण तेव्हा शेतीला जाण्यासाठी चांगले रस्ते व वाहने नसल्याने घोडा हे एकमेव साधन होते. अमीनसाहेबांच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनामुळे मी ऊस-लागवड, मशागत, इत्यादी विषयांत चार-पाच महिन्यात चांगलाच तयार झालो. त्यामुळे त्या ठिकाणी मी चार वर्षे चांगली जबाबदारी पार पाडली.

"एकदा श्रीमानशेठ करसीभाई फॅक्टरीवर आले होते. दुपारी शेठजी सावळीविहीरवाडीला भेट देणार असल्याचा निरोप मला मिळाला. दुपारी त्यांच्यासोबत मॅनेजर श्री.के.के.भार्गव व श्री. जी. डी. पटेलसाहेबही आले.

"आमच्या वाडीवरील ऊसशेती पाहून सर्वजण खूष झाले. शेठजींनी मला विचारले, 'मला उत्तम व वाईटातला वाईट प्लॉट दाखव.' मी चटकन सांगितले, 'मजकडे वाईट प्लॉट नाहीत.'

"शेठजींनी माझी आस्थेवाईकपणे चौकशी केली. माझ्या किरकोळ शरीराकडे पाहून थट्टेने विचारले, 'जाड कधी होणार ?' मी त्यांना सांगितले, 'मी खातो, पितो, कष्ट करतो, जाड होण्याचे माझ्या हाती नाही...' शेठजी समाधानाने हसले. ही. त्यांची व माझी पहिली मुलाखत... इथेच आमच्या ऋणानुबंधाचे धागे जुळले. माझ्या भविष्याचा लेख इथेच लिहिला गेला. एका प्रेषिताचे शुभाशिर्वाद मला लाभले.

"परंतु नियतीचा खेळ विचित्र होता. काही दिवस मी ही नोकरी सोडून दुसऱ्या फार्मवर गेलो होतो. परंतु तीन महिन्यांतच मी कंटाळलो आणि परत गोदावरीकडे आलो. अमीनसाहेबांनी माझ्यासाठी सोमैया शेठजींकडे रदबदली केली व त्यांनी त्यावेळी अत्यंत कमी उत्पादन देणाऱ्या शिंगवावाडीवर माझी नियुक्ती केली. परंतु अमीनसाहेबांच्या

साहाय्याने ऊस लागवडीत सुधारणा करून मी तिथे एकरी ७६ टन उत्पादन केले. १९५३ साली मला शेती-अधिक्षक म्हणून बढती मिळाली. माझ्या कार्यक्षेत्रात रामवाडी, दशरथवाडी व लक्ष्मीवाडी मिळून ९०० ते १००० एकर ऊसक्षेत्र होते. या ठिकाणी मी १९५३ ते १९६३ या काळात शेती-अधिक्षक म्हणून उत्तम कामगिरी बजावली. या काळात मी अनेक नवे प्रयोग केले. या दहा वर्षांच्या कारकिर्दीत या भागातील ऊस-शेतकऱ्यांचे व माझे अत्यंत चांगले संबंध निर्माण झाले. उत्तम मशागत, योग्य खतांचा वापर, ग्रेडेड फरो पद्धतीचे सिंचन व जमिनीच्या प्रकारास अनुसरून उसाच्या विशिष्ट जातीची लागण करून आम्ही भरपूर उत्पादन काढले. या काळात ऊस उत्पादनात आम्ही जागतिक उच्चांकही प्रस्थापित केला.

"एक वर्षी आमचे पीक अतिशय चांगले येईल असे दिसत होते. एकरी ८५ टनांच्या पुढे ॲव्हरेज पडेल असे वाटत होते. पण त्या वर्षी आम्हांला उंदरांचा एवढा त्रास झाला की, ॲव्हरेज ५६ टनावर आले. म्हणजे उंदरांमुळे जवळजवळ ३५ ते ४० टनांचे नुकसान झाले. मग उंदीर मारण्याचीच मोहीम हाती घ्यावी लागली. त्यासाठी औषधे मारण्याचे काम तर केलेच, पण आम्ही प्रत्येक उंदरांमागे नये पैसे उंदी पकडणाऱ्या वडाऱ्यांना देत असू. अशा प्रकारे उंदरांचा बंदोबस्त करावा लागला.

"दशरथवाडीला असताना माझ्याकडे तीन वाड्या होत्या आणि हाताखाली पाच ओव्हरसियर होते. पण अधिकारी, ओव्हरसिअर, मुकादम यांच्यात साहेब आणि नोकर असे आमचे संबंध कधीच नव्हते.

"वाडीवर अगदी खेळीमेळीचे वातावरण असे. त्यावेळचे अधिकारी सर्वश्री चौगुले, पी. एम. कुलकर्णी, चिटणीस, पटेल हे होते. वेगवेगळ्या वाडीवर सहभोजनाचा कार्यक्रम ठेवत असू. गप्पागोष्टी करीत असू. एकमेकाला समजून घेऊन काम करणारी माणसे आता सहजी सापडत नाही. आम्ही कामही खूप करायचो. पण काम करताना, 'मी कोणी नोकर आहे' अशी भावना माझ्या मनात कधीच नव्हती. कारखान्याबद्दल, आपल्या कामाबद्दल आपुलकीचीच भावना असायची. माझे शेठलोकांशी संबंध पण अगदी घरच्यासारखेच होते. अमीनसाहेब हा तर सर्वात राजा अधिकारी! सर्वांशीच ते प्रेमाने व आपुलकीने वागत असत.

"एकदा ज्वारी, 'हायब्रीड सीड' बद्दलही खूपच चर्चा चालू होती. आम्ही पण हायब्रीड सीड करायचे ठरविले. पहिल्याप्रथम सीड काढले. ते पीकही चांगले आले. श्री. नानासाहेब लोणकर हे बागायतदार आमचे मित्र म्हणजे आमचे प्रचारयंत्रच होते. आम्ही शेतीसाठी केलेल्या सुधारणांची माहिती ते त्यांच्याकडे येणाऱ्या मोठ्या बागायतदारांना, अधिकाऱ्यांना देत असत. आम्ही करीत असलेली शेती व आमच्या शेतीवरील पिकांचे मिळणारे सर्वसाधारण टनेज यांची माहिती घेण्यासाठी आमच्या शेतीला अनेक मंत्र्यांनीसुद्धा भेटी

दिल्या. त्यांत उल्लेख करण्यासाठी नावे म्हणजे सर्वश्री यशवंतराव चव्हाण, एस.के. पाटील, अण्णासाहेब शिंदे आदी.

"शेठ करमसीभाई आपले चिरंजीव शांतिलालजी यांना कारखान्याच्या व शेतीच्या कामाबद्दल माहिती व्हावी या हेतूने वेळोवेळी साकरवाडीला आणीत असत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते परदेशातही जाऊन आले होते. शांतिलालजींची व्यवस्थापकीय कारकीर्द १९५६ मध्ये सुरू झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी साखर कारखान्याच्या शेती विभागाने महत्त्वाचे शेतीविकासाचे टप्पे गाठलेले आहेत. त्यांमध्ये प्रामुख्याने उल्लेख करावयाचा झाल्यास उसाची नवीन जात निर्माण करणे, उदा. 'सी.ओ.-६१५'. चांगल्या जातीचा प्रसार करणे, उदा. 'सी.ओ.-७४०'. आधुनिक शेतीतंत्राचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेणे, उदा. 'ग्रेडेड फरो मेथड, ३२ इंची खोल नांगरट' इत्यादी उल्लेखनीय घटना आहेत.

"१९५५ साली आंतरराष्ट्रीय ऊस आणि साखर-तंत्रज्ञांची परिषद साकरवाडी येथे भरली होती आणि तिथूनच शांतीलालजींच्या शेतीविषयक जीवनाची सुरूवात झाली. १९५६ साली त्यांच्याच प्रेरणेने 'सी.ओ-७४०' या उसाच्या जातीचा मोठ्या प्रमाणावर प्रयोग आणि लागवड करून गोदावरी कारखान्याने संपूर्ण महाराष्ट्राला मार्गदर्शन केले. आज महाराष्ट्रामध्ये जवळजवळ ९० टवके उसाचे क्षेत्र या उसाच्या जातीने व्यापलेले आहे आणि याचा उगम गोदावरी कारखान्याच्या शेतीमध्ये १९५६ साली केलेल्या प्रयोगात आहे. उत्पादन कमीत कमी खर्चात झाले पाहिजे यावर शांतिलालजींचा अत्यंत कटाक्ष होता. त्यांच्या या आग्रहामुळे गोदावरीची शेती ही केवळ कोपरगाव परिसरातच नव्हे, तर महाराष्ट्रातील साखरधंद्यात एक नमुनेदार शेती म्हणून ओळखली जाते. आज या भागात संपन्न झालेले सर्वश्री लोणकर, घारमाळकर, बोरावके, ससाणे, जगताप, रोहमारे आदी शेतकरी अजूनही गोदावरी शेतीमळ्यांचा अभिमानाने उल्लेख करतात. गोदावरीचे शेतीतज्ज्ञ आणि प्रगतीशील बागायतदार यांच्यामध्ये एक प्रकारे निकोप अशी चुरसच लागत असे.

"याच काळात माजी राज्य अन्नमंत्री श्री. अण्णासाहेब शिंदे यांनी अनेक शेतकऱ्यांना घेऊन या ऊस-मळ्यांची पाहणी केली होती व समाधान व्यक्त केले होते.

डॉ. शांतिलाल सोमैया 'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन'चे अध्यक्ष होते. तेव्हा त्या अधिवेशनाला आपल्या मंत्रिपदाच्याा कारकीर्दीतच श्री. अण्णासाहेब शिंदे आले होते. आपल्या प्रास्ताविक भाषणात त्यांनी असे कबूल केले की, 'महाराष्ट्रातील, विशेषत: नगर जिल्ह्यातील शेती व्यवसायात प्रगती करण्यात सोमैया कुटुंबियांचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या शेतीची ते चांगली प्रगती करतातच, त्याचबरोबर आसपासच्या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञान देऊन त्यांच्याही शेतीची प्रगती करण्यास हातभार लावतात.'

"१९६२ साली गोदावरी साखर कारखान्याने आपल्या ऊस-मळ्यात अडसाली,

खोडवा आणि सुरू या उसांची सरासरी ७१ हून काढून एक नवा जागतिक उच्चांक निर्माण केला. त्यावेळच्या गोदावरी शेतमळ्यातील ऊस उत्पादनाच्या आकडे हे जगातील कुठल्याही विकसित देशाच्या ऊस-उत्पादनाच्या तुलनेत बरोबरीने होते आणि पुढे तर १९६२ पर्यंत गोदावरी साखर कारखान्याच्या साकरवाडी व लक्ष्मीवाडी येथील १६००० एकरांच्या यांत्रिक ऊस फार्ममध्ये ऊस-उत्पादनाचे लक्षणीय उच्चांक गाठले गेले. सर्वश्री गोवर्धनभाई पटेल, ए.ए. आमीन, जे.एन. पटेल, फकीरभाई पटेल, एन.जी. कुलकर्णी, एस.बी.चौगुले, बी.एम. मुरुगकर, पी. के. वैद्य, प्रभाकर भिसे, एम. वाय. खुर्जेकर आदी शेतकी-अधिकाऱ्यांच्या आणि इतर सहकाऱ्यांच्या सक्रिय सहकार्याने व परिश्रमाने गोदावरी कारखान्याला दर एकरी १०७ टन ऊस उत्पादन, १३.४ टक्के साखर उतारा आणि दर एकरी १४.१६ टन साखर उत्पादन असे जागतिक पातळीच्या तुलनेचे उच्चांक गाठता आले.”

या यशाच्या श्रेयात आधुनिक, तांत्रिक पद्धतीच्या शेतीचा पुरस्कार सातत्याने करण्यात डॉ. शांतिलालजी यांचा जसा वाटा आहे, तसाच कर्मवीर करमसीभाईंचाही आहे. करमसीभाई हेच या सर्वांचे आद्य प्रवर्तक आणि मार्गदर्शक होते. यशाचे शिखर गाठणारी ही तज्ज्ञ माणसे त्यांनीच हेरली आणि आपल्या कामाशी जोडली. या माणसांचे अनुभवही प्रेरक आहेत. श्री. जे. एन. पटेल यांचे अनुभव-कथन विस्ताराने अशासाठीच दिले आहे की, त्यातून करमसीभाईंनी आपल्या शेतमळ्यांची घडण कशी केली व त्याचबरोबर त्यांच्या शेतीतील कार्यकर्त्यांचीही घडण कशी झाली, हे लक्षात यावे.

❖

शेती अधिकाऱ्यांचे अनुभव कथन

उदाचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ।

उदारवृत्ती असलेल्या माणसांच्या दृष्टीने जग हे एक कुटुंब असते.

शेती अधिकाऱ्यांचे अनुभव कथन

करमसीभाईंच्या मार्गदर्शनासाठी घडलेल्या काही शेतकी-अधिकाऱ्यांचे अनुभवकथनही उद्‌बोधक आहे. त्यांतून करमसीभाईंच्या व्यक्तिमत्त्वातील एक एक पैलू उजळून दिसतील.

श्री. प्रभाकर दत्तात्रय भिसे हे ॲग्रीकल्चर डिप्लोमा असलेले तरुण १९४७ पासून गोदावरीच्या शेतीमध्ये 'ॲग्रो ओव्हरसियर' म्हणून कामावर आले. सुरूवातीला त्यांना खानापूर येथील आपल्या खाजगी फार्मवर करमसीभाईंनी पाठविले. आपले अनुभव सांगताना भिसे म्हणाले, "फार्मवर गुऱ्हाळ चालू असताना एकदा शेठजी तिथे आले. कढयांमधून उसाचा रस उकळत होता. कामावरल्या मुकादमांचे लक्ष नव्हते. शेठजींनी त्यांना चांगलेच धारेवर धरले व आम्हा सर्वांनाच आपापल्या कामावर नीट लक्ष देण्याविषयी फर्मावले. ते गुऱ्हाळावर आले म्हणजे सगळीकडे फिरून कशा प्रकारे कामे चाललेली आहेत हे बारकाईने पाहत असत. एकदा क्रशर चालू होता. रस गळत होता. शेठजींनी एक नट राईट करून घ्यायला सांगितले. मी म्हणालो, 'शेठजी, आपण असा नट टाईट करायला गेलो तर रस रंगावर उडेल व भाजेल.' ते म्हणाले, 'तसे काही होणार नाही. तुम्ही नट राईट करा.' आम्ही नट टाईट केला तेव्हा थोडा रस उडालाच. ते म्हणाले, 'भाजले का? काही काही वेळेला मी कोणाचे ऐकत नसतो. हे बरोबर नाही. मी मुंबईला गेल्यावर कोणाबरोबर तरी क्रशर पाठवून देतो.' आणि मुंबईला गेल्याबरोबर त्यांनी तीन क्रशर पाठविले. शेठजी अतिशय चटकन निर्णय घेत असत व ते पार पाडीत असत.

"साखरेबरोबरच त्यांचा गुळाचा व्यापारही चालू होता. मला ते, आसपास चालणारी गुऱ्हाळे पाहून त्यांच्या गुळाचा रंग कसा आहे. आपल्याकडील गूळ करण्याच्या पद्धतीत काय उणीव आहे, हे नीट पाहून यायला सांगत असत. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाला ताबडतोब मंजुरीही देत असत.

"एकदा गुऱ्हाळ चालू असताना शेठजी तेथे आले. देशपांडेसाहेब मॅनेजर होते. एका कढईमधील गूळ खूप काळा झाला होता. तो पाहिल्यावर शेठजी खूप रागावले. मी जवळच

होतो. त्यांनी मला 'हा गूळ काळा का झाला' असे विचारले. मी सांगितले, 'आपण उसाची राहिलेली टिपरी वगैरे गोळा करून शेवटी शेवटी आणतो. त्यांची ही शेवटची काहिल आहे. त्यामुळे या गुळाचा रंग काळा झाला आहे...' इतके बारीकसारीक त्यांचे लक्ष असे. हारेगावला उसाची शेती होती. त्यांच्यापेक्षा आमचा ऊस जर कमी झाला किंवा उतारा कमी पडला तर असे का झाले याबाबत योग्य ती चौकशी करून यायला ते सांगत असत. आपली चूक सुधारायला लावीत असत. एवढी चौकस बुद्धी त्यांच्याकडे होती. एखादा नोकरीसाठी त्यांच्याकडे आला तर त्याची ते तावून सुलाखून परीक्षा घेत असत.

"शेठजी फार्मला भेट द्यायला आले म्हणजे आपल्या शेजारी आपल्या शेतीला लागून असलेल्या बागायतदारांची शेतीसुद्धा पाहत असत. त्यांच्या व आपल्या शेतीची ते तुलना करीत असत. एकदा अशा प्रकारे पाहणी करीत असताना एका शेतकऱ्याच्या शेतीमधून आपला ट्रॅक्टर गेलेला त्यांनी पाहिला. ते म्हणाले, 'आपल्या ट्रॅक्टरपुढे त्यांच्या शेतीचे नुकसान होता कामा नये.'

"कोठलीही उसाची नवीन जात आली की ती आपल्याकडे आणून त्याचा प्रयोग करण्याची त्यांची इच्छा असे. एकदा आम्ही खाजगी फार्मवर कापूस लावला होता. शेठजी आले म्हणजे कापसाचे झाडन् झाड अगदी नीटपणे पाहून निरीक्षण करीत असत. त्यांची वाढ चांगली झाली नसली तर त्याच्या खताची चौकशी करून त्याची वाढ चांगली कशी होईल याबद्दल मार्गदर्शन करीत असत.

"१९४८च्या सुमारास एकदा आमच्याकडील ४७ एकरातील ऊस जळाला. जवळजवळ दोन हजार टन माल असावा. आता हा ऊस गाळणार कोठे?... आमचे गुऱ्हाळ चालू होते. तरीपण एवढ्या उसाचा गूळ करायला जवळजवळ वीस दिवस लागले असते. माझ्यापुढे प्रश्न पडला. अर्थात हा उद्योग आमच्याबद्दल वाईट भावना असलेल्या माणसांचा होता. मी ही हकीगत सांगण्यासाठी निघालो होतो. रस्त्यात मला महाराष्ट्र फॅक्टरीचे अधिकारी भेटले. त्यांचा माझा परिचय होता. त्यांनी चौकशी केली तेव्हा मी त्यांना माझी अडचण सांगितली. त्यांनी विचारले, 'अशा या उसाचे काय करायचे ठरविले आहे?' मी म्हणालो, 'तुम्ही हा ऊस घेतला तर चांगले होईल.' तेव्हा ते म्हणाले, 'तुला हा निर्णय थोडाच घेता येणार आहे?' मी सांगितले, 'मी आमच्या मालकांना विचारीन. मला खात्री आहे की ते याला मान्यता देतील...' मग मी शेठजींना व आमच्या मॅनेजरना भेटून त्यांना ऊस जळिताची माहिती दिली व महाराष्ट्र फॅक्टरी हा ऊस घ्यायला तयार आहे असेही सांगितले. शेठजींनी याला लगेच संमती दिली.

"शेठजींचा भोपाळ येथे ५००० एकर जमिनीचा फार्म आहे. त्यांनी मला भोपाळला पाठविले होते. अमीनसाहेबही बरोबर होते. तिथे साखर कारखाना काढण्याची त्यांची

कल्पना असावी. नंतर तिथे त्यांनी गहू वगैरे भुसार शेतीच केली.

"एकदा शेठजी तिथे भेट देण्यासाठी येणार होते. आम्ही त्यांची उतरायची वगैरे व्यवस्था एखाद्या मंत्र्यासारखी केली होती. स्टेशनवर त्यांच्या स्वागतासाठी हार-गुच्छ घेऊन गेलो होतो. ते पाहून म्हणाले, 'मी कोणी मंत्री वगैरे नाही. माझे असे स्वागत करायला नको होते.'

"शेतीवर गेल्यावर किती नांगरट वगैरे झाली याची त्यांनी बारकाईने चौकशी केली. जेवायला सर्वांच्याबरोबर बसल्यावर त्यावेळीही चर्चा करीत असत. शेतीसाठी उत्कृष्ट खते, बियाणे वगैरेंचा तुटवडा कधीच पडला नाही. अमीनसाहेबांचेही चांगले मार्गदर्शन झाले. उसाची शेती होती तेव्हा अगदी उसाची उंची मोजून जास्तीत जास्त टनेजबद्दल आमच्यात चढाओढ लागत असे. त्यांच्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट घडली तर मात्र ते रागावत असत. पण अपशब्द मात्र कधीच वापरत नसत. भेट झाली म्हणजे अगदी मुलाबाळांसह सर्वांची चौकशी करीत.

"माळेवाडी-खानापूर येथील कामगारांनी एकदा शेतीची मजुरी वाढवून मिळण्याबद्दल संप केला होता. त्यावेळी मजुरी साधारणपणे १ रुपया २० पैशापेक्षा कमी असावी. कॉमरेड माधवराव गायकववाड हे त्यांचे पुढारी होते. त्यावेळी गुळाला अतिशय कमी भाव होता. त्यामुळे संप मिटेना. संप जास्तीत जास्त काळ चालल्यामुळे मजूरदेखील अडचणीत आले. मग त्यांनी 'आम्हांला शेठजींशी बोलावयाचे आहे' असा निरोव पाठवला. शेठजींची व त्यांची भेट झाली. माधवराव गायकवाड यांचे सर्व म्हणणे शेठजींनी ऐकून घेतले. मजुरांना किमान २५ नये पैसे दर वाढवून द्यावा अशी त्यांनी मागणी केली. शेठजी म्हणाले, 'सध्या गुळाला भाव नाही. म्हणून दर वाढवून देणे मला परवडणार नाही. शिवाय अशा प्रकारे तुम्ही मजुरांना सारखे संप करायला लावले तर प्रत्येकी वेळी दर वाढवून देणेही मला परवडणारे नाही...' मग आसपासच्या मजुरांना काय फायदे मिळतात व आमच्याकडील मजुरांना काय मिळते यावर चर्चा झाली. शेवटी आमच्याच फार्मवर असणाऱ्या मजुरांना जास्त फायदे मिळतात असे दिसून आले. तरीपण पुढारी म्हणाले, 'तुम्ही काहीतरी मजुरी वाढवून द्या, नाहीतर आमची फजिती होईल.' शेवटी तडजोड होऊन शेठजींनी त्यांची मागणी मान्य केली व नंतर पुढारी गेल्यावर शेठजींनी सर्व कामगारांना प्रत्येकी अर्धा-अर्धा पोते ज्वारी मोफत वाटण्यास सांगितले. म्हणाले, 'शेवटी आपल्या कामगारांना आपणच मदत करणार!...'

"एखाद्या गोष्टीविषयी त्यांची खात्री पटली तर ते माघार घेणार नाहीत, पण निर्णय मात्र त्वरीत घेणार. त्यांच्याबद्दल कामगारांच्या खूपच आदर असे."

"१९५५-५६ च्या सुमारास शेठजी 'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिकल असोसिएशन'चे अध्यक्ष होते. तिथल्या सभेत ते आपले विचार अगदी स्पष्टपणे मांडत असत.

शेठजींना आपल्या माणसाबद्दल फार आपुलकी वाटते. आमच्याकडे एक हॉर्टिकल्चरिस्ट-फलोद्यान अधिकारी - श्री. जी. बी. देशमुख म्हणून होते. साकरवाडी

व लक्ष्मीवाडी, तसेच बंगल्यावरील बागांबाबत ते सल्ला देत असत. वृद्धापकाळी त्यांनी 'मला तुमच्या गेस्ट हाऊसमध्ये साकरवाडीस राहावयाचे आहे' अशी इच्छा व्यक्त केली. शांतिलाल शेठजींनी त्यांना साकरवाडीस पाठविले व आम्हांला सांगितले की 'यांचा सांभाळ करा काळजी घ्या...' नंतर देशमुख साकरवाडीस येऊन राहिले. काही दिवसानंतर ते आजारी झाले. त्यांची प्रकृती तपासल्यानंतर डॉक्टरांनी सांगितले की 'देशमुख जास्त आजारी असल्यामुळे त्यांच्या घरच्या कोणास तरी बोलावून घ्या.' आमचे मॅनेजर काळे यांनी मुंबईला फोन करून ही हकीकत कळवली. देशमुखांचा मुलगा मुंबईस राहत होता. शेटजींना हा निरोप कळल्यानंतर ते रात्रभर प्रवास करून पहाटेच देशमुखांना भेटावयास आले. त्यांना ते भेटले. त्यांच्याशी बोलले आणि सकाळीच परत मुंबईला जावयास निघाले. तेवढ्यात ज्याला आम्ही निरोप दिला होता तो त्यांचा मुलगा आला. त्याने रात्री प्रवासाचा त्रास नको म्हणून नाशिकला मुक्काम केला होता व सकाळी येथे आला होता!... पण शेटजी मात्र रात्रभर प्रवास करून, त्रास सोसून येथे आले होते. इतकी त्यांना आपल्या माणसांबद्दल आपुलकी व प्रेम वाटते.

"याचे आणखी एक उदाहरण म्हणजे आमचे इस्टेट मॅनेजर गोवर्धनभाई पटेल कॅन्सरने आजारी होते, तेव्हा त्यांना टाटा हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. एकदा त्यांची प्रकृती जास्तच बिघडल्यामुळे त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की, 'मला करमसीभाईंना भेटावयाचे आहे.' शेठजींना फोन केल्यावर ते तिथे लगेच आले. शेठजींची भेट झाली. पटेलसाहेबांनी विचारले, 'शांतिलालजी नाही आले?...' शांतिलालजींना दिल्लीला एका मिटींगला जावयाचे होते. शेठजींनी त्यांना फोन करून सांगितले की, 'दिल्लीची मिटींग पुढे पण होईल, परंतु जी. डी. पटेलांची भेट परत होणार नाही.' मग शांतिलालजी सर्व कामे बाजूला ठेवून आले. जी.डी.पटेल वारले तेव्हा शेवटी शेठजींनी त्यांना खांदा दिला होता.

"शेतीकडे त्यांचे फार लक्ष असे. कोल्हापूरची रिकव्हरी जास्त आहे हे कानावर आले. तेव्हा त्यांनी त्याची कारणे पाहून येण्यास सांगितले."

"सहकारी साखर कारखाना निघाला तेव्हा त्यांनी विरोध केला नव्हता. तर उलट विखे पाटील हे शेठजींकडून माहिती घेत होते व शेठजी त्यांना मदत करीत होते.

"काही उपद्व्यापी लोक शेठजींना मुंबईला निनावी पत्रे लिहून कारखान्याबद्दल काहीतरी कळवीत असत. कारखान्यावर येताना शेठजी ती पत्रे बरोबर घेऊन येत असत व ऑफिस-मिटींगमध्ये ती पत्रे वाचावयास सांगत असत. वाचून झाल्यावर ते सांगत असत, 'ज्या कोणी ही पत्रे लिहिली असतील त्यांच्यावर माझा विश्वास नाही आणि माझ्यावर या पत्रांचा काहीच परिणाम होणार नाही. परंतु आपले कोणाचे काही चुकत असेल तर सुधारणा करण्यासाठी इथे वाव आहे...' अशी पत्रे लिहिणारी माणसेसुद्धा तिथे असत व त्यांना अशा कानपिचक्या बसत असत.

“एकदा शेठजी लक्ष्मीवाडीहून कोपरगावला जात होते. सकाळी अकराच्या सुमारास रामवाडीच्या शेतात काही बकऱ्या चरत असल्याचे त्यांनी पाहिले. त्यांनी लगेच कोपरगावहून कारखान्याकडे निरोप पाठविला आणि ही हकीकत सांगून संबंधित माणसाला कामावर लक्ष ठेवण्यास बजवावे असे कळवले. शेठजींना कामातला गलथानपणा अजिबात आवडत नव्हता.

“आधुनिक तंत्राने शेती करण्याकडे शांतिलालजींचे व त्यांचे जास्त लक्ष असे. त्यासाठी लागणारी आधुनिक अवजारे ते लगेच पाठवित असत. अगदी छोट्या छोट्या फार्मवरसुद्धा ते आधुनिक अवजारे ठेवीत असत. शेतीला बाधा पोचेल अशी वेळ ते कधीच येऊ देत नसत. पी.पी. शहा, अमीन, खुजा, क्षत्रिय या सर्व अधिकाऱ्यांना तंत्रज्ञानाच्या शिक्षणासाठी त्यांनी परदेशांत पाठविले होते. अशा वेळी ते खर्चास मागेपुढे पाहात नसत.

“वाडीवरल्या शेतीवर ऊस उत्पादनाचे टनेज वाढण्याबाबत चढाओढ असे. त्यावेळी शेतीला पाणी भरणाऱ्यापासून ते ओव्हरसियरपर्यंत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना खास बक्षिसे देण्यात येत असत. शिवाय त्यांना सर्वांबरोबर वेगळा बोनसही मिळत असे. पाणी भरण्याचा पगार त्यावेळी असायचा पंचेचाळीस रुपये. पण त्याला बक्षीस मिळायचे पन्नास रुपये!...

“कोठेही प्रवासाला गेल्यावर सर्वांप्रमाणेच आपल्या ड्रायव्हरचे जेवण झाले की नाही याची शेठजी न विसरता चौकशी करीत असत. एकदा असेच आम्ही बाहेरगावी गेलो होतो. त्यांच्या घरचे पाहुणे बसलेल्या गाडीच्या ड्रायव्हरचे जेवण झालेले नव्हते, तेव्हा त्यांनी सर्वांना खाली उतरवले व अगोदर ड्रायवरला जेवण करून घ्यावयास लावले... अशा शेठजींच्या बऱ्याच आठवणी आहेत. मला तर त्यांच्यापासून खूपच शिकायला मिळाले आहे.”

लक्ष्मीवाडीचे पुढे मॅनेजर झालेले श्री. बी. एन. मुरुगकर यांनीही आपले अनुभव सांगताना म्हटले, “मी १९६३ साली गोदावरी साखर कारखान्यातील शेतीखात्यात नोकरीसाठी आलो. मला माझे स्नेही व थोर देशभक्त श्री. अच्युतराव पटवर्धन यांनी सांगितले की, ‘महाराष्ट्रात व्यापारी तत्त्वावर शेती गोदावरी शुगर मिल्समध्ये केली जाते. अशा ठिकाणी नोकरी करायला तुम्हांला हरकत नाही. तुम्ही या क्षेत्रात जात आहात ते अतिशय चांगले आहे.’ त्यांनी मला तसे पत्रही दिले होते. मी या संस्थेमध्ये येण्याचे हे प्रमुख कारण होते.

“स्वातंत्र्यपूर्व काळात पडीक जमिनी लागवडीखाली आणून त्यांची सुधारणा करणे हा राष्ट्रीय कार्यक्रमच करमसीभाईंनी केला होता. अच्युतराव जरी समाजवादी विचारसरणीचे नेते होते, तरी जमिनीच्या स्थित्यंतराचा हा कार्यक्रम कोणी भांडवलदार करतात की इतर कोणी करतात, हा भाग त्यांनी गोण मानलेला असावा. राष्ट्रीय

दृष्टीकोन ठेवून हे काम कोण हाती घेतो, यालाच त्यांनी महत्त्व दिले असावे. त्यांची व करमसीभाईंची जुनी ओळख होती. १९४२ च्या लढ्यात अच्युतराव भूमिगत असताना त्यांना करमसीभाईंनी राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन व मोठे साहस करून आपल्या घरी ठेवून घेतले होते. करमसीभाईंची अप्रत्यक्षपणे स्वातंत्र्यलढ्याला मदत असेच.

"करमसीभाईंनी कारखान्यासाठी बऱ्याच जमिनी खरेदीने अगर खंडाने घेतल्यावर त्यात पैसा व श्रम ओतून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतीत मोठी सुधारणा केली. त्यांचे पाहून आसपासच्या बागायतदारांनीही आपली शेती सुधारली.

"गोदाचवरीची हजार ते बाराशे एकर जमीन एकेका वाडीवर असे. आधुनिक यंत्रांच्या साह्याने शेतीची मशागत केली जात असे. शेतीत नवीन नवीन प्रयोग करण्याची आवड व जिद्द त्यांच्यात होती. पूर्वी शेतीमध्ये खत म्हणून पेंडीचा वापर केला जात असे. पेंडीच्या खताचे प्रमाण व त्यातून येणारे पीक याचा हिशोब लावला जात आसे. पेंड दिल्यानंतर रिकामी पोती जनरल स्टोअर्समध्ये जमा करावीत अशी करमसीभाईंची सूचना होती. त्या रिकाम्या पोत्यांच्या आधारे शेतीत आपण किती खत वापरले याचा हिशेब व्हायचा. ते असा काटेकोर हिशेब पाहत असत.

"त्यावेळी करमसीभाई शेतीतून पायी हिंडलेले आहेत. बैलगाडीतून फिरलेले आहेत. हा माणूस हाडाचा शेतकरी आहे. देशात कोठेही शेतीबद्दल काही वाचनात आले की लगेच हे तेथे जायचे व सर्व माहिती मिळवायचे. व्यापारात जरी ते असले तरी शेतीबद्दल त्यांना जास्त प्रेम आहे. गोदावरी साखर कारखान्याचा संपूर्ण पाया हा शेतीवर आधारित असा 'ॲग्रो बेस' आहे. गोदावरीच्या 'ग्रेडेड फरो' पद्धतीची त्या काळी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिकल असोसिएशनच्या सभांमधून खूप चर्चा झाली होती. आंतरमशागत कशी करावी T.D.18, D7, TD24, D/4 यांसारखे ट्रॅक्टर वापरून जमीन कशा प्रकारे नांगरावी, जमीन भुसभुशीत केली तर पीक चांगले येते, वगैरे तंत्रज्ञान व साधने शासनाकडेही नव्हती. अशा त्या काळात करमसीभाईंनी हे प्रगत तंत्रज्ञान अवलंबिले. देशाला व महाराष्ट्राला शेतीमध्ये एक नवे तंत्र दिले. सरकारी योजना यायच्या अगोदर यांनी नदीवर लिफ्ट योजना केली होती. या योजनांद्वारे शेतीला पाणी दिले. कॅनॉल असतानासुद्धा ४०×४०च्या विहिरी खणल्या. शेतीला पाणी देताना पाण्याचा थेंबसुद्धा वाया जाऊ नये असा त्यांचा प्रयत्न असे.

"एकदा बंगलोर येथील लाल बागेत गेलो होतो. त्यावेळी ते तेथील सर्व झाडांची बारकाईने पाहणी करत होते. यातली कोणती झाडे आपल्याकडे जगू शकतील, वाढू शकतील याची अगदी बारीक सारीक माहिती ते घेत होते.

"१९६६ साली कर्नाटक राज्यात नव्याने साखर कारखाना काढण्याचे जेव्हा त्यांनी ठरवले तेव्हा आम्हांला प्रथम कोल्हापूर, सांगलीइ या भागातील साईटही पाहायला सांगितली

होती. उसासाठी जेथे चांगले क्षेत्र उपलब्ध होईल व चांगल्या प्रतीचा ऊस निर्माण होऊ शकेल अशा दृष्टीने कारखाना काढताना विचार केला पाहिजे असे त्यांनी सांगितले होते."

श्री. पी. के. वैद्य हे १९३८ सालच्या मे महिन्यात करमसीभाईंना मुंबईत भेटले होते. त्यावेळी त्यांचे ऑफिस वडगादीला होते. गोदावरी साखर कारखान्याची जुळवाजुळव चाललेली होती आणि त्या संदर्भात होणारे व्यवहार कायदेशीरपणे व्हावेत यासाठी त्यांना एका वकिलाची गरज होती. पी. के. वैद्य हे वकील होते. जळगाव जिल्ह्यात एरंडोल येथे ते वकिली करीत होते. शोभाचंद खटोडांच्या ओळखीने ते आले होते. करमसीभाईंनी त्यांना सुरूवातीला साकरवाडीला स्टोअर सुपरिटेंडेंट म्हणून नेमले घेतले. लक्ष्मीवाडीची फॅक्टरी सुरू झाल्यावर त्यांना तिथल्या जनरल ऑफिसमध्ये पाठविले होते. शेतीबद्दलची कामे, तसेच कोर्टातील शेतीसंबंधीची कामेही ते करीत असत. कामगारांची युनियन निघाल्यानंतर त्या संदर्भातील कोर्टाची कामेही निघू लागली. त्यामुळे वैद्यांना कोपरगाव, सोलापूर येथील कोर्टाची कामेही पाहावी लागत असत. १९७४ पर्यंत त्यांनी ही कामे केली. त्यानंतर ते पुण्यास राहावयास आले. तेव्हा करमसीभाईंनी त्यांना जसजशी कोर्टाची कामे निघतील, तसतशी ती पुण्यात पाहात चला, असे सांगितले. या अवधीतील आपला अनुभव सांगताना पी. के. वैद्य म्हणाले, "१९३८ ते ८४ या सुमारे पंचेचाळीस-सेहेचाळीस वर्षात मला त्यांच्याजवळ काम करण्याची संधी लाभली. करमसीभाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत कष्टाळू व करारी आहे. अमूक एक करायचे ठरवले म्हणजे ते झालेच पाहिजे, मग जेवणखाण वगैरेची काही पर्वा नाही, अगोदर काम असा त्यांचा खाक्या होता. मुंबईत असले म्हणजे तर ते रात्री दहा वाजेपर्यंत ऑफिसमध्ये काम करीत असत.

"आठवड्यातून एक खेप ते साकरवाडीला मारत असत. आल्याबरोबर अगोदर फॅक्टरी व्हिजीट, मग निरनिराळ्या खात्यांच्या प्रमुखांची मिटींग असा त्यांचा कार्यक्रम चालू होत असे. ऑफिसमधील रेकॉर्ड नीट वापरावे, नीट ठेवावे, कारण ते खूप दिवस राहावयाचे असते असे त्यांचे सांगणे असे. अत्यंत लक्षपूर्वक बारकाईने सर्व रेकॉर्ड तपाशीत असत. काही चूक निघालीच तर समजावून सांगत असत.'आपण अशा चुका केल्या तर कारखाना कसा चालेल?' असे म्हणून चूक दुरुस्त करायला लावीत असत... कधीकधी कामाबद्दल रागावले तरी आवाज चढवून बोलत नसत. अपशब्द वापरीत नसत."

श्री. पी. के. वैद्य यांचे चिरंजीव श्री. विनायक वैद्य हेसुद्धा शेतीचे पदवीधर झाल्यानंतर गोदावरीकडेच नोकरीला होते. विद्यार्थी दशेपासूनच साकरवाडीच्या परिसरात ते वाढले होते व त्यांच्यादेखतच कारखान्याचीही वाढ झालेली होती. १९४८ साली शेतीची पदवी घेतल्यानंतर करमसीभाईंनी त्यांना विचारले होते, 'आता काय करणार?' विनायक वैद्यांनी

सांगितले, 'मी आता नोकरी करणार...' आणि ते गोदावरीच्या शेतकीच्या कामात आले. आपले अनुभव सांगताना ते म्हणाले, 'एकदा वाडीवर आले असताना शेटजींनी मला विचारले, 'दोन ठिकाणच्या पिकांमध्ये तफावत का दिसते?' मी त्यांना सांगितले. 'इथली जमीन सुपीक आहे व दुसरीकडची मुरमाड आहे, म्हणून पीक चांगले नाही.' शेठजी म्हणाले, 'तुम्हांला कॉलेजमध्ये काय शिकविले. मुरमाड जमीन चांगली होऊ शकते की नाही? तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारून अशा जमिनीत काय सुधारणा करता येतील ते पाहा. जमीन सुधारून तिच्यातून जास्तीत जास्त पीक आपण घेतले पाहिजे. शेतीत आपल्याला जो फायदा होईल तोच साखर कारखान्याच्या दृष्टीने खरा फायदा असतो.' शेती व्यापारी पद्धतीने करायला पाहिजे असे त्यांचे मत होते. जे जे व्यवहारात वसेल त्याचा ते पाठपुरावा करीत असत. उत्पादन वाढीसाठी शेणखत वापरणे, ग्रेडेड फरो पद्धतीने पाणी देणे, यांत्रिक अवजारांचा वापर करणे, याबरोबरच ते कामगारांना प्रोत्साहित करण्यासाठी स्पर्धाही ठेवीत असत आणि उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा गौरव करून त्यांना बक्षीसेही देत असत.

"एखादा प्रयोग सुरू केल्यानंतर त्यात आपल्याला किती खर्च येईल याचा ते कधी विचार करत नसत. भविष्यकाळाकडे दृष्टी ठेवून ते निर्णय घेत असत. प्रयोग करताना, समजा, आपल्याला नुकसान आले तर आपण प्रयोग करून पाहिला असेच समजता येईल अशी त्यांची दृष्टी असे. 'प्रयोग करताना तो यशस्वी झाल्यानंतर त्याचे पुढील फायदे आपल्याला मिळतातच, पण त्याचबरोबर आपल्याला संशोधन केल्याचासुद्धा आनंद मिळतो,' असे ते म्हणत असत.

"रस्त्यात ऊस वगैरे पडलेला त्यांना आवडत नसे. त्याबद्दल ते सर्व अधिकाऱ्यांना जबाबदार धरत असत. १९६२-६३ साल हे आमच्या यशाचे फार मोठे गमक आहे. BSFA आणि STA वगैरेंमध्ये आम्ही शेतीविषयांवर पेपर लिहून ते वाचले, त्यांवर चर्चा पण केल्या.

"बऱ्याच वेळा शेठजी रेल्वेने प्रवास करीत असत. एकदा एका प्रवाशाजवळ असलेल्या मासिकात उसाबद्दल काही माहिती होती. तो मजकूर त्यांनी खुणा करून कारखान्यात आल्यावर दिला व गोवर्धनभाईंना त्याचा अभ्यास करायला सांगून आपल्याकडे याबद्दल काही करता येईल का ते पाहा, असे सांगितले. त्यानंतर गोवर्धनभाईंची पुन्हा भेट झाली तेव्हा त्यांनी त्या प्रयोगाबद्दल परत आठवण केली.

एकरी जादा बियाणे वापरून त्याचा उसाच्या उत्पादनावर काय परिणाम होतो याचापण आम्ही प्रयोग केला. नंतर हा प्रयोग आर्थिकदृष्ट्या उपयुक्त नाही हे दिसून आल्यानंतर आम्ही तो प्रयोग थांबविला, पण त्याचा अहवाल मात्र आम्हांला सातत्याने पाठवावा लागत असे.

"एकदा बहि:शाल शिक्षण मंडळाचे सचिव शेठजींना भेटले. त्यांचे केंद्र साकरवाडीला सुरू करावे असे ते म्हणाले. शेठजींनी मंडळावरील व्याख्यानांचे विषय पाहिले, तेव्हा

त्यांना त्यांत शेती हा विषय नाही असे आढळले. शेठजींनी या विषयावर व्याख्याने झाली पाहिजेत असे सचिवांना सांगितले. सचिव म्हणाले, 'आम्हांला या विषयासाठी व्याख्याते मिळत नाहीत.' शेठजींनी मला विचारले, 'तुम्ही व्याख्यानाला जाल का?'... मी होकार दिला. त्यानंतर हेड ऑफिसकडून मला ताबडतोब यासाठी मंजुरी मिळाली. मी महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी शेती विषयावर व्याख्यान देण्यासाठी गेलो. माझे व्याख्यान जरी पुणे विद्यापीठातर्फे होत असे, तरी मला असा आदेश होता, की मी प्रवासादी खर्चाची बिले पुणे विद्यापीठाकडे न पाठवता ती गोदावरी कंपनीकडेच पाठवावीत. अशा प्रकारे बहि:शाल शिक्षण मंडळाला आपल्याकडून अप्रत्यक्षपणे ही मदतच आहे, असे ते मानत असत.

"१९६८ साली कंपनीची शेती राज्य शेती मंडळाकडे गेल्यावर त्यांचे जनरल मॅनेजर एकदा कंपनीच्या गेस्ट हाऊसमध्ये आले होते. तेव्हा त्यांनी मला विचारले, 'तुम्ही आमच्याकडे का येत नाही. कंपनीने जरी तुम्हांला ठेवावयाचे ठरविले असले तरी...' १९६८ ऑगस्टमध्ये मी शेतीमहामंडळाकडे गेलो. तिथे मी सिनिअर इस्टेट मॅनेजर होतो. पण पुढे त्यांचे व माझे काही गोष्टींवरून पटले नाही. मी शेठजींना भेटलो. त्यांना सर्व काही सांगितले. मला म्हणाले, 'ठीक आहे. आमची दारं तुम्हांला केव्हाही खुली आहेत. तुम्ही साकरवाडीला कामावर जा!...' मी परत गोदावरीत आलो.

करमसीभाईंचे शेतीवर जसे प्रेम होते, तसेच शेतीची देखभाल करणाऱ्या आपल्या अधिकाऱ्यांवरही होते.

❖

शेतकऱ्यांचे अनुभव कथन

प्रजानां विनयाधानाद्रक्षणादभरणादपि।
स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतव :।।

उदारवृत्ती असलेल्या माणसांच्या दृष्टीने जग हे एक कुटुंब असते.

शेतकऱ्यांचे अनुभव कथन

कारखान्यातील शेतकी अधिकाऱ्यांचे अनुभव कथन जसे उद्‌बोधक आहे तसेच काही शेतकऱ्यांचेही आहे. श्री. बन्सीलाल रूपचंद संचेती हे या भागातील असेच एक शेत-करी. आपले अनुभवकथन करताना ते म्हणाले, "करमसीभाई शेठजींची व माझी ओळख १९६०-६५ सालच्या दरम्यान झाली. त्यावेळी आमच्या वैजापूर भागात साखर कारखाना नव्हता. म्हणून ऊस देण्यासाठी मी साकरवाडीला कारखान्यावर आलो होतो. त्यावेळी जनरल मॅनेजर श्री. हुजा व मॅनेजर श्री. खुर्जेकर म्हणून होते. त्यांना मी भेटलो. कारखान्याला मला ऊस द्यावयाचा आहे असे सांगितले. त्यावेळी वास्तविक त्यांना उसाची गरज नव्हती. त्यांनी मला तसे सांगितले. मी त्यांना म्हणालो, 'मला जवळजवळ दहा ते बारा हजार टन ऊस आमच्या भागातील द्यावयाचा आहे' त्यांनी मुंबई ऑफिसला फोन केला व त्यांच्या परवानगीने त्यांनी आमच्या ऊस घ्यायला सुरूवात केली. त्याबाबत आमचा लेखी करारही झाला. पाच-सहा दिवसांत दोन हजार टन ऊस कारखान्यावर आला. तो वैजापूरच्या जवळच्या मार्गाने आला. जनरल मॅनेजर हुजासाहेब यांनी मला कारखान्यावर बोलावून घेतले आणि म्हणाले, 'तुम्ही आमच्याबरोबर ऊस पुरवठ्याचा करार केला, पण तुमचा ऊस व्हाया कोपरगाव न येता तो जवळच्या मार्गाने येतोय, त्यामुळे तुम्ही आमची ऊस वाहतुकीच्याबाबत फसवणूक केली आहे. कारण तुम्हांला ऊस वाहतूक जवळ पडते. आम्हांला सात ते आठ रुपये जास्त द्यावे लागतात...' मग हे प्रकरण जी.डी. पटेल यांच्यामार्फत मोठ्या शेठजींपर्यंत गेले.

"आमच्याकडील सर्व ऊस आल्यानंतर शेठजींनी मला बोलावून घेतले. हुजासाहेबही त्यावेळेस हजर होते. शेठजी म्हणाले, 'यांनी आपल्याला दहा ते बारा हजार टन ऊस जवळच्या मार्गाने आणून दिला म्हणून त्यांना त्यांची बिले द्याच, पण त्याचबरोबर त्यांच्या नावे दहा हजार रुपये कमिशन म्हणून जमा करा!'

"यानंतर आमचे व शेठजींचे संबंध वाढतच राहिले. शेती-व्यवसायात त्या वेळी मी एवढा निष्णात नव्हतो. माझे वडील वारलेले, पण मला शेठजींचे मार्गदर्शन पितृवत मिळाले.

ऊस लागणीसाठी पैशांचा पुरवठा, पीक उत्पादनासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन त्यांच्याकडून मला सतत मिळाले. त्यावेळी वैजापूरहून दहा ते पंधरा हजार टनच ऊस जात होता. शेठजींनी शेती सुधारण्यासाठी एकरी हजार ते पंधराशे रुपये शेतकऱ्यांना पीक-कर्ज दिले. त्यामुळे या भागातील उसाची शेती सुधारली. जवळजवळ पंधरा ते वीस लाख रुपये त्यांनी कर्जरूपाने वाटले. विहिरी खोदण्यासाठी व इंजिन बसवण्यासाठीही आर्थिक मदत दिली. त्यामुळे या भागातून साठ ते सत्तर हजार टन ऊस कारखान्यावर येऊ लागला. कोपरगाव तालुक्यात सहकारी साखर कारखाने निघाल्याने उसासाठी आता वैजापूरशिवाय पर्याय नाही, असे त्यांच्या लक्षात आले असावे असे मला वाटते.

"मी दत्तक आहे. दत्तक गेल्यानंतर माझ्याकडे दहा ते बारा हजार एकर जमीन होती. लँड सिलींगचा कायदा लागू होणार होता. मी या जमिनीचे काय करावे याबाबत शेठजींचा सल्ला घेतला आणि त्याप्रमाणे केले. त्यात माझा फायदाच झाला. गोदावरीच्या मार्गदर्शनाने माझ्या शेतीतील उसाचे उत्पादन एकशेचार टनांपर्यंत पोचले होते. त्यावेळी सर्वत्र सरासरी पासष्ट टन इतके उत्पादन होत असे.

"उसाचे भाव ठरविताना ते आम्हांला बोलावत असत. शेतकऱ्यांचा दृष्टीकोन जाणून घेत असत. शेतकरी सांगत असत, 'सहकारी साखर कारखाने उसाला जो भाव देतात त्यापेक्षा थोडा जास्त किंवा निदान त्यांच्या बरोबरीने आपण भाव दिल्याशिवाय हा ऊस आपल्याला मिळणार नाही...' यावर मग चर्चा करून उसाचा भाव ठरविला जाई. त्यांचापण अंदाज आमच्यासारखाच असे. परंतु ते आमचाही अंदाजे घेत असत.

"कारखान्याच्या प्रगतीवर शेतकऱ्यांची प्रगती अवलंबून आहे व शेतीतील उत्पादनावर कारखान्याची प्रगती अवलंबून आहे, असे ते सांगत असत. ऊस ताजा आला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे. ऊस शिळा झाला तर ते अधिकाऱ्यांना जाब विचारीत असत. ऊस किती टन क्रश केला यापेक्षा तो किती ताजा होता याला ते महत्त्व देत असत.

"शेतीवर शेठजींचे फार प्रेम होते. झाडाला कुरवाळताना त्यांना मी पाहिले आहे. ते म्हणत, 'झाडांच्या काय अडचणी आहेत त्या मी पाहतो व समजावून घेतो. झाडे आपल्याशी बोलतात. त्यांना अन्नपाणी कमी पडते की काय हे ते सांगतात. यासाठी सतत शेतावर गेले पाहिजे. तुम्ही शेतावर गेलाच नाहीत तर तुम्हांला हे कसे कळणार?' शेतीबरोबरच शेतकऱ्यांचा उत्कर्ष व्हावा अशीच त्यांची दृष्टी असे. उसाच्या नवीन नवीन जाती ते लावीत असत. ७४० जातीचे बेणे त्यांनी आम्हांला पुरविले होते.

"चार वर्षांपूर्वी मी द्राक्षे लावली. १९८१ साली. त्या वेळी शेठजी वैजापूरला आले. माझी द्राक्षबाग बघण्यासाठी त्यांनी दोन-अडीच तास घालविले. झाडांचे निरीक्षण केले. कामगारांशी बोलले. 'किती वर्षे नोकरी करता, काय काय सवलती मिळतात', हे त्यांच्याकडून जाणून घेतले.

“गोदावरीतर्फे शेतकऱ्याच्या उसाला आर्थिक मदत दिली जाई. पण जर अशा एखाद्या शेतकऱ्याचा ऊस आला नाही तर त्याच्यावर दावा लावण्याचा प्रसंग यायचा. पण शेठजींचा विचार वेगळा असायचा. शक्यतोवर शेतकऱ्यांवर दावा लावला जाऊ नये असे त्यांना वाटे. ते म्हणायचे, ‘त्या शेतकऱ्याचा ऊस का आला नाही याची चौकशी करा व त्याचा ऊस परत आपल्याकडे येईल अशा तऱ्हेने त्याला परत उभे करा, मदत करा.’

“शेठजी मला म्हणत, ‘माझ्याशी बोलताना तुम्ही मारवाडीत बोलावे’... शेठजींना मारवाडीपण फार चांगले बोलता येते. पण सवयींमुळे मी बऱ्याच वेळा मराठीतच बोलत असे.

“मी श्वेतांबर जैन आहे. श्रीरामपूरला आमचे गुरुजी आल्यानंतर शेठजी त्यांना जाऊन भेटत असत. एकदा मी त्यांना म्हणालो, ‘आमच्या जैन स्वामींना कसे भेटता?’ शेठजी म्हणाले, ‘ते गुरू आहेत ना! मोठ्या माणसांकडून आपण आशीर्वाद घेतो. तीच आपली कमाई. यात नुकसान तर काही नाही ना?’ अशा त्यांच्या मोठेपणाच्या आठवणी आहेत.”

श्री. बचूभाई दोशी हे असेच एक कॉन्ट्रॅक्टर व शेतकरी. बचूभाई गुजरातमधील काठेवाडचे आणि करमसीभार्ठ कच्छचे. बचूभाईंच्या वडिलांची आणि करमसीभाईंची चांगली ओळख होती. बचूभाई हे सुरूवातीला इरिगेशनच्या कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय करीत असत. कोपरगाव ते नाशिक जिल्ह्यांत त्यांची कामे होती. त्याच दरम्यान साकरवाडीच्या कारखान्याचेही काम चालू होते. बचूभाईंच्या वडिलांनी त्यांची व करमसीभाईंची ओळख करून दिली. त्यातून अकरा चारीचे काम बचूभाईंनी घेतले. पुढे १९५२ साली बचूभाईंनी त्या भागात वेळापूरला एक जमीन खंडाने घेतली. करमसीभाईंना विचारले, ‘या शेतीत काय करू?’ करमसीभाईंनी सांगितले, ‘ऊस लावा आणि कारखान्याला द्या.’ बचूभाई म्हणाले, ‘एवढे पैसे माझ्याकडे नाहीत.’ करमसी म्हणाले, ‘आम्ही पैशाची व्यवस्था करू.’ आणि १९५२ पासून ते अखेरपर्यंत बचूभाईंच्या शेतीला ऊस कारखान्याकडे येत होता.

१९६० साली करमसीभाईंनी बचूभाईंना सांगितले की, ‘आपण आपला ऊस तर कारखान्याला देतच आहात, पण त्याशिवाय इतर शेतकऱ्यांचा ऊसही आपल्या कारखान्याला मिळेल असे काहीतरी करा.’ बचूभाईंनी त्यांना कारखान्याला ऊस मिळविण्यासाठी कमिशन देऊन एजंट नेमावेत अशी सूचना केली. करमसीभाईंना ही सूचना पसंत पडली. त्यांनी नेमलेल्या एजंटापैकी बचूभाई हेही एक एजंट बनले. १९६० ते ६९ पर्यंत त्यांनी गोदावरी कारखान्याला ऊस मिळवून देण्याचे काम केले.

बचूभाईंना एकदा अपघात झाला होता. तेव्हा करमसीभाईंनी त्यांचया उपचाराची व औषधपाण्याची सर्व व्यवस्था त्यांना श्रीरामपूर येथे सात महिने व पुणे येथे चार महिने

हॉस्पिटलमध्ये ठेवून आपल्या कंपनीमार्फत केली होती.

एक बागायतदार प्रभाकर गुजराथी यांनी चार एकर ऊस लावलेला होता. त्यांना जमीन घ्यायला व ऊस लावायला कंपनीनेच मदत केली होती. चार वर्षांचा करार होता. तो संपल्यावर त्या वेळचे मॅनेजर अंजारीया हे नवीन करार करायला नकार देऊ लागले. तेव्हा बचूभाईंनी हे प्रकरण करमसीभाईंकडे नेले. त्यांनी त्यांची शांतीलालजींशी ओळख करून दिली.

कारखान्याच्या व्यवस्थापनात शांतीलालजी लक्ष घालू लागले होते. त्यांनी प्रभाकर गुजराथी यांची अडचण अंजारीया यांना सांगून दूर केली.

करमसीभाईंच्या शेतीवरील प्रेमाच्या व ती कसण्यातील कौशल्याच्या कितीतरी गोष्टी, आठवणी, त्यांच्या संपर्कात त्या वेळी आलेली शेतकरी मंडळी व इतर लोकही सांगतात. तसे पाहिले तर करमसीभाई हे काही शेतकी महाविद्यालयात शिकून शेतकीचे पदवीधर झालेले नव्हते, पण अंतरीच्या उर्मींनी ते शेतीकडे वळले. वृत्तीने व व्यवसायाने व्यापारीच असल्यामुळे त्यांनी शेतीतही आपले वाणिज्यकौशल्य पुरेपूर ओतले. नवनवीन संशोधनांची चाहूल घेऊन साहसीपणाने प्रयोग केले. अनुभवातून ते पुष्कळच शिकले आणि एके काळच्या रुक्ष, ओसाड, दुष्काळी भागात हजारो एकरांमध्ये हिरवीगार उसाची शेती फुलवून समृद्धीचे नंदनवन निर्माण केले. उसाच्या संदर्भातील जागतिक विक्रम मोडले आणि हाताशी आलेल्या अनुभवाचे सोने आसपासच्या बागायतदार शेतकऱ्यांनीही मुक्त-मोकळेपणाने वाटून दिले! त्यांचेही शेतमळे फुलवून टाकले!

१९५० सालच्या सुमारास सहकारी साखर कारखानदारीचा पाळणा, त्यांच्यापासून जवळच्याच भूमीत हलू लागला. उसाची शेती त्यांनीही करमसीभाईंच्यापासून प्रेरणा घेऊनच फुलवली, वाढवली. आजही काही मातब्बर समजली जाणारी सहकारी क्षेत्रातील नेतेमंडळी मोठ्या अभिमानाने सांगत असतात की, 'उसाची शेती आम्हांलाच नव्हे तर आमच्या नगर जिल्ह्यालाही करमसीभाईंनीच शिकवली. उसाच्या शेतीतले करमसीभाईच आमचे गुरू आहेत!'

शेती आणि शेतकरी यांबद्दल करमसीभाईंच्या मनीमानसी फार फार जिव्हाळा आहे. ते स्वत:लाही एक शेतकरीच म्हणवून घेतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंमध्ये 'शेतकरी' हा एक प्रमुख पैलू आहे.

❖

कारखान्यांतील अधिकाऱ्यांचे अनुभव कथन

व्यतिषजति पदार्थानान्तर : कोऽपि हेतुर्न
खलु बहिरुपाधीन्प्रीतय : संश्रयन्ते।
विकसति हि पतङ्.गस्योदये पुण्डरीकं
द्रवति च हिमरश्मावुदग्ते चन्द्रकान्त : ।।

कोणत्या तरी अदृश्य आन्तरिक कारणाने दोन पदार्थ जोडले जातात. प्रेम खरोखर बाह्य उपाधींवर अवलंबून नसते. सूर्योदय झाल्यावर कमळ उमलते, तर चंद्रोदय झाल्यावर चन्द्रकान्त मणी पाझरू लागतो.

कारखान्यांतील अधिकाऱ्यांचे अनुभव कथन

गोदावरी साखर कारखान्यांना करमसीभाईंच्या शिस्तशीर दृष्टीकोनामुळे एक प्रकारची उत्तम परंपरा लाभली होती. या त्यांच्या परंपरेतून काही जणांची व्यक्तिगत जडणघडण झाली. त्यांना शिकायलाही खूप मिळाले. त्यापैकी काही जणांचे अनुभव-निवेदन लक्षणीय आहे :

श्री. कपिलराय हरिवल्लभ पारेख हे साकरवाडीला चीफ केमिस्ट होते. ते म्हणाले, "मी अमेरिकेहून आलो. शोभाकाकांमुळे साकरवाडीला गेलो. आर.एस.कोटक व जी. डी. पटेल यांनी माझी साखर कारखान्यात चीफ केमिस्ट म्हणून नेमणूक केली. १९३९ साली कारखान्याची सुरूवात झाली होती. तेव्हापासून ते १९४४ पर्यंत मी गोदावरीच्या नोकरीत होतो. नंतर हारेगावला गेलो.

करमसीभाई मुंबईतील गोदावरीच्या ऑफिसमधून साखर कारखान्यांचा कारभार चालवित असत. परंतु महिन्यातून दोन-तीन वेळा तरी कारखान्यांवर येत असत. आल्यावर बारीक सारीक गोष्टीत लक्ष पुरवीत असत. कारखान्यात किती माणसे कामाला घेतली व त्यांची आवश्यकता किती, याकडे ते जातीने लक्ष देत असत. उसाच्या व साखरेच्या उत्पादनवाढीसाठी त्यांनी वेगवेगळ्या कारखान्यांची पाहणी केली होती. एखाद्या प्रयोगाबद्दल त्यांना खात्री पटली तर तसा प्रयोग करण्यासाठी ते वाटेल तेवढी मदत देऊ करीत असत. व्यापारी व वैज्ञानिक दृष्टीने काम करून कारखान्यातील नफा कसा वाढविता येईल इकडे त्यांचे लक्ष असे. केवळ कारखाना आणि शेतीच नव्हे तर आपल्याकडे कामासाठी असणाऱ्या माणसांकडेही करमसीभाईंचे लक्ष असे. गोवर्धनभाई पटेल हे त्यांचे निकटचे स्नेही व सल्लागार होते. सख्ख्या भावाप्रमाणे त्यांचे संबंध होते. गोवर्धनभाईंच्या मृत्यूनंतरसुद्धा करमसीभाईंनी त्यांच्या घरातील व्यक्तींना आस्थेने जवळ केले. अतिशय चांगली वागणूक दिली. एम.सी. जोशी हे कारखान्यात चीफ इंजिनिअर होते. ते वयोमानाप्रमाणे रिटायर झाले. पण त्यांची मुले लहान होती. मुलांचे शिक्षण व लग्ने व्हावयाची होती. म्हणून एम.सी. जोशी परत नोकरी शोधण्याच्या प्रयत्नात होते. शेठजींना हे कळल्यानंतर त्यांनी जोशींना आपल्याकडील

चीफ इंजिनिअरला सल्ला देण्याकरीता म्हणून पगार देऊन ठेवून घेतले. जोशींच्या मृत्यूनंतरसुद्धा त्यांच्या मुलांच्या लग्नकार्यासाठी त्यांनी आर्थिक मदत केली होती. मी हारेगावला नोकरीसाठी गेलो होतो तरी भेटल्यावर ते माझी व माझ्या कुटुंबियांची मोठ्या आस्थेने चौकशी करीत."

अविनाश अनंत झेंडे हे १९६७ साली गोदावरी कारखान्याकडे मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट म्हणून नोकरीला आहे. आपले अनुभव-कथन करताना ते म्हणाले, "शेठजी साखरेच्या प्रतीबद्दल, दर्जाबद्दल फार दक्ष असत. त्यांची दृष्टी व ज्ञान अतिशय शास्त्रशुद्ध आहे. कारखान्यात तयार झालेला साखरेचा रंग कसा आहे, दाणा कसा आहे, बारीक आहे का, खराब आहे का, हे बारकाईने पाहत असत. इतकेच नव्हे तर साखरेची पोती शिवताना त्याला किती टाके असावेत हेही पाहत असत. चौदा टाके प्रत्यक्षात आहेत का नाहीत हे मोजून पाहत असत.

"मी अठराव्या आंतरराष्ट्रीय साखर परिषदेसाठी क्यूबा येथे गेलो होतो. दर तीन वर्षांनी अशी परिषद वेगवेगळ्या राष्ट्रांत भरते. भारतातर्फे आम्ही वीस प्रतिनिधी होतो. त्यात समीरवाडीचे डॉ. नरसिंह, श्री. भाटीया व मी असे आम्ही गोदावरीचे तीन प्रतिनिधी होतो. साखरेचे आधुनिक तंत्रज्ञान व शेतीमधील प्रगती यांबद्दल पाहणी व चर्चा असा कार्यक्रम असे. करमसीभाई मला विनोदाने म्हणत असत, 'तुम्ही झेंडे-साखरेचा झेंडा लावा!' आपल्याकडे उत्कृष्ट तंत्रज्ञ असावेत असा त्यांचा सतत प्रयत्न असे. 'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन' बनविण्यात शेठजींचा फार मोठा हात होता. त्यांना काय आणि कसली माहिती लागेल ते सांगता येत नसे. एखादे वेळेस विचारतील, 'आजचे तपमान किती आहे?...' त्यामुळे आम्हाला अद्यावत माहिती ठेवावी लागत असे. एखाद्या कुटुंबातील कर्ता पुरुष असावा असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. आमची मशिनरी जुनी असली तरी कारखाना चांगला चालतो. १०५० इतकी क्रशिंग कपॅसिटी असताना १३०० पर्यंत आम्ही क्रशिंग करीत असू. उसाचा अपुरा पुरवठा मात्र जाणवत असे.

"शांतिलालशेठजींच्या सांगण्याप्रमाणे मी एकदा त्यांचे रेल्वेचे फर्स्ट क्लासचे तिकीट काढले. तेव्हा ते म्हणाले, 'गाडीत झोपल्यानंतर फर्स्ट क्लास काय किंवा सेकंड क्लास काय, सर्व सारखेच!...' असा साधेपणा त्यांच्या ठिकाणी आहे.

कारखान्यावर स्टोअरकीपर म्हणून काम करणारे कांतीलाल चुनिलाल शहा म्हणाले, "मी मूळचा राहणारा मेहसाणा जिल्ह्यातला. मी साकरवाडीला आलो तेव्हा अे.टी.शहा व जी.डी.पटेल हे दोघे करमसीभाईंचे विश्वासू अधिकारी होते. अे.टी.शहा हे माझे मेव्हणे. त्यांनी जी.डी.पटेल व करमसीभाई यांना विचारून मला बोलावून घेतले. मी

भावनगरला होतो. मॅट्रिक झालो होतो व 'खेतआबादी' या सरकारी खात्यात नोकरी करीत होतो. या खात्यामार्फत शेतकऱ्यांसाठी विहिरी खणून देण्याचे काम केले जात असे. हे काम आठ महिने चालत असे.

"मी येथे आल्यानंतर शेठजींनी मला संवत्सर येथे ठेवले. नंतर ओव्हरसियर, त्यानंतर कारकून बनवले. त्यानंतर मला साकरवाडीला स्टोअर कीपर म्हणून नियुक्त केले. १९५० पर्यंत मी गोदावरीकडे, नंतर अन्य काही ठिकाणी नोकऱ्या करून १९७१ ला परत या संस्थेत आलो.

"शेठजी कारखान्यात आले की माझ्याकडून स्टोअरच्या संदर्भात सर्व बारीकसारीक माहिती विचारून घेत असत. त्यांच्या हाताखाली काम केल्यामुळे मला एवढे शिक्षण मिळाले की बाहेरच्या कारखान्यात नोकरीस गेलो असताना मला कसलीच अडचण भासली नाही.

"एकदा मी खूप आजारी होतो व त्याच वेळी लक्ष्मीवाडीला स्टोअरमध्ये काही कामाची गडबड झाली होती. तेथे दोन क्लार्क होते. त्यांच्याकडून काही चुका झाल्या होत्या. शेठजींच्या कानांवर ही गोष्ट गेली. त्यांना हे आवडले नाही. त्यांनी मला बोलावून घेतले व आजारी असतानाही मला आपल्याबरोबर लक्ष्मीवाडीला नेले. माझी तिथे सर्व प्रकारची व औषधपाण्याची व्यवस्था केली. तेथील मॅनेजरना माझ्यावर खास लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. ज्या दोन कारकुनांच्याकडून चुका झालेल्या होत्या त्यांना लगेच कामावरून काढण्याचा हुकूम मॅनेजरना दिला. शेठजींना शिस्त आवडत असे. चांगले काम करणाऱ्यांना ते अतिशय प्रेमळपणाने वागवीत असत.

"एकदा त्यांनी साकरवाडी येथील एका क्लार्कला तो लक्ष्मीवाडीस असताना 'काम संपल्याशिवाय व माझ्या परवानगीशिवाय साकरवाडीला परत यावयाचे नाही' अशी सूचना दिली होती. परंतु त्याने त्यांच्या आज्ञेचा भंग केला. हे जेव्हा त्यांना कळले तेव्हा त्यांनी त्या काळे नावाच्या क्लार्कला नोकरीतून काढून टाकण्याचा हुकूम मॅनेजरना दिला. या काळे नावाच्या तरुणाचे नुकतेच लग्न झाले होते. नोकरी गेल्याने त्याची पंचाईत होणार होती. मी शेठजींकडे जाऊन त्याच्याबद्दल रदबदली केली. शेठजी म्हणाले, 'चूक केल्यावर शिक्षा झालीच पाहिजे.' मी म्हणालो, 'शेठजी, ही शिक्षा फारच मोठी आहे.' मी त्यांना त्याची सगळी परिस्थिती सांगितली. ती त्यांनी शांतपणे ऐकून घेतली आणि काळे यांना क्षमा करून त्यांना परत कामावर घेतले. अशी त्यांची शिस्त व प्रेमळपणा होता. सत्य हकीकत सांगितली तर ते मानत असत, पण असत्य सांगितली तर त्यांना ते खपत नसे.

"शेठजी येणार आहेत असे कळले की कारखान्यात सगळीकडे व्यवस्थितपणा दिसून येत असे. त्यांचा दराराच तसा होता. इकडेतिकडे उसाचे एखादे टिपरू किंवा पाचट पडलेले

दिसले तर तेही त्यांना खपत नसे.

कारखान्यातील एक चीफ केमिस्ट म्हणून चौदा वर्षे नोकरी केलेले पी.पी. शहा म्हणाले, "मी ईस्ट आफ्रिकेत युगांडामध्ये नानजी कालिदास मेहता यांच्या कंपनीमध्ये चीफ केमिस्ट म्हणून नोकरीस होतो. १९३९ मध्ये मी हिंदुस्थानात आलो. स्टीमरमधून उतरलो तेव्हा मला धुळ्याचे त्रिवेदी नावाचे एक गृहस्थ भेटले. त्यांचा ऑईल केकचा धंदा होता. मी नंदुरबारला राहात होतो. त्यांनी माझी माहिती विचारली. मी रजेवर आल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'अशा युद्धपरिस्थितीत तुम्ही परत जाऊ नका.' मी सांगितले, 'माझी येथे फारशी ओळख नाही.' त्रिवेदींनी माहिती दिली की नगर जिल्ह्यात एक नवीन साखर कारखाना निघत आहे. तुम्ही तिथल्या मालकांना जाऊन भेटा. मी करमसीभाईंनी भेटलो. त्यांनी मला बसायला खुर्ची दिली व माझी विचारपूस केली. मग म्हणाले, 'तुम्ही बाहेर देशात जाऊ नका. आम्ही तुमची नेमणूक केली आहे असेच समजा.' त्यानंतर मी साकरवाडी येथे डेप्युटी चीफ केमिस्ट म्हणून कामास लागलो. मला अपॉइंटमेंट लेटर दिलेले नव्हते, तसेच पगारपण ठरलेला नव्हता. त्या वेळी स्वस्ताईपण खूप होती. श्री. आठल्ये हे जनरल मॅनेजर होते.

"आमचा पहिला सीझन फारच यशस्वीरित्या पार पडला. आमच्याकडे असलेला सर्व ऊस आम्ही गाळला. नंतर दोन वर्षांनी बेलापूर कंपनीची मशिनरी घेऊन लक्ष्मीवाडी येथे शेठजींनी दुसरा साखर कारखाना काढला. साकरवाडीला असलेले चीफ केमिस्ट श्री. पारेख यांना लक्ष्मीवाडीला बदलण्यात आले व मला साकरवाडीला चीफ केमिस्टची जागा देण्यात आली. करमसीभाईंच्याकडे नोकरी करीत असताना मला खूपच गोष्टी शिकायला मिळाल्या. मी आजपर्यंत जेवढे मालक पाहिले, त्यांत असा मालक मला पाहायला मिळाला नाही. आम्ही या मालकाशी कारखान्याच्या कामांबाबत अगदी मोकळेपणाने चर्चा करीत असू. एखाद्या व्यक्तीला जर कसली अडचण आली व ती त्यांना सांगितली तर ते योग्य ती मदत करीत असत. रिक्तहस्ताने परत पाठवीत नसत. नोकरीच्या काळात, तसेच नोकरीनंतरसुद्धा आमचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे राहिलेले आहेत."

कारखान्यातील अधिकाऱ्यांनी व शेतकऱ्यांनी जसे आपले मनोगत व्यक्त केले, तसेच रामसिंग रामेश्वर पवार नावाच्या एका कामगारानेही - यांना सर्वजण दादा म्हणत असत - सांगितले की, "मी पंधरा वर्षांचा होतो. तेव्हा असिस्टंट फिटर म्हणून साकरवाडीला कामाला लागलो. कारखान्याच्या उभारणीच्या वेळी मी कामावर होतो. नंतर लक्ष्मीवाडीला आलो. सुरूवातीस येथे ढोले व हुमणे यांची युनियन होती. नंतर पुढे रावसाहेब पटवर्धन यांनी नवीन कामगार युनियन काढली. कामगार नेते किशोर पवार हे माझे धाकटे भाऊ. ते

सुरूवातीला साकरवाडीला कारखान्यात नोकरीला होते. रावसाहेब पटवर्धन यांनी त्यांना ती नोकरी सोडून देण्यास सांगितले व युनियनची जबाबदारी त्यांनी त्यांच्यावर टाकली. तेव्हापासून किशोर पवार युनियनचे पूर्ण वेळ काम करू लागले. पुढे आम्ही वारी गावात साखर कामगारांची परिषद घेतली होती. नंतर गोदावरी कारखान्याच्या हद्दीतील गांधी मैदानावर कामगारांची सभा घ्यावयाचे ठरविले. त्या वेळी गांधी मैदानात सभा घ्यायला मॅनेजरची म्हणजेच करमसीभाईंची परवानगी नव्हती. त्या वेळी युनियन व मॅनेजमेंट यांच्यातील संबंध तणावाचे होते. पोलिसांचा सर्वत्र बंदोबस्त होता. पोलिसांनी आम्हाला मैदानावर जाण्यास प्रतिबंध केला. किशोर पवारांनी सांगितले, 'आम्ही शांततेने सभा पार पाडू व काही नुकसाान झाल्यास आम्ही जबाबदार आहोत.' मग शेठजींनी आम्हांला सभा घ्यायला परवानगी दिली. नानासाहेब गोरे यांचे भाषण झाले. तेव्हा शेठजींना कळले की हे विधायक दृष्टीकोन ठेवणारे लोक आहेत.

"सुरूवातीला लक्ष्मीवाडीचा कारखाना ५०० टनांचा होता. आता आम्ही १३०० टन ऊस गाळतो. मशिनरीमध्ये झालेल्या वाढीमुळे व सुधारणांमुळे कारखाना चांगला चालतो. पुढे पुढे शेठजी व कामगार युनियन यांचे संबंधही सुधारले होते. कष्ट करणारा कामगार असला तर त्याला त्याचे हक्क मिळालेच पाहिजेत, अशी त्यांची धारणा होती. आमची युनियनसुद्धा कामगारांच्या हक्कांच्या मागण्यांबरोबरच त्यांना त्यांच्या कर्तव्याचीही जाणीव करून देणारी असल्यामुळे युनियन व कंपनी यांच्यातील संबंध इतके चांगले झाले की पुढे प्रत्येक गोष्ट वाटाघाटीने व सामंजस्याने सोडविली जाऊ लागली.

"एकदा शेठजी अमेरिकेला जाणार होते. म्हणून आम्ही त्यांना भेटायला मुंबईला त्यांच्या घरी गेलो, तेव्हा ते विनोदाने म्हणाले, 'तुम्ही आम्हांला घालवायला आला आहात!' त्या वेळी ते आमच्याशी अगदी घरच्यासारखे बोलले, वागले. आम्हांला नाश्ता वगैरे दिला. सगळ्यांची चौकशी केली. सौ. साकरबाईंनीसुद्धा आमची सगळ्यांची प्रेमाने विचारपूस केली. सर्वांना आपल्याबरोबर जेवायला लावले. त्यांच्या मुलीच्या लग्नाला आम्ही गेलो होतो. शेठजी सर्वांची वडिलकीच्या नात्याने चौकशी करतात. आम्ही तर त्यांना वडिलांप्रमाणे मानतो."

अशा प्रकारे करमसीभाईंनी कृषि-औद्योगिक प्रकल्पांची उभारणी करून आणि कल्पक बुद्धिमत्तेने व कठोर परिश्रमाने शेती व कारखाना यांमधील उत्पादन विक्रमी करून देशाच्या समृद्धीत भरच घातली होती आणि त्याचबरोबर या क्षेत्रातील जाणकार, परिश्रमी तज्ज्ञ माणसे शोधून त्यांच्याकडून उद्योगांची भरभराट घडवून आणतानाच त्यांच्याशी जिव्हाळ्याचे

व सलोख्याचे संबंध आपल्या प्रेमळ वागणुकीने प्रस्थापित केले होते. करमसीभाईंच्या आस्थापूर्ण वागणुकीत अशी एक जादू आहे की तिच्यामुळे एकदा त्यांच्या संपर्कात आलेला माणूस, त्याचे काम, नोकरी-चाकरी, उद्योगधंदा संपला तरी तो त्यांच्याकडे येतच राहतो आणि करमसीभाईदेखील त्याचे आगतस्वागत मनापासून करीतच राहतात. मालक आणि नोकर यांच्यामधील असे सौहार्दपूर्ण संबंध क्वचितच कुठे आढळतात!

❖

दी गोदावरी शुगर मिल्स लि.

उद्यम : साहसं धैर्यं बुध्दि : शक्ति : पराक्रम : ।
षडेते यत्र वर्तन्ते तत्र देव : सहायकृत ।।

उद्योगीपणा, साहस, धैर्य, बुध्दी, शक्ती आणि पराक्रम
हे सहा गुण जेथे असतात तेथे देव सहाय्यकर्ता होतो.

दि गोदावरी शुगर मिल्स लि.

कान्हेगाव रेल्वे स्टेशनजवळ, वारी गावच्या भूमीवर आपला साखर कारखाना काढण्याचे निश्चित झाल्यावर करमसीभाई त्या दृष्टीने कार्यरत बनले.

खटोडांच्या भागीदारीतील माघारीमुळे ते आर्थिक अडचणीत आले होते, पण एक घटना अशी घडली की करमसीभाई त्या अडचणीतून सुखरूप सावरले. ते कसे सावरले याची हकीकत सांगताना ते म्हणाले, "त्या महायुद्धाच्या काळात देशाचीही आर्थिक घडी बिघडलेली होती. बिर्लांसारख्या मोठ्या उद्योगपतींनाही भांडवलाची चणचण जाणवत होती. अशा परिस्थितीतसुद्धा मी माझ्यावर आलेले आर्थिक दुरवस्थेचे आव्हान धैर्याने स्वीकारले.

"अहमदाबाद येथील अमृतलाल हरगोविंददास हे मोठे भांडवलदार होते. त्यांनी नगर जिल्ह्यातील डहाणूकरांच्या दोन्ही साखर कारखान्यांना भांडवल पुरविले होते. त्यांच्याकडे त्यांची कायमची साखर विक्रीची एजन्सीही होती. शिवाय त्यांच्याकडे कारखान्यांचे काही शेअर्सही होते. पुढे या सगळ्या व्यवहारातून मुक्त होण्याचा डहाणूकरांचा विचार होता. त्या वेळी त्यांनी अशी एक अफवा पसरवून दिली की, 'आपली प्रकृती ठीक नाही. आपण आजारी आहोत. भविष्यातील अनिश्चिततेमुळे आपल्याला असे वाटते की, ज्यांच्याकडे आमचे शेअर्स आहेत आणि ज्यांचे कर्जही आहे त्यांच्या ऋणातून मुक्त व्हावे.' ही वार्ता कानावर येताच अमृतलाल शेठजींनी डहाणूकरांच्याकडील आपली रक्कम परत घेतली. रक्कम फार मोठी होती आणि अमृतलाल शेठ हे स्वत:ही मोठे चाणाक्ष व्यापारी असल्यामुळे एवढ्या मोठ्या रकमेवरील व्याज बुडविण्यास ते तयार नव्हते. म्हणून ते सुद्धा एवढी मोठी रक्कम व्याजाने कर्जाऊ घेणाऱ्या व्यक्तीच्या शोधात होते. मी त्यांना या संदर्भात विचारले तेव्हा त्यांनी 'डिबेंचर्सच्या स्वरूपात आपण ही रक्कम देऊ' असे सांगितले. परंतु मला तसे नको होते, म्हणून मी नकार दिला. मी त्यांना असे सांगितले की, 'आपणास हवे असतील तर मी प्रेफरन्स शेअर्स देईन; इक्विटी शेअर्स देणार नाही.' यावर अमृतलाल शेठजींनी नकार दिला आणि ते प्रकरण तिथेच थांबले.

“मला आठवते आहे की, त्या वेळी आम्ही वाळकेश्र येथील बंगल्यात पहिल्या मजल्यावर रहात होतो. एकदा मी कामानिमित्ताने पुण्याला गेलो होतो. संध्याकाळी मी पुण्याहून परत आलो. गाडीतून उतरून वरच्या मजल्याकडे जाण्यासाठी जिन्याकडे वळलो. तेवढ्यात एक टेलीफोन आला आणि पोस्टमनने टाकलेले टपालही दिसले. मी ते घेतले आणि एकेक पत्र उघडून वाचू लागलो. त्या पत्रांत गोवर्धनभाई पटेल यांचे एक पत्र होते. आम्ही भांडवलासाठी श्री. हरिदासभाई नावाच्या मुंबईतील एका दुसऱ्याच पार्टीशी बोलणे केले होते. त्या कराराच्या संदर्भातील ते पत्र होते आणि त्यात त्यांनी आपण अहमदाबादला जात असून दादर स्टेशनवर भेटावे, असे कळविले होते. मी तसाच लगेच दादरला गेलो. ते दोघे स्टेशनवर अहमदाबादला जाणाऱ्या गाडीची वाट पाहत थांबले होते. आम्ही भेटलो, बोललो. पण मी भांडवलासंबंधी काहीच बोललो नाही. ते दोघेही चकीत होऊन एकमेकांकडे पाहू लागले. गाडी येण्याची वेळ जसजशी जवळ आली तसा मी गोवर्धनभाईंना म्हणालो, ‘अमृतलालशेठना डिबेंचर्स देण्यास मी तयार आहे असे कृपया सांगावे.’ तेवढ्या गाडी आली आणि ते अहमदाबादकडे रवाना झाले.

“दुसऱ्या दिवशी मला अहमदाबादहून तार आली. तारेत कळविले होते की, ‘अमृतलालशेठ मी सुचविल्याप्रमाणे रक्कम देण्यास तयार आहेत.’ वस्तुत: रकमेवरील व्याज बुडू नये या चिंतेत अमृतलालशेठ होते.

“त्याच दिवशी मी अहमदाबादला गेलो आणि कर्जाऊ रकमेच्या संदर्भात अमृतलालशेठशी बोलणी केली. करारातील सर्व मुद्दे एका कागदावर, स्टँपपेपरवर नव्हे, साध्या कागदावर लिहून काढले.

“त्याच दरम्यान साखरेचे भाव वाढले आहेत अशा बातम्यांनी बाजारपेठ गजबजून गेली होती. आमच्याकडे त्यावेळी साखरेची फार मोठी साठवण केलेली होती. माझी स्वत:ची आणि कमिशन बेसीसवर इतर कारखान्यातील साखर विक्रीसाठी माझ्याकडे होती. मी ताबडतोब मुंबईला परतलो. बाजारातील परिस्थितीचा अंदाज घेतला. नंतर मी पुन्हा अहमदाबादला गेलो. त्यावेळी काही थोड्याशा बदलाने तयार केलेल्या करारपत्रावर आम्ही सह्या केल्या. अमृतलालशेठकडून मला साडेसात लाख रुपये मिळाले. दीडएक वर्षांनी मी त्यांना डिबेंचर्स दिले. अमृतलालशेठचा माझ्यावर मोठा विश्वास होता आणि म्हणून त्यांनी एवढी मोठी रक्कम मला ॲडव्हान्समध्ये दिली होती.

“डहाणूकरांनी आपल्याकडील अमृतलालशेठजींची रक्कम परत केली आणि ती माझ्याकडे आली, ही मी देवाने माझ्यावर केलेली फारच मोठी कृपा समजतो!”

भांडवलाची व्यवस्था झाली. मशिनरी आलेलीच होती. मशिनरीचा फक्त एक पार्ट जहाजावर गहाळ झालेला होता. परंतु तो करमसीभाईंनी ‘रिचर्डसन अँड क्रुडास’ यांच्याकडून तयार करवून घेतला होता.

अशी बहुतेक सगळी जमवाजमव झाल्यावर १ जून १९३९ रोजी 'दि गोदावरी शुगर मिल्स लिमिटेड' या नावाने जॉईंट स्टॉक कंपनीची स्थापना झाली. या कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स होते मेसर्स के. जे. सोमैया अँड सन्स (प्रायव्हेट) लिमिटेड.

या कंपनीने आपला पहिला साखर कारखाना साकरवाडी, जिल्हा अहमदनगर येथे १९४० साली गोदावरी नदीच्या डाव्या किनाऱ्याला उभारला. गोदावरी नदीला भारतीय नद्यांमध्ये श्रेष्ठ असे स्थान आहे. प्राचीन काळी श्रीरामांच्या व सीतामाईंच्या वनवासकालातील बराचसा काळ गोदावरीच्या काठी नाशिकजवळील पंचवटी येथे व्यतीत झालेला होता. नाशिकला तीर्थस्थानाचा क्षेत्रमहिमा गोदावरीमुळेच लाभलेला आहे. भारतातील प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये नाशिकचीही गणना होते. इथेच गोदावरीकाठी कुंभमेळाही भरत असतो. गोदावरी नदीला इकडे 'गंगा' म्हणूनच संबोधले जाते. अशा पवित्रपावन गोदावरी नदीचे नावच करमसीभाईंनी आपल्या साखर कारखान्यासाठी निवडले, यावरून त्यांची धार्मिकताही व्यक्त होते.

कारखान्याचे नाव गोदावरी नदीचे ठेवले, तर कारखाना जिथे उभारला त्या स्थळाचे नाव 'साकरवाडी' असे ठेवले. करमसीभाईंच्या पत्नीचे नाव साकरबाई असे आहे. साकर हे नाव साखरेशी अगदी मिळतेजुळतेच आहे आणि आपली जीवनसाथी असलेली आपली अर्धांगी हिचेही आपल्या घडणीतील व उद्योगातील अप्रत्यक्ष हातभाराचे मूल्य करमसीभाई मनोमनी जाणून होते. त्याचाही प्रेमादर त्यांच्या मनी वसत होता. तोच त्यांनी 'साकरवाडी' हे नाव देऊन व्यक्त केला होता. साकरवाडीचा हा कारखाना प्रतिदिनी १००० मे. टन उसाची गाळप क्षमता असलेला होता.

साकरवाडीचा कारखाना सुरू झाल्यावर दोनच वर्षांनी कंपनीने आपला दुसरा साखर कारखाना गोदावरी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर साकरवाडीपासून सुमारे आठ मैल अंतरावर सावळीविहीर या गावाजवळ उभारला. हा प्रकल्प 'लक्ष्मीवाडी' येथील सोमैया शुगर फॅक्टरी म्हणून ओळखला जातो. कारखान्याच्या या स्थळाला आपल्या मातोश्री लक्ष्मीबाई यांचे नाव देऊन करमसीभाईंनी आपली मातृभक्तीच व्यक्त केली आहे!

लक्ष्मीवाडीचा हा दुसरा कारखाना दोनच वर्षांत उभारण्याला तसेच एक निमित्त झाले होते. ते असे की, त्या सुमाराला बेलापूर कंपनीने आपली जुनी मशिनरी विक्रीस काढली होती. कारण त्यांना नवीन मशिनरी बसवायची होती. साकरवाडी येथील दोन वर्षांच्या साखर-कारखान्याचा चांगला अनुभव करमसीभाईंच्या गाठी जमा झालेला होता. त्या यशाने त्यांचा आत्मविश्वासही द्विगुणित झालेला होता. म्हणून बेलापूर कंपनीची विक्रीस निघालेली मशिनरी आपण विकत घेऊन दुसरा कारखाना सुरू करावयाचा असा त्यांनी निर्णय केला. ती मशिनरी जुनी झाली होती, तरी चांगली होती.

या सर्वांहून आणखी एक भावनिक कारण निर्माण झाले होते; ते असे की, 'ज्या बेलापूर कंपनीच्या साखर व्यवसायाने आपली भरभराट झाली त्या बेलापूर कंपनीची मशिनरी आपणच घ्यावी व साखर कारखानदारी वर्धिष्णू करावी अशी इच्छा आणि म्हणून करमसीभाईंनी बेलापूर कंपनीची ती मशिनरी खरेदी केली.

मशिनरी जुनी असल्यामुळे सुरूवातीला कारखाना चालवताना काहीसा त्रास झाला. मशिनरीचे झिजलेले भाग बदलावे लागले. नवीन बसवावे लागले. पण असे करताकरता पुढील दोन-तीन वर्षांत मशिनरी तंदुरुस्त झाली आणि कारखाना व्यवस्थित चालू राहिला. हा प्लँट दर दिवशी सुमारे ७५० मेट्रीक टन उसाचे गाळप करणारा होता.

कारखान्याच्या उभारणीच्या वेळी इमारतींच्या बांधकामावर आणि मशिनरीच्या जुळणीवर करमसीभाई प्रत्येक अवस्थेत डोळ्यांत तेल घालून पहारा दिल्यासारखे लक्ष घालीत असत. प्रत्येक काम हे व्यवस्थित, नीटनेटके आणि काटकसरीने झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. अव्यवस्थित गहाळपणा किंवा उधळमाधळ त्यांना मुळीच खपत नसे. मुंबईहून बहुधा ते आठ-दहा दिवसांनी कारखान्यावर येत असत. मुंबईहून येणारी गाडी त्यावेळी पहाटे चार वाजता कान्हेगावला पोचत असे. गाडीतून उतरल्यावर ते चालत चालतच कारखान्यावर पोचत असत. आल्याबरोबर ते थोडीशीही विश्रांती न घेता कारखान्यातून पाहणी करीत हिंडत असत. हिंडताना जर कुठे एखादा नट, बोल्ट किंवा अशाच काही वस्तू एकडे तिकडे पडलेल्या दिसल्या की ते स्वत:च उचलून घेत असत. संबंधितांना त्या देऊन सांगत असत, 'ह्या वस्तू आपण पैसे देऊन विकत घेतलेल्या आहेत. त्या नीट ठेवल्या पाहिजेत, जपल्या पाहिजेत. इकडे लक्ष दिले पाहिजे.' हिंडताना कारखान्यातील प्रत्येक विभागाची बारीक सारीक पाहणी करीत ते माहिती घेत असत. अगदी लहान लहान वस्तूंचासुद्धा हिशेब बरोबर ठेवला गेला पाहिजे अशी त्यांची ताकीद असे. साखरेसाठी बारदाना किती आला, किती गेला व किती शिक्षक आहे याचा पूर्ण हिशेब ते विचारून घेत असत. कारखान्यातील चीफ इंजिनिअर, चीफ केमिस्ट, स्टोअरकिपर, मॅनेजर, शेतकी अधिकारी आदी सर्वांशीच ते बोलत असत. कामाची माहिती घेत असत. त्यांच्या तक्रारी, अडचणी ऐकून घेत असत व त्या कशा दूर करता येतील याचाही विचार करीत असत. त्यांना स्वत:ला शिस्त फार प्रिय आहे.

एकदा असेच सकाळी रेल्वेने मुंबईहून ते कान्हेगावला आले व कारखान्यात चालले. तेव्हा गेटवरच्या वॉचमनने त्यांना अडवले. करमसीभाईंनी त्याला विचारले, 'तू मला ओळखत नाहीस?'

वॉचमन म्हणाला, 'मी तुम्हांला ओळखत नाही आणि आमच्या शिस्तीप्रमाणे तुम्हांला आत जाता येणार नाही.'

मग करमसीभाई कारखान्यात न जाता गेस्ट हाऊसमध्ये आले. तिथून त्यांनी, त्या

वेळी मॅनेजर असलेल्या खुर्जेकरांना फोन केला आणि सांगितले, 'कारखान्याच्या गेटवर जो वॉचमन आहे त्याला पंचवीस रुपये बक्षीस द्या! अशी शिस्त पाळणारी माणसे आपल्याला हवी आहेत!

साकरवाडी व लक्ष्मीवाडी या दोन्हीही कारखान्याच्या ठिकाणी त्यांच्या त्यांच्या प्रयोगशाळा - Laboratories होत्या. त्यांतून विविध प्रकारचे प्रयोग चालत असत. त्यांत प्रामुख्याने शेती, ऊस-उत्पादन, साखर-उतारा आदी कारखान्यांच्या हिताच्या दृष्टीनेच प्रयोगांवर भर असे. ऊस आणि साखर यांचा उत्कृष्ट दर्जा सांभाळणारी अशी ही जणू केंद्रेच होती!

कारखान्याला एकवीस मैल लांबीची स्वत:ची ट्रॉलीलाईन होती. शिवाय एकशेसाठ केन ट्रक्स, सहा डिझेल इंजिन आणि तीन स्टीम इंजिन्स यांचा एक ताफाच होता.

साकरवाडी व लक्ष्मीवाडी या दोन्ही कारखान्यांमधून A, B, C आणि D दर्जाची दाणेदार साखर तयार होत असे. साखरेचा रंगही 29 I.S.S. हून अधिक चांगला असे. 30 I.S.S. दर्जाच्या रंगाची साखरही पुढे पुढे तयार होत असे.

या दोन्हीही कारखान्यांची वाढ ही गोदावरी शुगर फार्मवर अवलंबून होती. या शेतीतील उसाच्या दर्जेदार उत्पादनावर कारखान्यातील साखरेचे उत्पादन अवलंबून होते. 'साखरेची निर्मिती कारखान्यात होत नसते तर ती उसाच्या शेतीत होत असते' हे त्यातील मर्म करमसीभाईंनी चांगलेच जाणलेले होते; आणि म्हणूनच गोदावरी शुगर मिल्समध्ये शेतीला अनन्यसाधारण असे महत्त्व दिलेले होते.

साखर कारखान्यात गाळलेल्या उसापासून जी मळी किंवा बगॅस हे पदार्थ शिल्लक राहतात त्यांचा विनियोग साखरेच्या मुख्य उत्पादनानंतर उपउत्पादन - By-products - म्हणून करता येतो. मळीपासून 'रेक्टीफाईड स्पिरिट'ची निर्मिती करणारी डिस्टिलरी गोदावरी कारखान्ये साकरवाडी येथे १९४७ साली सुरू केली. दररोज पंधराशे गॅलन रेक्टिफाईड स्पिरीट निर्माण करण्याची तिची क्षमता होती. नंतर पुढे १९६२ मध्ये साकरवाडी येथेच साखर कारखान्याजवळ 'ॲसेटिक ॲसिड9ची निर्मिती करणारा एक प्लँट बसविण्यात आलेला आहे.

❖

नभ मेघांनी आक्रमिले

छिन्नोऽपि रोहति तरु : क्षीणोऽप्युपीयते पुनश्चन्द्र : ।
इति विमृशन्त : सन्त : सन्तप्यन्ते न ते विपद : ।।

वृक्ष तोडला तरी पुन्हा वाढतो, चन्द्र कृश झाला तरीसुध्दा फिरून पुष्ट होतो असा विचार करून सत्पुरुष संकटांनी घेरले तरी कष्टी होत नाहीत.

नभ मेघांनी आक्रमिले

गोदावरीच्या ऊस उत्पादनाची आणि साखर निर्मितीची प्रशंसा देशातच केवळ नव्हे तर परदेशांतही होत होती. एकरी १२० टन उसाचे
उत्पादन करणारे गोदावरी कारखान्याचे मळे म्हणजे काही केवळ
निसर्गाची किमया नव्हती, तर ती एक मानवी पराक्रमाची व
कर्तृत्वाची गाथा होती. शास्त्रीय ज्ञान, सातत्याने घेतलेले परिश्रम व गतिमान औद्योगिक धोरण या त्रिसूत्रीमधून लाभलेले मधूर फळ होते. गोदावरी कारखान्याने आधुनिक पद्धतीने शास्त्रशुद्ध शेती करून जागतिक उसाच्या उत्पादनाचे हवाई बेटांचे विक्रम मोडले होते. तसेच प्रतिदिनी ६०० टनांच्या गळितापासून क्रमाक्रमाने वाढ करीत गोदावरी साखर कारखान्याने पंचवीस वर्षांत आपली गाळप क्षमता प्रतिदिनी १३५० टनांपर्यंत नेली होती. दर्जेदार धवलशुभ्र दाणेदार साखर म्हणजेच गोदावरीची साखर, असे समीकरण देशातील लोकमानसात निर्माण झाले होते. २४×४८ इंच आकारमानाच्या पंधरा चरकांच्या साहाय्याने १५०० मेट्रिक टनांचे एका दिवसात विक्रमी गळित करून ऊस गळित तंत्रात एक नवीन उच्चांक गोदावरीने गाठला होता

साकरवाडी येथील कारखान्याच्या पाठोपाठ १९४२ सालच्या गळीत हंगामात लक्ष्मीवाडी येथील गोदावरीचा दुसरा साखर कारखाना सुरू झाला. या कारखान्यातही सुरूवातीच्या ९०० टन गळितापासून क्रमाक्रमाने प्रतिदिनी १७०० टन गळिक्षमता वाढविली होती. लक्ष्मीवाडीच्या D-30 साखरेस अखिल भारतात पहिला क्रमांक मिळालेला होता. तसेच साखर निर्यात क्षेत्रातसुद्धा या कारखान्याची साखर सदैव पहिली आली होती. या कारखान्याची कच्च्या साखरेची प्रत पहिल्या दर्जाची होती. अशा तऱ्हेने याही कारखान्याने नेत्रदीपक प्रगती केलेली होती. करमसीभाईंच्या पंचवीस वर्षांतील परिश्रमाने व कर्तृत्वाने यशाची शिखरे झगमगून टाकणारा हा भरभराटीचा काळ होता. पुढील वाटचालीसाठी कर्तृत्वाचे निरभ्र आभाळ खुणावीत होते. आवाहन

करीत होते.

परंतु एकाएकी दृष्ट लागावे तसे घडले. निरभ्र आभाळ काळ्या ढगांनी झोकाळून आले आणि विपरीत असेच घडले.

१९६५-६६ च्या सुमारास महाराष्ट्र राज्याच्या शासनाने शेतीच्या जमिनीवर कमाल धारणेचे निर्बंध घालणारे एक बिल विधानसभेत आणले. या कायद्यानुसार एका विशिष्ट एकरांच्या पलीकडे शेतकऱ्यांना आपल्याजवळ शेतजमीन ठेवता येणार नव्हती. निर्बंधित एकरांच्या पुढील शेतजमीन सरकार त्या शेतकऱ्याकडून काढून घेणार होते व ज्याच्याजवळ जमीन नाही त्याला ती जमीन कसायला देणार होते. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे या बिलाचे समर्थन करताना म्हणत असत, 'शेतजमिनींच्या या राष्ट्रीयीकरणापासून आम्ही महाराष्ट्रात समाजवादाचा पाळणा हलविणार आहोत!' आपल्या या वैचारिक भूमिकेचा प्रचार यशवंतरावांनी मोठ्या हिरीरीने महाराष्ट्रभर सुरू ठेवला होता. त्या वेळी वसंतराव नाईक, जे पुढे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, ते महसूलमंत्री होते व त्यांनीच हे बिल मांडले होते.

व्यक्तिगत शेतमालक किंवा शेतकरी यांच्या बाबतीत शेतजमिनींची अशा प्रकारे पुनर्रचना किंवा पुनर्विभागणी करण्यात फार मोठी अडचण नव्हती. भारताच्या सार्वभौम शासनाने व या शासनाची सत्ताकेंद्रे ज्या राजकीय पक्षाच्या हाती होती त्या काँग्रेस पक्षानेही एक तत्त्व म्हणून समाजवादी समाजरचना देशात निर्माण करण्याचे धोरण मान्य केलेले होते.

परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्रात फार मोठी अडचण आली होती. ती खाजगी साखर कारखान्यांकडे असलेल्या फार मोठ्या क्षेत्रफळांच्या जमिनींची. या खाजगी साखर कारखान्यांच्याकडे हजारो एकर जमीन उसाच्या शेतीखाली होती. त्या वेळी महाराष्ट्रात असलेल्या आठ-नऊ साखर कारखान्यांपैकी सहा कारखाने नगर जिल्ह्यातच होते. गोदावरी कंपनीकडेच सुमारे १५००० एकर जमीन होती आणि उसाच्या शेतीने भरभराटलेली होती.

येऊ घातलेल्या नव्या कायद्यान्वये या जमिनींचे काय करायचे असा प्रश्न निर्माण झालेला होता. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणत असत, 'खाजगी साखर कारखान्यांकडील या जमिनी सरकार कायद्याने काढून घेणारच. कारण या कायद्याने ज्या शेतकऱ्यांकडे कायद्याने ठरविलेल्या जमिनीच्या मर्यादेपेक्षा अधिक जमिन असेल तर ती जमीन सरकार काढून घेणार. अशा परिस्थितीत खाजगी कारखानदारांकडील एवढ्या मोठ्या जमिनी सरकारला कशा ठेवता येतील? कायदा सर्वांना सारखाच लागू असतो. म्हणून सरकारला या जमिनींचे राष्ट्रीयीकरण करावेच लागेल.'

नगर जिल्ह्यातील साखर कामगारांचे ज्येष्ठ नेते श्री. गंगाधर ओगले व श्री. किशोर

पवार यांना बोलावून त्यांच्यापुढेही श्री. यशवंतराव चव्हाण यांनी ही परिस्थिती विशद केली होती व या भागात अशाा रीतीने समाजवादाचा पाळणा हलविण्यासाठी त्यांनी साहाय्य करावे, असे आवाहनही केले होते.

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीने कला व वाणिज्य महाविद्यालय १९६४ सालीच सुरू केले होते. कॉलेजचा व्याप दिवसेंदिवस वाढत गेला आणि कॉलेजला स्वतंत्र इमारतीची गरज तीव्रतेने भासू लागली. तेव्हा या इमारतीसाठी करमसीभाई व शांतिलालजी सोमैया यांनी देणगी दिली. कॉलेजच्या इमारतीचा कोनशिला समारंभ श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्ते ७ सप्टेंबर १९६७ या दिवशी गणेश चतुर्थीच्या सुमुहूर्तावर करमसीभाई आणि शांतिलालजी यांच्या उपस्थितीत साजरा झाला आणि त्या महाविद्यालयाचे 'के. जे. सोमैया कला आणि वाणिज्य महाविद्यालय' असे नामांकन झाल्याचे जाहीर करण्यात आले. त्या वेळी भाषण करताना श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले, 'श्री. करमसीभाई यांचे मला मनापासून अभिनंदन करावयाचे आहे. शिक्षणाच्या बाबतीत ते फार रस घेतात. लोक त्यांना फक्त कारखानादार म्हणून ओळखतात. पण मी त्यंना कारखानदार म्हणून ओळखत नाही तर अतिशय धार्मिक वृत्तीचे गृहस्थ म्हणून मी त्यांना ओळखतो. हिमालयाची पायपीट करून त्यांनी जितकी माहिती मिळवलेली आहे तितकी माहिती हिंदुस्थानातील फारच थोड्या माणसांना असावी आणि म्हणूनच भारताचा संरक्षणमंत्री झाल्यावर मी करमसीभाईंना भेटायला गेलो होतो. चांगल्या प्रवृत्तीचा, चांगल्या प्रेरणांचा त्यांच्यासारखा एक उद्योगपती आपल्यात आहे याबद्दल मला आनंद होतो.'

याच सुमारास लँड सिलींग ॲक्ट येऊ घातलेला होता. त्या संदर्भात बरीच चर्चा चालू होती. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी गोदावरी साखर कारखान्यासही भेट दिली होती. त्यावेळीही त्यांनी करमसीभाईंच्या उद्योगशिलतेची व विशेषत: उसाच्या शेतीतील अभिमानास्पद प्रगतीची तोंड भरून स्तुती केली होती. उसाने भरभराटलेल्या या जमिनी नव्या कायद्याने सरकार काढून घेणार हे निश्चित झालेच होते. प्रश्न होता तो या जमिनी कायद्याने काढून घेतल्यावर त्यांच्यातील उसाचे उत्पादन असेच राहील का? ही भीती यशवंतराव चव्हाण यांच्याही मनात असावी आणि म्हणूनच ते असे म्हणाले होते की, 'करमसीभाईंच्याकडील अधिक जमिनींचेच केवळ आम्ही राष्ट्रीयीकरण करणार नसून त्यांच्या ऊस शेतीच्या संदर्भातील बुद्धीचेही राष्ट्रीयीकरण करणार आहोत!'

कमाल नवीन धारणेच्या कायद्यान्वये ज्या जमिनींचे राष्ट्रीयीकरण करण्याचे सरकारने ठरविले होते त्याला फार मोठ्या दूरदृष्टीने त्याच वेळी करसीभाईंनी मोठ्या तीव्रपणाने विरोध केला होता. कारण त्यांच्याकडून ज्या जमिनी काढून शासनाने स्थापन

केलेल्या शेतीमहामंडळाकडे (State Farming) सुपूर्त करण्यात येणार होत्या, त्यांच्यातील ऊसनिर्मितीची हानी होणार होती हे त्यांना स्पष्ट दिसत होते. ऊस उत्पादनात होणारी ही हानी म्हणजे साखर निर्मितीमधील हानी होती आणि अखेरीस या व्यवहारात सरकारला आर्थिक फटका बसणार असून त्यात देशाचीही हानी होणार होती. ती राष्ट्रीय हानी समाजवादाच्या सवंग घोषणा करणाऱ्या नेत्यांच्या लक्षात जरी तितकीशी आली नव्हती तरी ती करमसीभाईंसारख्या त्या क्षेत्रातील निष्णात शेतकऱ्याला आली होती. करमसीभाई देशभक्त होते. तारुण्यात त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतलेला होता. त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा ज्वलंत होती. तेव्हा त्यांच्यासारखा माणूस भविष्यात होणारी ही राष्ट्रीय हानी स्वस्थ बसून उघड्या डोळ्यांनी कशी पाहणार? म्हणून त्यांनी 'स्वार्थी', 'भांडवलदार', 'शोषक'... अशा शेलक्या शब्दांनी तथाकथित पुरोगाम्याकडून होणाऱ्या अवहेलनाची वा अपप्रचाराची मुळीच पर्वा न करता सनदशीर रीतीने सुप्रीम कोर्टापर्यंत या नव्या कायद्याविरुद्ध झुंज दिली. त्यात त्यांना यश लाभले नाही, ही गोष्ट वेगळी. पण या प्रकारात सरकारच्या पदरी प्रचंड अपयश पडले व देशाची हानी झाली ही खंत फार मोठी आहे.

खाजगी कारखानदारांच्या ज्या जमिनी काढून घेतल्या, त्या सरकारने एक शेती महामंडळ स्थापन करून त्यांच्याकडे सोपविल्या. महामंडळावर मोठमोठ्या पगारांचे अधिकारी, गाड्या, ट्रॅक्टर्स आदी शेतीची महागडी अवजारे यांची रेलचेल झाली. पण अशा बाह्यसाधनांनी समृद्धी आणता येत नसते. त्या साधनांबरोबरच ती वापरणाऱ्यांचे तळमळीचे मनही असावे लागते. सरकारी यंत्रणेत बहुधा सर्वत्रच अशा तळमळीचे मन असणाऱ्या माणसांचे दुर्भिक्ष्य असते.

मानवी प्रवृत्ती म्हणा किंवा स्वभाव म्हणा, असा असतो की माणसाला आपले स्वत:चे असे काही असावे असे वाटते. म्हणजे त्याच्यामधील अभिक्रमशीलता (Incentive) तत्परतेने कार्यरत बनत असते. कारण त्यातील उत्पादनाची फळे त्याला त्याच्या मर्जीनुसार चाखायला मिळणार असतात. याच्या उलट, माणसाला स्वत:ची अशी अभिक्रमशीलता जिथे उरलेलीच नसते, तिथे तो त्या अवाढव्य यंत्रणेतील केवळ एक निर्जीव स्क्रू बनून राहतो. तिथे होणाऱ्या उत्पादनाचे वा नफा तोट्याचे त्याला सोयरसुतक उरलेले नसते. 'नफा झाला तर सरकारचा होईल, तोटा आला, सरकार सोसेल; मला माझा ठरलेला पगार मिळणारच!' अशी एक हातच्या कामाबद्दल दुजाभावाची किंवा परकेपणाची उदासवृत्ती निर्माण होत असते.

अलीकडे सोव्हिएत रशियात कम्युनिस्ट राजवटीच्या संदर्भात जया प्रचंड घडामोडी घडल्या, त्यावरूनही हेच स्पष्ट होते. रशियन क्रांतीनंतर आलेल्या कम्युनिस्ट राजवटीने लोकांकडून बळजबरीने हजारो हेक्टर जमिनी राष्ट्रीयीकरणाच्या नावाखाली काढून घेतल्या आणि हजारो एकरांचे मोठमोठे फार्मस् तयार केले. अगदी अल्पशी जमीन स्वत:च्या

मालकीची अशी काही शेतकऱ्यांच्याजवळ ठेवली होती. अनेक वर्षांच्या सामूहिक शेतीच्या प्रयोगानंतर असे आढळून आले की सरकारी फार्मवरील हेक्टरी उत्पादनापेक्षा खाजगी अल्पशा जमिनीतील उत्पादन तुलनेने अधिक होते! याचाच अर्थ असा की खाजगी जमीनधारकांना आपल्या अल्पशा का होईना, जमिनीच्या तुकड्याबद्दल आपुलकी होती आणि तिच्यात कष्ट करून जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी लागणारी अभिक्रमशीलता त्यांच्या ठिकाणी जागृत होती. याच्या उलट सरकारी फार्मबद्दल अधिकारी व कामगार यांना आत्मीयता नव्हती व त्या जमिनीत घाम गाळून जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी लागणारी अभिक्रमशीलता किंवा इच्छाशक्ती त्यांच्याकडे मुळीच नव्हती.

नेमकी हीच गोष्ट महाराष्ट्रातही शेतकी महामंडळाच्या बाबतीत घडली.

या भागातील एक शेतकरी श्री. भाऊसाहेब टेके सांगत होते, 'गोदावरीकडे आमची शेती असताना सकाळी सहा-साडेसहालाच कामाची जुपी होत असे. पण तीच शेती महामंडळाकडे गेल्यावर तिथले अधिकारीच सकाळी दहा-साडेदहा वाजून गेल्यावर कामावर येत असत. मग काम कसं होणार आणि उत्पादन कसं वाढणार?'

दुसरे एक शेतकरी शंकर दगडू वीर म्हणाले, 'कॉर्पोरेशनकडे आमच्या जमिनी गेल्या तेव्हा असं वाटलं, आपल्या आईनं आमचं लग्न दुसऱ्याशी लावून असं आम्हांला सासरी पाठवू नये. कंपनी आमची आई होती. खूप चांगलं पीक निघे. आता सगळं बिघडलं. १९६८ साली फॅक्टरीकडील शेती महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे गेली, पण आज शेती महामंडळाचं उसाचं एकरी टनेज आमच्यापेक्षाही येत गेलेलं आहे. सध्या त्यांचं ॲव्हरेज ४० ते ४२ टन असेल.' गोदावरीकडे खोडवा ऊस, सुरू व आडसालीचे ६८ टनांचे रेकॉर्ड आहे. १९६३ मध्ये श्री. पटेलसाहेब हे रामवाडी, दशरथवाडी, हनुमानवाडी या ठिकाणी या तीन वाड्यांचे प्रमुख होते. खोडवा, सुरू, आडसाली यांचे ॲव्हरेज १९६७ साली पटेलसाहेब, चौगुलेसाहेब वगैरे शेतकी अधिकारी असताना ६८ टनांचे होते. शेतीबद्दल अधिकाऱ्याला व कामगाराला आपुलकी असली पाहिजे. उगाच वरून आज्ञा आली म्हणजे कागदोपत्री काही करत राहायचे, यामुळे शेती चांगली होत नाही. निष्काळजीपणा हा याला प्रामुख्याने कारणीभूत आहे. यात सरकारचे व देशाचेही नुकसान आहे. स्टेट फार्मिंगकडे असलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्याच होत्या. त्या स्टेट फार्मिंगकडे खंडाने होत्या, पण परवा कोठे तरी मी पेपरमध्ये वाचले की, आजपर्यंत सरकारने जो शेतकऱ्यांचा खंड दिला तो त्या शेतीची किंमत समजून. आता शेती सरकारची म्हणजे शेती महामंडळाची झालेली आहे, असे सरकारचे म्हणणे आहे. माझी तेरा एकर जमीन शेती महामंडळाकडे खंडाने आहे. ३९० रुपये मला खंड मिळत असे. आतापर्यंतच्या मिळालेल्या खंडाचा विचार करता माझी बारा एकर जमीन बारा हजार रुपयांना शेती महामंडळाने विकत घेतली असाच अर्थ होईल. याची कल्पना या अगोदर आम्हांला दिलेली नव्हती. या असंतोषाविरुद्ध लोक आंदोलन

करणारच. आज या जमिनीबद्दल मूळ जमीनमालकांना आपुलकी असणारच. माझ्या वडिलांनी ही जमीन घेतलेली असेल किंवा आजोबा, पणजोबांनी. तेव्हा जमिनीत कष्ट करून ते मिळवत असतील व माझ्या मुलाला या जमिनीचा उपयोग होईल, तो यावर उदरनिर्वाह करील ही कल्पनाच आज नष्ट झालेली आहे. यापेक्षा पूर्वीचे कारखानदार बरे. निदान खंड वेळच्या वेळी तरी देत असत. त्याबद्दल काही तक्रार नसे.

"यात शेतकऱ्यांचे नुकसान आहेच; पण उसाचे उत्पादन कमी आल्यामुळे कारखान्याला पण भरपूर ऊस मिळत नाही. शिवाय देशाचे पण नुकसान होत आहे. सहकारी क्षेत्राबद्दल मी तर विचारच करत नाही. गेली तीन-चार वर्षे मी गावच्या सहकारी सोसायट्यांचा कारभार पाहिला आणि हे सहकारी क्षेत्रातले राजकारणाचे काम आपले नाही असे समजून मी त्यापासून अलिप्तच राहिलो. आमच्या मताप्रमाणेच सर्व चालले पाहिजे, अशी सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपासून निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची समजूत आहे. हा कोणी तरी आपल्याकडे गरजू आलेला असून त्याने आम्ही सांगू त्याप्रमाणे ऐकलेच पाहिजे, असे हे ठरवत असल्यामुळे व माझ्या मनाला हे पटत नसल्यामुळे, मी यापासून अलिप्त आहे. त्यामुळे मी कोठल्या बँकेचा मेंबर नाही, सहकारी सोसायटीचा सभासद नाही. सहकारी क्षेत्रातील बागायतदार, सभासद वगैरे यांचे उसाचे प्रमाण घटतच चालले आहे, असे वाटते. याला कारण म्हणजे सहकारी साखर कारखाने उसाचा भाव देताना कारखान्यावर मिळणाऱ्या फायद्यावरून उसाचे भाव ठरवतात. त्यामुळे उसाला जास्तीत जास्त भाव मिळतो. मग ऊस कसल्याही प्रतीचा असो. त्याला कारखान्याने ठरविलेला भाव मिळणारच. त्यामुळे उसाचा दर्जा, सहकारी कारखान्याचे सभासद असलेल्या शेतकऱ्यांचा पण खालावत चाललेला आहे. तसेच त्याचा टनेजवर पण साहजिकच परिणाम होतो. उसाला पूर्वी मिळालेला भाव, यामुळे शेतकऱ्याचे शेतीकडे दुर्लक्ष होत गेले. पूर्वी ७० टनेज असलेले उत्पादन आज ३५ ते ४० टनांपर्यंत दिसून येते.

शेतकऱ्याचे लक्ष शेतीपेक्षा राजकारणाकडे अधिक वळत गेले व ते पण शेतीवर दुर्लक्ष होण्यास कारणीभूत झालेले आहे आणि शेवटी या निष्काळजीपणाचा परिणाम व्हायचा तोच झाला. ज्या गोदावरीच्या उसाच्या शेतीमधून एकरी सरासरी ६५ ते ७० टन उसाची निर्मिती होत असे त्याच जमिनीतून सरकारीकरण झाल्यावर उसाचे एकरी उत्पादन १२ ते १३ टनापर्यंत खाली घसरले आणि प्रचंड नुकसान झाले.

अशा प्रकारे जमिनींचे राष्ट्रीयीकरण करून अपेक्षित असा समाजवादाचा पाळणा हालला तर नाहीच, पण उलट मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय संपत्तीचा नाश होऊन राष्ट्राचे नुकसान झाले.

वीस-पंचवीस वर्षाच्या या कटू अनुभवानंतर आता, समाजवादाचा उदो उदो करणारे

तेच नेते उघडपणाने म्हणू लागले आहेत की, त्या वेळी खाजगी कारखान्यांकडील जमिनी काढून घेऊन त्या सरकारी शेती महामंडळाकडे सोपविल्या ही फार मोठी चूक झाली. सरकारने शेतीच्या व्यवसायात लक्ष घालता कामा नये, असा धडाच आम्हांला मिळाला आहे.

अशा प्रकारे जमिनींचे राष्ट्रीयीकरण करूनच सरकार थांबले नव्हते, तर आणखी एका बाजूने उसाच्या शेतीचे व साखरधंद्याचे नुकसान करण्याचे धोरण स्वीकारले होते.

१९५० च्या अखेरीस नगर जिल्ह्यात, श्रीरामपूर तालुक्यात, साकरवाडीपासून जवळच प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना निघाला. या कारखान्याच्या उभारणीत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ व तत्कालीन काँग्रेस मंत्रिमंडळात सहकारी खात्याचे मंत्री असलेले पूर्णतया सत्‌शील गांधीवादी कार्यकर्ते श्री. वैकुंठभाई मेहता यांचा फार मोठा हातभार होता. लोणीचे शेतकरी श्री. विठ्ठलराव विखेपाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांना घेऊन गाडगीळ व मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली फार कष्ट करून हा कारखाना सुरू केला होता.

करमसीभाईंनी या सहकारी उपक्रमाचे स्वागत केले आणि विखे-पाटील यांना उसाच्या शेतीसाठी हवे ते मार्गदर्शन आणि सल्लाही दिला होता. सहकारी कारखानदारीला करमसीभाईंनी विरोध केला होता अशी जी एक अफवा त्या भागात त्यावेळी पसरलेली होती, ती पूर्णत: असत्य होती. भांडवलदारीला बदनाम करण्याच्या दुष्ट हेतूनेच ती, तशाच कोणीतरी तथाकथित पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या माणसाने जाणूनबुजून पसरविली असावी.

प्रवरानगरचा पहिला सहकारी साखर कारखाना निघाल्यावर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या अनेक नेत्यांना आपापल्या भागांतही सहकारी साखर कारखाने काढण्याची प्रेरणा मिळाली आणि सांगली, कोल्हापूर, सातारा आदी भागांतही सहकारी साखर कारखाने उभे राहिले. नगर जिल्ह्यात खुद्द कोपरगाव तालुक्यात साकरवाडी व लक्ष्मीवाडीच्या जवळच तेथील दोन काँग्रेस नेत्यांचे दोन सहकारी साखर कारखाने सुरू झाले. साहजिकच कारखान्यात तयार होणाऱ्या साखरेसाठी उसाची गरज भासू लागली. पुढे पुढे तर साखर कारखाने काढण्यासाठी परवाने देण्याच्या सरकारी धोरणातही काही तारतम्य आणि मेळ राहिला नाही. जिल्ह्या-जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या तालुक्या-तालुक्यांच्या अंतरावरील स्थानिक नेत्यांना आपल्या राजकीय प्रगती व स्थैर्यासाठी सहकारी साखर कारखान्याची गरज भासू लागली. त्यांची मागणी सरकारदरबारी वाढली आणि त्या त्या कारखान्यांसाठी आवश्यक असा ऊस आहे की नाही याची पुरेशी खातरजमा करून न घेताच, केवळ त्या भागातील गठ्ठा मतदानावर डोळा ठेवूनच, निव्वळ राजकीय दृष्टीने भरमसाठपणाने अशा सहकारी कारखान्यांना सरकारने परवानेही दिले.

सहकारी साखर कारखाने ठायी ठायी वाढले, पण त्यांच्या कार्यक्षेत्रातील जमीन काही वाढली नव्हती, वाढणारही नव्हती आणि उसाचे उत्पादनही वाढणार नव्हते. याचा परिणाम, अर्थातच सहकारी तत्त्वांना हरताळ फासून एकमेकांच्या क्षेत्रातील उसाची पळवापळव सुरू करण्यात झाला. उसाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे कारखाने चालेनातसे झाले आणि असे अनेक कारखाने आजारी पडले. अनेक कारखान्यांमधून सहकाराच्या ठिकाणी स्वाहाकार बोकाळला. सहकारी साखर कारखाने म्हणजे सत्तेच्या राजकारणाचे अड्डेच बनले!

सहकारातून समाजवादाकडे जाण्याऐवजी, नव्या सरंजामशाहीचा मात्र उदय झाला. समाजवादाचा पाळणा इथेही हालला नाही, हे दुर्दैव!

याच राजकारणाची झळ गोदावरी साखर कारखान्याला लागल्याशिवाय राहिली नाही. जमिनी सरकारकडे गेल्यामुळे आणि उसाच्या पळवापळवीमुळे साकरवाडी व लक्ष्मीवाडी येथील कारखान्यांना उसाचा अपुरा पुरवठा होऊ लागला. या कारखान्यांना ऊस मिळूच नये, अशी व्यूहरचना ही काही तथाकथित सहकारमहर्षींनी केली. एकजण तर म्हणाले, 'करमसीभाई यांनी आम्हांला उसाची शेती कशी करावी हे शिकवले म्हणून ते आमचे गुरू आहेत आणि आमच्या कारखान्यांसाठी आम्हांला त्यांच्याकडील ऊस हवा म्हणून ते आम्हांला शत्रूसारखेही वाटले. कारण शेवटी या लढाईत आमच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला होता. त्यांचा ऊस आम्हांला मिळाला नसता तर आम्ही उद्ध्वस्त झालो असतो. म्हणून त्यांच्याकडील उसासाठी त्यांची कोंडी करून त्यांना उद्ध्वस्त करण्याखेरीज आम्हांला गत्यंतरच नव्हते आणि म्हणून आम्ही ते केले. करमसीभाईंना त्यांचे दोन्ही कारखाने गुंडाळावे लागले.'

बदलत्या काळाची ही पावले ओळखून, आता यापुढे कारखाने चालवण्यात अर्थ नाही हे जाणून, करमसीभाई व शांतिलालजी यांनी आपले दोन्ही कारखाने नाईलाजाने बंद केले.

ज्या कष्टातून हे वैभव उभारले होते, ज्या सृजनशील प्रयोगातून व प्रयत्नांतून हा उत्कर्ष साधला होता त्याच ठिकाणी त्याचा अपकर्षही पाहावा लागला याचे केवढे दु:ख या पितापुत्रांना झाले असेल, याची कल्पनाही करवत नाही!

❖

साखर व्यवसायातील त्यांच्या आठवणी

क्लेश : फलेन हि पुनर्नवतां विधत्त ।

फळ मिळाल्यावर केलेले कष्ट नवीन रुप धारण करतात.

(म्हणजे कष्ट नाहीसे होतात.)

साखर व्यवसायातील त्यांच्या आठवणी

श्री. रामधनजीभाई खटोड यांच्याशी विचारविनिमय झाल्यानंतर करमसीभाईंनी त्यांच्या साखरव्यवसायात भागीदारी पत्करली. श्री. खटोड यांचे इतर बरेच उद्योग होते. परंतु करमसीभाईंनी केवळ साखर विक्रिच्या व्यवसायापुरतेच त्यांच्याशी भागीदारीचे संबंध ठेवले.

ज्या दिवशी ही भागीदारी उभयतांमध्ये निश्चित झाली त्याच दिवशी रात्री करमसीभाई साखर खरेदीसाठी मुंबईला रवाना झाले. 'शुभस्य शीघ्रम!'

साखर विक्रिच्या व्यवसायातून पुढे काही वर्षांनी करमसीभाईंनी साखर कारखाने उभारले, याची हकीकत मागे आलेलीच आहे. साखर विक्रिच्या व्यवसायात साखर कारखाने काढल्यानंतरही करमसीभाईं महाराष्ट्रातील किंबहुना मध्यप्रदेश, आंध्र, कर्नाटक, गुजरात आदी प्रांतांतही एक अग्रगण्या साखर व्यापारी म्हणून आदराने ओळखले जात होते. कारण स्वत:च्या कारखान्यातील साखरविक्रिबरोबरच ते त्या आधीपासूनच आपल्याकडे असलेल्या इतर साखर कारखान्यांकडील एजन्सीनुसार मोठ्या प्रमाणावर साखर खरेदी करुन साखर बाजारात वावरत होतेच. इतकेच नव्हे, तर साखर बाजारावर दररोजच्या साखर भावाच्या संदर्भात करमसीभाईंचीच हुकूमत चालत असे. ते काय भाव काढतात इकडे ठिकठिकाणचे मोठमोठाले साखर व्यापारी लक्ष देऊन असत. साखर व्यवहारातील ह्या प्रतिष्ठित स्थानामुळेच करमसीभाईंना 'शुगर किंग' या गौरवनामाने संबोधिले जात होते.

महाराष्ट्रातील साखर व्यवसायाला एक पद्धतशीर संघटित स्वरूप देण्याच्या उद्देशाने साखर व्यवसायातील प्रमुखा असे श्री. वालचंद हिराचंद दोशी, श्री. दादासाहेब डहाणूकर आदींच्याबरोबरच करमसीभाईंनीही पुढाकार घेतला होता. व 'डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन' ही संस्था प्रवर्तित केली होती. या संस्थेचे, बाय रोटेशन असे, अध्यक्षपदही करमसीभाईंनी भूषविले होत. पुढे त्यांचे सुपुत्र डॉ. शांतिलालजी सोमैया यांनीही हे अध्यक्षपद भूषविले होत. सोमैया घराण्यातील पिता-पुत्र दोघेही या महाराष्ट्रातील अग्रगण्य अशा साखर व्यवसायातील संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष बनले होते.

अशा प्रकारे करमसीभाईं प्रदीर्घ काळपर्यंत साखर व्यवसायात गंतलेले होते. या कालावधीतील काही आठवणी आजही त्यांच्या मनात रेंगाळत आहेत. त्यांतील काही आठवणी अशा :

त्यांची पहिली आठवण ही अगदी पहिल्या दिवशीचीच आहे. करमसीभाईं सांगतात, "भागीदारी ठरली त्याच दिवशी रात्री मी बेलापूरहून मुंबईला निघालो. मुंबईत साखर खरेदी करून व ती विकून सुमारे अडीच महिन्यांनंतरच घरी बेलापूरहून परतलो. बेलापूर रोड स्टेशनपासून गावात येण्याजाण्यासाठी टांग्याची सोय होती. मी एका टांगेवाल्याला रात्री येण्यास सांगून ठेवले होते, परंतु तो आलाच नाही. दारु पिऊन कुठे बसला की दुसरे पॅसेंजर घेऊन गेला कुणास ठाऊक. तो आला नाही, वाट पाहून पाहून मी मग पायीच निघालो. कारण रात्री उशीरा दुसरा टांगाही उपलब्ध नव्हता. स्टेशनपासून गाव तीन मैल अंतरावर होते. रात्रीच्या अंधारातून मी एकटाच चालू लागलो. मला पाहून एक कुत्रा एका शेतातून माझ्यावर भुंकत-भुंकत धावून आला. मी मनातून घाबरलो होतो, पण पळालो नाही. तसाच ठपकून राहिलो. मला हे माहित होते की, पळून न जाता असे केल्याने कुत्रा चावत नाही. मीही मग त्यांचे भुंकणे कमी झाल्यावर पुन्हा हळूहळू वाट चालू लागलो.

"माझ्या व्यवसायाच्या तिसऱ्या वर्षीची गोष्ट. रावळगाव साखर कारखान्यातील खांडसरी साखर न खपल्याने साठून राहिली होती. मला हे कळल्यावर मी तिथे गेलो आणि श्री. लालचंद हिराचंद यांच्याकडून ती साखर खरेदी केली. ईश्वरकृपेन ती मला विकताही आली. या व्यवसायात नफा थोडासाच झाला परंतु माझ्यामध्ये एक व्यापारी आत्मविश्वास जागृम झाला. दुसरे असे की, अन्य साखर कारखान्यांतील साखरही विक्रिसाठी आम्हांलाच मिळू लागली. आमचा व्यवसाय वाढण्यास मदत झाली.

"सर्वश्री डहाणूकर आणि वालचंद यांच्या कारखान्यांतील साखर तोंडी कराराने आम्ही घेत होतो. आमच्याकडे त्यांची कायमची एजन्सी होती. तथापि, एकदा कारखान्यांना साखर विक्रिची परवानगी मिळाल्यावर ते स्वत:च साखरविक्रि करू लागले.

"आम्ही खरेदी केलेल्या साखरेचा उत्पादन दर्जा खालावलेला असला तरी देखील आम्ही आमचा शब्द पाळून ती खरेदी करीतच असू. आमच्या या शब्द पाळण्याच्या धोरणामुळे अन्य अनेक कारखान्यांची साखर आम्हांला विक्रिसाठी मिळू लागली. फलटण साखर कारखान्याने आम्हांला त्यांच्याकडील नंबर २ ची साखर पोत्यामागे एक रुपयाच्या फरकाने दिली. ती साखर बाजारात न खपण्यासारखी होती. परंतु आम्ही कुरकुर न करता ती घेतली आणि विकली. त्यामुळे ते खूष झाले आणि दुसऱ्याच महिन्यात त्यांनी आम्हांला आपल्याकडील साखर कमी भावाने दिली. त्यामुळे मागील व्यवहारात झालेला तोटा आम्हांला भरून काढता आला. या व्यवहारिक धोरणामुळे साखर कारखान्यांचा विश्वासही

संपादन करता आला.

"एकदा साखरेवरील नियंत्रण उठल्यानंतर आम्ही कृष्णा साखर कारखान्यातील साखर पोत्यामागे चारशेसाठ रूपये याप्रमाणे खरेदी केली. ती आम्हांला चारशे पासष्ठ रुपयाला विकता येणार होती. परंतु अकस्मात साखरेच्या किमती उतरल्या आणि प्रत्येक पोत्यास तीनशे पस्तीस रुपये इतक्या झाल्या. म्हणजेच आम्हांला पोत्यामागे एकशे पंचवीस रुपये तोटा झाला. पुष्कळांनी मला त्यांच्याकडील अनामत न भरण्यास सांगितले. परंतु मी माझ्या शब्दाला जागून स्थिर राहिलो. त्या महिन्यात आम्हांला पंधरा लाख रुपयांचा तोटा झाला सहन करावा लागला होता.

"आम्ही आमचा शब्द कसोशीने पाळत होतो. त्यामुळे व्यापारी वर्गात आमच्यासंबंधी विश्वास निर्माण झालेला होता. आमची ही कीर्तीसुद्धा दूरवर पोचली होती. त्यामुळे लगेच दुसऱ्याच महिन्यात मद्रासमधील प्यारी अँड को. यांनी आम्हांला आठ हजार साखर पोत्यांची ऑफर दिली आणि आम्ही ती स्वीकारली. त्या नंतर लगेच दुसऱ्याच दिवशी कमी भावाने सतरा हजार साखर पोत्यांची ऑफर दिली. त्याच महिन्यात आम्ही श्री. वसंतदादा पाटील यांच्या सांगलीच्या कारखान्यातून, तसेच श्री. मोहित पाटलांच्या कृष्णा साखर कारखान्यांकडील आणि कोल्हापूर साखर कारखान्यांकडील एक महिन्याचे साखर उत्पादन खरेदी केल. परमेश्वराची कृपा अशी की, त्याच सुमारास साखरेचे भाव वाढले आणि त्या महिन्यात ऐंशी लाख रुपयांचा नफा झाला. आम्हांला जेव्हा तोटा झाला तेव्हा जर आम्ही आमचा शब्द पाळला नसता, तर ही मोठी खरेदी करण्याची संधी लाभली नसती. माझ्या या व्यापारी धोरणामुळे साखर बाजारात मला एक मानाचे स्थान व प्रतिष्ठेची पत लाभली. व्यापार कसा करावा हे मला कुणी शिकवले नाही. परंतु एक अदृश्य शक्ती माझ्या मागे उभी होती व तीच मला मार्गदर्शन करीत होती."

उत्तर प्रदेश म्हणजे साखर निर्मितीचा प्रदेश, असे महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या उदयापूर्वी मानले जात असे. उत्तर प्रदेशात फार मोठ्या प्रमाणावर उसाची लागवड करण्यात येत असे. त्यामुळे साखर उत्पादनाची खाजगी कारखानदारी इथे निर्माण झाली होती. त्या काळातीलच ही एक गोष्ट आहे :

उत्तर प्रदेशातील साखर-हंगाम अजून सुरू व्हावयाचा होता. बरेचसे नवीन कारखाने साखर उत्पादन करणार होते. ही परिस्थिती लक्षात होऊन करमसीभाईंनी साखर खरेदीची घाई न करता एक महिना थांबून वाट पहाण्याचा निर्णय घेतला. परंतु बेलापूर साखर कारखान्याने अशी वाट न पाहता पालनजी नावाच्या एका मोठ्या व्यापाऱ्यास आपल्याकडील साखर

विकून टाकली. करमसीभाईंनी व्यापारी वर्गात साखरेचे भाव उतरणार असून आजच्या दराने साखर खरेदी केल्यास आपल्याला तोटा होईल असा प्रचार सुरू केला. एप्रिल महिन्यात सतत ती दिवस साखरेचे भाव खाली आले. करमसीभाईंचे नाव व हुकुमत साखर बाजारावर चालत असल्यामुळे त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांचे काही चालले नाही. काही वेळा व्यापारी साखरेसाठी मुंबईला जात असत. त्यांना करमसीभाईंकडून सांगण्यात येत असे की नवीन दर्जेदार साखर कमी भावाने लवकरच उपलब्ध होणार आहे, तेव्हा घाई करू नका. अशा रीतीने आणखी वीस दिवस करमसीभाईंनी साखरेचा बाजार थोपवून धरला. बेलापूर कारखाना या काळात साखरेची शंभर पोती कशीबशी विकू शकला. तेव्हा ते करमसीभाईंकडे आले. बेलापूरहून तार आली की, 'डिलीव्हरी इज् व्हेरी पुअर. पूर्ण रक्कम भरा. आम्ही आमच्याकडील सर्व साखर बेलापूर येथील अर्पित लि. ला खरेदी देत आहोत.' आम्ही हा व्यवहार स्वीकारला, साखर घेतली. त्यांनाही समाधान वाटले. अशा प्रकारे या क्षेत्रातील करमसीभाईंचे आणखी काही स्पर्धक बाद झाले.

व्यापारात काही वेळा संघर्षाची भूमिकाही वठवावी लागते. अशाच एका संघर्षाबद्दल करमसीभाईं सांगतात, "साखरेचा हंगाम संपण्याच्या वेळी कारखान्यांकडील असलेली उर्वरीत साखर खरेदीच्या संदर्भात मला पहिला संघर्ष करावा लागला. मी व्यापाऱ्यांना सांगितले की, साखरेची खरेदी पंधरा दिवस तहकूब करा आणि नवीन हंगाम सुरू होताच नवीन साखर जी उपलब्ध होईल ती खरेदी करा. कारण साखर हंगामाच्या शेवटी उर्वरित साखरेमध्ये गोळे बनत असत आणि तिचा दर्जाही हलक्या प्रतीचा असे. माझ्या प्रचारामुळे काही व्यापारी माझ्याकडे खरेदीसाठी आले. काही व्यापारी साखरा विक्रि करू शकले नाहीत. त्यामुळे काही व्यापाऱ्यांनी माझे भागीदार खटोड यांच्याकडे येऊन अशी तक्रार केली की, करमसीभाईंच्या प्रचारामुळे आमचे नुकसान होत आहे. परंतु माझ्या भागीदारांनी कधीही माझ्या कामात ढवळाढवळ केली नाही. त्या व्यापाऱ्यांना त्यांनी नम्रपणे सांगितले की, हा करमसीचा धंदा आहे! "

बाजारात आपण व्यापाऱ्यांची सदिच्छा कशी मिळवली याबद्दल करमसीभाईंनी सांगितले,"साखरेच्या भावाबद्दल मी एक पद्धत ठरवलेली होती. मी जेव्हा एखाद्या भागात साखर विक्रिसाठी जात असे तेव्हा तिथल्या प्रमुख व्यापाऱ्यांची मागणी नोंदवून घेत असे. याचा पद्धतीने मी नंतरच्या व्यापाऱ्यांच्या मागण्या नोंदवून घेत असे. परंतु जर काही कारणामुळे मला साखरेचा भाव दुसऱ्या मागणीच्या वेळी कमी करावा लागला तर मी पहिल्यांदा मागणी नोंदविलेल्या व्यापाऱ्यांकडे जाऊन कमी भावाने मागणी नोंदवून घेत असे. माझ्या या प्रांजळ पद्धतीची बाजारात खूप प्रशंसा होत असे."

करमसीभाईंनी साखर उद्योगात मोठी प्रतिष्ठा मिळवली. पण सुरुवातीच्या काळात त्यांना खूप कष्ट आणि हाल सोसावे लागले होते. करमसीभाईं सांगतात, "साखरेचा धंदा सुरू केला तेव्हा मला साखरेचे व्यापारी कोण आहेत आणि कुठे आहेत हे देखील ठाऊक नव्हते. पण मी रेल्वेचे टाईम-टेबल पाहून दौरा ठरवीत असे आणि जिल्हा व तालुक्याच्या गावांना भेटी देत असे. तिथल्या व्यापाऱ्यांना भेटत असे. बोलत असे. त्यांची मागणी नोंदवून घेत असे. एकदा एका संध्याकाळी खानदेशातील एका तालुक्याच्या ठिकाणी मी पोचलो. गाव लहान होते. एका चौकात एक लहानसा दिवा जळत होता. सूर्यास्त होऊन गेला होता. सगळीकडे अंधार होता. मी चौकशी केली तेव्हा कळले की, या गावात व्यापार असा काही नाही. रात्री राहायला जागाही नाही. मी विचारले, 'इथे एखादे मंदिर तरी आहे का?' मग एकाने मला तेथील दत्ताचे मंदिर दाखवले. मी तिथे गेलो आणि मंदिराच्या पुजाऱ्याला विनंती करून म्हणालो की, मला आजची रात्र मंदिरात झोपण्याची परवानगी द्या. परंतु त्या पुजाऱ्याने माझी विनंती धुडकावून लावली. मग मी त्याला माझे सामान फक्त मंदिरात आतल्या बाजूला ठेवतो व मी बाहेर झोपतो असे सांगितले, पण त्याने माझी ही देखील विनंती धुडकावून लावली. मग मी ती रात्र तशीच जागून काढली. सकाळी एक दूधवाली जाताना दिसली. तिच्याकडून दूध घेतले आणि माझ्याजवळ पेला वगैरे काही नसल्यामुळे तिच्या मापानेच पिऊन टाकले.

"सकाळी एका व्यापाऱ्याने मात्र आश्रय दिला. घरी नेऊन जेवू घातले. माणुसकीचे हे दर्शन मी कधीही विसरणार नाही. परंतु त्यांचे नाव मात्र विसरुन गेला आहे. पुढे एकदा त्या गावी जाऊन त्यांचा तपास केला, पण माझी त्यांची भेट झालीच नाही. माझ्या मनी आजही ही एक रुखरुख राहून गेली आहे."

साखर व्यवसाय करीत असताना आणि साखर कारखाना काढण्याचे विचार मनात घोळत असताना करमसीभाईंच्या मनात खडीसाखरेचा कारखना काढण्याचा विचार आला. मुंबईला असताना ते एकद धोबी गल्लीतून चालले होते. तिथे एक खडीसाखरेची कारखाना होता. करमसीभाईं तिथेच थबकले आणि कारखान्यात गेले. तो एका गुजराथी माणसाचा कारखाना होता. करमसीभाईं त्याला भेटले आणि त्यांनी विचारले की आम्हांला खडीसाखरेचा एक कारखाना काढावयाचा आहे, त्यासाठी खडीसाखर बनविण्याची पद्धत वगैरे दाखवून मदत कराल काय? त्या गृहस्थाने सांगितले की, कालच आम्ही आमचा कारखाना बंद केला असून त्याचे सामान आणि अनुभवी माणूसही आमच्याकडे तयार आहे. करमसीभाईंनी त्याच्याशी सौदा ठरवला. पण जागा आणि पाणी असा प्रश्न आला. बेलापूर स्टेशनजवळ दोन एकराची जागा रिकामी होती. ती विक्रिसाठी दोन वर्षापासून उपलब्ध

होती. पण व्यार्घमुखी असल्यामुळे ती कोणी घेत नव्हते. करमसीभाईं त्या जागेसाठी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑप बँकेची जी शाखा बेलापूर येथे होती. तिच्या मॅनेजरला भेटले. परंतु त्याने सांगितले की, ती जागा विकण्याचा त्याला अधिकार नाही. कोपरगावच्या शाखेच्या मॅनेजरला भेटा. करमसीभाईं कोपरगावला जाऊन त्या मॅनेजरला भेटले आणि त्याने सांगितलेल्या किमतीस सौदा पक्का केला. त्या जागेत एक लहानसे गोडाऊन होते. जागा झाली पण पाण्याचे काय? त्या भागात पाण्याची टंचाई होती आणि विहिरींना पाणी लागत नव्हते. करमसीभाईंनी शेजारीच एक विहीर असलेल्या माणसाला विचारले तेव्हा त्याने हा भाग कोरडा असून जमिनीखाली पाणी नसल्याचे सांगितले. एके दिवशी मित्राबरोबर बेलापूर गावातून बेलापूर स्टेशनजवळील त्या जागेत करमसीभाईं आले होते. त्या मित्राने पाण्यासाठी एक जागा सुचवला. करमसीभाईंनी तिथे विहीर खणण्यास सुरुवात केली आणि ईश्वराच्या कृपेने २८ फुटांवर पाणी लागले. त्यांच्या खडीसाखरेच्या कारखान्याला पुरेल एवढे पाणी तर लागलेच, पण त्या गावाला पुरेल आणि रामनवमीच्या यात्रेच्या वेळी भासणारी पाण्याची टंचाई भागेल एवढे पाणी तेथे लागले. करमसीभाईं सांगतात, "आणखी आश्चर्य म्हणजे पुढे मी आमचा तो खडीसाखरेचा कारखाना आर्थिकदृष्ट्या फायद्यात चालेनासा झाला तेव्हा तो बंद करण्याचा निर्णय केला. ज्या दिवशी आम्ही तो कारखान बंद केला त्याच दिवशी त्या विहिरीतील पाणी आटून गेले. आजही त्या विहिरीत थेंबभरसुद्धा पाणी नाही."

पुढे काही दिवसांनी साखरवाडीचा कारखाना उभारणीच्या कामास सुरूवात झाली, तेव्हा बेलापूरचा हा खडीसाखरेचा कारखाना करमसीभाईंनी साकरवाडीच्या कारखान्याजवळ कान्हेगाव स्टेशनजवळ सुरू केला. काही दिवस तिथे हा कारखाना व्यवस्थित चालला, पण पुढे कामगारांचे प्रश्न उद्‌भवलयामुळे करमसीभाईंनी तोही कारखाना बंद करून टाकला व आपले पूर्ण लक्ष गोदावरी साखर कारखान्याकडे दिले.

बेलापूर कंपनी साखर विक्रि करीत होती. मूळचंद मोहनलाल हे कानपूरचे व्यापारी त्यांच्या कंपनीचे एजंट होते. ते बेलापूरला येऊन काही व्यापाऱ्यांनी बोलावून प्रत्येकी पाचशे साखरेची पोती विकत असत. बेलापूर कंपनीची साखरही चांगली दर्जेदार होती. त्यामुळे दररोज बरेच व्यापारी साखर खरेदीसाठी येत असत. व्यापारी आणि त्यांचे प्रतिनिधी रस्त्यांत हिंडून कमी किमतीने दुसऱ्या व्यापाऱ्यांना साखर विकत असत. त्यामुळे साखरेचा बाजार खाली येऊ लागला. मूळचंद मोहनलाल यांच्या व्यापाऱ्यांनाही साखरेचा भाव कमी करावा लागला आणि त्यामुळे तोटाही सहन करावा लागला. त्याच वेळी मुंबई साखर बाजार चढ्या भावात असताना बेलापूरची साखर मात्र कमी भावाने विकली जात होती. करमसीभाईंनी ही परिस्थिती बेलापूर कंपनीचे मुंबई येथील मॅनेजर मि. मोविअर यांच्या

नजरेस आणली. त्यांना असे सुचविले की, निरनिराळ्या व्यापाऱ्यांना विक्रिसाठी साखर देऊन साखरेच्या किमती उतरविण्याची संधी देण्यापेक्षा कंपनीच्या हिताच्या दृष्टीने त्यांचा विश्वास असेल अशा एकाच व्यापारी पार्टीकडे साखर विक्रीची व्यवस्था सोपवणे हिताचे होईल. त्यामुळे धंद्यामधली स्पर्धा कमी होऊन साखरेच्या भावात स्थिरता येईल. कंपनीला हे त्यावेळी पटले नाही. साखर विक्रीसाठी त्यांनी दोन अधिकाऱ्यांची नेमणूक केली. संजीव आणि आप्पासाहेब देवळालकर अशी त्यांची नावे होती. संजीव हा अधिकारी फर्स्ट क्लासने टायपिस्ट बरोबर घेऊन प्रवास करीत असे. देवळालकर हे स्वतंत्र गृहस्थ बोलके आणि धंद्याची माहिती असणारे. त्या काळात साखर फार कमी उपलब्ध असे. करमसीभाईं त्या वेळी एका बिगर हंगामाच्या काळात इंदोरला साखर विकण्यासाठी गेले होते. त्यांच्या उर्वरित कोट्यातील साखर विकून ते बेलापूरला परत येत होते. त्या वेळी संजीव त्यांना तिथे रेल्वे स्टेशनवर फर्स्ट क्लास केबिनमध्ये भेटला. करमसीभाईंनी चौकशी केली. तेव्हा तो साखर विक्रीसाठीच आला होता हे कळले. अश तऱ्हेने गिऱ्हाईकाला सरळ साखर विक्री करण्याचा अधिकार नव्हता. एका महिन्याच्या अवधीत त्या दोघाही अधिकाऱ्यांनी साखर विक्री केलेली नव्हती असेही चौकशीअंती त्यांना कळले. मि. मोविअर यांच्या लक्षात ही गोष्ट आल्यावर त्यांनी आपली सगळी साखर करमसीभाईंकडेच विक्रीसाठी सोपवली. १९४४ साली साखरेवर निर्बंध येईपर्यंत हीच पद्धत चालू होती.

"साखरेचा बाजार साधण्यासाठी मी बुधवारी बेलापूराहून निघत असे. पण मला त्यात यश येत असे, हे पाहून माझी पत्नी साकरबाई एकदा मला म्हणाली, 'तुम्ही बुधवारी जाण्याच्या ऐवजी वार बदलून दुसऱ्या एखाद्या वारी का जात नाही?"

"मी पत्नीचा सल्ला मानला आणि दुसऱ्या दिवशी बेलापूरला गेलो. तेव्हा मला साखरेचा व्यापार साधला."

ते दिवस चळवळीचे होते. 'चले जाव'चा लढा सुरू होता. देशभक्त करमसीभाईंची सहानभूती होतीच, ते सांगतात,"मी डोक्यावरचे सर्व केस काढून टाकले होते. गांधी टोपी, कुर्ता, धोतर आणि चप्पल वापरीत असे. दुपारी बारा वाजेपर्यंत ऑफिसमध्ये काम करीत असे. नंतर आजूबाजूच्या खेड्यांतून जात असे. मी भाषणे देत नसे, पण लोकांना आपल्या स्वातंत्र्याच्या ध्येयाबद्दल सांगत असे.

"एकदा माझ्या भागीदारांनी मला याबद्दल इशारा देऊन सांगितले की, आपला व्यवहार परकीयांशी आहे. बेलापूर कंपनी ब्रिटीश लोकांची होती. त्यांनी जर आपला चळवळीशी संबंध आहे असे कळले तर आपल्या धंद्यावर त्याचा परिणाम होईल. धंदा गमवावा लागेल. तेव्हा मी त्यांनी म्हणालो की हे लोक जरी परदेशाहून आलेले असले

तरी त्यांना आपण स्वातंत्र्याकरता लढत आहोत हे चांगले ठाऊक आहे. त्यामुळे आपला स्वातंत्र्यालढ्याशी संबंध आहे हे कळल्यावर ते आपली स्तुतीच करतील.

"आणि माझे विधान सत्य ठरले. आम्हांला कंपनीच्या लोकांकडून कधीच त्रास उद्‌भवला नाही. आमचा धंदा मोठ्या भरभराटीत चालला होता. त्या ब्रिटीश अधिकाऱ्यांनी माझ्या कामाबद्दल कधीच आक्षेप घेतला नाही, तर उलट प्रशंसाच केली."

बेलापूर कंपनीचे हेडऑफिस मुंबईला होते आणि संजीव नावाचे मॅनेजर तिथे होते. त्यांच्या हाताखाली सुभेदार आणि करमसीभाईंचे इतर काही मित्र काम करत होते. सुभेदार हा सुशिक्षित आणि सात्त्विक गृहस्थ होता. ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संताचे अभंग त्यांना पाठ होते.

बेलापूर कंपनीचे शेअर्स घेण्याचा विचार करमसीभाईंनी केला होता. बेलापूर कंपनीशी त्यांचा साखरेचा मोठा व्यवहार असला तरी मुंबई ऑफिसशी त्यांचा तसा संपर्क नव्हता. मुंबईतील कंपनीच्या ऑफिस शेजारीच शेअर बाजार होता. पण करमसीभाईंनी त्याची कधी चौकशी केली नव्हती. त्यांनी आपल्यासाठी बेलापूर कंपनीचे काही शेअर्स खरेदी करण्याची विनंती संजीव यांना केली. त्यांनी प्रयत्न करतो असे सांगितले. त्यांनी प्रयत्न केला परंतु कसेबसे दहा ते पंधर शेअर्स मिळाले. त्या वेळी बेलापूर कंपनीचे शेअर्स मिळणे फार कठीण होते. परंतु जेव्हा करमसीभाईंना शेअर बाजार शेजारीच आहे हे कळले तेव्हा त्यांनी ब्रोकरांच्या मार्फत सरळच शेअर्स खरेदी केले. दोराबजी परमानंदजी नावाच्या ब्रोकरने शेअर्स खरेदी करून दिले. ते जेव्हा सुमारे एक हजार शेअर्स करमसीभाईंच्या नावावर ट्रान्सफर करायचे होते तेव्हा बेलापूर कंपनीतील एक अधिकारी, गव्हर्निंग कौन्सिलचे मेंबर सर जोसेफ के. यांचा करमसीभाईंशी घनिष्ठ संबंध असल्यामुळे त्यांनी त्यांना सल्ला दिला की, आपण मोठ्या प्रमाणावर शेअर्सची खरेदी केली, तथापि बरेच शेअर्स विकून टाकलेले बरे. करमसीभाईंनी त्यांच्या सल्ल्याप्रमाणे केले, कारण बेलापूर कंपनी, सर जोसेफ के. आणि इतर अधिकारी यांच्याविषयी त्यांच्या मनात मोठ्या आस्थेची भावना होती. त्यांच्यामुळेच आपल्याला हे चांगले दिवस लाभलेले आहेत व उद्याही लाभणार आहेत याची जाणीव करमसीभाईंना होती.

साखर विक्रीसाठी करमसीभाई सर्वत्र महिनोन्‌महिने हिंडत असत. प्रवासात ते कधीही हाटेलमध्ये उतरत नसत. एखाद्या व्यापाराकडे आपले सामान ठेवून ते बाजारात हिंडून साखरेची मागणी नांदवून घेत असत. काम उरकले म्हणजे स्टेशनवर जाऊन पुढची गाडी पकडत असत. अशा प्रकारे करमसीभाई दररोज तीन बाजारपेठा तरी उरकीत असत. एखाद्या गावी रात्रीचा मुक्काम करावाच लागला तर ते दुकानाच्या ओट्यावर सामान ठेवीत असत. प्रवासात त्यांचा आहार म्हणजे बरोबर घेतलेला भटोरा, सुकामेव्याची पाच-सहा

पॅकेटस्. बाजारातून हिंडतान एखादा मिठाईवाला जर मावा तयार करताना दिसला तर ते मावा विकत घेत असत किंवा गवळयाकडे जाऊन दूध, लोणी घेत असत. केळीही खरेदी करीत असत आणि भूक भागवित असत. यामुळे वेळ वाचत असे आणि उत्साहदेखील टिकून राहत असे.

साखर विक्रिसाठी करमीसभाई एकदा पुण्याला गेले होते. तिथे भवानी पेठेतील नारायणदास गोविंदराम नावाच्या मोठ्या व्यापाऱ्याशी त्यांची भेट झाली. ते खडीसाखरेची पिठीसाखर बनवत असत. करमसीभाईंली त्यांना जेव्हा बेलापूरच्या नंबर १ व २ पिठीसाखरेचे भाव सांगितले तेव्हा ते फारच रागावले आणि म्हणाले,'फारचा जास्ती भाव सांगत आहात. आम्हांला व्यापार कळत नाही असे का तुम्हाला वाटते? तुम्ही आम्हाला लुबाडण्यासाठी आला आहात काय?'... असे रागान ते बरेच बोलले. त्यांनी करमसीभाईंकडे मागणी नोंदविली नाही. पण पुढे कालांतराने तेच गृहस्थ करमसीभाईंचे फारच चांगले मित्र बनले. नंबर एकचे व्यापारी झाले. त्यांनी करमसीभाईंकडून हजारो पोती साखर खरेदी केली. करमसीभाईंच्या स्वभावातील सौजन्य आणि शांतपणा यामुळे हे घडून आले.

करमसीभाईं जेव्हा कामधंद्याविना रिकामे होते तेव्हा खटोडांशी त्यांची भागीदारी कशी जमली हे मागे सांगितलेच आहे. त्या वेळचीच एक आठवण सांगताना करमसीभाईं म्हणतात, "त्या वेळी बेलापूरात मी एकटाच होतो. माझी पत्नी बाळंतपणासाठी माहेरी कच्छला गेली होती. मी भागीदारीला होकार दिला आणि त्याच रात्री बेलापूर सोडले. मुबईला आलो आणि पुढे अडीच महिने गावोगाव साखर विक्रीसाठी फिरत राहीलो. या अवधीतच पौष महिन्यात मला मुलगा झाला होता. शांतिलालच्या जन्माची वार्ता देणारे पत्र मला जळगाव-वर्धा या प्रवासाच्या दरम्यान मिळाले होते."

साखर कारखान काढण्याचे ठरविले तेव्हा त्या संदर्भात कोणाला भेटावयाचे हे करमसीभाईंना ठाऊक नव्हते. पण मोरारजीभाई देसाई यांना ते ओळखत होते. म्हणून ते कारखानाच्या परवानगीसाठी त्यांच्याकडे गले. मोरारजी हे खरेखुर राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे ते संतापले आणि म्हणाले, 'तुम्ही शेतकऱ्यांनी गुलाम करायला निघाला आहात. ते आपल्या जमिनी तुम्हाला विकतात आणि तुम्ही श्रीमंत होता. मी त्या खात्याचा कुणी नाही म्हणून ठीक आहे. नाहीतर मी तुम्हाला मुळीच परवानगी दिली नसती.' परंतु त्यांनीच करमसीभाईंना त्या खात्याचे प्रमुख श्री. नुरी यांना भेटावयास सांगितले. श्री. नुरी यांनी करमसीभाईंना कारखान्यासाठी परवानगी दिली.

"१९४५ च्या सुमारास मध्य प्रदेशात भोपाळ येथे 'नर्मदा फार्मस्' या नावाने आम्ही शेती करण्यास सुरुवात केली. एक हजार एकर जमीन आम्ही लीजवर घेतली होती. त्या

जमिनीत गव्हाचे उत्पादन होत होते. त्या आमच्या जमिनीत गव्हाचे उत्तम वाढलेले आणि पोसलेले पीक पाहीले की मी त्याच्या मुळाभोवतालची माती हळूच साफ करीत असे. रोपाच्या मुळाशी असलेल्या एका गव्हाच्या दाण्याच्या रोपावर बाराशे गव्हाचे दाणे आलेले पाहून आश्चर्य वाटे!"

"१९४५ च्या सुमारास भोपाळजवळ बूंदी येथे आम्ही एक हजार एकर जमीन लीजने घेतली होती. गहू उत्पादनासाठी उत्तम अशी ती जमीन होती. आम्ही 'नर्मदा फार्मस्' या नावाने तिथे फार्म तयार केला. पुढे आम्ही तिचे शुगर टेक्नॉलॉजिस्टांची एक कॉन्फरन्स आयोजित केली होती. त्यासाठी जगातील साखर तंत्रज्ञाचे शिष्टमंडळ तिथे येणार होते. आम्ही त्यांना प्राचीन काळी हिंदुस्थानात साखर कशी तयार केली जात असे हे दाखवणार होतो. त्यासाठी बऱ्याच जुन्या वस्तु गोळा करावयाच्या होत्या. या संदर्भात जेव्हा आमची चर्चा चालली होती तेव्हा नर्मदा फार्मवरील शेती आधिकाऱ्यांनी सांगितले की, येथून दोन मैलांवर असलेल्या नदीच्या पलीकडे वीस ते तीस फूट उंचीच्या जुन्या पुराण्या मूर्ती इतस्तत: पडलेल्या आहेत. आम्ही तिथे गेलो. प्राचीन काळी ऊसातून रस कसा काढीत असत हे आम्ही तिथे पाहिले. तिथे आम्ही दगडी खुंट्याची पिठाची एक गिरणी पाहिली. दगडी खुंटा नव्हता पण तो बसवण्याचे भोक तयार केलेले दिसले. मी त्यात माझे बोट घातले आणि लगेच बाहेर काढले. त्याबरोबर एक उंदरीण बाहेर आली. ती भीतीने भेदरलेली दिसत होती. ती परत आपल्या घरात गेली आणि आपल्या दोन तीन लहानशा पिलांना घेऊन बाहेर आली, घाबरून पळून गेली. हे सगळे काही क्षणांतच घडले. आई आणि तिचे आपल्या पिलांवरील प्रेम हे त्या प्राण्यांतही दिसून आले."

एकदा गूळ तयार करण्याच्या उन्हाळी हंगामात गुळाचा लिलाव घेण्यासाठी करमसीभाई गेले होते. चैत्राचा महिना होता. गुळाच्या ढेपी नीट बांधून एका गोडाऊनमध्ये तीन रांगांत ठेवलेल्या होत्या. एकाएकी गोडाऊनला आग लागल्याच्या ओरडा ऐकू आला. करमसीभाई तिकडे गेले. जाताना त्यांचा पाय गोडाऊनमधील एका ड्रमवर पडला. आगीमुळे गूळ वितळत होता. करमसीभाईंचा पाय अशा एका गुळाच्या ढेपीवर पडला की तापलेला गूळ त्यांच्या पायावर उडाला. ते ताबडतोब बाहेर आले पण भाजलेल्या पायावर ताबडतोब इलाज करण्याची व्यवस्था तिथे नव्हती. भाजलेला पाय फुग्यासारखा फुगला. करमसीभाईंना त्यावर उपचार करण्यासाठी अहमदनगरला जावे लागले. तिथल्या हॉस्पिटलमध्ये ते पंधरा दिवस उपचार घेत होते.

करमसीभाईंच्या मनीमानसी वालचंद हिराचंद या विख्यात उद्योगपतींविषयी मोठ्या आदराची भावना वसत आहे. सोलापूरच्या एका कापडाच्या व्यापाऱ्याच्या तरूण मुलाने

आपल्या पारंपरिक धंद्यात न गुरफटता, वडिलांच्या इच्छेविरुद्ध आपल्या आवडीच्या सिव्हिल कन्स्ट्रक्शनच्या उद्योगात कसा प्रवेश मिळवला व अत्यंत कष्टाने, चिकाटीने व साहसाने तो कसा मोठा उद्योगपती बनला, याचे कौतुकास्पद आकर्षण करमसीभाईंच्या मनात सतत जागे होते. त्यांनी वालचंद हिराचंद यांच्या विकासकार्याचा परिचय करून देणारा एक छोटासा लेखच लिहिला आहे.

वालचंद हिराचंद यांनी रेल्वे लाइन्स बांधल्या. खंडाळयाच्या घाटातील बोगदे यशस्वीरित्या खोदले. शेती, ऊस उत्पादन आणि दोन साखर कारखाने उभारले. इतकेच नव्हे तर आणखी काही उद्योगांबरोबरच शिपिंग - जहाज बांधणी, विमान बांधणी आणि मोटारी तयार करण्याचे कारखानेही मोठ्या हिमतीने काढले. अशा प्रकारे भू, जल व आकाश या तिन्ही क्षेत्रांवर त्यांनी आपल्या उद्योजकतेचा अमीट असा ठसा उमटविलेला आहे. या त्यांच्या अलौकिक कर्तबगारीचा प्रभाव करमसीभाईंच्या मनावर तरूण वयातच पडला होता. त्यांची आणि वालचंदभाईंची ओळखच नव्हे तर दाट स्नेहसुद्धा होता. त्यांच्या कारखान्यातील साखर करमसीभाईं आपल्या व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर खरेदी करत असत.

अशा एखाद्या शून्यातून उद्योगांचे साम्राज्य उभारणाऱ्या यशस्वी उद्योजकाचे आकर्षण तशाच वृत्तीच्या तरुण करमसीभाईं वाटणे स्वाभाविकच आहे. केवळ नुसते आकर्षणच नव्हे तर अशा व्यक्तींकडून त्यांनी प्रेरणा व स्फूर्तीही मिळविली आहे आणि आपले व्यक्तिमत्त्व तशाच तऱ्हेच्या अविरत धडपडीमधून समृद्ध केले आहे.

❖

समीर वाडी

नात्युच्चशिखरो मेरूर्नातिनींचं रसातलम् ।
व्यवसायाद्वितीयनां नाप्यपारो महोदधि : ।।

उद्योगाची कास धरणाऱ्या मनुष्याच्या दृष्टीने मेरू पर्वताची शिखरे उत्तुंग नसतात, पृथ्वीचा तळ देखील फार खोल नसतो की महासागरही दुर्लंघ्य नसतो.

समीर वाडी

साकरवाडी आणि लक्ष्मीवाडी येथील कारखान्यांची शेतजमीन महाराष्ट्र राज्य लँड सीलींग कायाद्याखाली सरकारजमा होणार असल्याने व दिवसेंदिवस या दोन्ही कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस-पुरवठा कमी होणार असल्यामुळे दोन्ही कारखान्यांचे भवितव्य फार आशादायक नाही, याची जाणीव करमसीभाईं व शांतीभाई यांना झाल्यामुळे कारखान्यांचे स्थलांतर करण्याशिवाय पर्याय नाही, हे स्पष्ट झाले होते; व त्या दृष्टीने १९६६ सालापासूनच निरनिराळया राज्यांमध्ये नवीन कारखान्याच्या दृष्टीने किंवा स्थलांतरित कारखान्याच्या दृष्टीने सर्वेक्षणाचे काम आपल्या शेती-अधिकाऱ्यांमार्फत सुरु केले होते.

या कामासाठी साकरवाडीचे श्री. जे. एन. पटेल व लक्ष्मीवाडीचे श्री. मुरुगकर यांच्यावर ही जबाबदारी सोपविली होती. नव्या जागेचे सर्वेक्षण करत असताना मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक या राज्यांचा त्यांनी दौरा केला. मध्यप्रदेशमध्ये गोदावरी शुगर मिलच्या मालकीचा असलेला ४००० एकरांचा 'नर्मदा फार्म'चा विचारही या दृष्टीने करण्यात आला. त्याचबरोबर हुशंगाबाद जिल्ह्यातील नवीन होत असलेल्या तवा (Tawa) धरणाच्या लाभक्षेत्राचाही या दृष्टीने विचार केला. आंध्र प्रदेशात पोचमपाड धरण-लाभक्षेत्र, मंडिया जिल्ह्यात मड्डूरभागात, कर्नाटकमध्ये सुरुवातील रायपूर जिल्ह्यातील गंगावती-सिंहनूर तालुका, जिल्हा रायपूर या भागात तुंगभद्रा नदीचे नवीन कालवे तयार झाले होते, आणि ऊस व उसाचे क्षेत्र वाढण्याची खूपच क्षमता असल्याचे आढळून आले. सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांची एक मिटींग घेऊन कारखाना व ऊस-लागवडीसाठी जमीन घेण्याचेही ठरले.

त्याचवेळेस कोल्हापूरमधील एक साखर व्यापारी करमसीभाईंना मुंबईला भेटले आणि त्यांनी, कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात मुधोळ परिसद कारखाना काढण्यास योग्य आहे, असे सांगितले. साखर व्यापाराच्या निमित्ताने देशभरच्या व्यापाऱ्यांशी करमसीभाईंचा सतत संपर्क होताच. याशिवाय प्रत्येक भागातील साखर व गुळाची प्रत कशा प्रकारची आहे, याची

त्यांनी जाणीव आहे.

मुधोळ परिसर हा कोल्हापूर जिल्ह्याला लागून असल्याने व कोल्हापूर भागात देशातील उत्तम प्रतींची साखर व गूळ तयार होत असल्याने साहजिकच मुधोळ भागातही त्याच दर्जाचा गूळ किंवा साखर तयार होण शक्य आहे, असे त्यांच्या चाणाक्ष दृष्टीला वाटले.

मुधोळ भागात कारखाना काढण्याचे ठरल्यानंतर १९६८ त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा यांच्या समवेत एक मिटींग झाली व त्यावेळी लक्ष्मीवाडी येथील कारखाना कर्नाटकात स्थलांतरित करण्याच्या सूचनेचे त्यांनी स्वागत केले. आणि वरील प्रकल्पासाठी कर्नाटक राज्या शासनातर्फे संपूर्ण सहकार्य देण्याचे जाहीर केले.

१९६६-६७ साली साकरवाडी व लक्ष्मीवाडी येथील ऊसमळे शासनाने ताब्यात घेतले. त्याच सुमारास कनार्टकमध्ये मुधोळ तालक्यात करमसीभाईंनी ऊसबेणे मळयासाठी जमीन खरेदी केली. महाराष्ट्रामध्ये साखर-कारखनाच्या विकासाचा मुख्य कणा कारखान्यांच्या मालकीचे ऊसमळे होते. ऊसमळयांद्वारे उसाचे एकरी जास्तीत जास्त उत्पादन वाढवून त्या तंत्रदानाचा लाभ आसपासच्या शेतकऱ्यांना करून दिला जात होता. अशाच तऱ्हेचा प्रयोग पुन्हा एकदा कर्नाटक राज्यात करण्याचा करमसीभाईंचा निर्धार होता. त्या दृष्टीने कृष्णाघटप्रभा खोऱ्यात पडित असलेली जमीन खंडाने वा खरेदीने घेण्याच्या सूचना आपल्या अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या.

१९७० साली मुधोळ (विजापूर जिल्हा) व गोकाक (बेळगाव जिल्हा) यांच्या सीमेवर कारखाना उभारण्याचे ठरविले. सुरूवातीला लक्ष्मीवाडी कारखान्याचे स्थलांतर करण्याचे ठरले होते, पण नंतर महाराष्ट्र शासनाने स्थलांतरास नकार दिल्याने नवीनच कारखाना काढण्याचे करमसीभाईं व शांतिलालजींनी ठरविले. १९७० साली कारखानाच्या पायाभरणी कार्यक्रम झाला. त्यांप्रसंगी केलेल्या भाषणात शांतिलालजी म्हणाले होते की, 'समीरवाडीचा कारखाना हा केवळ उसाची साखर निर्माण करणारा होणार नसून, ऊस व साखर यांच्या उत्पादनतंत्रामध्ये संशोधनात्मक बदल घडवून आणणारे व उत्पादन वाढविणारे एक अत्याधुनिक केंद्र होईल आणि हे केंद्र जगाच्या नकाशावर उल्लेखिल जाईल, असे बनविण्याचे ध्येय आमच्यासमोर आहे.'

वरील उद्देश साध्य होण्यासाठी त्यांनी कारखानाच्या उभारणीबरोबरच ऊस-संशाधन संस्थाही स्थापन केली. या संस्थेचे नामकरण 'कर्नाटक इन्स्टिट्यूट ऑफ ॲप्लाईड ॲग्रिकल्चरल रिसर्च (K.I.A.A.R.) असे करून 'लखनौ शुगरकेन रिसर्च इन्स्टिट्यूट'चे डायरेक्टर श्री. आर. आर. पांजे यांची या संस्थेचे डायरेक्टर म्हणून नेमणूक केली.

श्री. पांजे हे कुशाग्र बुद्धीचे, मुलभूत संशाधन करणारे शास्त्रज्ञ होते. शांतिलाल सोमैया यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यात या शास्त्रज्ञाचा मोलाचा वाटा आहे.

'K.I.A.A.R.' या संस्थेने कारखानाच्या कार्यक्षेत्राचे सर्वेक्षण करून प्रचलित असलेल्या उसाच्या जातींचा अभ्यास केला व निरनिराळया ठिकाणी प्रात्यक्षिक केंद्रे स्थापन केली. शेतकऱ्यांशी सतत संपर्क साधून नवीन तंत्रज्ञान त्यांना समजावून सांगण्यासाठी शेतकऱ्यांची शिबिरे, ग्रुप मिटींग्ज, माहितीपुस्तिका व आवश्यक तेथे आर्थिक सहाय्य देऊन 'K.I.A.A.R.'न सुरुवातीला श्री. पांजे यांच्या नेतृत्वाखाली व नंतर डॉ. नरसिंहन, श्री. मेनन, श्री. एच. एल. कुलकर्णी अशा थोर शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने प्रगती केली. या संस्थेने समीरवाडीच्या ऊस-क्षेत्रात CO GTI, CO-6415 या जाती संशोधित करून त्यांचा प्रसार केला, आणि त्यामुळे सुरुवातीला १० टक्के साखरेचा उतारा असलेला कारखाना आता साडेबारा-तेरा टक्के उताऱ्यापर्यंत गेला आहे. याचे संपूर्ण श्रेय 'K.I.A.A.R.' या संस्थेने परिश्रमपूर्वक केलेल्या संशोधनाला व सातत्याने त्याचा पाठपुरावा करणाऱ्या शेतीविभागातील विस्तार अधिकारी व कर्मचारी यांना आहे.

समीरवाडी कारखान्याने केवळ ऊस व साखर उत्पादन एवढेच ध्येय न ठेवता त्या परिसरातील शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर ग्रामीण विकास-कार्यक्रमही आखले. ऊस-पुरवठा करणाऱ्या खेड्यांना त्यांनी पुरविलेल्या उसाच्या प्रमाणात गावातील सामूहिक योजनाही आखली. ज्या गावांमध्ये लोकांनी शाळा, लायब्ररी, व्यायामशाळा, सामूहिक पाणीपुरवठ्याच्या योजना, असे उपक्रम हाती घेतले व ज्यांत स्थानिक लोकांनी निम्मा खर्च करण्याची तयारी दाखविली, अशा गावांना आर्थिक मदत केलेली आहे. अशा तऱ्हेने अनेक गावांमध्ये अशा स्वरुपाची काम झालेली आहेत. याशिवाय ग्रामपातळीवरच्या भेट-योजना (मिटींग्ज) तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शेतकऱ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने शेजारील प्रांतांत दौरे आखणे, असेही कार्यक्रम निरंतर राबविले जातात.

उसाचा पुरवठा कारखान्याच्या वाढणाऱ्या क्षमतेबरोबर व्हावा म्हणून पाणीपुरवठ्याची साधने वाढविण्याच्या दृष्टीने उपसा-जलसिंचन योजनेला, मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना मदत केली आणि यामुळेच १९७२ साली केवळ १०,००० एकर उसाचे क्षेत्र असलेल्या कार्यक्षेत्रात आज सुमारे ६०,००० एकर उसाचे क्षेत्र वाढलेले आहे. याचे मुख्य कारण सातत्याने ऊस-विकास-कार्यक्रम राबविण्याचा आग्रह डॉ. शांतीलाल सोमैया यांनी ठेवला. 'K.I.A.A.R.' आणि शेती-खात्यातील विस्तार-विभागाच्या संयुक्त सहकार्याने हे साध्य झाले. याशिवाय ऊस-वाहतुकीसाठी व शेतकऱ्यांच्या जमिनीची चांगल्या प्रकारे मशागत होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टरपुरवठा योजना आखली व अल्पभू-धारकांना रबर-टायर बेलगाड्या यासाठी कर्जपुरवठा करण्यासाठीही योजना आखली. या सर्वांचा परिणाम म्हणून समीरवाडी कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर ही

वाहतुकीची व मशागतीची साधने उपलब्ध झालेली आहेत.

'K.I.A.A.R.' ने केलेल्या कामाची राष्ट्रीय पातळीवरील कोईमतूरसारख्या ऊस संशोधन संस्थेने दखल घेऊन समीरवाडी येथे विभागीय ऊस चाचणी केंद्र स्थापण्याची परवानगी दिली. यामुळे अनेक ऊसाच्या जाती चाचणीसाठी दरवर्षी कोईमतूरहून समीरवाडी येथे आणल्या जातात आणि या जातींचा ३ वर्षे सतत अभ्यास करून त्याचा अहवाल कोईमतूर येथे पाठविला जातो. अशा पद्धतीमुळे आज कित्येक उसाच्या नव्या जाती 'K.I.A.A.R.' च्या ऊस-मळयावर विकसित झालेल्या आहेत. याशिवाय 'K.I.A.A.R.' ने 'भाभा-ॲटोमिक रिसर्च सेंटर्स'शी संपर्क साधून त्यांच्या संयूक्त सहकार्याने ऊस बेण्यांवर या किरणांची प्रक्रिया करुन नवीन जाती विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा विविध स्वरूपात समीरवाडी येथे चाललेल्या विकास कामाची दखल घेऊन राज्यपातळीवर अनेक पुरस्कार या संस्थला मिळाले. याशिवाय डॉ. शांतिलालज सोमैया यांच्यासारख्या उद्योगपतीच्या मार्गदर्शनाखाली हे काम कर्नाटकात चाललेले आहे हे पाहून धारवाडच्या 'कर्नाटक युनिव्हर्सिटी'ने डॉ. शांतिलाल सोमैया यांना 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' ही पदवी बहाल केली!

समीरवाडी कारखान्याच्या विकास व विस्तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर आज झालेला असताना १९७३ साली अपघाताने घडलेली दुर्देवी घटना अद्यापही अनेकांच्या मनात ताजी आहे. केंद्र सरकारने भाषावार प्रांतरचना करुन, मातृभाषेचा विकास व्हावा, म्हणून, अनेक भाषिक राज्ये निर्माण केली असली तरी दोन प्रांतांच्या सीमेवर बसलेल्या गावांची दु:खे अद्याप संपलेली नाहीत. बेळगाव जिल्हा हे त्याचे बोलके उदाहरण आहे. बेळगाव शहर व आसपासच्या भागात मराठी भाषिक बहुसंख्य आहेत आणि त्यांना महाराष्ट्रात सामील व्हावयाचे आहे. कर्नाटक जनतेचा व राज्य सरकारचा या गोष्टीला विरोध आहे. त्यामुळे नेहमीच या भागात तणावपूर्व परिस्थिती निर्माण होत असते. १९७३ साली डिसेंबरमध्य अशाच प्रकारचा वाद सीमाभागात निर्माण झाला व त्याचे रुपांतर हिंसेत झाले. समीरवाडी कारखान्यामध्ये मराठी, कर्नाटकी, उत्तर प्रदेशी, बिहारी - असे अनेक भाषिक अधिकारी व कर्मचारी होते. सीमावादाने निर्माण झालेल्या तणावामुळे व काही विघ्नसंतोषी लोकांच्या भडकविण्यामुळे समीरवाडी हे असंतोषाचे केंद्र बनले. १३ डिसेंबर रोजी बेळगाव, अधणी, खबकी, मुधोळ या भागातील हिंसाचाराबरोबरच समीरवाडीचाही मोठ्या प्रमाणात प्रक्षुब्ध जमावाने नासधूस केली. कारखानाच्या हंगाम चालू असतानाच ही घटना घडली. झालेल्या घटनेमुळे सगळेच हतबुद्ध झाले. कारखानाच्या सीमावादामध्ये काहीही संबंध नसताना हे का घडले, या प्रश्नाचे उत्तर अद्यापही मिळालेले नाही. सर्व अधिकारी व कर्मचारीवर्ग कारखान्याची नासधूस झाल्यामुळे व मग तो बंद पडल्यामुळे चिंतेत होते. अशा परिस्थितीत

करमसीभाईंनी दाखविलेले धैर्य अतुलनीय आहे. डॉ. शांतिलालजी सोमैया कुशलातापूर्वक परिस्थितीचा आढावा घेतला. पुनर्रचनेची पावले तत्परतेने उचलून सुमारे एक महिन्याच्या कालावधीत काखाना पूर्ववत चालू करून कर्मचाऱ्यांचा व शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला! त्यानंतर समीरवाडीने कधीही मागे वळून पाहिलेले नाही.

आज समीरवाडी कारखाना १२ लाख टन उसाचे गाळप करतो आहे आणि साखर उत्पादनमध्ये कर्नाटकात त्याने प्रथमस्थान पटकाविलेले आहे. सुरुवातीच्या अडीच हजार टन गाळप क्षमतेच्या कारखान्याची आज साडेसहा हजार टन ऊस-गाळप क्षमता झालेली आहे. सध्या १० हजार टन प्रतिदिनी गाळप क्षमतेची विस्तार-योजना आखण्याची तयारी झाली असून, त्याचबरोबर वीजनिर्मितीचीही योजना आखली जात आहे. याशिवाय डिस्टलरीतील सांडपाण्यातून 'मिथेन वायु' तयार करुन त्याचा पर्यायी ऊर्जेसाठी वापर केला जात आहे. त्यानंतर निघणाऱ्या सांडपाण्यातून, आधुनिक तंत्रज्ञान वापरुन, उत्तम प्रतीचे सेंद्रीय खत तयार करुन शेतकऱ्यांना पुरविले जाते. याशिवाय शेतकऱ्यांना जोडधंद्यातून उत्पन्न मिळावे म्हणून दुग्ध-व्यवसाय, सुगंधी वनस्पतींची लागवड व ग्रामीण बँक अशा योजनाही करमसीभाईंचे नातू श्री. समीर सोमैया, ज्यांच्या नावाने 'समीरवाडी' स्थापन केली आहे, यांनी नियोजित केलेल्या आहेत.

महाराष्ट्रातील साकरवाडी व लक्ष्मीवाडी साखर कारखान्याने बंद होण्याच्या मार्गावर असतानाच कर्नाटकमध्ये समीरवाडी येथे मोठ्या क्षमतेचा कारखाना काढून श्री. करमसीभाईंनी मोठीच योजकता दाखविली. सुरूवातीच्या सीमावादाच्या घटनेत सुमारे दीड कोटी रुपयांचे नुकसान झालेले असताना, डगमगून न जाता, चिकाटीने संशोधन व विस्तार-योजनेतून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून, गेल्या २५ वर्षात कारखान्याने बराच पल्ला गाठलेला आहे. १९४० साली गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर लावलेले रोप स्थलांतरित करून आता घटप्रभा-कृष्णा खोऱ्यात एका मोठ्या वटवुक्षाचा आकार समीरवाडीच्या स्वरुपात घेऊ पाहात आहे.

❖

कर्मचारी संबंध



अलोह : खलु संयमनपाश : सौजन्यमभिजातानाम् ।

अभिजात कुळात जन्मलेले दुसऱ्यांना प्रेमरज्जूने बांधतात -
लोखंडाच्या साखळीने नव्हे.

कर्मचारी संबंध

गोदावरी मिल्सचे साकरवाडी व लक्ष्मीवाडी येथे दोन साखर कारखाने सुरु झाले. कारखान्यांत व कारखान्यांच्या शेतीवर मोठ्या संख्येने कर्मचारी वर्ग काम करु लागला. या कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी आपली संघटना बांधली.

या युनियनचे नेतृत्त्व महाराष्ट्रातील साखर-कामगारांचे एक प्रसिद्ध नेते श्री. किशोर पवार यांच्याकडे प्रथमपासूनच होते. किशोर पवार हे स्वातंत्र्य चळवळ, राष्ट्र सेवा दल, समाजवादी पक्ष व कामगार संघटना यांतूनच वाढले व घडले. त्यांनी युनियन स्थापना केली. आपल्या कामगार संघटनेच्या प्रारंभीची, वाढीची, संघर्षाची व नंतरच्या आपुलकीच्या जिव्हाळ्याची हकीकत त्यांनी या प्रकरणात सांगितली आहे. किशोर पवार सांगतात :

"१९३९-४० साली माझे थोरले बंधू रामसिंग पवार एका कॉन्ट्रॅक्टरबरोबर साकरवाडीला कारखान्यांच्या उभारणीच्या कामासाठी आले. मी त्यांना दादा म्हणत असे. दादांचे कामातील कौशल्य पाहून करमसीभाई त्यांना कॉन्ट्रॅक्टरकडून आपल्या कंपनीतच घेऊन टाकले. मी त्या वेळी औरंगाबादला शिकत होतो. एकदा दादांना भेटायला म्हणून साकरवाडीला गेलो होतो. काही दिवस तेथेच राहिलो. कारखाना सुरू झाला होता.

मी शिकत असतानाच हैद्राबाद संस्थानच्या विरुद्ध चाललेल्या तत्कालीन लढ्याशी माझा संबंध विद्यार्थी दशेतच आला होता. चळवळ दडपून टाकण्यासाठी निजामाने धरपकड सुरू केली होती. म्हणून आम्ही काही विद्यार्थी पळून पंढरपूरला गेलो होतो. तिथे देगलूरचा पूर्वपरिचय असल्यामुळे गुंडामहाराजांच्या मठात वर्षभर राहिलो. तिथूनच मी साकरवाडीला दादांकडे गेलो होतो.

नगर जिल्ह्यात त्या आधीच हरेगावला आणि टिळकनगरला साखरेचे कारखाने सुरु झाले होते. त्या वेळी तिथे कम्युनिस्ट पक्षाने कामगारांच्या संघटना बांधण्यास सुरुवात केली होती. विनायकराव भुस्कुटे हे काम करीत असतात. ते ढोले आणि ढुमणे यांच्याबरोबर युनियनचे काम करीत असत. साकरवाडीलाही त्यांनी युनियन सुरू केली होती. रावसाहेब पटवर्धन हे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. शेतकरी व कामगार यांना काँग्रसमध्ये

आणण्याची खटपट ते करीत होते. त्यामुळे त्यांचे हरेगाव, टिळकनगर, साकरवाडी येथे येण-जाणे असे. माझा स्वातंत्र्याच्या चळवळीशी संपर्क असल्यामुळे त्याच वेळी रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन आणि नगरचेच डॉ. जोग यांचा परिचय झाला. राष्ट्र सेवादलाचीही सुरूवात त्याच वेळी झाली होती. आपण काहीतरी करावे असे मलाही वाटत होते. त्यातूनच त्यांनी मला साकरवाडीला बंधंच्याकडे राहून सेवादलाचे काम करण्यास सांगितले. माझ्या नोकरीसाठीही रावसाहेबांनी करमसीभाईंना सांगितले. काँग्रेसच्या चळवळीमुळे रावसाहेब बेलापूरला त्यांच्याकडे जात असत. करमसीभाईंची व रावसाहेबांची चांगली ओळख होती. त्यामुळे मला साकरवाडीच्या कारखान्यात पॅन-बॉय म्हणून करमसीभाईंना नोकरी दिली. त्या वेळी मी एकोणीस-वीस वर्षांचा होतो.

कारखान्यातील कामामुळे व सेवादलाच्याही कामामुळे त्या भागात माझ्या ओळखी वाढत गेल्या. बऱ्याच ठिकाणी आम्ही सेवादलाच्या शाखा सुरू केल्या. मग पुढे कामगारांची युनियन काढण्याचाही प्रयत्न सुरु केला. दरम्यान 'चले जाव' ची चळवळ सुरू झाली. साकरवाडीला कारखान्यात बहुतेक ऑफिसर्स हे गुजराती होते व गुजरातचे गांधीजी, वल्लभभाई यांच्यामुळे ते स्वातंत्र्यप्रेमीही होते. त्यांचे आमचे चांगले जमले. चळवळीत रावसाहेब तुरुंगात गेले व अच्युतराव भूमिगत राहिले. संगमनेरचे समाजवादी कार्यकर्ते भास्करराव दुर्वे हेही भूमिगत राहिले. अच्युतराव त्यांच्याबरोबर या भागात येत असत. त्यामुळे माझा त्यांच्याशीही परिचय झाला. हरेगावला शारंगधर पवार, कोपरगावला मामा गवारे, साकरवाडीला मी, अशी आम्ही मंडळी काम करीत होतो. कम्युनिस्टांशी लढत होतो. नगर जिल्ह्यात कम्युनिस्टांचे बरेच काम होते. साकरवाडीला ढोले-ढुमणे यांच्याबरोबर काही दिवस अमरशेखही युनियनच्या कामासाठी येऊन राहिले होते. करमसीभाईं हे कॉंग्रेसवाले आणि कम्युनिस्टांच्या विरोधात होते आणि म्हणून आमच्या दादांच्या सहकार्याने तिथे कामगार युनियन सुरू करण्याच्या आमच्या प्रयत्नाला करमसीभाईंनी पाठिंबा दिला. मालकांनीच पाठिंबा दिल्यामुळे अधिकारी व कामगार यांनीही पाठिंबा दिला.

गंगाधर ओगले हे सुटून आल्यानंतर हरेगाव व टिळकनगर येथील युनियनचे काम पाहू लागले होते. त्यांचा माझा संबंध आला आणि मी चांगदेव, साकरवाडी व लक्ष्मीवाडी येथील युनियनचे काम पाहू लागलो. करमसीभाईंचा दुसरा साखर कारखाना तोवर लक्ष्मीवाडीला सुरु झाला होता व दादांची बदली तिथे केली होती. त्यामुळे लक्ष्मीवाडीलाही युनियनचे काम वाढविणे सुकर झाले. अल्पावधीतच आमचे काम वाढले आणि वर्षभरातच आम्ही कम्युनिस्टांना तिथून हुसकावून लावले.

युनियन बनवल्यानंतर मग कामगारांचे प्रश्न, मागण्या हे आलेच. त्या काळी मजुरीमध्ये बाईला अडीच आणे आणि गड्याला पाच आणे अशी मजुरी मिळत असे. आम्ही हे मजुरीचे दर वाढवून मिळावेत, तसेच रेशनचे दुकान मिळावे अशा काही मागण्या

कारखन्याकडे केल्या. आम्ही तसे नवीनच, तेव्हा वाटाघाटी कशा जमाव्यात? आम्हाला तर शेठजींनी दाद दिलीच नाही. म्हणून मग डॉ. जोग आणि रावसाहेब पटवर्धन यांना बोलावून घेतले. रावसाहेब एका गाडीने दुपारी एक-दीड वाजता पोहोचले आणि तेव्हापासून संध्याकाळपर्यंत नुसत्या निव्वळ वाटाघाटीच सुरु ठेवल्या. हिशेब, गाणित - अशा नाना प्रकारांनी शेठजींनी वाटाघाटी चालवल्या. त्यात रेशनिंगचे दुकान, पिण्याचे पाणी वगैरे मागण्या मान्य केल्या. पण पगारवाढ फक्त अर्धा आणाच मान्य केली. अर्ध्या आण्याच्या वर वाढ द्यायला शेठजी मुळीच तयार नव्हते. अर्धा आणा जरी वाढवला तरी शेतीवरील व कारखन्यातील मोठ्या संख्येच्या मजुरांच्या मानाने किती खर्च वाढेल याचा हिशेब त्यांनी मांडला. आम्हांला कधी असला हिशेब ठाऊकच नव्हता. मागणी करायची. यावरून मग वाटाघाटी फिसकटल्या. रावसाहेब परत गेले ते नाराज होऊनच.

"आमचा विचार असा की, शेठजी म्हणतात तशी अर्धा आणा तर अर्धा आणा वाढ घ्यावी. कारण कामगारांना काहीतरी मिळवून दिले पाहिजे ना! नाहीतर कम्युनिस्टांची युनियन द्यायची भीती, म्हणून आम्ही वाटाघाटींसाठी पुन्हा रावसाहेबांकडे गेलो. रावसाहेब म्हणाले, 'काय वाटेल ते सांग. पण करमसीभाईंनी वाटाघाटी करण्यास बोलावू नको. तू तुझ्या भाषेतच त्यांना बरोबर पटवशील.'

"पंधरा दिवसांनी परत एक भेट झाली. तोवर वातावरण जरा तापवलं होतं. त्या बैठकीत शेठजींनी आमची अर्धा आण्याची मागणी मान्य केली. त्यानुसार स्त्री कामगाराला तीन आणे आणि पुरुषांना सहा आणे अशी मागणी मान्य झाली. अशी आमच्या युनियनची सुरुवात झाली. त्या वेळी बहुतेक मजूर हे रोजंदारीवरच होते. कारखान्यात थोडेच पगारी अधिकारी होते. त्यांनाही दरमहा पस्तीस ते चाळीस रुपये असा पगार असे. पुढे १९४५ च्या सुमारास हुद्देवारीनुसार त्यांनाही शंभर रुपयांपर्यंत पगारवाढ झाली. अशा रीतीने आमची संघटनाही वाढत गेली. लक्ष्मीवाडीचीही युनियन झाली होती. युनियन वाढली तशी भांडणेही वाढली. कारण हरेगाव, टिळकनगर येथील कामगारांना तेथील युनियनकडून पगारवाढ मिळायची. कारण ते कारखाने जुने होते. हा गोदावरी कारखाना नवा होता. पण त्या कामगारांच्या पगारवाढीचा परिणाम आमच्या कामगारांवर व्हायचा. मग आम्हांलाही पगारवाढीसाठी मागणी करावी लागायची.

"रावसाहेबांकडे त्यांच्या सल्ल्यासाठी अधूनमधून मी जात असे. त्याच सुमारास रावसाहेबांचा नगरला मोठा सत्कार करून त्यांना चाळीस हजारांची थैली देण्यात आली. होती. ती त्यांनी नगरचेच काँग्रेस कार्यकर्ते काकासाहेब गरुड यांच्याकडे सुपूर्द केली होती. त्या पैशातून सर्ववेळ कार्यकर्त्यांना प्रत्येकी मासिक वीस रूपये मानधन म्हणून देण्याची योजना होती. आमचे युनियनचे काम वाढले होते. कारखान्यातली नोकरी करुन त्याकडे लक्ष देणे मला अवघड झाले होते. म्हणून रावसाहेब मला म्हणाले, 'तू आत नोकरी सोड

आणि तालुकाभर काम कर.'

"मग मी नोकरी सोडली. त्या दरम्यान एक घटनाही घडली. कोपरगावला एक मोठे शेतकी प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यात त्या काळातील रावबहादूर, दिवाणबहादूर, गिरमे, बोरावके असे लोक प्रामुख्याने होते. मुंबईचे गव्हर्नर यायचे होते. त्या प्रदर्शनात कन्फेक्शनरीचा एक स्टॉल उघडण्याची जबाबदारी शेठजींनी माझ्यावर सोपवली होती. कान्हेगावला त्यांचा एक कन्फेक्शनरी बनवण्याचा कारखाना होती. शेठजी मला म्हणाले, 'तू बोलका आहेस. तूच जायला पाहिजे' त्यानुसार मी स्टॉल मांडला. तीन दिवसांनी प्रदर्शन संपले. मी त्यांच्या मालाचा प्रचार चांगला केला होता. पण विक्री कमी झाली होती. त्यामुळे बराच माल शिल्लक होता. तो मी वाटून टाकला. तिथून परत आल्यावर विक्रीचे पैसे स्टोअरकीपर जाजू यांच्याकडे देऊन टाकले. शेठजींनी चौकशी केली, 'स्टॉलला कुणी-कुणी भेटी दिल्या. किती माल खपला, किती शिल्लक राहिला, वगैरे.' मी सगळी हकीकत सांगून टाकली. शिल्लक माल मी वाटून टाकला हे सांगितल्यावर त्यांनी मला विचारले, 'हा शिल्लक माल तू कुणाला वाटून टाकला?' कशासाठी वाटून टाकला?' मी म्हणालो, 'आपल्या मालाचा प्रचार व्हावा म्हणून तो वाटून टाकला.' त्यावर शेठजी म्हणाले, 'हेतू चांगला आहे. पण न विचारता असे करणे बरोबर नाही.' मी म्हणालो, 'तुम्हांला जर माझे हे करणे पसंत नसेल, तर मी नोकरी सोडतो.'

"आणि मी नोकरी सोडून दिली. त्यांनी मग मला बोलावून घेतले आणि म्हणाले, 'मी रागावलो नाही, पण व्यवहार सांगितला. व्यवहारामध्ये वाटून टाकून चालत नाही. किती वाटायचं आणि विक्रि किती करायची, त्यातील नफ्यातोट्याचं गणित जमलं पाहिजे. नफा वाटून टाकला असतास तरी चाललं असतं. पण मुद्दल-मालही वाटून टाकणं बरोबर नाही. व्यवहार पहावा लागतो'

"शेठजींनी मला समजावले. त्यांचे ते खरेही होते. पण मी त्यांना सांगितले की, 'मला आता नोकरी करावीशी वाटत नाही.' आणि अशा रीतीने मी नोकरी सोडली.

"नोकरी सोडल्यावर युनियनच्या, सेवादलाच्या आणि काँग्रेस पक्षाच्या कामाला मी जोराने चालना दिली. युनियन वाढली, बळकट झाली. तशा आमच्या मागण्याही वाढू लागल्या आणि त्यांतून संघर्षही उद्‌भवू लागले. आमच्या मागण्या मान्य करण्याचयाबाबत शेठजी फार कडक, कठोर, कंजूष असत. पण असे असले तरी ते तुटेपर्यंत टोकाला जात नसत. काही तरी मग त्यातल्या त्यात समझोता घडवून आणीत असत. त्यामुळे आमची त्यांची खूप भांडणे व तणातणी झाली तरी आमच्याकडे इतर कारखान्यांप्रमाणे संप कधीच झाला नाही. हे त्यांचे वैशिष्टय होते.

"असे असले तरी शेठजींबद्दल आमच्या मनात एक प्रेमादराची भावनाही होती. कारण

ते देशभक्त होते. स्वातंत्र्यलढ्याढी संबंधित होते. अच्युतराव, अरुणा असफलअली, उषा मेहता या क्रांतीकारकांना त्यांनी त्या काळात आपल्याकडे आसरा दिला होता. ही गोष्ट फार मोठ्या धाडसाची व जबाबदारीचीही होती, ती त्यांनी केली होती. म्हणून आम्हांला त्यांच्याबद्दल मोठी आपुलीकीही वाटत होती. युनियनच्या कामात तणातणी तर व्हायचीच. पण जमून जायचे. एकदा दुसऱ्या काही कामासाठी रावसाहेब आले होते. करमसीभाईंची त्यांची जुनी ओळख, युनियनबद्दल बोलणे निघाले तेव्हा रावसाहेबांनी शेठजींनी विचारले, 'तुमचे यांचे काय जमते?' शेठजींनी सांगितले, 'त्यांची-माझी पध्दत अशी आहे की आधी तूप मागायचे. तूप मिळाल्यावर म्हणायचे नुसते तूप कसे खात येईल? खिचडी पाहजे. मग तूप आणि खिचडी दोन्हीही घ्यायचे. अशी यांची पध्दत आहे. ती मला आता ठाऊक झाली आहे. तेव्हा आमचे आता मून जाते.

"तिथे भरतवाडीला एक मेहता म्हणून शेतकी अधिकारी होते. ते सेवादलाचे होते. त्यांनी सगळ्या अधिकाऱ्यांची एक असोसिएशन बनविली. तेव्हा शेठजींनी त्यांना काढून टाकले. या प्रश्नावर आम्ही वातावरण तापवले. कर्मचारी आणि अधिकारी एक झाले, हे पाहतचाच शेठजींनी मेहतांना परत कामावर घेतले. असे ते मोठे धोरणी आहेत.

"पुढे काँग्रेसमधून समाजवादी बाहेर पडले तेव्हा आमचयामध्ये नव्या स्वरुपात संघर्ष उभा राहिला. शेठजी कट्टर काँग्रेसवादी तर आम्ही समाजवादी. समाजवाद्यांना वाढू द्यायचे नाही ही त्यांची भूमिका त्याच सुमारास ग्रामपंचायातीची पहिली निवडणूक आली होती. कारखाना वारी गावच्या गावच्या ग्रामपंचायतीत होता. आम्ही ही निवडणूक लढविण्याचे ठरवले. शेठजींनीही कॉग्रेसचे उमेदवार उभे केले. सगळ्यांना सांगितले की समजावाद्यांना निवडून द्यायचे नाही. सर्वांवर तसे दडपणच आणले. शेठजींनी पी. पी. शहा नावाचे एक चीफ केमिस्ट, राजाज्ञे नावचे एक डेप्युटी केमिस्ट, नंतर बबुलाल संचेती आणि एक टिळकनगरहून आलेला फिटर असे चार काँग्रेसचे उमेदवार त्यांनी आमच्या विरोधात उभे केले. इकडे मी, आमचे जुने मित्र राजाभाऊ टांकसाळे, कर्णिक, आणखी एक असे आम्ही उभे राहिलो होतो, तो आमचा वॉर्ड नं. ४ होता. निवडणुकीचा प्रचार जोरात चालू होता. चार नंबरच्या वॉर्डमध्ये आमचा सगळा कारखाना होता. शेठजी निवडणुकीत जातीने लक्ष घालत होते. निवडणूक अटीतटीची झाली. पण निकाला लागला तेव्हा बाबुलाल संचेतीला आमच्या विरोधात चार मते पडली. पी. पी. शहा व राजज्ञो यांना पस्तीस मते पडली आणि फिटरला दहा - बारा मते मिळाली. ते सगळे पराभूत झाले आणि आम्हांला अडीचशे पावणे - तीनशेंच्यावर मते मिळाली. आम्ही निवडणूक जिंकली. मग आणखीनच जोर वाढला.

"आमच्या युनियनचे बळ जसजसे वाढू लागले तसतसा कारखान्याच्या व्यवस्थापनाकडून आम्हांला होणारा विरोधही वाढू लागला. तोवर कारखान्यात बाहेरुन काही अधिकारी आलेले होते. त्यांनीही विरोधाची धार वाढवायला सुरुवात केली.

युनियनचे सभासद कोण कोण आहेत, युनियनचे काम कोण कोण करतात अशा चौकशा त्यांनी सुरु केल्या. या सुमारास शेठजी मुंबईच्या ऑफिसचे काम वाढल्यामुळे कारखान्याच्या भागात पूर्वीच्या मानाने कमी वेळा येऊ लागले होते व अधिकाऱ्यांची कारकीर्द सुरु झाली होती.

"ह्या अधिकाऱ्यांनी आमच्या युनियनला विरोध करण्याचे धोरण पत्करल्यामुळे ते आमच्या सभांनाही विरोध करु लागले. युनियनच्या सभा होऊच द्यायच्या नाहीत. त्यांवर बंदी घालायची, असले उपद्व्याप त्यांनी सुरु केले. परंतु आम्ही त्यांची पर्वा न करता गांधी मैदानावर सभा भरवीत असू. कारखान्यातल्या त्या मैदानाला 'गांधी मैदान' असे नाव आम्हीच दिले होते. त्यामुळे गांधी मैदानावरील सभेला वरोध करतानाही त्या अधिकाऱ्यांची मोठी पंचाईत होत असे. मग ते गेट बंद करुन घेत असते. वाड्यावाड्यांमधल्या आमच्या सभासदांना तो येता येऊ नये असा बंदोबस्त करीत असत. आमच्या युनियनचे सभासद संख्येने तेच अधक असत. ते विरोध न जुमानता येत असत. कारखान्यातले लोक अधिकाऱ्यांच्या व शेठजींच्याही दबावामुळे कमी प्रमाणात येत असत. वाड्यांवरचे गुजराती अधिकारी सुध्दा आमच्या बरोबर असायचे. त्यांना वाड्यांवर आणण्यासाठी घोडे असायचे. मोटारी वगैरे वहाने नव्हती. शेठजीसुध्दा टांग्यातून फिरत असत. श्रीरामपूरपर्यंत टांग्यातून जात - येत असत. आमच्या सभांना तरीही गर्दी होत असे. मग ते अधकारी पोलिसांना बोलावत असत. पन्नास - पन्नास पोलीस आमच्या सभांना येत असत आणि गांधी मैदान वेढून टाकीत असत. हे अधिकारी मॅजिस्ट्रेटलाही सांगत असत की हे युनियनवाले म्हणजे जाळपोळ करणारी मंडळी आहेत. उद्योग बंद पाडणारे लोक आहेत. त्या वेळी ब्रिटिशांचे राज्य होते. कलेक्टर युरोपियन असे. तेव्हा कलेक्टर, डी.एस.पी. मॅजिस्ट्रेट वगैरे अधिकारी कारखान्याच्या मॅनेजरला मदत करीत असत. कारखान्यात संप होऊ नये म्हणून दहशत निर्माण करीत असत. त्या वेळी हरेगावच्या कारखान्यात रावसाहेबांच्या नेतृत्वाखली फार मोठा संप झाला. तो सुमारे त्रेपन्न दिवस चालला होता.

"तरी आमच्या सभा होत असत. सभेत दोन-दोन तास भाषणे चालत असत. मी तास-दीडतास बोलत असे. कारखान्याचे मॅनेजर पोलिस अधिकाऱ्यांना विचारत असत की, इतकी भाषणे होतात, तुम्ही त्यांना पकडत कसे नाहीत? तमुचे पोलिसही नुसते बसलेले असतात. त्यावर पोलिस अधिकारी त्यांना म्हणत, 'पकडायचे कसे, ते तर चांगलंच बोलत असतात.' मॅनेजर विचारायचे, मग आम्ही तुम्हांला बोलावले कशाला ? तुम्ही यांना पकडले पाहिजे. तुरुंगात टाकले पाहिजे... वगैरे तणातणी चालायची. पण हे सर्व कारखान्याचे मॅनेजर वगैरे अधिकारी मंडळीच करीत असत. त्यांचाच फार विरोध होता. शेठजींनी अशा तऱ्हेचा विरोध कधी केला नाही. पोलिस वगैरे बोलावले नाहीत.

"एकदा आमची सभा गांधी मैदानात रात्री ठेवली होती. त्या दिवशी शेठजी

साकरबाई, लीलाबेन आदी आपल्या परिवारासह संध्याकाळी कारखान्यावर आले होते. आम्हांला हे कळताच आम्हीही मग मोठी सभा भरवायची असे ठरवले आणि सगळीकडे सभेला येण्याविषयी वाड्यांवाड्यांवर निरोप पाठविले. त्यामुळे सभेला खूप लोक आले होते. आमची सभा रात्री बाराच्या सुमारास सुरु झाली. दिवसाचे काम संपल्यावर वाड्यावाड्यांवरुन लोक जेवून - खाऊन सभेला यायचे, म्हणून आमच्या सभा अशा रात्री उशीराच सुरु होत असत.

"आमची सभा सुरु होण्याच्या आधीच शेठजी आणि त्यांच्या परिवारातील मंडळी खुर्च्या टाकून ऐकायला बसली होती. मी त्या वेळी जवळ जवळ दोन तास त्या दिवशी बोललो, सगळे मुद्दे काढले. म्हणालो - 'आमचे करमसीभाई कसे आहेत? आमचे मॅनेजर कसे आहेत?... हे मॅनेजर साईबाबा संस्थान चालवण्याच्या लायकीचे असतात. अशा लोकांना करमसीभाई साखर कारखाना चालवायला देतात... एन. सी. शहा, पी. सी. शहा ही रिटायर्ड मंडळी तिथे मॅनेजर म्हणून आणली आहेत. दोन-दोन तीन-तीन मॅनेजर असायचे... करमसीभाई हे खरे इंडस्ट्रियलिस्ट नाहीत. उद्योगपती म्हणून जी लक्षणे असायला पाहिजेत ती त्यांच्यात नाहीत. त्यांचे धोरण भडभुंज्यासारखे आहे. आज फुटाणे विकायचे, उद्या त्या पैशातून चुरमुरे करायचे, असे ह्यांचे चालते. एवढा मोठा उद्योग चालवायचा म्हणजे कशा तऱ्हेच्या लायकीचे माणसे असायला पाहिजेत, मॅनेजर कसे असायला पाहिजेत, आपण कसे असायला पाहिजे?'... असे मी बेधडक बोलत होतो. त्याच सुमारास एक घटना घडली होती. बृहन्महाराष्ट्र फॅक्टरीचे चंद्रशेखर आगाशे यांनी कंपनीचे दवाळी काढले होते. लोकांचे पैसे त्यात गुंतलेले होते. त्यांच्यात घबराट झाली होते. अशा वेळी कंपनीचे जास्तीत जास्त शेअर विकत घेऊन ती कंपनीच ताब्यात घेण्याचा प्रयत्न करमसीभाई करीत होते. याच घटनेचा उल्लेख करुन मी म्हणालो, 'यांना आपला कारखाना नीट चालवता येत नाही आणि हे आगाशेंचा कारखाना घ्यायला निघाले...'

असे मी पुष्कळ बोललो आणि शेठजींनी माझ्या भाषणातले वीस - एकवीस मुद्दे लिहून ठेवले होते. दुसऱ्या दिवशी त्यांचे मौन होते. तिसऱ्या दिवशी मला बोलावून घेतले आणि म्हणाले, 'मुद्दा नंबर एक : तुझे भाषण एक तास पन्नास मिनिटे चालले होते. एकही माणूस तुझ्या सभेतून उठून गेला नाही. जवाहरलाल नेहरु जसा लोकांवर प्रभाव ठेवून असतात, तसा तूही लोकांवर प्रभाव ठेवला आहेस. त्याबद्दल शब्बास! आम्हांला व्यवस्थापकांची पारख नाही हे तुमचे म्हणणे खरेच आहे. कारण इथे तीन-तीन मॅनेजर असून मला मुंबईला त्यांच्याकडून वेळेवर रिपोर्ट मिळत नाही...' अशा प्रकारे एकेका मुद्यावर बोलताना ते म्हणाले, 'चंद्रशेखर आगाशे यांच्याबद्दल तुम्ही सांगितले, तर तुम्हांला काय वाटते की आम्ही जर तो कारखाना घेतला तर तो चालवू शकू की नाही?' मी सांगितले, 'चंद्रशेखर आगाश्यांपेक्षा तुम्ही तो कारखाना चांगला चालवू शकाल'... यावर ते म्हणाले, तुमचे

हे म्हणणे आम्हांला पटत नाही. कारण आम्ही भडभुंजे आहोत!'... हे ऐकून मी चाटच पडलो! मग बरेच बोलणे झाले. शेवटी मी त्यांना कशी कबुली दिली की, 'कामगारांना उठवायचे असेल तर अशा काही गोष्टी तिखटमीठ लावून बोलाव्याच लागतात'... मग शेठजी म्हणाले, 'असं असं, मग चालू द्या.'

"अशा प्रकारे आमची अनेक वेळा भांडणे झाली. समझोतेही झाले. आम्ही एकमेकांना अधिकाधिक समजून घेत गेलो. त्यातून स्नेहाचे व प्रेमाचे संबंधही निर्माण झाले.

"भूमिगतांवरील वॉरंटस् रद्द झाल्यावर बरेच भूमिगत प्रकट झाले होते. त्यात नाना पाटीलही होते. त्यांचा दौरा आमच्या भागात त्या वेळी झाला. पावसाळ्याचे दिवस होते. गोदावरी नदीला पूर आला होात. नाना पाटलांची सभा पुणतांब्याला चांगदेव फॅक्टरीवर ठेवली होती. त्यांच्याबरोबर रावसाहेब पटवर्धनही होते. सभेनंतर त्यांना करमसीभाईंनी साकरवाडीला मोठ्या थाटाचे जेवण ठेवले होते. देशभक्तांबद्दल त्यांना फार आदर वाटत असे. त्या दिवशी त्यांनी जवळजवळ अडीचशे ते तीनशे लोक जेवायला बोलावले होते. त्यासाठी शुगर गोडाऊन उघडले होते. स्वत: करमसीभाई पंक्तीत वाढत होते. जेवणात शरा वगैरे चांगले पदार्थ केले होते. पण ऐन जेवणाच्या वेळी नाना पाटील म्हणाले, 'मला हे चाणार नाही, मला भाकरी आणि झुणका पाहजे.' मग धावपळ सुरु झाली. शेठजी चिंतेत पडले. पण मी चटकन एका कार्यकत्यांच्या घरी गेलो आणि तिथून गरम गरम भाकरी आण झुणका घेऊन आलो. नाना पाटील खूष झाले. करमसीभाईंनाही समाधान वाटले. त्यांना देशभक्तांबद्दल आपुलकी असे. त्यांचे आमचे संघर्ष खूप झाले परंतु आम्ही दोघेही कधी तुटेपर्यंत गेलो नाही.

"शेठजी खूप हिशेबी होते. साकरवाडी व लक्ष्मीवाडीच्या रस्त्यावर साकरवाडीजवळच गोदावरी नदी वाहते. वाहतुकीसाठी करमसीभाई लोखंडी सांगाड्यावर फळ्या टाकून तात्पुरत्या वाहतुकीसाठी पूल तयार करायचे. हा पूल सात-आठ महिने वापरात असायचा. पावसाळ्यात पुराच्या वेळी तो काढून टाकायचा. यावर ते दर वर्षी चाळीस-हजार रुपये खर्च करायचे. एकदा हा मुद्दा घेऊन मी बोललो आणि म्हणालो की, 'दर वर्षी अशा प्रकारे तीस - चाळीस हजार रुपये घालवण्यापेक्षा एकदाच तीन-चार लाख रुपये घालवून शेठजी नदीवर पक्का पूल का बांधत नाहीत'... यावर ते म्हणाले, तुम्ही समजावादी आहात. तुम्हांला व्यवहार काही समजत नाही. मी असा कामापुरता कच्चा पूल करतो, त्यावर एकोणीस- वीस हजार रुपये खर्च करतो. पावसाळ्यात काढून घेतलेल्या फळ्या, लोखंडी पिलर्स पुन्हा पुढच्या वर्षी वापरतो. फक्त माती, मुरुम टाकण्याचा खर्च करतो. तुम्ही म्हणता तसा पूल बांधायचा म्हटले तर तीन-चार लाख रुपये खर्च येतो. त्या तीन-चार लाख रुपयांचे व्याज

किती होईल. तेच तीन-चार लाख रुपये मी दुसरीकडे वापरतो. त्यावर माझा धंदा चालतो. कच्च्या पुलाचे पैसे निघून जातात. ते मला फायद्याचे पडते. हे तुम्हांला समजत नाही.

"आमच्या कामगारांच्या मागण्यांच्या संदर्भातही शेठजी म्हणाले, तुमच्या मागण्यांप्रामणे मी जर तुम्हांला पैसे दिले तर तुम्ही ते खाऊन फस्त करुन टाकणार. पण तेच पैसे जर माझ्याकडे राहिले तर मी ते कोणत्यातरी धंद्यात गुंतवणार, नवी कंपनी काढणार आण त्यात कामगारांना नवा रोजगार उपलब्ध होणार!' अशी आपली गणिती दृष्टी समजावून देऊन ते वर मला मार्मिक-विनोदाने म्हणाले, 'आणि तिथे पुन्हा तुमची युनियन निघणारच!'

"असा आपला हिशेबी दृष्टिकोन समाजावून दिल्यावर शेठजी म्हणाले, 'हे मी एवढ्याचसाठी सांगितले की हे तुम्हांला कळल्यावर तुम्ही विनाकारण भांडणार नाहीत. तुम्हाला व्यावसायिक हिशेब किंवा गणित शिकवण्यासाठीच मी हे सांगितले.

"आणि त्यांचे हे सांगणे खरेच होते. त्यात तथ्यही पुष्कळच होते. त्यांच्या ह्या व्यावहारिक गणिती दृष्टिकोनामुळे मी त्या संदर्भात खूपच शिकलो, तयार झालो. तसा मी मॅनेजमेंट, मालक आणि कामगार यांच्या संघर्षाच्यावेळी वाटाघाटींमध्ये कधीही कुणाला हार जात नाही. कुणीही माझा हात धरु शकत नाही. याचे श्रेय करमसीभाईंना आहे. त्यांनी विरोध केला नसता तर माझी एक कामगार कार्यकर्ता म्हणून आजच्याइतकी तयारीही झाल नसती. त्यांनी निरनिराळ्या तऱ्हेने विरोध केला. म्हणूनच मला निरनिराळ्या तऱ्हेने विचार करुन त्याला शह द्यावा लागला व अशा तऱ्हेच्या संघार्षातूनच माझे कामगारक्षेत्रातील उत्तम शिक्षण झाले! विरोधविकास वादाचेच तत्व इथे प्रत्ययास आले! माणसाचा विकास सहज सुलभतेपेक्षा विरोध व अडणचींमधूनच होत असतो. तसा माझा झाला. रावसाहेब व अच्युतराव पटवर्धन, नानासाहेब गोरे, एस.एम. जोशी, गंगाधर ओगले यांनी जसे मला एका बाजूने घडविले तसेच व्यवहाराच्या दृष्टीने करमसीभाईंनीच मला घडविले!

"पुढे शांतिलालजींची कारकीर्द सुरु झाली, तेव्ह तर ते आमचे मित्रच बनले. संघर्ष संपला. बोनस वगैरेबाबत तेच आम्हांला सांगायचे की तुम्ही ठरवा आणि मला सांगा. परंतु या त्यांच्या धोरणामुळे मला एक प्रकारची जबाबदारी वाटली. ही जबाबदारी जाणीव शेठजींच्यामुळेच मला झाली. ते म्हणायचे, 'आज तुम्ही कामगाराला जास्त पैसे दिले तर तो दुकानात जाऊन भांडी-बिंडी विकत घेईल. पण पुढच्या महिन्यात चणचण भासू लागली की तीच भांडी विकायलाही आणील. तर अशा सवयी लावता काम नये. माझ्याकडे जर ते पैसे राहिले तर मी त्यांच्याच कामासाठी शाळा काढीन, दवाखाना सुरु करीन, त्यांच्यासाठी घरं बांधीन... हे ते करणार आहेत का, याचा विचार तुम्ही केला पाहिजे. तसेच काहीतरी नवीन-नवीन करण्याची जिद्दही ठेवली पाहिजे.'

“शेठजी शांतिलालजींनाही अशीच शिकवण देत असत. ‘आहे त्यात समाधान मानू नका. नवे उद्योगधंदे शोधा आणि सुरु करा.’ असेच त्यांचे सांगणे असे. त्यांनी स्वत: जे हे शून्यातून निर्माण केले त्यांच्या मुळाशी हीच दृष्टी व जिद्द होती.

“पुढे पुढे शेठजींचे आणि माझे संबंध खूपच प्रेमाचे व आपुलकीचे बनले. मधून-मधून ते मला बालावून घेत असत. मनातल्या गोष्टी सांगत असत. एखाद्या प्रकरणात मध्यस्थीही करायला लावीत. अशा वेळी ते माझेही ऐकत असत. त्यांचे माझे असे संबंध पाहून मग कारखान्यातले अधिकारी व घरातील मंडळीही माझ्याशी एका विश्वासाच्या भावनेने वागू लागली. शेठजी तर मला आपल्या कुटुंबातलाच एक मानतात. साकरबाईंनी तर मुलाप्रमाणे प्रेमाा वर्षावच केला होता ! बरेच दिवसांत गेलो नाही तर त्या रागावत असत. मी अशाच एका चळवळीच्या निमित्ताने जेलमध्ये असताना माझ्या पत्नीचे मुंबईला डॉ. पुरंदरे यांच्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन आले होते. तेव्हा तिची सगळी व्यवस्था साकरबाईंनीच केली होती. असा त्यांचा माझा घरोब्याचा संबंध जुळला आहे. श्री. मधुकर पोंक्षे हे लेबर कमिशनर होते. आमचे हे संबंध पाहून ते गमतीने म्हणायचे, ‘करमसीभाईंना दोन पुत्र आहेत. एक शांतिलाल हा मॅनेजिंग एजंट आहे, तर किशोर पवार हा बार्गेनंग एजंट आहे !”

या कामगार-संघटनेच्या कहाणीतून करमसीभाईंच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्वाची ओळख होते!

❖

पश्चिम रंग



समाज ऋण

शतहस्त समाहर सहस्रहस्त सं किर !

हे शतबाहो, संपत्ती मिळव आणि हे सहसबाहो तिचे वाटप कर.
(शेकडो हातांनी मिळवलेली संपत्ती हजारो मार्गांनी इतरांच्या सौख्यासाठी उपयोगात आणावी.)

समाज ऋण

प्राचीन काळची गोष्ट. धारा नगरी राजनगरी म्हणून विख्यात होती. धारा नगरीत मुंज नावाचा राजा राज्य करीत होता. राजा जसा शूर,
वीर होता तसाच विद्या व साहित्यप्रेमीदेखील होता. एकदा मुंज राजाच्या दरबारात एक विद्वान ब्राम्हण आला. असे देशोदेशीचे
विद्वान मुंज राजाच्या दरबारात आपली विद्या दाखवून प्रशंसा मिळविण्यासाठीच नेहमीच येत असत आणि राजाही त्यांचे उत्तम स्वागत करुन योग्यतेनुसार त्याचा सत्कार करीत असे. आलेला ब्राह्मण हा ज्योतिषविद्येत पारंगत होता. त्याची पारंगतता पाहून मुंज राजा प्रसन्न झाला आणि त्या ब्राह्मणाचा विपुल धन देऊन त्याने सत्कार केला, त्याच्या विद्य-
`बद्दल प्रशंसोद्गार काढले.

परिश्रम करुन मिळविलेली विद्या कोणकोणती सुखे प्राप्त करुन देते देते हे या लहानशा गोष्टीवरुन ध्यानात होते. विद्येची प्रशंसा एका श्लोकात वर्णिलेली आहे ती अशी :

मातेव रक्षति पितेव हिते नियुङ्क्ते
कान्तेव चाभरमयत्यपनीय् खेदम्
कीर्तिं च दिक्षु विमलां वितनोति लक्ष्मीं
किं किं न साधयति काल्पलतेव विद्या ।।

याचा अर्थ असा की, 'आईप्रमाणे रक्षण करते, वडिलांप्रमाणे कल्याणकारक कामाकडे प्रेरित करते, पत्नीप्रमाणे मनोरंजन करते आण दु:ख दूर करते, दशादिशांमध्ये कीर्ती पसरवते आणि भाग्य वाढविते अशी जी ही विद्या, इच्छा पुरविणाऱ्या कल्पकतेप्रमाणे खरोखर काय प्राप्त करुन देत नाही ?

एखादे शास्त्र किंवा विद्या परिश्रमाने आत्मसात करुन घेतले म्हणजे सर्व ठिकाणी तिचा प्रभाव पडतो. सर्व प्रकारच्या हितकारक गोष्टी, ऐश्वर्य त्या व्यक्तिला प्राप्त होतात. विद्येचे महत्व अशाच प्रकारे आणखी एका श्लोकात वर्णिलेले आहे :

विद्वत्त्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन।

स्वदेशे पूज्यते राजा विद्वान्सर्वत्र पूज्यते।।

याचा अर्थ असा की, 'विद्वत्ता आणि राजसत्ता यांची कधीच तुलना करता येणार नाही. राजाला केवळ त्याच्या राज्यातच मान मिळतो, तर जगातले सर्व लोक विद्वानाचा आदर करतात.'

सत्ताधिशाला मान त्याच्या हाती असलेल्या सत्तेमुळे, तो ज्या आसनावर बसलेला असतो त्या असानामुळे प्राप्ह होता असतो. त्यावरुन तो खाली उतरला की त्याला कोणी ओळखी नाही. त्यातूनही सत्ताधारी राजाचा प्रभाव त्याच्या राज्यसीमेपुरताच मर्यादित असतो. बाहेर त्याला कोणी विचारत नाही.

विद्वत्तेचा प्रभाव मात्र विद्वान कोठेही गेला तरी दिसून येतो. सर्वांच्या आदराला तो सर्वत्र पात्र ठरतो !

विद्येची ही महती करमसीभाई उत्तम प्रकारे जाणून आहेत.

बालपणी शालेय जीवनातदेखील त्यांनी, अनेक अडथळे आले असतानासुध्दा विद्येची उपासना कसोशीने पार पाडली होती. शाळेत ते एक हुशार विद्यार्थी म्हणून नावाजलेले होते. परीक्षेतील पहिला क्रमांक त्यांनी कधीच सोडला नाही. त्यामुळे त्यांना प्रशंसा आणि पारितोषिकेही लाभली. काही गुरुजनांचे ते आवडते विद्यार्थी बनले होते. परंतु असे असतानासुध्दा त्यांना आपल्या घरगुती अडचणींमुळे तत्कालीन इंग्रजी सहावीच्या पुढे शिकता आले नाही. शिक्षण अर्धवट सोडून ऐन तारुण्यातच त्यांना पोटापाण्याच्या उद्योगाकडे वळावे लागले.

विद्यालयीन शिक्षण पूर्ण करता आले नाही व महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळता आले नाही याची खंत त्यांच्या मनात सलत होती.

महाविद्यालयीन शिक्षण जरी घेता आले नाही तरी पुढील जीवनात अनुभवाच्या उघड्या जंगम विद्यापीठात करमसीभाईंना पुष्कळच शिकता आले आणि त्या शिक्षणाच्या बळावरच ते एक यशस्वी व्यापारी, शेतकरी व उद्योजक म्हणून सर्वदूर विख्यात झाले! स्वत:चे वैयक्तिक जीवन सर्वार्थाने सर्वांगीण संपन्न व समृध्द बनविले. एक प्रापंचिक गृहस्थ म्हणूनही त्यांनी आपल्यावरील सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या अत्यंत यशस्वीरीत्या तडीस नेल्या. एका अर्थाने त्यांनी आपला प्रपंच नेटका केला, व तो करीत असताना जमेल तेवढा व तसा परमार्थही साधला. परंतु करमसीभाई तेवढ्याच तुटपुंज्या परमार्थाने समाधानी होणाऱ्यांपैकी नाहीत. भारतीय संस्कृतीने 'मातृदेवो भव। पितृदेवा भव। आचार्यदेवो भव। अतिथीदेवो भव।...' अशी वंदन मालिका सांगितलेली आहे. जन्मला आलेल्या प्रत्येक मनुष्याला या वंदनीयांची सेवा करुन ऋण फेडावे लागते. या ऋणांबरोबरच भारतीय संस्कृतीने आणखी एक समाजऋण सांगितलेले आहे. प्रत्येक माणूस हा व्यक्ती म्हणून जरा स्वतंत्र असला तरी समाजाच्या बांधिलकीने तो बध्दच असतो. 'जल बिन मछली' अशी जिवंत राहू शकत

नाही. तसाच माणूसही समाजविन्मुख राहू शकत नाही. अनेक तऱ्हेच्या समाजऋणातच तो जगत असतो, वाढत असतो, विकासत असतो. म्हणून हे समाजऋण फेडणे हेदेखील त्याचे मोठे कर्तव्यच ठरते. करमसीभाई हे समाजऋण मानणारे व ते आपल्या परीने फेडण्याठी तत्पर असणाऱ्यांपैकी एक समाजशील गृहस्थ आहे.

तसे पाहिले तर -

Man can never adequately repay his debt to society. He must, however, in all humility, attempt to do all that he can to redeem himself.

मनुष्य समाजाचे ऋण परिपूर्ण स्वरुपात कधीच फेडू शकत नाही, पण त्याने ते मोठ्या नम्रतेने अंशत: का होईना फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करमसीभाईंची विचारधारा अशाच प्रकारची आहे. ईशावास्य उपनिषदात म्हणटले आहे :

ईशावास्यमिदं सर्वं यत् किं च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन श्रुज्जथा : मा गृध मस्य स्विद्धनम् ।।

त्याचप्रमाणे संत तुकाराम महाराज यांनीही एका अभंगात म्हणटले आहे :

"जोडोनिया धन। उत्तम व्यवहारें
उदास विचारें। वेंच करी"

उत्तम व्यवहार साधून माणसाने धन कमवावे आणि त्या धनाविषयी आसक्ती न बाळगता ते रंजल्या-गांजल्यासाठी, गरजूंसाठी, गरजूंसाठी खर्च करावे.

करमसीभाईंनी तुकोबांची ही शिकवण अंमलात आणायचे ठरवले. त्यांना आदरणीय, वंदनीय असलेल्या गांधीजींनीदेखील 'प्रत्येक माणसाने स्वत: कष्ट करुन कमावलेल्या संपत्तीतून स्वत:च्या कमीत कमी गरजा भागवून उर्वरीत संपत्तीचा वापर 'विश्वस्त' या नात्याने समाजासाठी करावा', असेच सांगिलते आहे.

या सर्व विचारधनातून घ्यावयाचा तो बोध करमसीभाईंनी घेतला आणि उद्योग-व्यवसायात व परिवारात चांगले स्थैर्य प्रस्थापित झाल्यावर समाजऋण फेडण्यास ते सिध्द झाले. हे समाजऋण कशा प्रकारे फेडावे, याचा विचार करतानाच त्यंच्या मनातली स्वत:च्या अपूर्ण राहिलेल्या शिक्षणाची खंत त्यांना तीव्रतेने जाणवली आणि त्यांनी समाजऋण फेडण्यासाठी प्राधान्याने शिक्षणक्षेत्रच निवडले.

भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षण प्रसार ही अत्यंत निकडीची गरज मानावी लागते. विद्याप्रेमी करमसीभाईंनी आपल्या कार्यक्षेत्रात स्वत:च्या शिक्षणसंस्था उभ्या करण्यासाठी व इतर शिक्षणसंस्थांना मदत करण्यासाठी 'सोमैया ट्रस्ट' ची स्थापना केली, आणि कोपरगांव तालुक्यात -

१. सोमैया विद्या मंदिर, साकरवाडी
२. सोमैया विद्या मंदिर, लक्ष्मीवाडी

ही दोन माध्यमिक विद्यालये उभारली. या दृष्ट्या वतीने माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या आणि देशात व परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कर्जाऊ शिष्यवृत्त्या दिल्या जातात. याशिवाय या ट्रस्टने खालील शिक्षणसंस्थांचा पुरस्कार केलेला असून त्यांना आर्थिक मदत केली आहे व केली जात आहे.

१. के. जे. सोमैया कला व वाणिज्य महाविद्यालय, कोपरगांव
२. जेठाभाई ठाकरशी हायसकूल, श्रीरामपूर
३. के. जे. सोमैया हायस्कूल, बेलापूर
४. मालुंजा प्रायमरी स्कूल, मालुंजा, ता. श्रीरामपूर
५. शारदा इंग्लिश मीडीयम स्कूल, कोपरगांव
६. सोमैया विनय मंदिर हायस्कूल, समीरवाडी, जि. विजापूर
७. सोमैया शिशुनिकेतन, समीरवाडी, जि. विजापूर
८. भुत, खावडा व अबवसा तालुक्यामध्ये पंधरा प्राथमिक शाळा. (कच्छ, गुजरात राज्य)

या शिक्षणसंस्थांच्या पाठीशी करमसीभाई उभे ठाकले आणि ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या. हे खरेच. परंतु याहूनही आणखी मोठी झेप. शिक्षणक्षेत्रात जी घेतली आहे. ती स्तिमित करणारी आहे !

❖

एका घटनेचे निमित्त

अधोमुखस्यापि कृतस्य वह्ने :
नाध : शिखा याति कदाचिदेव।।

अग्नीची ज्वाळा उलटी केली तरीदेखील कधीही खाली जात नाही,
वरच उफाळून येते.

एका घटनेचे निमित्त

एकाद्या कारणानेच एखादी घटना घडून येते किंवा एखाद्या घटनेसाठी कारण लागते. असेच एक कारण करमसीभाईंच्या विद्याक्षेत्रातील भव्य झेपेसाठी निमित्त झाले.

ते १९५८ साल होते. करमसीभाई आपल्या कुटुंबातील काही व्यक्तींसह कैलास-मानसरोवर यात्रेला जाण्याच्या तयारीत होते. त्याच सुमारास गुजरातमधील एक विख्यात विद्वान लेखक, स्वातंत्र्यसैनिक, धडाडीचे विधायक कार्यकर्ते व भारतीय विद्या भवन संस्थेचे चेअरमन श्री. के. एम. मुन्शी यांच्याकडून करमसीभाईंकडे अशी विचारणा झाली की, 'आमच्या शिक्षणसंस्थेला आपण जर दहा लक्ष रुपायांची देणगी देण्यास तयार असाल तर आम्ही आमच्या शैक्षणिक आवारात आपल्या नावाने इंजिनिअरिंग कॉलेज काढण्यास तयार आहोत.'

के.एम.मुन्शी यांच्यासारख्या शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे काम केलेल्या विद्वानाकडून अशा तऱ्हेची विचारणा होताच विद्याप्रेमी करमसीभाईंनी मोठ्या आनंदाने त्वरितच या योजनेस आपला होकार कळवला.

असा होकार कळविल्यानंतर या योजनेच्या तपशीलात जाऊन सविस्तर वाटाघाटी व्हावयाच्या होत्या. त्याला थोडा अवधीही लागणार होता. म्हणून आपल्या पूर्व योजनेनुसार करमसीभाई कैलास-मानसरोवराच्या यात्रेला गेले. काही दिवसांनी या यात्रेवरुन परत आल्यावर के.एम. मुन्शी आणि करमसीभाई यांच्यात इंजिनिअरिंग कॉलेजच्या संदर्भात बोलणी होऊन एक करारनामा तयार करण्यात आला. हा करारनामा घेऊन केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी के. एम.मुन्शी दिल्लीला पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्याकडे गेले.

त्या दिवशी मुन्शी पंडितजींच्या भेटीला आले होते, त्याच दिवशी पंडितजी अशा एक संस्थेच्या उद्घाटनासाठी कलकत्याला जाऊन परतले होते. पंडितजी कलकत्त्याहून परतले तेच काहीसे अस्वस्थ मनाने. घडले होते असे की, पंडितजी ज्या संस्थेच्या उद्घाटनासाठी गेले होते ती एक शासकीय शैक्षणिक संस्था होती. तिच्यावर शासनाने कोट्यावधी रुपये

खर्ची टाकले होते, आण असे असताना कलकत्यामधील एक मारवाडी गृहस्थाने या संस्थेला दीड लाखाची देणगी देऊन त्या बदल्यात संस्थेला आपले नाव द्यावे, अशी सूचना केली होती. पंडितजींना या गोष्टीचा अत्यंत राग आला होता, आणि म्हणूनच ते अस्वस्थ झाले होते.

पंडितजींच्या अशा अस्वस्थ मन:स्थितीतच जेव्हा मुन्शी त्यांना भेटले आणि आपली योजना त्यांना सांगितली, तेव्हा तर ते आणखीनच अस्वस्थ झाले आणि त्यांनी मुन्शींची ही योजनाच फेटाळून लावली.

या घटनेचे निमित्त मात्र म्झाले आणि कर्तबगार व धाडसी करमसीभाईंच्या मनात विचार चमकून केली की, 'आपणच स्वत: आपले असे कॉलेज का काढू नये?'...

ठिणगी पडली आणि ज्योत उजळली! आपले कॉलेज काढण्याचा त्यांचा निश्चय पक्का झाला. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींशी बोलणी केली. चर्चा झाल्या आणि निश्चयाला बळकट पाठिंबाच मिळाला. महाविद्यालय काढावयाचे ठरले.

'कला आण विज्ञान' 'Arts and science' अशा दोन विद्या शाखा असलेले महाविद्यालय प्रारंभीच उभारण्याची योजना करमसीभाईंच्या मनात घोळू लागली.

मग प्रश्न उभा ठाकला जागेचा. महाविद्यालयासाठी जागा कुठे, आणि कोणती? ...पण तोही जणू या आधीच करमसीभाईंनी सोडवून ठेवला होता.

१९४४ साली मुंबईतील गोदीमध्ये एकदा भयंकर स्फोट झाला होता आणि त्या आसपासच्या भागत बरीच पडझड झाली होती. फार फार नुकसान झाले होते. त्या नजीकच्या भागातच लोहाणा कच्छी समाजातील मंडळींची वस्ती होती. त्यांतील पुष्कळांची घरे-दारे नेस्तनाबूत झाली होती. अशा अनिकेत निर्वासितांची सोय करावी. त्यांचे पुनर्वसन करावे, अशा उदात्त हेतूने करमसीभाईंनी त्यावेळी घाटकोपरजवळ बरीच मोठी जागा खरेदी करुन ठेवली होती.

या कामी श्री. के. आर. देशमुख रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर यांची खूपच मदत झाली. त्यावेळी जमिनीच्या किंमती आजच्या एकढ्या वाढलेल्या नव्हत्या. देशमुखांनी त्या भागातल्या अनेक जमिनी मालकांना गाठून, त्यांच्याशी बोलून, त्यांच्याकडून लहान लहान असे जमिनीचे तुकडे खरेदी करुन एक विशल क्षेत्रफळाचा भूखंड तयार केला होता.

महाविद्यालयांसाठी हीच जागा करमसीभाईंनी निश्चित केली. यात करमसीभाईंची दूरदृष्टीही होती. ती अशी की, आपल्या शैक्षणिक प्रकल्पासाठी मोठीच जागा हवी. कारण भविष्यात जर विद्यानगरीच साकार करायची झाली, तर जागेची अडचण भासू नये. म्हणून त्यांनी घाटकोपर जवळच्या आपल्या या जागेवरच उभारण्याचे ठरविले.

करमसीभाईंनी घाटकोपरजवळची जागा पसंत केली होती, परंतु त्यांच्या बहुतेक सर्व मित्रांना, हितचिंतकांना, या शैक्षणिक कार्याला पाठिंबा देणाऱ्या मंडळींना, इतकेच नव्हे तर

त्यांच्या सर्व कुटुंबियांनाही इतक्या दूरची जागा महाविद्यालयांसाठी म्हणून पसंत नव्हती. कुलाबा अशा ठिकाणी जागा घ्यावी. या भागात सुशिक्षित, सुसंवादी, सुसंस्कृत अशा उच्चभ्रु लोकांची वस्ती असल्यामुळे आपल्या महाविद्यालयांतही अशी संस्कारी मुले येतील आणि आपल्या महाविद्यालयांना चांगली लोकप्रियताही लाभेल.

परंतु करमसीभाईंनी हा विचार आवडला नाही. त्यांनी तो बाजूला सारला आणि घाटकोपरच्या जागेवरच आपले लक्ष केंद्रित केले.

जमीन ओबडधोबड, चढउतारांची, खाचखळग्यांची जरी होती, तरी ती त्यांनी सारखी सपाट करुन घेतली. तिच्यातली काटेरी झाडेझुडपे व तण खणून काढले. सारा भूभाग निर्मळ करुन घेतला आणि मग याच भूभागावर विद्यानगर उभे राहिले.

जागा मिळविण्याच्या व ती अशी तयार करुन घेण्याच्या संदर्भातील सारे श्रेय करमसीभाई मोठ्या मनाने श्री. आर. के. देशमुख यांना देतात.

❖

विद्याविहार

ज्ञानादेव तु कैवल्यम् ।

ज्ञानातूनच मुक्ती मिळते.

विद्याविहार

विद्यादानाच्या रुपाने समाजऋण फेडण्यासाठी करमसीभाईंनी दोन ट्रस्ट स्थापन केले होते. जाती, धर्म, वंश व वर्ण निरपेक्ष अशी दृष्टी ठेवून समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आणि आरोग्यसेवा
उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी 'सोमैया ट्रस्ट' ची स्थापना केली होती. तर कच्छी, लोहाणा समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी 'के. जे. सोमैया ट्रस्ट'ची स्थापना केली होती.

'सोमैया विद्याविहार' हा शैक्षणिकदृष्टया अद्ययावत व प्रगत असा एक नवीन शैक्षणिक समाज निर्माण करावयाचा तर यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील विद्वान, अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणे आवश्यक होते. त्यांच्या सखोल अनुभवाचा लाभ मिळणे गरजेचे होते.

सोमैया विद्याविहाराची उभारणी एका भाग्यशाली क्षणालाच झाली असावी. या संस्थेला पहिले संस्थापक अध्यक्ष म्हणून सुप्रीम कोर्टाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश व मुंबई आणि बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरु श्री. एन.एच. भगवती यांच्यासारखे थोर विद्वान लाभले. न्याय, विद्या आणि समाजाकार्य या क्षेत्रांत न्यायमूर्ती भगवती यांना श्रेष्ठ म्हणून आगळेच स्थान होते.

संस्थेचे दुसरे भाग्य असे की, संस्थेला संस्थापक मंडळावर काम करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील सन्मानीय श्रेष्ठी संस्थापक सदस्य लाभले.

७ सप्टेंबर १९५९ रोजी मुंबईत न्यू एरा स्कूलच्या हॉलमध्ये भरलेल्या संस्थापक सदस्यांच्या सभेत 'सोमैया विद्याविहार'ची रीतसर स्थापन झाली. त्यावेळी संस्थापक अध्यक्ष न्या. एन. एच. भगवती यांनी नियोजित विद्याविहार या शैक्षणिक प्रकल्पांच्या संदर्भात आपले मौलिक विचार मांडले. न्या भगवती म्हणाले,

"The VIDYAVIHAR must strive for education that will not merely lead to the intellectual development of the individual but will also make his life and

personality fuller and richer. It should aim not merely to develop his faculties and talents but also to satisfy and fulfil his more important urges, ethical, aesthetic and spiritual. It must, in short, strive for education that will develop an integrated personality.

In its institutions, the Vidyavihar must never fail to emphasise the three important aspects of education which are as important to the individual as to the nation :—

(i) Firstly, the moral foundations of our society have been rudely shaken in recent years. Students hardly know what moral values are because at home, in the society and in the world outside they do not see them. The responsibility of schools and colleges therefore becomes all the greater to see that students never lose sight of the fundamental values of life. Else, the future of our nation would be in jeopardy.

(ii) Secondly, whereas English must continue to play an important role both at national and inter-State levels and regional languages must have full scope for unfettered development, Hindi — the common language that binds people from the North to the South — must be developed. We must learn not merely to live and work together but also to speak, think and discourse together. Besides the national interests, interests of high scholarship also demand that Hindi must be given its due importance.

(iii) Thirdly, we must become a nation of able bodied men and women. The jerks that we give in the name of physical training do no good to anyone. We must wholly revitalise the system of physical education and help build sound physique of our students.

I hope and trust that the Vidyavihar will never lose sight of these essentials."

शिक्षणाचा प्रसार करती असतानाच, शिक्षणाने विद्यार्थ्यामध्ये व्यक्तिजीवन, समाजजीवन व राष्ट्रीयजीवन यांना हितकारक अशी मूलभूत मौलिक मूल्ये कशी बिंबवली जातील याची काळजी विद्याविहाराने दक्षतापूर्वक घ्यावयाची असे उद्दिष्ट ठेवले होते. कारण अशा मूल्यवर्धक शिक्षणातूनच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन समृध्द होत असते. खरे-

खुरे शिक्षण तेच असते की, जे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानलालसा आणि जिज्ञासा जागृत करते. त्याचबरोबर गुरुजनांविषयी परम आदराची व निरपेक्ष सेवेची भावना निर्माण करते.

या उद्दिष्टसाध्यासाठी अत्यंत उचित असे वातावरण निर्माण करुन ते राखण्यासाठी विद्याविहारने आपल्या अनेकविध व्यापांतून या कामाला सर्वोच्च महत्व दिले होते.!

सामूहिक प्रार्थना, विविध प्रकारचे खेळ आणि असे वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक असे अन्य काही उपक्रम विद्याविहारमध्ये प्रारंभापसूनच सुरु करण्यात आले होते. अशा संस्कारपूर्ण वातावरणामधूनच विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनाला चिरस्थायी अशी जीवनमूल्य टिपता येतात. शिक्षणाचा अंतिम हेतूच हा असतो की शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्यांच्या ठायी आत्मविश्वासाची भावना दृढ व्हावी.

अशा उद्दिष्टप्रधान पार्श्वभूमीवरच विद्याविहारमधील सर्व शैक्षणिक संस्था उभारण्यात आल्या.

२९ फेब्रुवारी १९६० या दिवशी वे. शा. सं. श्री. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या हस्ते श्रीमती साकरबाई क. सोमैया द्वारा 'मातोश्री लक्ष्मीबाई सोमैया बालिका सदन' 'श्रीमद्भगवद्गीता पाठशाला' व 'संस्कृती विस्तारक भवन' यांचा शिलान्यास समारंभ साजरा झाला. या पावनप्रसंगी बोलताना शास्त्रीजींना मानवी जीवनाला अध्यात्मिक मूल्यांची कशी व किती गरज आहे याचे उत्कृष्ट विवरण केले. शास्त्रीजी म्हणाले,

"माणूस केवळ भाकरीवर जगत नाही. भाकरीच्या पलीकडची धार्मिक, आध्यात्मिक आणि नैतिक अशी एक भूक त्याच्या ठायी असते. अशी एक ओढ त्याच्या मनात असते. पण ज्या दिवशी ही ओढ, ही भूक व ही दृष्टी माणूस भौतिक सुखाच्या मागे लागून घालवून बसेल तो दिवस भारतीय जीवनातला अत्यंत दु:खाचा दिवस म्हणून मानावा लागेल. साध्या जीवनाहून उच्चतर व उच्चतम जीवनाच्या आकांक्षेतूनच माणसाला बौध्दिक, मानसिक शांततेचा लाभ होत असतो. आणि म्हणूनच धार्मिक आणि आध्यात्मिक मूल्य ही विश्वाची चिरंतन अशी संपत्ती आहे.

"आपल्या गुरुजनांविषयी परम आदराची भावना शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या मानसात जागती ठेवली पाहिजे. पण दुर्दैवाने ही कृतज्ञतेची भावना आपण पूर्णपणे विसरलो आहोत. परंतु आपला जो निर्माता आहे, त्याच्याविषयी भक्तिपूर्वक कृतज्ञता आपण आपल्या मनीमानसी बाळगली पाहिजे.

"आणि केवढीही किंमत मोजून आपण भौतिक कृतघ्नतेचा प्रवाह बदलला पाहिजे आणि आपल्या निर्मात्याविषयी प्रार्थनामय समर्पित भावनेने, नम्रपणाने आपली कृतज्ञता

व्यक्त केली पाहिजे. हीच भावना गुरुजनांविषयीसुध्दा मनी जोपासली पाहिजे.

"आणि हेच केवळ खरे-खुरे शिक्षण होय."

त्या पुढल्या महिन्यातच १८ मार्च १९६० रोजी तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते विद्याविहाराच्या नियोजित 'कला आणि शास्त्र' 'Arts and Science' महाविद्यालयाच्या इमरतीचा पायाभरणी समारंभ मोठ्या उत्साहात साजरा झाला.

त्यानंतर इमारतीच्या बांधकामास सुरुवात झाली. बांधकाम साहित्याचे ढीग लागले. इमारत बांधणारे कलाकार, कामगार, स्थापत्यशास्त्रातील जाणकार वास्तुविशारद, अभियंते, पर्यवेक्षक, आदी मंडळींच्या हालचालीला वेग आला. दिवसादिवसाने इमारत वाढू लागली, आकार घेऊ लागली आणि सुमारे तीन महिन्यांच्या अवधीतच अहोरात्र घेतलेल्या परिश्रमांतून घाटकोपरनजीकच्या त्या ओसाड आणि रुक्ष भूखंडावर जनू १९६० मध्ये विद्याविहाराच्या 'कला आणि शास्त्र' महाविद्यालयाची तीन मजली टोलेजंग, देखणी व भव्य इमारत उभी राहिली !

विद्याविहार मधील
विद्या शाखा

विद्यासंस्कृतिशास्त्रकलानामग्रिमं च स्थानम्।
विद्याविहार इत्याख्यं निर्मितमिदं मन्दिरम्।।



ज्या ठिकाणी विद्या, संस्कृती, शास्त्र आणि कला यांना अग्रगण्य स्थान आहे असे विद्याविहार नावाचे विद्येचे मंदिर उभारले आहे.

विद्याविहार मधील विद्याशाखा

महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून शिक्षणक्षेत्रातील अनुभवी व विद्वान प्राध्यापक श्री. अमृतलाल याज्ञिक यांनी सूत्रे हाती घेतली.

दोन्ही विद्याशाखेतील मिळून सहाशे वीस विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाचे वर्ग सुरु झाले. उगमाजवळ कुठलीही नदी लहान असते, पुढे तिच्या प्रवाहप्रवासात अनेक लहानमोठे झरे, नाले, ओहोळ, ओढे आणि लहान लहान नद्या मिळतात व नदीचा प्रवाह विशाल बनतो. त्याचप्रमाणे विद्याविहारने प्रवर्तित केलेल्या शिक्षणसरितेला भावी काळात अनेक नवनवीन शैक्षणिक उपक्रमांचे प्रवाह येऊन मिळाले आणि आज सुरुवातीचा तो लहान प्रवाह गंगौघाप्रमाणे विशाल बनला आहे! प्रारंभीच्या 'कला आणि शास्त्र' या विद्याशाखांमध्ये आज हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या विद्याशाखांमध्ये एम.ए. आणि एम.एस्सीपर्यंत तथा पी.एचडी. या उच्च पदवीपर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

विद्याविहाराचे 'के. जे सोमैया कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स' महाविद्यालय भाषा शिक्षणाच्या संदर्भात अनेक विद्यालयांपैकी, जी काही थोडी विद्यालये असतील, त्यापैकी एक असून, या महाविद्यालयात इंग्रजी, संस्कृत, हिंदी मराठी आणि गुजराती या महत्वाच्या भाषा खास दर्जा राखून शिकवल्या जातात आणि पर्शियन, फ्रेंच, कन्नड आणि सिंधी या भाषा सर्वसामान्यपणे शिकवल्या जातात. त्याशिवाय बी.एस्सी परीक्षेसाठी भूशास्त्र हा विषय ऐच्छिक स्वरुपात उपलब्ध आहे.

महाविद्यालयाला अभिमान वाटावी अशी 'N.S.S.' आणि 'N.C.C.' युनिट्स आहेत. विद्यापिठीत आणि BN मध्ये ही दोन्ही युनिट्स आज अनेक वर्षे उत्कृष्ट युनिट्स म्हणून नावाजलेली आहते. 'N.C.C.' मधील काही कॅडेट्सनी तर उच्च दर्जाची कामगिरी बजावलेली आहे. १० वर्षे सतत पहिले पारितोषिक पटकावले आहे. श्री. विनोद नेब हा त्यापैकीच एक कुशल पायलट. भारत - पाकिस्तान संघर्षाच्या वेळी याने मोठ्या पराक्रमाने

पाकिस्तानी विमान पाडले. या शौर्याबद्दल त्याला भारताच्या राष्ट्रपतींकडून गौरवपूर्वक पारितोषिक देण्यांत आले.

महाविद्यालयात उपयुक्त असे काही उपक्रम राबविले जातात. 'दी टीचर - स्टुडंट गार्डड स्कीम, दी बुक - लोन स्कीम, व्होकेशनल गाईडन्स ब्यूरो, आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे दररोजची सामूहिक प्रार्थना, त्याचप्रमाणे भगवद्गीता आणि नैतिक शिक्षण यांचे वर्ग नियमितपणे चालविले जातात. या महाविद्यालयाचे हे वैशिष्टय म्हणावे लागेल.

१९६१ साली, म्हणजे दुसऱ्याच वर्षी, महाविद्यालयातील विद्यार्थी - संख्या हजाराच्यावर पोचली. याचाच अर्थ असा की, इकडील किरोल नामक गावाच्या व आसपासच्या भागातील रहिवशांची महाविद्यालयाची गरज व मागणी जुनीच होती. कुर्ला आणि घाटकोपर या रेल्वे स्टेशनांच्या मध्ये त्यांना आणखी एक सोयीस्कर असे रेल्वेस्टेशन हवे होते.

विद्याविहारने त्यांची ही मागणी उचलून धरली आणि मोठ्या नेटाने रेल्वे मंत्रालयाकडून तडीस नेली. तीन महिन्यांच्या कालावधीत 'विद्याविहार' याच नावाने एक रेल्वे स्टेशन बांधण्यात आले.

१९६१ सालाच्या सप्टेंबर महिन्यात तत्कालीन संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांच्या हस्ते या 'विद्याविहार' स्टेशनचे उद्घाटन झाले.

१९६२ च्या जून महिन्यात 'अध्यापन मंदिर' उभे राहिले. यालाच 'श्रीमती एस. के. सोमैया ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन' असे म्हटले जाते. अध्यापन मंदिर म्हणजे प्राथमिक शाळेतील शिक्षिकांना प्रशिक्षित करण्याचे महाविद्यालय. प्राथमिक शाळांमधून प्रशिक्षित शिक्षिकांची मोठी मागणी होती. ती पुरी करण्यासाठी व तरुण महिलांना त्यांची आर्थिक गरज भागविण्यासाठी त्या शिक्षिका म्हणून नोकरीस पात्र ठराव्यात, अशा हेतूने हे महाविद्यालय सुरु करण्यात आले.

अध्यापन मंदिर हे महाविद्यालय सर्व महाराष्ट्रात एकमेव ठरावे, अशी मराठी गुजराती, इंग्रजी आणि हिंदी अशी चार भाषांतील शिक्षणाची माध्यमे येथे महिला शिक्षिकांसाठी उपलब्ध आहेत.

प्रशिक्षणार्थी महिलांची वाढती उपस्थिती आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विनंतीवरुन महाविद्यालयाने एक वर्षाचा पत्राद्वारे शिक्षण देण्याचा 'कॉरस्पॉन्डस कोर्स' ही सुरु केलेला आहे.

ऑगस्ट १९६३ मध्ये तंत्रनिकेतन विद्यालय दी के. जे. सोमैया पॉलिटेक्निक या

नावाने सुरु झाले. वस्तुतः १९६३ सालच्या मे महिन्यात तंत्रनिकेतन विद्यालय सुरु करण्याबद्दलचा प्रस्ताव शासनाकडे मांडला होता. त्यावर सोमैया विद्याविहारवरील एक प्रकारच्या विश्वासाने केंद्र आणि राज्य शासनाने ताबडतोबीने मंजुरी दिल्याने कला आणि शास्त्र महाविद्यालयाच्या दक्षिण भागात याची सुरुवातही झाली. या तंत्रनिकेतनासाठी स्वतंत्र इमारतीचा पायाभरणी समारंभ २३ मे १९६५ रोजी तत्कालीन रेल्वेमंत्री श्री. एस. के. पाटील यांच्या हस्ते झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. डी. एस. देसाई हे होते. यात सिव्हिल, इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल अशा तीन शाखा प्रारंभी सुरु करण्यात आल्या होत्या. त्यानंतर लवकरच इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंट इंजिनिअरिंग आणि ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग असे सामाजिकदृष्टया अत्यंत गरजेचे विविध अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रस्ताव पाठविला.

'के. जे. सोमैया पॉलिटेक्निक' विद्यालयाची भव्य इमारत विद्याविहाराच्या भव्य नगरीत उभी आहे.

'ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेश'ला संलग्न अशा 'श्री. एस. के. सोमैया विनय मंदिर' या विद्यालयाची स्थापना १९६५ मध्ये झाली. १९७५ मध्ये यालाच जोडून ज्युनिअर कॉलेज सुरु करण्यात आले. प्राथमिक शाळेपासून ते शालान्त एस. एस. सी. परीक्षेपर्यंत आणि नंतर दोन वर्षे म्हणजे बारावीपर्यंतच्या सर्व तऱ्हेच्या शिक्षणाची सोय विनय मंदिर विद्यालय उपलब्ध झालेली आहे. त्यानंतर पालक वर्गाकडून होणाऱ्या मागणीची पूर्तता करण्याच्या उद्देशाने गुजराती माध्यमाची 'बालवाटिका' - के. जी. चे वर्ग विनय मंदिरामध्ये सुरु करण्यांत आले. १९७० साली अस्तित्वात आलेल्या बालवाटिकेमध्ये बालविकासाच्या विविध उपक्रमांबरोबरच संस्कृतची आणि इंग्रजी भाषेची ओळख करुन दिली जाते.

१९७२ साली विद्याविहारमध्ये 'वाणिज्य महाविद्यालय' - 'कॉमर्स कॉलेज' सुरु करण्यात आले आणि आधीच्या 'के. जे. सोमैया आर्टस आणि सायन्स कॉलेजच्या' ऐवजी 'के. जे. सोमैया कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स' आणि 'के. जे. सोमैया कॉलेज ऑफ सायन्स' अशी दोन वेगवेगळी महाविद्यालये अस्तित्वात आली.

विद्याविहारमधील विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन परगावांहूनच नव्हे, तर परदेशांतूनही शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय करण्याच्या दृष्टीने एक सहा मजली भव्य इमारतीत दोनशे सत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची उभारणी करण्यात आली. त्याचबरोबर अध्यापक - प्राध्यापक यांच्यासाठी निवास व्यवस्थाही करण्यात आली. या वसतिगृहाचा पायाभरणी समारंभ २ ऑक्टोबर १९६८ - 'गांधीजयंती'च्या दिवशी, तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

उद्योग - व्यवसायाच्या यशस्वितेसाठी सुविहित व कुशल व्यवस्थापन आणि अद्यावत तंत्रविज्ञान यांची जोड दिली पाहिजे, हे युग संगणकाचे आहे, याची दखल सोमैया उद्योगसमूहाचे प्रमुख व विद्याविहारचे उपाध्यक्ष डॉ. शांतिलालजी करमसीभाई सोमैया यांनी घेतली. काळाची चाहूल व मागणी त्वरेने टिपली आणि आपल्या विद्याविहार या शैक्षणिक प्रकल्पामध्ये या नववैज्ञानिक शिक्षणाचाही अंतर्भाव केला.

१९८१ मध्ये 'के. जे सोमैया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टजीज अॅन्ड रिसर्च' ही शिक्षणसंस्था उभी राहिली. गेल्या पंधरा वर्षात मुंबईतील व्यवस्थापनशास्त्राचे अध्ययन व संशोधन करणारी एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था, असा लौकिक या संस्थेने प्राप्त केलेला आहे. संस्थेमध्ये उपयुक्त अशा विविध अभ्यासक्रमांच्या अध्यापनाची सोय उपलब्ध केलेली आहे.

१९८१ साली 'सोमैया इन्टिटयूट ऑफ जरनॅलिझम अॅन्ड मास कम्युनिकेशन' ही अध्यापनसंस्था उभी ठाकली. वृत्तपत्र आणि जनसंपर्क यांना आज फारच महत्व आलेले आहे. हा एक स्वतंत्र व्यवसाय म्हणूनच पुढे आलेला आहे, आणि याची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबईतील अग्रेसर वृत्तपत्रे आणि या क्षेत्रातील सुप्रसिध्द अनुभवी पत्रकार यांचे सहकार्य या संस्थेने मिळविले आहे.

पत्रकारितेमधील एक वर्षाचा 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा कोर्स' संस्थेने सुरु केला असून गेल्या पंधरा वर्षात संस्थेने या क्षेत्रात उत्तम लौकिक साध्य केलेला आहे. या संस्थेत शिकून तयार झालेले कितीतरी तरुण विद्यार्थी आज विविध वृत्तपत्रांमधून व मासिकांमधून वार्ताहर, सहसंपादक म्हणून काम करीत आहेत.

१९८२ मध्ये विद्याविहारमध्ये 'सोमैया कॉम्प्युटर सेंटर'ची उभारणी झाली. संगणकविषयक आवश्यक ते सर्व प्रकारचे शिक्षण आणि संशोधन या संस्थेत आज पंधरा वर्षे सुरु आहे.

१९८३ साली 'के. जे. सोमैया कॉलेज ऑफ इंजिनिअरींग' ची प्रतिष्ठापना झाली. सोमैया विद्याविहार या शिक्षणप्रकल्पाच्या वाटचालीमधील इंजिनिअरिंग कॉलेजची उभारणी हा एक महत्वाचा टप्प मानला जातो. शिक्षणशाखेत इंजिनिअरींग कॉलेजची उभारणी आज फार निकडीची गरज निर्माण झालेली आहे, व समाजाकडून तशी मागणीही फार आहे. हे लक्षात घेऊनच विद्याविहारने हे महत्वाचे पाऊल टाकलेले आहे. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग,

प्रॉडक्शन इंजिनिअरींग आणि मशीन टूल इंजिनिअरींग अशा तीन विद्याशाखांचा चार वर्षांचा डिग्री कोर्स येथे उपलब्ध आहे.

१९८७ साली 'के. जे. सोमैया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल ट्रेनिंग ॲन्ड रिसर्च' या संस्थेचा शुभारंभ झाला. विविध प्रकारचे टेक्निकल कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी इथे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांमध्यील व्यावहारिक तंत्रज्ञानाविषयक कौशल्य वाढावे आणि त्यांच्या ठायी आत्मनिर्भरता निर्माण व्हावी हाच उद्देश या शिक्षणशाखेमागे आहे.

१९८८ साली 'के. जे. सोमैया इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट' या नावाची शिक्षणसंस्था साकार झाली. 'डोमेस्टिक ॲन्ड इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक', आणि 'प्रॉजेक्ट सिव्हिल ड्राफ्टस्मन' - असे दोन वर्षांचे कोर्सेस इथे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. 'ब्रिज कोर्स इन इलेक्ट्रॉनिक्स' - असाही एक अर्धवेळ शिक्षणाचा सायंकालीन कोर्स इथे चालविला जातो.

१९९० मध्ये अध्यापक महाविद्यालय (के. जे. सोमैया कॉलेज ऑफ कॉम्प्रिहेन्सिव एज्युकेशन, ट्रेनिंग ॲन्ड रिसर्च) या मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संस्थेची उभारणी झाली. येथे शिक्षणक्षेत्रातील बी. एड. या पदवीपर्यंतचे शिक्षण उपलब्ध आहे. शालेय शिक्षणातील उच्च दर्जाच्या शिक्षण पध्दतीचे व प्रवाहाचे शिक्षण शिक्षकांसाठी या संस्थेत उपलब्ध आहे. विशेष्ज्ञ म्हणजे संशोधनाचीही व्यवस्था आहे.

शिक्षणातील आधुनिक प्रवाह आणि मूल्ये - या विषयावर या संस्थेत परिसंवादही झाला होता. या महाविद्यालयाने डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन व्होकेशनल गाईडन्स ॲन्ड कौन्सेलिंग आणि एज्युकेशनल टेक्नॉलॉजी सेल तसेच व्हीडीओ लायब्ररी देखील विकसित केलेली आहे.

१९८९ मध्ये 'सोमैया भारतीय संस्कृतिपीठ' या संसथेची स्थापना झाली. आपल्या प्राचीन ग्रंथांमधून जे ज्ञानधन आहे ते अध्ययनपूर्वक जाणून घेणे आणि शिक्षकाच्या मुखातून नवीन पिढीपर्यंत पोचविणे हे या पीठापुढील उद्दिष्ट आहे.

या अध्ययनासाठी वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र आणि अन्य प्राचीन भारतीय ग्रंथ यावर आधारित असा एक अभ्यासक्रम संस्कृतिपीठाने तयार केलेला आहे. भारतीय संस्कृतीने जपलेल्या मूल्यांचा व जीवननिष्ठांचा प्रसार समाजाच्या सर्व स्तरांवर करणे ही काळाची गरज आहे. प्राथमिक शाळांमधील संस्कारक्षम वयाच्या मुलांपासूनच या प्रकारच्या मूल्यशिक्षणाचे बीज रुजले पाहिजे हे करमसीभाईंच्या द्रष्ट्या नजरेने अचूक जाणले व या विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन त्यांना घडवणाऱ्या शिक्षकांसाठी या अभ्यासक्रमाची आखणी

करण्यांत आली. या उपक्रमात दाखल होणाऱ्या स्नातक शिक्षकाची जबाबदारी निवास व भोजनासह सोमैया ट्रस्ट स्वीकारत असते. त्यामुळे मुंबई बाहेरच्या, इतकेच नव्हे तर भारताबाहेरच्या संस्कृती अभ्यासकांनाही या उपक्रमाचा लाभ घेता येतो. हा अभ्यासक्रम पूर्णपणे नि:शुल्क आहे हे विशेष !

संस्कृतिपीठाच्या अभ्यासक्रमाला महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे. याचप्रमाणे संस्कृतिपीठात सुट्टीच्या कालावधीत बी.एड. कॉलेजमधील प्राध्यापकांसाठीही भारतीय संस्कृतीचा अभ्यास चालविला जातो. तसेच आय.ए.एस. सारख्या प्रशासकीय सेवांसाठी संस्कृत विषयाचे मार्गदर्शन दिले जाते. संस्कृतिपिठाला महाराष्ट्र शासनाने सांस्कृतिक व संशोधन संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे. विद्याक्षेत्रातील प्रतिथयश संस्थांच्या सहकार्याने संस्कृतिपीठ नियमितपणे राष्ट्रय तसेच आंतरराष्ट्रीय परिसंवाद व विद्वत्सभा भरवत असतो.

१९९० साली 'के. जे. सोमैया इंडॉलॉजिकल रिसर्च इन्टिट्यूट' या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेने देखील खालील प्रकल्प हाती घेतलेले आहेत.

१. ऋग्वेदाचे श्री अरविंदांच्या विचारप्रणालीवर आधारित अध्यात्मिक भाष्य.
२. धर्मशास्त्रांचे पुनर्भाष्य, म्हणजेच अचूक सामाजिक इतिहास आणि
३. पुराणांच्या व विशेषत: अग्निपुराणातील खास संदर्भांसह वनस्पतीविद्येचे अध्ययन.

भावी काळात आणखी बरेच प्रकल्प हाती घेण्याचे संस्थेने ठरवले आहे.

'कलाभवन' - या संस्थेची अल्प प्रमाणावरील सुरुवात १९६१ साली झाली. शिवणकाम आणि कशिद्याचे नक्षीकाम तसेच फॅन्सी वर्क यांचे वर्ग सुरु करण्यात आले. महाराष्ट्र शासनाचे तांत्रिक शिक्षण मंडळाने मान्यता दिलेले डिप्लोमा कोर्सेस कलाभवनमार्फत घेतले जातात.

'सुरुची' या संस्थेची १९६९ साली झाली. सुरुचीच्या स्थापनेमागे प्रामुख्याने दोन उद्देश आहेत. एक, उत्तम प्रकारची लोणची आणि खाद्यपदार्थ बनविले आणि दोन, गरीब व गरजू महिलांना रोजगार पुरवणे.

'कलाकेंद्र' हा सुध्दा सुरुचीचाच एक लहानसा विभाग आहे. या केंद्रामार्फत हस्तकला कौशल्याची कामे गरीब महिलांना उपलब्ध करुन दिली जातात.

दिनांक ३० एप्रिल १९९३ रोजी स्वामी तद्रूपानंदजी यांच्या शुभहस्त 'दि के. जे. सोमैया योग अकादमी'चे उद्घाटन झाले. 'योग-थिअरी ॲन्ड प्रॅक्टिस' असे योगशास्त्रातील

शैक्षणिक कार्यक्रम शिक्षकांसाठी या संस्थेमार्फत आयोजित केले जातात.

दिनांक ६ डिसेबर १९९३ साली 'के. जे सोमैया सेंटर ऑफ बुध्दिस्ट स्टडीज' या संस्थेचे उद्घाटन तिबेटी धर्मगुरु श्री. दलाई लामा यांच्या शुभहस्ते झाले. बुध्दिझम हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग असल्याने त्याच्या अध्ययनाची सोय या संस्थेद्वारा करण्यात आली आहे. संस्थेतर्फे ६ ते १० मार्च १९९५ या अवधीत विद्याविहार येथे शुचिन युनिव्हर्सिटी क्योटो, आणि मुंबई विद्यापीठाच्या तत्वज्ञान शाखेच्या सहकार्याने एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद भरविला होता. बौधद तत्वज्ञानावर प्रत्येक महिन्यात विद्वानांची व्याख्यानेही येथे आयोजित केली जातात.

विद्याविहारचा शैक्षणिक परिसर आणि व्याप आज केवढातरी वाढलेला आहे. विविध प्रकारच्या भव्य शैक्षणिक इमारतींनी व त्यामधून चालणाऱ्या विविध तऱ्हेच्या विद्याशाखांनी विद्याविहार बहरुन गेले आहे.

एके काळी रुक्ष व ओसाड पडलेल्या या भूखंडावर विद्याविहारची मुहूर्तमेढ रोवली गेल्यानंतर या पस्तीस वर्षात - जवळपास तीन तपांच्या काळानंतर विद्याविहारचा हा विस्तीर्ण परिसर विद्यार्थी, शिक्षक, अध्यापक, अतिथी, कर्मचारी आदींनी गजबजून गेला आहे. एक सळसळते चैतन्य विद्येच्या रुपाने विद्याविहारच्या या परिसरात जिवंत व्रतोत्सवासारखे निरंतर नांदते आहे. करमसीभाईंच्या भव्य शैक्षणिक स्वप्न मूर्तिमंत साकार झालेले आहे. ज्ञानदेवांनी आपल्या पसायदानात 'चेतना चिंतमणीचे गाव' असे म्हटले आहे, ते गाव विद्याविहारच्या रुपाने साकार झालेले आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

आपल्या देहू गावाबद्दल कृतज्ञतेने 'धन्य देहू गाव' असे उद्गार एका अभंगात तुकाराममहाराजांनी काढले आहेत. अशीच धन्यता करमसीभाईंना विद्याविहाराचे आजचे स्वरुप पाहून निश्चिंतपणाने व्यक्त करता येईल,

'धन्य माझे विद्याविहार'

धन्य अशा विद्याविहारच्या वटवृक्षाला १९९१ सालच्या जुलै महिन्यापासून आणखी एक विद्याशाखा फुटलेली आहे.

विद्याविहारपासून सहा किलोमीटर अंतरावर मुंबई शहरातील सायन भागात 'के. जे. सोमैया मेडिकल कॉलेज' व 'के. जे. सोमैया हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर' अशाच एका प्रशस्त भूभगावर उभे ठाकले आहे. सोमैया ट्रस्ट आणि सोमैया विद्याविहारची ही उणीव भरुन काढून आधिक्य वाढवणारी ही बावीसावी संस्था.

मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेच्या नियमानुसार सर्व आवश्यकता या संस्थेने पूर्ण केल्या असून मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यताही मिळविली आहे. सोमैया मेडिकल कॉलेजमधून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अमेरिकेतील एफ.एम.जी. या उच्च श्रेणीतील परीक्षेला पात्र ठरविले जाईल.

गोरगरिबांना मोफत असे सातशे खाटांचे हॉस्पिटल अस्तित्वात आले असून शंभर

विद्यार्थी मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत. हे मेडिकल कॉलेज मुंबई विद्यापीठाशी संलग्न असून सुरुवातीला पहिल्या वर्षी शासकीय अनुदान न स्वीकारता सुरु केले आहे. अशा प्राकरचे विनाअनुदानावर सुरु झालेले मुंबई शहरातील हे पहिलेच खाजगी मेडिकल कॉलेज असावे. गेल्या सहा वर्षात 'सोमैया आयुर्विहार' - 'Centre of Health Care' या नुतन प्रकलपची विविध उपचारपध्दतीमधील प्रगीत प्रशंसनीय आहे. या आरोग्यविषयक संस्थांना 'सोमैया आयुर्विहार' या नावाने संबोधिले आहे.

रोटरी क्लब ही एक नावाजलेली मानव सेवेसाठी तत्पर असणारी अशी जागतिक संघटना आहे. जगभर रोटरीच्या शाखोपशाखा पसरलेल्या असून कोट्यवधी रोटेरीयन या संस्थेचे सभासद आहेत. 'रोटरी इंटरनॅशनल' असेच या संस्थेचे नाव आहे.

रोटरी इंटरनॅशनल आणि मुंबई शहरातील रोटरी क्लबच्या शाखा यांनी 'आय बँक असोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या सहाय्याने मुंबई शहरात अंधांसाठी 'आय बँक प्रोजेक्ट' - 'नेत्रपेढी प्रकल्प' सुरु करण्याचे योजिले आहे. आणि 'के. जे. सोमैया मेडिकल ट्रस्ट'ला या प्रकल्पासाठी सहकार्याचे आवाहन केले. कवेळ मानसेवेसाठीच निरपेक्ष बुध्दीने संस्थापिलेल्या या ट्रस्टचे संस्थापक करमसीभाई यांनी अत्यंत त्वरेने या आवाहनाला सक्रीय प्रतिसाद दिला आणि सोमैया आयुर्विहारच्या आवारतील हॉस्पिटलमध्ये 'सोमैया रोटरी आय बँक प्रॉजेक्ट'ची स्थापना झाली. या प्रकल्पाचे उद्घाटन १६ डिसेंबर १९९२ रोजी जुहू-मुंबई येथील सेन्टॉर हॉटेलमध्ये रोटरी इंटरनॅशनलचे १९९३-९४ चे अध्यक्ष डॉ. रॉबर्ट आर. बार्थ यांच्या हस्ते झाले. या नेत्रपेढीचे कामही समाधानकारक चाललेले आहे.

विद्याविहारमधील वातावरण विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक व शैक्षणिक जीवन समृध्द करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या कार्यक्रमांची सतत रेलचेल असते. सेमिनार्स, वर्कशॉपस, ओरिएंटेशन प्रोग्राम्स आणि कॉन्फरन्सेस वेळोवेळी भरविल्या जातात.

University Eduction in Prospect and REstrospect,' 'Sociological Dimensions of Rural Development,' 'Freedom struggle in Third World countries,' 'Contemporary Women Novelists,' 'Indo-English Literature,' 'Management of Chage' and the 'Silver Jubilee Conference of the Indian Association of American Studies.' इत्यादी काही उल्लेखनीय कार्यक्रम.

आणखी विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे कला आणि शास्त्र महाविद्यालयाचे अमेरिकेतील - The University of South Carolina (Spartanburgh), The Breavard Community College, at Cocoa in Floria and the Waukesha County Technical College in Wisconsin State. - आदी नामवंद विद्यापीठांशी असलेले शैक्षणिक सहकाय (Academic collaboration).

महाविद्यालयाच्या उच्चविद्याविभूषित प्राध्यापकांमध्ये काही फुलब्राईट स्कॉलर्स

आणि टीचर्स असे आहेत की ज्यांना अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स आणि आशिया व आफ्रिकेमधील विकसनशील देशांमधून अध्यापनासाठी निमंत्रित केले जाते. शिक्षकांपैकी बहुसंख्य शिक्षकांनी निरनिराळ्या विषयात डॉक्टरेट डिग्री मिळविलेली असून काहीजण तर मंबई विद्यापीठाचे पी.एच.डी. चे मान्याप्राप्त मार्गदर्शन आहेत. विद्याविहारच्या विद्यानगरीला शंकराचार्य, दलाई लामा, स्वामी चिन्मयानंद आणि पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यासारख्या धार्मिक नेत्यांनी भेट देऊन आशीर्वाद दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सर्वश्री मोरारजी देसाई, डॉ. करणसिंग, एम.एस. जोशी, पी. बी. गजेंद्रगडकर, पी. एल. देशपांडे, मधुकरराव चौधरी, एम. डी. श्रॉफ निजलिंगप्पा, वीरेंद्र पाटील, एस. के. पाटील, जी. डी. पारीख, जीवराज मेहता आदी राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रसंगोचित भेटी देऊन समाधान व्यक्त केले आहे.

विद्याविहारच्या आवारात नेहमीच काहीना काही तरी सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केलेले असते. गांधी शताब्दीच्या निमित्ताने गुजरातीचे थोर कवी व शिक्षणतज्ज्ञ श्री. उमाशंकर जोशी यांचे व्याख्यान झाले, तर कवी केशवसुत यांच्या शताब्दीच्या निमित्ताने मराठीतील लोकप्रिय लेखक पु.ल. देशपांडे यांचे व्याख्यान झाले होते आणि असे कितीतरी कार्यक्रम झाले आहेत, होत आहेत.

एक विशेष उल्लेखनीय कार्यक्रम २० मार्च १९७५ रोजी विद्याविहारमध्ये झाला आणि तो म्हणजे कन्नड भाषेतील साहित्य अकादमी आणि ज्ञानपीठ या मान्यवर संस्थांनी पारितोषिक देऊन सन्मानित केलेले थोर कविवर्य डॉ. डी. आर. बेन्द्रे यांच्या अभिनंदनाचा समारंभ. याप्रसंगी अनेक वक्त्यांनी कविवर्यांच्या साहित्यसेवेचा आणि सर्वांगीण समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा गौरव तर केलाच; शिवाय कविवर्यांच्या अभिवादनपर केलेल्य संस्कृत, हिंदी, मराठी कवितांसह कविवर्यांच्या काही निवडक कवितांचा संस्कृत व हिंदी भाषेतील अनुवाद करुन एक छोटासा काव्यगुच्छ प्रसिध्द करण्यात आला होता. या समारंभाचे वेळी सोमैया विद्याविहारच्या वीतने कविवर्यांना भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती श्री. बी.डी. जत्ती यांच्या हस्ते गौरवपूर्वक मानपत्रही समर्पित करण्यात आले.

कन्नड भाषेतील दुसरे एक तरुण कवी आणि कादंबरीकार श्री. अनंतमूर्ती ह्यांना ज्या वेळी ज्ञानपीठाने सन्मानपूर्वक पारितोषिक दिले त्या वेळी १९९५ मध्ये विद्याविहारनेही त्यांना निमंत्रित करुन त्यांचा भव्य सत्कार केला होता.

विद्याविहारचे संस्थापक श्रीमान करमसीभाई सोमैया यांनी आपल्या संस्थेतील

विद्यार्थ्यांना दिलेला संदेश असा आहे.

MESSAGE FROM THE FOUNDER

SHRI KARAMSHI J. SOMAIYA

TO THE STUDENTS

My dear young students,
Welcome to the Institutions of the Vidyavihar.
Your finest hour is here
The future belongs to you.
Let us all zealously work together and
dedicate ourselves to build India of our dreams.

Remember,
Nothing was ever achieved without hard work.
Be bold but be not bowled over.
Let ‘truth’ and ‘duty’ be your watchwords.
Never despair in the face of setbacks.
Keep Courage and continue to work with Fortitude.
Have faith in yourselves and in the Almighty.
Strive for Your ‘goals’ and the ‘future’ is yours!

❖

आठवणीतील विद्याविहार

सा रम्या नगरी।

ती रम्य नगरी .....

आठवणीतील विद्याविहार

'न मानुषात् परमो धर्मः।' - माणसाहून म्हणजेच मानवसेवेहून श्रेष्ठ असा अन्य धर्म नाही. या श्रद्धेनेच करमसीभाईंनी 'विद्या विहार' आणि 'आयुर्विहार' या शिक्षण आणि सेवारत अशा प्रकल्पांना तन-मन-धन समर्पित करुन जोपासले आहे. प्रकल्पाच्या प्रारंभी यासाठी किती व कसे प्रयत्न केले याची माहिती त्यावेळच्या काही संबंधित व्यक्तिंच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यांतून करमसीभाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रयत्नशील पैलू प्रकट होतो.

प्राचार्य अमृतलाल याज्ञिक यांनी सांगितले, "एकदा रुईया कालेजमध्ये एका समारंभसाठी करमसीभाई आले होते. माझी त्यांची भेट झाली आणि त्याचवेळी त्यांनी मला आपण लौकरच सुरू करीत असलेल्या विद्याविहार संस्थेमध्ये 'कला आणि शास्त्र' या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून यावे असे सुचविले. तेव्हा मी त्यांना सांगितले की यासाठी 'शिक्षण प्रसारक मंडळा'ची अनुमती घ्यावी लागेल. कारण मी इथे केवळ प्राचार्य नसून व्यवस्थापकीय प्रमुखसुद्धा आहे. संस्थचा 'लाईफ मेंबर'पण आहे.

करमसीभाई म्हणाले, परमेश्वराने मला भरपूर पैसे दिलेले असून आता मला शिक्षणासाठी चांगले कार्य करण्याची इच्छा आहे. आपण जर आमच्या संस्थेत आलात तर आम्ही तुम्हांला तुमच्या मागणीनुसार वेतन देऊ. मी त्यांना म्हणालो की मला जास्त पगाराची अपेक्षा नाही. काही ध्येयाने मी संस्थेत येईन.

त्यानंतर संस्थेने मला आपल्या सेवेतून मुक्त करावे यासाठी करमसीभाईंनी शिक्षण प्रसारक मंडळीकडे पत्र पाठवले. मंडळाने मला आपल्या सेवेतून मुक्त करण्यास नकार दिला. पण करमसीभाई अत्यंत आग्रहावरुन मी माझी लाईफ मेंबरशिप व प्राचार्यपद यांचा राजीनामा देऊन या संस्थेत आलो.

जून १९६० मध्ये कॉलेज सुरू केले. त्यावेळी इमारतीचे बांधकाम चालू होते. आम्ही विद्यार्थ्यांना प्रवेश देत होतो. करमसीभाई त्यावेळी उपस्थित राहून जातीने लक्ष घालत असत. खरे तर देणगीदार अशा कामात इतके लक्ष घालत नसतात. उद्घाटनाच्यावेळी मी माझ्या

प्रास्ताविक भाषणात, करमसीभाईंना शैक्षणिक क्षेत्रात शिक्षणाबरोबरच संस्कृती संवर्धनाचे आणि सामाजिक मूल्यांच्या जोपासनेचेही कार्य करावयाचे आहे आणि या हेतूनेच त्यांनी आपल्या कॉलेजला मोठी देणगी दिलेली आहे, असे म्हणालो होतो. पण त्यांना मी देणगीदार म्हणालो हे काही आवडले नव्हते. कारण त्यांचे म्हणणे असे की मी स्वत:च ही शिक्षणसंस्था उभारीत आहे. केवळ देणगीदार नाही.

शैक्षणिक संदर्भात करमसीभाईंची काही मते होती. त्यांना मुला-मुलींचे सहशिक्षण मान्य नव्हते. मुला-मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्यावेळी किंवा नाटकात एकत्र काम करणे पसंत नव्हते. शैक्षणिक आवारात धूम्रपान करण्यास त्यांची सक्त मनाई होती. मुलांनी केस वाढवणे आणि मुलींनी केस कापणे तसेच आखूड कपडे घालणे वगैरे फॅशनच्या नावाखाली चालणारे प्रकारही त्यांना आवडत नसत. सामूहिक प्रार्थनेला व नीतिशिक्षणाच्या पाठाला सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहिलेच पाहिजे असा त्यांचा सक्त कटाक्ष होता. करमसीभाई ज्या उद्दिष्टाने ही संस्था चालवू इच्छित होते त्याच्याशी त्यांचे त्यापैकी काही विचार स्तुत्य असेच होते. पण काही विचारांबाबत मात्र प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे दुमत होते. यांवरून कधीकधी मतभेदही प्रकट होत असत.

एकदा मुंबई विद्यापीठाचे रेक्टर, थोर विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ श्री. गोवर्धनभाई पारीख हे माझ्या ऑफिसमध्ये येऊन रेकॉर्ड तपासत होते. ते धूम्रपान करीत असत. त्यावेळीही त्यांनी सिगारेट शिलगावली. तेव्हा मी त्यांना कॉलेजचा नियम सांगून सिगारेट ओढण्यास प्रतिबंध केला तेव्हा ते म्हणाले, 'माझी ही सवय आहे. शिवाय मी विद्यार्थ्यांसमोर सिगारेट ओढत नाही. जे कॉलेजचे नियंत्रण करतात त्यांच्याकरता तुमचे हे नियम फारच जाचक आहे. विद्यार्थ्यांसाठी हे नियम ठीक आहेत.'

अशा प्रकारे सिगारेट ओढण्यास प्रतिबंध केल्याचे श्री. पारीख यांना आवडले नाही. त्यांना वरिष्ठ मंडळींनी सर्व गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी ही बाब फारच गंभीरपणे घेतली होती.

अशा काही गोष्टींवरून करमसीभाईंच्या व माझ्या दृष्टीकोनात मतभेद होते. व्यवस्थापनावरूनही एकदा त्यांच्या माझ्यात असाच मतभेद झाला आणि मग मी त्यावरून राजीनामा दिला. तथापि त्यांचे माझे वैयक्तिक संबंध सौहार्दाचेच आहेत."

गांधीवादी कार्यकर्त्या श्रीमती उषा मेहता म्हणाल्या, ''सोमैया विद्याविहारचे सेक्रेटरी श्री. पी. एम. कावडिया आणि मी कॉलेजमध्ये एकत्र होतो. मला करमसीभाईंच्याबद्दल, भारतीय संस्कृती व हिंदू धर्म याविषयीचा त्यांचा अभिमान आणि त्यांच्या प्रसारासाठी ते करीत असलेले विविध प्रयत्न यांबद्दल श्री. कावडियांकडून ऐकायला मिळाले आणि प्रत्यक्ष भेटीपूर्वीच करमसीभाईंच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली. १९६० साली करमसीभाईंची व माझी पहिली भेट झाली. त्यांचे प्रसन्न व प्रभावी व्यक्तिमत्त्व पाहताच

त्यांना आपण साष्टांग नमस्कार केला पाहिजे, असे वाटले. विद्याविहारच्या संस्थापक सदस्य मंडळावर मला घेतले होते.

श्री. मनसुखलाल जव्हेरी हे गुजरातमधील एक प्रसिद्ध लेखक व वक्ते होते. एका कॉलेजचे ते प्रिन्सिपॉलही होते. त्यांना आपण आपल्या कॉलेजात आणावे अशी करमसीभाईंची खूप इच्छा होती. म्हणून आम्ही दोघे एकदा त्यांना भेटायला गेलो होतो. मनसुखभाईंना सिगारेट ओढण्याची सवय तर करमसीभाईंना सिगारेटविषयी तिटकारा. शिवाय ते आपल्या तत्त्वापासून मुळीच न ढळणारे. त्यामुळे ते काही जमले नाही.

विद्याविहारच्या संस्थापक सदस्य मंडळावर असल्यामुळे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला लाभली होती. त्या वेळी माझ्या असे लक्षात आले की करमसीभाईंना माणसाची पारख, त्याला पाहताक्षणीच चटकन करता येत असे आणि त्यामुळेच त्यांनी आपल्या विशाल परिवारात अनेक उत्तमोत्तम माणसे जोडली आहेत. त्यांच्या पसंतीनुरुप चांगल्या माणसांच्या व्यक्तीमत्त्व विकासाला ते सर्व तऱ्हेने वाव देत असत. त्यांचा नेहमी असा आग्रह असे की उत्कृष्ट व्यक्तींना कॉलेजमध्ये आणा. पैशाच्या खर्चाबद्दल चर्चा करू नका. आपलं कॉलेज - आपली शिक्षणसंस्था ही एक आदर्श शिक्षणसंस्था बनली पाहिजे. करमसीभाईंच्या ठायी ओतप्रोत असे विद्याप्रेम आहे, त्यापुढे त्यांना पैशाचा लोभ किंवा मातबरी वाटत नाही. शिक्षणसंस्था हे त्यांना एक पवित्र मंदिर वाटते. तिथे धूम्रपानासारखी व्यसने करू नयेत असे त्यांचे मत आहे. तुमची व्यसने किंवा तुमच्या सवयी तुम्ही वैयक्तिरित्या तुमच्या खाजगी जीवनात फार तर चालवा. तुम्हांला तुमचे त्या ठिकाणी व्यक्तिगत स्वातंत्र्य आहे. पण शैक्षणिक संस्थेत किंवा सार्वजनिक जीवनात तुम्ही एक शिस्त पाळलीच पाहिजे आणि हा नियम, व्यक्ती कितीही मोठी असली तरी सर्वांना सारखाच लागू होतो. एरवी मृदू, सौजन्यशील असणारे करमसीभाई अशा प्रकारच्या तत्त्वपालनाच्या बाबतीत मात्र कठोर आहेत.

हिंदू धर्म व संस्कृती याविषयी त्यांना फार आस्था आहे. गरिबीमुळे लोकांना धर्मांतर करावे लागते याचे त्यांना फार दु:ख वाटते. धर्म व सामाजिक आणि राजकीय जीवन यांची गल्लत होता कामा नये; केवळ मतांसाठी एखाद्या धर्मीयांना इतरांपेक्षा जादा सवलती देऊ नयेत असेही त्यांना तीव्रतेने वाटते. सर्वश्री पांडुरंगशास्त्री आठवले, डोंगरे महाराज, मुरारीबापू आदींच्या निकट सहवासामुळेही त्यांच्या मनावर हा पगडा जास्त असावा.

एकदा एखादे काम करावयाचे ठरले म्हणजे ते करण्यासाठी करमसीभाई तसूभरही मागे न राहता सर्व शक्तीनिशी अग्रभागी राहतात. त्यांच्या मनीमानसी मानवतेबद्दल एवढा जिव्हाळा जिवंत आहे की आपला एखादा शत्रू जरी एखाद्या अडचणीत सापडला असला तरी ते त्याच्या साहाय्यासाठी धावून जातात, अशी कितीतरी उदाहरणे त्यांच्या जीवनात आढळतात.

विद्यार्थ्यांनी विद्यासंपन्न होऊन आपल्या पायावर उभे राहिले पाहिजेच, पण त्याचबरोबर देशालाही गौरवशाली करण्यात भाग घेतला पाहिजे; उत्तम चारित्र्यवान नागरिक बनले पाहिजे असे त्यांना मोठ्या कळकळीने वाटते.

करमसीभाईंप्रमाणेच त्यांच्या पत्नी सौ. साकरबाई यादेखील प्रपंच आणि परमार्थ, अतिशय साधेपणाने राहून, मोठ्या दक्षतेने करीत असत. त्या एक आदर्श पत्नी आणि माता होत्या."

अध्यापक महाविद्यालयाच्या श्रीमती जसवंतीबेन देसाई म्हणाल्या, "माझी मैत्रीण उषाबेन मेहता हिने मला नोकरीच्या संदर्भात विद्याविहारकडे अर्ज करायला सांगितल्यावर मी तसा अर्ज केला होता. त्यांना बेसिक ट्रेनिंग झालेले शिक्षक पाहिजे होते. माझी मुलाखत करमसीभाईंनीच घेतली. त्यांना पाहून मला नवलच वाटले होते. कारण त्यांनी खादीचे सुती कपडे घातलेले होते; आणि मी तर ऐकले होते की ते खूप श्रीमंत आहेत म्हणून. त्यांच्या साधेपणाची व शिक्षणाबद्दलच्या कळकळीची छाप माझ्या मनावर पडल्याशिवाय राहिली नाही. मुलाखतीनंतर २० जून १९६२ रोजी माझी अध्यापक म्हणून नेमणूक झाली. त्यानंतरच्या काळात त्यांची गाठभेट वारंवार होऊ लागली. शिक्षणाविषयी चर्चाही होऊ लागली. करमसीभाईंच्या मनात प्रत्येक भाषेबद्दल प्रेम व आदर आहे. गुजराती, हिंदी, इंग्रजी, मराठी, संस्कृत आदी सर्व भाषांमधून शिक्षण झाले पाहिजे असे त्यांना वाटते. एखाद्या विषयासाठी अगदी दहा विद्यार्थी असले तरी वर्ग चालवावा असा त्यांचा आग्रह असे. कॉलेजमध्ये सर्व भाषाभ्यासांच्या इमारती असाव्यात व मध्ये वाचनालय असावे; शिक्षक, अध्यापक, प्राध्यापक व कर्मचारी यांच्यासाठी सर्व सोयींनी युक्त अशी निवासव्यवस्था असावी; नियत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विविध सांस्कृतिक उपक्रम पुष्कळ असावेत, असे त्यांना वाटते. परदेशातील अशा प्रगत शिक्षणसंस्था त्यांनी मुद्दाम जाऊन पाहिलेल्या आहेत व त्यांची माहितीही मिळवलेली आहे.

गणित, शास्त्र या विषयांवर तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्रभाषा हिंदी व संस्कृत या विषयांवर अधिक भर असावा असे त्यांचे मत आहे. भारतीय संस्कृती व धर्म याविषयी त्यांच्या मनात फार मोठा आदर वसत आहे व यांच्या प्रसारासाठी कितीही खर्च करावा लागला तरी त्यासाठी त्यांची तयारी असेल. त्यातूनच त्यांचे काही आग्रहही आहेत. त्यापैकीच एक म्हणजे मुलीच्या हातात बांगड्या व कपाळावर कुंकू असले पाहिजे हा होय.

करमसीभाईंना माणसाची पारख फार आहे. एखाद्या व्यक्तीमध्ये उत्तम सद्‌गुण आढळले तर ते त्या व्यक्तीला प्रोत्साहित करत असत. एखाद्या गरीब विद्यार्थ्यात जर हुशारी व अध्ययनशीलता हे गुण आढळले तर ते त्याच्या शिक्षणाचा सर्व खर्च करीत असत.

करमसीभाई विद्याविहारमध्ये वारंवार येत असत. आल्यानंतर सगळीकडची स्वच्छता ते बारीक नजरेने न्याहाळत असत. त्यांना कुठे थोडीशीसुद्धा धूळ खपत नसे. तसेच अगदी लहानसहान गोष्टींकडेही त्यांचे बारीक लक्ष असे. एकदा ते आले असताना व खोलीत कोणी नसताना खोलीमधला पंखा चालू होता. तेव्हा त्यांनी त्यावर नजर ठेवणाऱ्या शिपायाला बोलावून त्याची ही चूक दाखवून दिली.

शिक्षणाच्या संदर्भात जर कधी काही अडचण निर्माण झाली तर प्रमिलाबेन पारेख व मी त्यांच्याकडे जात असू. त्यावेळी ते आमची अडचण शांतपणाने समजावून घेत असत आणि तातडीने पण विचारपूर्वक ती अडचण दूर करीत असत. त्वरीत निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्या ठायी मोठी आहे. शिक्षणक्षेत्रात मी जे काय केले व शिकले ते करमसीभाईंच्याकडूनच मला शिकायला मिळालेले आहे.

करमसीभाईंच्याप्रमाणेच त्यांच्या घरातील सर्व मंडळीही अतिशय स्वागतशील आहेत; प्रेमळ आहेत. मी जरी त्यांच्याकडे नोकरी करीत होते, तरी त्यांनी नोकर म्हणून कनिष्ठ प्रतीची वागणूक मला कधी दिली नाही आणि म्हणूनच माझे वडील मला सांगत असत की, शेटजींकडून एका कामाचा पगार घेत असलीस तर तू त्यांचे दीडपट काम केले पाहिजे.

मध्यंतरी मला डोळ्यांचा त्रास होत होता. ऑपरेशन करावयाचे होते. करमसीभाईंनी मला सांगितले की तुम्ही कॉलेजची काही काळजी करू नका. डोळ्यांची काळजी घ्या. त्यांनीच मग एका नेत्रतज्ज्ञ डॉक्टरची तपासणीसाठी वेळ घेतली व आपल्या पत्नी सौ. साकरबेन यांना माझ्याबरोबर पाठवले. इतकी आत्मीयता त्यांच्या ठायी आहे."

गुजरातमधील सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा. सुरेश दलाल करमसीभाईंच्याविषयी आदर व्यक्त करून म्हणाले, "मला त्यांच्याविषयी खूप आदर वाटतो. कारण नावाप्रमाणेच ते कर्मयोगी आहेत. उद्योगधंद्यात मिळणारा पैसा ते सामाजिक कामासाठी वापरतात. हाती आलेली लक्ष्मी महालक्ष्मी म्हणून उपयोगात आणतात. धर्म व संस्कृती, तसेच संस्कृत भाषा याबद्दल त्यांना खूप जिव्हाळा वाटतो. संस्कृत भाषेचा सर्वत्र प्रसार व्हावा यासाठी ते खूपच प्रयत्नशील आहेत.

मी जेव्हा सोमैया कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत होतो तेव्हा विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आम्ही मोठ्या उत्साहाने योजीत असू व ते पार पाडीत असू. एकदा आम्ही गाण्याचा कार्यक्रम ठेवला होता. त्यात मुले व मुलीसुद्धा भाग घेणार होत्या. तेव्हा प्राचार्य म्हणाले, 'करमसीभाईंना हे आवडणार नाही,' मग मी करमसीभाईंनाच भेटलो व आमच्या कार्यक्रमाची सविस्तर रूपरेखा समजावून दिली. ती त्यांना आवडली. आमचा योजिलेला कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला. म्हणून मला काही काही वेळेस असे वाटते की लोक करमसीभाईंना नीट समजून न घेताच त्यांच्याबद्दल विनाकारण गैरसमज करून घेतात

आणि तो पसरवितात.

करमसीभाईंचे सुपुत्र श्री. शांतिलालजी हे तर माझे चांगले मित्र आहेत. त्यांच्याबरोबर मी जिनिव्हापर्यंत प्रवास केलेला आहे. त्यांना शिक्षण, संस्कृती, संगीत, साहित्य याविषयी खूपच आस्था आहे. त्यांच्या पत्नी सौ. मायाबेन व कन्या हरिणाक्षी याही उत्तम गातात.

एकदा त्यांच्या घरी भजन-गायनाचा कार्यक्रम होता. त्यावेळी हरिणाक्षीने एक गझल गायली. करमसीभाईंना ते आवडले नाही. ते कार्यक्रमातून निघून गेले. त्यांना घर किंवा कॉलेज हे आश्रमासारखेच वाटते. त्यामुळे तिथल्या व्यक्तींवर काही बंधने येतात. कॉलेजमधील विद्यार्थी आता गोष्टी ऐकायला तयार होत नाहीत. अशा संदर्भात माझेही त्यांच्याशी काही मतभेद आहेत, पण म्हणून मला त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आदरात कसलीही उणीव भासत नाही."

श्री. एम. एन. पंड्या म्हणाले, "१९६० मध्ये कॉलेज उघडल्यानंतर नोकरीत असताना करमसीभाईंची व माझी भेट झाली. उद्योगधंद्यातील त्यांचे वरिष्ठ स्थान लक्षात घेता ते मला अतिशय प्रेमळ व मनमिळाऊ वाटले.

कॉलेजसाठी जागा निवडण्यापासून ते कॉलेजमधील वातावरण, शिस्त व विविध शैक्षणिक-सांस्कृतिक प्रकल्पांतर्गत त्यांची अशी एक दूरदृष्टी दिसून येते.

शैक्षणिक क्षेत्रात सर्वांगिण प्रगती व्हावी, विद्यार्थी चारित्र्यवान बनावा आणि शिक्षणानंतर भावी आयुष्यात त्याला मानाने जगता यावे असे त्यांना वाटते आणि म्हणूनच दहा ते पंचवीस अशा गटांमधून विद्यार्थ्यांना शिकविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असू. त्यामुळे विद्यार्थ्यांशी व्यक्तिगत संपर्क साधणे आम्हाला सोयीचे होत असे. अभ्यासाकडे जास्त लक्ष दिले जात असे व त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंधही निर्माण होत असत. विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव निर्माण केला जात असे. रक्षाबंधन दिवस साजरा केला जात असे. गीतेचे शिक्षणही दिले जात असे. नैतिक शिक्षणाच्या तासाला प्रत्येक विद्यार्थी हा हजर असलाच पाहिजे असा सक्त नियम होता. आईन्स्टाईन, सॉक्रेटिस, ज्ञानेश्वर, तुकाराम, महात्मा गांधी अशा थोर थोर व्यक्तींची चरित्रे अभ्यासासाठी निवडली जात असत. वर्षाचे शेवटी सामान्य ज्ञानाची - जनरल नॉलेजची परीक्षा पण घेतली जात असे. पालकसंघाची सभाही वारंवार घेतली जात असे व पालकांच्या सूचनांचा विचार करण्यात येत असे.

दर पंधरवड्याला मॅनेजमेंट व स्टाफ यांची मिटींग घेतली जात असे. करमसीभाई अध्यक्ष असत. यावेळी अडीअडचणींचा व सूचनांचा विचार केला जात असे.

अतिशय हुशार विद्यार्थ्यांना शोधून त्यांना उत्तेजन दिले जात असे. साठ ते सत्तर टक्क्यांच्या वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना आय.पी.एस. किंवा आय.ए.एस.च्या परीक्षांना बसण्यास प्रोत्साहन दिले जात असे.

'पास्ट स्टुडंटस युनियन'ची सुद्धा आम्ही स्थापना केली होती. तिथे माजी विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचा विचार केला जात असे.

नैतिक प्रवचने व गीतेची शिकवण यांचा विद्यार्थ्यांच्या मनावर चांगला परिणाम होतो, असे मला दिसून आलेले आहे. धूम्रपान वाईट आहे हे माहीत असूनसुद्धा काही विद्यार्थी ते करतात. त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी बोलून त्यांना त्यापासून परावृत्त केले पाहिजे. आता काही जुने विद्यार्थी जेव्हा भेटतात तेव्हा ते मोठ्या कृतज्ञतेने सांगत असतात की, 'त्यावेळी तुम्ही आम्हांला जी उत्तम शिकवण दिली तीच आता उपयोगी पडत आहे.'

विनय मंदिराच्या मुख्याध्यापिका प्रमिलाबेन पारेख यांनी सांगितले की, "विनय मंदिर संस्थेमध्ये बालवाटिका, एक ते चार इयत्तपर्यंतची प्राथमिक शाळा व पाचवी ते बारावीपर्यंत वर्ग आहेत. अध्यापन मंदिरही तेथेच आहे.

जानेवारी १९७३ पासून माझा या संस्थांशी संबंध आला. मला विद्याविहारची तशी माहिती नव्हती. पण जाहिरात वाचून अर्ज केला होता. माझी मुलाखत करमसीभाईंनीच घेतली. शिक्षणाविषयी त्यांचे स्वतंत्र असे विचार आहेत. मुला-मुलींच्या सहशिक्षणाबद्दलही त्यांची काही मते आहेत. अगदी लहान वयात व त्यानंतर पाचवी ते सातवीपर्यंत मुले आणि मुली चालतील, पण आठवी ते दहावीच्यावरील मुले आणि मुली एकत्र येऊ नयेत कारण बारा ते चौदा वर्षांचे हे वय मानसिकदृष्ट्या गोंधळात टाकणारे असते. त्यानंतर सोळा वर्षाच्या वयानंतर त्यांना एकत्र यायला हरकत नाही, कारण त्यावेळी प्रत्येकाला आपली जबाबदारी कळत असते असे हे म्हणत असत. त्यांनी मानसशास्त्राचा अभ्यास केला होता की नाही, हे मला ठाऊक नाही पण माणूस आणि मानसशास्त्र याविषयीचे त्यांचे चिंतन आणि अवलोकन उत्तम होते, यात शंका नाही.

"मुला-मुलींच्या कपड्यांबद्दल तसेच मुलींनी बांगड्या घातल्या पाहिजेत व कुंकू लावले पाहिजे असे त्यांचे मत होते. मी स्वत: बांगड्या घालीत नसे. त्यापाठीमागे तसे काही कारणही नव्हते. पण मला दागिने घालणे आवडत नसे. याबद्दल त्यांनी मला प्रत्यक्ष सांगितले नाही. पण ते म्हणत असत, 'प्रमिलाबेन, आपल्या संस्थेतील मुलींसाठी नियम आहे की त्यांनी हातात बांगड्या घातल्या पाहिजेत व कपाळावर कुंकूही लावले पाहिजे...' मग माझ्या ते लक्षात आले की आपण जे करत नाही ते इतरांना करायला सांगणे योग्य नाही.

"करमसीभाईंना गोरगरिबांविषयी फारच कणव वाटते. एकदा मध्यप्रदेशात प्रवास करताना एका बाईच्या अंगावरील कपडे खूपच मळलेले, घाण झालेले व फाटलेले दिसले. शेटजी त्या बाईस म्हणाले, 'बाई, कपडे स्वच्छ धुवावेत. असे घाण राहू नये.' त्यावर त्या बाईने सांगितले, 'बाबा आमच्याकडं दुसरी कापडं नाहीत. ही कापडं धुवायचे म्हटलं तर मी अंगावर काय घालू?' करमसीभाईंना याचे खूप वाईट वाटले. त्यांचे मन करुणेने भरून

आले आणि त्यांनी निश्चय केला की, आपण गरीब लोकांसाठी काही तरी करायचे आणि त्यातूनच 'गिरिवनवासी प्रगती मंडळ' निघाले.

करमसीभाईंना अस्वच्छता वगैरे अजिबात आवडत नाही. एकदा एके ठिकाणी ते मिटींगला गेले असता तेथे खूपच धूळ दिसली. त्यांनी ताबडतोब झाडू मागवून घेतले. तेव्हा तिथल्या लोकांच्या ते लक्षात आले आणि त्यांनी त्यांची माफी मागितली. चूक कबूल केली आणि तो हॉल ताबडतोब स्वच्छ करून घेतला.

संस्कृत भाषेविषयी त्यांना फार प्रेम आहे. त्यामुळे त्यांच्या घरी प्रत्येक महिन्यात एकदा संस्कृतमधून प्रवचने होतात. संस्कृत प्रचारासाठी त्यांनी 'सुर-भारती'ची स्थापना केली होती. तिची सविस्तर माहिती वेगळ्या प्रकरणात दिली आहे.

सर्व तऱ्हेची समृद्धी असूनही करमसीभाई मोठे काटकसरी आहेत. वस्तूंचा उपयोग जरूरीप्रमाणे व तेवढाच करावा, यावर त्यांचा कटाक्ष असतो. म्हणून लिहिताना लहानशा कागदावर भागत असेल तर तो तेवढाच वापरावा. मोठा कागद वापरून कागदाचा दुरुपयोग करू नये. एखाद्या कागदाने नुकसान होणार नाही, पण वस्तूंचा दुरुपयोग करण्याची, ती वाया घालवण्याची सवय चांगली नाही. यामुळे राष्ट्रीय नुकसानही होते हे लक्षात घेतले पाहिजे, असे ते सांगत असतात."

जयवंतीबेन देसाई म्हणाल्या, "विद्याविहार"च्या प्रांगणात 'रिसर्च ट्रेनिंग कॉलेज' काढावयाचे होते असे कळल्यावरून मी तिथे नोकरीसाठी अर्ज केला. माझी मुलाखत करमसीभाईंनीच घेतली आणि १९६२ सालच्या जुलै महिन्यात 'प्रिन्सिपॉल ऑफ टीचर्स ट्रेनिंग कॉलेज' म्हणून माझी नेमणूक झाली. या संस्थेचे नाव 'श्रीमती साकरबेन सोमैया ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन' असे जे होते ते १९७४ नंतर 'श्री. एस. के. सोमैया ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन' असे झाले. घाटकोपर ते मुंबईमध्ये आधीपासून दोन ट्रेनिंग कॉलेजेस होती. आमचे हे तिसरे कॉलेज. शिक्षणाच्या माध्यमासाठी कोणत्याही एकाच भाषेचे बंधन नको म्हणून 'मल्टीमीडिया कॉलेज' असावे असे करमसीभाईंना वाटे. त्या त्यांच्या धोरणाला प्रारंभी काही लोकांचा विरोध होता. विद्यार्थ्यांना अभ्यास जड जाईल अशी टीकाही वृत्तपत्रामधून झाली, परंतु अशा टीकेची भीती बाळगण्याचा त्यांचा स्वभावच नसल्यामुळे त्यांनी गणित व शास्त्र इंग्रजीमधून आणि बाकीचे विषय हिंदी, गुजराती, मराठी वगैरे ज्याच्या त्याच्या मातृभाषेतून शिकवण्याची सोय केली. आमच्या संस्थेचा रिझल्ट त्यावेळी आणि त्यानंतरही खूपच चांगला लागला आहे.

या संस्थेमध्ये काम करताना आपल्याला आपली अध्ययन व अध्यापनशीलता वाढविली पाहिजे याची जाणीव फार तीव्रतेने झाली. कारण करमसीभाईंचा स्वभाव तसा आहे आणि ते प्रत्येक गोष्टीत स्वत: जातीने लक्ष देत असत. त्यामुळे काम करायला देखील

खूप उत्साह वाटे.

ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रयोग हेच महत्त्वाचे. म्हणून प्रयोगासाठी कितीही खर्च झाला तरी हरकत नाही असे त्यांचे सांगणे असे. आपली संस्था उज्ज्वल झाली पाहिजे इकडे त्यांचे लक्ष असे.

करमसीभाईंचे किंबहुना त्यांच्या सगळ्या कुटुंबियांचेच हे वैशिष्ट्य आहे की ते सर्वजण मालक व नोकर असा भेद न करता सर्वांशी आत्मीयतेने व बरोबरीच्या नात्याने वागतात. सौ. साकरबाई आम्हांला आईसारख्याच होत्या. अगदी मुलींप्रमाणे वागवत असत.

करमसीभाई व साकरबाई यांची राहणी अगदी साधीच आहे. त्यात देखावा नाही. येथे एक बोलतील व दुसरीकडे दुसरेच बोलतील असे त्यांच्याकडून कधीच घडत नाही. सत्य तेच बोलणार व तसेच वागणार. चूक झाली तर एकदम रागवणार नाहीत, समजावून सांगतील आणि त्यांच्याकडूनसुद्धा जर काही चूक झाली असेल तर ती मोकळेपणाने कबूल करतील. मनात काही ठेवणार नाहीत. असा त्यांचा सरळ, साधा, निगर्वी स्वभाव आहे."

केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारतातील शैक्षणिक क्षेत्रात 'सोमैया विद्याविहार' आता एक 'शैक्षणिक तीर्थक्षेत्र' म्हणून विख्यात झाले आहे. करमसीभाईंचे शैक्षणिक स्वप्न किंवा ध्येय विद्याविहारच्या रूपाने साकारलेले आहे. विद्याविहारची शैक्षणिक क्षेत्रातली वाटचाल आजही नवनवीन शैक्षणिक क्षितिजांच्या अनुरोधाने चालूच आहे व चालूच राहील.

विद्याविहारच्या शैक्षणिक कार्याला पूरक असेही काही उपक्रम सोमैया ट्रस्टने सुरू केलेले आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'सोमैया पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड.' या प्रकाशनसंस्थेचा शुभारंभ २५ जानेवारी १९६७ रोजी तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुणसेन यांच्या हस्ते झाला. यावेळी त्यांच्या हस्ते 'सीटीझन्स ऑफ टुमॉरो' या नावाच्या पुस्तकसंचाचे प्रकाशन झाले. ही पुस्तके छोटी छोटी असली तरी उत्कृष्ट विषयानुरूप रंगीत चित्रांनी सजवून आकर्षक केलेली आहेत. त्यांची छपाईदेखील प्रसन्न, सुंदर आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांतील प्रमुख व ठळक अशा तत्त्वांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिलेली आहे. ही पुस्तकमाला केवळ इंग्रजी भाषेतच नसून हिंदी, गुजराती, मराठी आदी नऊ भारतीय भाषांमधूनही प्रसिद्ध केलेली आहे. याशिवाय मुलांच्या मनोरंजनासाठी गोष्टी व गाणी यांचीही आकर्षक अशी बरीच पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. अशा तऱ्हेच्या बालसाहित्याबरोबरच प्रौढ वाचकांसाठीदेखील कथा, कादंबरी, नाटक आदी वाङ्मयप्रकारातील ग्रंथही या प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले आहेत.

'दी बुक सेंटर प्रायव्हेट लिमिटेड" नामक संस्थेची सुरूवात १९५४ सालीच झाली आहे. देशात व परदेशात प्रसिद्ध झालेल्या व होणाऱ्या मौलिक अशा ग्रंथांचा प्रसार ठोक व किरकोळीने भारतभर करण्याचे महत्त्वपूर्ण असे सांस्कृतिक कार्य ही संस्था करीत

असते. इंग्लंड आणि अमेरिकेतील नामवंत प्रकाशकांशी या संस्थेचा निकटचा संपर्क आहे. भारतातील अनेक विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि शासकीय विभाग यांना बुक सेंटरमार्फत ग्रंथ उपलब्ध करून दिले जातात. विविध प्रकारच्या नियतकालिकांच्या वार्षिक वर्गण्या भरण्याची सोयही बुक सेंटरने उपलब्ध करून दिली आहे.

पुण्याच्या विद्यार्थीगृहात काम करीत असलेले डॉ. कोशे यांना करमसीभाईंनी आपल्याकडे शिक्षण आणि प्रकाशन या कामासाठी मुद्दाम निमंत्रित केले होते. त्या संदर्भात डॉ. कोशे म्हणाले, 'माझी व करमसीभाईंची भेट १९७० साली झाली होती. सोमैया पब्लिकेशनचा चीफ प्रमोटर म्हणून त्यांनी मला नियुक्त केले होते. आपले जावई आजारी असल्यामुळे करमसीभाई त्यांना भेटण्यासाठी अमेरिकेत जेव्हा गेले होते, तेव्हा त्यांनी तिथल्या शिक्षणसंस्थांची व शिक्षणपद्धतींची खूपच माहिती करून घेतली होती. येथे परत आल्यावर त्यांनी मला व श्री. हुल्याळकर यांना बोलावून घेतले व आपण आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये काय व कसा बदल करावा, आणखी कोठले विषय समाविष्ट करावेत, आदींच्याबाबत दोन दिवस बरीच चर्चा केली व त्यानुसार एक यादीच तयार करून दिली.

केवळ अभ्यासक्रमांचीच नव्हे, शैक्षणिक पद्धतींबद्दलची नव्हे, तर शैक्षणिक संस्थांची इमारत कशी असावी याबद्दलसुद्धा त्यांनी उत्तम माहिती अमेरिकेतून आणली होती. एकूण शिक्षणाविषयीच त्यांची खूप आस्था आहे. शिक्षणाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी व विचारही स्वतंत्र आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांचे समग्र जीवन समृद्ध व परिपूर्ण व्हावे, असे त्यांना वाटते. यासाठी त्यांनी विद्याविहारमध्ये नैतिक, सांस्कृतिक असे कितीतरी उपक्रम सुरू केले आहेत. तसे वृत्तीने ते जुनाट सनातनी नाहीत. त्यांच्या वयाच्या मानाने ते पुष्कळच पुरोगामी आहेत. चांगल्या कामांची, चांगल्या माणसांची ते जागरूकतेने दखल घेतात. दादरच्या बालमोहन विद्यालयाचा परीक्षेचा निकाल फार चांगला होता. करमसीभाईंनी आपल्या संस्थेतील अध्यापकांना सांगितले की, 'त्या शाळेत कशा रीतीने शिक्षण दिले जाते, विद्यार्थ्यांची तयारी कशी करून घेतली जाते, याची पाहणी करून माहिती घ्या.'

चांगल्या कामाची दखल घेण्याची त्यांची ही प्रवृत्ती केवळ शिक्षणापुरतीच मर्यादित नाही, तर कुठे कुणी चांगली शेती केली असेल, कुणी उत्तम फळबागा लावल्या असतील, तर त्यांचीही ते तितक्याच कुतूहलाने माहिती घेतात व त्या ठिकाणी जाऊन पाहूनही येतात.

प्रत्येक गोष्टीत जातीने लक्ष घालून ती ते समजून घेतात आणि ते काम व्यवस्थितपणाने होते की नाही, हेही पाहतात. प्रेस व प्रकाशन यांतही त्यांनी अगदी व्हाऊचर्स तपासण्यापर्यंत लक्ष घातलेले होते. कामाच्या संदर्भात कधी कधी मतभिन्नता

होते, पण करमसीभाई कधी विरोधासाठी विरोध करीत नाहीत, एखादी गोष्ट त्यांना पटली तर ती करण्यासाठी ते जिद्दीने उभे राहतात. काम करणाऱ्या लोकांना ते त्यांचे काम समजावून देतात, त्यांना बरीच पत्रे येतात. त्यातील प्रत्येक पत्र ते बारकाईने वाचतात व उत्तरही लिहितात. टाईप केलेले प्रत्येक पत्र नीट पाहून, तपासून मगच त्यावर ते सही करतात. 'या अशा कामासाठी एखादा पी.ए., निजसचिव - का ठेवत नाही?' असे एकदा विचारले असताना ते म्हणाले, "पी.ए. असण्याची सवय लागते. प्रत्येक वेळी तो जवळ असेलच असे नाही. मग ते आपल्याला कसे जमणार? आपण आपले काम केव्हाही करू शकतो."

विद्यार्थ्यांच्या नैतिक, धार्मिक, सांस्कृतिक शिक्षणावर त्यांचा विशेष भर आहे. बुद्धिवान तरुण शिक्षणासाठी म्हणून परदेशात जातात आणि नोकरी मिळवून तिथेच राहतात. आपल्या देशात परत येत नाहीत. कारण त्यांच्या बुद्धीला व त्यांनी घेतलेल्या उच्च दर्जाच्या शिक्षणाला येथे तसा फारसा वाव नाही, असे त्यांचे म्हणणे असते, यात देशाचे फार मोठे नुकसान आहे. ते थांबविण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, असे त्यांना सतत वाटत असते.

मुला-मुलींचे वागणे, वेशभूषा, केशभूषा, शिस्त इत्यादी बाबतीत त्यांची काही मते आहेत, त्याबाबत ते आग्रही आहेत, पण दुराग्रही मात्र नाहीत.'

विद्याविहारच्या रूपाने करमसीभाईंनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर अखिल भारतात एक आदर्श शैक्षणिक प्रकल्प उभारून प्रतिष्ठित केला आहे! भारताच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणेच्छू विद्यार्थी विद्याविहाराकडे येत असतात. एवढेच नव्हे, तर परदेशातूनही विद्यार्थी येत असतात. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हे विद्याविहारचे ब्रीदवाक्य आहे. ते इथे सार्थकतेने शोभते आहे.

❖

सुरभारती

शतशतकोटिशरत्पर्यन्तं प्रवहतात् संस्कृतमन्दाकिनी।

शेकडो कोटी वर्षापर्यंत (शरदऋतुंपर्यंत)
संस्कृत भाषेची मंदकिनी (गंगा) वाहत राहो.

सुरभारती

कच्छी, गुजराती, मारवाडी, संस्कृत, हिंदी, मराठी आणि इंग्रजी अशा सात भाषाभगिनी करमसीभाईंच्या ठायी वसतीला आलेल्या आहेत, हे मागे सांगितलेच आहे.

तसे पाहिले तर कच्छी ही त्यांची प्रदेश व मातृभाषा. गुजराती ही त्यांची राज्यभाषा. मारवाडी ही निकटची शेजारभाषा आणि हिंदी व इंग्रजी या त्यांच्या व्यवसायभाषा. परंतु करमसीभाई आपली मातृभाषा म्हणून मराठी भाषेला व राष्ट्रभाषा म्हणून संस्कृत भाषेला अग्रस्थान देतात.

बालपणी शालेय जीवनापासून मराठी आणि गुजराती या भाषांबरोबरच संस्कृत भाषेशीही त्यांचे सख्य जडले. संस्कृत भाषा त्यांना फार फार आवडू लागली. संस्कृत भाषेचे माधुर्य आणि नादसौंदर्य असे भुरळ घालणारेच आहे. मनातील विचार व भावना कमीत कमी पण अचूक शब्दांत व्यक्त करण्याचे सामर्थ्य संस्कृत सुभाषितात असते. त्यामुळेच अनेकजण येता-जाता सुभाषितांचा उपयोग करीत असतात. या विशेष गुणधर्मानेच ती लोकप्रिय व प्रशंसनीय ठरली आहेत.

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती।
तस्माद्धि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम्।।

हा श्लोक त्याच अर्थाने रूढ झालेला आहे. या श्लोकाचा अर्थ असा : 'सर्व भाषांत प्रधान अशी माधुर्यमयी व अलौकिक अशी ही देववाणी आहे. त्यातील काव्य अधिक मधुर आहे तर सुभाषित हे त्याहूनही रसमय आहे.'

भाषा समाजाची प्रगती ओळखण्याचे गमक आहे. वैदिक काळापासून, जगातील पहिली, शुद्ध आणि समृद्ध भाषा म्हणून संस्कृतचे महत्त्व सर्व पंडितांनी मान्य केलेले आहे :

संस्कृतिः संस्कृताश्रिता।

याचा अर्थ असा की, 'भारतीय संस्कृती संस्कृत भाषेच्या आधाराने राहिलेली आहे.'

धर्म, साहित्य, कला, विद्या या सर्व अंगांनी समृद्ध असलेल्या भारतीय संस्कृतीचे,

तिने जोपासलेल्या श्रेष्ठ जीवनमूल्यांचे व तिचे मस्तक असलेल्या अध्यात्मविद्येचे दर्शन संस्कृत भाषेत लिहिल्या गेलेल्या वेदवेदांगे, षड्दर्शने, पुराणे काव्यनाटकादींच्या प्रचंड वाङ्मयसंभारातूनच घडणे शक्य आहे. संस्कृत भाषेचा आधार घेतल्यावाचून भारतीय संस्कृतीचे ज्ञान होणे शक्य नाही. म्हणून संस्कृत भाषेचे अध्ययन व अध्यापन ताजे, टवटवीत आणि जीवंत राहिले पाहिजे.

भारताला प्राच्य भाषांच्या भाग्याने एक अद्वितीय वैय्याकरण लाभला आणि त्याच्या ग्रंथात संस्कृतचे स्वरूप जे सांगोपांग रेखांकित झाले ते कायमचे. गांधार देशातल्या, म्हणजे आजच्या अफगाणिस्तानातल्या शलातूर गावी जन्मलेल्या व जगात सर्वश्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या वैय्याकरणाचे नाव 'पाणिनि' आणि त्याने अत्यंत लाघवयुक्त सूत्रशैलीने रचलेल्या ग्रंथाचे नाव 'अष्टाध्यायी" असे आहे. अष्टाध्यायीने ज्या 'भाषे'चे निरूपण केले तिलाच कालांतराने 'संस्कृत" हे नाव मिळाले. दंडीने हिचा 'देववाणी' म्हणून गौरव केला,

'संस्कृतं नाम दैवी वाक् अन्वाख्याता महर्षिभिः।'

या भाषेने ललित आणि शास्त्रीय वाङ्मयाची एक महान परंपरा निर्माण केली. ही भाषा, हे वाङ्मय आणि या दोहोतले सांस्कृतिक धन यांनी शतकानुशतके केवळ भारतातल्याच नव्हे, तर भारताबाहेरच्याही, विशेषतः पूर्वेकडील देशांतल्या भाषा, लोक व परंपरा यावर चिरस्थायी ठसा उमटवला.

संस्कृत भाषेचे हे सर्वांगीण श्रेष्ठत्व लक्षात घेऊनच 'भारताची राष्ट्रभाषा म्हणून संस्कृत भाषेलाच मान्यता द्यावी', असा आग्रह काही विद्वान नेत्यांनी, भारताची घटना तयार होत असताना धरला होता. घटनाकार डॉ. आंबेडकर हेदेखील या मताला अनुकूल होते.

संस्कृत ही कोणत्याही एका विशिष्ट प्रदेशाची भाषा नसल्यामुळे व तिने बहुतेक सर्वच भारतीय भाषांच्या विकासाला मोलाचे सहाय्य करून त्या त्या भाषांना समृद्ध केलेले असल्यामुळे, ती सर्वांना आदरणीय ठरलेली आहे.

संस्कृत भाषेचे राष्ट्रीय जीवनातले हे महत्त्व अर्वाचीन काळातल्या अनेक विचारवंतांच्या उद्गारांत आणि लेखनात प्रतिबिंबित झाले आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी असे म्हटले होते की, भारताची सर्वात मोलाची दौलत कोणती? सर्वात मोलाचा वारसा कोणता? असे जर मला कोणी विचारले तर संस्कृत भाषा, वाङ्मय आणि त्यात आहे ते सर्व असे मी ठाम उत्तर देईन आणि या निष्ठेतूनच पुढे त्यांनी भारतीय शासनाच्या वतीने संस्कृत आयोगाची नेमणूक केली.

शालेय जीवनापासून करमसीभाईंना संस्कृत भाषेचा अभिमान, महत्त्व आणि प्रेम उत्पन्न झालेले होते. संस्कृत हा अभ्यासविषय ते मोठ्या आवडीने कसून करीत असत. त्यातील रसास्वाद घेत असत. प्रयत्नपूर्वक संस्कृत बोलतही असत. एकदा तर संस्कृतच्या

एका परीक्षेत त्यांनी ऐंशी टक्के गुण मिळवून पाच रुपयांचे बक्षीसही पटकावले होते!

परंतु पुढे व्यवसायाच्या व्यापात त्यांना आपले हे संस्कृत प्रेम थोडेसे बाजूला ठेवावे लागले. संस्कृत संभाषणाची सवयही राहिली नाही. पण पुढे काही वर्षांनी जेव्हा व्यवसाय भरभराटीला येऊन स्थिरावले आणि त्यांना स्वत:लाही सर्वांगीण समृद्धी, स्थैर्य प्राप्त झाले तेव्हा त्यांच्या ठायीच्या मूळच्या शिक्षणप्रेमाने उचल घेतली. ते उफाळून आले. तसे तर त्यांनी व्यवसायाच्या व्यापात असतानादेखील काही ठिकाणी माध्यमिक विद्यालये उभारून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय उपलब्ध करून दिली होती. परंतु तेवढ्यावरच त्यांचे समाधान झालेले नव्हते. अल्पशा कामाने समाधानी होणारे करमसीभाईंचे व्यक्तिमत्त्व नाहीच. त्यांची दृष्टी आणि झेप यांचा आवाका फार मोठा आहे आणि म्हणूनच त्यांनी १९६० साली घाटकोपरनजीक 'विद्याविहार' या नावाचा एक फार मोठा शैक्षणिक प्रकल्प साकार केला. या प्रकल्पाची माहिती अन्यत्र दिलेली आहेच.

विद्याविहारच्या विस्तीर्ण आवारातच १९६७ साली करमसीभाईंनी संस्कृतप्रेमाने 'सुरभारती'चे रोपटे लावले!

सुरभारती नामक सोमैया संस्कृत केंद्राचा उद्देशच संस्कृत भाषेला प्रोत्साहन देऊन तिचा प्रसार करणे हा आहे. सुरभारतीची केंद्रे पुढील काळात केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जम्मू, काश्मीर, दिल्ली, ग्वाल्हेर, देवरिया, विजापूर आदी ठिकाणीही कार्यान्वित झाली.

या केंद्रामार्फतच्या संस्कृत संभाषणाच्या, लेखनाच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. परिसंवादही भरविले जातात. आणि संस्कृत भाषेतून बोलण्यास उत्तेजन दिले जाते. या केंद्रांचा कारभार बव्हंशी संस्कृतमधूनच चालतो.

सुरभारतीच्या वतीने मुंबईच्या उपनगरांमधून संस्कृत शिक्षणाचे मोफत वर्ग किंवा पाठशाळा चालवल्या जातात. संस्कृतच्या परीक्षा घेतल्या जातात. प्रतिवर्षी सुमारे दोन हजार विद्यार्थी याचा लाभ घेतात.

सुरभारतीच्या सर्व केंद्रावर संस्कृत ग्रंथांचे ग्रंथालय चालविणे, महाराष्ट्रातील संस्कृत पाठशाळांचे सम्मेलन भरविणे अशी कामे चालतात. असे संमेलन १९७४ सालच्या डिसेंबर महिन्यात घेण्यात आले होते. मुंबईमधील संस्कृत विषय शिकविणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांचे संमेलन अशा प्रकारचेही संमेलन आयोजिलेले होते. माध्यमिक शिक्षकांसाठी संस्कृत शिक्षणाचा अभिक्रम राबविण्यासाठी अभ्यासक्रम आयोजिणे, इत्यादी उपक्रम कार्यान्वित केलेले आहेत.

या सर्व उपक्रमांची आणि सुरभारतीच्या केंद्रांची माहिती संकलित स्वरूपात देण्यासाठी एक त्रैमासिकही चालविले जाते.

श्रीमती प्रमिलाबेन पारेख यांनी संकलित केलेल्या सतरा संस्कारी कथांचे 'बाल साहित्य सरिता' नामक, बालांचे चित्त वेधून घेईल अशा आकर्षक चित्रांनी सजविलेले एक

पुस्तक सुरभारतीने प्रसिद्ध केले आहे.

सुरभारतीच्या रोपट्याचा वेलु आता वाढत वाढत बराच वाढला आहे. पसरला आहे. आजचा याचा विस्तार व त्याची माहिती महाराष्ट्रातील एक नामवंत संस्कृतप्रेमी पंडित श्रीयुत श्री. धुं. कवीश्वर यांनी एका लेखाद्वारे सविस्तरपणे दिलेली आहे. श्री. कविश्वर हे सुरभारती या संस्थेचे एक तळमळीचे नेतेही आहेत. 'सुरभारती (सोमैया ट्रस्ट) संस्कृतविषयक ऐतिहासिक योगदान' - या आपल्या लेखात ते अशी माहिती देतात :

महाराष्ट्र शासनाच्या परिणामकारक शिफारसीप्रमाणे केंद्रशासनाच्या निरीक्षण-समितीने सुरभारती (सोमैया ट्रस्ट)च्या १९७२ पासूनच्या संकल्पित मुंबईतील 'के. जे. सोमैया संस्कृत विद्यापीठा'विषयी अनुकूल एकमुखी अभिप्राय केंद्रशासनास सादर केला आहे. त्या संदर्भात हा लेख.

संस्कृत भाषेचे शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, जागतिक विशेषत: भारतीय राष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेसंबंधीचे विशेष महत्त्व विचारात घेऊन 'दी सोमैया ट्रस्ट मुंबई' या संस्थेने प्रारंभापासूनच 'एक राष्ट्रीय कर्तव्य" या भावनेने व श्रद्धेने संस्कृतकडे विशेष लक्ष दिलेले आहे. सोमैयांच्या शिक्षण संस्थांत छात्राला प्रवेश देण्याच्या वेळीच संस्कृतला प्राधान्य दिले जाते.

१९६८ पासून सोमैया ट्रस्टने (श्री. के. जे. सोमैया व सुपूत्र डॉ. शांतिलालजी के. सोमैया यांच्या मार्गदर्शनानुसार) महाराष्ट्र राज्यात संस्कृतविषयक सार्वत्रिक व व्यापक स्वरूपात प्रचार-प्रसाराची भूमिका स्वीकारली. यासंबंधी कारणीभूत प्रधान घटना अशी की 'गेल्या हजार वर्षांतील भारतातील संस्कृत पांडित्याचा इतिहास म्हणजे महाराष्ट्रातील संस्कृत पांडित्याचा इतिहास होय!' अशी साधार व सार्थ प्रशंसा, लवपूर (लाहोर) येथे संपन्न झालेल्या प्राच्य विद्या परिषदेचे अध्यक्ष म. म. हरप्रसाद शास्त्रीसारख्या परप्रांतीय प्रकांड पंडितांनी मन:पूर्वक केलेली आहे.

अशी ही महाराष्ट्र राज्याची संस्कृतविषयक भूषणास्पद व उज्ज्वल ऐतिहासिक परंपरा असताना महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणविषयक श्वेतपत्रिकेतील (८ एप्रिल १९६८-सुधारित श्वेतपत्रिका २३ फेब्रुवारी १९७०) संस्कृतविषयक घोर उपेक्षेमुळे संस्कृत हा विषय महाराष्ट्रात वस्तुसंग्रहालयातील एक पदार्थ ठरेल की काय; अशी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली.

संस्कृत-प्रतिकूलतेच्या अशा कठीण समयी सर्वप्रथम कोण कामास आले असेल तर, 'सोमैया ट्रस्ट' हीच संस्था होय. यासंबंधी सोमैया ट्रस्टच्या पुढाकाराने राज्यभर जागृती करून ५० संस्कृतविषयक व शैक्षणिक संस्थांच्या सहभागाने दि. २१ एप्रिल १९७० रोजी मुंबई येथे 'संस्कृत-शिक्षण परिषद' आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेत

उद्घाटक डॉ. के. एम. मुन्शी, अध्यक्ष सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्रि. सी. रा. (बाबासाहेब) तावडे व आजच्या संदर्भात विशेष उल्लेखनीय म्हणजे मुंबईचे तत्कालीन महापौर प्रिं. मनोहरपंत जोशी हे सन्माननीय विशेष अतिथी व प्रवक्ते म्हणून उपस्थित होते.

महाराष्ट्रात केंद्रीय संस्कृत विद्यापीठ

अशा प्रकारे सार्वत्रिक स्वरूपात शासकीय व अशासकीय पातळीवर महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर गेली २७ वर्षे सोमैया ट्रस्टतर्फे (शाखाभूत सुरभारती - सोमैया - केंद्रा'तर्फे) संस्कृतविषयक जनजागृतीचे उल्लेखनीय कार्य चालू आहे.

तत्कालीन शिक्षणमंत्री प्रा. अनंत नामजोशी यांचया प्रेरणेनुसार महाराष्ट्रात केंद्रीय संस्कृत-प्रचार-प्रसाराचे प्रयत्न सुमारे ३० वर्षे 'सोमैया ट्रस्ट' या संस्थेचेच आहेत आणि म्हणूनच अनेक संस्कृत संमेलनांतून सोमैया ट्रस्टची, केंद्रीय संस्कृत विद्यापीठविषयक मागणी शासनाने मान्य करावी, असे ठराव संमत झालेले आहेत. इतकेच नव्हे तर महाराष्ट्र राज्य शासकीय संस्कृत स्थायी समितीनेही तशा आशयाचा एकमुखी ठराव संमत केलेला आहे. (दि. १०/०७/१९८६ सभा)

तसेच, संस्कृत-संरक्षण-संवर्धनात्मक ऐतिहासिक महत्त्वाचे असे प्रशंसनीय व उल्लेखनीय कार्य हे महाराष्ट्रात सोमैया ट्रस्टच्या पुढाकाराने जेवढे झाले, तेवढे व तशा प्रकारचे आवश्यक असे संस्कृत कार्य हे महाराष्ट्रात अन्य कोणत्याही संस्थेने केलेले नाही. किंबहुना अतिशयोक्ती नव्हे, तर सुस्पष्ट वस्तुस्थिती म्हणून कोणाही महाराष्ट्रातील जाणकार व सुसंस्कृत नागरिकाला कृतज्ञतेने मान्य करावे लागेल की सोमैया ट्रस्टचे संस्कृतविषयक प्रयत्न व व्यापक क्रियाशील सहकार्य गेल्या सुमारे २ तपांच्या काळात नसते, तर एकेकाळी संपूर्ण भारताला संस्कृत-पांडित्याच्या संदर्भात आदर्श स्वरूप असलेल्या महाराष्ट्रात, आज संस्कृत ही वस्तुसंग्रहालयातील एक वस्तू ठरली असती!"

सोमैया ट्रस्टची घटकभूत असलेली 'सुरभारती सोमैया केंद्र' ही जी संस्था, या संस्थेच्या माध्यमातून, गेल्या सुमारे २७ वर्षांच्या काळात, शासकीय व अशासकीय स्तरावर जे बहुविध संस्कृतीविषयक कार्य झाले आहे. त्याच्या संक्षिप्त सिंहावलोकनावरून वरील सुस्पष्ट वस्तुस्थिती अतिशयोक्ती नसल्याचे ध्यानात येऊ शकेल.

'सुरभारती' - संस्कृतविषयक कार्याचे सिंहावलोकन सुप्रसिद्ध वयोवृद्ध शिक्षणतज्ज्ञ कोल्हापूरचे प्रिं. सी. रा. (बाबासाहेब) तावडे यांच्या अध्यक्षतेखाली, संस्कृत प्रतिकूल श्वेतपत्रिकेच्या संदर्भात, मुंबई येथे महाराष्ट्रव्यापी 'संस्कृत-शिक्षण-परिषद' दि. २१ एप्रिल १९७० रोजी करण्यात आली. या परिषदेची काही उल्लेखनीय वैशिष्ट्ये -

१. 'संस्कृत ही तथाकथित विशिष्ट वर्गाची भाषा', असा अनैतिहासिक अपप्रचार दृढमूल झालेल्या महाराष्ट्रातील संस्कृतचया व्यासपीठावर; प्रथमच बहुजन समाजातील

मान्यवर शिक्षण महर्षीच्या रूपाने अध्यक्ष म्हणून आदरणीय प्रिं. सी. रा. (बाबासाहेब) तावडे (विशिष्ट पातळीवरून विरोध झाला असतानाही) उपस्थित राहिले व संस्कृतानुकूल मार्गदर्शक अध्यक्षीय भाषणही त्यांनी केले.

२. अशा प्रकारे राष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेचा प्रवलतम आधार असलेल्या संस्कृत भाषेला बहुजनभिमुख करण्याचे आद्य श्रेय, सोमैया ट्रस्टचे आहे!

या यशस्वी उपक्रमामुळे महाराष्ट्र शासनाला श्वेतपत्रिकेतील संस्कृत-प्रतिकूल भूमिकेचा त्याग करावा लागून संस्कृतानुकूल भूमिका घेणे भाग पडले!

महाराष्ट्राच्या जीवनात उल्लेखनीय संस्कृतविषयक सांस्कृतिक परिवर्तन

सोमैया ट्रस्टच्या (सुरभारती) क्रियाशील प्रेरणेने महाराष्ट्रात, गेल्या सुमारे तीस वर्षांच्या काळात, संस्कृतविषयक जागृतीसाठी, वेळवेळी अनेक संस्कृत संमेलनाचे व संस्कृतविषयक विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे (वासंतिक संस्कृत शिबिर, संस्कृत-प्रचार-प्रशिक्षक वर्ग, संस्कृत-संगीत सभा, संस्कृत संभाषण वर्ग, संस्कृत नृत्य-नाट्य... इत्यादी) स्पृहणीय स्वरूपात यशस्वी असे आयोजन करण्यात आले. उदाहरणार्थ १. संस्कृत-शिक्षण-परिषद (२१ एप्रिल १९७०) २. संस्कृत पाठशाळा संमेलन (१९७४), महाराष्ट्र शासन व सोमैया ट्रस्ट संयुक्त सहकार्याने आयोजित ३. संस्कृत अध्यापक-प्राध्यापक संमेलन (१९७४) ४. बृहन्मुंबई संस्कृत संमेलन (१९७८), कै. नानासाहेब गोरे उच्चायुक्त लंडन, यांच्या हस्ते उद्घाटन ५. संस्कृत (अभिजात भाषा) शिक्षण परिषद (१९८५) श्री. दादासाहेब रूपवते उद्घाटक, कै. बाबासाहेब गावडे (मराठा मंदिर) कै. वसंतदादा पाटील व कै. कॉम्रेड श्री. अ. डांगे यांची उपस्थिती ७. संस्कृत-प्रचार-प्रशिक्षण-शिबिर (१९९४) - पूज्य शंकराचार्य, शृंगेरी यांचे आशीर्वाद. ८. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांत संस्कृतचा समावेश. याबाबत तत्कालीन आयुक्त श्री. स.शं. तिनईकर यांचे बहुमोल सहकार्य इत्यादी.

सोमैया ट्रस्टद्वारा (सुरभारती) आयोजित संस्कृत-उपक्रमांचे हे संक्षिप्त चित्र आहे. याशिवाय संपूर्ण भारतभर आयोजित होणाऱ्या संस्कृतविषयक विविध उपक्रमांना सोमैया ट्रस्टतर्फे क्रियाशील प्रोत्साहन व आर्थिक साहाय्य दिले जाते.

संस्कृतविषयक अशा सर्व कार्यक्रमांच्या संयोजनात, सोमैया ट्रस्टची (सुरभारती) भूमिका विचारणीय व मननीय आहे.

''प्राचीन ऋषी-मुनींच्या वारसा हक्काने प्राप्त झालेले संस्कृतचे बहुमोल अक्षय्य धन हे, विशिष्ट वर्गाचे नसून, जाति-धर्म-पक्ष-भाषा निरपेक्ष असा सर्वांचाच या संस्कृतधनावर समान हक्क आहे."

''संस्कृत म्हणजे विशिष्ट वर्गाची भाषा अशा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक

सामंजस्यास व प्रगतीस बाधक असलेल्या प्रतिकूल काळात, सोमैया ट्रस्टच्या (सुरभारती) दूरदृष्टीच्या व्यापक संस्कृतविषयक प्रयत्नांमुळे, महाराष्ट्राच्या जीवनात उल्लेखनीय व प्रशंसनीय असे शैक्षणिक व सांस्कृतिक परिवर्तन झालेले आहे. त्यामुळे संस्कृतविषयक व्यापक जागृती व आस्था निर्माण झाली आहे. ''आता शहरातील 'श्रीपादच' नव्हे तर खेड्यातील 'शिर्प्या' ही संस्कृत हवे; असे म्हणतो!"

जाती-धर्म निरपेक्ष संस्कृतविषयक धोरण

मुंबईतील पं. गुलामदस्तगीर अबासअली बिराजदार हे संस्कृतक्षेत्रातील अखिल भारतीय स्वरूपाचे व्यक्तिमत्त्व संस्कृत क्षेत्रात सर्वत्र सुपरिचित आहे. सोमैया सुरभारती-योजनेमुळेच उत्तम संस्कृत-वक्तृत्व आत्मसात करता आले; हे स्वत: पं. बिराजदार कृतज्ञतेने मान्य करतात. ते स्वत: सुरभारती-सोमैया केंद्राचे सहसंयोजकही आहेत.

एका वर्षी सुरभारती सोमैया संस्थेच्या सहकार्याने मुंबईतील एका विख्यात संस्थेच्या गणेशोत्सवात एक संस्कृत परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. तसे निमंत्रण पत्रिकेत छापलेही होते. वक्त्यांची नावे छापली नव्हती. ती नावे नंतर ठरणार होती. त्याचप्रमाणे सुरभारती-सोमैयातर्फे संस्कृत-परिसंवादापूर्वी काही दिवस अगोदर परिसंवादासाठी जी काही संस्कृत पंडितांची नावे त्या सहभागी संस्थेला कळविली, त्या यादीत पं. गुलामदस्तगीर बिराजदार या मुस्लिम संस्कृत पंडितांचेही नाव होते. 'हिंदूंचा धार्मिक गणेशोत्सव, त्यात आणि मुस्लीम धर्मीय वक्ता', हे कसे जमणार म्हणून त्या संलग्न संस्थेने पं. बिराजदारांशिवाय इतर वक्त्यांची नावे स्वीकारली व तसे सोमैयांना कळविले. यावर सोमैयांतर्फे त्या संस्थेला कळविण्यात आले की, 'ज्या लो. टिळकांनी सामाजिक एकतेच्या संदर्भात गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले, त्या लो. टिळकांच्या गायकवाड वाड्यातील गणेशोत्सवापुढे, ख्रिश्चन बाप्तिस्ता काका, बॅ. जीना (मुस्लीम) प्रभृती अन्य धर्मीय वक्त्यांचीही व्याख्याने, लो. टिळकांच्या उपस्थितीत पार पडलेली आहेत. तरीही तुम्ही पं. गुलामदस्तगीर बिराजदार या वक्त्याला केवळ मुस्लिम धर्मीय म्हणून हरकत घेणे योग्य नाही."

तरीही त्या संस्थेने पं. बिराजदारांचे नाव वक्ता म्हणून स्वीकारण्यास असहमती दर्शविल्यावर, सुरभारती-सोमैया संस्थेने त्या गणेशोत्सवाच्या संस्कृत परिसंवादातून आपला सहभाग मागे घेतला. परिणामी निमंत्रणात छापले असूनही, त्या वर्षी तो संस्कृत-परिसंवाद होऊ शकला नाही.

कालांतराने संस्थेच्या सर्वसाधारण वार्षिक सभेत, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्री. ना. सप्रे व आजीव सदस्य पं. श्री. धुं. कवीश्वर यांनी रीतसर ठरावानुसार आवाज उठविल्यावर,

संस्थेस आपली चूक समजली. त्या चुकीचे परिमार्जन म्हणून, त्या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्टला पं. गुलामदस्तगीर बिराजदार यांचा संस्थेतर्फे खास सत्कार व संस्कृत व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यकम इतका गाजला की दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात चौकटीमध्ये 'ब्राह्मण सभेत चमत्कार!' अशा शीर्षकाखाली पं. बिराजदारांच्या संस्कृत व्याख्यानाला परिणामकारक भरपूर प्रसिद्धी मिळाली. अशी आणखीही काही उदाहरणे आहेत. सोमैयांचे संस्कृतविषयक धोरण असे जाति-धर्म निरपेक्ष आदर्श स्वरूपाचे आहे.

मराठी भाषिक महाराष्ट्रात संस्कृत कार्यासाठी, सोमैया ट्रस्टचे आदर्श योगदान

१. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर या विभागीय मंडळांच्या इयत्ता १०वीच्या परीक्षेसाठी दरमहा ४०/- व रु. ३०/- असे दोन वर्षांसाठी 'के. जे. सोमैया संस्कृत शिष्यवृत्ती'साठी स्थिर स्वरूपाचे आर्थिक सहाय्य दिलेले असून, नव्याने निर्माण झालेल्या नासिक, अमरावती व कोल्हापूर या तीन विभागीय मंडळासाठीही अशाच संस्कृत शिष्यवृत्त्यांची योजना आगामी शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित होणार आहे.

२. मुंबई विभागीय मंडळासाठी (इ. १२वी) 'के. जे. सोमैया संस्कृत सुवर्णपदक' असून शिवाय उर्दूसह सर्व विषयांसाठी (इ.१०वी) 'के. जे. सोमैया संस्कृत पारितोषिक' देण्याची योजना आहे.

३. गरीब मुलींसाठी इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या 'सावित्रीबाई फुले दत्तक योजने'नुसार संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील एक, तसेच बृहन्मुंबईमधून एकूण ४० गरीब मुली सोमैया ट्रस्टतर्फे दत्तक घेण्याचे निश्चित झाले आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून याची कार्यवाही होईल.

४. पूर्व शिक्षणमंत्री मा. प्रा. राम मेघे यांनी 'जगन्नाथ केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, जगन्नाथपुरी (ओरिसा) येथे दि. १६/२/१९८६ रोजी जे उल्लेखनीय संस्कृत भाषण केले होते, ते सचित्र, विशाल व रंगीत भित्तीपत्रकाच्या स्वरूपात सोमैया ट्रस्टतर्फे प्रकाशित करून महाराष्ट्रातील व अन्य राज्यांतील शैक्षणिक संस्थांकडे २५ हजार प्रतींमधून पाठविण्यात आले होते. अशाच प्रकारे संस्कृतच्या प्रचार-प्रसारार्थ शासनाच्या संस्कृतानुकूल निर्णयांना, सोमैया ट्रस्टतर्फे वेळोवेळी विशाल प्रसिद्धी दिलेली आहे.

५. मराठी भाषिक तसेच अन्य छात्रांना, शिक्षक-प्राध्यापकांना परदेश प्रवास, पी.एच. डी.प्रबंध, पुस्तक खरेदी इत्यादींसाठी, संस्कृतविषयक कार्यासाठी सोमैया ट्रस्टतर्फे पर्याप्त आर्थिक मदत दिली जाते.

६. 'मराठा मंदिर, मुंबई' या संस्थेचे अध्यक्ष भूतपूर्व केंद्रीय मानव संसाधन

विकास मंत्री, श्री. माधव महाराज शिंदे व उपाध्यक्ष पूर्व मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार आहेत. या संस्थेचे डॉ. शांतिलाल सोमैया या संस्थेचे आश्रयदाते असून ते मराठा मंदिर प्रणित महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू आहेत.

७. 'धर्मभास्कर' या अग्रगण्य मराठी मासिकात सोमैया ट्रस्टतर्फे 'सरल मधुर ही संस्कृत भाषा' हे सदर सतत २५ वर्षे अखंडपणे सुरू असून त्याद्वारा संस्कृतविषयक प्रचार-प्रसार सातत्याने चालू आहे. अन्य राज्यांतील अनेक संस्कृत नियतकालिकांना संस्कृतसाठी पर्याप्त आर्थिक साहाय्य दिले जाते.

८. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या संस्थेचे कुलपती, केंद्रीय गृहमंत्री श्री. शंकरराव चव्हाण हे आहेत. या संस्थेलाही कै. यशवंतराव चव्हाण यांच्या सूचनेनुसार, सोमैया ट्रस्टतर्फे उल्लेखनीय आर्थिक सहाय्य झालेले आहे. 'वासंतिक संस्कृत शिक्षण वर्ग' सारख्या अनेक शैक्षणिक उपक्रमांसाठी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला आर्थिक व इतरही साहाय्य लाभलेले आहे. सोमैया ट्रस्टला प्रस्तुत संस्थेचे आजीव सभासदत्वही लाभले आहे.

मुस्लीम संस्कृत पं. गुलामदस्तगीर यांची संस्कृत निमंत्रण पत्रिका

''संस्कृत म्हणजे विशिष्ट (हिंदू) धर्माची भाषा" या अनैतिहासिक प्रबळ गैरसमाजाच्या पार्श्वभूमीवर, एक मुस्लिम धर्मीय आपल्या कन्येच्या विवाहाची निमंत्रणपत्रिका संस्कृत भाषेत छापतो. त्यामुळे आपोआप संस्कृतविषयक काही गैरसमज दूर होऊन, संस्कृत-प्रचार-प्रसाराचा मार्ग सुलभ होतो याचे अर्वाचीन काळातील आद्य श्रेय, सोमैया ट्रस्टकडे जाते.

बहुजन समाजातील शिक्षण महर्षी प्राचार्य कै. सी. रा. (बाबासाहेब) तावडे यांना अध्यक्ष म्हणून संस्कृतचे व्यासपीठ (संस्कृत-शिक्षण-परिषद १९७०, मुंबई) सोमैयांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे उपलब्ध झाल्यामुळे 'संस्कृत म्हणजे विशिष्ट वर्गाची, थत्ते, दामले, गोरे, आपटे, मराठे... अशा एकारांत सदाशिवपेठी लोकांची भाषा' हा संस्कृतबाबत अपस्-ामज निस्तेज होऊन, संस्कृतच्या संरक्षण-संवर्धनार्थ गावडे, तावडे, माने, रूपवते, कांबळे... अशी बहुजन समाजातील निराळी एकारांत मंडळी आता पुढे सरसावत आहेत. महाराष्ट्रातील हे एक उल्लेखनीय ऐतिहासिक महत्त्वाचे सांस्कृतिक परिवर्तन, प्राधान्याने सोमैया ट्रस्टच्या संस्कृतविषयक खास प्रयत्नांमुळे झालेले आहे. त्याचप्रमाणे 'संस्कृत म्हणजे विशिष्ट (हिंदू) धर्माची भाषा' हाही फार मोठा संस्कृतबाधक गैरसमज सोमैया ट्रस्टच्या विशिष्ट प्रयत्नामुळे निष्प्रभ होण्यास मोठी मदत झालेली आहे. एखाद्या साध्या लहानशा गोष्टीमुळेही, कसे परिणामकारक कार्य साधता येते; याचे 'मंगलविवाहार्थ मुस्लिम धर्मीय नागरिकाची संस्कृत निमंत्रणपत्रिका' हे एक मार्मिक उदाहरण आहे.

पं. गुलामदस्तगीर यांच्या कुटुंबातील पहिलेच मंगलकार्य म्हणजे ज्येष्ठ कन्येचा विवाह.

पं. गुलामदस्तगीरांना संस्कृतमध्ये निमंत्रणपत्रिका मुद्रित करण्याची इच्छा होती. सोमैयांना हे समजताच त्यांनी 'संस्कृतमध्ये छापा पण त्याचबरोबर मुस्लीम धर्मीय बांधवांच्या दृष्टीने उर्दूमध्ये निमंत्रण पत्रिका छापणे योग्य होईल.' असा सल्ला पं. बिराजदारांना दिला. त्याप्रमाणे संस्कृत व उर्दू अशा संयुक्त भाषांच्या स्वरूपात - बहुधा मुस्लिम धर्माच्या संदर्भात प्रथमच - ती निमंत्रणपत्रिका, सोमैया ट्रस्टतर्फेच पाच हजार प्रतींच्या स्वरूपात छापून भारतातील सर्व प्रमुख वृत्तपत्रे, सांसद (खासदार), आमदार, सर्वपक्षीय मान्यवर नेते व कुटुंबीय अशा सर्वांना पाठविण्यात आली.

या उपक्रमामुळे पं. बिराजदारांचे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर कौतुक झाले. महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील अनेक भाषांच्या वृत्तपत्रांमध्ये यावर प्रशंसापर व संस्कृतचे महत्त्व प्रतिपादन करणारे मननीय अग्रलेख प्रकाशित झाले.

संस्कृतला त्या वेळपर्यंत फारसे अनुकूल नसणारे पुरोगामी विचारांचे श्री. माधव गडकरी यांनीही दै. मुंबई सकाळमध्ये आपल्या खास शैलीतील लोकप्रिय 'चौफेर' या सदरात संस्कृत निमंत्रणपत्रिकेचा ब्लॉक छापून... एक मुस्लीम धर्मीय संस्कृतबद्दल एवढे प्रेम व्यक्त करतो, तर मग आपणा हिंदू धर्मीय बांधवांचेही संस्कृतविषयी काही कर्तव्य आहे की नाही ?... 'अशा शब्दांत संस्कृतचे महत्त्व व्यक्त केले. पूर्व केंद्रीय मंत्री श्री. आरीफ मोहंमद खाँ यांनीही पं. बिराजदारांना संस्कृतमध्येच शुभेच्छापत्र पाठवून संस्कृतचे राष्ट्रजीवनातील महत्त्व विशद केले होते. श्री. अटलबिहारी वाजपेयींसारख्या सर्वपक्षीय व सर्वधर्मीय मान्यवरांचीही पं. बिराजदारांच्या संस्कृत निमंत्रण पत्रिकेच्या निमित्ताने उल्लेखनीय कौतुकपर असंख्य पत्रे पं. बिराजदारांना आली होती. असे हे संस्कृतविषयक अखिल भारतीय स्वरूपाचे व्यापक कार्य सोमैया ट्रस्टच्या क्रियाशील संस्कृत प्रेमामुळे होऊ शकले.

सांसदांचे (खासदारांचे) व आमदारांचे संस्कृत-शपथग्रहण

हे एक सोमैया ट्रस्टचे ऐतिहासिक महत्त्वाचे संस्कृतविषयक उल्लेखनीय कार्य आहे. नवव्या लोकसभेपूर्वी (१९९०) लोकसभेत व राज्यसभेत, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या संस्कृत भाषेतून शपथ घेणाऱ्या सांसदांची (खासदारांची) संख्या, एका हाताच्याही बोटावर मोजण्याइतकी नव्हती.

पण सोमैया ट्रस्टच्या खास प्रयत्नानुसार दहाव्या विद्यमान लोकसभेत व राज्यसभेत संस्कृतमधून शपथ घेणाऱ्या सांसदांची संख्या दोन्हीही सभागृहांत मिळून सुमारे ८० झाली. जाणकारांच्या अभिप्रायानुसार, राष्ट्राची सर्वोच्च अंतिम सत्ता अधिष्ठित असलेल्या लोकसभा-राज्यसभा येथे, संस्कृत भाषा आता तृतीय क्रमांकावर आहे (क्र. १ हिंदी, क्र. २ इंग्रजी व क्र. ३ संस्कृत..... या नंतर अन्य भाषा) संस्कृत-शपथग्रहण करणाऱ्या सांसदांत, प्रमुख अशा सर्वपक्षांचे स्त्री-पुरुष सांसद आहेत. ही खरी उल्लेखनीय राष्ट्रीय एकात्मता!

या ऐतिहासिक महत्त्वाच्या संस्कृतविषयक कार्याबद्दल महनीय राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा, लोकसभा अध्यक्ष श्री. शिवराज पाटील, केंद्रीयमंत्री डॉ. बलराम जाखड, पूर्व केंद्रीय मंत्री श्री. आरीफ मोहंमद खां प्रभृती मान्यवरांनी सोमैया ट्रस्टची जाहीर प्रशंसा केलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात तांत्रिक नियमानुसार दिखाऊ बाऊ करून, संबंधित नोकरशाहीकडून संस्कृत शपथग्रहणाला १९९० मध्ये प्रतिबंध करण्याचे प्रयत्न झाले. त्यावेळी विधानपरिषदेच्या सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांना इच्छा असूनही शपथ संस्कृतमध्ये घेता आली नव्हती! घटनातज्ज्ञ कै. त्र्यं. कृ. टोपे यांचा सल्ला तसेच सोमैया ट्रस्टने केलेल्या खास प्रयत्नांमुळे महाराष्ट्राच्या आमदारांना संस्कृतमधून शपथ घेण्याची परवानगी मिळाली. १९९० मध्ये तीन आमदारांनी व आता १९९५ मध्ये ९ आमदारांनी संस्कृतमध्ये शपथग्रहण केले. यामध्ये आदिवासी आमदारांचाही उल्लेखनीय व प्रशंसनीय सहभाग आहे.

सोमैया ट्रस्टचे असे हे संस्कृतविषयक प्रशंसनीय कार्य विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने सोमैया-केंद्रीय संस्कृत विद्यापीठासाठी केंद्र शासनाकडे शिफारस केलेली आहे.

❖

गिरीवनवासी प्रगती

न मानूषात् परो धर्म : ।



माणुसकी हाच श्रेष्ठ धर्म.

गिरीवनवासी प्रगती मंडळ

आपल्या कष्टातून कमावलेल्या संपत्तीचा विनियोग विश्वस्त वृत्तीने करण्याची वृत्ती करमसीभाईंच्या ठिकाणी खोलवर रुजलेली आहे. उपनिषदांनी याच वृत्तीला 'इदं न मम' अशी वृत्ती म्हटलेले आहे. आणि या वृत्तीपासूनच करमसीभाईंनी विद्याविहार-सारखा शैक्षणिक प्रकल्प मुंबईजवळ प्रवर्तित केला. अन्यत्र काही ठिकाणीदेखील शिक्षणेच्छूंच्यासाठी असे प्रकल्प उभारले, काहींना सहाय्य दिले आणि शिक्षणाची संधी ग्रामीण परिसरातही उपलब्ध करून दिली. ज्ञानाइतके पवित्र काम दुसरे नाही - 'नही ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।'- असे संस्कृत सुभाषित आहे. करमसीभाईंनी हे पवित्र कार्य उदंड केले आहे. परंतु एवढ्या उदंडानेही तृप्त-समाधानी होण्याची वृत्ती करमसीभाईंच्या व्यक्तिमत्त्वात नाही. त्यांची तहान याहूनही मोठी आहे. अवघ्या मानवतेलाच प्रेमभराने व समदृष्टीने कवटाळण्याची महान आकांक्षा त्यांच्या ठायी आहे.

'न मानुषात परो धर्मः।' - कुठलाही धर्म माणुसकीहून मोठा नाही, अशी स्वामी विवेकानंद आणि महात्मा गांधी यांच्याप्रमाणेच करमसीभाईंचीदेखील धारणा आहे. स्वामी विवेकानंदांनी समाजाच्या तळागाळातल्या उपेक्षित, दुर्लक्षित, गोरगरीब, दलितांना, 'दरिद्रीनारायण' या शब्दाने संबोधले आहे. गांधीजींनी विवेकानंदांचा शब्द शिरोधार्य मानून पुढे वापरला. भगवंतांची अनेक रूपे आहेत. अनेक अवतार आहेत. अनेक आविष्कार आहेत. जो तो आपापल्या वृत्ती-प्रवृत्तीनुसार या सर्वांमधून ईश्वरदर्शन घेण्याचा प्रयत्न करीत असतो. विवेकानंद व गांधीजी यांना असे ईश्वरदर्शन घडले ते दीनदलितांच्या दारिद्र्यात. त्यांना 'नारायण' भेटला तो भयंकर स्वरुपाच्या दारिद्र्यात. म्हणून त्यांनी त्याला 'दरिद्रीनारायण' असेच म्हटले!

या दरिद्रीनारायणाचे दर्शन करमसीभाईंना त्यांच्या व्यवसायाच्या आणि तीर्थयात्रेच्या भारतभ्रमणात ठिकठिकाणी अत्यंत विदारक स्वरूपात घडले होते - घडत होते. अन्न, वस्त्र, निवारा, उपचार, शिक्षण या मुलभूत मानवी गरजांचा भयंकर अभाव सर्वत्रच आढळला. त्यातही विशेषतः रानावनांतून, गिरीकंदरांतून जन्मणाऱ्या आणि वाढणाऱ्या गिरिजनांच्या भागांमध्ये तर या अभावग्रस्त जीवनाचे भेसूर चित्र त्यांना दिसले. धरतीचे अंथरूण आणि

आकाशाचे पांघरूण करून ही मंडळी कशीबशी जगत आहेत. फळे, कंदमुळे खाऊन जवळजवळ नग्नावस्थेतच जीव तगवीत आहेत. शतकानुशतके हेच जीवन यांच्या वाट्याला आलेले आहे. १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला, परंतु ते स्वातंत्र्य या गिरिवनवासी भागापर्यंत पोचलेच नाही. ते मोठमोठ्या शहरांमधून आणि काही गावांमधूनच अडकून पडले. स्वातंत्र्याचा नुसता वाराही इकडे आला नाही. आले ते स्वातंत्र्यामुळे ज्यांच्या हाती सत्ता व मत्ता एकवटली, त्या सत्ताबाजांचे शोषणच. त्यामुळे धरतीची ही लेकरे आणखीनच नागवली गेली.

स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या विकासासाठी काही पंचवार्षिक योजनांचे आयोजन झाले, परंतु अशा योजना आल्या आणि गेल्या, तरी कित्येक वर्षे त्यांचा लाभ या भागांना मिळाला नाही. इथल्या जमिनी तशाच पडीक राहिल्या. इथले पाणी बंधाऱ्याविना तसेच वाहून गेले. कसल्याच सुविधा आणि सुधारणा झाल्या नाहीत. हे भाग दुर्लक्षितच राहिले. तशातच ख्रिश्चन, मुस्लिम व अन्य धर्मीय प्रचारक या दारिद्र्याचा फायदा उठवून, त्या गोरगरीबांना आमिष दाखवून त्यांना आपल्या धर्मात ओढत होते. मिनाक्षीपुरम्‌मध्येही काही दलितांना मुसलमान बनविण्यात आले होते. या वार्तांनी करमसीभाई दु:खित झाले होते. त्यांना तीन रात्री झोप आली नव्हती. ते हिंदू धर्माचे ज्वलंत अभिमानी आहेत. हिंदू धर्माच्या रक्षणासाठी त्यांचा प्रयत्न असतो. १९६६ मध्ये करमसीभाई लीलाबेन व सदाजीवनलाल यांच्यासह बँकॉक येथे भरलेल्या विश्व हिंदू परिषदेलाही उपस्थित राहिले होते. हे सर्व पाहून करमसीभाई स्वाभाविकपणे व्यथितचित्त बनले. ते अस्वस्थ झाले आणि या अवस्थेमधूनच त्यांनी या दुर्लक्षित गेलेल्या गिरिवनवासी बांधवांसाठी आपल्या कुवतीनुसार काहीतरी सेवाकार्य उभे करण्याचे ठरविले.

करमसीभाईंनी 'गिरिवनवासी प्रगती मंडळ' नावाची सेवासंस्था स्थापन केली. या संस्थेच्या उद्देशांतच असे नमूद केलेले आहे की,

१. गिरीकंदरांतून, रानावनांतून दूरवर राहणाऱ्या वाड्या-वस्त्यांतील आपल्या दुर्लक्षित आणि विसरलेल्या बांधवांच्या सर्व प्रकारच्या उन्नतीसाठी, सुविधा, सुधारणा, प्रगतीसाठी, समर्पित भावनेने व बुद्धीने काम करणाऱ्या, तसेच या कामाबद्दल सहानुभूती असणाऱ्यांच्या साहाय्याने ही संस्था कार्यशील राहिल.

२. ही संस्था राजकीय पक्षोपपक्ष आणि कार्य यांपासून अलिप्त राहिल.

३. आदिवासी माणसामाणसांमधील 'भ्रातृत्व' आणि ईश्वराचे 'पितृत्व' या विश्वात्मक मानवतेच्या आदर्शानुसार ही संस्था कार्यरत राहील.

केंद्राच्या वतीने प्रवर्तित अशा कार्यक्रमांबद्दल मंडळाच्या घटनेत असे नमूद केले आहे की,

'भारताच्या प्रत्येक राज्यात 'गिरीवनवासी प्रगती मंडळा'चे केंद्र उघडण्यात येईल. या

केंद्राच्या वतीने प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, तसेच किमान दोनशे मुलांसाठी व शंभर मुलींसाठी वसतिगृहे उघडण्यात येतील. 'बालभवन', 'वैद्यकीय उपचार केंद्र', 'शेतीमाळा', 'गोशाळा', 'कलाभवन' अथवा 'उद्योगशाळा' आणि वर्कशॉप - 'लहानशी कार्यशाळा' आदी सुविधाही इथे उपलब्ध होतील. एकूणच गिरिवनवासी प्रगती मंडळाचे हे केंद्र म्हणजे नव्या जीवनाची उभारणी करणारे निर्मितीस्थळ बनेल!

अशा ध्येय-धोरणाने जाती, धर्म, वंश, वर्ण व लिंगभेद न मानता सर्व मानवांना समान संधी उपलब्ध करून देणारे अखिल भारतीय गिरिवनवासी प्रगतीमंडळ सेवारत झाले.

२० सप्टेंबर १९७४ रोजी या मंडळाच्या नावाने एक ट्रस्टही स्थापन करण्यात आला.

या मंडळाने, अल्पशा काळापुरती करावयाची कामे व दीर्घ मुदतीसाठीची कामे, अशी आपल्या कामांची दुहेरी आखणी केली.

कमी मुदतीत करावयाच्या कामापैकी एक महत्त्वाचे काम म्हणून मंडळाने वार्षिक नेत्रोपचार आणि अन्य वैद्यकीय मदत शिबीरे भरविण्यास सुरूवात केली. ही आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारी शिबीरे देशाच्या विविध गिरिवनवासी भागातील ओसाड अशा आंतरभागात घेण्यात आली. हेतू असा की त्या परिसरातील दलित-गरीब गरजूंना याचा लाभ प्रामुख्याने मिळावा.

मंडळाने त्या त्या गिरीवनवासी भागातील सामाजिक आणि परिस्थितीजन्य, पर्वतीय आणि जंगल भागातील शेती, वैद्यकीय मदत, पोषक आहार, तसेच सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता या संदर्भातही संशोधनकार्य हाती घेण्याचे ठरविले होते.

मंडळाने दीर्घ मुदतीने करावयाचे दुसऱ्या प्रकारचे काम, महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात नरेशवाडी येथे सुरू केले. त्या परिसरातील गिरिवनवासींच्यासाठी तिथे शेती, शिक्षण आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध केल्या.

मंडळाने देशाच्या विविध गिरिवनवासी विभागांमध्ये भरविलेल्या नेत्रदान व अन्य वैद्यकीय सेवा-शिबिरांविषयी थोडक्यात अशी माहिती एका पुस्तिकेत नमूद केलेली आहे; ती अशी :

शिबिरांमध्ये दाखल झालेल्या रुग्णाला सर्व प्रकारची वैद्यकिय (Medical, Surgical or Clinical) मदत तर मिळेच, पण त्याचबरोबर शिबिराच्या अल्पशा कालावधीत त्या भागातील परिस्थितीमध्ये काही सुधारणा घडवून आणण्याचा मंडळाचा प्रयत्न असे; आणि म्हणूनच शिबिरात येणाऱ्या रुग्णाकडे केवळ एक रुग्ण म्हणून न पाहता त्याच्याशी सांस्कृतिक संदर्भात संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असे. मंडळाची ही शिबीरे म्हणजे केवळ रोगाचे निदान करणारी व त्यावर उपचार करणारी केंद्रे नसून जीवनाचे, सामूहिक कार्याचे आणि माणसामाणसांमधील बंधुत्वाचे वातावरण निर्माण करणारी प्रायोगिक केंद्रेच होती.

मंडळाने आयोजित केलेली ही शिबिरे म्हणजे फारच मोठ्या प्रमाणावरील संघटनात्मक प्रयत्न होता. सुमारे १,५०,००० स्क्वेअर फूट जागा या शिबिराने व्यापलेली असे. तिथे विभागावर सुमारे दीड हजार खाटांची रुग्णांसाठी सोय असे. शिबिराला पाणीपुरवठ्यासाठी व विद्युत पुरवठ्यासाठी स्वत:ची अशी खास व्यवस्था केलेली असे. दररोज सुमारे दहा हजार लोक भोजन करतील अशी उत्तम व्यवस्था असे. या सर्व सुविधांसाठी व सेवाकार्यासाठी मंडळाला खाजगी संस्था तसेच राज्य व केंद्र शासनाकडून साहाय्य लाभत असे.

सुमारे तीन आठवड्यांच्या शिबिर कालावधीत तो परिसर चैतन्यशील अशा प्रेरणादायी हालचालींनी गजबजलेल्या लहानशा गावकुसाहून मोठे स्वरूप धारण करीत असे.

शिबिरांमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी मंडळाने विविध सुविधा ठेवलेल्या होत्या. त्यापैकी काही अशा :

१. नेत्ररुग्णांना व त्यांच्याबरोबर राहणाऱ्या मदतनीसांना शिबिरात दाखल होण्यासाठी व नंतर त्यांना आपल्या घरी परतण्यासाठी वाहनांना मोफत सोय असे.
२. शस्त्रक्रियेसह सर्व प्रकारची वैद्यकीय उपचार सेवा मोफत असे.
३. रुग्णांना व त्यांच्याबरोबर आलेल्या मदतनीसांना भोजनाची मोफत सोय आहे.
४. रुग्णांना नवीन कपडे मोफत दिले जात असत.
५. नेत्ररुग्णांना गॉगल्स आणि चष्मे मोफत दिले जात असत.
६. शस्त्रक्रियेनंतर सुमारे महिनाभर पुरतील एवढी आवश्यक ती औषधे रुग्णांना मोफत पुरविली जात असत.

अशा प्रकारे रुग्ण, त्याचा नातलग अथवा मदतनीस यांच्यासह रुग्णाला या शिबीर कालावधीत मंडळाने जणू काही पूर्णपणे दत्तकच घेतलेले असे.

मंडळाचे हे नेत्रदान-शिबिर म्हणजे केवळ नेत्रोपचार करणारे किंवा एखादे साधे वैद्यकिय शिबिर नसे, तर विविध प्रकारच्या रोगांवरही इथे उपचाराची जी सोय असे ती अशी :

१. दृष्टीदान-यज्ञ (डोळ्यांवरील उपचार आणि शस्त्रक्रिया)
२. स्त्री-रोग निदान, उपचार शिबिर (गायनाकॉलॉजीकल कँप)
३. गायनाकॉलॉजीकल कॅन्सर डिटेक्शन सेंटर
४. सर्वसामान्य शस्त्रक्रिया (जनरल सर्जरी)
५. दंतयज्ञ (डेंटल कँप)
६. बालरोग विभाग (चाईल्ड डिसीज सेक्शन)
७. पोलिओ चाईल्ड केअर सेंटर
८. हाडवैद्य केंद्र (बोन सेटींग)

९. आयुर्वेदिक उपचार केंद्र

१०. योगशिबिर (योग सेक्शन)

११. त्या परिसरातील बालकांना पोलिओ डोस देण्याची व्यवस्था.

मंडळाने १९८०-८१ पर्यंत पुढीलप्रमाणे सात शिबिरे घेतली. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

	ठिकाण	राज्य	वर्ष	रुग्णसंख्या
१.	सुरगणा	जिल्हा नाशिक, महाराष्ट्र	१९७४-७५	७,८७८
२.	शामलाजी	जिल्हा साबरकंठा, गुजरात	१९७५-७६	१४,५६३
३.	बागीडोरा	जिल्हा बनासववाडा, राजस्थान	१९७६-७७	१८,३९२
४.	अमरकंटक	जिल्हा शाहडोल, मध्य प्रदेश	१९७७-७८	१६,२९९
५.	जेकैपूर	जिल्हा कोरापूट, ओरिसा	१९७८-७९	३४,०९६
६.	मेस्रा	जिल्हा रांची, बिहार	१९७९-८०	४५,२२७
७.	कुकमा	जिल्हा कच्छ, गुजरात	१९८०-८१	४९,१६२
			एकूण	**१,८५,४१७**

मंडळाच्या या शिबिरांच्या वार्ता दहा दिशांना पसरली आणि मानवतेचा हा अभिनव सेवायज्ञ पाहण्यासाठी सर्व बाजूंनी सर्व तऱ्हेच्या लोकांनी गर्दी केली. त्यात गरीब-श्रीमंत होते, लहान-थोर होते, स्त्री-पुरुष होते, देशी-परदेशी होते, लोकसेवक, सरकारी अधिकारी आणि मंत्रीगणही होते, साधू-सत्पुरुषही होते. त्यातच देशी-परदेशी वृत्तपत्रांचे वार्ताहरही होते. त्यांनी आपापल्या वृत्तपत्रांतून या शिबिरासंबंधी मोठ्या आस्थेने लिहिले.

मध्यप्रदेशातील अमरकंटक येथे भरलेल्या शिबिरासंबंधी 'इंटरनॅशनल हेरल्ड ट्रिब्यून'ने आपल्या २५ जानेवारी १९७८ च्या अंकात पुढील प्रमाणे मोठा मथळाच दिला होता.

"JUNGLE, HILL TRIBES OF INDIA GET HEALTH CARE FOR FIRST TIME"

'इंडिया ॲब्रॉड' या वृत्तपत्राने म्हटले होते, "MEDICAL TEAM FINDS DISEASE RAMPANT AMONG TRIBALS."

'द इंडियन एक्सप्रेस'ने मथळा दिला होता. "Doctors in midst of tribals."

'हिंदुस्थान टाईम्स'ने म्हटले होते, "Tribals see doctors for the first time."

'दी स्टेटसमन'ने छापले होते, "Thousands Get Treatment at Orissa Medical Camp."

‘टाईम्स ऑफ इंडिया’ने म्हटले होते, "High incidence of cancer among MP Tribals."

‘क्रॉनिकल’ ने छापले होते, "Union Home Minister Lauded the work of the Mandal"

‘टाईम्स ऑफ इंडिया’ने आणखी एका अंकात छापले होते, "Taking Medicare to the deprived."

अशा प्रकारे मथळे देऊन देशीविदेशी भाषांतील वृत्तपत्रांनी या शिबिरांना मोठी प्रसिद्धी दिली होती.

या प्रत्येक शिबिरासाठी सुमारे दहा ते पंधरा लक्ष रुपयांचा खर्च होत असे.

‘रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉर दी ब्लाईंड’ या जागतिक समाजसेवी संस्थेने या शिबिरांची प्रशंसा करून आपले बहुमोल सहकार्यही दिले होते.

कुकमा येथील शिबिराला दिनांक ३ जून १९८१ रोजी द ब्रिटिश हायकमिशनरने भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी मंडळाच्या या कार्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले होते.

मराठी भाषेतील ‘गणराज्य’ साप्ताहिकाने कोपरगावहून १५ मार्च १९७९ रोजी खास गिरिवनवासी अंकच प्रसिद्ध केला होता. त्यात ‘आशिया खंडातील पहिले फिरते सुसज्ज हॉस्पिटल : जेकैपूर’ - या मथळ्याखाली शिबिराचा सविस्तर वृत्तांतच दिला होता. त्यातील काही भाग संक्षेपाने मुद्दाम उद्धृत अशासाठी केला आहे की, शिबिर-कार्याची व व्यवस्थेची कल्पना यावी. या लेखात म्हटले आहे :

“मुंबईच्या गिरिवनवासी प्रगती मंडळाच्यावतीने ओरिसा राज्यातील अतिशय मागासलेला भाग म्हणून समजल्या जाणाऱ्या किंबहुना दारिद्र्याचे मूर्तीमंत प्रतीक म्हणून ज्याचे वर्णन करता येईल अशा कलिंगघाटी व कैलासपूर या टेकड्यांच्या कुशीमध्ये दंडकारण्यासारख्या निसर्गरम्य परिसरात जे. के. पेपर मिलच्याजवळ कोरापूट जिल्ह्यातील रायगड तालुक्यातील जेकैपूर या गावी २८ जानेवारी ते १८ फेब्रुवारी १९७९ पर्यंत सर्व रोगनिवारण व नेत्रशिबिर आयोजित करण्यात आले होते.

जेकैपूर गावानजिक वाहणाऱ्या नागावली नदीच्या पैलतीरावरील दोन विभागांमध्ये शिबिराची व्यवस्था करण्यात आली होती. नदीच्या एका तीरावर सर्व सोयींनी युक्त असा विस्तीर्ण शामियाना उभारलेला होता. स्वतंत्र ओरिसा राज्याच्या निर्मितीसाठी अहिंसक मार्गाने आंदोलन करणारे ओरिसाचे प्रतिगांधीजी म्हणून गणले जाणारे थोर देशभक्त, क्रांतिवीर कै. गोपबंधूदास यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांना अभिवादन करण्यासाठी या शामियानास ‘गोपबंधूदास नगर’ असे नामाभिधान करण्यात आले होते. यात डोळ्यांची चिकित्सा व शस्त्रक्रियेसाठी वैशिष्ट्यपूर्ण व अत्याधुनिक हॉस्पिटलच्या तोडीने

सुसज्ज व सर्व यंत्रसामग्रीची उपलब्धता असणारे शस्त्रक्रियागृह-ऑपरेशन थिएटर - उभारण्यात आले होते. या कक्षात पाच ते दहा मिनिटांमध्ये एक शस्त्रक्रिया केली जात असे. एका दिवसामध्ये या कक्षात जास्तीत जास्त दोनशे ऑपरेशन्स झाली आहेत. यांमध्ये मोतीबिंदूंच्या ऑपरेशनाचाही समावेश आहे. डोळ्यांचे ऑपरेशन झालेल्या रुग्णांना राहण्यासाठी मोठ्या आकाराचे बारा वॉर्डस तयार करण्यात आले होते व त्यांतून दोनशे तीस खाटा ठेवण्यात आल्या होत्या. या खाटांवर गवताच्या पेंढ्यांचा चुरा करून तो बारदानमध्ये समप्रमाणात भरून योग्य त्या आकाराची गादी टाकलेली होती. करमसीभाई या गादीस 'गरिबांच्या फोमच्या गाद्या' असे म्हणत असत. रुग्णांना थंडीवाऱ्यापासून बचाव होण्यासाठी पुरेशा कपड्यांची व्यवस्था करण्यात आली होती.

याच विभागामध्ये राजकोट येथील दंतविशारद चिकित्सक श्री. लाभशंकर मूळशंकर शुक्ल यांची कन्या दंतवैद्या सरोजबहेन शुक्ल या कसल्याही प्रकराचे इंजेक्शन न देता दुखावणारे व हलणारे दात आयुर्वेदीय पद्धतीने काढीत असत. एका वेळेस अवघ्या दहा मिनीटांमध्ये रोग्याला काहीही त्रास न होता तेरा दात काढून त्यांनी एक नवाच विक्रम प्रस्थापित केला! सरोजबहेन शुक्ल यांनी ही विद्या आपल्या पिताजींकडून आत्मसात केली. त्यांनी कुठल्याही मेडिकल कॉलेजची पदवी घेतलेली नाही. मात्र आयुर्वेदामध्ये असणाऱ्या जालंदर योगाचा अभ्यास केला आहे. हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील नगवाई येथील वैद्य स्वामी परमानंद आचार्य यांचे आयुर्वेदिक औषधोपचार केंद्र तिथेच सुरू करण्यात आले होते. स्वामीजींनी यासाठी सुमारे बारा हजार रुपयांची औषधे आणली होती. स्वामीजींनी प्रामुख्याने संधिवात, दमा, अल्सर या रोगांवर उपचार केले. जेकैपूर परिसरामध्ये येणाऱ्या शंभर किलोमीटर कार्यक्षेत्रात पासष्ट टक्के लोक अल्सर व संधिवाताच्या रोगाने ग्रासलेले आहेत असे अनुमान औषधाच्या खपावरून स्वामीजींनी काढले.

रुग्ण व त्यांच्याबरोबर येणारे नातेवाईक यांच्यासाठी एक स्वतंत्र भोजनगृह उभारण्यात आले होते. त्या भोजनास 'समष्टीभोजन' असे संबोधले जाते. दररोज सकाळ-संध्याकाळ सुमारे आठ हजार लोक या भोजनाचा लाभ घेत असत.

शिबिरासाठी लागणारी साहित्यसामग्री, धान्य, मसाल्याचे पदार्थ, औषधे, स्टेशनरी साहित्य, कपडे इत्यादी ठेवण्यासाठी एका विस्तीर्ण जागेवर एक भांडार-स्टोअररूम-उभारण्यात आले होते.

शामियानाच्या मध्यावर व प्रवेशद्वाराच्या बरोबर समोर सर्वांचे लक्ष आकर्षून घेणारी, प्रेरणादायी लक्ष्मीनारायणाची भव्य व प्रसन्न मूर्ती दिसत होती.

मुंबईमधील महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी गिरिवन जनतेला शास्त्रीय माहिती देण्यासाठी खास एका शास्त्रीय शिबिराचे आयोजन केले होते.

नागावली नदीच्या दुसऱ्या तीरावर बांधकाम पूर्ण होत असलेल्या ई.एस.आय. दवाखान्यामध्ये गायनाकॉलॉजी, ई.एन.टी., त्वचा व योगउपचार हे विभाग सुरू करण्यात आले होते. गायनाकॉलॉजीची ऑपरेशन्स मुंबईचे विश्वविख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. बी. एन. पुरंदरे, त्यांचे चिरंजीव डॉ. सी. बी. पुरंदरे व त्यांची पत्नी डॉ. सौ. नंदिनी सी. पुरंदरे जातीने करीत असत. पत्रकारांना मुलाखत देताना डॉ. बी. एन. पुरंदरे म्हणाले की, "आदिवासी भागांमध्ये बाळंतपणाच्या सेवा लोकांना उपलब्ध नसल्याने गायनाकॉलॉजीची ऑपरेशन्स करणे त्रासाचे व गुंतागुंतीचे झाले आहे. लोक अज्ञानी असल्याने त्यांना वैद्यकिय सेवेबद्दल माहिती नाही. किंबहुना त्यांच्यात अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त असल्याने त्यांना ऑपरेशनसाठी तयार करणे फारच त्रासदायक ठरले आहे." या शिबिराबद्दलचा आपला अनुभव सांगताना ते म्हणाले, "आदिवासी भागांमध्ये अशा प्रकारचे रोगनिवारण शिबिर आयोजित केल्याने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्यकेंद्रांना चालना व प्रेरणा मिळेल. तेथील नर्सेस व डॉक्टर्स यांनी अशा प्रकारच्या शिबिरात भाग घेऊन मर्यादित साहित्य सामग्रीमध्ये केवळ पाच ऑपरेशन्स केली तरी ते भावी आयुष्यात निष्णात वैद्यक बनू शकतील." या संदर्भात त्यांनी मुंबई व पुणे येथील काही नामवंत डॉक्टरांचा उल्लेख केला. गिरिवनवासी प्रगती मंडळासारख्या स्वयंसेवी संस्था निर्माण होण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. शासनाने या रोगनिवारण शिबिरांसाठी अनुदान म्हणून किरकोळ रक्कम देण्याऐवजी शिबिरे आयोजित करणारी मंडळे, त्यांचे पदाधिकारी व त्यांचे कार्य पाहून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा व या कार्याला चालना द्यावी. स्वयंसेवी संस्था, शासन व आदिवासी जनता यांचा जर यासाठी मिलाफ झाला तर गिरिवनवासींचे कल्याण निश्चितपणे होईल असा विश्वास डॉ. पुरंदरे यांनी व्यक्त केला.

ओरिसा परिसरात स्त्री-रोगाचे प्रमाण अतिशय मोठ्या प्रमाणात आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वंध्यत्व, गर्भपाताचे प्रमाण, बाळंतपणाच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे निर्माण होणारे दोष, संसर्गजन्य रोग व कॅन्सरचे प्रमाण फार आहे असे डॉ. पुरंदरे यांनी सांगितले; तर कान, नाक, व घसा यावर उपचार करणारे डॉ. सुधीर जोशी म्हणाले, "आदिवासी लोक शरीर स्वच्छ ठेवण्याकडे दुर्लक्ष करतात. किंबहुना त्यांना शरीरस्वच्छतेचे महत्त्वच समजत नाही. म्हणूनच कान, नाक, घसा यांसारख्या रोगांना ते बळी पडतात. या लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले तर त्यांच्यामध्ये या रोगांचे प्रमाण काही प्रमाणात का होईना कमी होईल."

मुंबईचे त्वचारोगाचे प्रसिद्ध निष्णात डॉ. एन.एस.व्ही.चारी, डॉ. सौ. सुधाताई चारी, डॉ. श्रीकांत शंकर पदे या डॉक्टरांनी जेकैपूर परिसरातील आदिवासींच्या त्वचेची चिकित्सा केली. त्यांनी चिकित्सा केलेले रोगी पस्तीस ते चाळीस या वयोगटातील मोठ्या प्रमाणात होते. तपासणी केलेल्या रोग्यांमध्ये नऊ टक्के कुष्ठरोगाचे प्रमाण आढळून आले. त्याचप्रमाणे

इसब, गजकर्ण, नायटे, पांढरे कोड आदी रोगांचे प्रमाणही बऱ्याच मोठ्या प्रमाणात जाणवले.

योग व योगशिबिराचे महत्त्व स्वामी श्री. ओमानंदजी व श्री. आर.सी.गुप्ता यांनी पटवून दिले. स्वामी ओमानंदजींनी या शिबिर कालावधीमध्येच जे. के. पेपर मिलचे व्यवस्थापक श्रीवास्तव यांच्या सहकार्याने एक योगासन प्रशिक्षण वर्ग पेपर मिलमधील सभागृहामध्येच चालविला. "प्राणायाम केल्याने सर्व रोग नष्ट होतात व मनुष्य निरोगी आणि सदृढ बनू शकतो", असे त्यांनी सांगितले.

जेकैपूरच्या आसपास शंभर किलोमीटरच्या परिसरात ठिकठिकाणी मंडळाने साठ प्राथमिक आरोग्यकेंद्रे उघडलेली होती. त्यातून गिरिवनवासींना डोळ्यांवर व इतर रोगांवर प्राथमिक उपचार करूनच ऑपरेशनसाठी प्रवेश दिला जात असे.

ऑपरेशन झालेल्या रुग्णांना घरी जाण्याच्या वेळी गॉगल, चष्मा, कपडे, पुरेसे औषध व त्यांच्या जाण्या-येण्याचे प्रवासभाडे दिले जात असे. हा निरोप समारंभ लक्ष्मीनारायणाच्या मंदिरात होत असे. लक्ष्मीनारायणाचा मोनोग्राम असलेला गोलाकार बिल्ला रुग्णांना देताना त्यांच्याकडून 'मी कधीही दारू पिणार नाही, धूम्रपान करणार नाही व खोटे बोलणार नाही', अशी शपथ घेतली जाई.

अशा प्रकारे या शिबिरांच्या माध्यमातून गिरिवनवासी जनतेमध्ये सामाजिक परिवर्तन करण्याचाही प्रयत्न मंडळ करीत असे. महात्मा गांधीजींना आवडणारी ग्रामसफाईदेखील शिबिराच्यावतीने आयोजित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे त्यांना लोकशिक्षण देण्याचाही एक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला होता.

मंडळाच्या या रोगनिवारण शिबिरासाठी देशाच्या विविध भागांतून अनेक डॉक्टर्स, नर्सेस, स्वयंसेवक व संघटक आले होते.

या शिबिरासाठी सर्व प्रकारची यंत्रणा चाळीस विभागांतून सात संघटकांच्याद्वारे उत्तम प्रकारे राबविली जात होती. या संघटकांमध्ये अहमदाबादचे प्रा. सुरेशभाई शहा, मुंबईचे रवीभाई खन्ना, प्रेमजीभाई रूपारेल, किशोरभाई टोपरानी, जसवंतीबहेन देसाई, प्रमिलाबहेन पारेख व सुरेशभाई मात्रावाडिया हे सात संघटकप्रमुख होते. त्यांना करमसीभाई व शांतीलालजी सोमैया, लीलाबेन कोटक, रायगडचे कांताभाई ठाकर, मनीभाई कक्कड, मणीबेन कोठारी, श्रीवास्तव आदींचे मार्गदर्शन लाभत होते.

या शिबिराला ओरिसा सरकारचे सर्व मंत्री, कोरापूट जिल्ह्याचे कलेक्टर, पोलीस आदींचे उत्तम सहकार्य लाभले.

या शिबिरामध्ये करमसीभाईंच्या बरोबरीनेच त्यांच्या पत्नी सौ. साकरबाई, चिरंजीव डॉ. शांतिलालजी, सूनबाई सौ. मायाबेन, सौ. लीलाबेन कोटक यांच्यासह सर्व कन्या व इतर अनेक नातेवाईकसुद्धा, कुठल्याही मानापमानाची भावना न ठेवता सर्वसामान्य

स्वयंसेवकाच्या खांद्याला खांदा लावून शिबिराच्या सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत कार्यमग्न झालेले होते.

एके दिवशी बिहारचे मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर व ओरिसातील मंत्री सर्वश्री समरेंद्र कुंडू, हरीचँद्रो बक्षीपात्रो, पी. के. दास व जगबीरसिंग यांनी एकाच वेळी शिबिराला भेट दिली. त्यावेळी बरीच गर्दी जमली व मंत्र्यांची जत्रा भरल्याचे दृश्य दिसू लागले.

डोळ्याचे ऑपरेशन झालेल्या एका रुग्णाची माहिती डॉ. शांतिलालजी सोमैयांनी बिहारचे मुख्यमंत्री श्री. कर्पुरी ठाकूर यांना एका वॉर्डामध्ये दिली तेव्हा कर्पुरी ठाकूर उद्‌गारले, "आप लोग यहाँ भगवान के रूप में आये हो।।"

ओरिसाचे उद्योगमंत्री श्री. हरिचँद्रो बक्षीपात्रो यांनी तर "या अवाढव्य शिबिराचा गौरव कोणत्या शब्दांत करावा, यासाठी मजजवळ शब्द नाहीत", असे भावपूर्ण उद्‌गार शिबिरपाहणी करताना काढले. "गिरिवनवासी भागांमध्ये दर सहा महिन्यांनी अशा प्रकारचे रोगनिवारण शिबिर आयोजित करण्यासाठी केंद्र शासनाने स्वयंसेवी संस्थांना मदत करावी म्हणजे वैद्यकिय शास्त्राबद्दल गिरिवनवासींना वाटणारी भीती दूर होईल व हळूहळू रोगाचे प्रमाण कमी कमी होत जाईल", असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

गिरिवनवासी प्रगती मंडळाने अशी एकूण सात शिबिरे विविध ठिकाणी घेतली. याविषयी मागे माहिती दिलेलीच आहे.

या शिबिरांसाठी आधी कितीतरी महिने करमसीभाई कार्यमग्न असत. शिबिराचा ध्यास घेऊन अनेक गोष्टींकडे लक्ष पुरवीत असत. शिबिराची जागा निवडण्यापासून ते शिबिर पार पडेपर्यंत त्यांना विश्रांती अशी ठाऊक नसे. फुरसतच नसे. ते स्वत: तर असे रोज अठरा-एकोणीस तास काम करीत असतच, पण शिवाय आपल्या इतर सहकाऱ्यांनाही नेमून दिलेल्या कामाला लावीत असत. केव्हा, कुठे आणि कसे काय काय करायचे याचा तपशीलवार आराखडा त्यांच्याकडे तयार असे आणि त्या त्या कामाला योग्य अशी माणसे निवडून त्यांच्यावर ती जबाबदारी ते टाकीत असत. त्यानुसार ते ते काम झाले किंवा नाही हेही बारकाईने पाहत असत. अर्धवट राहिलेल्या कामांचा पाठपुरावा करीत असत. सगळे कसे जिथल्या तिथे, व्यवस्थित आणि आदर्शवत झाले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे.

शिबिरकालात करमसीभाईंना दिवस पहाटे चार वाजताच उजाडत असे. दिवस थंडीचे असले तरी ते त्यावेळी थंडगार पाण्याने स्नान करीत असत. प्रार्थना झाल्यावर ते कामाला लागत असत. शिबिरासाठी आलेल्या प्रत्येक रुग्णाशी बोलून ते त्याची विचारपूस करीत असत आणि त्यांची योग्य ती सोय लावून देत असत. दारिद्र्यामुळे गिरिवनवासी रुग्णांना स्वच्छ राहता येत नसे. एकदा एकाने त्यांना सांगितले की, 'आंघोळीनंतर बदलायला माझ्याजवळ दुसरी लंगोटीच नाही.' याची वेदना करमसीभाईंना जाणवत असे. शिबिरासाठी

आलेल्या कितीतरी आदिवासी रुणांना ते स्वत: आंघोळ घालून स्वच्छ करीत असत आणि त्यांना नवीन कपडे देत असत. त्यांच्याप्रमाणेच त्यांच्या पत्नी सौ. साकरबाई, कन्या लीलाबेन, जावई माधवजीभाई कोटक, सूनबाई मायाबेन तसेच जसवंतीबेन, प्रेमाबेन आदी भगिनीदेखील आदिवासी स्त्रियांना आंघोळ घालीत असत. नवीन कपडे देत असत.

ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन झाल्यावर पहिल्या रुग्णाला, त्याचे स्ट्रेचर स्वत: वाहून त्याला त्याच्या वॉर्डमधील खाटेवर आणून निजविण्याचा व्रतनिश्चय करमसीभाईंनी केला होता. कितीतरी रुग्णांची स्ट्रेचर उचलून वाहिली आहेत. तसेच वॉर्डावॉर्डामधून ते जात आणि प्रत्येक रुग्णाला भेटत असत. त्याची चौकशी करीत असत. अडचण विचारीत आणि सोय करीत. अशा वेळी मानवतेचा प्रथमच साक्षात्कार झालेले ते रुग्ण अंत:करणपूर्वक त्यांना देव मानून नमस्कार करीत असत. तोंड भरून दुवा देत असत. त्यांना आजवर माणूस म्हणून कोणीच असे जिव्हाळ्याने, प्रेमाने जवळ घेतलेले नसे. त्यांच्या अभावग्रस्त जीवनात माणुसकीचा हा सुखद अनुभव प्रथमच मिळत असे. त्यांचे डोळे कृतज्ञतेने भरून येत असत.

जगन्नाथाच्या रथाला असे हजारोंचे हात लागतात आणि रथयात्रा संपन्न होते तसेच या शिबिरांसारखे अवाढव्य काम करण्यासाठी शेकडोंचे हात करमसीभाईंच्या पुरुषार्थी हातांना येऊन मिळत असत. 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान' असे म्हणतात. करमसीभाईंचा संकल्प शंभर नंबरी सत्याधिष्ठित असल्यामुळे तो भगवत्कृपेने तडीस जात असे. संपन्न होत असे.

करमसीभाईंनी प्रवर्तित केलेल्या या कर्मयज्ञात अनेकजण, आपापली नित्याची कामे बाजूला सारून, व्यवसाय-धंदा दूर ठेवून आपल्या सेवेची आहुती देण्यासाठी शिबिराच्या आधीपासूनच व शिबिरातही पुढे सरसावून येत असत.

श्री. सदाजीवनलाल हे असेच एक करमसीभाईंचे वयस्क सहकारी. करमसीभाईंच्याबरोबर त्यांनी देशात व परदेशांतही प्रवास केलेला होता. आपल्या आठवणी सांगताना ते म्हणाले, "१९७५ मध्ये मी त्यांच्याबरोबर दौऱ्यावर होतो. एकदा एका ठिकाणी काही कारणाने आम्ही अडकून पडलो होतो. जेवणाखाणाची थोडीशी अडचणच झाली होती. परंतु करमसीभाईं त्याविषयी कधी कुरकूर करीत नसत. थोडीशी फळे, दूध, पाणी यांवर ते चालवून घेत असत. एवढ्यावर ते खूष असत. जिथे जिथे जे काही पाहण्यासारखे असेल ते पायी हिंडून पाहत असत. त्यांच्याबरोबर मी बँकॉक, सिंगापूर, इंडोनेशिया, मलेशियामध्ये कौलालंपूर इत्यादी ठिकाणी गेलो होतो. कौलालंपूरमध्ये वीस ते बावीस मैल दूर अंतरावर एक मंदिर आहे. साठ-सत्तर मंदिरांचा एक समूहच आहे. हे ठिकाण टेकडीवर असून तिथे सात-आठशे पायऱ्या चढून जावे लागते. एवढे चढणे आपल्याकडून होणार नाही असे साकरबाई म्हणाल्या, पण करमसीभाईंचा उत्साह मोठा दांडगा. ते स्वत: भरभर

चढून वर गेले. चढताना मलाही थोडीशी धाम लागली. पण करमसीभाई एखाद्या विशीतल्या तरुणाप्रमाणे चढून गेले. मग आम्ही हिंदू आणि बौद्ध मंदिरे पाहिली.

या प्रवासात ते दिवसा हिंडण्याफिरण्यामुळे कितीही थकले भागले असले तरी पहाटेच ते उठत असत व कामाला सुरूवात करीत असत. राहण्याच्या व्यवस्थेत कुठे अडचण असली तरी ते त्यामुळे अस्वस्थ होत नसत. झोपायला चांगला बिस्तरा नसला तर सतरंजीवर झोपत. जेवण साधे, पण शाकाहारी, मग त्याला स्वाद असो, नसो. कपडेही साधेच, पण खादीचे हवेत. एवढीच त्यांची अपेक्षा असे.

गिरिवनवासी प्रगती मंडळाचे काम करमसीभाई अगदी बारीकसारीकपणाने पाहतात. कुठलीही गोष्ट त्यांच्या नजरेतून सुटत नाही. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते स्वत: काम करतातच पण बरोबरच्या सर्वांनाच कामाला लावतात.

गिरिवनवासी प्रगती मंडळाच्या शिबिरामध्ये तर ते अहोरात्र श्रम करीत असत. गिरिवनवासींमधील आत्यंतिक दारिद्र्य पाहून करुणेने त्यांचे डोळे पाझरत असत. एकदा एकाजवळ एका लंगोटीशिवाय काहीच नव्हते. म्हणून तो आंघोळच करीत नव्हता. करमसीभाईंनी त्याला आंघोळ घालून कपडे दिले. त्याने विचारले, 'मला तुम्ही हे कपडे वगैरे का देता? तुम्हांला माझे मत पाहिजे का?'... हे ऐकून करमसीभाईंना खूप वाईट वाटले. त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. तो माणूस त्यांना सारखे विचारीत होता, 'तुम्ही डोळ्यांची ऑपरेशन फुकट करता. राहण्याची, खाण्याची सोय करता. कपडे, चष्मे देता. हे सर्व कशासाठी करता?'... हे ऐकून करमसीभाईंचे अंत:करण पिळवटून जात असे.

आजकाल नि:स्वार्थीपणाने वा निर्मोहीपणाने असे कुणी कुणासाठी करत नाही. केलेच तर त्यामागे काहीतरी स्वार्थ - निदान मताचा तरी असतोच, हे आता गोरगरीबांच्याही लक्षात येऊन चुकले आहे. निरलस, निरहंकारी सेवा ही गोष्ट दुर्मिळच झालेली आहे. त्यामुळे देणाऱ्या दात्याविषयी एक प्रकारचा अविश्वासही घेणाऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे. परस्पर अविश्वासाची भावना हे रोजच्या रोगट समाजरचनेचे निदर्शक आहे. हे मानवतेला घातक आहे.

श्री. प्रेमजीभाई रूपारेल म्हणाले, "करमसीभाईंची ओळख कच्छमधली. त्यांच्या व आमच्या गावात सात मैलांचे अंतर आहे. त्यांच्या गावात नाव तेरा. आमच्या गावाचे नाव कोठारा. माझ्या वडिलांचे भाऊ करनदास हे करमसीभाईंचे मित्र होते. ते पण खादीधारी होते.

"गिरिवनवासी प्रगती मंडळापुढे आम्ही जवळ आलो. सुगरणा येथील शिबिराला मी गेलो होतो. तिथली व्यवस्था आणि करमसीभाईंचे कष्ट पाहून थक्क झालो. गिरिवनवासींबद्दल त्यांना फार कणव वाटते. त्यांना केवळ वैद्यकीय मदत करून भागणार नाही तर त्यांना अन्न, पाणी, कपडे, शिक्षणसुद्धा दिले पाहिजे याची त्यांना जाणीव आहे आणि म्हणूनच त्यांनी

नरेशवाडी येथे हॉस्पिटल आणि शाळा सुरू केली आहे.

"मी त्यांच्याबरोबर एकदा मफतलाल ग्रुपने आयोजित केलेल्या शिबिराला गेलो होतो. प्रवासात ते माझी फार काळजी घेत असत. ते पहाटे लवकर उठतात, पण मला लवकर उठणे जमत नाही. म्हणून ते मला 'लवकर उठत जा', असे कधी म्हणाले नाहीत. पण ते स्वत:च भजने, गीते म्हणत आणि त्यामुळे मला जाग येई. एकदा मी बाथरूममध्ये आंघोळ करायला गेलो होतो. मला आंघोळीस बराच वेळ लागला, तेव्हा त्यांनी दार वाजवले आणि म्हणाले, 'सावकाश होऊ द्या. तुम्हांला वेळ लागल्यामुळे मला काळजी वाटली म्हणून दार वाजवले.' इतकी ते दुसऱ्याची काळजी घेतात.

श्रीमती प्रमिलाबेन पारेख यांनी सांगितले की, "नेत्रशिबिराला मी दोनशे विद्यार्थी घेऊन गेलो होते. स्वयंसेवक म्हणून त्यातील काही थोडी मुले-मुली कामचुकार असतील, पण काहींनी वीस-वीस तास काम केले. रुग्णांबद्दल त्यांच्या मनात सहानुभूतीची सद्भावना जागृत झाली. शिबिरामध्ये सेवाकार्यासाठी यावयाला नवीन नवीन विद्यार्थी तयार असत.

"शिबिरात लक्ष्मीनारायणाचे मंदिर बनवण्यात येते. मंदिरात भजन-पूजन सकाळ-संध्याकाळ चालू असते. शिबिरातून रुग्ण घरी जाताना त्याला देवदर्शन व्हावे अशी ही व्यवस्था. करमसीभाई रुग्णांशी बोलताना मोठ्या प्रेमळपणाने बोलतात. विचारतात, 'विडी ओढतोस का?...' विडी ओढू नये. त्याने अपाय होतो.' मी असे रुग्ण पाहिले आहेत की जे हा उपदेश ऐकून खिशातली विडीकाडी काढून कचऱ्याच्या टोपलीत फेकून देतात. करमसीभाईंच्या पाया पडतात. पण करमसीभाईंना असे पाया पडून घेणे आवडत नाही. आम्ही त्यांना श्रीमान, शेठजी किंवा पूज्य वगैरे म्हणतो ते सुद्धा आवडत नाही. 'नुसते करमसीभाई म्हणा' असे ते सांगतात. प्रसंगोचित मार्मिक विनोदही त्यांच्या बोलण्यात असतो.

"शिबिरामध्ये ग्रामसफाईचा कार्यक्रम असतो. आमचे स्वयंसेवक गावात जाऊन, विभाग निवडून साफसफाई करतात. गावकऱ्यांना त्या कामात सहभागी व्हायला लावतात. त्यांना व्यसनमुक्तीचे महत्त्व समजावून सांगतात."

भजन-पूजनासाठी व पाठांतरासाठी श्री गिरिवनवासी प्रगती मंडळाच्यावतीने 'आराधना' भाग-१ नामक एक छोटीशी पुस्तिका करमसीभाईंनी प्रकाशित केली आहे. या संकलनाविषयी पुस्तिकेच्या प्रारंभी 'समर्पण'पत्रिका आहे. करमसीभाई लिहितात,

समर्पण

प्रभू!

इसमें मेरा कुछ नही है। संतोद्वारा दी हुई आपकी यह प्रसादी है।

इस जीवन में अगणित भूलें, अविचारी कार्य, तिरस्कार व अक्षम्य अपराध किये हैं।

अनेकों के दिल दु:खित किये है। दंभ को खूब पोषण दिया है। वह सब, प्रभु! आप और मैं हम दोनों को ही ज्ञात है।

इन परिस्थितीयों में और क्या हो सकता है, सिवा कि अपने किये हुए कर्मों का स्मरण करना, पश्चात्ताप और प्रायश्चित करना।

कर्मों का फल मुझे अवश्य ही भोगना चाहिए। इसके लिए मैं क्षमा नहीं चाहता। परंतु आपसे एक प्रार्थना अवश्य करता हूँ कि अबसे आगे भविष्य में कोई अविचारी कार्य ना करूँ।

अपने उतावलेपन और क्रोधी स्वभाव पर संयम रख सकू, अहंभाव दूर रख सकू ऐसी शक्ति और बुद्धि आपके इस बालक को आप कृपया प्रदान करें।

मन में उपरोक्त संकल्प किये है, और भी होते है। उसे साध्य करने के प्रयत्न जारी है। यदि शुभ एवं नि:स्वार्थ भाव से यह सत्य है तो प्रभू। उन्हें पूर्ण करने का सामर्थ्य प्रदान करें।

इससे अधिक क्या माँगू?

यह समर्पण स्वीकार करके अनुगृहीत करें।

आपका

करमसीभाई जेठाभाई सोमैया

या संकलन-पुस्तिकेत संस्कृत, हिंदी, गुजराथी भाषेतील स्तोत्रे, प्रार्थना, श्लोक, भजने, गीते इत्यादींचा समावेश भावार्थासह केलेला आहे. हिंदी भाषा व देवनागरी लिपी आग्रहपूर्वक वापरलेली आहे. तसा आग्रह करमसीभाईंनी नेहमीच ठेवलेला दिसतो.

या पुस्तिकेचा प्रसार खूपच झाला. १९९२ साली या पुस्तिकेची सातवी आवृत्ती प्रसिद्ध झाली. तिला करमसीभाईंनी प्रारंभी प्रास्तविक लिहिले आहे. करमसीभाई लिहितात :

प्रास्ताविक

आपके करमकमलों में 'आराधना' के प्रथम पुष्प की सातवी आवृत्ती प्रस्तुत करते हुए हमें हार्दिक प्रसन्नता होती है। हमें पूर्ण विश्वास है कि आराधना द्वारा पाठकगण आराधना करते हुए परम शक्तिवान परमात्मा से निकटता प्राप्त कर सकेंगे।

भौतिक उपायों से सुख की खोज में भटकता हुआ मनुष्य न तो सुख पाता है, न शांति। ऐसी परिस्थिती में मानसिक और आध्यात्मिक शांति पाने के लिए 'आराधना' नि:संदेह उपयुक्त होगी, क्योंकि इस 'आराधना' में अनेक महापुरुषों की हृद्य-चेदना से भरे हुए नित्यपाठ के लिए उपयुक्त मर्मस्पर्शी श्लोक एवं भजन संगृहीत हैं।

इसका स्वाध्याय आत्मचेतना को जगा कर एवं नैराश्य निर्मूलन कर हृदय को प्रसन्न रख सकता है। मानसिक स्फूर्ति एवं आत्मिक तृप्ती के लिए अर्थानुसंधान के साथ श्रद्धापूर्वक इसका पठन और मनन तन-मन का शोधन करते हुए आत्मदर्शन में अवश्य सहायता करेगा।

इसमें कई सुभाषित दिये है। उनमें जीवन को सुसंस्कृत बनाने की अमोघ शक्ती है। सुभाषित सम-विषम परिस्थिती में जीवन की राह बतानेवाला दीपस्तम्भ है। प्रसिद्ध है कि -

द्राक्षा म्लानमुखी जाता शर्करा चाश्मतां गता।
सुभाषित रसस्याग्रे सुधा भीता दिवं गता।।

'आराधना' की यह सातवी आवृत्ती है। इस आवृत्ती में कायापलट - सा हुआ है। दैनिक प्रात: और नित्यकर्म के साथ बोली जानेवाली प्रार्थनाओं का इसमें समावेश किया गया है। अत:जीवन के हर क्षण में यह पुस्तिका उपयुक्त होगी।

करमसी जेठाभाई सोमैया
अध्यक्ष

मूळचे पंजाबचे राहणारे रवी खन्ना हेही काही शिबिरांत दाखल झाले होते. तेथील आपले अनुभव सांगता ते म्हणाले, "मी सुरगणा येथील पहिल्या शिबिरात सेवाकार्यासाठी गेलो होतो. त्यावेळी करमसीभाईंचे सेवाकार्य मी जवळून पाहिले. ते स्वत:च उत्कृष्ट ॲडमिनिस्ट्रेटर आहेत. अगदी बारीकसारीक गोष्टींचीसुद्धा ते काळजी घेतात. तशीच प्रत्येक रुग्णाची देखील चिंता वाहतात. सर्वांशी प्रेमळपणाने वागतात. ते फारच वक्तशीर आहेत. शामलानी शिबिरामध्ये असताना एकदा काही ऑपरेशन्स करावयाची होती. आम्ही निघालो, पण वाटेत रेल्वेच्या क्रॉसिंगमुळे फाटक बंद होते. तेव्हा पोचायला उशीर होऊ नये म्हणून करमसीभाई गाडीतून उतरले आणि पायीच शिबिराकडे निघाले. त्यांना जरासुद्धा विलंब झालेला चालत नाही.

"अमरकंटकला शिबिर असताना खूप पाऊस पडत होता. थंडीपण खूप होती. काही डॉक्टरमंडळी कँपला भेट द्यायला आली होती. बस डोंगराच्या माथ्यावर चढवायला ड्रायव्हर तयार नव्हता. मग करमसीभाईंनी ड्रायव्हरची समजूत घालून डॉक्टरांची नीट व्यवस्था लावली. शिबिरामध्ये स्वच्छतेवर त्यांचा विशेष भर असे."

गुजरातमधील श्रीमती भारती माणिकलाल वखारिया म्हणाल्या, "मी गुजरामधील आहे, परंतु मुंबईला राहते. रविशंकर महाराज मला धर्मसून मानत असत. त्यांच्यामुळेच माझी व पूज्य बापूजींची - करमसीभाईंची ओळख झाली. एका कर्मयोगी माणसाची ओळख झाली. मी त्यांना पिताजींप्रमाणे मानते व तेही मला मुलीप्रमाणे मानतात.

“बापूजींना सामाजिक कार्याची खूप आवड आहे. १९६८ मध्ये सुरतेला फार मोठा पूर आला होता. फार मोठे नुकसान झाले होते. अनेकांची घरे वाहून गेली होती. त्यावेळी रविशंकरमहाराज यांच्या मदतीने ज्यांची घरे वाहून गेली आहेत अशांसाठी गावोगावी घरे बांधली होती. पुनर्वसनाचे काम होते. त्यावेळी मी बापूजींची परवानगी न घेताच त्यांच्या नावाने एक गाव दत्तक घेतले होते. मुंबईला आल्यावर त्यांना मी हे सांगितले. ते म्हणाले, ‘मुली, चांगले केलेस. गाव दत्तक घेतलेस तर त्यासाठी दहा हजार रुपये खर्च येवो किंवा एक लाख खर्च लागो, मला तुझा शब्द राखलाच पाहिजे.’

“रक्षाबंधनाच्या वेळेस बापूजी मला फोन करून बोलावून घेऊन शांतीलाल शेठजींना राखी बांधायला लावीत असत.

“सुरगणा, शामलाजी, बागीडोरा, अमरकंटक, रांची वगैरे ठिकाणी नेत्रशिबिरे झाली. मी शिबिरांतून स्वयंसेवक म्हणून काम केले.

“बापूजींना सत्य फार प्रिय आहे. आपण जर अगदी सत्य गोष्ट सांगितली तर ते तुमच्यावर विश्वासून हवी ती मदत करतील. सुरगणा कॅम्पमध्ये काम उरकण्यासाठी जादा ट्रक लावणे गरजेचे होते. पण त्यासाठी संबंधित लोक घाबरत होते. त्यावेळी ती जबाबदारी स्वीकारून मी जादा ट्रकस लावायला लावले व बापूजींकडून नंतर परवानगी घेतली.

“पिताजींप्रमाणेच माताजी-साकरबाई यादेखील खूप काम करतात. आपल्या पतीला सहकार्य देतात. साकरबाईंचे सहकार्य नसते तर बापूजी एवढे काम करू शकले नसते.

“शिबिर चालू असताना २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी सर्व गावाला जेवायला बोलावले. शिबिर संपत आले होते. म्हणून आम्ही समष्टी-किचन बंद केले होते. सुमारे दोन हजार लोक जेवायला आले. भोजनाची तयारी करू लागलो. पण पाण्याची अडचण भासू लागली. साकरबाईंना वाईट वाटले. मंदिरात जाऊन प्रार्थना केली. बाहेर येऊन पाहिले तर पाण्याने भरलेले दोन टँकर दिसले. बिहारमधील शिबिरांमध्ये एकदा माताजी आजारी पडल्या. त्यांना ऑक्सिजन द्यावा लागला. मग बरे वाटू लागले.

“बापूजींना पाहिल्यानंतर ते खूप कडक असावेत असे वाटते. पण त्यांच्या सहवासात आल्यानंतर असे वाटते की ते अगदी मऊ लोण्यासारखे आहेत. उन्हाळ्यात महाबळेश्वरला काही वाचून दाखवले तर आवडत असे.

“वैष्णवजन तो तेणे कहिए - हे गांधीजींचे आवडते भजन. त्या काळाला अनुसरून वैष्णवजन म्हटले होते. पण आज आपण मानवताजन म्हणायला पाहिजे”, असे बापूजी सांगत असत.

“एकदा एका स्वामीजींच्याबरोबर चर्चा चालू होती. तेव्हा स्वामीजी म्हणाले, ‘मृत्यू

माझ्या पाठीमागे येत नाही कारण मी त्याच्या पुढे जात असतो.' तेव्हा बापूजी म्हणाले, 'माझ्याजवळ मृत्यू येणारच नाही. आलाच तर मी त्याला सांगेन, अजून मला खूप कामं करावयाची आहेत. मला जीवनाचा कंटाळा येत नाही. त्यामुळे मृत्यू माझ्याजवळ फिरकतच नाही.'

मला एकदा अपघात झाला होता. मी मुंबईला हॉस्पिटलमध्ये होते. त्यावेळी डोंगरेमहाराजांची प्रवचने चालू होती. कामाचा खूपच व्याप बापूजींच्या मागे होता. पण त्यातूनही सवड काढून ते मला मुद्दाम भेटायला येत असत. फुलासारखे कोमल असे त्यांचे अंत:करण आहे. माझ्यावर जेव्हा एखादे संकट येते तेव्हा पिताजींची आठवण केल्यावर माझे दु:ख कमी होते."

हिरूभाई पटेल हे सेवाकार्यासाठी शिबिरात दाखल होत असत. ते म्हणाले, "सुरगणा, शामलजी, बागीडोरा वगैरे नेत्रशिबिरांत मी काम केले. माझ्याकडे रुग्णांना नेण्याआणण्याचे काम दिले होते. रुग्णाची काळजी कशी घ्यायची, त्यांना नेता-आणताना त्रास होऊ नये, अपमानित वाटणार नाही याची दक्षता कशी घ्यावी हे ते सांगत असत. अमरकंटकला शिबिर होते त्यावेळी थंडी खूपच होती. पण तशा थंडीतही डोक्यावर काहीही न घालता करमसीभाई काम करीत असत. एकदा आम्ही त्यांना म्हणालो, 'बापूजी, थंडी फार आहे. डोक्यावर गरम टोपी, मफलर वगैरे बांधा.' तेव्हा ते म्हणाले, 'तुम्हा जवान लोकांना जास्त थंडी वाजते. आम्हांला ती जाणवत नाही.' शिबिरात खूपच गरीब लोक येत असत. त्यांच्याजवळ कपडेही नसत. बापूजी कमीत कमी कपडे वापरीत असत."

श्री. जयंतीभाई - राधेराधे - हे अंधेरीला राहणारे सेवाभावी गृहस्थ आहेत. ते म्हणाले, "करमसीभाई हे स्वत: मोठे उद्योगपती असूनही नेत्रशिबिरांमध्ये अगदी सामान्यांप्रमाणे सामान्य होऊन सामान्यांसाठी काम करीत होते. माणूस-मानवता यांची सेवा हीच ईश्वरसेवा, या भावनेने ते गिरिवनवासींची सेवा करतात. खरं तर त्यांना 'आदिवासी' म्हणून संबोधणे हेसुद्धा त्यांना आवडत नाही. म्हणून ते त्यांना 'गिरिजन' असे म्हणतात.

"नेत्रशिबिरात थंडीच्या रात्री-पहाटेसुद्धा ते काम करतात. शिबिरात दोन-तीन प्रकारची भोजन-व्यवस्था असते. स्वयंसेवकांसाठी वेगळी, डॉक्टरांसाठी वेगळी आणि सर्वांसाठी म्हणजे समष्टी-भोजनव्यवस्था वेगळी. त्यात रुग्ण व त्यांच्याबरोबर येणाऱ्या नातेवाईकांना भोजन दिले जाई. करमसीभाई या सर्वांच्या बरोबरच समष्टीभोजन घेत असत. त्यांच्या वृत्तीतच असा साधेपणा आहे. नम्रता आहे. मुंबईतच माधवबागेत पांडुरंगशास्त्रींची प्रवचने चालतात. करमसीभाई प्रवचनाला येत असत आणि सर्वांच्या शेवटी बसत असत. इतर लोक व शास्त्रीजीसुद्धा त्यांना पुढे येऊन बसण्याविषयी

विनंती करीत असत, पण करमसीभाई ती कधीच मान्य करीत असत. सर्वांच्या शेवटी मागे बसत असत.

"स्वच्छता व व्यसनमुक्ती यांकडे त्यांचे बारीक लक्ष असे. एकदा शिबिरात एक इसम बिडी पीत हिंडताना त्यांना दिसला. त्याला बोलावून ते म्हणाले, "देवळात देवापुढे आपण बिडी ओढतो का? जिथे देवाचे नाव घेतो, भजन करतो तिथे तू बिडी ओढतोस हे चांगले नाही. पुन्हा असे करणार नाही, अशी शपथ घे." त्या इसमाने बिडीकाडी फेकून दिली आणि पुढे त्याने कायमचीच बिडी सोडली.

"प्रत्येक कामाबद्दल ते सर्वांना बोलावून घेऊन त्यांच्याशी चर्चा करून निर्णय करतात. त्यावेळी त्यांची दूरदृष्टी, वैचारिक पातळी व निर्णयशक्ती याचा प्रत्यय येतो. एवढ्या सगळ्या व्यापातून ते वाचन-चिंतन केव्हा करत असतील हेच कळत नाही. सगळीकडे ते जातील, पाहतील, जिज्ञासूपणाने समजून घेतील. त्यांचा दृष्टीकोन विधायक आहे. मी अमेरिकेहून आल्यानंतर गिरिवनवासींना कपडे वगैरे वाटण्याचे काम त्यांनी मला सांगितले होते. त्यांच्या सहवासाने व प्रेरणेने चहा पिण्याची माझीपण सवय सुटली. करमसीभाई वृत्तीने अतिशय दिलदार आहेत. पण दिलेले दान चांगल्या कामासाठीच वापरले जाईल की नाही याची खात्री करूनच देतात. एकदा अंधेरीच्या एका बाईने खोट्याच सबबीखाली त्यांच्याकडे पैसे मागितले होते. तेव्हा त्यांनी माझ्याकडे पाचशे रुपये दिले आणि त्या बाईंचा नाव-पत्ता वगैरे देऊन सर्व माहिती गोळा करायला सांगितली. त्याप्रमाणे मी त्या पत्त्यावर जाऊन चौकशी केली, पण मला काही त्या बाईचा पत्ता मिळाला नाही. मी त्यांना परत येऊन सर्व माहिती सांगितली. करमसीभाई मदत करतील, पण सत्य असेल, योग्य असेल तरच करतील.

"एका गिरिवनवासीचा एक आंधळा मुलगा कच्छमधील नेत्रशिबिरात आला होता. परंतु त्याच्या अंधत्वाची अधिक चिकित्सा करून त्यावर ऑपरेशन करणे गरजेचे होते. म्हणून करमसीभाईंनी त्या मुलाला मुंबईला डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरकडे दाखविण्याची व्यवस्था केली. तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्या मुलाच्या डोळ्याची काम करणारी नसच खराब झाली आहे, त्यामुळे ऑपरेशन करूनही काही उपयोग होणार नाही असा निर्णय दिला. तो ऐकून त्या मुलाबद्दल खूपच वाईट वाटले. त्यांच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. मी जेव्हा हे दृश्य पाहिले तेव्हा मला मानवतेचे दर्शन त्यावेळी घडले.

"करमसीभाई स्वत: अविश्रांत काम करतात व प्रत्येकाने आपले काम कसोशीने करावे अशी अपेक्षा ठेवतात. त्यांना कामचुकारपणा मुळीच आवडत नाही. एकदा एका वॉचमनने त्यांना पत्र लिहून कळवले की, 'मला पगारवाढ द्या, नाहीतर हाच माझा राजीनामा समजून मला मुक्त करा.' करमसीभाईंनी त्याला त्याचा पगार देऊन नोकरीतून मुक्त केले.

कारण त्याला कामाबद्दल आस्थाच नव्हती.”

मुंबईतील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विख्यात स्त्री-रोगतज्ज्ञ डॉ. बी. एन. पुरंदरे यांनीही आपल्या सहकारी डॉक्टर मित्रांसह या शिबिरांमधून निरपेक्षपणाने सेवाकार्य केले होते. तत्पूर्वी डॉ. पुरंदरे यांनी स्वत:च पुढाकार घेऊन स्त्रियांवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणारी शेकडो शिबिरे मुंबई व ठाणे जिल्ह्यात खेडोपाडी घेतलेली होती. एकट्या ठाणे जिल्ह्यात एक लक्ष शस्त्रक्रिया त्यांनी त्यावेळी केलेल्या होत्या. त्यांची ही शिबिरे अगदी लहान लहानशा खेड्यापाड्यांतूनही होत असत. करमसीभाईंची आणि त्यांची ओळख जुनीच होती. करमसीभाईंनीही त्यांची ही शिबिरे मुद्दाम जाऊन पाहिली होती. एकदा डॉ. पुरंदरे यांनी वसईजवळच्या एका खेड्यात असेच शिबिर भरवले होते. गिरिवनवासी प्रगती मंडळाचे मुख्य ठिकाण तिथून जवळच नरेशवाडीला होते. नरेशवाडीहून संध्याकाळी मुंबईला परत जाताना करमसीभाई शिबिराच्या ठिकाणी गेले. त्यावेळी डॉ. पुरंदरे हेसुद्धा आपल्या गाडीने मुंबईला परतण्याच्या तयारीत होते. करमसीभाईंनी त्यांना विनंती करून आपल्या गाडीत आपल्याबरोबर घेतले. वाटेत करमसीभाईंनी त्यांना आपल्या मंडळाच्या वतीने लौकरच नाशिक जिल्ह्यातील सुरगणा येथे योजिलेल्या नेत्रशिबिराची माहिती दिली व ‘आपण तिथे येऊन स्त्रियांची रोगचिकित्सा व शस्त्रक्रिया करावी’ अशी विनंती केली. सेवाभावी डॉ. नानासाहेब पुरंदरे यांनी या गोष्टीस तत्काळ संमती दिली. त्यांचे असे सहकार्य त्यानंतरच्या शिबिरांतही लाभले. करमसीभाईंनी आपल्या शिबिरामधून त्यांच्यासाठी सुसज्ज असा महिला विभाग पहिल्या शिबिरातील कार्यपद्धती पाहून डॉ. पुरंदरे यांना फारच समाधान वाटले. आपले हे समाधान त्यांनी पुढीलप्रमाणे एका पत्राद्वारे व्यक्तही केले होते.

१४ नोव्हेंबर १९७७ रोजी त्यांनी करमसीभाईंना ‘श्री गिरिवनवासी प्रगती मंडळा’चे अध्यक्ष या नात्याने लिहिलेले पत्र असे होते : (पुढील पानावर पाहावे)

To, The President,
Shri Giri Vanavasi Pragati Mandal,
BOMBAY.

Sir,

I had the privilege to attend along with my team of doctors and take active part in the last two camps organised by your Mandal, one at Shamlaji, District - Sabarkata, Gujarat in December 1975 and the other at Bagidora, District - Banaswada, Rajasthan in December 1976.

Both the camps were organised in complete rural surroundings where thousands of women got the advantage of the camps. All the doctors in the team were highly impressed by the perfect arrangements made in creating surgical facilities, operation theatres and temporary wards for the operated cases and an excellent arrangement for the examination of daily out-patient cases.

The arrangements made for the out-door examination and treatment was highly appreciated by thousands of poor patients coming from distant villages. The in-door operation theatre facilities including sterilization of surgical instruments made it possible for the team of doctors to undertake even major gynaecological operations by hundreds throughout the camp.

The post-operative nursing care of the patients was efficiently organised from the point of view of the patients' comforts. Even the relatives who accompanied the patients were offered facilities such as food etc. These camps gave unlimited opportunities for rendering medical and operative services to the poor rural women. We highly appreciate the untiring efforts made by your Mandal in making the camps very successful. This has also given an opportunity to carry our medical services to the very door steps of the patients as is expected by our Government.

We look forward to offer our services to the future camps.

Yours faithfully,

(B. N. Purandare)

करमसीभाई सोमैया आणि डॉ. पुरंदरे यांचा स्नेहसंबंध जुनाच होता. करमसीभाईंच्या परिवारातील लेकी-सुना आदींची काही बाळंतपणे व रोगोपचार डॉ. पुरंदरे यांच्याकडेच झाले होते. या शिबिरांमुळे या डॉक्टरमंडळींना विविध तऱ्हेच्या केसेस हाताळण्याची संधी लाभली व त्यातून एक प्रकारचे नवीन असे अनुभवशिक्षणच झाले. याविषयी डॉ. बी. एन.

पुरंदरे यांनी लिहिलेल्या आपल्या 'शल्य-कौशल्य' या आत्मकथेत नमूद केले आहे की :

"उद्योगपती सोमैयांचे कुटुंब हे अण्णांच्या वेळेपासून आमचे पेशंट होते. उद्योगपती करमसी सोमैयांच्या एका विश्वस्त निधीतर्फे आरोग्य व करमसी सोमैया शिबिरे घ्यावीत असे ठरले. त्यांनी मला त्यांचे नेतृत्व करण्याची विनंती केली. त्यांच्यातर्फे आम्ही दरवर्षी एका राज्यात ग्रामीण आदिवासी विभागात मोठे कँप भरविण्यास सुरूवात केली. सोमैयांच्या या विश्वस्त निधीचे - ट्रस्टचे नाव होते 'गिरिवनवासी प्रगती मंडळ!' या मंडळातर्फे बिहार, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र... अशा विविध राज्यांत दूरवरच्या आडबाजूच्या विभागांत हे कँप भरवले, कारण तेथील लोकांनाच आमच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाची खरी गरज असते.

"कँपसाठी चांगली आठ-दहा एकरांची उघड्या माळरानाची जागा निवडत. ती साफसूफ करून तिथे वीज व पाणी आणले जाई. मोठमोठे तंबू उभे केले जात. एकेका तंबूत शंभर पेशंटची सोय असे. आजूबाजूच्या सर्व विभागात कँपचा जोरदार प्रचार केला जाई. सोमैया उद्योगसमूहातील कर्मचारी, वाहने आदींची सेवा तर या कँपला लाभत असेच, पण त्यांच्या शाळा-कॉलेजातील मुले-मुली व शिक्षक श्रमदान मोहिमा काढून कँपला आनुषंगिक मदत करीत असत. म्हणजे कँपजवळपासच्या खेड्यापाड्यांत ही मंडळी याच वेळी स्वच्छतामोहीम, आरोग्य माहिती मोहीम, अशा मोहिमा हाती घेत असत. कँप चांगला पंधरा दिवस चाले. बसेस भरभरून पेशंट आणण्याची व त्यांना परत नेण्याची सोय असे. एकावेळी दहा-पंधरा हजार लोकांची जेवणे कँपमध्ये चालत. चौदा-पंधरा लाख रुपयांच्या घरात कँपचा खर्च असे.

"अशा या तात्पुरत्या हॉस्पिटल-नगरीत काम करायला आमचे अनेक तयार विद्यार्थी, आमच्या हाताखाली शिकून गेलेली डॉक्टर मंडळी व इतर सहकारी सर्जन आनंदाने येत असत. आमच्या विभागासाठी (गायनाकॉलॉजी - ऑब्स्थेट्रिक्स) आठ-दहा टेबलांचे ऑपरेशन थिएटर येत असे. अशा कँपमधून एरवी मुंबईत पाहायला - ऐकायलाही न मिळणारी, विरळा आढळणारी ऑपरेशन्स प्रत्यक्ष करायला मिळायची म्हणून आमची वैद्यकीय मंडळी कँपवर खूष असत!

"बिहार राज्यात रांचीजवळ अशाच एका सोमैयांच्या कँपमध्ये एक मोठी इंटरेस्टिंग केस आली. एका बाईच्या पोटातून ५२ पौडांचा ट्यूमर काढला! हो, हो, बावन्न पौडांचा!

"कँपजवळच्या एका खेड्यात कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी सफाईचे काम करीत होते. तिथं एका प्राध्यापिकेला ही बाई आढळली. अगदी लुकडी बाई आणि पोटाचा हा नगारा झालेला. प्राध्यापिकेने विचारले की, 'काय झालंय?' तर ती बाई म्हणते, 'कुठं काय! पोटुशी आहे." प्राध्यापिकेने विचारले, 'कधी होणार बाळंत?' तर बाईने सांगितले, 'देवाला

माहीत!' 'का? काय झालं?' तर म्हणे, 'दोन वर्षे उलटली, अद्याप बाळंत होत नाही. कुणी म्हणतात दोन पोरं आहेत!'

"प्राध्यपिकेने कपाळावर हात मारून घेतला अन् त्या बाईला सांगितले, 'चला, मोठे डॉक्टर इथे जवळच आले आहेत, त्यांना दाखवून घे' तर ती बाई यायला तयार होईना. शेवटी कशीबशी तिची समजूत घालून तिला कँपात आणली त्या प्राध्यापिकेने!

"मी पाहिलं आणि म्हटलं, 'ताबडतोब टेबलावर घ्या!' तयारी करून दोन तासांत ऑपरेशन टेबलावर घेतले. आत भला मोठा ट्यूमर होता. तो ट्यूमर टाकण्यासाठी एक ट्रॉलीच स्टरलाईज (निर्जंतुकीकरण करून) तयार ठेवली होती. तीन माणसांनी ताकद लावून तो ट्यूमर उचलून ट्रॉलीत टाकला. बावन्न पौंड वजन भरले त्याचे. बाईचे वजन ऑपरेशनपूर्वी १०८ पौंड होते. म्हणजे ऑपरेशननंतर ती बाई फक्त हाडांचा सांगाडा वाटत होती. ती केस त्यावेळी खूपच गाजली. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री मुद्दाम शिबिरास भेट देऊन गेले. त्यांनी त्या बाईबरोबर स्वत:चे एक छायाचित्र काढविले!

"उत्तर प्रदेशातील एका कँपमध्ये अशीच आणखी एक ट्यूमरची केस आली होती. या बाईने तर सात वर्षे उदरात ट्यूमर वागविला होता. ती सरकारी दवाखान्यांतून गेली होती, पण कुणी तिच्याकडे लक्षच देत नव्हते! एकूण सरकारी कारभाराची स्थिती इथून तिथून सारखीच. वैद्यकीय व्यवस्था तरी सरकारी रोगांपासून कशी वाचणार? तिथेही अनास्था, अनागोंदी भरपूर. तर शेवटी ही उत्तर प्रदेशातील बाई उपचारासाठी आमच्या कँपमध्ये येऊन पोचली एकदाची. तर या बाईचे ऑपरेशन सुरू असताना तेव्हाचे पंतप्रधान चरणसिंग तिथे आले. त्यांनी विचारले, "ये क्या चला है, डॉक्टरसाब?" बहुधा सहज माहिती म्हणून विचारले असावे. मी कावलोच होतो. मी ताडकन उत्तरलो - "क्या चला है क्या! हे तुमच्याच लोकांचं काम करतोय. ही बिचारी सात वर्षांपासून आजारी आहे आणि कोणी तिची दखलच घेत नाही. मग हे आम्हांला असं बाहेरून येऊन इथे कँप घेऊन ऑपरेशन्स करावी लागतात -"

"त्यावर त्यांचे आरोग्य-संचालक - डायरेक्टर ऑफ हेल्थ - लगेच बोलले, 'एरव्ही बडी इज नॉट फॉरच्युनेट टू हॅव अ डॉक्टर पुरंदरे लाईक महाराष्ट्र!" (डॉ. पुरंदरे उपलब्ध असणं हे महाराष्ट्र राज्याचं भाग्यच आहे; प्रत्येक राज्याच्या नशिबी ते नाहीत!) तर मी त्याला सुनावलं, "असं म्हणू नका. तुमच्याकडेही डॉक्टर आहेतच पण तुम्ही त्यांना मोटिव्हेट करत नाही. (कामाला लावू शकत नाही.) त्यांना पोषक असं वातावरण देत नाही..."

मंडळाच्या शिबिरांना विविध स्तरांतील अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या होत्या व प्रत्यक्ष भेटून, फोनवरून व पत्रे लिहून शिबिरातील कार्याबद्दल सानंद समाधान व्यक्त

केले होते.

मंडळाचे १९८१ च्या जानेवारीमध्ये कच्छमधील कुकमा येथे सातवे शिबिर भरले होते. या शिबिराला भेट देण्यासाठी दिल्लीहून ब्रिटिश हायकमिशनर मि. जे. ए. थॉमसन हे आले होते. शिबिरातील कार्यपद्धती पाहून ते फारच प्रभावित झाले होते. त्यांनी आपल्या भावना व विचार ३ जून १९८१ रोजी लिहिलेल्या पत्रातून पुढीलप्रमाणे व्यक्त केल्या होत्या.

Dear Mr. Somaiya,

You may recall that last January I visited your medical camp while I was on a tour of Kutch. You very kindly received me and showed me around. In the course of our conversation. It was suggested, I think primarily by Mr. G. J. Mehta, that other commonwealth countries might follow India's example in conducting Eye Camps or more generally Medical Camps. Some of the people present said they were sure that a number of Indians, including people in your organisation, would be glad to share their experiences and perhaps even to donate their services in neighbouring commonwealth country. I undertook to be in touch with the Commonwealth Secretary General about this idea.

I have now had a helpful reply from Mr. Ramphal, the Commonwealth Secretary General. He fully agrees with me about the value of the activities in the medical field of such voluntary organisations as yours. He adds that you and your colleagues deserve every congratulations. He says that there are in fact many Eye Camps held in Commonwealth countries organised mainly by Royal Commonwealth Society for the Blind. He enclosed a copy of their annual report which I pass on to you here with. He suggests that you may possibly like to contact the society, whose address is in the reports, although he suspects that you already know them.

Mr. Ramphal continues that workshops and seminars over a wide range of specialised medical and surgical fields are also held in a number of commonwealth countries, sometimes on a regional basis. Some of them have received support from the commonwealth Fund for Technical Co-operation.

The commonwealth Secretariat does what it can to encourage such activities, the extent of professional involvement depending on the subject of the individual workshop or seminar. Their Medical Adviser will bear in mind the kind offer of you and your colleagues to share your experiences and possibly make your services available should the opportunity arise.

I hope this reply may be of some interest to you. I am glad to learn that Eye Camps are indeed held in other Commonwealth countries since I think there is a great need for them and I was most impressed by what you showed me.

Yours sincerely,

(J. A. Thomson)

❖

नरेश वाडी

सहस्त्रगुणमुत्स्त्रष्टुमादत्ते हि रसं रवि :।

सूर्य पाणी शोषून घेतो ते हजारो प्रकारे परत देण्यासाठीच.

नरेश वाडी

साठीनंतरचे माणसाचे वय हे सेवानिवृत्तीचे वय म्हणून मानले जाते. माणसे 'रिटायर' बनतात आणि स्वस्थ बसतात किंवा नाना तऱ्हेच्या चिंता करीत राहतात. कुणी कुणी तर नसलेले आजारपणही ओढवून घेतात. नाहीतर अपरिचित वा अननुभवी धंद्यात पडून फसतात. खरं तर, आयुष्यातील एखाद्या क्षेत्रात काम करून मिळविलेला दीर्घकालीन अनुभव सेवानिवृत्तीनंतर समाजाला देण्यासाठी नव्याने प्रवृत्त होण्याचा हा संधिकाल असतो. म्हणूनच विनोबाजींनी म्हटले होते, "रिटायर होऊ नका, तर 'री-टायर' बना!"

करमसीभाईंनी निवृत्ती आणि प्रवृत्ती यातील मर्म अचूक जाणलेले होते. त्यांचा पिंडच असा किंवा वृत्तीच अशी की, त्यांची आणि निवृत्तीची कधी ओळखभेट जणू झालीच नाही. त्यांचे नाते जमले ते प्रवृत्तीशीच! आणि म्हणून व्यष्टिगत व्यवसायातून ते अगदी सहज, सुलभपणाने समष्टीकडे वळले. हे वळणे त्यांचे त्यांनादेखील कळले नाही; इतके ते नैसर्गिक व स्वाभाविक होते! आणि असे होते म्हणून वयाची सत्तरी उलटल्यानंतरही ते 'श्रीगिरिवनवासी प्रगती मंडळा'चा प्रपंचव्याप थाटून बसले!

श्रीगिरिवनवासी प्रगती मंडळाची मुहूर्तमेढ १९७४ साली रोवल्यानंतर मंडळाच्या उद्दिष्टांनुसार जे नैमित्तिक कार्य करावयाचे होते ते सर्व रोगनिवाराणाच्या सात शिबिरांमधून सिद्ध झाले. परंतु मंडळाच्या उद्दिष्टांनुसारच नित्यस्वरुपाचे जे कार्य साकार करावयाचे होते त्याकडेही करमसीभाईंनी याच वेळी लक्ष पुरविले होते.

श्रीगिरिवनवासी प्रगती मंडळाने आपल्या नावाला अनुसरूनच आपल्या देशातील शहरी संस्कृतीपासून दूर गिरिकंदरांत राहणाऱ्या उपेक्षित गिरिवनवासाची बांधवांची उन्नती करण्याचे महान कार्य आपल्या शिरावर घेतले होते.

मंडळाने आपल्या महान ध्येयाची पूर्ती करण्यासाठी कार्यक्रमांची एक योजना बनविली होती. त्यातील काही कार्यक्रम असे होते.

१. परंपरागत आणि व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी नि:शुल्क छात्रालयांची

स्थापना करणे. कृषी, बागायत, दुग्धालय, तंत्रशाळा आणि हस्तकला उद्योगशाळेशी जोडलेले राहतील. मंडळाच्या कार्यक्रमाला कार्यान्वित करू शकतील अशा सामाजिक कार्यकर्त्यांना या पाठशाळांमधून प्रशिक्षित केले जाईल.

२. गिरिवनवासी हा भारताचा एक सुसंस्कृत नागरिक बनेल अशा दृष्टीने त्याच्या ठायी देशभक्तीची उत्कट भावना आणि त्याचबरोबर चारित्र्य-विकास होईल असा प्रयत्न राहील.

३. मंडळाचे सर्वाधिक महत्त्वपूर्ण कार्य हे राहील की सार्वजनिक स्वास्थ्यांतर्गत सेवाकेंद्रांची स्थापना करणे. या सेवाकेंद्रामध्ये हॉस्पिटल आणि रुग्णांची देखभाल करण्यासाठी परिचारिकाही असतील.

४. नेत्रचिकित्सा आणि अन्य सेवा-शुश्रुषेसाठी नरेशवाडी येथे नेत्रचिकित्सेसह जनरल हॉस्पिटल उभारणे.

श्रीगिरिवनवासी प्रगती मंडळाच्या नित्य कार्यासाठी करमसीभाईंनी ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात धुंदलवाडीजवळ पारडी नावाच्या खेड्यातील जमीन खरेदी केली होती. हा भाग शहरापासून लांब व सर्व दृष्टींनी मागासलेला होता. त्या परिसरात उपेक्षित गिरिवनवासींचीच वस्ती होती.

करमसीभाईंनी मंडळाच्या उद्दिष्टानुसार या जमिनीवरच सुधारित शेती, फलोद्यान, डेअरी, शाळा, वसतिगृह व हॉस्पिटल उघडण्याचे निश्चित केले.

सुरूवातीस १९७४-७५ साली करमसीभाईंनी ही जमीन लागवडीस योग्य बनविण्यासाठी कामास सुरूवात केली. त्यासाठी ते अधूनमधून मुंबईहून येऊ-जाऊ लागले. व्यवसायाच्या निमित्ताने डहाणू वगैरे भागात त्यांच्या ओळखी तर पुष्कळच होत्या. डहाणूचे एक व्यापारी व प्रगतीशील शेतकरी श्री. पूनमचंद जी. बाफना यांची ओळख जुनीच होती. त्यांचा मुलगा नरेश हा पंचविशीतला हुशार आणि उत्साही तरुण होता. परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेऊन आलेला होता. त्याला शेतीकामाची विशेष आवड होती. त्यामुळे करमसीभाईंच्या सान्निध्यात आल्यावर तो मोठ्या उत्साहाने त्यांच्या नियोजित कार्यात भाग घेऊ लागला. मंडळाचा तो एक क्रियाशील सभासदच बनला. तो या कामात इतका रंगून गेला की त्याने आपल्या परदेशातील मित्रांना पत्रांतून कळविले की, 'मी श्रीगिरिवनवासी प्रगती मंडळाच्या कार्यात सहभागी झालो असून मी या कामात फार समाधानी आहे.'

शेतीकामाविषयी नरेशला जरी घरी वडिलांच्याकडून व घेतलेल्या शिक्षणातून माहिती होती तरी तो करमसीभाईंच्याबरोबर चर्चा करीत असे आणि योजना आखीत असे. त्याच्याजवळ कामासंबंधी एवढी आस्था आणि त्वरा होती की करमसीभाईंच्याबरोबर चर्चा करून निश्चित केलेली कामाची योजना करमसीभाई पुन्हा तिकडे येण्यापूर्वीच त्याने पूर्ण करून टाकलेली असे.

तो रविवारचीही सुट्टी घेत नसे.

अशाच एका रविवारी नरेशला मित्रांबरोबर सुरतला लायन्स क्लबच्या मिटींगसाठी जायचे होते. मित्रांनी फारच आग्रह केल्यामुळे मनात नसतानासुद्धा त्याने मान्य केले.

नियतीची योजना कोणालाच कळत नाही. प्राक्तन कोणालाच टाळता येत नाही. मित्रांबरोबर मिटींगला जायचे होते, तरीसुद्धा नरेश फार्मवर गेला.

फार्मवर तो ट्रॅक्टरवर बसला आणि दलदलीच्या जमिनीवरही ट्रॅक्टर कसा चालवायचा हे तो तिथल्या कामगारांना दाखवू लागला.

दुर्दैवाने ट्रॅक्टर उलटला. नरेशच्या छातीत ट्रॅक्टरचा नॉब जोराने घुसला आणि जागच्या जागीच नरेशचा प्राण गेला.

ही दुर्दैवी घटना कळताच करमसीभाई डहाणूला गेले. त्यांनी नरेशच्या वडिलांचे सांत्वन केले. ते स्वत:ही या घटनेने शोकाकूल बनलेलेच होते.

नरेशला श्रद्धांजली वाहण्यासाठी झालेल्या शोकसभेत करमसीभाई म्हणाले, "नरेशच्या निधनाने मला मोठा धक्का बसला आहे. फार नुकसान झाले आहे. तो जर माझ्याबरोबर राहिला असता तर या फार्मवर पुष्कळच चांगल्या गोष्टी करता आल्या असत्या. नरेश फार बुद्धिमान आणि उत्साही तरुण होता. त्याच्या स्मरणार्थ या फार्मला येथून पुढे 'नरेशवाडी' या नावानेच ओळखले जाईल."

'नरेशवाडी' नावामागे अशी ही दु:खद कहाणी आहे.

नरेशवाडी प्रकल्पामध्ये गिरिवनवासी मुलांच्या शिक्षणासाठी प्राथमिक शाळा सुरू करणे हे एक मुख्य उद्दिष्ट होते आणि त्यासाठी योग्य व्यक्तीच्या शोधात करमसीभाई होते. करमसीभाईंचे भाग्यच असे की त्यांना हाती घेतलेल्या किंवा इच्छिलेल्या कामांसाठी त्या त्या वेळी त्या त्या क्षेत्रातील योग्य व्यक्ती मिळाल्या. नरेशवाडीच्या शालेय प्रकल्पासाठी प्राचार्य व्ही. आर. गोखले यांच्यासारखा शिक्षणतज्ज्ञ व अनुभवी सहकारी लाभला.

करमसीभाईंना संस्कृत भाषेबद्दल अत्यंत प्रेम आहे. संस्कृतच्या प्रसारासाठी त्यांनी 'सुरभारती' नावाची एक संस्थाही काढली होती, याचा वृत्तांत मागे आलेलाच आहे. या सुरभारतीमध्ये आस्थेने काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये श्री. प्रभाकरपंत जोशी हे एक संस्कृततज्ज्ञ होते. संस्कृत प्रेमामुळे जोशी आणि करमसीभाई हे निकटचे मित्र बनले होते. करमसीभाई जेव्हा नरेशवाडीतील शिक्षण प्रकल्पासाठी योग्य व्यक्तींचा शोध घेत होते तेव्हाच प्रभाकरपंत जोशी यांनी करमसीभाईंची आणि व्ही. आर. गोखले यांची गाठ घालून दिली. व्ही. आर. गोखले आणि जोशी यांची दाट ओळख होती. त्याच सुमारास म्हणजे १९७५ साली व्ही. आर. गोखले हे गोखले एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावरून निवृत्त झाले होते आणि तेही मागास भागातील गिरिवनवासी मुलांच्या

शिक्षणासाठी या निवृत्तीनंतर एका सामाजिक बांधिलकीने प्रवृत्त होऊ इच्छित होते. त्यांना अशा प्रकारच्या शिक्षणकार्याची अत्यंत आवड व आस्था होती. महाविद्यालयाचे प्राचार्य असतानासुद्धा त्यांनी कॉलेज युवकांची शिबिरे ठाणे जिल्ह्यातील कोसबाड, तलासरी आदी ठिकाणी घेतलेली होती. तेव्हापासून सेवानिवृत्तीनंतर या भागात येऊन आपण काहीतरी शैक्षणिक कार्य करावे असे त्यांना वाटत होते. करमसीभाई आणि गोखले यांची भेट म्हणजे एक समसमासंयोगच म्हणावा लागेल! या भेटीनंतर घडलेल्या घटनांबद्दल सांगताना व्ही. आर. गोखले म्हणाले :

"करमसीभाईंची व माझी ओळखभेट १९७६ सालची. त्यामुळे आधीची माहिती नाही. थोडे फार ऐकून आहे इतकेच. त्यांचा साखरेचा व्यवसाय होता. पुढे तर त्यांनी साखर कारखानेच उभारले. त्यांच्या माझ्या अनेक वेळा चर्चा होत असत. एकदा त्यांच्या बोलण्यातूनच कळले की साखर व्यवसाय असताना त्यांना व्यवसायाच्या निमित्ताने खूप हिंडावे लागत असे. या प्रवासामध्ये कधी केळी, खजूर, दूध यांवर भागवावे लागत असे तर कधी उपवासही घडत असे. असे कष्ट त्यांनी उपसले होते.

"करमसीभाई तसे फार करारी व ताठ गृहस्थ आहेत. एखादी गोष्ट त्यांनी आपल्या मनाशी ठरवली की ते तशीच करण्याचा आग्रह किंवा हट्टदेखील धरतात. मग त्या बाबतीत ते दुसऱ्याचे ऐकून घेत नाहीत.

"त्यांच्याबद्दल असे ऐकल्यावर आणि पाहिल्यावर मला वाटायचे की आपण तर आजवर स्वतंत्र वृत्तीने वागत आलो आहोत. मग आपले आणि यांचे कसे जमणार? म्हणून मी त्यांना सुरूवातीलाच सांगितले की, 'करमसीभाई हे काम स्वीकारताना तुमच्याकडून माझी काहीही आर्थिक अपेक्षा नाही. मी विनामूल्य सेवा करीन. शिवाय मी या फार्मवर राहीन तेदेखील माझ्या खर्चानेच राहीन. मला पेन्शन आहे. माझ्या पत्नीलापण पेन्शन आहे. मुलगा कॅनडामध्ये आहे. जावई इंजिनिअर आहे. त्यामुळे मला पैशासाठी कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नाही.' एखाद्या धनवानाने एखाद्या प्रकल्पासाठी द्रव्यसाहाय्य केले म्हणजे त्याची साहजिकच अशी अपेक्षा असते की आपले सर्व इथे ऐकले गेले पाहिजे. म्हणजे अशा ठिकाणी आपल्याला स्वातंत्र्य राहत नाही आणि म्हणूनच मी त्यांना सुरूवातीलाच तसे स्पष्ट सांगून टाकले.

"नरेशवाडी येथे गिरिवनवासी प्रगती मंडळाच्या वतीने सेवेचा एखादा प्रकल्प उभारावा असे त्यांच्या मनात होते. परंतु त्यावेळी तरी त्याला अजून मूर्त स्वरूप आलेले नव्हते. मंडळाच्यावतीने त्यांची नेत्रशिबिरे मात्र चालू होती.

"प्राथमिक शाळेपासून आमचया कामाला सुरुवात झाली. सुरुवातीलाच आम्ही असे ठरवून टाकले होते की या शाळेला सरकारमान्यता घ्यावयाची नाही. कारण सरकारमान्यता आली की मग पंचेचाळीस मिनिटांचा तास, त्यांनी मंजूर केलेलाच अभ्यासक्रम, परीक्षापध्दती

अशी बंधने पाळावी लागतात. आम्हांला ती नको होती. पैशाची अडचण आम्हाला नव्हती. पण मग सरकारमान्यतेशिवाय चालविलेल्या आमच्या शाळेतील विद्यार्थी काही कारणाने बाहेर गेला तर त्याला आमच्या शाळेचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र - स्कूल लीव्हिंग सर्टिफिक्वेट - चालणार नाही अशी अडचण होती. तेव्हा मी आमच्या पध्दतीनुसार असे शिक्षण देण्याचे ठरवले की तो आपल्या जीवनात स्वत:च स्वत:च्या पायावर स्वतंत्रपणे उभा राहू शकेल. स्वत:च स्वत:चा मदतनीस - सेल्फ सपोर्टिंग तो व्हावा अशीच इच्छा होती.

"सकाळी दोन तास कृषी औद्योगिक शिक्षणासाठी दिल्यावर मग नियत अभ्याक्रमाचे शाळांचे तास घ्यावयाचे. गिरीवनवासी मुलांचे ड्रॉईंग खूप चांगले असते. चित्रावरुन त्यांचा कल-ॲप्टीट्यूड- कळतो. त्याचाही विकास व्हावा असा प्रयत्न असावा. गिरिवनवासी मुलांच्या अंगात ताकद खूप असते. धावण्यात व नेमबाजीत ते फार पटाईत असतात. हेही शिक्षणक्रमात लक्षात घेतले पाहिजे. आमची शाळा गिरिवनवासी भागात आहे. त्यामुळे विद्यार्थी सगळे गिरिवनवासीच आहेत. या परिसरात गिरीवनवासी मुलांसाठी व मुलींसाठी वसतिगृहे आहेत. याचा आर्थिक भार करमसीभाईंनी उचललेला आहे. मला स्वातंत्र्य आहे. माझ्या कामात ते कधीही ढवळाढवळ करीत नाहीत. हा माणूस मोठा जिद्दीचा आहे. सच्चा आहे. निर्व्यसनी आहे. पहाटे तीनला उठून गार पाण्याने आंघोळ केल्याशिवा राहत नाही. जेवताना एक भाजी, डाळभात व एक फुलका; तळलेले पदार्थ चालत नाहीत. दोन भाज्या वाढल्या तर एक काढायला सांगतात. असा अल्प आहार घेतात, पण काम खूप करतात. णी त्यांना बाबा म्हणतो.

"बाबांना झाडांची आवड फार आहे. झाडांची माहितीही पुष्कळ आहे. नरेशवाडीतील तीस एकरांत फलोद्यान आहे. या विभागात ठिबक सिंचन-ड्रिप इरिगेशन-वगैरेचा वापर केलेला आहे. त्यांचे सांगणे असते की 'तुम्ही नित्य नवनवीन प्रयोग करा, त्यासाठी माझा पैसा खर्च झाला तरी चालेल.'

"लहानपणापासूनच त्यांना शेतीबद्दल आवड आहे. तेव्हापासूनच आपला चांगला मळा असावा असे त्यांना वाटत असे. म्हणूनच कितीही खर्च झाला तरी आपली ती इच्छा पूर्ण करण्याची धडपड त्यांच्यात दिसते.

"आमच्याकडे चौधरी म्हणून एक शेती अधिकारी मॅनेजर म्हणून होते. त्यांना बाबा फार्मबद्दल सतत माहिती विचारत असत आणि चौधरीसाहेब त्यांना बहुतेक वेळा नकारार्थी उत्तर देत असत. बाबांबरोबर काम करणे, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे फार अवघड आहे. त्यांना फक्त पैशासाठी काम करणारे लोक किंवा कामचुकार असणारे लोक मानवत नाहीत.

"आमच्या शाळेतील गिरिवनवासी मुलांना त्यांनी एकदा मुरारीबापूंच्या कार्यक्रमासाठी मुंबईल आणले होते. आमच्या मुलांनी सुरेख गाणी म्हटली. सगळ्यांना हा कार्यक्रम आवडला. रविशंकर महाराजांच्या शंभराव्या वाढदिवसाला घरच्या सगळ्यांना घेऊन गेले

होते. बाबांना फिरण्याची खूप हौस आहे. माणसे जोडण्याची हातोटी आहे. एकदा आम्ही त्यांना म्हणालो, 'ऐंशी वर्षांच्यावरील लोकांचा आम्ही सत्कार करणार आहोत. त्यांत तुमचाही सत्कार करणार आहोत.' तेव्हा ते हसून म्हणाले, 'मी अजून ऐंशी वर्षांचा कोठे झालो आहे? मला अजून पुष्कळ काम करावयाचे आहे.'

"आता त्यांच्या प्रकृतीस प्रवासाची ही दगदग सोसत नाही. इथे आल्यावर दिवसभर काम केल्यावर जाताना सांगतात, 'मी आता महिन्याने येईन,' पण आठ दिवसांतच ते इथे येईन हजर होतात. घरुन निघताना सौ. साकराबाई व सौ. लीलाबेन त्यांना प्रवासाची दगदग करु नका असे सांगत असतात. पण बाबा त्यांचे ऐकत नाहीत.

"एकदा दिल्ली रिसर्च इन्स्टिट्यूमधून आंब्याची दोनशे कलमे आणली होती. ती आणणारे पाहुणे श्री. शर्मा यांना रीसीव्ह करण्यासाठी त्यांनी साकरवाडी येथून जे. एन. पटेलसाहेबांना बोलावून घेतले होते. पण त्याअगोदरच बाबा स्वत:च पाहुण्यांना घेऊन नरेशवाडीला पोचले. अशी एक प्रकारची उतावीळताही त्यांच्या दिसते."

१३ जानेवारी १९८० रोजी नरेशवाडी येथील फार्मवर चाळीस खाटांच्या हॉस्पिटलचे भूमिपूजन तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्य न्यायाधीश श्री. भी. एन. देशमुख यांच्या हस्ते झाले. आज हे ४० खाटांचे या भागातील एक मोठे जनरल हॉस्पिटल बनलेले आहे.

११० एकरांच्या जमिनीवरील सुधारित पध्दतीने शेती आणि फळबाग केली जाते. शिवाय डेअरी-फार्मिंग, गायींचे-संवर्धन, संगोपन तसेच कला आणि हस्तोद्योग, अंबरचरखा, मेकॅनिकल स्किल्स आणि रिपेअर्स यांचीही योजना आहे.

एकदा प्रस्तुत लेखकाने करमसीभाईंच्याबरोबर मुंबईहून नेरशवाडीची सफर केली होती. तिथल्या शाळेत जाऊन आदिवासी मुलांना गोष्टही सांगितली होती. करमसीभाईंच्याबरोबर दिवसभर हिंडून नरेशवाडीची पाहणीही केली होती. शेतातून हिंडताना असे आढळले की जमीन, पाणी, खत, पीक इत्यादींची अत्ंत बारीक-सारीक माहिती त्यांना आहे. फलोद्यानातून हिंडतना तर असे आढळले की प्रत्येक झाडाचे पानन् पान ते बारीक नजरेने न्याहाळतात. झाडाचे मूळ, पान, फूल, शेंडा-काही एक त्यांच्या नजरेतून सुटत नसे. भरोबरच्या शेती अधिकाऱ्यांना ते प्रश्नांवर प्रश्न विचारत असत. भरोबरचे शेती अधिकारी गडबडून जात असत. णागे एकदा सांगितलेले काम पूर्ण झालेले दिसले नाही म्हणजेही खुलासा विचारीत असत. आवाज चढवून अपशब्द वापरीत नसत. पण त्यांच्या मृदु भोषतही शेती अधिकाऱ्यांना त्यांच्या तज्ज्ञतेची जरब जाणवत असे. त्यांच्या अनुभवाचा धाक वाटत असे. ते तिथल्या शेती अधिकाऱ्यांना म्हणाले, "माझ्याबरोबर हिंडताना जवळ वही, पेन्सिल, फूटपट्टी, टेप, चाकू व कात्री ह्या वस्तू बरोबर घेऊनच हिंडले पाहिजे. वहीत टिपण केले पाहिजे. मोजमाप घ्यावयाचे वेळी ते लगेच घेतले

पाहिजे. काटछाट करण्याच्या वेळीही ती लगेचच केली पाहिजे....”

एके ठिकाणी मजूर विहीर खेदत होते. बोअरींगचे काम चालले होते. करमसीभाईंनी तिथे गेल्यावर चौकशी केली, “ पहार किती इंची आहे ? ती कशी लावता? ”... त्यांच्याकडून माहिती ऐकल्यावर पहार कशी तिरकी लावावी वगैरे गोष्टी त्यांना समजावून सांगितल्या. दिवसाला किती फूट खोल काम जाते याचीही माहिती घेतली. एक मजुराला एक दगड घेऊन तो उंचीवरुन खालच्या दगडावर टाकायला लावला. दगड फुटला नाही तेव्हा म्हणाले, “चांगला टणक आहे. लहान लहान दगड बाजूला काढा. त्यांची खडी होईल आणि मोठमोठे दगड वेगळे ठेवा. याचा बांधकामाला उपयोग होईल.” असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक वस्तूची उपयुक्तता पारखून घेण्याची बारीक दृष्टी त्यांच्यामध्ये आहे.

अननसांच्या वाफ्याजवळून चाललो होतो. त्यांची पाने वाळलेली दिसली. म्हणाले, “यांना पणी हवे. दररोज पाणी कसे मिळेल याची योजना करा.” अननसाच्या पानांत माती दिसली. तेव्हा म्हणाले, “ती माती काढून टाका. नाहीतर पीक चांगले येणार नाही.”

सुकलेले, मलूल झाड किंवा पिवळसर पान पाहिजे की करमसीभाई मनापासून हळहळत असत. बरोबरच्या शेतकी अधिकाऱ्यांना सांगत असत, “ही माझी मुलंबाळं उपाशी आहेत. तहानलेली आहेत. त्यांना पाणी नाही. हे कसे मिळेल याचे दररोज चिंतन करा आणि मगच झोपा.”

शेतात काम करणाऱ्या मजुरांना शिकविण्याची त्यांची अशी एक सोपी पध्दत आहे. त्यांच्या मते हे लोक हुशार असतात, शहाणे असतात, त्यांना काय करावे, कसे करावे, याचे उपायही ठाऊक असतात. पण केवळ दुर्लक्ष, आळस, टाळाटाळ यामुळे ते करीत नाहीत. याचे तर त्यांनी तिथे लगेच प्रात्याक्षिकच दाखवले. मजुराच्या तोंडूनच उपाय वदवून घेतला, तो प्रसंग असा :

चिकूच्या व पेरुंच्या झाडांच्या बुडाशी गवत उगवलेले होते. जवळच काम करणाऱ्या एका मजुराला ते दाखवून त्याला म्हणाले, “हे काय आहे?”

मजूर म्हणाला, “गवत उगवलंय.”

“हे गवत बुडाशी आल्यावर काय होईल?”

“जमिनीतलं अन्नपाणी खाऊन टाकील.”

“गवतानं असं अन्नपाणी खाल्यावर झाडाला भरपूर खायला मिळेल का?”

“नाही मिळणार.”

“पीक चांगलं येईल का?”

“नाही येणार.”

“मग काय होईल?”

“नुकसान होईल.”

“मग असं नुकसान करुन घ्यायचं का?”
“नाही.”
“मग नुकसान टाळण्यासाठी काय केलं पाहिजे?”
“बुडातलं गवत काढून टाकायला पाहिजे.”
“शाब्बास! हुशार आहेस. मग आज हे सगळं गवत काढून टाक.”
“बराय.”

एकदा सांगत होते, “पूर्वी शेतकरी सकाळी लोटा घेऊन शेतातच परसाकडेला जायचे. जाताना शेताच्या एका बाजूनं जायचे आणि येताना दुसऱ्या बाजूने यायचे. म्हणजेच सकाळी सकाळीच शेताला अनायासे चक्कर व्हायची. शेताची पाहणी व्हायची. त्यात पिकाला पाणी कुठं नाही, कुठं आहे, कुठे कमी आहे, कुठे जास्ती आहे, कुठे हवे आहे, कुठे नको... हे सर्व त्यांच्या नजरेखालून जायचे. रात्री काय घडले ते, वारा-पाऊस यांचा परिणाम दिसून यायचा. चोऱ्या वगैरे लक्षात यायचे. राखणदाराने राखण कशी केली की झोप काढली हे कळून यायचे... दिवस उजाडल्याबरोबर अशी सुपरव्हीजनच व्हायची आणि चांगल्या शेतीसाठी हे फार आवश्यक आहे. शेती कष्टाची आणि मेहनतीची आहे.”

जाताना एके ठिकाणी केळीच्या पायथ्याशी त्यांना नवी फूट दिसली. थांबले. शेतकी अधिकाऱ्याला म्हणाले, “ही केळी ठेवायची असेल तर ही फूट मुरगळून, चुरडून टाका. कापू नका. कापल्याने पुन्हा फुटेल. ती अहिरावण-महिवारणाची गोष्ट ठाऊक आहे ना. ते राक्षस तलवारीने छाटले की वाढायचे. कापले की पुन्हा वाढायचे ! म्हणून नवी फूट चिरडून टाकावी.”

करमसीभाईंबरोबर शेतावर हिंडताना माझ्यासारख्याला कितीतरी गोष्टी कळल्या; समजल्या. त्यांचे चौफेर बारीक लक्ष असे. पीक, पाणी, खत, कुंपण या सगळ्यांवर त्यांची शोधक दृष्टी फिरत होती आणि शेतकी अधिकाऱ्याला सांगत होते, “पपईला आता पाणी नाके, अननसाला दररोज पाणी हवे. केळीचे घड व अननस झाकले पाहिजेत, चिकूच्या फांद्या जमिनला टेकता उपयोगी नाही. त्या पाच फुटावरच तोडल्या पाहिजेच. प्रूनिंग केले पाहिजे, त्यामुळे फळ कमी येईल पण जे येईल ते मोठे येईल. चांगले पोसले जाईल, नारळीच्या-लीचीच्या रोपांवर छप्पर घाला. आंब्यांच्या झाडाला बाक येत असेल तर आधार द्या. गवत काढा, रान स्वच्छ राखा...” एक ना दोन; करमसीभाई अनेक तऱ्हेच्या उपयुक्त सूचना देत होते. झाडातले अंतर - सरी-सरीतले

अंतर - तिथलया तिथेच मोजून त्यावर चर्चा करीत होते. पिकाला पाणी पाटाने, की ठिबकने की तुषार पध्दतीने द्यावे हे जातीनेपाहून ते ठरवतात. त्याची योजना तयार करतात. शेताभोवतीचे कुंपण - चोरवाटा बारकाईने त्या त्या जागी जाऊन पाहतात. या बंद करायचा उपाय असा सांगतात.

"सगळीकडे सहा फूट खोलीचा चर खणून घ्या म्हणजे पलीकडल्या रानातल्या झाडांच्या मुळ्या आपल्या रानात येणार नाहीत, इकडल्या तिकडे जाणार नाहीत. जनावरांना जाता-येता येणार नाही. चोरट्यांनाही जाणे-येणे जड जाईल. तर असे फायदे होतील."

एका ठिकाणी पिकात उंबराची लहान लहान झुडपे दिसली. त्यांनी ती लगेच तोडायला लावली. म्हणाले, 'विजातीय असे पिकात काही नसावे."

पेरुच्या बागेत दोन पेरु दोन झाडाखाली पडलेले दिसले. करमसीभाईंनी ते दोन्ही उचलून हातात घेतले. ते नीट बारकाईने पाहिले. म्हणाले, "हा पेरु खूप पिकून आपोआप गळून पडलेला आहे आणि हा पेरु मुद्दाम तोडलेला आहे. कोणी तोडला? लक्ष ठेवा..."

करमसीभाई हे तसे हाडाचे शेतकरी अहोत. कुठल्याही शेतकी महाविद्यालयात जाऊन शिकून पदवी घेतलेले ते पदवीधर शेतकरी जरी नसले, तरी त्या पदवीधारी शेतकी तज्ज्ञापेक्षादेखील वरचढ किंबहुना त्यालाही शिकवू शकतील असे उपजतच शेतकरी आहेत. शेतीत कष्ट करुन, राबून, त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून हे ज्ञान मिळविलेले आहे.

खरं तर, करमसीभाई यांनी फार मोठ्या प्रमाणावर आदर्श अशी जी आयुष्यभर शेती केली ती उसाची शेती होती. उसाच्या शेतीचे ते फार मोठे जाणकार मानले जातात. पण नरेशवाडीची फलोद्यानाची शेती करतानाही त्यांची दृष्टी अशी एखाद्या कसलेल्या बागेच्या माळ्यासारखी दिसते, याचे कारण हेच आहे की, ही वेगळी शेती करतानासुध्दा त्यांनी तिच्याबद्दल मिळेल तिथून माहिती घेतली. निरनिराळ्या फलोद्यानाला भेटी देऊन पाहणी केली. चर्चा केली. त्यासंबंधीची माहिती पुस्तिका - लिटरेचर मिळवले. मागवून घेतले. वाचून काढले.

प्रत्येक गोष्टीत अशी श्रम करण्याची त्यांची तयारी आणि क्षमता पाहून खरोखरोच नवल वाटते!

करमसीभाई स्वत: अशी आदर्श शेती करतातच; पण जर कुणी तशीच आदर्श शेती परिश्रमाने करीत असेल तर ती जाऊन पाहून त्या व्यक्तीचे कौतुकही मन भरुन करतील!

वेंगुर्ल्याला काका चमणकरांची मोठी आंबराई आहे. ती त्यांनी उत्तम जोपासलेली आहे. निरनिराळे नवनवे प्रयोग कलमी आंब्यांचे उत्पादन वाढवले आहे. त्यांच्या आंब्यांना बाहेर फार मोठी मागणी आहे. त्यांना उत्तम उत्पादनाचे पारितोषिकही लाभलेले

आहे. हे सर्व समजाताच करमसीभाई एकदा वेंगुर्ल्यालाच गेले. काका चमणकरांच्याबरोबर त्यांच्या आमराईत पोहोचले. त्यांच्याबरोबर त्यांची सगळी आमराई फिरुन पाहिली. फिरताना अत्यंत जिज्ञासूपणाने नाना तऱ्हेचे प्रश्न विचारुन माहिती मिळविली. काका चमणकरांनाही त्यांचे समाधान होईल अशी आपल्या प्रयोगांतून हाती आलेली अनुभवसिध्द अशी माहिती त्यांना दिली. आंबराईसाठी काकांनी श्रमपूर्वक केलेल्या फलदाय प्रयोगाची सिध्दता पाहून करमसीभाई मनोमनी खूष झाले. काकांची अंत:करणपूर्वक चाह करीत त्यांनी काकांना तोंड भरुन शुभेच्छा दिल्या. आपल्या श्रमाची करमसीभाईंसारख्या एका जाणकाराकडून अशी चिकित्सक प्रशंसा झाल्याने काका चमणकरांनाही खूपच आनंद झाला!

अशा प्रशंसनीय कामाला मन:पूत दाद देऊन कौतुक करण्याचा मनाचा मोठेपणा करमसीभाईंच्याजवळ भरपूर आहे. असे कितीतरी प्रसंग व घटना असतील की जिथे करमसीभाईंनी खुषीने मान हलवून शाबासकीचा हात त्या पुरुषार्थी व्यक्तीच्या पाठीवरुन फिरविला आहे!

नरेशवाडीच्या शेतीवरुन अशी अडीच तीन तासाची चौकस फेरी झाल्यानंतर जेवणासाठी सुट्टी घेतली. जेवणाच्या व्यवस्थेसाठी त्यांनी आधीच महाराजाबरोबर स्वयंपाकाच्या वस्तू देऊन त्याला मुंबईहून पुढे नरेशवाडीला पाठविलेले होते. स्वयंपाक तयार झालाच होता. हातपाय धुताना मला विचारले, "किती हैराण झालात?"

"मुळीच नाही." मी सांगितले.

त्यावर म्हणाले, "मग वज्रदेही आहात!"

करमसीभाईंच्या स्वभावात मार्मिक विनोदाची सुबक अशी छटाही आहे. जेवायला बसताना कळेल की आमच्यापैकी दोघांना शनिवारचा उपवास आहे. त्यांच्या फराळाची व्यवस्था झालेलीच होती. पण म्हणाले, "शाळेत शिकलो होतो की 'टू माईनस मेक वन प्लस' - तर उपवासवाले दोन म्हणजे माईनस टू झाले. तर आता एक कुणीतरी प्लस होऊन जेवायला या !"

करमसीभाईंना आपल्याबरोबर पंक्तीला इतरेजनांना घेऊन बसण्यात फार फार आनंद होतो. त्यांच्याकडे कुणी गेले आणि जेवणाची वेळ असली तर ते त्याला आपल्या पंक्तिला घेऊन जेवल्याशिवाय सोडणारच नाहीत. स्वत: फारच माफक जेवतात, पण पंक्तीत आपल्याबरोबर बसलेल्यांना मात्र आग्रह करुन खाऊ घालतात.

सहभोजनाची ही आवड त्यांना पहिल्यापासूनचीच आहे. बेलापूरला असताना तरुणपणी ते जेव्हा काँग्रेसच्या कामात भाग घेत असत तेव्हा चळवळीतले कितीतरी कार्यकर्ते ते आपल्याकडे घरी जेवायला आणायचे.

जेवतानाही मनमोकळेपणाने गप्पागोष्टी व विनोद करुन ते वातावरण प्रसन्न करुन टाकतात. आग्रह करुनही जर कुणी एखादा पदार्थ घेतला नाही तर ते सांगतात, 'संकोच करु नका. जेवताना जो संकोच करतो, तो पाप करतो...' जेवणे आटोपताच ते खरकटी ताट्यावाट्या गोळा करायला लागतात. चहा प्याल्यावर कपबश्याही उचलू लागतात. त्यांना काहीही वाटत नाही. अगदी सहज करतात.

जेवणे झाली. हात धुतला आणि करमसीभाईंनी लागलीच आपला झब्बा अंगावर चढवला. टोपी घातली आणि थोडीशीदेखील विश्रांती न घेता ते पुन्हा फार्मवर निघाले. मीही त्यांच्याबरोबर निघालो.

करमसीभाई आता डेअरीकडे वळले. नरेशवाडीच्या फार्मवर दूध-डेअरीचा प्रकल्पही राबविला जातो. डेअरीत बऱ्याच दुभत्या जरसी गायी आहेत. करमसीभाई तिथे पोहोचले तेव्हा गायी बाहेर चरायला नेलेल्या होत्या. गोशाळेत कोणीच नव्हते. गायींचे शेण वेगैरे घाण मात्र तशीच होती. ती पाहताच करमसीभाईंनी धोतर वर खोचले, बाह्या वर सरल्या, हातात झाडू घेतला आणि नळाला रबरी पाईप लावून पाणी टाकत खराट्याने सगळी घाण झाडून, निपटून टाकली. काही शिंतोडे कपड्यांवर उडाले, पण त्यांची दखलही त्यांनी घेतली नाही. सगळा गोठा स्वच्छ करुन टाकला! कसलेही काम कमी प्रतीचे नाही, ही जाणीव त्यांच्या ठायी खोलवर रुजलेली आहे.

तेवढ्यात गोशाळेचे काम पाहणारे तिथे आलेच. करमसीभाईंनी स्वत:च्या आचरणातूनच स्वच्छतेचा प्रत्यक्ष पाठ दिलेला होता.

मग त्यांनी गव्हाणीवर बसवावयाच्या जाळीसंबंधाने संबंधिताला विचारले, "या जाळ्या गव्हाणीपासून किती उंचीवर बसवणार?"

"त्याने सांगितले, दीड फुटावर बसवणार."

करमसीभाई म्हणाले, "आणखीन थोड्या वर, दोन-अडीच फुटावर बसवा. कशासाठी?"

पण या प्रश्नाचे उत्तर त्या गृहस्थाला देता आले नाही. तेव्हा मग करमसीभाईंनीच त्यांना समजावून सांगितले,"गाय जेव्हा गव्हाणीतला चारा खाण्यासाठी मान खाली करेल तेव्हा तिची शिंगे पुढे येतील आणि ती या जाळीत अडकतील. जाळीला अडतील. म्हणून जाळ्या आणखी थोड्या वर बसवल्या पाहिजेत. आलं लक्षात?"

त्या गृहस्थांनी होकारार्थी मान हलवली. मी पण करमसीभाईंचे हे व्यवहारी चातुर्य पाहून चकित झालो! गोष्ट साधीच, पण तिच्याविषयी केवढी दृष्टी आणि विचार ! त्यांच्या नजरेतून काही सुटतच नाही.

गोशाळेतले दूध वितरण करण्याची चर्चा चालली होती. आमच्याबरोबर आलेले राधेराधे म्हणाले, “दूध वितरण आपणच करावे, कुपन्स काढावीत. केंद्र उघडावीत.”

यावर करमसीभाई हसले आणि त्यांनी एक गोष्ट सांगितली. म्हणाले, “गावच्या पाटलाची बायको मेली. गावातले लोक समाचाराला आले. गावातली एक पोक्त बाईही आली. ती म्हणाली ‘पाटील, दुसरी बायको करा.’ तेव्हा पाटील तिला म्हणाले, ‘बाई, बायको पाहायला मी आता कुठं जाऊ? तुम्हीच व्हा!...’ तसंच मी तुम्हांला सांगतो. तुम्ही म्हणता ते दूध वितरणाचं काय करायचं ते तुम्हीच करा. माझी हरकत नाही.”

निरनिराळ्या प्रश्नांवर उत्तरे शोधण्यात आणि त्यांची व्यवस्था लावण्यात सगळा दिवस गेला. संध्याकाळ झाली तसे आम्ही घरी मुंबईला निघालो. फार्मच्या गेटजवळ आलो. गेटमनने दार घडवून सलाम ठोकला. पण करमसीभाईंनी ड्रायव्हरला गाडी गेटच्या आतच थांबविण्यास सांगितली. गेटमनला म्हणाले, “गेटपास पाह्यलास?”

गेटमन गडबडला. नियम असा होता की कुठलेही वाहन फार्मवरुन बाहेर जाताना गेटवर गेटपास पाहून आणि गाडीतील बाहेर चाललेले सामान पाहून मगच गाडीला बाहेर जाता येते. पण हा नयम त्या वेळी ‘धन्याचीच गाडी आहे‘ असे म्हणून डावलला होता. गेटपास मागितल्याबद्दल दुसरा एखादा धनी गेटमनला डाफरलाही असता. पणी धनी करमसीभाई वेगळाचा होता. त्यांनी आपणहून गाडी थांबवली. गाडीत मुंबईला बंगल्यावर नेण्यासाठी दहा लिटर दूध असलेला कॅन डिकीत ठेवलेला होता. गेट पास केलेला नव्हता. करमसीभाईंनी त्याला गेटपास करुन आणायला सांगितले आण मगच गाडी बाहेर जाऊ दिली. करमसीभाई असे नियम व शिस्त काटेकोरपणाने पाळणारे आहेत आणि म्हणूनच कामही व्यवस्थित होते. कामगारांना शिस्त लागते. जबाबदारीची जाणीव राहते. धाकही वाटतो.

आता अलीकडे वयोमानानुसार प्रकृती बरोबर साथ देत नसल्यामुळे करमसीभाईंचे नरेशवाडीला पूर्वीसारखे जाणे-येणे राहलेले नाही. परंतु घरी बसूनही त्यांची देखरेख तशीच आहे. दररोज दुधाची गाडी नरेशवाडीहून बंगल्यावर येते, भळे, भाज्याही येतात आणि रोज झालेल्या कामाचा अहवाल आणि करावयाच्या कामाची माहती असलेले सविस्तर पत्रही रोजच्या रोज त्यांच्याकडे येत असते. त्या पत्राला उत्तर देणारे व करावयाच्या कामांबद्दल सुचना देणारे, मार्गदर्शन करणारे यांचे पत्रही परतणाऱ्या गाडीबरोबर तिथल्या कचेरीकडे जात असते.

नरेशवाडीहून आलेली फळे - त्यांचा रंग, आकार, वाढ व स्वाद इत्यादी गोष्टी ते

बारकाईने पाहतात. त्यांच्या सराईत नजरेतून काहीच सुटत नाही. कुठे काही कमतरता आढळली तर ती सुधारण्यासाठी यांचे सूचनापत्र रवाना होतेच. घरी असले तरी करमसीभाईंचे मन इतर कार्यक्षेत्रांप्रामणेच नरेशवाडीतही गुंतलेले असते. नरेशवाडी ही त्यांची समाजहितकारक अशी आवडीची प्रयोगशाळाच आहे!

❖

भ्रमंती
(रेल्वे प्रवास)

साधूनामाचरितं खलचेष्टा विविधलोकहेवाकान्।
नर्म विदग्धैर्विहितं युवतिजनवक्रकथितानि।।
गुरूगूढशास्त्रतत्त्वं विटवृत्तं धूर्तकत्र्चनोपायान्
वारिधिपरिखां पृथ्वीं जानाति परिभ्रमन्पुरूष :।।



समुद्रवलयांकित पृथ्वीवर प्रवास करणारा मनुष्य सज्जनांची वागणूक, दुष्टांची अपकृत्ये, निरनिराळ्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा, विद्वानांचा नर्मविनोद, तरूणींचे चतुराईचे बोल, शास्त्रांमधील गहन तत्त्वे, धूर्तांचे वागणे, लबाड माणसांच्या लबाडीचे मार्ग - हे सर्व उत्तमप्रकारे जाणतो.

भ्रमंती (रेल्वे प्रवास)

शेती, उद्योग, व्यापार अशा बहुविध व्यापात सतत मग्न असलेल्या करमसीभाईंना काही त्यांचे आवडते असे छंदही आहेत. माणसाला छंद हवेतच; कारण व्यवसाय-व्यापात गढून गेलेलय मनाला व देहालाही कधी ना कधीतरी कंटाळा वाटतोच. तेच तेच काम व परिश्रम सतत करीत राहिल्यामुळे कधीतरी मन आणि देह थकून भागून जातो. अशा वेळी थकलेल्या देहाला आणि मनाला नेहमीच्या परिपाठातल्या कामापेक्षा थोडे वेगळे, जरा नराळे असे काम व वातावरण हवेहवेसे वाटू लागते. विश्रांतीची-विरंगुळ्याची गरज भासू लागते. चांगले, निर्मळ, केवळ आनंदाने व सौंदर्याने ओथंबलेले छंद अशा वेळी ही गरज भागवू शकतात. मनाचा व देहाचा थकवा नि कंटाळा घालवून विश्रांती व विरंगुळा देऊ शकतात. आणि मरगळलेल्या देहमनांत पुनश्च नवी उभारी, नवी उमेद भरु शकतात. असे पुनश्च ताजेतवाने झालेले मन व देह आपल्या नित्यकर्मात अधिक जोमाने, धैर्याने, जिद्दीने व उत्साहने पुढील अधिक मोठी झेप घेण्यास तयार होतो. एक परीने उत्तम, निखळ, आनंददायी छंद हे देहमनाचे उत्साहवर्धन टॉनिकच ठरतात. म्हणून असे छंद कसल्याही आणि केवढ्याही व्यापातून जपले पाहिजेत आणि देहमानचे आरोग्य टिकवले पाहिजे.

छंदांमधील हे सद्‌गुण व मर्म करमसीभाईंनी अचूक जाणलेले आहे. आणि म्हणूनच सज्जन सहवास व तीर्थाटन हे दोन उत्कृष्ट छंद त्यांनी मोठ्या कटाक्षाने जपलेले आहेत. 'केल्याने देशटन पंडत मैत्री सभेत संचार' - ही उक्ती सर्वज्ञान आहे. देशाटन केल्याने सृष्टिदर्शन व स्थलदर्शन घडते. समाजजीवन व लोकजीवन अवलोकनात येते. निसर्ग - सौंदर्याने मन फुलून जाते. विविध तऱ्हेचे मानवी स्वभावाचे नमुने अनुभवास येतात. नाना प्रकारच्या उद्योगधंद्यांची, कृषिपध्दतीची, हवापाण्याची, रीतिभातींची, पंथ-परंपरांची ओळखदेख होते. ज्ञान, विचार व संस्कारसमृध्दी वाढते. हा अशा प्रकारचा प्रवासातील आनंद आणि लाभ करमसीभाईंनी आपल्या कर्मसंपन्न आयुष्यात भरपूर प्रमाणात लुटलेला आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्वही रसिक, सुजाण व चतुर बनलेले आहे. आपल्या

प्रवासातील उद्‌बोधक व मनोरंजक अशा आठवणी ते मोठ्या रसाळपणाने सांगतात.

करमसीभाईंना बालपणी आपल्या वडिलांबरोबर केलेल्या पाहिल्यावहिल्या प्रवासांची अजूनही आठवण आहे. ते सांगतात, "मी त्यावेळी सहा-सात वर्षांचा असेन आम्ही बेलापूरला राहात होतो. एकदा घरातील आम्ही सर्वांना, म्हणजे वडील, आई, मोठा भाऊ धारशीभाई, धाकटी बहीण बसंती आण मी यांना वडिलांनी दक्षिण भारतात तीर्थयात्रेला नेले होते. धनुष्यपुरी, रामेश्वर, तिरुपती आदी तीर्थस्थानी आम्ही गेलो होतो. त्या वेळी आजच्यासारखी राहण्या-उतरण्यासाठी खर्चिक हॉटेल्स नव्हती. तीर्थक्षेत्री पंडे, बडवे, गोरे आदी यजमानकृत्य करणारी ब्राह्मण मंडळी असत. राहण्याजेवणाची व देवदर्शनाची सगळी व्यवस्था दक्षिणा घेऊन ते करीत असत. आजही ही प्रथा आहेच. अशीच एक प्रथा त्यांच्यात रुढ आहे, ती म्हणजे त्यांना त्यांची दक्षिणा देऊन निरोप घेताना ते यात्रेकरुचे संपूर्ण नांव, गाव व पत्ता आपल्या चोपडीत लिहून घेत असत. अशासाठी की त्या यात्रेकरुच्या पुढल्या पिढीतील येणाऱ्यांना ते दाखवून त्यांच्यावर आपलाच एक प्रकारचा हक्क आहे हे सध्द करण्यासाठी. अशा तऱ्हेने परंपरेने पिढयान्‌पिढ्या तीर्थक्षेत्री येणारे यात्रेकरु त्या त्या ब्राह्मण मंडळींच्याकडेच जात असत. उतरत असत. राहात असत. धार्मिक कृत्य, देवदर्शन स्थलदर्शन करीत असत.

एकदा अशाच एका ब्राह्मणाबरोबर आम्ही एक सरोवर पहायला चाललो होते त्यावेळी एका सर्पाने एक बेडूक आपल्या तोंडात पकडलेला दिसला. बेडूक साक्षात मृत्यूच्या जबड्यात होता. परंतु अंतिम अवस्थेतसुध्दा तो आपल्या जीभेने नाकावर बसलेली माशी मटकावण्याच्या प्रयत्नात होता. प्राण्याची मरण्याच्या दारातसुध्दा जीवनाची आसक्ती केवढी प्रबळ आहे, याचीच ही साक्ष होती."

करमसीभाईंनी हे जे दृश्य पाहिले, असेच वर्णन किंवा दाखल ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरीत एका ओवीत दिलेला. ती ओवी अशी:

दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा ।
कींतो मासिया वेटाळी जिभा ।
तैसे प्राणिये कवणा लोभा ।
वाढविती तृष्णा ।।

आपल्या आठवणीत करमसीभाई पुढे सांगतात, "माझ्या वडिलांना तिकडील तमिळ भाषा येत नव्हती. परंतु सुदैवाने एका रेल्वेत स्टेशनवर मुसलमान इसम त्यांना भेटला. त्याला तिकडील भाषा येत होती. हिंदुस्थानी भाषाही समजत होती. त्यांच्या सहाय्याने माझ्या वडिलांनी आम्हांला लागणाऱ्या रोजच्या वस्तूंची त्यांच्या तिकडील भाषेतील नावांची एक यादीच तयार करुन घेतली व काम भागविले.

“आम्ही तिरुपती येथील गिरिबालाजीच्या दर्शनाला गेलो होतो. तिरुमलाईच्या डोंगरावरुन चढून जावयाचे होते. असे सात डोंगर होते. मी लहान, डोंगर चढणे शक्य नव्हते म्हणून मला एका इसमाने खांद्यावर घेतले होते. डोंगर चढणीच्या वेळी चालताना मागेपुढे व्हायचे. वळणावर एकमेक दिसायचे नाहीत तर अशाच एका ठिकाणी त्या इसमाने मला खांद्यावरुन खाली उतरविले आणि काही अंतर चालवत नेले. पुढच्याच वळणावर माझ्या वडिलांना हे दिसले. ते रागावले आणि त्यांनी त्या भाडोत्री इसमाच्या थोबाडीत मारली.

“आमच्या त्या दक्षिण यात्रेत आम्ही मोठमोठाली प्रशस्त देवळे पाहिली. गोपुरे पाहिली. देवळांच्या बाहेर आसपास पाल ठोकून बसलेले न्हावी लोक दिसले. तिथे त्या क्षेत्रावर प्रथा अशी आहे की, न्हाव्याकडून मुंडण करुन घ्यावयाचे व केसांचे दान करावयाचे. माझ्या वडिलांनी व भावांनी मुंडण करुन घेतले. मग माझी पाळी आली. माझ्या डोक्यात त्या वेळी फोड झाले होते. मुंडण करताना धारदार वस्त्र्याने ते फुटले, त्यातून रक्त वाहू लागले, मी मोठ्याने रडू लागलो परंतु त्यातून माझी सुटका झाली नाही. माझा तुकतुकीचा गोटा केल्यावर त्यावर थोडे चंदन लावण्यात आले, असे आठवते.

“त्यावेळी धनुष्यकोडी अस्तित्वात होती. त्यानंतरच्या काळात वारा, वादळ, पाऊस, आदी निसर्गाच्या आघातांनी ती नष्ट झाली. इतस्त: पडलेले दगड वगैरे भग्नावशेष एवढेच आता दृष्टीस पडतात.”

“समुद्रकाठच्या वाळूत उभे असलेले एक मंदिर पाहल्याचे आठवते. अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांच्या संगमावर हे मंदिर उभे आहे. मंदिराच्या पुढे अवघ्या दीड फुटावर एका लहानशा कुंडात पिण्याचे गोड पाणी होते. पुढच्या विस्तीर्ण वाळवंटात विविध आकारांचे आणि रंगांचे शंखशिंपले पुष्कळच होते. मी आणि माझा मोठा भाऊ धारशीभाई अशा आम्ही दोघांनीही आमच्या धोतरात पुष्कळसे शंखशिंपले गोळा केले. वारा जोराने वाहत होता. आम्ही गोळा केलेल्या जड ऐवजामुळे धोतरे ढिली झाली होती. आता धोतरे वाचवायची की, तो गोळा केलेला खजिना वाचवायचा असा प्रश्न आमच्यापुढे उभा राहिला. शेवटी विचार करुन आम्ही धोतरे वाचवायची ठरवले आणि तो खजिना तेथेच टाकून दिला.”

“या दक्षिण यात्रेनंतर दीड-दोन वर्षांनी वडिलांनी सर्वांना गेणभाई बैरागी यांच्याबरोबर श्री गुरुदत्तांचया यात्रेला नेले होते. परंतु यात्रेच्या ठिकाणी कॉलऱ्याचा प्रादुर्भाव झाल्यामुळे त्यांना तिकडे जावयास मिळाले नाही. म्हणून ते परतीच्या वाटेवर अहमदनगर येथे उतरले आणि सदाशिवराव नावाच्या ओळखीच्या पोस्टमास्तरांच्याकडे राहिले. सदाशिवराव हे बेलापूरला पोस्टमास्तर होते व त्यांची बदली त्यावेळी

अहमदनगरला झाली होती.

करमसीभाईंना बाळपणातल्या पाहिलेल्या काही साधूंच्या व ज्योतिषांच्या आठवणी आठवतात. ते सांगतात, बेलापूरला असताना शेतावर काम करणारा एक मजूर भविष्य सांगतो असे वडिलांच्या कानावर आले, तेव्हा त्यांनी माझ्या थोरल्या भावाला त्याच्याकडे नेले होते. त्या शेतमजुराने माझ्या भावाच्या जीवनातील काही मोठ्या घटनांचे वर्णन करुन सांगितले होते.

"एकदा मुंबईला असताना व्यास नावाच्या एका ज्योतिषाकडे मी गेलो होतो. तो बोरीबंदला भाटिया बागेत असलेल्या त्याच्या ऑफिसमध्ये होता. मी त्याच्या खोलीत गेलो. त्याला आश्चर्य वाटले! त्यांचे सर्वसाधारणपणे माझे भविष्य कथन केले. त्यापैकी पन्नास टक्के भविष्य खरे ठरले."

"एकदा तर मी साधू बनण्याच्या उद्देशाने लोटा घेऊन घराबाहेर पडलो होतो आणि राहुरीच्या बाजुला चाललो होतो. परंतु तीन-चार मैल चालून गेल्यावर मला, मी घेतलेल्या या निर्णयाचा पश्चात्ताप झाला आणि बेलापूरला घरी परतलो.

"माझ्या आजींनी बांधलेले मालुंजा येथील शिवालय आजही अस्तित्वात आहे."

तरुणपणी करमसीभाई जेव्हा साखरेचा व्यवसाय करु लागले तेव्हा त्यासाठी त्यांना पुष्कळच लांबलांबचा प्रवास कराव लागत असे. व्यवसायानिमित्त करमसीभाई जरी प्रवास करीत होते, तरी जिथे कुठे देवस्थान, मंदिर, मठ, आश्रम, धर्मादाय संस्था किंवा कुष्ठरोग्यांची वसाहत असे, तिथे तिथे जात असत; पहात असत. या प्रवासात कधी कधी काही घटनाही घडत असत. अशाच एका घटनेबद्दल करमसीभाई सांगतात, "एकदा विदर्भात एका गावाला चाललो होतो. वर्ध्याच्या स्टेशनवर गाडी बदलली. गाडीत तिकीट-चेकर आला. मी कधीही विनातिकीट प्रवास करीत नव्हतो. फक्त एकदाच मात्र तिकीट काढायला वेळ नव्हता व गाडी सुटण्याच्या बेतात होती म्हणूनच तिकीट न काढताच मी गाडीत चढलो होतो. परंतु पुढल्याच स्टेशनवर तिकीटचेकरकडे जाऊन मी स्वत:हूनच तिकिटाचे पैसे भरले होते. परंतु यावेळी तिकीट काढूनही ते कुठे ठेवले आहे याची आठवण मला राहिली नव्हती. मी कपड्याचे खिसे व सामान तपासले, पण तिकीट काही मिळाले नाही. घटना तशी लहानशी होती, पण ओशाळवाणी होती. पण शोधता शोधता घड्याळ ठेवण्याच्या लहानशा शिखात माझ्या हाती ते तिकीट लागले, मला आनंद झाला मी ते चटकन तिकीटचेकरला दाखविले.

एकदा असाच मी बेलापुरातून चाललो होतो. गाडिला उशीर झालेला होता. म्हणून मी स्टेशनमास्तरांशी इंग्रजीत संभाषण करीत होतो. मला ओळखणाऱ्या एका ऊस बागायतदाराने हे दृश्य पाहिले आणि तो आश्चर्यचकितच झाला. कारण त्या काळी ग्रामीण भागात इंग्रजी शिक्षणाचा फार मोठा प्रसार झालेला नसल्यामुळे इंग्रजीत बोलू शकणारे फारच थोडे लोक असत."

एकदा असाच एक हृद्य अनुभव सांगताना करमसीभाई म्हणाले, "मिरॅकल म्हणजे काय? एखादी घटना कशी अचानक घडते, कुठल्या वातावरणात घडते आण कुठल्या स्वरुपात दैवी स्पर्श जाणवून जातो, हे कोणालाही सांगता येत नाही. एकदा प्रवासात असतानाच खंडाळा स्टेशनावर थंडीत कुडकुडणारा एक गरीब प्रवासी माझ्या दृष्टीस पडला. मी लोणावळ्याला चाललो होतो. थंडीचे दिवस होते आणि कडाक्याची थंडी होती. अशा थंडीत तो कुडकुडणारा प्रवासी पाहून माझे मन कळवळून गेले. माझ्याजवळ दोन रुपये किंमतीची काश्मिरी शालीच्या काठाप्रमाणे काठ छापलेली एक शाल होती. ती मी त्या प्रवाशाला देऊन टाकली."

"राहुरीच्या एका मंदिरात एक साधू राहात होता. त्याने बेलापुरातही एक मंदिर बांधले होते. एकदा मी आणि माझा मोठा भाऊ धारशीभाई अहमदनगरला जात असताना वाटेत राहुरीला साधुमहाराजांच्या दर्शनाला गेलो. त्यांच्याशी बोलताबोलता आम्ही त्यांना विचारले, "आपले वय किती?" साधुमहाराजांनी सांगितले, 'माझ्या वयाबद्दल विचारु नका. मी माझ्या हातांनी प्रभू रामचंद्रांना अभिषेक केलेला आहे. प्रभु रामचंद्र जेव्हा वनवासाला निघाले तेव्हा मी अयोध्येत होतो."

"परंतु सुमारे पंधरा वर्षानंतर या साधुमहाराजांचे निधन झाले.

"साखर विक्रीचा व्यवसाय करीत असताना एकदा पंढरपूरला जाण्याचा योग आला. पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी म्हणून तिथेच भेटलेल्या काही दर्शनेच्छू लोकांबरोबर विठ्ठल मंदिरात गेलो. परंतु दर्शनासाठी आलेल्या लोकांची तेथे बरीच मोठी गर्दी झालेली होती. ती हटविण्यासाठी पहारेकरी ओढाताण करीत होते. ते दृश्य पाहिले आणि विठ्ठलाचे दर्शन दुरुनच घेऊन मी मंदिराच्या बाहेर आलो आणि केळी विकत घेऊन ती गायींना खावयास दिली.

"एकदा पंढरपुरातील यात्रेच्या वेळी मी लातूरला गेलो होतो. त्यावेळी बेसुमार गर्दीमुळे तो प्रवास मालगाडीच्या वॅनमधून करावा लागला होता.

“एका ठिकाणच्या देवीच्या यात्रेत वडारी लोक आलेले होते. ते डुकराचे मांस खातात, तिथे त्यांनी तीन जिवंत डुकरे पेटलेल्या आगीत भाजल्याचे मी पाहिले. ती गरीब बिचारी डुकरे मोठ्यांदा आक्रोश करीत होती. अंगावर शहारे आले. एवढी यात्रा जमलेली, पण कोणीसुध्दा त्या मुक्या प्राण्यांना वाचविण्यासाठी पुढे सरसावला नाही. मला ते भयंकर दृश्य आठवते!

“एकदा साखरविक्रीच्या प्रवासातच मी वर्ध्याला गेलो होतो. जवळच विनोबांचा आश्रम पवनारला आहे. मी तिथे राहिलो. रात्री गच्चीवर झोपलो. स्वच्छ चांदणे पडले होते. रात्री जेव्हा वारा सुटला तेव्हा कसलातरी विचित्र आवाज ऐकू येऊ लागला. मी घाबरुन गेलो आणि तोंडावरुन पांघरुण घेतले. बाहेर डोकावून पाहण्याचे धैर्य झाले नाही. तो आवाज बराच वेळ येत राहिला. तेव्हा मग थोड्या धीरानेच मी बाहेर डोकावून पाहिले तेव्हा तिथे जवळच एक मोठे झाड दिसले. झाडाला फूटभर लांबीच्या शेंगा लागलेल्या दिसल्या. शेंगा वाळलेल्या, रंगाने पिवळट आणि बाकदार होत्या. वाऱ्याच्या झोताने त्या शेंगा हलत होत्या आणि हलताना त्यांचा आवाज होता होता.

“सकाळी मी विनोबा भावे यांच्या आश्रमात गेलो, त्या दिवशी एकादशी होती म्हणूनच नाश्त्याला खजूर आणि दूध मिळाले.

“एकदा दक्षिण भारतातील यात्रेच्या वेळी सत्यासाईबाबा यांच्या पुट्टपरथी आश्रमात गेलो होतो. तिथे दर्शनासाठी पुष्कळ लोक आलेले होते. परंतु त्यांच्याकडून बोलावल्याशिवाय कोणालाही त्यांच्याकडे जाता येत नव्हते. काही जणांना परवानगी मिळाली, तर काही जणांना सहा महिन्यांनी, काही जणांना दोन महिन्यांनी, तर काही जणांना एक-दोन आठवड्यांनी येण्यास सांगितले होते. आम्ही गर्दीतच थांबलो होतो. महिलांची रांग वेगळी होती. माझ्या पत्नीला बोलावण्यात आले. एका ग्रुपमधल्या एकाला जरी बोलावले तरी त्या ग्रुपमधील सर्वजण दर्शनाला जाऊ शकत होते. म्हणून आम्ही तिघेजण सत्य साईबाबांच्या दर्शनाला गेलो. त्या वेळी त्यांनी आम्हांला नेहमीप्रमाणे भस्म दिले.

“कोचीनला असताना अय्यप्पा साब्रीमलाई नावाच्या एका मोठ्या क्षेत्राबद्दल माहिती मिळाली. तिथे स्त्रियांना प्रवेश नव्हता. मी माझी पत्नी आणि दोन मुली असे चौघेजण त्या टेकडीच्या पायथ्याशी गेलो. मुलींना म्हणालो, ‘आमच्याबरोबर चला. काय होईल ते पाहू’. हळूहळू आम्ही मंदिराच्या पायऱ्यांजवळ पोचलो. तेव्हा आम्हांला हटकले. मी त्यांना विनवणी करुन म्हटले की, ‘आम्ही फार लांबून दर्शनासाठी आलो आहोत. या माझ्या

मुली लांबून दर्शन घेतील.' माझी विनंती मान्य करुन त्यांनी माझ्या मुलींना दर्शनाची परवानगी दिली.

"तिथे अशी प्रथा आहे की, मंदिराच्या प्रत्येक पायरीवर जितक्या वेळा तुम्ही दर्शनाला आला असाल, तितके नारळ प्रत्येक पायरीवर अर्पण करावयाचे. मंदिराला अठरा पायऱ्या आहेत. आम्ही तेवढे नारळ अर्पण केले. या प्रथेतून लक्षावधी रुपये ती मंडळी कमावतात.

"गुजरातमध्ये श्री. हिंमतभाई नरेंद्र मनोहरदास यांनी एकदा मला सांगितले की, गुजरातमधील महुआ येथे श्री. मुरारीबापू यांची रामायणावरील प्रवचने ऐकण्यासारखी असतात. मी त्याच दिवशी संध्याकाळी मुरारीबापूंचे प्रवचन एकेले आणि घरी पत्राने कळवले. मी मुरारीबापूंच्या प्रवचनाने प्रभावित झालो होतो, परंतु त्यांया निकट पोचलो नव्हतो. त्यानंतर काही दिवसांनी काही मित्रांच्या मार्फत मी मुरारीबापूंच्या सान्निध्यात गेलो. त्यांना मुंबईला येऊन रामायणावर प्रवचने करण्याची वनंती केली. ती त्यांनी मान्य केली. आम्ही मुरारीबापूंची रामायणावरील प्रवचने मुंबईच्या चौपाटीवर घडवून आणली. हजारो श्रोत्यांनी याचा लाभ घेतला.

"त्या आधी डोंगरे महाराजांचीसुध्दा प्रवचने आझाद मैदानावर घडवून आणली होती. मुरारीबापूंची प्रवचने जगभर अनेक ठिकाणी झाली. त्यांच्या प्रवचनांनी लक्षावधी श्रोते प्रभावित झाले!"

अशी प्रवचने-कीर्तने ऐकण्याची संधी ग्रामीण भागातील मंडळींनाही लाभली पाहिजे, अशा तळमळीतून करमसीभाईंनी साकरवाडी, श्रीरामपूर या भागांत असे कार्यक्रम योजून पार पाडले होते.

❖

हिमालयाच्या सावलीत

(अमरनाथ)

अस्त्सुत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराज :।
पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थित : पृथिव्या इव मानदण्ड :।।



समुद्रवलयांकित पृथ्वीवर प्रवास करणारा मनुष्य सज्जनांची वागणूक, दुष्टांची अपकृत्ये, निरनिराळ्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा, विद्वानांचा नर्मविनोद, तरूणींचे चतुराईचे बोल, शास्त्रांमधील गहन तत्त्वे, धूर्तांचे वागणे, लबाड माणसांच्या लबाडीचे मार्ग - हे सर्व उत्तमप्रकारे जाणतो.

हिमालयाच्या सावलीत (अमरनाथ)

करमशीभाई हे श्रध्दाळू मनाचे आणि धार्मक वृत्तीचे आहेत. ईश्वरनिष्ठ आहेत. हिंदू धर्माचा त्यांना रास्त अभिमान आहे. हिंदू धर्मरक्षणाची तळमळ त्यांचया ठायी आहे. तशीच हिंदू तीर्थक्षेत्रांची ओढही त्यांच्या ठिकाणी आहे.

हिंदू मनाला हिमालय आणि गंगा या दोन पवित्र स्थानांचे विशेष आकर्षण आहे. हिंदू मनात या दोन गोष्टींविषयी विशेष आदराची भावना वसत आहे. आणि म्हणूनच हिदू मनाने हिमालयाला 'देवतात्मा' आण गंगेला 'गंगामैया' असे परमश्रध्देने संबोधिलेले आहे. जन्माला येऊन हिमालयालाचे दर्शन घ्यावे आणि गंगेचे स्नान करावे, तसेच जीवनाचा अंतिम काल हिमालयाच्या सान्निध्यात व्यतीत व्हावा आणि मरताना मुखात गंगाजल पडावे अशी तीव्र इच्छा हिंदू माणसाला असते.

उद्योग-व्यवसायातून काहीशी फुरसत मिळाल्यावर करमसीभाईंनीदेखील हिमालय आणि हिमालयाच्या कुशीत वाहणाऱ्या गंगामातेकडे धाव घेतली होती.

करमसीभाईंनी आपल्या धार्मिक वृत्तीला अनुसरुन हिंदू प्रथेप्रमाणे भारतातील बहूतेक सर्व धर्मक्षेत्रांची यात्रा केलेली आहे. यात -

बद्रीनाथ, द्वारकाधीश, जगन्नाथपुरी, आणि रामेश्वर ही चार धामे, मथुरा, वृंदावन, काशी, अवंती, अयोध्या, द्वारका, जगन्नाथ, कांची इत्यादी बारा पुरी, तसेच कैलास-मानसरोवर, बिंदूसरोवर, पंपासरोवर आणि नारायण सरोवर अशी चार सरोवरे, तसेच महाराष्ट्रातील अष्टविनायक, बारा ज्योतिर्लिंगे, तसेच अमरनाथ, वैष्णोदेवी, गिरिबालाजी, तसेच गंगा, यमुना, नर्मदा, सिंधु गोदावरी, कावेरी इत्यादी नद्या व अनेक लहान-मोठी तीर्थक्षेत्रे यांची यात्रा त्यांनी केलेली आहे. काही ठिकाणी तर ते दोन-तीन वेळा गेलेले आहेत. काश्मीरमध्ये हिमप्रदेशातील अत्यंत अवघड व कठीण अशा अमरनाथला ते तीन वेळा जाऊन आले आहेत.

या बहुतेक सर्व यात्रांच्या वेळी करमसीभाईंनी बरोबर आपल्या धर्मपत्नी सौ. साकरबाई, ज्येष्ठ कन्या सौ. लीलाबेन आणि प्रसंगानुसार इतरही कन्या, नातेवाईक व स्नेही यांना बरोबर घेतले होते. याशिवाय स्वयंपाकासाठी महाराज, हरकामी गडी, शिधासामग्री, कपडेलत्ते अशा तीन चार गाड्या व त्यांचे ड्रायव्हर अशा एकूण लवाजमा घेऊन करमसीभाई हा प्रवास करीत असत. प्रवासाला निघण्यापूर्वीच आधी एक-दोन महिने ते जिथे जावयाचे आहे, तिथले रस्ते, दिशा, मुक्कामाची ठिकाणे, मंदिरे पाहण्यासाठी स्थळे, हवामान, इत्यादी गोष्टींची बारीकसारीक माहिती नकाशांसह ते मिळवीत असत. तिक्डे जाऊन आलेल्या यात्रेकरुंच्यांकडूनही माहिती घेत असत. अशी सूक्ष्म दृष्टी व बारकावा त्यांच्या स्वभावातच आहे. या यात्रांचे प्रवासदर्णन त्यांनी जरी लिहिले नसले तरी सौ. लीलाबेन यांनी मात्र ते आपल्या प्रवासी दैनंदिनीच्या आधाराने सविस्तर असे आपल्या गुजराती भाषेत लिहिलेले असून ते वेळोवेळी त्यांच्या लोहाणा समाजाच्या 'लोहाणा सौरभ' या नावाच्य मासिकात प्रसिध्दही झालेले आहे. त्यांच्या या लेखनाद्वारे व करमसीभाईंनीसुध्दा सांगितलेल्या प्रवासातील काही प्रवासी-आठवणींची नोंद इथे घेतलेली आहे.

करमसीभाईंनी तीन वेळा काश्मीरमधील हिमालयातील अमरनाथची अवघड यात्रा आपल्या परिवारासह केलेली आहे. अमरनाथची यात्रा घडणं हा भाविकांच्या दृष्टीनं एक महान पुण्ययोग असे मानले जाते. तसेच बर्फाळ प्रदेशातून, अरुंद, वाटेने, थंडी-वाऱ्याच्या गारठ्यात ही यात्रा करणे म्हणजेही एक दुर्मिळ नवलाईची घटना समजली जाते.

अमरनाथच्या गुहेत एका विशिष्ट हंगामात, एका विशिष्ट ठिकाणी बर्फाचे मोठ्या आकारातील शिवलिंग तयार होत असते. त्यावेळी त्यांच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने जात असतात. आणखी एक नवलाईची गोष्ट म्हणजे तिथे नित्य नेमाने सुमारे २० कबुतरांचा थवा एका विशिष्ट वेळी येत असतो. करमसीभाईंनी सांगितले, "आम्ही तीन वेळा अमरनाथची यात्रा केली. पहिल्या वेळी आम्हांला तिथे पूर्ण मोठ्या आकारातील बर्फमय शिवलिंगाचे दर्शन झाले. दुसऱ्या वेळी शिवलिंग तयार झालेलेच नव्हते. ती जागा सफाट हिमच्छादित होती. आणि तिसऱ्या वेळी दोन फूट उंचीचे शिवलिंग पहावयास मिळाले. अमरनाथला पोचूनही पूर्णावस्थेतील शिवलिंगाचे दर्शन घडणे ही गोष्ट भाग्याचीच मानली जाते."

करमसीभाईंच्या ज्येष्ठ कन्या सौ. लीला माधवजी कोटक यांनी अमरनाथच्या पहिल्या यात्रेचे जे प्रवासवर्णन लिहिले आहे, त्यात त्या म्हणतात, "हिमालयाची आठवण येताच मन मोहून जातं. हिमालयाबद्दल थोडं वाचलं होतं आण ऐकलं होतं परंतु अजूनपर्यंत हिमालयाचं

दर्शन घेण्याचा योग आला नव्हता, तो आला -

"एके दवशी पूज्य अधांनी सांगितले की, 'आपल्याला अमरनाथची यात्रा करायला जायचं आहे.' हे ऐकताच नजरेसमारे भव्य लिंगाकृती उभी राहिली! नंतर प्रयाणाचा दिवसपण उजाडला. दि. ९ ऑगस्ट १९५६ रोजी पूज्य अधा (करमसीभाई) मी, लालजीशेठ, पंजु आणि सूर्यकांत कोठारी, डॉ. कृष्णन, एक महाराज (स्वयंपाकी), रामा आणि आया (वरकाम करणारे) यांच्यासमवेत आम्ही मुंबई येथून पंजाब मेलने निघालो. रस्त्यात इटारसी, भोपाळ, ग्वाल्हेर, आग्रा आदी स्टेशने लागली. सर्वत्र ठिकठिकपणी हिरवीगार शेते दिसत होती. नद्या भेटत होत्या. भोपाळजवळ दूरवरचा साचीचा स्तूप दिसत होता. भोपाळ आणि ग्वाल्हेर या स्टेशनांवर नातेवाईक मंडळी आम्हांला भेटायला आली होती. दिल्लीला पोचलो त्या वेळी आमच्या गाडीला विलंब झालेला होता. त्यामुळे पुढची पठाणकोटची गाडी मिळाली नाही. म्हणून आम्ही दिल्लीला थांबलो. काश्मीरसाठी दोघांची परमिटस्पण काढायची होती. दिल्लीला थांबलो नसतो तर ही परमीटस् पठाणकोठला काढावी लागली असती.

दिल्लीत सकाळी पू. अधा आमच्या ओळखीचे श्री. रमणभाई ह्यांच्याबरोबर गेले. आम्ही कॅनॉट सर्कलवर जाऊन थोडी खरेदी केली. तिथून राजघाटला गेलो. महात्माजींच्या समाधीचे दर्शन घेतले. तिथे जवळच यमुना नदी वाहते. समाधीा परिसर स्वच्छ आणि शांत आहे. त्यानंतर आम्ही जुम्मा मस्जिद, कुतुबमिनार, इंद्रप्रस्थ वगैरे ठिकाणी गेलो. आमची गाडी रात्री ९ ला होती. ती पकडून आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता पठाणकोटला पोचलो. तिथून भाड्याची स्टेशनवॅगन घेतली. परंतु पाऊस खूप असल्याने बनिहाल घाटाचे रस्त बंद होते. म्हणून सायकल रिक्षाने पुढे गेलो. संध्याकाळी घाटाचा रस्ता चालू झाल्यावर जम्मूच्या दिशेने पुढे गेलो. वाटेत रावी नदी लागली. रावीचे पाणी हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशा दोन देशांत वाटले गेले आहे. लारवन गावापासून काश्मिरची हद्द सुरु होते. तिथे परमिट दाखवून पुढे गेलो. पावसामुळे नदी, नाले पाण्याने भरलेले होते. सुंदर रंगीत दगड छान दिसत होते. निसर्गसौंदर्य पहात पहात प्रवास चालला होता, परंतु रस्त्यात मोठमोठे खड्डे पडलेले असल्यामुळे खूप खबरदारी घ्यावी लागत होती. रस्त्यात एके ठिकाणी स्वयंपाक करुन जेवलो. वातावरण खूपच छान होतं. काही फोटोही काढले. मेघांनी झाकलेली पर्वतराणी रमणीय दिसत होती.

पठाणकोटहून जम्मू ६६ मैल आहे. एक हजार फूट उंचीवर आहे. रात्री जम्मूलाच थांबलो.

सकाळी जम्मूतील एका मोठ्या मंदिरात गेलो. तिथे पुष्कळ शाळिग्राम दिसले.

जम्मूहून बनिहाल १६६ मैल आहे. तिथं चिनाब नदी आहे. नदीवर झुलता पुल आहे. बनिहाल १२०० फूट उंचीवर आहे. बनिहालला संध्याकाळी पाच वाजता पोचलो. या

प्रवासात आम्ही कधी अडुसष्टशे फूट वर चढत होतो तर कधी दोन हजार दोनशे फूट खाली येत होतो. घाट चढायला अवघड व उंच आहे. खाली खोल दऱ्या दिसतात. समोर पर्वतामध्ये नद्या-नाले दिसतात. आज दाट धुकं असल्यामुळे रस्तेपण नीट दिसत नव्हते. ट्राफिक, रहदारी पण पुष्कळ होती. सहा वाजता आम्ही टनेल-बोगद्याजवळ आलो. त्यावेळी टनेलची दुरुस्ती चालली होती. हा बोगदा दोन फर्लांग लांबीचा आहे. त्यातून बाहेर पडलो तेव्हा थंडी जाणवू लागली. आम्ही गरम कपडे घातले. पुढे वेरनागला आलो. येथून झेलम नदीच्या खानबलला पोचलो. तिथे खूप मासे आहेत. पाणीपण खूप आहे. माशांना खायला टाकलं की ते सुळकांडी मारुन वर येतात. त्यांच्या बरोबर खेळायला खूप मजा येते. वाटेत डाळिंबाची झाडे भेटतात. जहांगीर म्हणतो, "स्वर्ग असेल तो इथेच !" फर, देवदार, चनारची झाडे भोवताली नजरेस पडत होती. इथेच एका बंगल्यात आम्ही थांबलो. या बंगल्याच्या जवळच शहाजहानचा बगीचा आहे. मत्स्यालय आहे. ते पाहून आम्ही अनंतनागला आलो. काश्मिर भाषेत बाग म्हणजे सरोवर आणि चष्मा म्हणजे झरा. अनंतनागच्या पुढे मार्तंड मंदिर आहे. अनंतनाग हे पहलगाम अंतर ४० मैलांचं आहे. तेवढा प्रवास करुन आम्ही पहेलगामला पोचलो. अमरनाथची यात्रा पहेलगाम येथूनच सुरु होते. इथेच वरती अमरनाथकडे जाण्याची सगळी व्यवस्था केली. पाऊस खूप होता.

सकाळी पहलगामहून निघालो. श्रावण पौर्णिमेला अमरनाथला पोहचण्याचा महिमा आहे. पौर्णिमेच्या दिवशी पूर्णाकरात शिवलिंगाचे दर्शन घडते, असे म्हटले जाते. परंतु तसे काही नाही.

दोन दिवसानंतर सकाळीच संघ रवाना होणार होता. म्हणून दोन दिवस आधीच यात्रेकरुंना वर जाण्याची मनाई करण्यात आली होती. कारण जेव्हा संघ वरती जात असे त्यावेळी यात्रेकरु खाली उतरत असत. ते सर्व समोरासमोर आले तर फारच अडचण होते. रस्ता फारच अरुंद आहे. पहिल्यांदा आम्हांला पण परवानगी मिळाली नाही. परंतु अधांच्यामुळे मिळाली.

पहेलगाममध्ये तिथल्या लहानशा बाजारातून फिरलो. थोड्या वस्तू खरेदी केल्या. वस्तूंच्या भावांबद्दल घासाघीस करावी लागते. म्हणजे मग व्यापाऱ्याने सांगितलेल्या भावापेक्षा तो तीच वस्तू निम्म्या दराने देतो. सव्वा रुपयाचा एक देखणा दगड भाव कमी करता करता साठ पैशाला मिळाला. तिथे लोक स्टोनला 'इस्टोन' म्हणतात. स शब्दाच्या आधी 'ई' शब्द लावून बोलतात.

सकाळी आमच्या नियमानुसार लवकरच उठलो. पूज्य अधा कितीही थंडी असली तरी आंघोळीशिवाय बाहेर निघत नाहीत. सकाळी आल्हाददायक असते. हिमालयाच्या हवेत असा एक गुण आहे की, माणूस कितीही थकलेला असला तरी सकाळी उठला की तो

ताजातवाना असतो. त्याचा थकवा रात्रीच्या झोपेतच संपून गेलेला असतो.

वरती जाण्यासाठी आदल्या दिवशी घोडी, खेचरे ठरवून ठेवली होती. परंतु ती वेळेवर आली नाहीत, वाट पहाण्यात फार वेळ गेला. उशीर झाला. त्यांना शोधायला बाजारात जावे लागले. जवळजवळ दोन वाजता ते सापडले. वरती जाण्यासाठी भाड्याने टेंट घेतले होते. सगळे सामान बांधण्यात आणखी एक तास गेला.

माझ्यासाठी डोली केली होती. ती चांगली मोठी आणि छत्रीची होती. डॉ. कृष्णन आणि लालजीशेठ यांच्यासाठी दोन घोडे ठरवले होते. एक घोडा जास्तीचा ठेवला होतो. बाकी कोणी घोड्यावर बसायला तयार नव्हते. हळूहळू यात्रा सुरु झाली. चढण चांगलीच होती. वाटेत क्रिसलॅण्ड आलं. पहेलगामहून चंदनवाडी नऊ हजार पाचशे पंचाण्णव फूट उंचीवर आणि आठ मैल अंतरावर आहे. चंदनवाडीजवळ बर्फाचा पूल येतो. त्यावरुन जावे लागते. आता तर चंदनवाडीपर्यंत मोटारीने जाता येते. रात्री ९ वाजता चंदनवाडीला पोचलो. रात्री तिथेच मुक्काम केला. तिथं राहण्याची सोय होती. दुकानेही होती. मोठमोठ्या पहाडातून आणि उंच उंच झाडातून वहात येणारी पंचतरणी नदी शेषनागहून निघून इथे वाहात होती. खडकावरुन तिला साथ द्यायला लहान-लहान झरे शर्यंत लावल्यासारखे, कोण पहिल्यादां पोहोचतो, अशा जोषात वहात होते. अशा वेळी आम्हीसुध्दा दुनियेतल्या सगळ्या कटकटी निसर्गाशी एकरुप झालो होतो.

थंडीच्या भीतीने सगळ्यांनी खूप गरम कपडे घातले होते. परंतु चालताना उकडायला लागले. अधा तर थोडं चालल्यावर फक्त पैरण घालूनच चंदनवाडीहून निघाले. दुबळे, बंदिस्त पण हुषार घोडा वळणाच्या वेळेस थोडा उभा राही आणि रस्ता बरोबर पाहून परत वळणावळणाच्या वाकड्यातिकड्या रस्त्यावरुन चालू लागे. रस्त्यात चढावर काही वेळा खाली उतरावे लागत होते. खाली दरीतले फुले पाहून मन मोहून जात होते.

पुढे फुटबॉल घाट आला. तो पिसुधारीसारखा नव्हता. एक वाजता शेषनाग येथे येऊन पोचलो. अधिकाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या जागेत उतरलो. शेषनाग हे खूपच सुदंर स्थळ आहे. त्याचं दुसरं नाव वावजन असं आहे. ते १२००० फूट उंचीवर आहे. खाली शेषनाग तलाव आहे. त्याचं पाणी निळ्या रंगाचं, खोल आणि स्थिर आहे. चारी बाजूंनी बर्फ वितळल्यामुळे शेषनाग तलाव बनला आहे. समोरच्या पहाडावर तीन शिखरे दिसतात. त्यांना ब्रह्मा, विष्णू आणि महेश असे म्हणतात.

आम्ही रात्री झोपलो तेव्हा अचानक मोठा आवाज झाला. तो लॅण्डस्लाइडचा होता. वरतून मोठ्या शिळा खाली पडतात आणि धरती धडधडून जाते. थंडी खूपच होती. पुष्कळ

गरम कपडे, हातापायात मोजे, डबल कानटोपी - तरी थंडी वाजतच होती. इथलं सृष्टिसौंदर्य काही वेगळंच होतं. दूरवर नजर टाकली असता उन्हात चकाकणारे बर्फाच्छादित पहाड दिसत, दुसरीकडे नजर टाकली तर उंच उंच पहाडावर उंच उंच झाडे दिसत. खाली नजर फिरवली की, फुलांचे सुंदर गालीचे दिसत. हिरव्या कापडावर रंगीबेरंगी दोऱ्यांनी जणू भरतकाम केलं आहे, असं वाटत होतं.

आज लवकरच झोपलो आणि लवकर उठून दुसरे दिवशी पंचतरणीला रवाना झालो. आठ मैल अंतर कापायला जवळजवळ पाच तास लागले. पंचतारणी खालच्या भागात आहे. तिथं पाच ठिकाणचं पाणी एकत्र येतं म्हणून गावाचं नाव पंचतरणी. तिथे थोडा वेळ थांबून पुढे नघालो. निघालो तेव्हा पाऊस नव्हता. परंतु थोडे अंतर कापले तोच मेघगर्जना सुरु झाली.पाऊसही पडू लागला. रस्ता मुळातच खराब होता. तो पावसामुळे आणखी खराब झाला. अरुंद रस्ता आणि उंच चढण यामुळे कसेतरी चढत गेलो.

चढण संपली आणि बर्फ दिसायला लागले. बर्फावर खूप उत्साहाने आम्ही सर्व चालत गेलो. अमरनाथ आठ मैल दूर होतं. तिथल्या गुंफांजवळ चार वाजता पोचलो. गुहेतच बर्फाचं शिवलिंग आहे. काही वेळा हे शिवलिंग मोठे वाटते, तर काही वेळा फारच लहान असते. आम्हांला कल्पनेपेक्षा फारच लहान आकारातील शिवलिंगांचं दर्शन झाले. त्यामुळे मन थोडे निराश बनले. परंतु कितीतरी दिवसांची आकांक्षा पूर्ण झाली, याचा आनंदही वाटला. आमच्या स्पेशल परमीटमुळे दर्शनाच्या वेळी दुसरे यात्रिक नव्हते. त्यामुळे खूपच शांतपणाने दर्शन घडले. तिथे कुणी राहत नाही. पुजारी होते. खूपच शांतपणाने पूजा केली. पुजाऱ्यांनी त्यांच्या भाषेत मंत्र म्हटले. या भागात मुस्लिम लोक बरेच आढळतात. खूप वर्षांपूर्वी त्यांनीच ही गुहा शोधली होती. गुहेत कबुतरंसुध्दा पाहिली. आम्ही गेलो तेव्हा तिथं राहात असणारे एक साधू भेटले. ते तिथं दोन वर्षांपासून राहात आहेत. वर्षाला पुरेल एवढे सामान जवळ ठेवतात. त्यंचे दर्शन घेतले. फोटोही काढले. नंतर साडेपाचला तिथून परत फिरलो. सात वाजण्याच्या सुमारास परत पंचतरणीला पोचलो. अतिशय थंडीमुळे बोलणं देखील सुचत नव्हतं. एका तंबूमध्ये झोपलो. एका तंबूत सामान ठेवले.

पंचतरणीहून दुसऱ्या दिवशी परतीच्या वाटेने निघालो. कालच्यापेक्षा पाऊस आज जोरात येत होता. रस्त्यातील चिखलामुळे चालायला जड जात होते. शेषनागला साडेबाराला पोचलो. तिथेच थोडे जेवलो. घोडेवाले आणि तट्टू यांना तिथं थांबायला सांगितले होते. परंतु ते पुढे निघून गेले होते. कारण त्यांना आणखी जास्त गिऱ्हाईक मिळण्याची आशा होती.

अधांनी सूर्यकांतकाकांना घोड्यावर बसायला सांगितले परंतु ते बसले नाहीत. म्हणून मग अधा स्वत: घोड्यावर बसले. सुखरुप पुढे निघून आले. बाकीचे पाचजण पायी चालत असल्याने मागे राहिले. ते मागे राहिले म्हणून अधांना त्यांच्याविषयी खूप काळजी वाटू लागली. लालजीशेठ तर, काही लोकं शेकोटी करुन बसले होते, तिथेच जाऊन बसले होते.

त्यांना खूप थंडी वाजत होती. अधा मागच्या लोकांना आणण्यासाठी घोडे कोठे मिळतील याचा तपास करीत शेकोटीजवळ गेले. तिथल्या लोकांनी सांगितले की असल्या खराब हवेत घोडे कुठेच मिळणार नाहीत. परंतु हे त्या माणसाचे वाक्य कानावर पडते न पडते तोच अधांनी मागे वळून पाहताच त्यांना चांगले दणदणीत असे दहा-पंधरा घोडे दिसले. अधांनी त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी मागच्या लोकांना घोड्यावरुन आणण्याची तयारी दाखविली. परंतु थोड्या वेळातच पाच माणसे येताना दिसली.

चंदनवाडीहूनच कोणी एक साधूमहाराज आमचयाबरोबर आले होते. दोन-तीन दिवस आमच्याबरोबर राहिले, पंरतु नंतर ते एकदम कुठे अदृश्य झाले ते कोणालाच कळले नाही.

सव्वाचारला शेषनागला बातमी कळली की काल रात्री तेथे खूप दंगल झाली, समोरच्या बर्फाच्या पहाडांपामधून भयंकार आवाज होऊन बर्फ खाली पडत होते.

सगळ्यांसह चंदनवाडीला पाच वाचता पोहोचलो. तिथं पुष्कळच तंबु उभारले होते. राहण्यासाठी जागा कुठेच नव्हती. पहिल्यांदा इथे थांबण्याचा विचार होता, परंतु मग तो रद्द केला. लवकरात लवकर खाली उतरुन जाणे योग्य वाटलं. तीन-चार हजार माणसं इथे होती. इथून आम्ही सर्व घोड्यांवर बसलो. त्यामुळे लवकर पोचण्याची शक्यता होती.

चंदनवाडीहून पुढे निघालो तेव्हा पहलगामचे यात्रिक समोरुन येत होते. पावसामुळे चिखल झाला होता आणि घसरण्याची भिती वाटत होती. जे लोक पायी चालत होते त्यांचे कपडे गुडघ्यापर्यंत चिखलाने भरत होते. चिखलात पाय फसत होते आणि महामुष्किलीने वर काढता येत होते. यात्रेकरुंची संख्या भरपूर होती. यात चार महिन्यांच्या मुलापासून ७० वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत होते. ते लोक एकमेकांचा हात पकडून श्रध्देचया जोरावरच पुढे जात होते. ईश्वरकृपेने आमची ही यात्रा सुखद आणि अनुभव संपन्न झाली. याचवेळी आम्ही कोल्हाई ग्लेशियरला सुध्दा गेलो होतो."

अमरनाथच्या दुसऱ्या यात्रेतील आठवण सांगताना करमसीभाई म्हणाले, "पहिल्या यात्रेच्या अनुभवावरुन असे लक्षात आले होते की, अमरनाथला जायचे तर यात्रेच्या वेळी किंवा यात्रेनंतर न जाता यात्रेच्या आधीच जाणे सोयीचे होते. कारण तोवर यात्रेची सर्व व्यवस्था झालेली असते. रस्तेही स्वच्छ रिकामे असतात. दुसऱ्या वेळी पहलगामहून निघताना पाऊस जोराने कोसळत होता. रस्ते चिखलाने भरुन गेले होते. आमचा हा प्रवास जाता-येता सुखावह झाला.

❖

हिमालयाच्या सावलीत
कैलास मानस सरोवर

शृङ्गोच्छ्रायै कुमुदविशदैर्यो वितत्य स्थित : खं
राशीभूत : प्रतिदिनमिव त्र्यम्बकस्याट्टहास : ।।

तो कैलास पर्वत आपल्या कमळांसारखा शुभ्र शिखरांनी आकाश व्यापून उभा आहे. जणू काही भगवान शंकरांचे राशीभूत झालेले - साठून राहिलेले अट्टहास्यच!

हिमालयाच्या सावलीत कैलास मानस सरोवर

हिमालयातील अमरनाथची दुर्घट यात्रा १९५६ मध्ये शिवकृपेने सुखरुप पार पडली होती आणि त्यानंतर ध्यास लागला होता, कैलास मानसरोवराच्या भेटीचा! या ध्यासातूनच करमसीभाईंनी २५ जुलै १९५८ रोजी आपल्या परिवारासह उत्तरेकडे हिमालयातील अतिभव्य अशा कैलास मानसरोवराच्या दिशेने प्रस्थान ठेवले.

'एक अविस्मरणीय यात्रा प्रसंग'- या शीर्षकाखाली सौ. लीला माधवजी कोटक यांनी 'लोहाणा सौरभ' च्या अंकात शब्दबद्ध केलेल्या लेखात लिहिले आहे. 'अमरनाथच्या यात्रेनंतर दोन वर्षांनी आम्ही कैलासयात्रेला प्रारंभ केला. पुरुषोत्तम मासासारखा श्रावण महिना, शुक्ल पक्षातील दशमी - २५ जुलै १९५८ हा दिवस आमच्या जीवनातील एक अविस्मरणीय दिवस म्हणून गणला जाईल. महाकाल भगवान श्रीशंकरांनी आमच्यावर कृपा केली आणि 'जय जय शिवशंकर' च्या जयजयकाराने पू. अधांच्या बरोबर फॅन्टीअर मेलने मुंबईहून इष्टमित्र व नातेवाईक मंडळींचा निरोप घेऊन निघालो. या यात्रेत अधांच्या बरोबर मी, माझी बहिण दिव्याबेन, डॉ. कृष्णन, पंडित देवेंद्र विजयजी, सूर्यकांतकाका, भगीरथप्रसाद वैद्यराज, दासकाका, सुब्रह्मण्यम, फोटोग्राफर भारद्वाज, चंद्रकांत खाता तसेच दोन महाराज आणि एक रामा असे एकूण चौदाजण होतो.

दि. २६ ला संध्याकाळी आम्ही मथुरेला पोचलो. महाराज्ञी जुमनाजींच्या सायंकाळच्या आरतीचे दर्शन घेतले. भगवान श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या आणि कोटी कोटी भारतीय लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या यमुनामातेला वंदन करुन आम्ही बरेल येथे जाण्यास निघालो.

बरेलीमध्ये श्री. रामावतारभाई आणि त्यांचे कुटुंबीय यांनी केलेले आमचे स्वागत आम्ही कधीच विसरणार नाही. बरेलीहून स्टेशनवॅगन आणि दुसऱ्या गाड्यांमधून तनकपूरकडे आम्ही रवाना झालो. वाटेत भारत सरकारने ५५ कोटी रुपये खर्च करुन बांधलेला 'शारदा' डॅम आम्ही पाहिला. आधुनिक भारताच्या नवीन तीर्थस्थळाच्या दर्शनाने

नव्या भारताच्या प्रगतीची कल्पना आली. खरी मजा शेतीभातीच्या नैसर्गिक सानिध्यात वावरणाऱ्या सारस पक्ष्यांना पाहून आली. तनकपूरला पोचलो तेव्हा पाऊस सुरु झाला. भयंकर पावसामुळे चिकट बनेलेल्या रस्त्यातून जाणे अवघड गेले. रस्त्यातील चिखलात गाडी जेव्हा फसली तेव्हा खाली उतरुन उचलून वर काढावी लागली. अशा खडतर प्रवासातून आम्ही चंपावटला पोचलो.

चंपावटला पोचलो तेव्हा संध्याकाळ व्हायला आली होती. पाऊस असल्यामुळे कुठे उतरावे हे ठरवू शकत नव्हतो. अशा वेळी एका शाळेच्या मुख्याध्यापकांनी आमची अडचण जाणून आम्हांला आपल्या घरी नेले. रात्री आम्ही त्यांच्याकडेच मुक्काम केला. सकाळी निघताना चुकून त्यांचा एक बिस्तरा आमच्या सामानात बांधला गेला. आमच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा दुसऱ्या दिवशी जाऊन तो आम्ही त्यांना परत केला. त्यांच्यापुढे दिलगिरी व्यक्त केली.

तेथून आम्ही पिठोरगढ येथे निघालो. रस्त्यात लॅण्डस्लाइड! मोठमोठाले पाषाण घसरुन रस्त्यात पडल्यामुळे रस्त्यातील वाहतूक ठप्प झाली होती. रस्ता साफ व्हायला बराच वेळ लागला, त्यामुळे २९ तारखेला आम्ही पिठोरागढला पोचलो.

पिठोरगढची एक सुखद स्मृती आमच्या मनात कायमची रेंगाळत राहिली आहे, ती म्हणजे तिथल्या निरागस, निष्पाप बालकांची. गुबगुबीत गोरी आणि गुलाबी गालांची बालके, त्यांचे कुतुहलपूर्ण निर्मल डोळे - आम्ही पहाताच राहिलो! विश्वासाचे वातावरण निर्माण होताच ती बालके आमच्याजवळ गोळा झाली. गोळ्या, चॉकलेट, फुगे ह्यांच्यासारख्या मनपसंत वस्तू आमच्याकडून मिळताच त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. पिठोरगढहून आमची खरी यात्रा सुरु झाली. सगळ्या सामानासाठी आणि प्रवासासाठी एकंदर ३६ घोडे व चार दंडी बरोबर घेऊन आम्ही दि. ३१ ला पुढे निघालो आणि वाटेत दाट धुक्यातून वाट काढत काढत तीन हजार फूट उंचीवरच्या आस्कोट नावाच्या स्थळी येऊन पोचलो.

आस्कोटहून पुढे आम्ही गौरीगंगा आणि कालिगंगा यांच्या जलजीभी नामक संगमस्थानी पोचलो. तिथून थोडे पुढे जात असताना खूप उंचीवरुन खाली येणाऱ्या गौरीगंगेचा प्रवाह आम्ही पहिला आणि तिथेच सर्वांनी आंघोळ करुन घेतली. अधा तर रस्त्यात दिसणाऱ्या झऱ्यात आणि धारेत आंघोळ करीत असत.

त्यानंतर आम्ही धारचुराला पोचलो. तिथे कैलास यात्रेहून परत फिरलेले श्रीस्वामीजी आणि प्रवीणभाई नानावटी यांच्याबरोबर मुलाखत झाली. तिथून तवाघाटला पोचलो. तवाघाटहून वरती नऊ हजार फूट उंचीवर श्रीनारायणस्वामींनी स्थापन केलेला आश्रम आम्ही पाहिला. विविधरंगी फुलांनी सफरचंदांनी लहडलेला स्वच्छ आणि शांत आश्रम-परिसर फारच आल्हादक वाटला.

एवढ्या उंचीवर श्रीस्वामी नारायणांनी स्थापन केलेला आश्रम म्हणजे एक कलात्मक भव्य मंदिर आहे. तितकेच भव्य म्युझियम आणि ग्रंथालय तिथे आहे. स्वामीजींचे निर्वाण १९५६ मध्ये झाले. पहाडी प्रदेशात आपल्या संस्कृतीचे वारसारुप प्रतीक स्थापन करुन ते गेले. त्यांनी या परिसरात भजन-कीर्तनाद्वारा भक्तिभावाचा खूपच प्रचार केला. आजूबाजूच्या खेडुतांना 'नारायण' असे म्हणायला शिकवले. आस्कोट येथे त्यांनी एक कॉलेज काढले, नंतर ते शासनाकडे सुपूर्द केले.

ह्या आश्रमाच्या शांत आणि आल्हादक वातावरणात आम्ही दोन दिवस राहिलो. भजन-कीर्तन केले.

नंतर आम्ही जणू सुंदर गालिचा असलेल्या सिरधा नावाच्या गावी पोचलो. श्रीनारायणस्वामींचे एक शिष्य किकुभाई हे आमच्याबरोबर आले. आम्ही पुढे प्रयाण केले. सिरधा गाव सोडून आम्ही तीन मैलांची चढण चढून गरबँग नावाच्या गावी पोचलो. गरबँग हे गाव एक हजार फूट उंचीवर आहे. भारतीय सरहद्दीवरील हे शेवटचे गाव आहे. या वाटेवरच आम्हांला गरबँगचे हुकूसिंग भेटले ते आमच्याबरोबर श्रीकैलासचे मार्गदर्शक म्हणून येणार होते.

गरबँग आता काही वर्षांपासून खाली बसत चाललं आहे. पहाडी प्रदेशातील 'याक' नावाचा पशू आम्ही पाहिले. येथून सामान वाहायला आणि सवारीसाठी याक कामाला येणार होते. आमचे गाईड हुकूमसिंग यांच्या कन्येच्या भुटिया वेशातील फोटो भारद्वाज फोटोग्राफरने तेथील स्मरण चिरस्थायी करण्यासाठी घेतला.

गरबँगहून हुकूमसिंग आणि किंशखंबाने यांना मार्गदर्शक म्हणून बरोबर घेऊन आम्ही पुढे निघालो.

पुढे जाताना कालापानीचा रस्ता खुपच खराब लागला. दंडीवाल्यांचे पाय घसरत होते. तिथली थंडीही असह्य होती. चेकपोस्ट असल्यामुळे थोडी मिलिटरीची माणसे दिसली. बाकी त्यांच्याशिवाय तिथे दुसरे कोणीच नव्हते.

तेथून उंच उंच पहाड आणि हिमनद्या ओलांडत १७५०० फूट उंचीवर असलेल्या शांगचुंग येथे पोचलो. शांगचुंगहून तकलाकोटच्या रस्त्यात खूपच उंचीवर असलेल्या भारतीय हद्दीच्या अंतीर वैराण प्रदेशात लिपूलेक येथे येऊन पोचलो. हा रस्ता निसरडा पहाडी आणि जंगलांनी वेढलेला होता. पायी चालत असताना मधे जर शेळ्या, मेंढ्या भेटल्या तर पाय सटकून सरळ नदीत पडण्याची भीती होती.

आता त्यानंतरचा प्रदेश म्हणजे तिबेटचा प्रदेश ! सपाट आणि सरळ असा प्रदेश. क्वचित एखादी टेकडी दिसते. येथून पर्वतांची उंच उंच शिखरे नजरेस पडत होती. दूरवरच्या कैलासच्या शिखरांचे दर्शन घेताना, कोण जाणे कशी, पण शालेय जीवनात वाचलेली उमाशंकरजींच्या कवितेतील ओळींची आठवण झाली.

लिपूलेकहून पुढे आम्ही १५ ऑगस्टला, तिबेटमधला पहिला मुक्काम, कलीकोट येथे केला. तिबेटमधले हे मोठे व्यापारी-गांव. तेथे कोणालाही घर बांधायची परवानगी नाही. भारतातील व्यापारी येथे व्यापार करायला जातात तेव्हा ते तंबू ठोकून राहतात. व्यापारात लाखो रुपयांची देवाण घेवाण करतात.

इथल्या हिरव्या रानात आम्ही मध, वाटाणे आण बटाटे यांचा आस्वाद घेतला. दुपारी खरेदीसाठी निघालो आणि एक नवीन अनुभव आला :

हा अनुभव म्हणजे एक नवीन आपत्तीत ओढवली होती. चीनने तिबेटवर आक्रमण केल्याचा तो काळ होता. तिबेटमध्ये रस्ते बांधण्याचे काम चीनने मोठ्या धडाक्याने चालवले होते. त्यासाठी सामान भरलेल्या ट्रक्सची वाहतुकही जोरात चालली होती. आम्हांला पाहून त्यांना शंका आली, आमच्यापैकी खाता आण भारद्वाज यांच्या गळ्यात कॅमेरे आणि बायनाक्युलर होते. त्यामुळे आम्ही गुप्तहेर असू अशी शंका चिनी ऑफिसरांना आली. त्यांनी आमचे सगळे सामान तपासून पाहिले. रेडिओ सेट विस्कटून टाकला. आमच्या तंबूची झडती घेतली. सगळे बायनाक्युलर्स, मुव्ही कॅमेरे ताब्यात घेतले. रात्री दोन वाजेपर्यंत बोलणी चालली आणि परत सकाळी भेटायचे ठरले.

या दरम्यान आमच्या ग्रुपमध्ये दोन विभाग झाले होते. अधा आणि भारद्वाज तकलाकोटहून दहा मैलांवर असलेल्या कोचननाथला गेले. आमच्या तंबूत मी आणि दिव्याबेन एकट्याच होतो. प्रदेश एकदम नवीन, त्यामुळे चिंता वाटत होती. त्यातून अधाही अजूनपर्यंत आले नव्हते. त्यांचीही चिंता वाटत होती. स्त्री आहे का पुरुष, हे सुध्दा ओळखता येणार नाही असे लांब-लांब केस असलेले उंच, जड बूट घातलेले, कमरेला खंजीर अडकवलेले तिबेटी लोक राहून-राहून आमच्या तंबूची पाहणी करुन जात होते. आम्ही देवाचा धावा करत होतो. रात्र कशीतरी घालवली. सकाळी अधा आणि दुसऱ्या गुप्रमधील मंडळी पाहल्यानंतर हायसे वाटले.

सकाळच्या चर्चेतून चिनी अधिकाऱ्यांनी आम्हांला पुढील अटी घातल्या : १) ज्या रस्त्याने आम्ही भारतातून आलो आहोत त्या रस्त्यानेच परत जायचे. २) मुव्ही कॅमेरा आणि बायनाक्युलर या वस्तू बरोबर न्यायच्या नाहीत. ३) दर्शनासाठी गेलात तर फक्त दर्शन करुनच परत फिरायचे. दुसरे काही करायचे नाही.

२० ऑगस्टला झालेल्या वाटाघाटींमध्ये शेवटी असे ठरले की-

१) भारतात परत जाताना कोणत्याही रस्त्याने परत जाता येईल.

२) मुव्ही कॅमेरा भारताता परत पाठवून द्यावा व स्टिल कॅमेऱ्याने फक्त तीन स्थळांचे फोटो काढायचे.

३) दर्शनासाठी जाताना बरोबर दुसऱ्या कोणत्याही गोष्टी करण्याचा प्रश्न नव्हता.

आमच्याबरोबर असलेल्या चारही मुव्ही पॅक करुन धारचुला-गरबँगमध्ये तिथले प्रतिष्ठित व्यापारी मोहनसंग यांच्या मार्फत भारतात परत पाठवून द्यायचे ठरले. तथापि दासकाका आणि भारद्वाज यांच्या मनात कलीने प्रवेश केला. ते आपसांत कुजबुजत होते की, आपल्याकडे सामानाचे १२५ डाग आहेत. आपण जर मुव्हीचे भाग वेगळे करुन एकेका डागात तो घुसडला तर दुसऱ्या कोणाला कळणार नाही. तरकोटीची हद्द संपल्यावर आपण मुव्हीचा परत उपयोग करु शकू. चारातील तीन मुव्ही भारतात परत पाठवायच्या आण एक मुव्ही अशा रीतीने वापरासाठी न्यावयाचा.

काही कारणास्तव अधा तंबूच्या बाहेर गेले आणि ह्या बेताची चाहूल जेव्हा त्यांना लागली तेव्हा त्या दोघांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. अधांना शंका आली आणि त्यांनी आवाज चढवून 'काय चाललंय?' असे जेव्हा विचारले तेव्हा दासकाका व भारद्वाज ह्या दोघांनी आपल्या योजनेची कबुली दिली. ती ऐकल्यावर अधांनी त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले, 'असे कधीच होणार नाही. आपण ठरल्याप्रमाणेच वागले पाहिजे. भारतातले लोक सच्चे आणि प्रामाणिक आहेत असेच त्यांना वाटेल असे आपले वर्तन असले पाहिजे. आपण त्यांना शब्द दिला आहे तो पाळलाच पाहिजे!'

अधांनी असे खडसावून सांगितल्यावर सकाळी आमच्याकडील चारीही मुव्ही पॅक करुन सील लावून त्यांनी मोहनसिंग यांच्याकडे सुपूर्त केल्या.

सकाळी तिथून निघताना चिनी ऑफिसर हातात चाबूक घेऊन एकदम रागाने आमच्याकडे पहात उभे असलेले दिसले. कारण कोणीतरी बाहेरच्या एका व्यक्तीने अशी अफवा पसरवली होती की, हे लोक एका माणसाच्या शोधात आहेत आणि तो माणूस भल्या पहाटेच भारतात पळून गेला आहे. आम्ही त्यांना सांगितले, आमचे नोकर पुढे गेले आहेत. त्यांनी विचारले की, मुव्ही कोठे आहेत? आम्ही त्यांना सांगितले की त्या सील करुन ठरल्याप्रमाणे मोहनसिंग यांच्याकडे दिल्या आहेत. परंतु त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी सील तोडून जेव्हा चारही मुव्ही पाहिल्या तेव्हा त्यांचे समाधान झाले.

आम्ही ईश्वराचे आभार मानले. अधा जर रात्री उठलने नसते आणि दासकाका व भारद्वाज यांनी आपली योजना अमलात आणली असती तर आम्ही चिनी अधिकाऱ्यांच्या हाती सापडलो असतो. मग आमचे कसे हाल झाले असते याची कल्पानाच करवत नाही.

नवीन प्रदेशात तिथली भाषा कळत नाही आणि त्यामुळे एक विचित्र अनुभव येतो. तिबेटमधे पहाडी बकऱ्यांची एक जात आहे. त्यांना 'चोर' म्हणून ओळखले जाते. त्यांचे वैशिष्टय असे की ते संबंध रस्ता अडवून सरळ रांगेत चालत असतात आण म्हणून तेथे सांगण्यात येते की, 'चोरांपासून सावध रहा.' म्हणून आमचे संरक्षक भारवाही लोक

चोरांपासून रक्षण करण्यासाठी सतत बंदूक घेऊन तयार असायचे. शेवटी आम्हांला चोराचा अर्थ कळला, तेव्हा हसूच आले!

तिबेटी लोक बसता-उठता चालता-बोलता काही ना काही काम करत असताना दिसतात. सतत विणत असतात, नाहीतर टोपल्या करत असतात. त्यांची चहा बनवण्याची पध्दतही वेगळी आहे. चहात लोणी टाकून ते चहा पौष्टिक बनवतात. दर एक कुटुंबामधील एक मुलगा साधू बनतो आणि पूर्ण दिवस मंत्रजप करत असतो. मोठ-मोठ्या मठांत हस्तलिखित ग्रंथ असतात. तिथेच शेकडो साधू राहतात. सबंध दिवस विविध शास्त्रांचे वाचन करीत असतात अथवा जप करीत राहतात.'ओम भनी पद्मणी हम' हा मंत्र खास करुन जपत असतात. कागदावर हा मंत्र लिहून फिरकीत टाकतात. जितक्या वेळेस ती फिरकी फिरते तितक्या वेळेस त्या मंत्राचा गुणाकार करुन तितका त्याचा मंत्र झाला अशी त्यांची श्रध्दा आहे. अशा पुष्कळ फिरक्या तिथं रांगेत लावलेल्या असतात.

तकलाकोटमध्ये आठशे वर्षांचे जुने सात मजली बांधलेले 'लामा गुप्पा' - म्हणजे मंदिर आम्ही पाहिले. सुवर्णाच्या पत्र्याने बनवलेल्या बुध्दाच्या विशाल प्रतिमेचे दर्शन घेतले. सहासष्ट वर्षांच्या धर्मगुरू लामाने आम्हांला पिवळे वस्त्र प्रसाद म्हणून दिले.

तिबेट हा उंचीवर सपाट, उंच झाडांनी आणि जंगलांनी व्याप्त असा प्रदेश आहे. निसर्गाने याला काटेरी झुडुपांची भेट दिली आहे. ती झुडपं ओली असली तरी कापरासारखी पेटतात आण सरपण म्हणून उपयोगी पडतात.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिथले 'विंचवाचे झाड'. त्या झाडाला स्पर्श होताच विंचू चावल्यावर जशी वेदना होते तशी वेदना होती आणि त्यांतल्या त्यांत ओला हात लागला तर हजारो विंचू डसल्याच्या वेदना होतात.

सिकांगची सपाट आणि विशाल भूमी ओलांडून सोळा हजार फूट उंचीवर असलेल्या गुर्ला गुंपा येथे पोहोचलो. तिथून राक्षसतल व कैलासच्या हिमशिखरांचे दर्शन व्हायला लागले. चौऱ्याहत्तर मैलांचा विशाल घेर असलेले राक्षसतल सरोवर खूपच खोल आहे. त्याचे पाणी इतके स्वच्छ आणि पारदर्शक आहे की कितीतरी फूट खोल असलेले रंगीबेरंगी दगड अगदी स्पष्ट दिसतात. परंतु ह्या सरोवरला कुठलातरी शाप असावा, कारण ह्याचं पाणी कोणीच पिऊ शकत नाही. तिथल्या लोकांचा असा समज आहे की, हे पाणी प्याल्याने जलोदर होते.

पहाडाच्या दोन्ही बाजूंना दोन तलाव आहेत. डाव्या बाजूला राक्षसतल आणि उजव्या बाजूस मानसरोवर. राक्षसतलहून मानसरोवरच्या काठी आम्ही गेलो. छप्पन मैलांचा घेर असलेल्या मानसरोवरावर आम्ही जाऊन पोहोचलो. शास्त्री, भक्तजन, साधू, ऋषीमुनी या सरोवराचे मुक्त कंठाने गुणगान गातात. या सरोरवराजवळ पोहोचल्यावर आम्ही सुध्दा

परमेश्वराचे आभार मानले.

मानसरोवरच्या अलौकिक सौंदर्याने आम्हा सर्वांना आश्चर्यचकित करुन टाकले. त्या खोल, शांत, पारदर्शक सरोवरात आम्ही सर्वांनी स्नान केले. अधा आणि भगीरथप्रसाद यांनी पूजा आणि पितृतर्पण वगैरे विधी केले.

मानसरोवरामधून ब्रह्मपुत्रा आणि सिंधू ह्यांच्यासारख्या विशाल नद्यांचा उगम होतो. दोन्ही नद्या समोरासमोरच्या दिशेने वाहतात. ह्या सरोवराला प्रणाम करुन आम्ही आमच्या यात्रेचा पहिला भाग पूर्ण केला आणि दुसऱ्यासाठी पुढे रवाना झालो.

मुंबईहून निघाल्यानंतर बरोबर एक महिनयाने आम्ही कैलास यात्रेचा श्रीगणेशा केला. दारवीनहून कैलास प्रवास म्हणजे चोवीस मैलांची प्रदक्षिणा आहे. रस्त्यात आम्ही सिक्कीमच्या राजाराणीला भेटलो.

२६ ऑगस्ट रोजी आम्ही आमच्या या महत्वाच्या यात्रेचा शुभारंभ केला होता. देवाचे नामस्मरण करीत रस्त्यातील शिळा ओलांडून २७ ऑगस्टला, संध्याकाळी १९ हजार फूट उंचीवर असलेल्या 'हिराकुमगुम्पा' येथे पोहोचलो. श्रीकैलासचे दर्शन आता जवळून व्हायला लागले. २८ ऑगस्टला सुप्रभाती आम्ही हळूहळू पहाड चढायला लागलो. सर्वांत उंचीवर जाऊन भगवान शंकराचे दर्शन घेण्यासाठी मन अधीर झाले होते. प्रेरणाशक्तीच्या आधाराने अधा आमच्या कितीतरी पुढे निघून गेले होते.

कैलासच्या पवित्र धरतीवर जणू काही शेकडो शिवगण एकसारख्या बर्फाच्या छावणीत गोळा झाले आहेत असा भास डाव्या बाजूकडील दऱ्या न्याहाळताना झाला. उंचीवर हवा विरळ असल्यामुळे सगळ्यांनाच चालणे अवघड जात होते. प्रत्येकजण आपआपल्या मानसिक कल्पनेप्रमाणे आणि भावनेप्रमाणे त्या शुभ्र बर्फाचे दृश्य पाहण्यात गढून गेले होते. एकदा तर एक कैलासशृंगामध्ये महात्मा गांधींसारखी आकृती भासमान झाली होती.

सकाळी ९ वाजता डॉलमा ओलांडून १८,४०० फूट उंचीवर असलेल्या गौरीकुंडावर आम्ही पोहोचलो. ह्या कुंडात जगज्जननी माता पार्वती देवी स्नान करीत होत्या अशी आख्यायिका आहे. त्या कुंडात स्नान करण्याचे सद्भाग्य आम्हांलाही लाभले. उंचीवर असल्यामुळे ह्या ठिकाणी हवा विरळ होती व त्यामुळे श्वासोच्छ्वासास त्रास होत होता. तरीसुध्दा आम्ही भगवान शंकरांच्या प्रेरणेने पुढे चालण्याचा प्रयत्न करीत होतो. येथे आम्ही खूप लठ्ठ, काळ्या रंगाचे आणि लाल पाय आणि लाल चोच असलेले कावळे पाहिले, त्याशिवाय तिथे आम्हांला एकही पक्षी किंवा मनुष्य आढळला नाही.

श्रावण शुक्ल पौर्णिमेला आम्ही कैलासाच्या चरणाचे दर्शन घेतले. हा भाग्यदिवसच होता! राखीपौर्णिमा असल्यामुळे शास्त्राप्रमाणे नवीन यज्ञोपवित धारण करण्याचा विधी तिथे

भगवान शंकरांच्या सान्निध्यातच संपन्न केला.

आमच्या कैलासयात्रेचा शेवटचा दिवस दि. २१ ऑगस्टला दारचिनमध्ये घालवला. मंचूच्या रस्त्याने दारचिनला पोहोचलो. ऊनी लोकर आण अन्य वस्तू यांचे हे व्यापारी ठिकाण आहे. तिथे आम्ही खरेदी केली व पुढे निघालो. सुमानधीन येथे पोहोचेपर्यंत पाण्याची तंगी भासली. पाणी खूपच थंड आणि गारठून गेलेले होते. त्यामुळे अंघोळ कशी करणार? ह्या पाण्याच्या तंगीने आम्हांला संयम शिकवला. कितीतरी वेळा आमच्याबरोबर जो नाश्ता होता त्यावरच आम्ही भागवून घेतले.

गोकुळअष्टमीच्या दिवशी एक भयानक प्रसंग घडला. शिवचिलममध्ये आम्ही मृत्यूमुखातून वाचलो. एका रांगेत चालण्याच्या जब्बुवरुन एका युवकाने रॉकेलच्या डब्यावर दगड मारला. सगळे जब्बु असे घाबरले की ते सर्व सामान सोडून पळायला लागले. सगळीकडे सामान पांगले. पापडाचा डबा उघडला गेला आणि पापड वाऱ्यावर उडाले. साक्षात यमराजाचं रुप धारण करुन आलेल्या जब्बूपासून वाचण्यासाठी आम्ही पण पळायला सुरुवात केली. जेथे रक्षण मिळेल तेथे आम्ही धावलो. थोड्याच वेळात तेथे हाहाकार माजला. नंतर भय टळले तेव्हा हसायला आले.

हा एक नवीन अनुभव होता. जब्बू आम्हांला निर्जन स्थानी एकटं टाकून निघून गेले. मजूर लोक आमच्याबरोबर ठाकर गावापर्यंत होते. नंतर आम्ही दुसरे मजूर घेणार होतो. दोन दिवसांच्या वाटाघाटीनंतर त्यांना सगळे पैसे आधी द्यावयाचे आणि साडेतीन दिवसांनी निती या गावी ते पोचतील असे ठरले होते. पैसे अगोदर दिले, पण ते लोक भारी निघाले! दुपारी थोडे अंतर कापून, दिवस संपला असे म्हणाले निती अजून वीस-बावीस मैल लांब असतानाच ते म्हणू लागले, 'साडेतीन दिवस झाले, आम्ही जातो.' ते गेले. सामान टाकून गेले. आम्ही मग दंडीवाल्यांना तयार केले. अधा, सुब्रह्मण्यम, दिव्या आणि मी असे आम्ही चौघेजण नितीकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो. खिशात फुटाणे भरले. हातात बॅटरी घेतली आणि मार्गदर्शकाशिवाय चालत राहिलो. सूर्यकान्तकाका आधीच घोडे आणि मजूर यांना घेऊन निघाले होते. जात असताना दुरुन कुत्र्यांच्या भुंकण्याचे आवाज ऐकू येत होते. चुकून जर त्या रस्त्याने गेलो तर फाडूनच खाणार अशी भीती. तशाच बॅटरीचे सेल पण संपले. अशा घनघोर रात्री आम्ही रामनाम घेत चाललो होतो.

ज्या रस्त्याने सूर्यकान्तकाका गेले त्या रस्त्यावर आपल्या देशाची पोलीस-चौकी होती. परंतु थंडीच्या दिवसांत ती उठवली जाई; आणि त्याचाच लाभ घेऊन चिनी लोक त्यांची पोलिस-चौकी बसवत.

रात्र पडली होती. कडक थंडीत रात्र कशी घालवायची, अशा विचारांत होतो. तेवढ्यात दूरवर कुठेतरी बत्ती दिसली. आशेचा किरण प्रकटला. उत्साह आला आणि

आम्ही चालण्याचा वेग वाढवला.

भारतातले व्यापारी चार महिने तिबेटला लोकरीची खरेदी करायला जात असतात. त्यांतल्या एका व्यापाऱ्याने त्याच्या काफिल्याबरोबर अर्ध्या तासापूर्वीच तंबू ठोकून मुक्काम केला होता. त्यांना भेटलो व नितीचा रस्ता दाखवायला एखादा माणूस बरोबर द्यायची विनंती केली. त्यांनी सांगितले की रस्ता खूप बिकट आहे, म्हणून उद्या जाण्याची काहीतरी व्यवस्था करु. त्यांनी आम्हांला गोड भोजन दिलं आणि स्वत:च्या तंबूतच राहण्याची सोय केली. तंबू लोकरीने भरलेला होता त्यामुळे थंडी वाजली नाही.

सकाळी लवकर उठून नितीला जाण्यास निघालो. रस्त्यात आमचे मजूर आणि घोडे भेटले. निती हे भारतीय हद्दीवरचे शेवटचे गाव. आम्ही तिथे पोहोचलो.

दि. २६ ऑगस्टला सकाळी आम्ही निती येथील चेकपोस्टच्या ऑफिसरला भेटलो. ते खूप भले सद्‌गृहस्थ होते. त्यांनी आम्हांला आग्रहाने चहापाणी दिले. नंतर पुढे निघालो. रस्त्यांत पावसाचे चिन्ह दिसताच जेलम येथे थांबलो. तिथले कर्मचारी फारच भले होते. त्यांनी आमच्यासाठी गाद्या, भांडी, धान्य वगैरेची व्यवस्था करुन दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून, लाटणे नसल्याने एका लाकडाच्या फळीवर काठीने लाटलेले पराठे आणि बेसन करुन जेवलो. ते जेवण आम्हांला अमृतासारखे वाटले. त्या जेवणाच्या चवीची आठवण आजही अधांना आहे.

जेलमहून संध्याकाळी एका गावाला पोचलो. तेथून तपोवन मधल्या रस्त्याने तीन मैल आणि नव्या सडकेने आठ मैल होते. तपोवनपासून जोशीमठ हे स्थळ आणखी आठ मैलांवर होते. मुंबईून पूज्य बा - मातोश्री साकरबेन, भाई, भाभी, सावित्रीबेनच्या सासूबाई वगैरे पंचवीसजण तेथे अकरा वाजेपर्यंत पोहोचणार होते. तसा आम्हांला त्यांचा निरोप मिळाला होता. म्हणून त्यांच्यापेक्षा थोडे लवकर पोचायला पाहिजे होते. परंतु त्या गावाहून पुढे जायला दंडीवाल्या मजुरांनी नकार दिला. संध्याकाळ झाली होती आणि ते लोक थकून गेले होते. म्हणून अधा, सुब्रह्मण्यम, दिव्या व मी असे चौघजण मधल्या जवळच्या रस्त्याने तपोवनकडे निघलो. बरोबर दोन बॅटऱ्या घेतल्या. पण घाईत बॅटरीचे सेल बदलायचे राहिले. चुकून मधल्या रस्त्याच्या ऐवजी नव्या सडकेनेच निघालो. रात्रीची वेळ, बॅटऱ्या निकामी, कुठे पाय घसरला तर काय होईल अशी भिती ! पण प्रभुकृपेने रात्री दहा वाजता आम्ही तपोवनला पोहोचलो. तिथे पोचल्यावर पाहिले तर घरांना कुलुपे लावलेली होती. एका दुकानात मात्र दिवा दिसला. बाहेरुन कुलूप होते. पण जाळीच्या दरवाजातून पाहिले तेव्हा एक माणूस खाटेवर झोपलेला दिसला. त्याला उठवले आणि रात्रभर राहण्यासाठी जागा देण्याची विनंती केली. तोही बाहेरुन आलेला पाहुणा होता. तो म्हणाला, 'या गावात लोक दिवसा व्यापार करायला येतात आणि रात्री घरांना कुलुपं लावून दूरच्या गावांना निघून जातात. आता ते सकाळी येऊन कुलुपं उघडतील.'

रात्र कुठे घालवायची या चिंतेत आम्ही होतो. त्याचा सल्ला घेतला. त्याने सांगितले, 'समोरच्या रस्त्याने दुसऱ्या भागाला जा. टेकडीच्या तळवटीत लोकल बोर्डाचा बंगला आहे. तेथे कदाचित जागा मिळेल.' तो बाहेर येऊन रस्ता दाखवू शकत नव्हता.

खाली नजर फिरवली तेव्हा दोन-तीनजण बॅटरीच्या प्रकाशात फिरताना दिसले. त्यांना आमची परिस्थिती सांगितली. बॅटरीच्या प्रकाशात खाली उतरलो. त्यांनी दोन गोष्टी सांगितल्या. एक तर तो मक्याच्या पैदाशीचा हंगाम होता. त्या प्रदेशात अस्वले भरपूर असतात. अस्वले रात्री मका खायला बाहेर पडतात आणि माणसाला पाहिल्यावर त्याच्यावर हल्ला करतात. उभे राहून माणसाच्या तोंडाचा डावा भाग, डोळ्यांखालचा भाग फाडून टाकतात. दुसरे म्हणजे ते दर महिन्याला निरीक्षणासाठी इथे येत असतात. ते सरकारी ऑफिसर होते. थंडी खूप आणि वस्ती बिलकूल नाही. म्हणून मग रात्रभर गप्पा मारत बसतात. दिवसा झोपतात आणि रात्री फिरायला निघतात. ईश्वरकृपेने त्यांची भेट झाली. त्यांनी आम्हांला आसरा दिला. आमच्याबरोबर थोडा चिवडा होता, तो आम्ही सगळ्यांनी खाल्ला. त्यांनी आम्हांला पाणी दिले ते प्यालो. आम्ही उपाशी आहोत हे त्यांना आम्ही न सांगताच समजले. तेव्हा त्यांनी त्यांच्या ओळखीचा एक सोनार तिथे राहत होता त्याला घर उघडायला लावले. त्याच्याकडून डाळ-तांदूळ आणले. आमच्यासाठी शेजारच्या एका खोलीत खिचडी केली आणि रात्री १२ वाजता आम्हांला सांगितले, की स्वयंपाक तयार आहे. त्यांच्यामधील ह्या माणुसकीच्या ओलाव्याने आम्ही प्रभावित झालो.

दि. १८ सप्टेंबरला प्रात:काळी नालकुंडामध्ये आंघोळ केली आणि जोशी मठाकडे जाण्यासाठी तयार झालो. दुपारी १२.३० वाजता जोशीमठला पोहोचलो. मुंबईहून आलेली मंडळी आमच्या आधीच तिथे पोचली होती. यात्रेच्या सुरुवातीनंतर बरोबर पावणेदोन महिन्यांनी आम्ही सर्व कुटुंबीय मंडळी एकमेकांना भेटत होतो. हर्ष-आनंदाची ती मंगल वेळ होती!

या भेटीच्या प्रारंभी पू.अधांना त्यांची वाढलेली दाढी आणि त्यांनी घातलेली कानटोपी यांमुळे कोणीच ओळखू शकले नाही. इतकेच नव्हे तर पूज्य बाईदेखील ओळखू शकल्या नाहीत. सगळे विचारायला लागले की, 'अधा कुठे आहेत?'... सगळ्यांच्या नजरा शोध घेत होत्या आणि मग दाढीवाल्या कानटोपीतल्या अधांची ओळख पटली तेव्हा हास्यकल्लोळच उडाला. दिव्या आणि मी सुध्दा बरचसं वजन वाढवून आलो होतो आणि त्यातही स्लॅक्स घातल्यामुळे आम्हा दोघींना पाहून हास्याला आणखीनच भरती आली.

मुंबईहून पंचवीस मंडळी सहभागी झाल्याने आम्ही आता चाळीस जण झालो होतो. जोशी मठातून पुढे आम्ही सगळे बद्रीकेदार, गंगोत्री, जमनोत्री अशी चारी धाम यात्रा

करण्यासाठी निघालो. काही जण म्हणाले होते, कैलासच्या यात्रेनंतर चार धामची यात्रा होऊ शकणार नाही. परंतु अधा म्हणाले, 'देवाच्या मनात असेल तसे होईल!' त्यांची ईश्वरनिष्ठा, अढळ श्रध्दा, साहसपूर्ण निर्भय स्वभाव यांमुळे काहीच अडचण न येता आम्ही चारी धामची यात्रा पूर्ण केली.

दि. २८ ऑक्टोबरला आम्ही सर्वजण मुंबईला सुखरुप पोहोचलो."

करमसीभाईंनी एका श्रध्देने व निष्ठेने हिमालयाशी जवळीक साधून जे निरीक्षण केले होते त्याची जाण श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या राजकीय नेत्यांनीही अचूक ठेवली होती. तिबेट प्रवासाच्या वेळी चीनने चालवलेली आक्रमणाची तयारी करमसीभाईंच्या नजरेतून सुटलेली नव्हती. त्यांना त्याचा अनुभवही मिळाला होता. त्यातून त्यांच्या मनी स्वदेश प्रेमामुळे मोठी चिंता उद्‌भवली होती आणि म्हणूनच त्यांनी भारतात परतल्यावर वृत्तपत्रांकडे ती व्यक्तही केली होती. मुंबईत प्रसिध्द होणाऱ्या दैनिक जन्मभूमी या गुजराथी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या मुलाखतीत त्यांनी भारतावरील चीनच्या संभाव्य आक्रमणाचा धोका व्यक्त केला होता व शासनाला सावधानतेचा इशाराही दिला होता आणि म्हणूनच श्री. यशवंतराव चव्हाण हे जेव्हा भारताचे संरक्षण मंत्री झाले तेव्हा ते प्रथम करमसीभाईंच्या भेटीला आले होते. ते म्हणाले होते, 'करमसीभाई हिमालयात खूप हिंडलेले आहेत. त्यांना हिमायलयाची खूप माहिती आहे. म्हणूनच मी त्यांना भेटण्यासाठी आलो आहे!'

करमसीभाईंच्या चित्तावर देवतात्मा हिमालयाची विलक्षण मोहिनी आहे!

❖

नवी दुनिया

यस्तु सञ्चरते देशान् यस्तु सेवेत पण्डितान्।
तस्य विस्तारिता बुध्दिस्तैलबिन्दुरिवाम्भसि।।

जो देशोदेशी प्रवास करतो आणि पंडितांची सेवा करतो त्याची बुध्दी पाण्यात पडलेल्या तेलाच्या थेंबाप्रमाणे विस्तार पावते.

नवी दुनिया

हिमालयाच्या सावलीत अमरनाथ, कैलास-मानसरोवर व बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, जमनोत्री आदी तीर्थस्थळांची करमसीभाईंनी
आपल्या सहकाऱ्यांबरोबर केलली यात्रा सौ. लीलाबेन यांच्या शब्दांत मागील प्रकरणात सविस्तरपणाने मुद्दाम उद्धृत केली आहे. हेतू असा की, खडतर समजल्या जाणाऱ्या या प्रवासात करमसीभाई व त्यांच्या बरोबरची मंडळी यांना कशा प्रकारे अडचणींना तोंड द्यावे लागले ? त्या अडचणींचे निवारण कसे झाले ? ईश्वरी कृपा व माणुसकी यांचा प्रत्यय कसा मिळाला ? तसेच त्या त्या प्रदेशातील भव्य निसर्ग, स्थलदर्शन व लोकजीवन कसे न्याहाळायला मिळाले; आणि त्यामुळे एका आगळ्यावेगळ्या अनुभवाने जीवनसमृद्धी कशी लाभली, हे कळावे.

प्रवासाची आवड आणि हौस करमसीभाईंच्या स्वभावातच आहे आणि त्यामुळेच त्यांनी केलेली व निरनिराळ्या कारणांमुळे त्यांना घडलेली भ्रमंती यांचीही ओझरती ओळख एका प्रकणात करुन दिलेली आहे.

त्या भ्रमंतीशिवायदेखील करमसीभाईंनी भारतात आणि भारताबाहेरच्या देशांतही फेरफटाका मारलेला आहे. विपुल प्रवास केलेला आहे.

उत्तर भारताच्या यात्रेनंतर करमसीभाईंनी भारताची दक्षिण यात्राही केलेली आहे. या सुभग-सुभग दक्षिण यात्रेच्या वेळी त्यांच्या बरोबर पत्नी साकरबाई, कन्या लीलाबेन, जावई माधवजी कोटक, दोन बहिणी आणि त्यांची मुले अशी कुटुंबीय मंडळी होती. दक्षिण भारत म्हणजे गोपुरांचा आणि विशाल मंदिरांचा, मंदिरापुढील विस्तीर्ण पुष्करणींचा तसेच प्रदीर्घ सागरकिनारा लाभलेला प्रदेश! श्रीमत् आद्य शंकराचार्य रामानुजाचार्य, माधवाचार्य, वल्लभाचार्य अशा भारतीय तत्त्वज्ञानात मोलाची भर

घालणाऱ्या प्रज्ञावंत आचार्यांचा प्रदेश. रमणीय वनश्रींनी, पाषाणातील अपूर्व शिल्पलेण्यांनी कन्नड, तमीळ, तेलगू व मल्याळम या द्रविड भाषांनी, त्यांतील साहित्य व विविध तऱ्हेच्या संस्कृती-आविष्कारांनी संपन्न असलेला प्रदेश !

या दक्षिण यात्रेत करमसीभाईंनी वेल्लूर, महाबलिपुरम, कांची, मदुराई, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, पेरियार, कोचीन, रामेश्वर, डिंडीगल, श्रीरंगम, पॉन्डेचरी, तिरुपती, बेंगलोर आदी लहानमोठ्या गावांना भेटी दिल्या. तिथली मंदिरे, मठ, स्मारके, उद्याने, अभयारण्ये, म्युझियम्स आदी पवित्र व प्रेक्षणीय स्थळे पाहिली.

आसामव्यतिरिक्त भारताच्या बहुतेक सर्व भागांत - प्रदेशांत करमसीभाईंनी प्रवासयात्रा करुन भारतदर्शन घेतले आहे.

भारताबाहेर नेपाळचा प्रवासही त्यांनी केला आहे. तेथील पशुपतीनाथ व इतर देवदैवतांचे दर्शन घेतले आहे. या प्रवासात त्यांना विविध तऱ्हेचे सुखदायक तसेच कष्टमय अनुभवही पदरी पडले आहेत.

नेपाळच्या वाटेवरील एका घटनेची आठवण त्यांना अजूनही आहे. या नेपाळ यात्रेच्या वेळी गोरखपूरजवळ दरोडेखोरांनी त्यांची बस रोखून धरली होती. लूटमार होण्याचा प्रसंग ओढवला होता. सगळे घाबरुन गेले होते. पण दैवयोगाने तेवढ्यातच मागून लष्करी जवानांची काही वहाने येताना दिसली, त्याबरोबर ते दरोडेखोर घाबरले आणि रोखलेली बस सोडून पळून गेले! एक भयंकर प्रसंग टळला!

नेपाळव्यतिरिक्त करमसीभाईंनी युरोप-अमेरिका आणि इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया या पूर्वेकडील देशांचाही प्रवास केलेला आहे.

युरोप-अमेरिका म्हणजे प्राचीन इतिहास, संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान, राजकीय विचारप्रवाह तसेच आधुनिक ज्ञान-विज्ञाननिष्ठ, उद्यमशील, अद्ययावत् संपन्न संस्कृतीचे नवीन दर्शन! या नव्या जगाचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची व तिथल्या मानव-कल्याणासाठी सिद्ध झालेल्या आधुनिकतेचा परिचय करुन घेण्याची उत्कंठा करमसीभाईंसारख्या नित्य नवा ध्यास असलेल्या व्यक्तिस असणे स्वाभाविकच आहे.

अमेरिकेमध्ये डिट्रॉइट या शहरी तर त्यांची एक कन्या सौ. निरुपमा आणि तिचे पती श्री. कुलीनभाई मस्काई राहात होते.

युरोपमधील प्रवास संपवून दि. १६ सप्टेंबर १९७१ या दिवशी करमसीभाई, सौ. साकरबाई, कन्या सौ. लीलाबेन व सौ. सावित्रीबेन दैया यांच्यासह लंडनहून विमानाने डिट्रॉईटला पोहोचले.

अमेरिकेतील सुमारे तीन महिन्यांच्या वास्तव्यात त्यांनी डिट्रॉईटसह शिकागो, ओमादा,

लास वेगास, कॅलिफोर्निया, डिस्नेलँड, रोचेस्टर, वॉशिंग्टन, मॉण्टेगोमॉरी, फिलाडेल्फिया, नायगारा, टोरॅण्टो इत्यादी शहरे, सृष्टिसौंदर्याने नटलेली उद्यानसदृश स्थळे, समुद्रकिनारे, स्मारके, कारखाने, म्युझियम्स आदी स्थळांना भेटी दिल्या. अमेरिकेमधल्या बहुतेक स्टेटस्मधून ते फिरले. फक्त टेक्सास, डलास राहून गेले.

अमेरिकेत असतानाच भारत-पाक युद्ध भडकले होते. भारतात बॉम्बस्फोट, ब्लॅकऔट, युद्ध सहकाल इत्यादी वार्ता त्यांना तिथेच मिळत होत्या. त्यामुळे एक प्रकारची अस्वस्थताही निर्माण झाली होती. घराची ओढही लागली होती. त्यामुळे सहा महिन्यांच्या युरोप-अमेरिकेची रंगतदार पण उद्यमी सफर करुन नव्या दुनियेचे दर्शन घेऊन दि. ३ डिसेंबर १९७१ रोजी करमसीभाई आपल्या सहप्रवाशांसह मुंबईस परतले.

त्यानंतर सुमारे तीन वर्षांनी पूर्वेकडील प्रवासाचे प्रस्थान करमसीभाईंनी ठेवले. त्याला निमित्तही विश्व हिंदू परिषदेने पुरविले होते.

दि. २३।३।१९७४ रोजी करमसीभाई, सौ. साकरभाई आणि सौ. लीलाबेन बँकॉकला निघाले. एक मित्र सदाजीवनलालजी हेही बरोबर होते. पूर्वेकडील इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया आदी देशांमध्ये भारतीय संस्कृतीची व हिंदू देवदेवतांची प्रतीके आणि मंदिरे गतकाळातील घनिष्ठ सहजीवनाची आठवण देत आहेत. इंडोनेशियात त्या वेळी तुलसीरामायणाला चारशे वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने उत्सव-समारंभ साजरा केला जात होता. विश्वहिंदू परिषदेचे अधिवेशन बँकॉकमध्ये भरले होते. बँकॉक हे थायलंडमधील प्रमुख शहर. हिंदू आणि बौद्ध या दोन्ही भारतीय धर्मांचा प्रसार थायलंडमधे आजही दिसून येतो. श्रीरामच्या मंदिराप्रमाणेच बुद्धविहारही दृष्टीस पडतात. भव्य पॅगोडा तर सर्वत्रच दिसतात. या प्रवासात कुवालालमपूर, बारगुंफा, सिंगापूर, बोरोबुदूर, जाकार्ता इत्यादी ठिकाणी ही सर्व मंडळी गेली. त्या त्या भागांतील प्रेक्षणीय स्थळे, मंदिरे त्यांनी पाहिली. बाजारहाटांमधूनही ते फिरले. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक लोकजीवनही न्याहाळले.

सुमारे तीन आठवड्यांचा हा प्रवास करुन करमसीभाई १३ एप्रिल १९७४ रोजी भारतात परतले. परतीच्या वाटेवर कलकत्ता, दार्जिलिंग या ठिकाणीही ते गेले.

अशा प्रकारे करमसीभाईंनी विपुल प्रवास करुन नव्या आणि जुन्या जगाचा परिचय करुन घेतला आहे. त्यामुळे सांस्कृतिक दृष्टयाही त्यांचे जीवन संपन्न बनलेले आहे. 'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार' या सुभाषिताची प्रत्यक्ष प्रचितीत करमसीभाईंना अनुभवायला मिळाली.

❖

अघा

रसो वै स : ।

तो आनंदाचा आणि उत्साहाचा झरा आहे.

अघा

करमसीभाईंचे आजचे राहते 'पद्मनाभ' नामक घर हे श्री. करमसीभाई व सौ. साकरबाई यांच्या स्वभावासारखेच प्रशस्त, औरस-चौरस, मोठ्या मनाचे आहे. या घराची वास्तुरचना सुपुत्र डॉ. शांतिलालजींनी आपल्या मात्या-पित्यांची उदंड उदारता व व्यापक मानवता लक्षात घेऊनच केलेली आहे.

घराला 'घरपण' अशा सद्‌गुणांमुळेच येत असते व घर शालीन-कुलवंत बनत असते!

या शालीन-कुलवंत घराला शांतिलालजींच्याच कलादृष्टीने व सौंदर्यसक्त मनाने समृद्ध-शोभिवंत सजविलेले आहे!

१९६८ पासून या मोठ्या घरात करमसीभाईंचे वास्तव्य आहे. या आधी मुंबईत तीन-चार ठिकाणी त्यांचे वास्तव्य होते. खरं तर, करमसीभाई, या मोठ्या काय नि या आधीच्या छोट्या काय, घरात फारच कमी वेळ असत. व्यवसाय-कामानिमित्त जास्त काळ ते बाहेरच असत. म्हणून करमसीभाईंच्यापेक्षा घर साकरबाईंचेच म्हणणे अधिक योग्य ठरेल! याला करमसीभाईंचीही सानंद मान्यता आहे. ते अनेक वेळा म्हणतातच, "घर सांभाळलं साकरबाईंनीच, मुलं वाढवली-शिकवली त्यांनीच, येणाऱ्या-जाणाऱ्यांकडं पाहिलं त्यांनीच. अडल्या-नडलेल्यांचं केलं त्यांनीच..."

सौ. साकरबाई आणि श्री. करमसीभाई यांचे जोडपे हे मूर्तिमंत 'लक्ष्मी-नारायण' यांच्यासारखेच दर्शनानंद देणारे व सानथोरांवर प्रेमळ मायेची सावली धरुन जिव्हाळा लावणारे होते. आपल्या माता-पित्यांविषयी त्यांच्या सर्व अपत्यांना आदर, प्रेम व अभिमान वाटणे स्वाभाविकच आहे. तसा तो सर्व अपत्यांना वाटतोही. पण तितकाच आदर, प्रेम, जिव्हाळा, आस्था आणि अभिमान त्यांच्या आप्त-इष्ट-मित्रांना व निकटच्या सेवक-सोबत्यांनाही वाटतो. त्यांना तर प्रसंगविशेषी हे जोडपे म्हणजे मायबापासारखेच आधारस्तंभ वाटते. अशी विश्वासार्हता व आदरभावना सर्वांच्याच मनीमानसी उदित व्हावी

असेच निरलस आचरण या उभयतांचे होते.

करमसीभाईंनी परिवारातील सर्वजण 'अधा' व साकरबाईंना 'बाई' म्हणतात. आपल्या अधांच्याबद्दल सुपुत्र शांतिलालजी यांच्या मनातील पितृभावना परम आदराची व प्रेमाची आहेच, तशीच ही बौद्धिकदृष्टीने चिकित्सक व समीक्षणात्मकही आहे. परंतु असे असूनही प्रस्तुत लेखकाने जेव्हा त्यांच्याशी बोलताना, 'आपल्या अधांबद्दल मला आपल्याकडून ऐकायचे आहे; त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आपल्या मनावरील प्रभाव किंवा ठसा जाणून घ्यावयाचा आहे'... असे जेव्हा म्हटले तेव्हा शांतिलालजी सुरुवातीलाच म्हणाले, "अगदी जवळच्या व्यक्तींबद्दलची अशी इंप्रेशन्स सांगणं कठीण जातं. लांबून तटस्थपणानं पाहताना त्या व्यक्तीचं समग्र व्यक्तिमत्त्व म्हणजे 'टोटल पर्सनॅलिटि' - जेवढे लक्षात येते तेवढे अगदी जवळून येत नाही. अनेक प्रकारच्या सूक्ष्मातिसूक्ष्म नाजूक भावभावनांचा दरवळही मनात नांदत असतो. त्यामुळं त्या व्यक्तींबद्दल व्हावं तेवढें अलिप्तही होता येत नसतं.

"तसं म्हटलं तर अधांच्या व्यक्तिमत्त्वाला पुष्कळ पैलू आहेत. 'अष्टपैले' म्हणतात तसं त्यांचं समृद्ध व्यक्तिमत्व आहे. मला लहानपणचं फारसं काही आठवत नाही. परंतु परिस्थितीशी झुंजताना त्यांना फार फार कष्ट करावे लागत होते. रोज जवळजवळ अठराअठरा तास काम त्यांना करावे लागत होते. हे मात्र चांगलेच आठवते. त्यांच्या सतत चाललेल्या अखंड दीर्घोद्योगाचा ठसा माझ्या कोवळ्या मनावर जो त्या वेळी विशेषत्वानं कोरला गेला होता तो पुढच्या काळात अधिकाधिक प्रखरपणानं दृढ होत गेला.

अधांच्या कार्यमग्नतेमुळे व व्यावसायिक फिरतीच्या स्वरुपामुळे त्यांना दीर्घकाळ घराबाहेरच प्रवासात राहावे लागत असते. त्यातही तेच मालक, तेच नोकर, तेच कारकून आणि तेच हमाल असा त्यांचा खाक्या असे. तो काळ मोठ्या त्रासाचा होता आणि त्यामुळे त्यांची आणि आम्हा मुलांची भेट होणेदेखील मुश्कील असायचे. ते कधीकधी रात्री बारा-साडेबाराला यायचे आणि पहाटे पाच-साडेपाचलाच कामासाठी निघून जायचे. त्या अवधीत आम्ही लहानगी मुलं झोपेतेच असायचो. अशा तऱ्हेच्या परिवारातील पिता आणि मुलं यांच्याबद्दल मी गमतीनं म्हणत असाते की, 'या घरात मुलं बापाला ओळखतच नाहीत...' एकूण वडिलांचं घरातलं सान्निध्यच कमी असे. पण असा कामाचा फार मोठा व्याप मागे असतानासुद्धा वेळात वेळ काढून ते आम्हां मुलांच्याबद्दल विचार करीत असत. प्रेमाने काळजी घेत असत. आमचा खेळ, व्यायाम, शाळा, आरोग्य, तसेच संगीत, चित्रकला, वाचन इत्यादी व्यक्तिगत विकासासाठी मुलांना आवश्यक असणाऱ्या गोष्टींचीही ते मोठ्या जाणीवपूर्वक चौकशी करीत असत व तशी साधने आणून देऊन योग्य ती व्यवस्थाही करीत असत. आपल्या मुलांचा व्यक्तिविकास सर्वांगीण दृष्टीने व्हावा अशी त्यांची इच्छा व प्रयत्न असत. तशी त्यांची दृष्टी, त्या काळाच्या मानाने फारच व्यापक व पुरोगामी होती. त्यांचे अगदी जवळचे असे चारपाच मित्रही होते. ते बहुधा दर रविवारी संध्याकाळी

यायचे तेव्हा अधा त्यांच्याबरोबर चौपाट खेळायचे. कधीकधी मीही त्यांच्यात खेळत असे. बुद्धिबळाच्या खेळातही माझी तयारी चांगली होती. अधांनी आमच्या निकोप वाढीसाठी पुष्कळ तऱ्हेने मदत केली.

"आमच्या बाईंनीही आमच्यासाठी खूपच खस्ता खाल्ल्या. वडील सतत घराबाहेर राहिल्यामुळे आमच्या पालनपोषणाची, दुखण्याबाण्याची, शिक्षणाची सर्व व्यवस्था व काळजी तिलाच घ्यावी लागत असे. तशात बाईंची प्रकृतीही फारशी चांगली नव्हती. बाईंच्या बिघडलेल्या तब्येतीची काळजीही अधा आपल्या कामाच्या मोठ्या व्यापातूनही घेत असत. बाईंसाठी वेळात वेळ काढून काही दिवस देवळाली, नगर, पुणे, मिरज, पाचगणी तर काही दिवस महाबळेश्वर येथेही अधा जाऊन-येऊन राहत असत. औषधपाण्याची व्यवस्था पाहात असत. सर्व तऱ्हेची काळजी घेत असत.

बाईंनी सेवा, शुश्रूषा व परोपकार अशी कामे पुष्कळच केली. ती अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. फार फार श्रद्धाळू होती. आमचं कच्छमधलं गाव तेरा. तिथं आमचं वडिलार्जित घर आहे. घरात आमचं कुलदैवत - नागराजाची पाषाणमूर्ती आहे. घरात काही शुभकार्य झालं की, तिथं जाऊन नागराजाची पूजा करुन दर्शन घेतलंच पाहिजे, अशी बाईंची श्रद्धा व शिकवण असे.

"माझे काका धरमशीभाई गेल्यावर त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींना अधांनी व बाईंनी अगदी स्वत:च्या मुलीसारखेच वाढविले. त्यांच्यात आणि आमच्यात कधीही आणि कसलाही भेदभाव झाल्याचे नजरेस पडले नाही. मला बहिणी किती ? पाच की सात ? असा प्रश्नही पुढे पुढे मोठेपणी कधी कधी पडत असे. लीला, सावित्री, दिव्या, निरुपमा आणि प्रतिमा या आपल्या मुलींप्रमाणेच जानकी व भारती यांच्यासह आम्हां सगळ्यांना सारखी वागणूक बाई आणि अधा देत असत.

"खरे तर, धरमसीभाई या वडीलभावाने अधांना तसा पुष्कळच त्रास दिला होता. पण तो सर्व विसरुन अधांनी आपले कर्तव्य केले आहे. अधा आणि बाई या दोघांचीही मने तशी विशालच. तिथे आपपर भावाला जागाच नाही. दुजेपणाला थाराच नाही.

"अधांची ईश्वरनिष्ठादेखील मोठीच आहे. काही करायचे किंवा केले किंवा झाले तर ते ईश्वरावर भरवसा ठेवूनच असतात. त्यामुळे जे काही घडेल त्यावर ते म्हणणार, 'हरिइच्छा!'

अधांची ईश्वरनिष्ठा तशी शाब्दिक नाही, अंतरात खोलवर मुरलेली आहे. रुजलेली आहे आणि म्हणूनच ते आपल्या हातून घडलेले सत्कृत्य समर्पण भावनेने ईश्वरार्पण करुन मोकळे होतात. त्याचे कर्तेपण आपल्याकडे घेत नाहीत. त्यांना स्वत:ला आत्मस्तुती किंवा प्रशंसा मुळीच आवडत नाही. ते एखाद्या समारंभात गेले तर पुढे जात नाहीत, तर लांब

लोकांत जाऊन बसतात. समारंभाचे प्रमुख त्यांना पुढे बसवण्याचा किंवा व्यासपीठावर चलण्याचा परोपरीने आग्रह करतात पण अधा बहुधा तो आग्रह मानत नाहीत. त्यांना लांब लोकांतच नि:संकोचीपणाने बसणे आवडते. अशा वेळी जर कोणी त्यांचे ऐकले नाही आणि फारच आग्रह चालू ठेवला, प्रशंसा-स्तुतीचा वर्षाव सुरु ठेवला किंवा त्यांचाच असा फोटो काढला तर ते कधी कधी रागावतदेखील असत.

"अधांची ईश्वरनिष्ठेइतकीच सत्यनिष्ठादेखील जाज्ज्वल्य आहे. असत्याचरण किंवा असत्य भाषण त्यांना मुळीच खपत नाही. ते स्वत:आपल्या असत्य गोष्टींपासून लांब आहेतच पण जर कोणी त्यांच्या संदर्भात असा खोटेपणा केला तर मात्र तिथेही त्यांना राग येतो. राग आला तरी तो व्यक्त करण्याची त्यांची पद्धतदेखील सौम्य व सभ्यच म्हणावी लागेल. कारण रागातदेखील ते कधी कुणाला कसलाही उणादुणा आपशब्द उच्चारणार नाहीत.

"अधांनी ही सत्यनिष्ठा आपल्या व्यापारातही कसोशीने पाळली होती. त्यामुळे लोकांचा फार मोठा विश्वास त्यांनी संपादन केला. बाजारपेठेत अधांच्या शब्दाला फार मोठं असं नैतिक वजन होतं. आपण दिलेला शब्द त्यांनी प्रसंगी नुकसान होत असतानासुद्धा मोठ्या सचोटीने पाळला. ते शब्दाचे फार फार पक्के आहेत.

"अधांनी आपल्यासमोर समाजकल्याणाची दृष्टी आणि देशहिताचा विचार सतत सावधपणे ठेवला. तिथे कधी कसली तडजोड स्वीकारली नाही. तसे ते फार आग्रही आहेत. एखाद्या गोष्टीबद्दल जर त्यांनी विचारांती आग्रह धरला तर ती गोष्ट तशीच झाली पाहिजे असा त्यांचा हट्ट असे. तो कोणी सहसा बदलू शकत नसे. त्यामुळे त्यांच्यातील हा आग्रही हट्टीपणा बदलत्या परिस्थितीत विसंगतही वाटतो. परंतु नीतिमूल्यांबद्दलची त्यांची दृष्टी व विचारसरणी ही फारच पक्की असल्यामुळे ते आपल्या आग्रहापासून बाजूला होण्याचे नाकारतात. आपल्याच विचाराला चिकटून राहतात, त्यामुळे काही प्रसंगी कधी कधी त्यांच्याविषयी दुसऱ्यांचे गैरसमजही झालेले आहेत.

"आज भ्रष्टाचार हा शिष्टाचारच झालेला आहे. त्याबद्दल आता कुणाला काही वाटेनासे झाले आहे. पण अधांना मात्र तसे वाटत नाही. देशाची भ्रष्टाचारामुळे झालेली आजची ही अवनत अवस्था पाहून त्यांना फारच खंत वाटते, दु:ख होते.

"अधांनी आमच्या विद्याविहारमधील मुले आणि मुली यांच्या बाबतीत त्यांच्या निष्ठेनुसार काही वर्तन-नियम घातले होते. त्यावरुनही काहीसे तंग वातावरण निर्माण झाले होते. परंतु अधांनी त्यांची फारशी पर्वा केली नाही. 'Man of Principles' - 'तत्त्वाधिष्ठीत माणूस' असेच त्यांचे वर्णन करता येईल आणि हा तत्त्वांचा आग्रह त्यांनी मानवी जीवनाच्या सर्वच अंगोपांगांबद्दल सतत धरलेला आहे. गांधीजींचा पुष्कळच प्रभाव त्यांच्यावर पडलेला आहे. आपली प्राचीन ऋषिपरंपराही अशीच आहे. 'विचारांप्रमाणेच आचार' याचाही आग्रह अधांच्या व्यक्तिमत्त्वात मोठ्या कटाक्षाने दिसून येतो.

“अधांची विचार करण्याची पद्धती आणि माझी विचार करण्याची पद्धती ही व्यक्तिपरत्वे वेगवेगळी आहे. अधांनी तर्कापेक्षा आपल्या अंतस्थ शक्तीवर अधिक भरवसा ठेवलेला आहे. त्यांच्या ईश्वरनिष्ठेला ते धरुनच आहे. तथापी, एखादी गोष्ट करण्यापूर्वी ते त्या त्या क्षेत्रातील जाणकारांचा, तज्ज्ञांचा सल्लाही घेतील. त्यांच्याशी सखोल विचारविनिमय करतील आणि मग त्यातून पटलेल्या गोष्टींची अंमलबजावणी देखील तितक्याच निष्ठेने करतील. अधांची प्रयोगशीलता किंवा प्रयोग करण्याची क्षमता देखील फारच मोठी आहे. कष्ट करण्याची तयारी व शक्ती त्यांच्या ठायी अपार आहे. शारीरिक व्यथा निर्माण झाली तरी ती त्यांनी दुसऱ्याला दिसू दिली नाही. स्वत:च निमूटपणाने सोसली. कारण त्यातून दुसऱ्याला दु:ख व्हावे, वाईट वाटावे व सेवा करण्यासाठी त्याला पुढे यावे लागावे, हे त्यांना मंजूर नव्हते. आपले दु:ख आपणच सोसावे आणि दुसऱ्याला केवळ निर्मळ आनंदच द्यावा अशी त्यांची वृत्ती आहे.

“अधांनी मला आयुष्यात पुष्कळच सांगितले आहे, शिकवले आहे. कृतीतून पटवले आहे. मला त्याचा पुष्कळच फायदाही झाला आहे. आता सर्वत्र नवीन तंत्रज्ञान आले आहे. अधांचा स्वभाव नव्याच्या बाबतीत स्वागतशील असल्यामुळे ते या नव्या तंत्रज्ञानाचाही जिज्ञासूपणाने परिचय करुन घेतात. त्या क्षेत्रातील जाणकारांशी बोलतात. सल्ला घेतात. नवीन तंत्रज्ञानाच्या संदर्भातील नवीन विचार आणि त्यांचे पारंपारिक विचार यांत कधी कधी गोंधळही निर्माण झालेला दिसतो. अधांच्या स्वभावात तशी लवचिकता देखील पुष्कळच आहे आणि म्हणूनच ते अनेकांचा सल्ला घेतात. आपला निर्णय घेण्यापूर्वी त्यावर कसून विचारही करतात आणि मग एखादा निर्णय झाला की त्यावर ते ठाम असतात. त्यांचा हा निर्णय कधी कधी मला मान्यही नसतो, पण मी त्याप्रमाणे वागतो-करतो. परंतु मी तो निर्णय माझा म्हणून नव्हे तर त्यांचा निर्णय म्हणूनच अमलात आणतो. मी स्वत: माझं विचाराचं स्वातंत्र्य नेहमीच अबाधित राखलेलं आहे. कधी कधी अधा मला नंतर म्हणत असत की, तू तुझे विचार का सांगत नाहीस ? मी म्हणतो, ‘मी तुमच्या निर्णयांचे पालन करतो.’

“आपल्या आजच्या लोकशाही पद्धतीबद्दलही अधांचे काही निराळे विचार आहेत. त्यांच्या चिंतनातून ते म्हणतात, ‘निवडणुकीद्वारा लोकप्रतिनिधी निवडण्याच्या ऐवजी ते गुणवत्तेनुसार निवडावेत. इलेक्शन नसावे तर सिलेक्शन असावे...’ पण त्यातही अनेक अडचणी आहेत. पहिलीच अडचण अशी की, हे सिलेक्शन कोणी करावे ? हे सिलेक्शन करणारे कोण ?.... परंतु अधांचे विचारचक्र अखंड चालू असते; हे देखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक उत्तम असे वैशिष्ट्यच आहे !”

आपली ज्येष्ठ कन्या लीलाबेन हिच्यावर करमसीभाईंची विशेष मर्जी आहे. माया आहे. तशी त्यांच्या चित्तात आपल्या व आपल्या बंधूंच्या दोन कन्यांसह सर्व अपत्यांविषयी

अपार प्रेम-माया आहे. तथापि, लीलाबेनविषयी त्यांना अधिक जिव्हाळा आहे. कारण लीलाबेन यांनीदेखील आपल्या अंगीच्या उपजत सेवाभावाने अत्यंत भक्तीपूर्वक आपल्या मात्या-पित्यांची सेवा-शुश्रुषा निरलसपणे केलेली आहे, आजही करीत आहेत. लीलाबेनना शिक्षण व समाजसेवा या क्षेत्रांबद्दलही खूपच आस्था आहे. 'सुरुची'सारखी संस्था त्या चालवतात. विद्याविहारच्या संचालक मंडळावर काम करतात. अधांच्या बहुतेक कामात त्या एक 'विश्वस्त' - 'ट्रस्टी' - म्हणनूही जबाबदारी पार पाडतात.

लीलाबेनविषयी करमसीभाईंना त्यांच्या जन्माच्या अगोदरपासूनच असा जिव्हाळा वाटू लागला होता. या संदर्भातील एक आठवण सांगताना करमसीभाई म्हणाले, "बेलापूरला दीड रुपया महिना भाड्याने एका अंधेऱ्या घरात राहात असाताना एका रात्री माझ्या पत्नी साकरबाई यांना एक स्वप्न पडले ते असे की, काळ्या पोषाखातील कोणी एक वृद्धेने त्यांच्या शरीरात प्रवेश केला. त्या वेळी माझ्या पत्नीला दिवस गेलेले होते. नंतर लीलाबेनचा जन्म झाला. पत्नीच्या स्वप्नातील ती वृद्धा म्हणजे माझी आईच होती अशी माझी श्रध्दा आहे आणि तीच लीलाबेन म्हणून आमच्या उदरी आली आहे. काही असेल ते असो, पण आमची लीलाबेन ही लहानपणापासूनच हसऱ्या मुद्रेची आहे. कसलाही प्रसंग येवो, लीलाबेनच्या मुद्रेवरचे हास्य मावळत नाही. ती हसून दुसऱ्याला धीर देते. हसवते."

करमसीभाईंनी एकदा असेही सांगितले आहे की, "त्या काळी अगदी लहान मुलांना पुरुष मंडळी घेऊन खेळवीत नसत. लांबूनच पाहात असत. एकदा पाळण्यातल्या चिमुकल्या लीलाबेनने आपले चिमुकले हात हसत धरण्यासाठी वर केले होते, तिची इच्छा मी ते चिमुकले हात धरुन तिला घ्यावे अशी असावी; पण मनावरल्या प्रथेच्या दडपणामुळे मी काही तिचे हात पकडून तिला उचलून धरले नाही.

"त्यानंतर सहाच महिन्यांनी ती फार आजार पडली. आजार गंभीर होता. त्या दिवशी आपण तिला उचलून घेतले नाही व तिच्याशी खेळलो नाही याचा मला त्या वेळी फार पश्चात्ताप झाला. देवाच्या दयेने लीलाबेन त्या आजारातून उठली, चांगली बरी झाली."

लीलाबेन यांनाही आपल्या बालपणाच्या काही आठवणी आठवतात. आपल्या अधांच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, "अगदी बाळपणचे आठवत नाही, पण थोडे मोठे झाल्यावर लहानपणी अधा आमच्याबरोबर अधूनमधून खेळत असत हे आठवते. त्यांना तसा फारसा वेळ नसे. चौरस हा त्यांचा आवडता खेळ आहे. वेळ असेल तेव्हा अधा बिल्डिंगमधील सगळी मुले जमवीत असत. त्यांच्याशी खेळत असत. आम्हांला ते नाटक करायला सांगायचे, त्यांचे एक सुत्र आहे, ते म्हणजे 'खेळा पण कधीही स्वस्थ बसू नका.' कर्मशीलता ही अधांच्या स्वभावातच आहे. अधांना मुलांविषयी फार प्रेम वाटते. कितीही कामात असो, ते आम्हां मुलांकडे प्रथम लक्ष देत असत. आम्हांला सस्कृत शिकवत

असत. गाणी स्तोत्रेही शिकवीत असत.

"मी १९४८ साली आजारी पडले होते. माझे लग्न ठरले होते. आम्ही एकदा लोणावळ्याला गेलो होते. तर तिथे एकाएकी माझे डोक असह्य दुखायला लागले. अधा अस्वस्थ झाले. ते कामात अत्यंत कडक शिस्तीचे आहेत. पण कोणी आजारी पडले की ते कमालीचे हळवे बनतात. माझ्या डोकेदुखीने ते असेच बेचैन झाले. आम्ही मुंबईला आलो, पण त्या आधीच त्यांनी दोन डॉक्टरांची अपॉइन्टमेंट घेऊन ठेवली होती. माझ्या डोकेदुखीवर उपचार सुरु झाले, पण काही केल्या गुण येईना. माझ्या शुश्रुषेसाठी दिवस-रात्र अशा दोन नर्स अधांनी ठेवल्या होत्या. डॉक्टरांच्या सल्ल्याने त्या उपचार करीत असत. दिवसातून मला बारा इंजेक्शन्स दिली जायची. त्या वेळी अधा स्वत: माझ्याजवळ उभे राहात असत. लॅबोरेटरीत रिपोर्ट आणायला स्वत: जात असत. कारण चुकून तिथे काही झाले तर.... याची ते काळजी घेत असत. नर्स विसरेल म्हणून दर वेळी तिला आठवण देत असत. माझी आई आणि अधा माझं डोकं दाबत असत. बर्फाची पिशवी डोक्यावर ठेवत असत. मला प्रकाशाचा किरणही सहन होत नसे म्हणून अधांनी माझी खोलीच अंधारुन टाकली होती. 'ब्लॅक आऊट' केली होती. डोकेदुखीमुळे मला झोप नसे. खाल्लेले पचत नसे. उलटी होत असे. अगदी अशक्त झाले होते. माझे मला उठून बसता येत नसे. बारा-तेरा महिने बिछान्यावर पडूनच होते. अधा सहा महिने कुठेही गेले नाहीत. जवळ बसून असत. सारखी माझी काळजी करायचे. 'लंबर पंक्चर' करताना डॉक्टर मोठी सुई वापरायचे. मला फार वेदना व्हायच्या. माझी अवस्था बघून अधांचे डोळे भरुन यायचे. ते फार कोमल मनाचे आहेत. कोणी आजारी पडल्याचे कळताच ते त्यांच्याकडे लगेच जातात. त्यांच्या उपचारांची व्यवस्था करतात. माझ्या आईच्या दीर्घकालीन आजारपणात अधांनी तिला ठिकठिकाणी नेऊन उपचार केले. त्यात कधी त्यांना कंटाळा वाटत नाही.

"आजारातून बरी झाल्यावर १९५० साली माझे लग्न झाले. मी लीला माधवजी कोटक बनले.

"बाई व अधांचे तर मला प्रेमपूर्ण वात्सल्य लाभलेच पण अधांचे मित्रही मला आपली मुलगी मानत असत. एक जण तर रात्री बारा वाजताही फोन करुन माझ्या आजारपणात माझी चौकशी करीत असत.

"माझी आई ह्यादेखील अत्यंत प्रेमळ, सेवाभावी व उदार वृत्तीच्या होत्या. त्या वेळी आम्ही घरी पाच बहिणी, एक भाऊ, वडील, चुलते, त्यांच्या दोन मुली आणि आणखी चार-पाच जण अशी बरीच माणसे होतो. पण बाईंनी कधीही कुरकुर न करता सगळ्यांचे कष्ट काढले. आपल्या मुलींसारखेच आपल्या दोन पुतणींनाही वाढवले. अल्प मिळकतीतही

त्यांनी नेटकेपणाने प्रपंच केला. पुढे पैसे मिळाल्यावर देखील त्यांचा स्वभाव तसाच प्रेमळ सौजनशील राहिला. श्रीमंतीच्या अहंकाराचा वार त्यांना जरासाही लागला नाही. उलट हाती आलेल्या पैशांचा सदुपयोग बाईंनी अधिकच मोठ्या मनाने उदारपणे केला. बाईंनी जवळपासच्या पंचवीस-तीस लोकांचे विवाह करुन दिले. घरकाम करणाऱ्या दोन मुलींना दीडशे रुपये पगारवाले मुलगे पाहून दिले. आता ती मुले दहा-दहा हजार रुपये मिळवती आहेत. सुखाने संसार करीत आहेत.

"बाईंनी जसे अनेकांचे संसार उभे केले, तसेच अनेकांच्या पडत्या संसारालाही आधार दिला. अनेकांची दुखणी-आजारपणे काढली. सेवा-सुश्रूषा, पथ्य-पाणी अगत्याने केले.

"बाई फार धार्मिक वृत्तीच्या होत्या. भक्तहृदयी होत्या. त्यामुळे घरात काही ना काही धार्मिक समारंभ होत असत. व्रते-वैकल्ये पाळली जात असत. त्यांवरही त्या बराच खर्च करीत असत. अधांना या गोष्टीत फारसा रस नसे. पण त्यांनी बाईंना त्यापासून कधीही परावृत्त केले नाही, की त्यात कधी आडकाठी आणली नाही."

सावित्रीबेन आपल्या आठवणी सांगतना म्हणाल्या, "अगोदर आम्ही वाळकेश्वरला राहात होतो. मग मरीन ड्राईव्हला राहायला गेलो. माझे शिक्षण एस.एस.सी.पर्यंत झाले. नंतर १९ व्या वर्षी माझे लग्न झाले. लग्नाच्या वेळी मला पहायला रात्री दहाच्या पुढे पाहुणे लोक आले होते. मला खूप झोप येत होती. त्यामुळे कोण पहायला आले ते ठाऊक नाही. पण घरचे सगळे लोक होतेच. नंतर लग्न ठरले. अधांनी सांगितले, मुलगा चांगला पाहूनच सर्व बोलणे केले आहे. चांगल्या ठिकाणी ठरवून दिले आहे. १९५४ साली मला पहिली मुलगी झाली. तिचे नाव ज्योती व दुसरा मुलगा चेतन १९५६ साली झाला. माझ्यावर ओढवलेल्या दुर्दैवी घटनेनंतर अधांनी व बाईंनीच मला आधार दिला."

सावित्रीबेननी वर ज्या दुर्दैवी घटनेचा उल्लेख केला आहे, ती घटना म्हणजे, त्यांचे पती हरिरामभाई यांचे १४ डिसेंबर १९६७ रोजी झालेले अपघाती निधन.

करमसीभाईंना आपल्या सुखी व संपन्न प्रापंचिक जीवनात बसलेला हा मोठाच धक्का होता. या संदर्भातही त्यांनी एक आठवण अशी सांगितली आहे, "एकदा हरिरामभाईंच्या मृत्युपूर्वी सहा महिने अगोदर आमची मुले महाबळेश्वरला गेली होती. त्यात त्यांची मुलगीही होती. एकदा तिथे मुलांनी प्लॅन्चेटचा प्रयोग केला आणि एका आत्म्याला बोलावले. हरिरामभाईंविषयी प्रश्न विचारत त्या आत्म्याने सांगितले, 'हा मनुष्य सहा महिन्यानंतर आमच्यामध्ये असेल!" हे कळताच मुले घाबरली. त्यांनी तो खेळ बंद केला, पण त्याविषयी कोणीही आम्हा मोठ्यांशी बोलले नाही. काही सांगितले नाही. परंतु सहा

महिन्यांनी जेव्हा हरिरामभाईंचे निधन झाले तेव्हा मग मुलांनी तो प्रकार सांगितला. आम्ही चकितच झालो! हरिरामभाईंच्या प्रत्यक्ष निधनापूर्वीच मुलांना ही गोष्ट सहा महिने आधी कळली होती."

लीलाबेन यांनी तर अधांच्याबरोबर खूपच प्रवास केलेला आहे. नंतर प्रवास वर्णनेही लिहिली आहेत. त्या प्रवासाच्या आठवणी मागे काही प्रकरणात दिलेल्या आहेतच. प्रवासाप्रमाणेच त्यांनी नेत्रशिबिरातील अधांच्या आठवणी सांगितल्या. त्या म्हणाल्या, "अधांना स्वत:चे काम स्वत:च करायची सवय आहे. आपले कपडेसुद्धा ते स्वत:च धूत असत. ऑफिसमध्ये सुद्धा ते कधीही काम अपुरे ठेवत नाहीत. सर्व काम पूर्ण झाल्यावरच घरी येत असत. अधांना सुरूवातीपासूनच भजनाची आवड आहे. तशीच त्यांना झाडांचीही खूप आवड आहे. कोठून कोठून फळझाडे आणून ते नरेशवाडीला लावत असत. मेहरूणची बोरं फार प्रसिद्ध, अधांनी त्या बोरांची रोपे नरेशवाडीत लावली आहेत. अधांना ससत काम हवे. ते खूप कष्ट करतात. त्यांना जर सांगितले की तुम्ही आता विश्रांती घ्या, तर ते म्हणतात, "विश्रांती घ्यायला लावून तुम्ही मला आजारी पाडाल!"

वृद्धपण हे दुसरे बालपण असते. या वयस्क बाळाचा बालहट्ट पुरविणे अवघड असते. पण, लीलाबेन खरोखरच आईच्या मायेने आणि कष्टाने अधांचे करीत असतात. त्यांना औषध देणे, भरवणे, प्रसंगी सक्तीने काही करायला लावणे, हे त्या कुशलतेने करतात. माता आणि कन्या अशा दुहेरी रूपात त्या दिसतात!

अधांची पुतणी - जानकीबेन - यांनाही आपल्या बालपणातल्या काही आठवणी आहेत. त्या म्हणाल्या, "अधा आम्हां मुलांशी अतिशय प्रेमळपणाने वागायचे. शाळेतल्या परीक्षेत आम्हांला चांगले मार्कस् मिळाले नाहीत तर रागवायचे. त्यांना मुलामुलींचे एकत्र शिक्षण आवडत नसे. त्यामुळे आम्हांला मुलामुलींबरोबर कॅम्पला वगैरे ते पाठवत नसत. त्यामुळे आम्हांला वाईट वाटत असे. अधांच्या बाहेरच्या वस्तू खालेल्या देखील आवडत नाहीत. आपल्या घरात शुद्ध व चांगले अन्नपदार्थ असताना आपण बाहेर का खावे, असे ते म्हणत.

"मी - जानकी आणि भारती अशा आम्ही दोन धारशीभाईंच्या मुली. माझी आई मी चार वर्षांची होते तेव्हा वारली. मग आम्ही दोघी मावशीकडे - तीच आमची काकीसुद्धा - आलो. साकरबाईंची सख्खी बहीण हीच आमची आई होती.

"मी व दिव्याबेन या एकाच वर्गात होतो. भारती व निरुबेन एकाच वर्गात शिकत होत्या. आईवडिलांचे प्रेम हे अधा आणि बाई यांनीच आम्हांला दिले.'

अधांची दुसरी पुतणी - भारतीबेन, आपली आठवण सांगताना म्हणाल्या, “अधा आणि बाई हेच आम्हांला आईवडिल वाटत होते. पुढे शाळेत गेल्यावर जेव्हा माझे नाव भारती डी. सोमैया असे लागले, तेव्हा प्रश्न पडला की, लीलाबेनचे नाव लीला कै. सोमैया आणि माझे व जानकीचे असे वेगळे का?... तेव्हा आम्हाला सर्व कळले! तोपर्यंत आम्ही त्यांच्या पुतण्या आहोत हे ठाऊकच नव्हते!”

दिव्याबेन आपल्या आठवणी सांगताना म्हणाल्या, “अधा फिरायला निघाले व रस्त्यात त्यांना कोणी जुने मित्र भेटले तर त्यांच्याकडे ते अगोदर जातात, बोलतात, चौकशी करतात. अधा मराठी व मारवाडी अतिशय चांगले बोलतात. बेसनाचा लाडू हा त्यांचा आवडता पदार्थ आहे.

“अधा आम्हांला कधीतरी मराठी नाटक पाहायला घेऊन जात असत. त्यांना नाटकांची आवड आहे. ‘एकच प्याला,’ ‘बटाट्याची चाळ’ही नाटके पाहायला आम्हांला त्यांनी नेले होते. गुजराती नाटकेदेखील आम्ही पहात होतो पण क्वचितच. अधांना सिनेमाची बिलकूल आवड नाही.

“आमच्या घरी सकाळी सात वाजता तसेच संध्याकाळी प्रार्थना चालते. अधांना पूर्वी धंद्यात असल्यामुळे याकडे फारसे लक्ष देता आले नाही. घरात चहा नव्हता. आम्हीसुद्धा लग्न झाल्यानंतर चहा घ्यायला लागलो. अधांना विडी, सिगरेट बिलकूल आवडत नाही. मिष्टान्न देखील जास्त आवडत नाही.

“वेळ असेल तेव्हा अधा लहान मुलांत मिसळत असत. त्यांच्याबरोबर खेळत असत. ते सांगत असत, ‘खेळा, ड्राईंग काढा, स्वीमिंग करा, संगीत-संस्कृत शिका, आणि अधा मुलांच्या शिक्षणासाठी सर्व तऱ्हेच्या सोयी उपलब्ध करून देत असत.

“ते सर्व मुलांना पाढे म्हणायला लावत असत. याची त्यांना खूप आवड होती. सर्व पाढे, तसेच पावकी, निमकी, दिडकी असे पाढे देखील सांगत असत. एकाने संस्कृतमधून गीतेचा श्लोक सांगायचा व सर्वांनी त्याप्रमाणे तो म्हणायचा असेही ते शिकवत. त्यामुळे आमचे पाठांतर व्हायचे.”

करमसीभाईंच्या तिसऱ्या पिढीतील दोन प्रतिनिधी म्हणजे नातू समीरभाई व नात हरिणाक्षी. हे दोघेही आता वैवाहिक जीवन सुखासमाधानाने व्यतीत करीत आहेत. हरिणाक्षीला एक मुलगाही आहे. म्हणजे करमसीभाई पणजोबा बनले आहेत. या छोट्या पणतवाशी ते गंमतगोष्टी करीत असतात. हरिणाक्षीला आपले अधा-आजोबा आंब्याच्या दिवसात खूप आंबे आणून खायला देत असत, अशी एक आठवण आहे.

समीरभाईंनीही आपल्या अधा-आजोबांच्या काही आठवणी सांगितल्या. ते म्हणाले, "माझ्या एका वाढदिवसाला अधांनी मला विचारले, 'तुला काय हवं?' तर मी सांगितलं, 'कुत्रा!' आणि तेव्हापासून आमच्या घरात कुत्रा आला. त्या आधी घरी कुत्रा आणण्याला अधांचा विरोध होता. त्यांनी कधी कुत्रा पाळू दिला नाही. पण त्यांचा तो विरोध माझ्या बाबतीत मावळला होता. मी आणलेला कुत्राही त्यांचा लाडका बनला. ते बाहेरून आले की तो त्यांच्या पायाजवळ जायचा, अधाही त्याला थोपटायचे.

"एकदा नॅचरल संस्थेच्या सभासदत्वाकरता मी विख्यात पक्षीप्रेमी सलीमअलींना फोन केला होता; ते त्या संस्थेचे प्रमुख होते. सलीम अलींनी फोनवर मला नाव विचारले. मी नाव सांगताच ते म्हणाले, "सोमैया?... करमसीभाई तर आमचे जुने सभासद आहेत.' अधा सलीमअलींचे चांगले मित्र होते आणि त्यांच्याप्रमाणे पक्षीप्रेमीही होते.

"अधा तसे आपल्या मताशी चिकटून असतात. त्या बाबतीत ते कठोर आहेत. हट्टीही आहेत. परंतु तितकेच ते संवेदनशील - सेन्सेटीव्ह आहेत. चांगल्या गोष्टी ऐकल्या, पाहिल्या आणि हृदयाला भिडल्या म्हणजे त्यांचे डोळे पाणावतात. अश्रू ओघळतात.

मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळची गोष्ट आहे. त्याच वेळी आमच्या घरी एका स्वामींची प्रवचने आयोजित केली होती. शहरातील स्फोटक व अशांत परिस्थिती लक्षात घेऊन मी त्या प्रवचनांना विरोध केला. सर्वांनी मला भित्रा वगैरे म्हटले. शांतिलालजी सुद्धा म्हणाले, 'बॉम्बस्फोट वगैरे आता रुटीन आहे. विद्वान स्वामींची प्रवचने हा दुर्लभ योग आहे'... पण अधांनी निक्षून सर्वांना सांगितले, 'प्रवचने रद्द!' या त्यांच्या निर्णयात मला जशी परिस्थितीची जाण दिसते, तशीच रुग्णांच्या विचारशील सूचनेचा स्वीकार करण्याची उमदी वृत्तीही दिसते."

श्रीरामपूरचे बाबूभाई व मंगलभाई चंदन हे दोघे अधांचे भाचे. भगिनी बसंतीबेन यांचे पुत्र. यांच्यावरही मामा म्हणून अधांचे वात्सल्यछत्र आहे. बाबूभाई तर लहानपणी आजोळी मामा-मामींकडेच वाढले. आजही ते अधांच्या सेवा-सुश्रूषेत तन-मनाने सदैव उपस्थित असतात. परगावी कुठे जाताना अधांना त्यांचा बाबू हवाच असतो!

सूनबाई मायादेवी आणि नातसून अमीताबेन याही अधांच्या सेवेत असतात. अधांच्या सर्व अभिमानाने या सर्वांच्या मनीमानसी आदराची प्रेमभावना नांदत आहे. सर्वांनाच अधांचा आधार पर्वताएवढा वाटतो.

अलिकडे बाईंच्या निधनानंतर तर त्यांचे अधा हेच एकमेव श्रद्धास्थान बनले आहे!

करमसीभाईंच्या घराला घरपण देणाऱ्या साकरबाई या सर्वार्थाने 'गृहिणी' होत्या.

न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते।
गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते।।

'चार भिंतींच्या घराला घर म्हणत नाहीत, तर गृहिणी म्हणजेच घर होय. पत्नीशिवाय घर हे अरण्यापेक्षा देखील भयंकर आहे.' संस्कृत सुभाषितकारांनी उत्तम गृहिणींची प्रशंसा अशा शब्दांत केली आहे. घराची टापटीप, मुलांचे संगोपन, पाहुण्यांचे आदरातिथ्य, वडील मंडळींची सेवा, पतीची प्रसन्नता या गोष्टी सांभाळणे जिला साधते ती गृहिणी होय. गृहिणी नसलेल्या एखाद्या घरात पाऊल टाकले म्हणजे या सगळ्या गोष्टींचा अभाव आपल्याला जाणवतो आणि तिच्यावाचून घर अरण्यासारखे आहे हे म्हणणे तात्काळ पटते. 'गृहिणीहीन' झालेल्या घराला 'कान्तारा'ची उपमा सुभाषितकारांनी यथार्थपणे दिलेली आहे. या सुभाषितात वर्णन केलेली 'गृहिणी' करमसीभाईंच्या जीवनात साकरबाईंच्या रूपाने मूर्तीमंत अवतरली होती. पतीच्या जीवनात पत्नीला अर्धांगी अशा शब्दाने संबोधून तिचे श्रेष्ठत्व व्यासांनी सांगितले आहे. गृहस्थधर्म सांगताना पतिव्रतेचे माहात्म्य व्यासांनी पुढील शब्दांत श्लोकरूपात कथन केले आहे :

जाया त्त्वर्थ शरीरस्य नृणां धर्मादिसाधने।
नातस्तासु व्यथां काञ्चित् प्रतिकूलं समाचरेत।।

'धर्म-अर्थ-काम या पुरुषार्थांची प्राप्ती करताना पत्नी ही पुरुषाचा अर्धा भाग आहे म्हणून तिला पीडा होईल असे तिच्याविरुद्ध वागू नये', - अशी शिकवण व्यासांनी दिलेली आहे. अर्धांगी, सहधर्मचारिणी या शब्दांत पत्नीचे संसारातले स्थान आणि महत्त्व वर्णन करून सांगितले जाते. गृहस्थ आपल्या अर्धांगीचे मन व मान राखून वागला तर त्याला व त्याच्या पत्नीला सुख व आनंद मिळू शकतो.

मनूने तर आचार्य, उपाध्याय, गुरू म्हणून कोणा-कोणाचा आदर करावा हे सांगितल्यावर सर्वश्रेष्ठ विद्यादात्री म्हणून मातेचा गौरव केला आहे :

उपाध्यायान्दशाचार्य आचार्याणां शंत पिता।
सहस्त्रं तु पितृन् माता गौरवेणातिरित्यते।।

'दहा उपाध्यायांहून आचार्य श्रेष्ठ होय. शंभर आचार्यांइतका पिता श्रेष्ठ होय आणि हजार पित्यांहूनही मातेचे महत्त्व अधिक आहे' - अशी मातृत्वाची महती सुभाषितकारांनी गायलेली आहे. 'मातृदेवो भव' असे नमन करून सर्व तत्त्वज्ञांनी व धर्मज्ञांनी पूज्य व्यक्तींमध्ये मातेला पहिले स्थान दिले आहे. मातेचे महत्त्व आधुनिक विचारवंतांनी व

शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. लहान मुलाचे शिक्षण-संस्कार त्याच्या गर्भावस्थेपासूनच सुरू होतात. वयाच्या तिसऱ्या वर्षांपर्यंत मूल जेवढ्या नवीन गोष्टी शिकते तेवढे मोठे झाल्यानंतर पुढे सर्व आयुष्यातही शिकू शकत नाही. शिक्षणाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा काळ असून या काळात मूल आईजवळच असते. भगवान श्रीकृष्णाने, सांदिपनी ऋषींच्या गुरुकुलात राहून विद्या संपादन केली. त्यानंतर ते जेव्हा सांदिपनी गुरूंचा निरोप घेऊन आश्रमातून आपल्या घरी जाण्यास निघाले तेव्हा आपल्या आदरणीय आचार्यांना वंदन करून 'मातृहस्तेन भोजनम्।' असा आशीर्वाद मागितला होता व सांदिपनी ऋषींनी 'तथास्तु!' म्हटले होते. या गोष्टीतूनही शिक्षण आणि संस्कार हे मातेकडूनच मुलाला मोठ्या प्रमाणावर लाभत असतात हेच कळून येते. आईच्या हातच्या जेवणात अन्नाच्या प्रत्येक घासात मुलावरील प्रेम मातेने मिसळलेले असते व त्या प्रेमानेच मुलाचे सर्वप्रकारे पोषण व वर्धन होत असते. प्राचीन वाङ्मयात स्त्रीला कन्या, पत्नी, माता व गृहिणी म्हणून तिच्या आदर्शांचे गुणगान केलेले आहे.

साकरबाईंच्या व्यक्तिमत्त्वात 'गृहिणी' म्हणून बजावलेल्या त्यांच्या सर्व भूमिकांमध्ये या आदर्श सद्गुणांचा परिमळ भरून राहिलेला आढळतो. या परिमळामुळेच त्यांचे समग्र जीवन हे अत्यंत सुगंधी बनलेले दिसते. साकरबाईंच्या व्यक्तिमत्त्वालाही विविध पैलू होते. गृहिणीधर्माचे पालन त्यांनी आदर्शवत केलेच, पण चार भिंतीच्या गृहातही त्या तशा अडकून राहिल्या नाहीत. त्यांच्या गृहिणीधर्मात समष्टीचा सेवाधर्मही अंतर्भूत झालेला होता आणि म्हणूनच घरातल्या, तसेच आप्तस्वकीयांच्या काळजीबरोबरच घराबाहेरच्या पण निकट सानिध्यात आलेल्या माणसांचीही काळजी त्यांनी तितक्याच उत्कटतेने व तत्परतेने घेतलेली दिसून येते. साकरबाई या मनोवृत्तीने धार्मिक व ईश्वरनिष्ठ होत्या. त्यांच्या समजुतीने त्यांनी अनेक प्रकारच्या व्रत-वैकल्यांत स्वत:ला गुंतवून घेतले होते. तथापि, या सर्व धर्माचरणाचे मुख्य रहस्य त्यांनी जाणले होते, ते होते, 'खरा तो एकचि धर्म। जगाला प्रेम अर्पावे।' आणि या प्रेमधर्माला अनुसरूनच त्यांनी सर्वांचे, घरातल्यांचे व बाहेरच्यांचे सुद्धा योग्य ते सर्व प्रकारे सर्व केले. त्यांनी पूजा-अर्चा, जप-जाप्य हे सर्व केलेच पण त्या बरोबरच परिवारातल्या, घरातल्या मुलांचे संगोपन व शिक्षणही तेवढ्याच दक्षतेने केले. सेवा-शुश्रूषा ही तर त्यांची वृत्तीच होती. त्याचबरोबर सत्पात्री दान, साहाय्य, परोपकार असा कर्तव्यदक्ष देखील त्यांनी अखंड सुरू ठेवला होता. साकरबाईंनी अनेकांना अनेक प्रकारांनी साहाय्य व संरक्षण दिले होते. पण या देण्याचा-दानाचा त्यांना कधीही गाजावाजा किंवा साधा उच्चारही केला नाही. दुसऱ्याचे दु:ख - परपीडा जाणून त्या दु:खिताला जवळ करण्याची व त्याचे दु:ख दूर करून आपले म्हणण्याची प्रचंड ताकद त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती. यालाच साधुवृत्ती आणि संतपण म्हटले जाते. या वृत्तीने साकरबाईंनी अनेकांना जवळ केले

आणि अनेकांच्या भरकटलेल्या जीवनाला सुखरूप स्वास्थ्य मिळवून दिले. साकरबाईंच्या प्रेमाची पाखर ज्यांना लाभली असे अनेकजण त्यांचे गुणगान गाताना आढळतात. साकरबाईंच्या देहावसानानंतर घरातल्या व बाहेरच्या अशा अनेकांना एकप्रकारे आपल्या जीवनातला प्रेमाचा व विश्वासाचा भक्कम आधारच गेल्यासारखे वाटून एक प्रकारचे पोरकेपण आल्याची दु:खद जाणीव झाली.

साकरबाईंना जाऊनही आता दोन वर्षे झाली. 'कालाय तस्मै नम:!'

साकरबाई देहरूपाने जरी गेल्या असल्या तरी प्रेमरूपाने त्या सोमैया परिवारात आजही वावरत आहेत. त्यांच्या प्रेमाचे, शिक्षणाचे, संस्काराचे बळ घेऊन आजही सर्वजण सन्मार्गाची वाटचाल करीत आहेत.

❖

स्मरण साखळी

यत्सम्बन्धिकथाभिरेव सततं दीर्घाभिरास्थीयत।



ज्यांच्या विषयीच्या जिव्हाळ्या प्रदीर्घ कथा संपत नाहीत कधीच!

स्मरण साखळी

व्यवसायातील आठवणींप्रमाणेच प्रपंच-परिवारातील घटनांची स्मरण-साखळीही करमसीभाईंच्या स्मरणात लखलखीत आहे. शंभरीच्या उंबरठ्यावरही त्यांचे स्मरण तसे उत्तमच म्हटले पाहिजे. आपल्या जीवनात घडून गेलेल्या घटनांच्या नोंदी त्यांनी करून ठेवलेल्या आहेत. काही घटना प्रस्तुत लेखकालाही सांगितल्या आहेत. करमसीभाईंच्या चरित्र-चारित्र्यांच्या दृष्टीने त्यांनाही महत्त्व आहे. त्या उद्‌बोधकही आहेत.

१९२८ हे साल करमसीभाईंच्या जीवनात महत्त्वाचे ठरले आहे. या साली आनंददायक घटना घडली. ती होती साखर-व्यवसायातील त्यांची व खटोडांची भागीदारी. या घटनेने तर करमसीभाईंचे पुढील सारे भवितव्यच घडविले.

त्याआधीच दुसरी आनंददायक घटना म्हणजे करमसीभाईंना पुत्रप्राप्ती झाली. शांतिलालजींचा जन्म १९२७ साली झाला. हिंदू संस्कारानुसार पुत्रप्राप्तीला माणसाच्या जीवनात फारच महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. एक तर तो वंशाचा दिवा असतो. घराण्याचे वंशसातत्य पुढे नेणारा असतो. वृद्धापकाळातील आधार असतो आणि मोक्षमार्गातील सहायकही असतो.

परंतु १९२९ साली मात्र एक दु:खदायक घटना घडली, ती म्हणजे करमसीभाईंच्या वडिलांचा मृत्यू. कच्छमधील त्यांच्या आजोळी वडिलांचा मृत्यू झाला. या वेळची काहीशी अस्वस्थ करणारी आठवण सांगताना करमसीभाई म्हणाले, “वडिलांच्या निधनाचे वृत्त कळताच मी त्यांच्या अंत्यविधीसाठी भागीदारीतील माझ्या खात्यावर असलेल्या रकमेपैकी काही रक्कम उचलली होती. माझ्या भागीदारांनी मला लिहिले की, ‘आपण उचललेली रक्कम तुमच्या खात्यावरील जमा असलेल्या रकमेपेक्षा जास्त आहे.’ अशा दु:खद प्रसंगी असे पत्र त्यांनी मला लिहिणे हे उचित नव्हते. मला ते आवडले नाही. म्हणून मी त्यांना उलट पत्राने कळविले की, ‘मी तुमचा वर्किंग पार्टनर आहे हे विसरू नका. माझ्या वडिलांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या उत्तरक्रियेसाठी मी पैसे उचलले’... त्यावर ते गप्प बसले. त्या वेळी

आमचे हिशेबही व्यवस्थित नव्हते.

"वडील गेले त्या वेळी माझा मुलगा शांतिलाल एक वर्षाचा होता. मी त्याला माझ्या अल्पशा कमाईतून हातात घालण्यासाठी वरून सोन्याचे पाणी दिलेले तांब्याचे एक कडे आणि लहानसा दागिना बनविला होता. त्या वस्तू विकून कसेबसे शंभर रुपये आले. त्या वस्तू विकण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. पण ते पैसे पाठवायचे कसे असाही एक प्रश्न होता. कारण मुंबईतील माझे थोरले बंधू धारशीभाई यांना सट्टा खेळण्याचा नाद होता. त्यांच्याजवळ पैसे देणे धोक्याचे होते. कारण हाती आलेले पैसे त्यांनी सट्ट्यात घालवले असते. म्हणून मी ते पैसे कच्छला माझ्या मामांकडे पाठवले आणि 'धारशीभाई क्रियाकर्मासाठी येतील तेव्हा त्यांना हे पैसे व आणखी लागले तर आणखीही काही पैसे द्या,' असे कळवले."

करमसीभाईंपेक्षा चार वर्षांनी मोठे असलेले त्यांचे बंधू धारशीभाई यांच्याविषयी मागे सांगितलेच आहे. त्यांनी सट्ट्याच्या नादापायी स्वत:चे आणि वडिलार्जितही सर्व पैसे तर घालविलेच पण करमसीभाईंनी स्वत:च्या कष्टाने कमविलेल्या कमाईतही वाटणी मागितली. इतकेच नव्हे तर त्यांनी त्यासाठी मुंबई हायकोर्टामध्ये करमसीभाईंच्या विरुद्ध दावाही दाखल केला होता. पुराव्यादाखल त्यांनी जे पत्र दाखल केले होते ते तद्दन खोटे व बनावट होते. त्याचा खोटेपणा उघड होताच धारशीभाईंनी लगेच तो दावा मागे घेतला.

ही अशी कष्टदायक घटना घडली तरी करमसीभाईंच्या मनाचा मोठेपणा आसा की, त्याच दिवशी त्यांनी धारशीभाईंना निरोप धाडला की, 'आपण घरी परत या, नेहमीप्रमाणे माझ्याकडे राहा.'

परंतु धारशीभाईंनी त्यांच्याकडे येण्याचे नाकारले.

आपल्या या थोरल्या भावाविषयी करमसीभाई सांगतात, 'धारशीभाईंच्या आधीच्या दोन्ही विवाहसंबंधातून त्यांना अपत्य लाभ झाला नव्हता. त्यांच्या दोन्हीही बायका दुर्दैवाने वारल्या होत्या. त्यानंतर त्यांचे तिसरे लग्न माझ्या पत्नीच्या धाकट्या बहिणीशी झाले होते. त्यांनी स्वतंत्र बिऱ्हाड केले होते.

एकदा मी माझ्या पत्नीकरता काही हिऱ्यांचे दागिने खरेदी केले होते. धारशीभाईंच्या पत्नीसाठी काही खरेदी केले नव्हते. याचा राग धारशीभाईंना फार आला आणि त्यांनी मला खरमरीत पत्र लिहिले. त्यावेळी माझी पत्नी आणि तिची बहिण दोघीही कच्छमध्ये होत्या. माझ्या पत्नीला मी पत्राने कळविले की, 'हिऱ्यांचे दागिने खरेदी केल्यापासून माझे ग्रह दूषित झाले आहेत आणि मला धंद्यात तोटा होत आहे. (अर्थात हे मी खोटेच लिहिले होते.) म्हणून तू हे हिऱ्याचे दागिने तुझ्या बहिणीला देऊन टाक.' माझे पत्र मिळताच माझ्या पत्नीने आपले हिऱ्याचे सर्व दागिने बहिणीला देऊन टाकले.

“धारशीभाईंनी सट्ट्यामधून सर्व काही घालविले. धंद्याशी त्यांचा काहीही संबंध उरला नाही. त्यानंतर मात्र ते आमच्याकडे आले. दुर्दैवाने १९५६ साली त्यांचा अंत झाला.”

करमसीभाईंनी खटोडांच्या भागीदारीत साखर विक्रीचा व्यवसाय जरी सुरू केला होता, तरी सुरूवातीला त्यांनी आपला मसाल्याचा व्यापार चालूच ठेवला होता. त्या वेळचीच एक चहाच्या संबंधातली आठवण सांगताना करमसीभाई म्हणाले, “माझ्या थोरल्या भावाच्या पहिल्या लग्नाच्या संबंधातील एक नातेवाईक एकदा बेलापूरला त्यांच्या धंद्यातील वसुलीसाठी आमच्याकडे आले होते. त्याच दिवशी धारशीभाईंच्या सासूबाईंचे भाऊ लक्ष्मीदासभाई हे सुद्धा धंद्याच्या निमित्ताने आलेले होते.

“लक्ष्मीदासभाईंना चहाची फार सवय होती. त्या बाबतीत ते फार उदारही होते. चाळीसगावला त्यांचे दुकान होते. दुकानाच्या मागच्या बाजूला स्टोव्हवर चहा सतत तयार असे. दुकानावरून जाताना ओळखीचा कोणी दिसला तर ते त्याला बोलावून चहा पाजीत असत. दिवसातून सुमारे चाळीस कप चहा लोकांना देत असत आणि तो देताना प्रत्येकाबरोबर जरी अर्धा कप म्हटला तरी ते वीस कप चहा पीत असत. ते सकाळी लवकर उठत असत आणि मग दिवसभर त्यांचे असे चहा पिणे चालू असे.

“आमच्या घरी बेलापूरला त्या वेळी चहा नसे आणि कोणी आला-गेला तर त्यालाही चहा न देण्याचा नियम असे. त्यामुळे लक्ष्मीदासभाईंची फारच अडचण झाली.

“त्या काळी, मुंबई शहरात सुद्धा प्रतिष्ठित लोक हॉटेलात जाताना, आपल्याला कोणी पाहात नाही ना, असे पाहून हॉटेलात जात असत. बेलापूरसारख्या लहान गावातही असाच रिवाज होता. त्यामुळे तर लक्ष्मीदासभाईंची फारच कुचंबणा झाली. ते आजारले. तेव्हा त्यांना ताप येऊ लागला व तो वाढूही लागला. पण त्यांनी त्याचे कारण मात्र सांगितले नाही. मी सकाळी सात वाजताच ऑफिसला जात असे. एके दिवशी त्यांचे एक संबंधी शिवजीभाई हे नऊ वाजता माझ्याकडे ऑफिसमध्ये आले आणि त्यांनी मला लक्ष्मीदासभाईंच्या आजारीपणाचे कारण सांगितले.

“आणि मग तेव्हापासून मी आमच्या घरी चहा बनवण्यास व आलेल्या लोकांना चहा देण्यास सुरूवात केली.”

आजची महागाई लक्षात घेता करमसीभाईंच्या लहानपणी किती व काशी स्वस्ताई होती हे त्यांच्याच आठवणींवरून कळून येते. करमसीभाई सांगतात, “माझ्या आजीची बहीण मिठाबाई - देवजी ओधवजीभाई यांची पत्नी या आपल्या आईला भेटण्यासाठी आम्ही राहात होतो तिथे येत असत. त्या वेळी त्या आम्हांला नाश्त्यासाठी एक आणा देत असत. ते चार पैसे नाश्त्याला पुरत असत. इतकेच नव्हे तर ते गरजेपेक्षा अधिकच होते.

“मी जेव्हा शाळेत शिकत होतो तेव्हा आम्हांला महिन्याला एक रुपया पॉकेट मनी म्हणून वरखर्चाला मिळत असे. म्हणजे रोज अर्धा आणा - दोन पैसे मिळत असत. माझा नेहमीचा खर्च, मला आवडत नसले तरी, माझे मित्र करीत असत. मी मग आजीने आपल्या शालीच्या टोकाला बांधून ठेवलेल्या किरकोळ पैशातून चौकोनी आकाराचे दोन आण्याचे नाणे गुपचूप चोरून घेत असे. तिने ते पैसे देवळात गेल्यावर देव-धर्मासाठी लागतील म्हणून ठेवलेले असत. हे कृत्य वाईट आहे असे मला वाटत असले तरी ते आजीला सांगण्याचे धाडस मला कधीच झाले नाही. सुमारे दोन-तीन वर्षे मी असे करीत असे.”

माणसातील गुणग्राहकता पारखून त्यांना जवळ करण्याचे कसब करमसीभाईंजवळ फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या कृषिऔद्योगिक व व्यावसायिक कामांसाठी योग्य अशी पुष्कळच माणसे जोडली होती व आपला विस्तीर्ण व्याप सांभाळला होता.

एकदा करमसीभाई गुजरातमधील नंदियाळ या गावी विश्व हिंदू परिषदेच्या बैठकीसाठी गेले होते. अध्यक्षस्थानी स्वामी सत्यानंदजी होते. करमसीभाई सांगतात, “मी त्यांचे भाषण ऐकून प्रभावित झालो. त्यानंतर दुसरे भाषण झाले ते प्राध्यापक सुरेशभाई शहा यांचे. ते ऐकून तर मी फारच प्रभावित झालो. त्यांची मुद्दाम ओळख करून घेतली. तेव्हापासून ते माझे एक उत्तम मित्र बनलेले आहेत.”

सुरेशभाई शहा हे अहमदाबाद येथील एका कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. नुकतेच ते निवृत्त झाले आहेत. शिक्षणाविषयी त्यांच्या ठायी अपार आस्था तर आहेच पण सामाजिक बांधिलकी मानून समष्टीसाठी कर्तव्यबुद्धीने सामाजिक व सांस्कृतिक कार्यातही ते मोठ्या धडाडीने भाग घेत असतात. कॉलेजमध्ये सुरेशभाई हे एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होतेच, पण सामाजिक कार्यातील त्यांच्या तडफदार व्यक्तिमत्त्वाने त्यांनी खूपच मोठी लोकप्रियता कमावलेली आहे. सुरेशभाईंचे वाचन जसे चौफेर आहे, विचार जसे मूलग्राही आहेत, तसेच त्यांचे वकृत्वही आकर्षक आहे. त्यांच्या ठायीची रसिकताही अभिजात आहे.

करमसीभाईंची ओळख झाल्यानंतर सुरेशभाईंनी करमसीभाई भरवीत असलेल्या आदिवासी भागातील नेत्रशिबिरात उपस्थित राहून एका श्रद्धेने अविरत सेवा केलेली आहे.

करमसीभाईंकडे सुरेशभाईंचे आता पिता-पुत्राप्रमाणे अत्यंत घरोब्याचे, जिव्हाळ्याचे नातेसंबंध निर्माण झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे सतत येणे-जाणे असते. प्रवासतही करमसीभाई त्यांना मुद्दाम बोलावून घेत असतात आणि सुरेशभाईंच्या सान्निध्यात काही निवडक असे चांगले ऐकण्या-वाचण्याचा आनंद घेत असतात.

करमसीभाईंनी एकदा विविध आठवणींबरोबरच आपल्या वास्तव्यासाठी घेतलेल्या जागांच्याविषयी देखील काही आठवणी सांगितल्या होत्या. ते म्हणाले, "मुंबईत वाळकेश्वरला आम्ही मुळजी हरिदास यांच्या बंगल्याच्या आतील बाजूस राहत होतो. ऑफिसमधून ही जागा लांब होती म्हणून मी ती जागा बदलून दुसऱ्या जागेत राहायला जायचे ठरवले. मग जागा बघायला सुरूवात केली. बऱ्याच जागा बघितल्यानंतर मरीन ड्राईव्हची शेठ गोविंदराव सेकसरैया यांच्या बिल्डींगमधील चौथ्या मजल्यावरील जागा पसंत पडली होती. परंतु त्या वेळी त्या जागेत स्वत: मालकच राहत होते आणि पाचव्या मजल्याचे बांधकाम अजून चाललेले होते. आम्हांला चौथ्या मजल्यावरची जागा पसंत पडल्याचे पाहून सेकसरैयांनी मनाचा मोठेपणा दाखवून आपले बिऱ्हाड पाचव्या मजल्यावर नेले आणि चौथ्या मजल्यावरची जागा आम्हांला दिली.

"दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी, १९४२ च्या सुमारास, मरीन ड्राईव्हच्या परिसरात विमानांचे थवेच्या थवे अवकाशातून फिरताना दिसत. त्या वेळी ही विमाने जपानी हल्ल्याची आहेत अशा समजुतीने त्या भागातील बरेचसे लोक जागा सोडून दुसरीकडे गेले. खिमजी नागजी कोठारी हे गृहस्थ मरीन ड्राईव्हची जागा सोडून ऑपेरा हाऊसजवळ राहायला गेले. आम्हीसुद्धा आमचे बिऱ्हाड पाचगणीला हलवले. पाचगणीची आरोग्यदायक हवा आणि मुलांच्या शिक्षणाची सोय या गोष्टी लक्षात घेऊनच आम्ही पाचगणीची निवड केली होती.

"पाचगणीला आम्ही एक बंगला भाड्याने घेतला होता. बंगल्याचे तीन वर्षांचे भाडे आम्ही भरले. परंतु तिथे राहिलो मात्र जवळपास वर्षभरच. बंगल्याचे नाव होते 'मेडस्टोन'. त्यावेळी पुष्कळ ठिकाणी स्फोटक पदार्थांचे साठे चोरून ठेवलेले असत. त्या सुमारास 'चले जाव'ची चळवळ जोरात चाललेली होती.

"मी नेहमीप्रमाणे माझ्या साखर व्यवसायाच्या निमित्ताने फिरतीवर होतो. कुटुंबीय मंडळी मुंबईला होती. त्या वेळी एकदा काही प्रवासी बंगल्याच्या शोधात आले होते. आम्ही एक गुरखा वॉचमन म्हणून तिथे ठेवलेला होता. एका प्रवासी स्त्रीने त्याला बंगल्याचे नाव विचारले. गुरख्याला ते नीट सांगता आले नाही. त्यामुळे त्या युरोपियन स्त्रीला संशय आला आणि तिने ताबडतोब कलेक्टर व तहसिलदार यांना कळवले. पोलीस झडतीसाठी व बंगल्याचा ताबा घेण्यासाठी आले. त्याच सुमारास मिरजेच्या आसपास काही धाडी पडलेल्या होत्या. म्हणून कलेक्टरने पोलिसांची दोन पथके बनविली. ते स्वत: एक पथक घेऊन धाडींच्या ठिकाणी गेले आणि एक पथक त्यांनी पाचगणीला पाठवले.

"पोलिसांना बंगल्याचा ताबा घ्यायचा होता. परंतु गुरख्याने त्यास हरकत घेतली. त्याने सांगितले की, मालक नसताना मी बंगल्यात तुम्हांला येऊ देणार नाही.

"माझ्या भागीदारांची पत्नी सीताबाई या तिथे जवळच एका बंगल्यात राहत होत्या. त्यांना बोलावून घेतले. त्यांनी आणि ओळखीच्या लोकांनीही सांगितले तेव्हा गुरख्याने

पोलिसांना बंगल्यात घेतले. पोलिसांनी तपासणी केली. डाव्या बाजूच्या दोन खोल्या बंद होत्या. परंतु त्यात मसाला आणि काही धान्य याखेरीज काहीच सापडले नाही."

सायनची जागा, जिथे आता के. जे. सोमैया हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज आहे, ती जागा कशी घेतली या विषयीची आठवण सांगताना करमसीभाई म्हणाले, "एकदा जाधवजीभाई प्रेमजी चंदा नावाचे माझे जे मित्र आहेत त्यांच्याकडे संध्याकाळी गेलो होतो. पण त्या वेळी ते घाईत कुठेतरी निघाले होते. मी 'कसल्या घाईत आहात' अशी चौकशी केली, तेव्हा त्यांनी सायन येथील एका जागेच्या चाललेल्या सौद्याबद्दलची माहिती दिली. व्यवहार जवळ जवळ ठरलेला होता. पण जागेच्या मालकाची इच्छा अमुक इतकी रक्कम मिळावी अशी होती. मी ती रक्कम ऐकली आणि माझ्या मित्राला म्हणालो, "मी हा सौदा घेतो. पहिल्या गिऱ्हाईकाला पटविण्याचा प्रयत्न करू नका. ती जागा मला खरेदी करून द्या." मित्रांनी माझ्यासाठी तो व्यवहार पूर्ण करून दिला. आज त्याच जागेवर आमचा 'आयुर्विहार' हा प्रकल्प उभा आहे."

साकरबाईंच्या आजारपणाच्या निमित्ताने करमसीभाईंनी त्यांना हवा पालटासाठी कुठे कुठे नेऊन ठेवले होते, हे सांगितलेच आहे. त्याच वेळी देवळालीवरून करमसीभाई साकरबाईंना घेऊन महाबळेश्वरला गेले होते. जाण्यापूर्वी त्यांनी महाबळेश्वरात हिंडणे-फिरणे सोयीचे व्हावे म्हणून पुण्यात एक 'शेव्हरोलेट' कार ४,५०० रुपयांना खरेदी केली होती. महाबळेश्वरला एका सीझनसाठी सहाशे रुपये भाड्याने एक बंगलाही भाड्याने घेतला होता.

महाबळेश्वरची हवा साकरबाईंना मानवली. तीन महिन्यांत त्या दोन-मैल चालूही लागल्या. सहा महिन्यांत तर त्या अगदी मोकळेपणाने वावरू लागल्या. महाबळेश्वरच्या हवेने साकरबाईंना तंदुरुस्त केले. त्यामुळे त्यांचे वास्तव्य तिथे वरचेवर घडू लागले.

एकदा एका ऑक्टोबर सीझनमध्ये करमसीभाई साकरबाईंना घेऊन महाबळेश्वरला गेले होते. याच वेळी योगायोगाने महाबळेश्वरला जो बंगला त्यांनी खरेदी केला त्याची हकीकत सांगताना करमसीभाई म्हणाले, "त्या ऑक्टोबर सीझनमध्ये महाबळेश्वरला फारच उकाडा होता. सकाळीसुद्धा घाम येत असे. एकदा मी माझ्या पत्नीसह फिरत फिरत महाबळेश्वरच्या एका टोकाला गेलो. तिथे बऱ्यापैकी उंचीवर आम्हांला 'रे व्हिा' नावाचा बंगला दिसला. एक सिंधी गृहस्थाचे ते हॉटेल होते. आम्ही पायऱ्या चढून वर गेलो. थंड वाऱ्याच्या झुळकीने प्रसन्न वाटले. मन उल्हसित झाले. वाटले, ही जागा बंगल्यासाठी फारच उत्तम आहे!

त्यानंतर वर्षभरातच, तोच बंगला लिलावात विकण्यासाठी काढला असल्याची जाहिरात वृत्तपत्रांत वाचली. मी मुंबईत त्या वेळी व्यवसायाच्या व्यापात बुडून गेलो होतो.

पण त्यातूनही सवड काढून मी तो बंगला खरेदी करण्याच्या आशेने मे महिन्यात महाबळेश्वरला गेलो.

"बंगल्याचा लिलाव सरकारी अधिकाऱ्यांपुढे पंचवीस हजार रुपयांच्या बोलीपासून सुरू झाला आणि वाढता वाढता तो अठ्ठेचाळीस हजार रुपयांवर येऊन ठेपला. मी विचार केला की, आपण एकोणपन्नास हजारांची बोली केली तर दुसरा कोणी तरी पन्नास हजारांची करणार. पण मीच जर पन्नास हजारांची बोली केली तर मग दुसरा कोणी त्याच्यावर बोलणार नाही. सरकारी अधिकाऱ्याने सुचविले, एक्कावन्न हजारांची बोली जर मी केली तर हा बंगला तुमच्या नावे करून दिला जाईल.

"आणि अशा प्रकारे एक्कावन्न हजाराला मी तो बंगला खरेदी केला.

त्यानंतर त्या सिंधी गृहस्थाला, बंगला अशा प्रकारे लिलावात विकल्याचे फारच दु:ख झाले, म्हणून तो हा व्यवहारच रद्द करण्याच्या खटपटीस लागला. पण मी त्यास बधलो नाही. कायदेशीररित्या हा सर्व व्यवहार झालेला आहे आणि आता हा बंगला आमचा झाला आहे, असे त्यास सांगितले. त्यावर त्याने कलेक्टरकडून लिलावावर बंदी आणण्याची खटपट केली पण लिलाव होऊन गेला होता. त्यामुळे त्याला काहीच करता आले नाही. त्यामुळे त्याने बंगल्याचा ताबा सोडला.

"बंगल्यात हॉटेलचे बरेच फर्निचर होते. तसेच भांडीकुंडी वगैरे वस्तूही पुष्कळ होत्या. त्याने फर्निचर, क्रोकरी, भांडी या सर्व वस्तू मला दहा हजारात दिल्या.

"असा सुसज्ज बंगला आम्हाला मिळाला याचा मला आनंद झाला!"

एकदा काही मित्रांबरोबर करमसीभाई वेरूळची लेणी पाहण्यासाठी गेले असतानाची हकीकत सांगताना ते म्हणाले, "आम्ही रात्रीच्या वेळी दौलताबादला थांबलो होतो. सकाळी सकाळीच एक गाडीवान गाडी हाकत चालला होता. त्या वेळी निजामाचे राज्य होते. तिथल्या चौकीदाराने गाडी थांबवण्यास सांगितले. परंतु गाडीवानाने गाडी थांबवली नाही. तेव्हा संतापून चौकीदाराने गाडीवानाच्या हातातील चाबूक हिसकावून घेतला आणि त्याने त्यास बेदम मारण्यास सुरूवात केली. आम्ही ते पाहत होतो, पण काहीच करू शकत नव्हतो.

"त्यावर्षी तिकडे फार मोठा दुष्काळ पडलेला होता. वेरूळच्या कुंडात तर हिरवाळून गेलेले गुडघाभरच पाणी उरले होते आणि लोक त्यातच डुबकी मारीत होते. परंतु मी काही डुबकी मारली नाही. अशा तऱ्हेचे पुण्य पदरी बांधण्याची माझी इच्छाच नव्हती."

"आम्ही एका ब्राह्मण गुरुमहाराजांकडे उतरलो होतो. त्या काळी उतरण्यासाठी लॉज, हॉटेल्स झालेली नव्हती.

"ब्राह्मण गुरूने आम्हांला सगळीकडे नेऊन सर्व धार्मिक कृत्ये करवून घेतली. आम्ही त्याला शेवटी आमच्या इच्छेनुसार दक्षिणाही दिली. त्याने ती संतोषाने घेतली आणि आमचे

नाव, पत्ताही आपल्या वहीत लिहून घेतला. इथे येणाऱ्या आमच्या पुढील पिढ्यांसाठी त्याला त्याचा उपयोग होणार होता.

"आम्ही तेराजण होतो. त्यात एक प्रेमसुखदास नावाचे बेलापूरचे नगरशेठ होते. त्यांना अशी इच्छा झाली की पंचवीस ब्राह्मणांना भोजन द्यावे. अशा प्रकारे एकेकाने आपल्या कुवतीनुसार दहा, पाच ब्राह्मण जेवू घातले!

"गुरुमहाराज मोठे धूर्त होते. त्यांनी सगळे मिळून चाळीस ते पन्नास ब्राह्मणांना भोजन देण्याचे आश्वासन दिले होते. पण पंचवीसच ब्राह्मण जेवतील अशी व्यवस्था केली होती. निरनिराळ्या दात्यांना त्यातीलच ब्राह्मण दाखवून त्याने चाळीस ते पन्नास ब्राह्मण जेऊ घातल्याचा हिशेब दिला!

"एकदा मी पैठणच्या यात्रेला गेलो होतो. फाल्गुन महिना होता. तिथल्या एका मोठ्या रांजणात भक्तांनी कितीही पाण्याच्या घागरी ओतल्या तरी रांजण भरत नाही. पण एका विशिष्ट आध्यात्मिक माणसाने जर एक लोटाभर पाणी ओतले तर रांजण भरून वाहू लागतो, अशी आख्यायिका मला ऐकायला मिळाली. ती खरी की खोटी हे मला तपासून पाहता आले नाही."

❖

सुहृद् हार्दिकता

तदेवास्य परं मित्रं पत्र संक्रामति इयम्।
दृष्टे सुखं च दु :ख च प्रतिच्छायेव दर्पणे।।



ज्याला पाहताक्षणीच सु:ख आणि दु:ख दोन्हीही आरशात प्रतिबिंब पाडावे तसे संक्रमित होते. तोच आपला खरा मित्र.

सुहृद हार्दिकता

करमसीभाईंनी आपल्या प्रसन्न-देखण्या व्यक्तिमत्त्वाने, अगत्यशील, सौजन्यपूर्ण, प्रेमळ स्वभावाने आणि प्रांजल, अविरत कर्मशैलीने
अनेक थरांतील अनेक लोक जोडले होते, जवळ केले होते. उत्कृष्ट उपजाऊ भूमीची, संतत वाहत्या जलप्रवाहांची, ऊन-पावसांच्या थंडीवाऱ्याच्या आगम-निर्गमाची चाहूल यांची जशी अनुभवसिद्ध जाणीव करमसीभाईंना अवगत झाली होती तशीच उचित ठिकाणी उचित माणसांची निवड-नियुक्ती करण्याची हातोटीही त्यांना साधलेली होती. करमसीभाई अनेकपारखी होते!

करमसीभाईंनी केवळ ऊस-मळेच फुलविले, विपुल साखर उत्पादनच केले, असे नाही; तर सचोटीच्या धनसंग्रहाबरोबरच सज्जन, सद्‌गुणी मित्रांचा व्यापक लोकसंग्रहदेखील केला! या बाबतीतही ते भाग्यवानच ठरले आहेत.

'ये हृदयीचे ते हृदयी' अशा स्नेहभावनेने त्यांनी आणि त्यांच्या स्नेह्यांनी एकमेकांना व्यक्त-अव्यक्त अशा रूपाने पुष्कळच दिले-घेतले आहे आणि उभयतांनी आपली जीवनयात्रा संपन्न केली आहे.

अशा काही स्नेही-सोबत्यांच्या निवडक हृद आठवणीही आहेत. त्यावरूनही करमसीभाईंच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी ओळख पटते.

अशा निकट स्नेह्यांपैकी एक आहेत उद्योगपती श्री. नवलभाऊ फिरोदिया. नवलभाऊ आणि त्यांचे वडिल भाऊसाहेब हे दोघेही अहमदनगर येथे वकिलीचा व्यवसाय यशस्वीपणाने करीत होते. दोघेही पिता-पुत्र गांधीजींच्या प्रेरणेने राष्ट्रीय आंदोलनात सहभागी झालेले होते. त्यातूनच करमसीभाईंशी त्यांचा स्नेहसंबंध जुळला. या संदर्भातली आठवण सांगताना नवलभाऊ म्हणाले, "माझी व करमसीभाईंची पहिली भेट १९३४ साली बेलापूर रोडला झाली. मी काँग्रेसचा कार्यकर्ता होतो आणि काँग्रेसकरीता फंड जमविण्यासाठी मी करमसीभाईंना भेटलो होतो. त्या वेळी ते खटोडांच्या भागीदारीत साखर व्यवसाय उत्तमपणे

करू लागले होते आणि त्यांच्या व्यवसायातील वकिलीचे काम त्यांनी माझ्याकडे सोपविले होते. करमसीभाईंनी आपला हा व्यवसाय तोवर एवढा वाढविला होता की त्यांना त्या वेळी दरसाल सुमारे एक लाख रुपये इतका इन्कमटॅक्स भरावा लागत होता! यावरून त्यांच्या व्यवसायातील प्रगतीची कल्पना येऊ शकेल.

"पुढे त्यांनी १९३९च्या सुमाराला साखरेचा कारखानाच साकरवाडी येथे काढला. १९४२ साली लक्ष्मीवाडी येथे दुसऱ्या साखर कारखान्याची सुरूवात केली आणि त्याही व्यवसायात त्यांनी खूपच प्रगती केली. साखर बाजारात करमसीभाईंना 'शुगरकिंग' म्हणूनच ओळखले जात असे.

"ही प्रतिष्ठा करमसीभाईंनी मोठ्या कष्टाने, चिकाटीने, कौशल्याने आणि परिश्रमाने मिळविलेली आहे. माझे मेहुणे हे फलटण शुगर फॅक्टरीमध्ये कॉन्ट्रॅक्टरचे काम करीत होते. तर त्यांनी मला एकदा सांगितले की, एकदा करमसीभाई हे फलटण शुगर फॅक्टरीपासून लोणंद स्टेशनपर्यंत वाहनाच्या अभावी पायी चालत गेलेले होते. असे कष्ट त्यांनी काढले. काही वेळा त्यांचा बिस्तराही त्यांच्या पाठीशी असे.

"१९४२ सालच्या लढ्यात तुरुंगात असताना नगरच्या आम्ही काही मित्रांनी सुटल्यावर स्वतंत्र उद्योगाची उभारणी करावयाची असा संकल्प केला होता. त्यानुसार सुटल्यावर आम्ही पाच भागीदारांनी मिळून 'जयहिंद इंडस्ट्रीज लि.' नावाची कंपनी काढून रजिस्टर्ड करून घेतली. या आमच्या कंपनीसाठी मुंबईत ऑफिस म्हणजे म्हणून मी एकदा फ्लोरा-फाउंटनजवळील फाजलभाय बिल्डिंगमधील आमचे मित्र करमसीभाईंच्याकडे गेलो. तिथे त्यांचे ऑफिस होते. मी त्यांना आमची जागेची अडचण सांगितली. तेव्हा करमसीभाई लगेच मला म्हणाले, "नवलभाऊ, अहो, माझ्या ऑफिसमध्ये तुमचीही टेबलखुर्ची ठेवा म्हणजे झाले. इथेच तुमचें ऑफिस सुरू करा." मला त्यांची ही सूचना पसंत पडली आणि आम्ही आमचे लहानसे ऑफिस करमसीभाईंच्या ऑफिसात थाटले. कायद्यानुसार लावावी लागते म्हणून एक लहानशी 'जयहिंद इंडस्ट्रीज लि.' अशी आमच्या कंपनीची पाटीही बाहेर लटकावून दिली होती.

ऑफिसमध्ये बहुधा रोज संध्याकाळी आमची गाठभेट होत असे आणि निरनिराळ्या विषयांवर चर्चा चालत असे. एकदा करमसीभाई आले आणि आपल्या डोक्यावरली गांधी-टोपी काढून टेबलावर ठेवत म्हणाले, "आजपासून ही टोपी घालण्याला मी लायक राहिलेलो नाही!" झाले होते असे की, ते कंट्रोलचे - रेशनिंगचे दिवस होते. साखरसाठा करण्यास बंदी होती. कुणीतरी चुगली केली असावी आणि त्यावरून पोलिसांनी करमसीभाईंच्या घरावर धाड घातली होती. घरात एक खडीसाखरेचे पोते होते, ते पोलिसांच्या हाती लागले. त्यावरून पोलिसांनी त्यांच्यावर खटला भरला होता. वस्तुस्थिती अशी होती की, करमसीभाईंच्या चिरंजीवांचे - शांतिलालजींचे लग्न ठरले होते. अशा वेळी आप्तेष्ट

मंडळींमध्ये खडीसाखर वाटण्याची कच्छी लोहाणा समाजात प्रथा आहे. त्यासाठीच ते पोते आणून ठेवलेले होते. साठेबाजी किंवा काळाबाजार करण्याचा उद्देश नव्हता. करमसीभाईंनी प्रांजळपणाने हे निवेदन कोर्टापुढे केले. परंतु कोर्टाने त्यांना कोर्ट उठेपर्यंतची शिक्षा ठोठावली!... आणि अशी शिक्षा आपल्याला झाली हे त्यांना लांछनास्पद वाटले. म्हणून त्यांनी गांधी टोपी काढून ठेवली होती. त्याकाळी गांधी टोपी ही शुद्ध चारित्र्याचे प्रतीक म्हणून मानली जात होती. आम्ही त्यांची समजूत काढली, युक्तिवाद केला आणि त्यांना परत टोपी घालायला लावली. करमसीभाई असे शील व चारित्र्य जपणारे आहेत. त्यांनी व्यवसायसुद्धा सटोडीयांप्रमाणे केला नाही. तथापि अचूक अंदाज घेऊन मोठ्या धैर्याने व साहसाने ते व्यापारात मोठी जबाबदारी - कॅलक्युलेटेड रिस्क - घेत असत.

"करमसीभाईंच्या स्वभावात जसे हे व्यापारी धाडस व कौशल्य होते, तशीच पराकोटीची ईश्वरनिष्ठाही आहे."

"एकदा काही कामासाठी करमसीभाई नगरला आले होते. आमच्या घरीच राहिले होते. एकदा रात्री बाराच्या सुमारास साकरवाडीहून एक मनुष्य आमच्याकडे करमसीभाईंचा शोध घेत आला. भाऊसाहेबांनी चौकशी केल्यावरून त्याने सांगितले की साकरवाडीच्या कारखान्यात आग लागलेली आहे. भाऊसाहेबांनी करमसीभाईंना झोपेतून उठवले. त्या आलेल्या माणसाने हा निरोप सांगितला. ते ऐकून करमसीभाई म्हणाले, 'तुम्ही कारखान्यात परत जा आणि आग विझवण्यासाठी जे काही करता येईल ते करा!' तो माणूस गेला आणि तेवढ्याच शांतपणाने करमरसीभाई झोपी गेले.

"नंतर पहाटेच्या सुमाराला त्यांचे मॅनेजर जीप घेऊन आले तेव्हा भाऊसाहेबांनी करमसीभाईंना झोपेतून उठवले. मॅनेजरनी सांगितले, 'फार मोठी आग लागलेली असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.'

"करमसीभाई त्यांना म्हणाले, 'तुम्ही हे सांगायला आलात ते ठीक झाले. पण मी आता तिथे येऊन काय करू शकतो? तुम्ही परत जाऊन आग विझवण्यासाठी जे काही करता येईल ते करा. मी जमल्यास सकाळी येईन किंवा मुंबईस जाईन. तुम्ही मला मुंबईस सविस्तर लिहून कळवा.'

"सकाळी मी त्यांना याबद्दल विचारले, तेव्हा ते म्हणाले, "मी तिथे जाऊन आग विझवू शकत होतो का? जास्त काही करू शकत होतो का? माझा परमेश्वरावर विश्वास आहे. त्याच्याच मनात जर माझे नुकसान व्हावे असे असेल तर त्याला कोण थोपवू शकणार? परमेश्वराची इच्छा!'

"उद्योगधंद्यांचे ज्ञान व व्यवस्थापकीय कार्यक्षमता हा गुण करमसीभाईंमध्ये उपजतच असावा. अनुभवाच्या शाळेत शिकून, त्यात वाढ करता येईल. माझ्या या म्हणण्याला, करमसीभाईंच्या सर्व उद्योग-व्यापारांकडे पाहिल्यानंतर त्यांत त्यांनी मिळवलेल्या यशाचे

निरीक्षण केल्यावर, पुष्टीच मिळते. 'हंसक्षीरन्याय' बुद्धीने आपण आपले कर्तव्य-कर्म करीत रहावे. यश-अपयश हे शेवटी परमेश्वरावर अवलंबून आहे. आपल्याला येणाऱ्या विविध अनुभवांतून आपण जे काही चांगले आहे ते कसे निवडून घ्यावे हे करमसीभाईंना चांगले ठाऊक आहे. माणसांची पारख करण्याचे चातुर्य त्यांच्यात आहे. 'मला एखादी गोष्ट पटवून दिली तर मी त्या माणसाचे जरूर ऐकेन; नाही तर माझे म्हणणे त्याला पटले तर त्याने माझे ऐकावे', अशी त्यांची भूमिका असते. सर्व साखर कारखानदारांशी त्यांचे संबंध नेकीचे होते.

"करमसीभाईंची राहणी अतिशय साधी आहे. मोठे कारखानदार झाल्यावर सुद्धा मी त्यांना रेल्वेच्या थर्डक्लासने प्रवास करताना पाहिले आहे. वास्तविक त्यांना अशा प्रकारे त्रास काढायचे काहीच कारण नाही. परंतु त्यांच्या अंगी असा साधेपणा मुरलेलाच आहे. तसेच अशा गोष्टींवर छोटेपणा किंवा मोठेपणा अवलंबून नसतो हेही त्यांना माहित आहे. आपल्याला मानमरातबाची जागा किंवा स्थान मिळाले पाहिजे अशी भावना त्यांच्या चित्तात कधीच नसते. उलट अशा गोष्टींपासून ते चार हात लांबच राहत असतात. म्हणूनच त्यांनी भाषण वगैरे करण्यात कधी फारसा भाग घेतला नाही. पण भाषण करावयाचेच झाल्यास ते अगदी उत्तम प्रकारे आपले विचार मांडू शकतात.

"आदिवासी, गोरगरीब यांच्याविषयी करमसीभाईंच्या ठायी अपार करुणा आहे. अगदी गरिबातल्या गरीब माणसाच्या लग्नालासुद्धा ते जातात, अडचणीच्या वेळी मदत करतात.

"त्यांनी हे सगळे आपले जग अगदी शून्यातून निर्माण केलेले आहे. त्यांचे जीवन हे एक प्रकारे सर्वांनाच मार्गदर्शनपर आहे!"

श्री. वागजीभाई ठक्कर हे करमसीभाईंच्या निकट मित्रांपैकी एक आहेत. गेल्या तीसहून अधिक वर्षांचा त्यांचा स्नेह आहे. ते आपल्या आठवणी सांगताना म्हणाले, "करमसीभाई यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ, निगर्वी आहे. ते सदैव कार्यमग्न-क्रियाशील असतात, हे मला त्यांचे एक विशेष वैशिष्ट्य वाटते. त्यांना कर्माचे ओझेही वाटत नाही. कर्मात सहजता ते अनुभवतात. कच्छमधील कुकमा येथे त्यांनी आयोजित केलेल्या नेत्रशिबिरात मी महिनाभर राहिलो होतो. त्या शिबिरात शेठजींनी मला व्यवस्थापकाचे काम दिले होते. येणाऱ्या पाहुण्यांना आणायचे, त्यांची व्यवस्था करायची. मग इतरही व्यवस्था बघायची असे काम माझ्याकडे दिले होते. शेठजी स्वत: आणि त्यांच्या कुटुंबातील सगळी मंडळी पहाटेपासूनच तिथे रुग्णांची जी सेवा करीत असत त्याचा प्रभाव माझ्या मनावर खूपच पडला आहे. तिथे सर्वांना समान वागणूक होती. एकाच प्रकारचे जीवन सगळ्यांसाठी असे. कुठे भेदभाव नव्हता. माणसाचा गौरव कसा करावा हे मी त्यांच्याकडून शिकलो. साकरवाडीला त्यांनी

एकदा हरिनाम सप्ताह घेतला होता. त्यावेळी मी त्यांच्याबरोबर गेलो होतो. रोज एक लाख लोक जेवत असत. तिथेही सगळी व्यवस्था शेठजींनी अत्यंत उत्तम प्रकारे ठेवलेली होती. श्रीरामपूरचे त्यांचे भाचे बाबूभाई चंदन यांची कन्या ही माझी सूनबाई आहे. हा विवाहसंबंध शेठजींनीच घडवून आणला.

"शेठजी नेहमी शांत व प्रसन्नवदन दिसतात. एकदा त्यांच्या बंगल्यातील शांतीलालभाईंच्या खोलीस आग लागली होती. बरेच नुकसान झाले होते. ही बातमी कळल्यावर मी व माझ्याप्रमाणे बरीच मंडळी शेठजींकडे विचारपूस करण्यासाठी गेलो असतानाही ते एवढेच म्हणाले, "भगवंताची मर्जी!" स्थितप्रज्ञासारखीच त्यांची वृत्ती आहे.

"एकदा शेठजींबरोबर मी जयपूरला संगमरवरी मूर्ती घेण्यासाठीच गेलो होतो. घाटकोपरला विद्याविहारमध्ये एक संगमरवरी विशाल मंदिर उभारण्याची त्यांची इच्छा आहे. त्या मंदिरात सर्व देवदेवतांच्या मूर्ती असतील. सर्व धर्मांची शिकवण असेल. सर्वांभूती समभावना व्यक्त होईल अशी भव्य कल्पना त्यांच्या चित्ता आहे. जयपूर, मकवाना, रायनगर, कांक्रोली, नाथद्वारा, उदयपूर अशी यात्रा करूनच आम्ही परतलो होतो. जयपूरला काही मूर्तीकारांना शेठजी भेटले होते. त्या मूर्तिकारांवरही शेठजींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडला होता. शेठजींनी त्यांना काही मूर्ती बनवण्यास सांगितल्या. मकवाना येथे संगमरवराच्या खाणी आहेत. मंदिरासाठी शेठजींनी त्यांचीही पाहणी करून काही खरेदी केली होती. काही स्थापत्य विशारदांकडून त्यांनी मंदिराचे आराखडेही बनवून घेतले आहेत. या वाढत्या वयातही त्यांच्या ठायी फार मोठी उमेद व इच्छाशक्ती आहे."

"मालुंजा, बेलापूर, श्रीरामपूर या भागातील रामूशेठ खटोड, मंगलभाई व बाबूभाई चंदन, प्रेमसुख झंवर, दुधेडीया, सुमनभाई शहा, पन्नालालजी खटोड, नागेशराव पेंडसे, जीवराजभाई, हाजी हसन कच्छी, रामनाथजी धूत, सुमतीभाई शहा, नवलखाभाई, तय्यबजी फरीद बद्रुद्दीन, रामविलास सोमाणी, रामचंद्र वर्मा, डॉ. पंडित, प्रेमसुखदासजी खटोड, मोहनलालजी खटोड, सोभाचंदजी दाकलिया, पतंगाभाई रुणवाल, देवजीभाई सोलंकी, केशरचंद गदीया, वसंतराव सुखदरे, रिंगेपाटील, औटी, जोशी, निवृत्ती बनकर, आप्पासाहेब मोकाशी, श्रीमती जुवेकर, अहमदनगरचे डॉ. निसळ, नानासाहेब देशमुख, नेमूकाका, मुनोत, कोलारचे भीमराज खर्डे आदी मंडळी शेठजींच्या संपर्कात सुरूवातीपासून आलेली आहेत. विविध क्षेत्रांतील वृद्ध मंडळींनीही आपल्या जिव्हाळ्याच्या आठवणी जपलेल्या आहेत.

श्रीरामपूरचे पुढे वार्ताहर व पत्रकार बनलेले श्री. नागेशराव पेंडसे यांनी अशी

आठवण सांगितली की, “शेठजींनी पहिल्यांदा श्रीरामपूरला खडीसाखरेचा कारखाना काढला होता आणि साकरवाडीच्या कारखान्याची तयारी चाललेली होती. त्या वेळी ते मुंबईहून सकाळी रेल्वेने अधूनमधून येत असत. मी त्यावेळी वर्तमानपत्रे विकत असे. शेठजींना गुजराथी वर्तमानपत्र लागत असे. मी त्यांना ‘जन्मभूमी’ हे गुजराथी दैनिक प्लॅटफॉर्मवरच देत असे. ते त्यांची किंमत आणा दोन आणे मला लगेच देत असत. एकदा वर्तमानपत्र घेऊन कुणाशीतरी बोलत ते तसेच निघून गेले. मीही पैसे मागितले नाहीत. पण पुढच्या वेळी ते जेव्हा आले तेव्हा त्यांनी मला एक रुपया काढून दिला आणि म्हणाले, “मागच्या वेळी गडबडीत पैसे न देता मी गेलो होतो. त्यांचा दंड म्हणून हा रुपया देत आहे.’ अशी त्यांची दृष्टी होती. कुणाचे नुकसान होऊ नये याविषयी ते फार जागरूक असत.”

श्रीरामपूरचे एक मोठे व्यापारी सुमनभाई फकीरचंद शहा यांनी सांगितले, “माझ्या वडिलांचे मित्र जी. डी. पटेल हे करमसीभाईंकडे इस्टेट मॅनेजर म्हणून कामाला होते. त्यामुळे करमसीभाईंची व आमची ओळख. आमच्या व्यवसायाची सुरूवात त्यांच्याच हाताने झाली व व्यवसाय नावारूपाला आला. ही सुद्धा त्यांची मेहेरबानी!

“हिंदू धर्माप्रमाणे जैन धर्मावरही त्यांची खूप श्रद्धा असल्याचे आढळते. बेलापूर येथील जागा जैन मंदिरासाठी त्यांनी अल्पशा दरात दिली होती. त्यांना शिक्षणाबद्दल खूपच आस्था आहे. आम्ही भावंडे लहान असलो तरी ते अगदी प्रेमाने वागवतात. लहान-मोठा असा भेदभाव नाही. संस्कृतभाषेवर त्यांचे खूपच प्रेम आहे. कधीही भेटलो की ते सांगत असत, ‘तुम्ही संस्कृत शिकले पाहिजे.’ धार्मिक कामात त्यांचा फार मोठा सहभाग होता. मी एकदा मुंबईला गेलो होतो, त्यावेळी ते आमच्या चंद्रशेखर महाराजांच्या दर्शनाला आले होते.”

प्रेमसुख हस्तीचंद झंवर हे बेलापूरचे शेती व्यवसायातले, करमसीभाईंच्या मित्रपरिवारातले एक गृहस्थ. ते सांगत होते, “मी बेलापूरचाच राहणारा. मोतीलाल नेहरू वारले तेव्हापासून मी काँग्रेसचे काम करत होतो. करमसीभाई आमचे पुढारी होते. ते सांगतील त्याप्रमाणे आम्ही राष्ट्रीय काँग्रेसचे काम करत होतो. ते आम्हांला भाषणे वगैरे लिहून देत असत. ते पाठ करून आम्ही बोलत असू. त्यावेळी मी सात-आठ वर्षांचा होतो. दारुबंदीसाठी पिकेटिंग करणे, लोकांना चरख्यावर सूत कातण्यास प्रवृत्त करणे अशी कामे आम्ही त्यांच्या हाताखाली करत असू.’

चंद्रकांत दुधेडिया म्हणाले, “माझे वडिल मदनलाल यांची करमसीभाईंशी मैत्री होती. १९७५ च्या सुमारास सौराष्ट्रामध्ये दुष्काळ पडला. जनावरांना चारा नसल्यामुळे

लोक ती सोडून जात असत व कसाई ही जनावरे घेऊन जात असत. करमसीभाईंनी अशा सातआठशे गायींना गोळा करून ठेवले व त्यांच्या चारापाण्याची व्यवस्था केली. दुष्काळ संपल्यावर त्या त्या मालकाला गाई परत केल्या. त्यावेळी काम करताना आम्ही तरुण असूनही थकत असू. पण करमसीभाई कधीच थकत नव्हते. चोवीस तास काम करण्याची शक्ती त्यांच्यात आहे."

बेलापूरचे रामनारायण ऊर्फ रामूशेठ खटोड हे शोभाचंद खटोड यांचे पुतणे. खटोड कुटुंबियांशी भागीदारीमुळे करमसीभाईंचा अत्यंत घरोब्याचा व जिव्हाळ्याचा संबंध जुळला. करमसीभाईंच्या पूर्वायुष्यातील माहिती सांगून रामूशेठ म्हणाले, "शेठजींनी १९३९ साली शुगर मिल काढली तेव्हा आमच्या काकांनी त्यात भाग घेतला नाही. काही लोकांनी त्यांचा गैरसमज करून दिला होता. त्यावेळी शेठजींनी आमच्या काकांची खूप समजूत काढली. त्यांना वाटायचे या धंद्यात शुभाकाकांची भागीदारी असावी. पण काकांनी आपली भागीदारी काढून घेतली.

"साखरेच्या व्यापारासाठी शेठजी गावोगावी फिरायचे. ज्या भागात आपल्याला जायचे आहे त्या भागाची माहिती ते आधी मिळवत असत.

"एखाद्या संस्थेला देणगी देताना ते मोठ्या चिकित्सकपणाने सर्व माहिती करून घेत. बेलापूरला शाळेसाठी देणगी मागायला आम्ही काही मंडळी गेलो तेव्हा ते म्हणाले, "तुम्ही किती पैसे जमवले आहेत ते सांगा, म्हणजे तेवढेच पैसे मीही देतो. तुम्ही पन्नास हजार जमवा, मी सुद्धा तेवढेच देईन." आमच्या शाळेला त्यांनी पन्नास हजार रुपये दिले. शेठजी आपल्या वागण्याने इतरांनाही त्याग करायला शिकवीत असत. आंधळेपणाने दान देणे त्यांना मान्य नाही. डोळसपणाने दान दिले पाहिजे, असे ते म्हणत.

"श्रीरामपूरला त्यांनी 'अर्पित' नावाची संस्था काढली. साखर घेणे व विकणे यातून मिळणारा नफा सार्वजनिक हितासाठी वापरला जाईल असा उद्देश ती संस्था काढण्याच्या मुळाशी त्यांचा होता. जगात जितक्या चांगल्या गोष्टी आहेत त्या अभ्यासाव्यात, त्यांचा परिचय करून घ्यावा, अशी त्यांची सदैव इच्छा असते. ते नेहमी म्हणत असत, रामलाल हा माझा पहिला मुलगा आहे. मलाही ते अगदी वडिलांप्रमाणे आहेत. माझ्या मुलाच्या लग्नाच्या पंगतीत स्वत: शांतीलालशेठ वाढायला पुढे सरसावले होते. या आपल्या जुन्या ओळखीच्या सर्व माणसांशी, सहकाऱ्यांशी, नातेवाईकांशी ते सतत संपर्क ठेवून असतात. पूर्वी ते फार प्रवास करीत असत. त्या वेळी ते ज्या भागात जातील तिथल्या अशा परिचित मंडळींकडे जाऊन गाठभेठ घेऊन आस्थेने

चौकशी करीत असत.”

बेलापूरचेच रामविलास सोमाणी हे शेठजींचे एक जुने स्नेही म्हणाले,

‘पैरका फरफरा।
जबानका चरचरा।
नाक कान का पटिधरा।
तो व्यापारी खरा।।

“व्यापारी लोकांमध्ये अशी म्हण आहे. त्याचा अर्थ असा की, सतत फिरणारा, तोंडाने बोलणारा, अपमान सहन करणारा, तो खरा व्यापारी!

“करमसीभाई रात्रंदिवस कष्ट करत असत. गावोगाव फिरत असत. साखरेच्या धंद्यात त्यांनी खूपच प्रगती केली.

टका है तो टेक।
नही तो टकमक देख।
और चांदीकी मेक।
और तमाशा देख।।

“डोके सुपीक असल्यानंतर काय होणार नाही? करमसीभाईंनी आपल्या कष्टाच्या व बुद्धीच्या जोरावर धन व कीर्ती मिळवली!”

श्री. पी. एम. कावेडिया हे आज सोमैया विद्याविहारच्या चिटणीसपदी आहेत. तसेच त्यांच्या कंपनीच्या संचालक मंडळातही आहेत. सोमैया परिवाराचे ते एक विश्वासू हितचिंतक आहेत. आपल्या आठवणी सांगताना कावेडिया म्हणाले, “करमसीभाईंचे पुत्र डॉ. शांतीलालजी सोमैया हे ज्या वेळी १९४३-४४ च्या सुमारास मॅट्रिकच्या वर्गात होते त्या वेळी त्यांच्याशी माझा प्रथम संबंध आला. मी त्या वेळी एम.ए.चा अभ्यास करत होतो. करमसीभाई प्रिन्सिपल वाघ यांना भेटण्यासाठी आले होते. आपल्या मुलाला पुढे कुठल्या कोर्सला घालावे याबद्दल ते माहिती घेत होते. प्रिन्सिपल वाघ त्यांना म्हणाले, “तुमच्या मुलाच्या भवितव्याबद्दल एम.ए.चा अभ्यास करणाऱ्या तरुण मुलाबरोबर तुम्ही चर्चा करावी.” वाघ यांनी करमसीभाईंचा माझ्याशी परिचय करून दिला.

“शांतीलालजी हे त्यावेळी मॅट्रिकचा अभ्यास पूर्ण केलेले शाळकरी पोशाखातले एक तरुण विद्यार्थी होते. करमसीभाईंच्या व्यक्तिमत्त्वाने मी पहिल्या भेटीतच आकर्षित झालो होतो. ते एक चांगल्या प्रकारचे उद्योगपती आहेत हे मी ऐकून होतो. मीही कच्छचा राहणारा आहे. शिक्षणाबद्दल मला खूप आस्था असून विल्सन कॉलेज व एच.पी.टी. कॉलेजमध्ये मी शिक्षण घेतले आहे.

“आमच्या भेटीनंतर थोड्याच दिवसांनी करमसीभाई व मुळजीभाई हे गवालिया टँकवर माझ्या घरी आले. त्यावेळी त्यांच्याशी झालेल्या चर्चेत मी त्यांना सांगितले होते की शांतीलालजींनी शुगर टेक्नॉलॉजिस्ट बनण्याच्या दृष्टीने कोर्सेस निवडावेत. करमसीभाई म्हणाले, शुगर टेक्नॉलॉजी हा एक भाग झाला. पण त्यासाठी मूळ ज्ञान जे शास्त्र, त्याचा पण आपण अभ्यास केला पाहिजे. मग मी सांगितले की, त्यांनी प्रथम सायन्स साईड निवडावी. कारण त्यामुळे बेसिक ज्ञान होतेच, शिवाय आपल्या हाताखालच्या माणसांना कामे समजावून देता येतात व त्यांचेही विचार समजावून घेता येतात.

“त्यामुळे शांतीलालजी आर्टस वा कॉमर्सकडे न जाता बी.एस्सी., एल.एल.बी. झाले आहेत.

“शांतीलालजी कॉलेजमध्ये जाऊ लागल्यानंतर एक वर्षाने शेठजींनी मला बोलावून घेऊन, ‘गोदावरीमये तुम्ही नोकरीसाठी का येत नाही?’ अशी विचारणा केली. म्हणून मी माझे शिक्षण संपल्यावर गोदावरी शुगर मिलच्या फाजलभाय बिल्डिंगमधील ऑफिसमध्ये नोकरीस राहिलो. मला अतिशय मानाने वागवण्यात आले. रणछोडभाई कोटक यांच्यानंतर तिथे माझा अधिकार मानला जात असे. या काळात मोठ्या शेठजींकडून मला खूपच शिकायला मिळाले. मी दोनच वर्षे गोदावरीत राहिलो. माझ्या कुटुंबीय मंडळींच्या व हितचिंतकांच्या दबावामुळे व सल्ल्यामुळे मी आयात-निर्यात करणाऱ्या एका मोठ्या कंपनीमध्ये नोकरीस गेलो.

“१९४७ नंतर १७-१८ वर्षे मी गोदावरीच्या बाहेर नोकरी केली. मी जरी गोदावरीची नोकरी सोडलेली होती तरीसुद्धा माझे उद्योगधंद्यातले-व्यवसायातले प्राथमिक शिक्षण गोदावरीतच करमसीभाईंच्या मार्गदर्शनाखाली झाले होते. त्यांचे व माझे संबंध अत्यंत सलोख्याचे होते. म्हणूनच सोमैया विद्याविहारचा आराखडा करण्यात माझा हातभार लागला आहे. विद्वान लोकांना या संस्थेत आणण्याबाबत करमसीभाई व शांतीलालभाई सतत प्रयत्नशील असत. त्यांच्या नोकरीत नसताना देखील त्यांनी मला संचालक म्हणून घेतले होते.

“१९६४ सालच्या नोव्हेंबर महिन्यात मी परत गोदावरीत दाखल झालो. त्यानंतर ५-६ महिन्यांनी मी आजारी पडलो. शरीरातील रक्त कमी झाल्यामुळे डॉक्टरांनी मला विश्रांती घ्यायला सांगितले होते. त्यावेळी स्वत:ची देखील तब्येत बरोबर नसताना लीलाबेनना घेऊन मोठे शेठजी माझ्या घरी आले. त्यांच्या येण्यामुळे आमच्या घरचे लोक अतिशय प्रभावित झाले. मी ज्या बिल्डिंगमध्ये राहत होतो ती बिल्डिंग पडत आलेली होती. आधाराला ठिकठिकाणी खांब लावले होते. ती जागा पाहून ते म्हणाले, “आमच्या उद्योगसमूहाचे तुम्ही आधारस्तंभच आहात. तुम्ही अशा घरात राहणे बरोबर नाही.”

“नंतर त्यांनी शांतीलालजींबरोबर चर्चा केली व तीन महिन्यांतच मला चांगल्या प्रकारचा फ्लॅट दिला. तो फ्लॅट खरेदी करण्यासाठी त्यांनी मला आर्थिक मदतही दिली.

आपल्या हाताखाली काम करणाऱ्या माणसांचे हित जपणे हे सोमैया कुटुंबियांचे मोठे वैशिष्ट्यच आहे.

करमसीभाईंनी आपल्या उद्योग-व्यवसायाव्यतिरिक्त सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्वरूपाच्या कामात अत्यंत आस्थापूर्वक सहभाग दिलेला आहे. समष्टीचा कार्यात कर्तव्यभावनेने तन-मन-धनाने परिश्रमपूर्वक मदत केलेली आहे व आपले जीवन याही दृष्टीने समृद्ध बनविले आहे."

१९२५ सालापासून डॉ. जुवेकर यांचा दवाखाना बेलापूरात होता. डॉक्टर स्वातंत्र्याच्या चळवळीत होते. स्वदेशी, चरखा, खादी या प्रचारामुळे त्यांचा आणि करमसीभाईंचा दृढ संबंध आला होता. श्रीमती जुवेकरबाईंनी सांगितले, "माझे लग्न १९२७ साली झाले आणि आम्ही बेलापूरला राहू लागलो. चळवळीमुळे शेठजी डॉक्टरांचे मित्र बनले. सभेत भाषण करीत असत. झेंडा लावून स्वत: वंदे मातरम् म्हणत असत. १९३१ साली डॉक्टरांना भाषणबंदीची नोटीस मिळाली. शेठजी स्वत: तुरुंगात गेले नाहीत पण स्वातंत्र्यसैनिकांना व त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यात त्यांचा हात असे. डॉक्टर तुरुंगात गेल्यावर मलाही त्यांच्याकडून मदत मिळाली होती."

श्रीरामपूरचे डॉ. ना. वा. पंडित आपल्या आठवणी सांगताना म्हणाले, "१९४६ साली मी श्रीरामपूरला आलो. मला राहायला व दवाखान्यासाठी जागा पाहिजे होती. मी नगरला आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये हाऊस-सर्जन म्हणून काम करत होतो. जागेच्या संदर्भात माझ्या मित्राने सांगितले की आपण बेलापूरच्या एका व्यक्तीकडे जाऊ. त्यांच्याबरोबर मी शोभाकाका खटोड यांच्याकडे गेलो. त्यांनी माझी चौकशी करून सांगितले, आमच्या शेतीफार्मवरील मजुरांचे आरोग्य तपासणीचे काम करा. करमसीभाईंनाही त्यांनी माझ्याबद्दल सांगितले. पगार अल्पसा होता. पण सुरूवात म्हणून मी संमती दिली. त्या वेळी मी मालुंज्यात राहत असे.

"करमसीभाईबरोबर काम करत असताना त्यांचा कामाचा उरक किती आहे याची जाणीव मला झाली. समोरचा माणूस किती बुद्धिमान आहे याची ते बरोबर पारख करत असत. त्यांच्या एका फार्म ओव्हरसियरला सिव्हिअर टायफॉईड झाला होता. त्यांना मी औषधोपचार करीत होतो. करमसीभाईंनी मला विचारले, 'ही केस तुम्ही व्यवस्थित हाताळू शकाल का? हा माझा चांगला अधिकारी आहे व त्याच्यावर माझे खूप प्रेम आहे.' मी त्यांना सांगितले की, 'टायफॉईडवर खास काही औषध नाही. (त्यावेळी आजच्यासारखी औषधे नव्हती.) फक्त शुश्रूषा हाच त्यावर उपाय आहे. मला असं वाटतं की मी त्यांना बरं करू शकेन. नगरला आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये असताना मी अशा केसेस हाताळल्या आहेत.' हे

समजावून सांगितल्यावर त्यांना खूप बरे वाटले.

"आमच्याजवळ काही वाहन नव्हते. आम्ही दोघे ट्रॅक्टरवरून तिथे गेलो. रस्ता चांगला नव्हता. खड्डे फार होते. ड्रायव्हरला त्यांनी ट्रॅक्टर हळू व नीट चालविण्यास सांगितले. ती केस मी बरी केली.

खटोड यांचा घन:श्याम नावाचा एक चुलतभाऊ होता. टी.बी. मॅनेंजायटीसने आजारी होता. त्याला मुंबईला रॉक्सी टॉकीज जवळील डॉ. शहा यांच्या पॉलिक्लिनीकमध्ये ट्रीटमेंटसाठी ठेवण्यात आले होते. तेथे सुखटणकर म्हणून डॉक्टर होते. ते औषधोपचार करीत असत व खास कन्सल्टंट म्हणून डॉ. एन.डी. पटेल यांना बोलावत असत. तिथे पेशंटला पाहण्यासाठी करमसीभाई आले होते. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, सिव्हिअर डोकेदुखी व मानेचा स्टिफनेस यांमुळे ही केस टी.बी. मॅनेजायटीसची असावी असे मला वाटले. म्हणून मोठ्या डॉक्टरांनी पाहून निदान करावे यासाठी मी यांना इथे आणण्याचा सल्ला दिला. करमसीभाईंनी मला विचारले, "तुम्ही याला अँटीट्युबरकिलॉसिसची ट्रीटमेंट दिली का?' मी 'नाही' म्हणून सांगितले. करमसीभाईंची प्रत्येक विषयाची माहिती घेण्याची वृत्ती मला दिसून आली. आपण डॉक्टर नसूनसुद्धा ते आरोग्य, औषधे व उपचारपद्धती यासंबंधीचे वाचन करीत असत.

करमसीभाईंना हा अभ्यासू दृष्टीकोन कोठून लाभला हे मला सांगता येणार नाही, पण मला वाटतं, गरिबीत माणसाची बुद्धी अतिशय तीव्र असते. अर्थात त्यानं योग्य दिशेनं आपली बुद्धी चालवली पाहिजे. करमसीभाई हे करू शकले आणि उत्तरोत्तर ते मोठे होत गेले."

कोपरगावचे श्री. के. बी. रोहमारे हे १९६२च्या सुमारास आमदार होते. सहकारी साखर कारखानदारीशी त्यांचा संबंध होता. कोपरगावला महाविद्यालय काढण्यातही ते प्रयत्नशील होते. सुरूवातीस करमसीभाई व नंतर शांतीलालजी यांच्याशी त्यांचा खूपच संबंध आला होता. ते सांगत होते, "एकदा मी मुंबईला करमसीभाईंच्या ऑफिसमध्ये गेलो होतो. तेव्हा तिथे जमिनीचे लेव्हलिंग करणारे एक कॉन्ट्रॅक्टर बसले होते. वाटाघाटीत ते साडेसात रुपये भाव मागत होते व करमसीभाई सव्वासात रुपये द्यायला तयार होते. बऱ्याच घासाघाशीनंतर सव्वासात रुपये हाच दर ठरला. कॉन्ट्रॅक्टर गेल्यानंतर शेठजी मला म्हणाले, "चार आणे दरासाठी मी घासाघीस करत होतो. पण त्यामुळे आमच्या ट्रस्टचे चाळीस लाख रुपये वाचले!" व्यवहारातील शेठजींची जिद्द, चिकाटी व चातुर्य हे गुण वाखाणण्यासारखे आहेत.

"साध्या-साध्या गोष्टीतही त्यांची शिकवण मोठी असते. पानात उष्टे टाकायचे नाही, असा त्यांचा दंडक आहे. एकदा सर्व सोमैया कुटुंबिय कोपरगाव येथे माझ्या घरी

झरा मुळिचाचि खरा

नाभिषेको न संस्कार : सिंहस्य क्रियते वने।
विक्रमार्जितसत्त्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता।।

सिंहावर राज्याभिषेक किंवा संस्कार करण्यात येत नाही.
तो स्वत:च्या पराक्रमाने सर्व प्राण्यांना नमवून राज्यपद मिळवतो.

झरा मुळिचाचि खरा

शंभर वर्षे वयाचा, अंगा-खांद्यावर अनेक फांद्या, पाने व पारंब्या धारण केलेला, तीन-चार पिढ्या पाहिलेला, पुराणपुरुषासारखा घनदाट,
सांद्र, शांत सावली पायतळीच्या भुईवर अंथरलेला, मोठा भव्य
विस्तार असलेला, प्रगाढ प्रौढपणा पांघरलेला, दिमाखदार वटवृक्ष
जसा असावा तसेच करमसीभाई जेठाभाई सोमैया आहेत!

शंभरीच्या घरातलेच, चार पिढ्यांचा विसतार ल्यायलेले, शांत-सहिष्णू-धार्मिक-सौजन्यशील कर्मवीर!

कर्माच्या दुर्बिणीतून पाहताना तर कॅलिडोस्कोपप्रमाणे विविध अंग-रंग आकृत्यांनी नटलेले करमसीभाईंचे व्यक्तिमत्त्व विलक्षण विलोभनीय दिसते!

'देहधारी करमसीभाई एक पण या एकात अनेक करमसीभाई सामावलेले आहेत!

'एकं सद्विग्रा बहुधा वदन्ति' - हा तर अद्वैत तत्त्वज्ञानाचा बीजमंत्र आहे. जगताचे आरंभी एक सत् तत्त्वच असून त्यालाच ज्ञानी लोक आपापल्या अनुभूतीप्रमाणे विविध नामांनी ओळखतात. जे मुळात एक व नित्यच; त्याला निरनिराळी नावे दिली जातात. व्यवहारात एक-देवत्वाची कल्पना या सूक्ताने मांडली जाते. विविधतेतून एकता - 'अविभक्तम् विभक्तेषु' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. कमलपुष्प याचे प्रतीक आहे! एका देठावर अनेक सुगंधरंगी पाकळ्या सहज-सुंदर आनंद-वृत्तीने प्रफुल्लित झालेल्या दिसतात!

अशा एकात अनेक असणाऱ्या व्यक्तित्वालाच 'बहुआयामि' व्यक्तिमत्त्व किंवा 'मल्टी डायमेन्शनल पर्सनॅलिटी' म्हणतात.

एका करमसीभाईंमध्ये प्रापंचिक गृहस्थ, कुशल व्यापारी, निर्मितीक्षम उद्योजक, सृजनशील शेतकरी, धर्मपरायण भक्तिमार्गी, आध्यात्मिक साधक, निस्सीम देशभक्त, सौंदर्यलक्षी, निसर्ग-साहित्य-संगीत-कला व भ्रमण प्रेमी, शिक्षण-संस्कार-सज्जनता वृद्धीसाठी

निरंतर झटणारा समाजहितकर्ता.... अशा विविध रूपांनी अन्य करमसीभाई वसत आहेत!

या एका करमसीभाईंमधल्या अनेक करमसीभाईंनी आपापल्या क्षेत्रात, अन्य बघणाऱ्या-ऐकणाऱ्यांनी थक्क होऊन जावे असे, डोंगराएवढे कार्य केलेले आहे! त्यांतील काहींचा परिचय व मोजमाप येथवरच्या प्रकरणांतून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण अशा स्वरूपाचे प्रयत्न स्थूल स्वरूपाचेच असतात. कारण काही प्रयत्न शब्दांमध्ये मावत नसतात, तर काहींचे मोजमाप काढताच येत नसते. ते अशा शब्दांच्या आणि मोजमापांच्या पलीकडेच असतात!

करमसीभाईंच्यासारखे मूलत:च जीवनाचे स्वरूप जाणणारे मात्र अशा कुठल्याही, लौकिक मोठेपणाच्या धोक्यापासून स्वत:ला सावरून लांब ठेवीत असतात. ते मोठे सजग, सावध असतात. म्हणूनच करमसीभाई म्हणतात, "मी आहे एक छोटा माणूस. लहान माणूस. वयानं मोठा आहे, पण गुणानं, कार्यानं मोठा नाही. छोटाच आहे. लौकिकदृष्ट्या माझ्या हातून जे काही मोठं घडलं असेल त्याचं श्रेय माझं नाही. त्या श्रेयाचा धनी आहे परमात्मा - भगवंत! म्हणूनच हे ज्याचं आहे त्या विश्वचालकाच्या चरणी समर्पित करून टाकतो. ज्याचं जे आहे त्याला ते देऊन टाकलेलं बरं. नाहीतर मोठेपणाच्या भ्रमात अडकून अहंकारात गुंतून पडेन! मी खेड्यात जन्मलेला, खेड्यात वाढलेला, सहावीपर्यंत शिकलेला अल्पशिक्षित, कोणाचे मार्गदर्शन नाही, कोणी गुरू नाही, कसली माहिती नाही. आपल्याला आश्चर्य वाटेल पण व्यवसायाच्या प्रारंभ काळात बँक व बँकिंग म्हणजे काय हे देखील ठाऊक नव्हते... अशा कितीतरी गोष्टींत मी अज्ञानी होतो. याचं कारण म्हणजे फारसं जाणं-येणं नाही, कुणात मिसळणं नाही, कुणाची चौकशी नाही. असा मी एकांडा शिलेदारच होतो. आपण भलं आणि आपलं काम भलं अशी माझी वृत्ती.

"पण एक गोष्ट मात्र आजपर्यंतच्या आयुष्यात मोठ्या कटाक्षानं पाळली आणि ती म्हणजे जिद्द व चिकाटी. या सद्‌गुणांचं बोट कधी सोडलं नाही. लहान-मोठा व्यवसाय असो किंवा सेवाकार्य असो ते जिद्दीनं, चिकाटीनं केलं. ते करताना संकटं आली, अडीअडचणी आल्या, निराशेचे प्रसंग उद्‌भवले. पण धीर सोडला नाही. जिद्द-चिकाटी सोडली नाही. परमेश्वरावर भार टाकून करीत राहिलो.

"मी इश्वरनिष्ठ आहे, पण तथाकथित दैववादी प्रयत्न आहे. 'यत्न तो देव जाणावा' – प्रयत्न हाच मी देव मानतो. मला माझ्या उद्योगव्यवसायातील प्रयत्नांत ईश्वर गवसला. प्रयत्नांती परमेश्वर! त्यानं माझ्या प्रयत्नाला उदंड यश दिलं. वाटचालीतल्या अडचणी दूर केल्या. मला यशवंत केलं. अनेक वेळा याची प्रचिती आली. एकदा दोनदा नव्हे. अनेक वेळा.

"जिद्द-चिकाटीबरोबरच व्यवसायाला, मग तो कोणताही व्यवसाय असो - औद्योगिक

कारखानदारी असो, शेती असो, शिक्षण-सेवाकार्य असो त्यासाठी स्थिर, शांत वृत्ती, गोड बोलणं, सहिष्णुता, परपीडा जाणणं, त्यांच्या मदतीला धावणं यांची गरज असते. ह्या गोष्टीतून माणसं जोडता येतात. माणसांची पारख होते. गुणी माणसं पारखून जोडणं फार महत्त्वाचं असतं. माणसामाणसातील जिव्हाळ्याचं नातं, प्रेम, विश्वास या गोष्टी पैशानंही मिळवता येत नाहीत. विकत घेता येत नाहीत. त्या आपल्यातील सचोटीनं आपल्याला कमवाव्या लागतात.

"आजच्या जगात माणसाशिवाय अन्य सर्व गोष्टींना मोल आहे. माणूस आणि त्याची माणुसकी हरवलेली आहे. माणसामाणसांतील माणुसकी, मानव्य लोप पावलेलं आहे आणि ही फार भयावह स्थिती आहे, असं मला वाटतं. सर्व शास्त्रे, ज्ञान-विज्ञान यांची सर्व वाटांनी भरभराट होत आहे. मानवी सुखासाठी विकासाच्या सर्व वाटा मोकळ्या होताना दिसत आहेत. पण ज्या माणसासाठी विकास, तो माणूस मात्र गमावून बसलेला दिसतो आहे!

"म्हणून सर्व विकासाबरोबरच मानण्याची प्रतिष्ठा राखण्याचाही यत्न व्हायला हवा. तरच विकासाला विधायकता प्राप्त होईल!

"कुठल्याही कार्यात, व्यवसायात, वाटचाल करीत असताना कसोटीचे क्षण येतात. बिकट प्रसंग उद्‌भवतात. पुराणात मोठमोठ्या तपस्वी व त्यागी ऋषींच्या तपस्येची कसोटी पाहिल्याच्या गोष्टी आहेत. कसोटी म्हणजे सत्त्वपरीक्षेचीच वेळ असते. अशा कुठल्याही मोहाला, लाभाला, मोठेपणाला, प्रतिष्ठेला बळी न पडता आपले सत्त्व राखले पाहिजे आणि कसोटीस उतरले पाहिजे. या कसोटीत आपले व्यक्तीगत चारित्र्य व व्यवसायाचा किंवा उत्पादनाचा उच्च दर्जाही अभिप्रेत आहे.

"त्यासाठी हवी असणारी मुख्य गोष्ट म्हणजे सचोटी! सर्व आयुष्यात एक-दोन प्रसंग सोडले तर मी कधी खोटं बोललो नाही. बालपणापासूनच मी असत्यापासून दूर राहत आलो. महात्मा गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव तरुणपणापासूनच माझ्यावर पडला. बेलापूरला असताना मी खादीधारी बनलो. खादीभांडार उघडले. गोरक्षणासाठी धडपड केली. स्वातंत्र्यलढ्यात थोडंफार काम केलं. पुढं व्यवसायात सचोटीनंच वागलो. व्यापार-उद्योग सचोटीनं करता येत नाही, असं म्हणणाऱ्यांनीच आपल्या खोट्यानाट्या कारभाराने व्यापार-व्यवसाय बदनाम केला आहे. पण हे खोटंच आहे. सचोटीनं उत्तम व्यापार-उद्योग करता येतो, असा माझा दीर्घकालीन अनुभव आहे. सचोटीच्या बळावरच मला माझ्या व्यवसायात उत्तम यश जोडता आलं आहे. सचोटीच्या वाटेने गेल्यामुळेच मी आज शंभरीच्या दारात आनंदी आहे. गिरिजनप्रगतीमंडळ, नेत्रशिबिरे किंवा विद्याविहारसारखे शैक्षणिक प्रकल्प, वैद्यकीय सेवा ही याच विचारवृक्षाला आलेली मधुर फळं आहेत. मी फक्त निमित्तमात्र आहे. परमेश्वराच्या हातातील एक अवजार बनण्याची मला संधी मिळाली, ही, त्या दयाघन परमेश्वराची असीम कृपा आहे. वयाच्या ९६व्या वर्षी आता मी जेव्हा मागे

वळून बघतो तेव्हा माझे मलाच आश्चर्य वाटते की हे सर्व घडले कसे? झाले कसे?... मी तर असा अल्पशक्ती, अल्पमती, अल्पगती मनुष्य. मग हे झाले कसे?... तेव्हा मला माझ्या पाठीशी सदैव उभा असलेला, माझी करंगुली धरून चालवणारा तो दयाघन परमेश्वर भासमान होतो. अदृश्य स्वरूपात दिसतो! माझी धन्यता असेल तर एवढीच! माझे कर्तृत्व असेल तर एवढेच!

"जीवनाच्या या प्रदीर्घ प्रवासात अशा तऱ्हेने वागतानासुद्धा कधीतरी चुकूनमाकून, कळत-नकळत माझ्याकडून काही व्यक्तींवर अन्याय झालेला आहे. याची पण कबुली देतो व पश्चात्ताप व्यक्त करतो. क्षमायाचना करतो."

एकदा करमसीभाईंनी असेच आपले एक हृदगत सांगितलेले आहे. ते म्हणतात, "आज १२ जुलै १९९४. माझा नातू समीरभाई यांच्या मंगलविवाहाचा दिवस. विवाहसमारंभ अहमदाबादला होत आहे. १६ जुलैला मुंबईत रिसेप्शन - स्वागत समारंभ ठेवला आहे. अनेकजण उपस्थित राहतील आणि आनंदसोहळ्यात भाग घेतील.

"मीही फार फार सुखावून गेलो आहे. आनंदात आहे!

"परमेश्वराकडे अधिक आणि उणे म्हणजेच जमा आणि खर्च अशी हिशेबाची चोपडी नाही. पण दोन स्वतंत्र माहितीच्या वह्या ठेवलेल्या कचेऱ्या आहेत. एका वहीवरून आयुष्यात केलेल्या सत्कृत्याबद्दल पारितोषिक लाभते आणि दुसऱ्या वहीतील कुकर्मांच्या नोंदींवरून कठोर शिक्षा मिळते.

"पारितोषिक लाभण्याचे माझे दिवस आता संपलेले आहेत आणि नकळत घडून गेलेल्या गैरकृत्याबद्दलचा दंड भरीत आहे.

"मला माझे सारे गतायुष्य आठवले आणि त्यातील ईश्वरी प्रसादांच्या क्षणांचे स्मरण झाले, म्हणजे कृतज्ञतेने माझे डोळे अश्रूंनी डबडबून येतात. अश्रूधारा पाझरू लागतात.

"अलीकडे काही वर्षे मी शारीरिकदृष्ट्या परावलंबी बनलो आहे. याचे मला फार दु:ख वाटते. दोन वर्षांपूर्वीच, १८ जुलै १९९५ रोजी माझी धर्मपत्नी साकरबाई ही मला इथे माघारी ठेवून देवाघरी गेली. याचेही दु:ख मला फार जाणवते आहे. साकरबाई या फार मोठ्या उदार मनाच्या व धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांनी माझा मोठा प्रपंच तर सावरून धरलाच, पण तेवढ्याच मोठेपणाने इतर अनेकांचे प्रपंचही उभारून दिले. आपल्या प्रेमळ व गोड स्वभावाने त्यांनी अनेक माणसे जोडली. अनेकांवर वात्सल्याचा वर्षाव केला!

"आज माझ्या अशा विकलांग अवस्थेत माझ्या पोटी, जणू माझी आईच बनून आलेली माझी लाडकी कन्या चि. लीलाबेन हीच माझा सर्व आधार बनलेली आहे. ती घेत असलेल्या कष्टांचे व करीत असलेल्या सेवेचे किती म्हणून कौतुक करू!

"तशी घरातील सर्वांचीच व बाहेरीलही अगणित मित्रांची प्रेमभावना मला लाभलेली

आहे. मी कृतकृत्य आहे. हे सारे ज्यांच्यामुळे लाभले त्या ईश्वराचे गुणगान गाणारे माझे आवडते भजन आठवून हे निवेदन संपवतो. भजनाची प्रारंभीची ओळ अशी आहे -

'हे करुणाना करनारा।
तारी कारुणानो कांइ पारनथी।।'

माझी आवडती प्रार्थना आहे :

'न त्वहं कामये राज्यं न स्वर्ग नापुनर्भवम।
कामये दु:खतप्तानां प्राणीनां आर्तिनाशनम्।।'

करमसीभाईंशी वेळोवेळी झालेल्या बोलण्यातून, चर्चेतून हे निवेदन शब्दबद्ध केलेले आहे.

उद्योग-व्यवसाय करीत असतानासुद्धा करमसीभाईंनी जसे देशकार्याचे व समाजकार्याचे भान राखले होते, तसेच भक्तीभावाने अध्यात्म साधनेचीही जाण ठेवलेली होती. सत्संगाची आस बाळगलेली होती. चारी धाम यात्रा, पवित्र तीर्थस्थानांची दर्शन यांसाठी जशी त्यांची अर्थाची व वेळेची यथायोग्य वेच केली, तशाच कथा-कीर्तने-भजने-प्रवचने यांचीही योजना केली.

करमसीभाईंनी पूजनीय डोंगरे महाराज, मुरारीबापू, पांडुरंगशास्त्री आठवले, चिन्मयानंद अशा अध्यात्म क्षेत्रातील श्रेष्ठींचा सहवास मिळविला. त्यांची प्रवचने मोठ्या प्रमाणावर घडवून आणली. हजारो लोकांना त्यांच्या अमृतवाणीचा लाभ मिळवून दिला. केवळ मुंबईतच नव्हे तर श्रीरामपूर येथे मुरारीबापूंची रामकथा तिथल्या श्रोत्यांना ऐकण्याची सुसंधी प्राप्त करून दिली होती. त्याचे सर्व आयोजन करमसीभाईंनीच केलेले होते. इतकेच नव्हे तर प्रारंभीचे प्रास्ताविक भाषणही त्यांनी मोठ्या तयारीने केलेले होते. मोठमोठ्या शहरांतील व परदेशांतील श्रोत्यांबरोबरच ग्रामीण भागातील जनसामान्यांची जीवन-सार्थकतेची अमृतवाणी ऐकण्याची संधी दिली पाहिजे, असा त्यात आग्रह होता.

साकरवाडीला पांडुरंगशास्त्री आठवले आणि चिन्मयानंद यांची प्रवचने तेथील कर्मचारी व नागरिक यांच्यासाठी मुद्दाम आयोजिलेली होती. प्रभुपाद स्वामींच्या निकट जाण्याचे भाग्यही त्यांना लाभले होते. तसेच रविशंकर महाराज यांच्या सात्त्विक साधुत्वाचा लाभही करमसीभाईंना झाला होता. अनेक साधू, संन्यासी, साधक यांना त्यांनी जवळ केले होते. आश्रयही दिला होता. हे सर्व करीत असताना सुद्धा त्यांच्यातला रत्नपारखी सदैव जागाच होता. सावध होता. भगव्या वस्त्राआडचा सच्चेपणा आणि कच्चेपणा ते ओळखून होते. तथापि त्यांच्या परमश्रद्धेला कधी ढळ पोचली नाही, की तडा गेला नाही. ती अढळ, अविचल,

निर्मळ, निरागस, नि:स्वार्थ, निरुपाधिक अशीच राहिली!

सत्याचा आग्रह व कर्म-उत्कटता त्यांच्या ठायी इतकी आहे की 'नंतर' हा शब्ददेखील त्यांना खपत नाही; नंतर नाही, 'आत्ता'-'आत्ताच' - म्हणा नि करा, असे त्यांचे सांगणे व करणे असे आणि म्हणूनच निर्मळ विनोदाचा शुद्ध झरा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झुळझुळताना दिसतो. शब्दनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोद ही त्यांची खासीयत आहे. करमसीभाईंचे असे विविध रूपांनी नटलेले एकरूप व्यक्तित्व पाहिले म्हणजे त्यांच्यातील अस्सलपणाची अधिकच ओळख पटते आणि म्हणावेसे वाटते :

तुका म्हणे झरा।
आहे मुळिचाचि खरा।।

❖

महायात्रा



तत्र का परिदेवता।

सिंहावर राज्याभिषेक किंवा संस्कार करण्यात येत नाही.
तो स्वत:च्या पराक्रमाने सर्व प्राण्यांना नमवून राज्यपद मिळवतो.

महायात्रा

सद्‌भाग्याने लाभलेल्या दीर्घायुष्यात करमसीभाईंनी बरेच दूरवरचे प्रवास केले. देशाच्या काना-कोपऱ्यांत तीर्थाटनांच्या निमित्ताने ते पोहोचले. तसेच हिमालयाच्या सावलीतही त्यांनी अमरनाथासारखी खडतर यात्रा केली. त्याहूनही हिमालयाच्या पलीकडील तिबेट-मधून, कैलास मानसरोवराच्या यात्रेचे पुण्य पदरी जोडले.

करमसीभाईंच्या जीवनातील हा यात्रा-योग केवळ प्रवासापुरताच मर्यादित होता असे नाही तर त्यांनी आपल्या जीवनाशी जो कर्मयोग जोडला होता, तो म्हणजेही त्यांची अलौकिक अशी एक कर्मयात्राच होती. या यात्रेचे सविस्तर दर्शन आपण येथवर मागील पृष्ठांमधून घेतलेच आहे.

करमसीभाईंसारख्या कर्मयोगी यात्रिकाला प्रदीर्घ अशी जीवनयात्रा करण्याचाही महायोग लाभला हे त्यांचे मोठे सुदैव.

आपल्या वयाच्या नव्वदीपर्यंत किंवा त्यापुढे एक-दोन वर्षांपर्यंत ते आपल्या कर्मयोगात मग्न राहिलेले होते. त्या सुमारास त्यांचे शरीर वार्धक्याने जर्जर होऊ लागले होते. कंपवाताने त्यांचे कर्मयोगी हात थरथरू लागले होते. पायातील बळ ओसरू लागले होते. बोलण्यातील आवाजात खोलपणा जाणवू लागला होता. परंतु इतके असूनही करमसीभाईंनी आपल्या नित्य कर्मात कधीही खंड पडू दिला नव्हता. घरी असले तरी काम आणि जेवून कचेरीत गेले तरी संध्याकाळी घरी परतेपर्यंत कामच काम. ते थरथरत्या हातांनी निरनिराळ्या फायलींचे बंध सोडीत असत आणि हवी ती कागदपत्रे अचूकपणे काढीत असत. काम होताच पुन्हा ती त्या त्या फायलीत सुरक्षितपणे ठेवीत असत. त्यांच्या कामाचे विभागही अनेक होते. त्यामुळे त्यांच्या फायली आणि त्यांतील कागदपत्रेही अगणित होती. त्यांच्या उशा-पायथ्याशी फायलींचा ढिगारा दिसत असे. त्याशिवाय पत्रलेखन, दूरध्वनी, आल्या-गेल्यांशी चर्चा ही कामेही त्यांची अखंडपणे चालू होती. शरीर थकत चालले होते, पण त्यांचे मन सदैव ताजेतवानेच राहिले होते. त्या

पिकल्या वयातही ते नरेशवाडीला जात असत. तेथील झाडांशी, पिकांशी ते बोलत असत. डेअरीमधील गाईंच्या पाठीवरून मायेचा हात फिरवीत असत. आदिवासींच्या जीवनात भावसाक्षरतेबरोबरच सुखाचा वारा कसा येऊ शकेल याची ते चिंता वाहत असत.

शिक्षणावर त्यांचे विलक्षण प्रेम होते. माणसाला माणूसपण मिळते ते शिक्षण आणि संस्कार यांद्वारेच, यावर त्यांचा दृढ विश्वास होता आणि म्हणूनच करमसीभाईंनी घाटकोपरजवळ विद्यादानाची एक तुंगार विद्यानगरीच उभी केली होती. अगदी पूर्ण प्राथमिक शिक्षणापासून ते आजच्या सुधारलेल्या संगणकीय शिक्षणापर्यंतची सर्व सोयी, प्रगती अत्याधुनिक साधनांसह त्यांनी करून ठेवली होती.

विद्याविहारच्या प्रांगणात जे जे सांस्कृतिक प्रवचनादी कार्यक्रम होत असत त्याला करमसीभाई अगदी व्हीलचेअरवर असनूही उपस्थित राहत असत आणि अशाप्रकारे जीवनयात्रा कंठीत असतानाच अखेरची तीन-चार वर्षे मात्र त्यांनी अगदी नाईलाजाने स्वत:च्या मनाविरुद्ध बिछान्यावर काढली. परंतु त्या अवस्थेतही होईल तेवढे काम ते करीतच राहिले होते. अशा अवस्थेत ९७ वर्षांच्या करमसीभाईंना एकच खंत वाटत असे आणि ती म्हणजे... 'ज्या शरीराने दुसऱ्याची सेवा करायची त्या आपल्या शरीराला दुसऱ्याकडून सेवा करून घ्यावी लागत आहे', याची. प्रस्तुत लेखकाजवळ ते अनेकवेळा म्हणालेदेखील. ''मला परावलंबित्व आले आहे, याचे फार दु:ख होत आहे.'

करमसीभाईंसारख्या आपल्या जीवनाच्या संदर्भात दुसऱ्याला काडीचाही त्रास होऊ नये म्हणून सजग सावधपणा बाळगून स्वावलंबी जीवन जगणाऱ्या माणसाला अशा परावलंबित्वाचे दु:ख होणे स्वाभाविकच आहे.

करमसीभाईंचा पिंड मूलत: धार्मिक, आध्यात्मिक प्रवृत्तींचा होता. त्यामुळे शंभरीच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या करमसीभाईंची चित्तप्रवृत्ती अगदी साहजिकपणेच प्रपंच व्यवहारापासून अलिप्त झालेल्या होत्या आणि एक प्रकारची समाधानी तृप्ती त्यांच्यामध्ये दिसू लागली होती. करमसीभाई आपली लाडकी कन्या - जिच्यात त्यांनी आपली आईच पाहिली होती, अशा लीलाबेनच्या हातून ते नाना प्रकारच्या औषधांबरोबरच अत्यंत अल्पसा रसाहार अनिच्छेनेच, बळेबळे घेत असत. पुढे पुढे तर त्यांनी असे खाणे-पिणे वर्ज्यच करून टाकले होते आणि प्रायोपवेशनाची कास धरली होती.

संत कबीर आपल्या दोह्यात म्हणतात, ''देवाच्या घरून येताना ही देहाची चादर जशी निर्मळ मिळाली होती, तशीच ती देवाच्या दारी जाताना पुन्हा निर्मळच करून नेली पाहिजे.'

करमसीभाईंच्या एका प्रकारच्या प्रायोपवेशनाच्यामागे कबीराचा हा दोहा असावा!

आणि अशा प्रकारे आपली आध्यात्मिक यात्रा चालू असतानाच अखेर ९ मे १९९९

रोजी करमसीभाईंनी या इहलोकाचा निरोप घेऊन अनंताच्या प्रवासासाठी आपल्या महायात्रेचा शुभारंभ केला.

करमसीभाईंसाठी जी महायात्रा शुभदायक होती ती त्यांच्या आजूबाजूच्या व नजीकच्या आप्तेष्ट मित्रांसाठी दु:खदायक, वियोगाची होती. परंतु करमसीभाईंसारख्या महायात्रिकाच्या जाण्याचे दु:ख करावयाचे नसते. शोकही करावयाचा नसतो आणि म्हणूनच अशा महायात्रिकाला अनंताच्या प्रवासासाठी तो निघाला असताना निरोप देताना म्हणावयाचे असते,

'या करमसीभाई या! अधा या!...'

❖

पद्मभूषण



दिगन्तरा किर्ति : ।

कीर्ती दाही दिशात पसरली.

पद्मभूषण

करमसीभाईंना जाऊन सुमारे आठ महिने झाले, पण ते गेल्याचे निकटवर्तीयांना कधी जाणवलेच नाही. त्यांच्या लहान-मोठ्या स्मृतींनी ते अनेकांच्या मनामनांतून सदैव घर करूनच राहिले आहेत.

थोडाशा विलंबाने का होईना पण भारत सरकारला करमसीभाईंच्या कर्मयोगाची महती लक्षात आली, पटली आणि जणू हातून घडलेल्या चुकीची दुरुस्ती म्हणूनच की काय करमसीभाईंना २६ जानेवारी २००० या प्रजासत्ताक दिनी भारताचे राष्ट्रपती श्री. के. आर. नारायणन् यांनी करमसीभाईंना 'पद्मभूषण' हा बहुमान देऊन त्यांच्या पश्चात त्यांचा गौरव केला.

❖

मुंगी उडाली आकाशी

कर्मणा राव संसिध्दि : ।

कर्म करूनच पूर्णता प्राप्त होते.

मुंगी उडाली आकाशी

कर्मवीर करमसीभाईंचे बालपणापासूनचे जीवन पाहिले आणि त्यांनी आपल्या जीवनाची सातत्याने जी घडण केली, ती पाहिली की मला मुक्ताईच्या एक गीताची हटकून आठवण येते.

लडिवाळ मुक्ताई ही ज्ञानदेवांची धाकटी बहिण. श्री निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई अशी नामावली संत मंडळात मोठ्या आदराने भजनाच्या ठेक्यावर म्हटली जाते. आजही वारकऱ्यांच्या दिंडीमधून ही नामावली टाळ-मृदंगांच्या तालात मोठ्या प्रेमाने व स्नेहभावाने गायिली जाते. उच्चारली जाते.

ज्ञानदेवांची धाकुटी मुक्ताई जशी लडिवाळ तशीच महाज्ञानीसुद्ध होती. वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी समाजाकडून अवहेलना झालेल्या आणि म्हणूनच खोपटाचे दार लावून रागावून बसलेल्या ज्ञानदेवांना या चिमुरडीने जो उपदेश केलेला आहे तो मराठी संत साहित्यात 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहे.

मुक्ताईच्या आणखीन काही काव्यरचना उपलब्ध आहेत. त्यातील एका रुपकाद्वारे तिने आपली आध्यात्मिक झेप वर्णिलेली आहे... मुक्ताई म्हणते...

'मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्याशी'

तशी ही रचना वरवर दिसायला जरी चमत्कारपूर्ण वाटली तरी तिचा आशय फार मोठा आहे, आध्यात्मिक आहे. मुंगी ही तर सर्वांत लहानात लहान कीटक... पण तप:-साधनेने तिने हजार हत्तींचे बळ साध्य केले आणि ती विराट आकाशात झेपावली.

करमसीभाईंच्या जीवनांची घडणही अशीच मुंगीसारख्या लहानग्या अवस्थेतून झालेली आहे. मुंगीच्याच गुणांनी त्यांनी सातत्याने उद्योगाची कास धरलेली दिसते. ती कधी निवांत बसलेली वा झोपलेली दिसत नाही. काम, काम, काम... श्रम, श्रम, श्रम... हा जणू तिचा ध्यासच असतो.

करमसीभाईंनीदेखील याच ध्यासाने जीवनातील प्रत्येक क्षण श्रमनिष्ठेने

वापरलेला होता. एका लहानशा खेड्यात लहानशा कुटुंबात जन्म घेऊन लहानशाच भागीदारीत साखर व्यवसायात त्यांनी ऐन तारुण्यात पदार्पण केले आणि पुढे वाढता वाढता हा 'वेलू गगनावेरी पोहोचला.'

देशातील एक 'शुगर किंग' म्हणून ते विख्यात झाले. साखरेच्या व्यापारातून त्यांनी स्वत:चे असे तीन साखर कारखाने उभारले. साखरेसारख्या पक्क्या मालासाठी लागणाऱ्या उसासारख्या कच्च्या मालाची शेती त्यांनी मोठ्या कष्टाने, परिश्रमाने व शोधक दृष्टीने जोपासली होती.

सुमारे १५००० एकर जमिनीतील उसाच्या शेतीसाठी अपार कष्ट घेऊन नवनवीन प्रयोगही त्यांनी केले. साखरेचा जास्तीत जास्त उतारा मिळावा म्हणून त्यासाठी उत्तम उसांच्या बियाण्यांची लागवड केली.

या शेतजमिनीवर अनुभवांच्या अभ्यासातून सरी पाडणे, पाणी पुरवठ्याची योजना करणे, पिकांच्या वाढीसाठी योग्य अशा खताची व्यवस्था करणे, इत्यादी शेतीविषयक कामांत करमसीभाईंनी स्वत:ला झोकून घेतले होते. या त्यांच्या ध्यासातून त्यांनी पिकवलेल्या ऊसमळ्यांतील उत्पादनांचा 'जागतिक उच्चांकही' त्यांनी गाठला होता.

नरेशवाडीतील त्यांनी फुलविलेले फलोद्यान, घाटकोपरनजिक उभारलेला विद्या विहार हा शैक्षणिक प्रकल्प ही त्यांच्या वृक्षशेतीची व विद्याव्यासंगाच्या आस्थेबद्दलची मोठी स्मारकेच म्हणावी लागतील.

करमसीभाई हे बालपणापासून श्रद्धाळू, भक्तिमय हृदयाचे आणि आध्यात्मिक वृत्तीचे होते. पण त्यांची भक्ती किंवा आध्यात्मिकता, समाजापासून दूर न जाता, समाजात राहूनच करावयाच्या 'उदंड' लोकसेवेत होती.

करमसीभाईंनी आदिवासी भागात घेतलेली आरोग्य शिबिरे आणि उभारलेली रुग्णालये, विद्यालये हे सारे त्यांचे कर्तृत्व केवळ 'प्रचंड' या शब्दातही मावणारे नाही.

देशप्रेम, समाजहित आणि त्यासाठी अखंड धडपड यामुळे एक साधासा, लहानगा माणूसदेखील किती मोठा होऊ शकतो याचे उदाहरण म्हणजे करमसीभाई होत.

हे सारे पाहिले म्हणजे मला सहजपणे मुक्ताईंच्या गीतांचे स्मरण होते.

"मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्याशी।"

याच मुंगीने एवढे व्यापकत्व मिळाले की तिची दखल भारताच्या राष्ट्रपतींनाही घ्यावी लागली आणि करमसीभाई पद्मभूषण झाले.

❖

परिशिष्ट



The Deccan Sugar Technologists' Association (India)

Presidential Address of Shri Karamshi Jethabhai Somaiya
on the occasion of
The Fourteenth Annual Convention of the Association
held at
The Law College, Poona
at 10 a.m. on Friday, November 8th, 1957.

Hon'ble Shri Yeshwantravji, Distinguished Guests, Ladies & Gentlemen,

It gives me great pleasure to welcome you all, this fine morning at the 14th Annual Convention of the Association. We are meeting in Poona for the fourth time as this year we have not been fortunate in getting invitation from any of the Sugar Factories. Being centrally situated, Poona has got natural preference over other places. Moreover, it is a place of historical past where cultural, social and political activities are in full swing.

We have always felt at home at the Law College premises. With the Vetal Hills at the back, beautiful stretch of the Mutha valley in the front, streams rippling away on the sides and mother nature full of abundant vegetation smiling to great us all, this place provides a picturesque and quiet atmosphere and offers us the best of the urban amenities in rural surroundings.

As a personification of the "Sangam" of the best of rural and urban life we have amongst us as our Chief Guest, our ever popular Chief Minister who has sprung from the rural areas and who is today responsible for the very able Government we are having in our State. The Chief Ministership of the new bilinguial Bombay State was a challenge to the calibre of any person and it is a matter of great pride and pleasure to say that our Chief Minister has proved his ability and ranks amongst the ablest in the country. To my mind, however, his crowning quality is his courteousness, simplicity, unassuming nature and generosity of heart. It is most befitting that when the progress of the country depends on

development of our villages we should have as the head of the State a man from a rural area.

I welcome you, Sir, as our Chief Guest of honour and sincerely thank you for having so kindly accepted this invitation in spite of your innumerable responsibilities. I am aware that you have specially come down from Bombay to grace this occasion and have to go back to Bombay tomorrow morning. This is an eloquent testimony of your generosity and a keen interest in the progress of our Industry. I am sure you will give a patient hearing and sympathetic consideration to some of the problems I would like to mention in this address.

Sugar Export :

Last season's production touched 20.25 lakh tons which is an all time record. Next season's production is expected to be around 22.5 lakh tons. As against this, the consumption figure, though higher than last year, has shown a decline from the estimates on account of very heavy excise duty imposed during the year and is expected to be around 19.50 lakh tons. The consumption figure will not materially change in the next season with the result that a surplus production of about 3 lakh tons may be expected.

With these encouraging features we have last year emerged as an exporting country. A quota of 2 lakh tons for export was announced against which a little over 1.50 lakh tons is expected to be exported. Chances of further exports at this moment are slim, because the temporary spurt in the international sugar prices which went as high as £ 70/- c.i.f., due amongst other reasons on account of the beet crop failure in Europe and Suez crisis, is over and the prices are playing around £ 45 c.i.f. This would mean an approximate realisation of Rs. 20/- per maund F.O.B. as against the minimum realisation of Rs. 27/- per maund that must be paid to the manufacturer taking into consideration the present cost structure of sugar manufacture, freights and after allowing for the rebate of excise duty and cane cess. Thus there is a net loss of Rs. 7/- per maund, i.e. as much as 25% which would work as a great disincentive for the promotion of export. In face of grave foreign exchange crisis and heavy production expected year after year the aspect of the cost of sugar manufacture assumes major importance and is a challenge to all of us, whether manufacturers, technicians or Government. In view of the very rigid and inflexible cost structure I do not think much reduction on the cost is possible.

The challenge for export has to be faced equally by the State Governments, Central Government and the Industry. In this connection I regret to note that State Governments do not want to part with their local taxes, viz., Cane Cess and the

Sales Tax. It is an accepted principle that all the internal taxes on the goods for export should be refundable. Application by the associations for exemption from the above taxes has been in vain. The incidence of taxation on these two items in Bombay State is Rs. 50/- per ton for Cane Cess and Rs. 25/- per ton for first-point Sales Tax, totalling to Rs. 75/- per ton. Similar taxations exist in varying degrees in other States. It must be realised that sugar meant for export is from the excess production in the country. In other words, what the State Governments want to retain is the additional revenue which normally they would not receive, Especially when our sugar cannot face the international competition the State Governments should feel it equally their duty to help promotion of export. If we are notable to export sizable quantity there would be crisis in the Industry and a great slump in the internal market. The result would be either the factories will restrict their operations or there would be demand for reduction in cane prices. Either of the cases would mean a grave loss to the Agriculturists and loss of taxation revenue to the Governments I would, therefore, appeal to the State Governments to consider the problem in the above light and permit exemptions from the local taxes on the sugar meant for export. There are difficulties about the allocations between different States, but given proper approach, a suitable formula can be easily evolved. This step of State Governments will help a lot in earning foreign exchange which is very badly needed presently.

Besides the exemptions from the State Taxes a bold and imaginative policy for export is called for wherein all the interests concerned are taken into full confidence and each one is allowed to do his bit. I personally oppose any Central Agency taking over the sugar produced by the factories as it is bound to act as a damper in the long run. It will be disastrous to the industry in general and particularly the infant co-operative movement would be seriously handicapped. According to me, the scheme envisaged should be such as would leave the incentive in the hands of the manufacturer for production of better sugar. I am aware that Government is fully alive to this situation and a scheme is on the anvil.

Economic Unit :

While on the subject I would like to repeat my last year's plea that treating a 1,000 tons unit as an economic unit is a thing of the past if compared to the world figures. Against our average production of 12,000 tons of sugar per factory the average in Queensland is 47,000 tons, in Cuba 49,000 tons and in Phillipines as high as 57,000 tons. The cost of production is bound to come down if the units are made larger and according to me, 2,500 tons capacity should be considered the minimum economic unit. Whatever be the accepted figure for the minimum

economic unit I feel it is the duty of both the Central and State Governments to see that, whether it is a private enterprise or a Cooperative enterprise, the minimum demands of the units are met with and that none of the units is starved. I would also like to suggest that proper and equitable zonal distribution of resources should be taken into consideration and unnecessary strain either on the roads or on transport should be avoided.

New Factories :

One remarkable feature of this year is the starting of at least 4 new cooperative factories besides the 3 that have already come into function. I would like to wish all the factories a bright future. I am confident that the Co-operative Movement in sugar factories in Bombay State is bound to be a great success. All that is needed is a broader outlook and the need to forget petty rivalries and class or political considerations.

Ethics :

Last year there was a heavy strain on the technical cadre in the industry especially in Deccan. As against 14 existing factories 17 new are coming up. Both the technicians and skilled hands have been found to leave their factories in the middle of the season. I am greatly pained to have to remark that the unwritten code of ethics that permeated through the industry all these years of not leaving any factory during the season was broken. Better jobs are always awaiting a good technician and they would certainly be available even after the season. As such, for any immediate gain it is not fit and proper for a technician to spoil his career by breaking the code that has been working to the mutual advantage of both the factories and the technicians for so long.

Technical Institute:

This, however, cannot do away with the basic need of having more technicians than are being trained today at Kanpur, the only Institute in the Country. And that is why this year also I repeat my last year's pleas for the need of a fullfledged institute in the State of Bombay.

I do not wish to elaborate my last year's remark about the need of a Central Sugar Institute in the country with branches in at least two parts of the country, one of which must be in the Bombay State in view of its expanding industry and its special and fundamentally different climatic conditions. I may suggest that such an Iitstitute in the State should also cover the activities of the Padegaon Farm. I am fully aware of the present set up and the fact that Padegaon Institute is working

under the Central Sugar Cane Committee and that the State does not take much direct interest. I feel that a re-orientation of this approach is called for.

I had last year tried to prove with figures that the results of the Deccan Industry rank amongst the best in the world. With Farms attached to the Industry, Factories take very keen interest on the technical aspects of both the Factory and the field. It boasts of some of the best workers in the country. The results achieved by them are mostly on account of the initiative of the individual managements rather than that of any strong co-ordinated collaboration between the Research Institutes at Kanpur or at Padegaon of the type that one would desire.

We feel that our problems arising out of the special features existing in this part of the country are not properly understood by the single Institute that lies far away. It is very rarely that we take much advantage of this Institute and sometimes our problems are lost on them in view of the wide variety of problems from other parts of the country. It is, therefore, very essential that we should have an Institute that would cater to our specialised needs and requirements; an institute that will also give us technicians who are trained in these requirements and who can man our factories.

I am sure the whole of the Industry as well as the Technicians in Deccan will very much welcome such an Institute and I on my part would assure all co-operation from this Association to make such an institution rank amongst the premier institutions in the world. All that we ask is a proper appreciation of our problems, a full-fledged Institute to take care of them and sufficient voice in its working to formulate its activities to suit our specific needs and requirements.

There is much that we are trying to do in our factories in a very crude experimental way, what is already an established fact in other advanced countries. I might refer to the Foliar Analysis or the Use of Minor Elements or Manuring by Spraying or Irrigation by determining the moisture contents of the soil and various other features. Today the use of radio active isotopes for the determination of intake of the fertilisers is a very advanced science in some other parts of the world whereas we have not even started on it. Manure is a major item of cost of cane cultivation in Deccan, going as high as Rs. 600 / 700 per acre. If we are to properly determine the actual intake and requirements of the plant by this specialised study, I am sure we can make at least 50% saving, if not more. These and other aspects, which call for close collaboration with research and practice can materially reduce the cost of production of cane

and incidentally the cost of sugar which is the challenge we are facing in our country. I have particularly thought it necessary to elaborate on this aspect becatise I think my plea was lost last year. Our Chief Minister has a progressive outlook and therefore cannot fail to be impressed by the basic soundness of our requirements. I look upon him to induce the Centre to establish such an Institute which was once under consideration.

Sugarcane Research Station, Padegaon:

The Silver Jubilee of the Sugarcane Station, Padegaon, will be celebrated very shortly. On behalf of you all I congratulate the workers at Padegaon and wish them great success. Their contribution to cane development in Deccan is very valuable and the Industry owes them a great debt. This is all the more noteworthy as they are working under a series of handicaps.

Success of the Deccan Industry rests entirely on its better quality of sugarcane and better cultural practices in agriculture. It is, therefore, essential that sugarcane research should be attached a paramount importance and the workers given full scope.

Approach of the State Government to Padegaon station needs a fundamental change. The station is treated just like any other administrative unit and the Research Heads are changed in the same way as Civil Service personnel are transferred from time to time. The field of work in research is entirely different and such periodical transfer of the Head of research will only serve to disturb the practical work that may have been appointed from time to time I would say that each person has had his own approach and the extensive programme of research laid by one specialist is not and cannot be taken up with same interest when a new Specialist comes in his place. He lays out his own experiments when he takes up office but has insufficient time to arrive at sufficient results. Research in a particular field is the work of a life time and cannot just be taken up for a limited period for which he is to be in charge. In Agriculture generally or for that matter in any field results come after years of patient observation. I would, therefore, strongly urge that Sugarcane Specialist, whoever he might be, should not be changed periodically. Full opportunity and enough time should be given to each one of them to complete the work planned by him.

I understand that before any research work is taken up the scheme is drawn up which may be for a period of 3-5 years and is formally sanctioned by the Central Sugarcane Committee. The persons employed to work in the scheme are required

till the completion of the scheme. No doubt they are absorbed in future schemes that may be evolved from time to time.

Some of the basis amenities are also lacking for these workers. There is no colony life for them, the quarters allotted to them are in poor condition and scattered all over. Transport facility also is denied to the Specialist in absence of which it is difficult to visit various farms and places to have an on-the-spot study. This is bound to affect efficiency.

Coming to the research programme I have already referred passingly to some of the most advanced fields of research taken abroad. They are no longer in the field of research but have found practical applications and the cultural practices are based on them. For example, foliar diagnosis and radio active isotope determine the total quantity of manure required for a crop. The moisture content in the soil determines the need of irrigation, etc. Sciences are trying to be exact and the empirical aspects is fast changing. At Padegaon we have not yet started research on any of these sciences. Fortunately, we have a complete data of work done already abroad and we will not have to cover any new ground. The equipment and the resultant programme thereon are required. Today in absence of this, Padegaon has still to do same analysis with NPK and compost or no-compost series, or continue its research programme on 450 lbs. Nitrogen in the proportion of 2 organic and one inorganic, etc.

What is, therefore, wanted is a permanent band of research workers devoted to the advancement of cane cultivation, provided with proper living facilities and who are given full scope both by way of finance and equipment to carry out their allotted task. Industry is directly affected by the achievement and results, and it is therefore in the fitness of things that it should be given active voice and participation in all its activities.

I am pained to learn that even funds for the proper celebration of the Jubilee and ushering in a new programme of research to mark the occasion are also lacking. When Deccan Industry pays annually as much as over Eleven million rupees (Rs. 1,10,00,000/-) as Cane Cess and would be paying twice that sum in a few years, a Cess meant for cane development, it is regrettable that its main research Station is starved of equipments and grants. I would, therefore, urge that Government of Bombay should earmark a definite percentage of its Cess income for the purpose of Padegaon Station. As far as the Jubilee is concerned, I would submit that Government should mark the occasion by giving some grants to start new research

programme with uptodate equipment on most advanced lines. Capital grants, if not more, of at least 1% of one year's cane cess realisation should be given. The money spent will not have been wasted as it is bound to benefit the State many more times by way of additional revenue.

With this new approach and more grants, Padegaon should become a fullfledged permanent Research Institution. In view of the concentration of Industry in Ahmednagar District one more Research Farm under Padegaon can be established with advantage in Kopergaon Taluka.

It is a welcome feature of recent years that Padegaon lays out same experiments at different factories and assesses the results under different climatic and soil conditions. Factories co-operate to the maximum and I hope that this co-ordination would be carried to its ultimate extent so that each factory can be a living research branch of the main Research Station at Padegaon.

PRACTICAL HANDICAPS :

There are some important practical handicaps which need to be removed for better working of the Industry and I would briefly like to mention them here.

Molasses : The problem of major magnitude that comes foremost in my mind is that of molasses disposal. I would only like to repeat my last year's remarks which still hold good in a greater measure this year. "The molasses problem as a whole has been grossly mishandled for the last many years. This year it has reached breaking point and hardly any molasses has been lifted from any of the sugar factories. It would be a problem to store the molasses of the next season. Even permission to throw it away or destroy it has been refused." This story is repeated again this year. Some factories have stocks of last 3 seasons and are at their wit's end what to do with them. Permission for destruction by burning has been lately received but it has no practical importance. It is hoped that for the next year permission to throw molasses in flood water will be received well in advance.

Fertilisers : The increase in the price of Ammonium sulphate and the very recent removal of total duty on export of oil cake are the disturbing features. The Industry and the Agriculturists have been consuming Ammonium sulphate for over two decades, long before Government of India thought it necessary to start a campaign for utilisation of inorganic manures. Today we are faced with great shortage which will have very serious effect on the crop and the country would

loose more by way of indirect disadvantage than by spending foreign exchange on import of sufficient quantity of manures. Further the State monopoly in Inorganic Manures is causing great handicaps especially because there are imparte increases in its price from time to time, a feature that would never have been permitted to any private enterprise. As if to aggravate the situation Central Government recently has thought fit to remove totally the export duty of Rs. 230/- per ton on expeller cake and Rs. 50/- per ton on deviled cake. The result has been that the price of oil cake, which is the most important manure used for cane cultivation, has shot up by about 25%. I can speak with authority that the extra foreign exchange earned by export of oil cake will not compensate for the indirect loss of the crops and the exportable sugar, especially in view of the huge shortage of ammonium sulphate expected during the next few years. This removal of export duty is most untimely.

Roads : The condition of roads in the factory areas is very bad. The strain of 1,000 carts coming and going, i.e. 2,000 carts a day loaded to overflowing capacity on the roads can be appreciated only by seeing them at site. It is an awful state to see a bullock break down on any road and the efforts made by half a dozen cart men to lift it up. Something needs to be urgently done for this. Sugar factories have come forward to contribute their share on the roads as envisaged by the Central Government in the Second Five-Year Plan. I hope speedy decision will be taken and substantial amounts will be earmarked from Cane Cess for this purpose. I would suggest calling for a high level meeting of senior representatives of all Sugar Factories to suggest and find ways and means for speedily tackling this issue.

Gram Panchayat : The imposition of. Gram Panchayat on the rural Industries and its attendant taxes on factory colonies where they do not give any services but generally provide nuisance value has been opposed. Such industries have pleaded for exemption of their areas by payment of a nominal fee so that the Panchayats may not interfere either in the colony constructions or in the factory changes, which is beyond their capacity. Such payment of fees should exempt industry from payment of any other fees or duties on any other account whatever. Further, these Panchayats are working as a damper to the colony progress in as much as better houses attract heavier taxation of a recurrent nature, in view of the taxation based on cost of the structure. It is only when factories are assured that giving better amenities to their workers will not be annually taxed in the shape of Panchayat taxes, that the colony conditions can improve. Present conditions act as a positive disincentive for improving the quality of housing.

Progress in Care Culture:

In spite of the fact that record yields are produced in Deccan still there is great scope for improvement in the general standard of cultivation. Personnel factor is an important aspect in the success or otherwise of high production. 80 tons average and 95 tons of Adsali crop is a normal feature in Malinagar factory. Similar results have not been achieved elsewhere. Efforts in Shrirampur and Kopergaon Taluka have been made and the yields have improved considerably. Still they are a long way from Malinagar yield. This region has its own handicaps. Pre-monsoon cyclones seem to be the limiting factor, their occurence and intensity or otherwise determine the fate of the crop. So the problem is to meet such vagaries of nature. Lodging has assumed a dangerous form and it is a serious problem as to how it can be prevented.

Efforts are being made for complete mechanisatiion of farm practices. Even the preparation of seed beds and interculturing operations have been mechanised but there are many practical difficulties in view of the special features of the agricultural practices.

Lay Out : It appears that the old serpentine method of irrigation with different compartments would soon be out of date and graded furrow layout will take its place. There are definite indication of saving of water and efficiency in irrigation by this method. Pit falls, however, are there, if one is not careful, viz., the overhead irrigation of the end portion and subsequent waste of water. For this careful contouring is very essential.

Variety : The wonder cane of Deccan Co. 419 is still not surpassed by any other variety. CO. 419 is a unique cane and useful under a very divergent set of conditions. It is neither preceded nor succeeded by an equally competent cane variety. Plea is being raised from time to time in the Conventions that the variety is under-going deterioration. Whatever be the case, there is need for better varieties. It is also essential that we should have early and late maturing varieties to even out the heavy fluctuations in recovery. Reports from Padegaon indicate the possibility that CO. 775 and CO. 740 may be the other alternative varieties and they may prove to be the early and late maturing varieties respectively.

In some of the factories. CO. 678 has been multiplied to a large extent and offers a substitute for CO. 419 to them, especially where CO. 419 suffers badly from grassy growth. Similarly CO. 798 also seems to show some promise. We will have to wait for a few more years before we can come to definite conclusions.

Technical Sub-committee:

I am glad to announce that this year we have made some headway towards making the Technical Sub-committees more active. This year the Manufacturing Sub-Committee was asked to collect complete and exhaustive data on the equipment and the practices prevalent in Deccan area on different systems of pan boiling and with a special emphasis on the production of bolder grams and its effect on steam consumption, for which exhaustive questionnaire was drawn up. The response received was very encouraging. This data with a general interpretation of the same has been printed separately and will be discussed at the Symposium tomorrow for which about an hour is alloted, I am confident that it will give rise to a very interesting and authoritative discussion. Similarly the Engineering Sub-committee was asked to prepare a symposium on "Steam balancing in the sugar factory" as it was thought that this could be properly co-related to the subject tackled by the Manufacturing sub-committee. I hope the Sub-committee will make more progress in the future. Task was given to the Agricultural Sub-committee to decide upon the experiments that are to be conducted simultaneously at all the sugar factories. so as to get representative results under different soil and climatic conditions all over the State . As, however, the decision taken was rather late no work has been done but I hope that recommendations would be made by the Sub-Committee well in advance for the experiments to be made in the next Adsali plantation in June-July 1958.

Papers :

This year 30 papers are presented for discussion. It is gratifying to note that in response to my request last year there are more papers on non-agricultural subjects this year. Two important subjects like "Steam Economy" and "Losses from cane to Crystal" from the subject matter of two papers. Observations on the working of Cell-less Vacuum Filter are important. Different aspects of sugarcane cultivation are studied and definite solutions to some problems are presented in Papers on Agriculture. In Cane Soil Study "Assessing the fertility of soil by colours" is noteworthy. The cane culture technicians have tried to find solution for the problem of loading. Due importance is given to the SUbject of manuring and 7 papers are given on this single subject. A positive way to avoid wastage of water by night irrigation is shown by storing water at night in storage tanks. Under Cane Pathology very detailed study of grassy growth is an important article. It is for the first time that studies about spraying for recovery are presented and this will give very interesting discussion. Amongst the articles on general subject synthetic came preparation and idea of replacing our usual manures by manure prepared from waste are thought provoking. In general the papers are well studied and very interesting.

Prizes :

I regret to note that no competitor has succeeded in gelling the Prize for Prize plots this year. A Prize of Rs, 1,0001- was other for an average yield of 12 tons sugar per acre on a 10 acre plot. As against this the maximum any competition has been able to give is 9.30, practically 75%.

My last year's remark that only a few factories have lately taken part in the competition holds good even this year. I wish more encouragement is given to the Technical Staff of the factories to participate in this competition. This year the terms of the prize have been liberalised to give the incentive to the competitors. In the third Council meeting we have taken a decision that in case nobody becomes eligible to get the prize in a particular year a consolation prize shall be given to the person producing maximum, subject to a minimum of I I tons sugar per acre.

This year Dr. Shirgaonkar's prize goes to Shri H. P. Mutha for his paper entitled "Optimum Indices". I offer him my hearty congratulations.

Thanks :

On behalf of myself, the Members of the Council as well as the Members of the Association I give my heartiest thanks to our Chief Guest who in spite of his various pressing commitments has specially come over here to inaugurate this Convention. Let me thank you one and all for having kindly accepted our invitation and graced this occasion. Our thanks are due to the Law College authorities for having so kindly placed the premises at our disposal for the purpose of this Convention . I also express our thanks to the Judges for Dr. Sirgaonkar Memorial Prize for having so kindly taken pains to scrutinise the papers of the last Convention and submit their opinion.

I also thank the Members of the Council of the Association for the cooperation and help they gave me last year in the discharge of my duties as the President. I would also thank Shri M. Y. Karve for ably conducting the affairs of the Association as its Secretary and also Shri Athawale, the Treasurer for maintaining the accounts of the Association and preparing and presenting the Association's Budger papers. On behalf of the members of the Association I wish to place on record our thanks to the various authors who have contributed their papers to this Convention. Last but not the least I must thank Shri K. P. Deshmukh who, as in the past, has very willingly accepted to be the Joint Secretary of the Association and to him we are indebted for the necessary preparations and arrangements made for this Convention over here.

JAI HIND

स्वागत प्रवचन

(विद्वान वक्त्यांची भाषणे, शास्त्री-पंडितांची प्रवचने ग्रामीण भागात घडवून आणून त्यांच्या विचारांचा, ज्ञानाचा लाभ ग्रामीण जनतेला करून देण्याची प्रबळ इच्छा करमसीभाईंच्या मनी सदैव असे. त्या इच्छेनुसार त्यांनी साकरवाडीस पं. पांडुरंगशास्त्री आठवले यांची व इतरांची प्रवचने घडवून आणली होती. श्रीरामपूर येथे दि. २७.०४.१९८५ रोजी विख्यात प्रवचनकार पू. मोरारीबापू यांच्या प्रवचनाचा लाभ तेथील जनतेला घडवून दिला होता. त्यावेळी करमसीभाईंनी केलेले स्वागत प्रवचन येथे उद्धृत केले आहे.)

आदरणीय परमपूज्य श्री मोरारीबापू एवं जन कल्याण की भावनावाले भाविक बंधू एवं भगिनिओ। आपको आश्चर्य होगा कि मैने स्वागत प्रमुख होने की सम्मति कैसे दी।

मै प्राय: प्रमुख, स्वागत प्रमुख, ट्रस्टी एवं उद्घाटन वगैरह के कार्य नही करता परंतु २-३ आकर्षणोने मुझे यह पद लेने को प्रवृत किया।

आपको विदित है कि यह मेरी सिर्फ जन्मभूमि ही नही कर्मभूमि भी है। आजसे अन्दाजन १०३ वर्ष पहले सन १८८१ मे मेरे दादाजी कच्छ से बम्बई होते हुए यहाँ आये थे। उस समय मनमाड दौण्ड रेल्वे की शुरुवात हुई थी। यहाँसे दस मिलोके दूर मालुन्जा नाम का गाँव जो लाख स्टेशन के पास प्रवरा नदी के किनारे है, वहाँ वास्तव्य किया। उन्होंने वहाँ खेती की, बगीचे लगाये एवं गन्ने की खेती भी की। उन्होने प्रथम गन्ना गालने के लकडी के चर्खे के स्थानपर लोहे के चर्खे स्थापित किये। इस गाव की बस्ती उस समय ५००/७०० आदमी की थी। मेरा जन्म उसी गाव में १९०२ मे हुआ था। वहाँ मेरे दादाजीने गन्ना लगाया था। उनका स्वर्गवास सन १८९८ में हुआ। उनकी मृत्यू के बाद मेरे पिताश्रीने यहाँसे चार मिलो के दूर बेलापूर में व्यापार शुरू किया और गन्ने की एवं अन्य खेती

बंद हुई। उसके बाद वह गन्ने की खेती ४० वर्ष के बाद सन १९४० मे मेरे हाथोंसे की गयी। इसलिए यह भूमि मेरी जन्मभूमि एवं कर्मभूमि भी है।

दूसरा कारण महान संत गोस्वामीजी श्रीतुलसीदासजी के समान श्रीराम एवं हनुमानजी के परमभक्त परमपूज्य श्री मोरारीबापू के पावन पैर पडने वाले थे, उसका आनंदलाभ मिलने वाला था।

तिसरा कारण मेरा वास्तव्य यहाँ ५० वर्षोंसे न होते हुए भी आपका प्रेम एवं आपके प्रतिनिधी जो बम्बई आये थे उनके आग्रह से यह कबूल करना पडा।

आजका दिन हम सब के लिये एक बहुत ही मौलिक एवं आनन्दमय दिन है।

इस ऐतिहासिक अहमनगर जिले में आज एक नया इतिहास बन रहा है। भारत की तवारीख में विविध बदलते हुए रंगोसे यह जिला रंगा हुआ है। यहाँ की प्रख्यात रानी चाँदबीबी ने बड़े शौर्यसे मुगल सेनासे टक्कर ली थी, मुगल सल्तनत के समय में मुगल दरबार के यूवोने इस स्थलोको दक्षिण में अपनी सत्ता को बडाने का केन्द्र बनाया था। वीरता, सामन्तशाही और राजरमत के अनेक प्रसंग इस जिलेने देखे है। गान्धीजी के सत्याग्रह आन्दोलन के समय अहमदनगर का कारागृह देश का भक्तिका एक प्रतीक बन गया था।

सन १८५७ का जो झासी की रानी लक्ष्मीबाई के नेतृत्व मे स्वतंत्रता का प्रथम युद्ध हुआ था, उनके सेनापती श्री तात्या टोपे यहाँसे निकट येवले गाव के थे।

बेलापूर गाँव के उस पार प्रवरा नदीपर श्रीकेशव गोविन्दजी महाराज का जो मन्दिर है उसमें १८५७ साल के स्वतंत्रयुद्ध के एवं वीर, जिनपर तलवार के अनेक घाव लगे थे वह, आकर रहे थे।

सन १९४२ के ऐतिहासिक Quit India - भारत छोडो आन्दोलन का गांधीजी ने ऐलान किया उस समय देश के उच्च नेताओं को गुप्तरीतिसे अहमदनगर के कारागार में लाया गया। सरदार वल्लभभाई पटेल, पं. जवाहरलाल नेहरू सब उच्च कोटी के नेता जो अन्दाजन १२ थे, इनमें एक श्री शंकरराव देव भी थे। इस भूमि को महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आदि नेताओंने भेट दी थी।

अहमदनगर जिला बहुत पवित्र है, यहाँ से २२ मिलो के दूर नेवासा नाम का गाँव है, जो प्रवरा नदी पर स्थित है। जहाँ श्रीज्ञानदेव महाराजने ज्ञानेश्वरी लिखी थी, वह स्थल अभी भी मौजूद है। इसी जिले में दासगणु नामके बडे संत हुए है। यहाँ महानुभावों के मठ है। अहमदनगरके पास नाथपंथि सम्प्रदाय का प्रसिद्ध मठ है।

एवं यहाँ से थोडी दूरपर पवित्र गोदावरी नदीपर पुनतांबा नाम का गाँव है, वह बडी पवित्र तीर्थभूमि है। यहाँ बहुत मंदिर है। सन्त ज्ञानेश्वर के समकालीन चांगदेव महाराज वहाँ रहते थे।

गोदावरी नदीपर नाहुर गाँव में स्वामीजी श्री शहजानंदजी जो बडे निस्पृह थे, एवं स्वतंत्रता संग्राम मे भी भाग लेते थे, उनका आश्रम था। गोदावरी नदीपर स्थित कोकमठाण वगैरह के आसपास सन १९४० में गणेशपुरीवाले स्वामीजी मुक्तानंदजी महाराज एक-डेड़ साल घूमते थे।

यहाँसे थोडी दूरपर २२ मिलोपर शिरडी गाँव में श्रीसाईबाबा का प्रख्यात मंदिर है, जहाँपर सारे हिन्दुस्तान के यात्री दर्शन को आते है, वह वहाँ रहते थे, उनका देहान्त १९२८ मे हुआ।

उसके नजदीक ही साकूरी गावमें उपासनी महाराज का मंदिर है, जहाँपर सिर्फ बहनेही रहती है। उनको सब शास्त्रों का संस्कृत में अध्ययन कराया जाता है, उनके मुखसे वेदोच्चार सुनने मे बडा सात्विक आनन्द आता है। उपासनी महाराज का देहांत १९४१ मे हुआ।

परमपूज्य श्री मोरारीबापू के आने से यह पवित्र भूमि आज और भी जादा पवित्र हो गयी है।

अहमदनगर जिले के श्री कुन्दनमलजी फिरोदिया स्वतंत्रता के बाद महाराष्ट्र सरकार मे स्पीकर के पदपर रह चुके है। इस जिलेने बहुत देशभक्त दिये है, उनमे स्वर्गस्थ श्री रावसाहब पटवर्धन एवं श्री अच्युतराव पटवर्धन दोनो बंधु प्रमुखमेसे है।

आज जब मै बोलने खड़ा हुआ हूँ तो सब बाते याद आती है। मै आगे कुछ बोलू उससे पहले अपना आदर व्यक्त करने के लिए दो नाम अवश्य लूँगा। उनमें बेलापूर शुगर मिल के मैनेजिंग डायरेक्टर सर जोसफ के एवं खटोड परिवार, जिन की पाचवी पीढी देख रहा हूँ।

सन १९२८ से १९३६ तक गाँधीजी की आज्ञानुसार कार्य करने को गावोगाव घुमते रहे, मै मस्तक मुण्डण, पाँवमें चपल, लम्बा झब्बा, मुक्त पटलीसे घुमता था। हमारे वरीष्ठ भागिदार श्री रामधनभाऊने कहाँ, "करमसी, हम बेलापूर कंपनी, जिसके चालक अंग्रेज है, उनसे व्यवहार करते है। और आगेभी करना है। तू यदी इस प्रकार कांग्रेस का कार्य करेगा तो अपना बड़ा नुकसान होगा, कारण बेलापूर कंपनी के चालक अपनेसे नाराज होंगे और अपना व्यवहार बंद हो जाएगा।"

मैने उनको कहाँ, कुछ फिकर मत करो। जब तक हम उनसे प्रामाणिकतासे और सच्चाई से व्यवहार करेंगे तबतक कोई फिकर नही। सर जोसफ सच्चा अंग्रेज है, वह देखते है की हम देशप्रेमसे यह कार्य करते है और यह करना हमारा कर्तव्य है। उसकी उनको कदर है, दिलसे वह हमारे कार्य की प्रशंसा करते ही होंगे।

मै बडी खुशी के साथ यहाँ कहता हूँ की हमारी प्रवृत्तीसे उन अंग्रेजीके साथ व्यवहार मे कभी भी कुछ भी बाधा आयेगी नही। व्यवहार अखीरतक प्रेमसे, १९४२ में शुगर कन्ट्रोल आने तक, चलता रहा।

खटोड पूज्य बावजी, श्री लक्ष्मनदासजी, श्री रामधनभाऊ एवं श्री शोभाचंद्रजी खटोड को याद करके मेरी आँखे अश्रुओंसे भरती जाती है। उनका प्रेम कभी नही भूल सकता हूँ। इस विशाल वृक्षछाया में बढा हूँ और आपके सामने खडा हूँ। शायद आपको लगेगा कि यह वृत्तान्त अप्रासंगिक है, किन्तु मेरे उपर जो इस भूमि के सन्तो का और व्यक्तियों का ऋण है उसे मैं उनका स्मरण करते हुए अदा करता हूँ।

अहमदनगर के शक्कर के उद्योग में एक नया इतिहास रचा है। एक ही जिले में बीस कारखाने है, जिनमें से पंधरह सहकारी है एवं पाच जो जोइण्ट स्टोक में है। उनमें शायद तीन सहकारी हो जायेंगे। व्यापार एवं खेती में भी इसने बडी प्रगती की है। ऐसी परिस्थिती में श्रीरामपूर गाँवमें श्रीरामकथा हो रही है, उसमे उत्तम कार्य और क्या होगा।

एक समय का सतत भयंकर दुष्काळग्रस्त अहमदनगर जिले का आज रंगरूप बिलकूल बदल गया है।

मिलोंतक आखों को ठण्डक दे सके ऐसे गन्ने के खेत यहाँ के कुशल कास्तकारों की समझ एवं परिश्रम का फल है। आज इस जिले में सहकारी संस्था के कारखाने है इसका सब श्रेय कार्य निष्णात कास्तकारों के प्रतिक सहकारमहर्षि तत्वनिष्ठ, सदगत, पद्मश्री श्री विखे पाटील को है, जो आज से तीन साल पूर्व हमारे बीच से बिदा हो गये। जो गन्ना पकाते है उन्होने शक्कर बनानी चाहिये, उनकी मालकी के कारखाने होने चाहिये, ऐसे आग्रही श्री विखे पाटील उस समय के सहकार मंत्री श्री वैकुंठभाई मेहता के पास आते थे, उनके पास उनके बंगलेमे ठहरते थे, परंतु रोटियाँ यहाँसे बनाके ले जाते थे, तथा वही रोटियाँ खाते थे। उनके यहाँ कभी भोजन नही किया, वे इतने कर्तव्यनिष्ठ एवं तत्त्वनिष्ठ थे, उनको मेरा सहस्र सादर प्रणाम।

ऐसी श्रीरामपूर की पवित्रभूमिपर आधुनिक युग के सन्त तुलसीदास भक्ति युगके सच्चे महर्षी बीसवीसदी की युवा पीढ़ी के सर्वोत्तम पुरुष परमपूज्य श्री मोरारीबापू यहाँ आये है और उनकी अमृतवाणी का लाभ हम सबको मिले उससे जादा और हम सबका सद्भाग्य क्या हो सकता है।

श्री मुरारीबापू गुजराथ सौराष्ट्र मे भावनगर जिले के महुवा शहर के पास तलगाजरडा नाम के एक छोटे ग्राम के निवासी है।

संसार मे रहते हुए भी ३२ सालकी इतनी छोटी उम्रमे आजीवन ब्रह्मचर्य पालन करने का निश्चय किया है। आज उनका उम्र ३९ वर्ष का है।

देशभरमें उनको प्रवचन के लिए आमंत्रण मिलते है। इतना ही नही परंतु युरोप, अमेरिका, आफ्रिका, मिडल इस्ट आदि देशों के आमंत्रण आते है। सालभरमें २/३ समय उनको जाना पडता है। दो वर्षों के प्रोग्राम नक्की रहते है। परदेश प्रोग्राम के लिए २/३ साल

रुकना पडता है। आप दिनमें एक समय जादा भोजन लेते है। चटाईपर सोते है, एवं आपने निद्रा को भी जीत लिया है।

उनका प्रवचन सुनने के लिए बडे शहरों में ४/४, ५/५ लाख एकत्र होते है।

उनकी वाणी का बहुतही प्रभाव पडता है। आप जेलमें जाकर बडे बडे खूनी अपराधी कैदियों को उपदेश देते है। उनका पर लोगोपर काफी प्रभाव पडता है।

मुझे यह देखकर बडा हर्ष होता है कि आपने अपने काम धन्धो में से समय निकालकर इतनी बडी संख्यामे परमपूज्य श्री मोरारी बापू की वाणी का अमृतपान करने को यहाँ आये है, आपके संस्कार एवं भक्ति का प्रतिक है। आप सबका अभिनंदन और धन्यवाद।

यह गाँव छोटा है एवं आप बडी संख्या मे यहाँ आये है, आपको असुविधा हुई होगी। हम आप सब की सुविधा के लिये प्रयत्न कर रहे है, परंतु बहुतसी बाते रह जायेगी, उसके लिये आप हमको क्षमा करेंगे।

यहाँ बडा मेला एकत्रित हुआ है यह स्वाभाविक है, सबको इच्छा होगी की आगे का स्थान प्राप्त करे, लेकिन यह सब के लिये सम्भव नही। परंतु जो उत्साह आप आगे की जगह के लिए रुकते है उससे भी जादा आप अपने संस्कारों में अच्छे बिचारों को ग्रहण करे तो अच्छा होगा।

हम सब परमपूज्य मुरारी बापू के आभारी है जिन्होने यहाँ आनेका कष्ट उठाया। इसके लिये हम सब उनके ऋणी है। परंतु उनका आना तथी सार्थक माना जायेगा जबकी हम उनके उपदेशानुसार जीवन सुधारे।

प्रेम और भक्ति प्रदर्शन की वस्तु नही है। जिस तरह बाष्प दिखती नही है। किन्तु संग्रहीत बाष्प की शक्ति से इंजिन बडी गाडीयों को खीचने की शक्ति पाता है। इसी प्रकार भक्ति को भक्तिसे शक्ति प्राप्त होती है। सच्ची भक्ति निस्पृह होती है। हो सकता है कभी कर्म के आधीन हमको सहन करना पड़े उसे आनंद से सहन करे। एवं खुश रहे, यह सभी सच्ची भक्ति से होता है।

श्री रामकृष्ण परमहंस से किसी भक्त ने उनके दर्द के बारे मे पूछा। उन्होंने जबाब दिया की मेरी भक्तिके कारण साक्षात्कार हुआ, लेकिन मेरा दर्द मेरे पूर्व जन्म का फल है, वह तो मुझे भोगना ही चाहिए। भक्त के पूछनेपर स्वामीजीने उत्तर दिया, मन चंचल है, रोज भक्तिद्वारा मन का निग्रह करना चाहिये, उसके लिए सत्संग जरुरी है। उसी सत्संग के लिए आपसब यहाँ एकत्रित हुए है।

सच्ची भक्ति सक्रिय होती है। एक समय गांधीजी ने गौशाला मे सोते हुए एक बच्चे को देखा, जो जमीनपर सिकूडकर सोया हुआ था और उससे पूछा तुम यही सोते है। रात

मे क्या ओडते हो, उसने अपनी फटी हुअी चादर दिखायी, तब गांधीजीने उससे पूछा तुझे ठण्ड नही लगती? उस बच्चे ने कहाँ, हा बापू ठण्ड लगती है, गांधीजी तत्काल अपनी कुटिया मे गये और रात होते हुए भी उसी समय खुद कस्तुरबाजी की जूनी साडी थोडे कागज एवं थोडा कापूस लिया, एवं उन्होने गुदडी सीने की शुरुआत की, कस्तुरबाजीने भी उनको मदद की। थोडी देरमे गुदडी तैयार हो गयी और गांधीजीने खुद जाकर उस बच्चे को ओढा दिया।

दूसरे दिन सुबह उस बच्चे से गांधीजीने पूँछा नींद कैसी आयी, बच्चेने कहा ऐसी अच्छी नींद कभी नही आयी जैसी रातको आयी थी। इस बातसे कितना आनन्द उस बच्चे को एवं गांधीजी को हुआ। वह आनन्दकी कल्पना नही हो सकती।

ऐसी सच्ची भक्ति हमें प्राप्त हो। इसलिए हमे ऐसे सुन्दर एवं शुभ सत्संगोसे अपने जीवन को सार्थक बनना चाहिये।

यहाँ के संयोजको का निमंत्रण स्वीकार करके पूज्य श्री मुरारी बापू पधारे एवं हम सब को श्रीरामचरितकथा का रसास्वादन कराये। इसके लिए हम सब कृतज्ञ है।

आप की सबकी यह भावना व्यक्त करने के लिए आपने मुझे कुछ शब्द बोलने के लिए निमंत्रण दिया इसके लिए मै आभारी हूँ। शब्दोंसे भावना व्यक्त नही हो सकती, मै आप सबकी तरफसे सहस्रवंदन करता हूँ, एवं इस युवा महर्षि के आशीर्वाद की याचना करके अपना स्थान ग्रहण करता हूँ।

❖

वंदनीय - तीर्थरूप अधा

शांतिलाल क. सोमैया

ज्यांनी आपल्या जीवनात ॐचे सतत स्मरण, सेवारूपी अलौकिक भक्ती, प्रबळ पुरुषार्थ, मानवसेवेचे व्रत आणि परमेश्वरावर दृढ श्रद्धा या गोष्टींना अढळ स्थान दिले असे तीर्थरूप अधा, अनेकांच्या मतानुसार 'आधुनिक युगाचे कर्मयोगी', यांनी रविवार ९ मे १९९९ या दिवशी आपला सर्वांचा कायमचा निरोप घेतला.

माझ्या ताई सौ. लीलाबेन आणि अधांच्या परिचयातील अनेक सूज्ञ शुभेच्छकांनी त्यांच्या अनेक कार्यांविषयी लिहिले आहे. पण जीवनातील आपले ध्येय गाठत असताना पूज्य अधांचे कितीतरी गुणविशेष, स्वानुभव, कार्यप्रवृत्तीचे प्रेरणास्त्रोत आणि त्यात त्यांना आलेल्या अडचणी यांचा थोडासा परिचय करून देण्याची संधी मलाही मिळावी असे वाटते.

अधांचा जन्म १९०२ मध्ये झाला आणि १९९९ मध्ये त्यांनी जगाचा निरोप घेतला; म्हणजे त्यांच्या कार्याचा उपयोग संपूर्ण विसाव्या शतकाला झाला. भारताची स्वातंत्र्य चळवळ, स्वातंत्र्यापश्चात् भारताने केलेली औद्योगिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती, उन्नतीच्या रंगीबेरंगी लाटा आणि प्रवाह, तथा वलये यांचे द्योतक त्यांना म्हणता येईल. प्रत्येक शतकाला, युगाला कर्मनिष्ठ व्यक्ती त्यांच्या प्रभावी कार्याने अविस्मरणीय बनवतात. आजच्या जगात सज्जनता आणि सहृदयतेचा अभाव आहे. अशा काळात कोणी एखादाच सत्त्वशील आणि प्रेमळ महानुभव सम्यक् जीवन तथा सनातन सत्य अन् चेतनेला जागृत करण्याचे काम करतो. मला वाटते, माझे बाबाही अशाच मोजक्या व्यक्तींपैकी एक होते!

समाजाची प्रगती आणि जडणघडण यांत व्यक्तीचे स्थान महत्त्वाचे असते. अशा व्यक्तींचे कार्य समाजाला मार्गदर्शक असते. व्यक्तीमुळेच समाज आणि राष्ट्राचे

नवनिर्माण शक्य होते. अशा मानवतावादी ध्येयशील व प्रतिभासंपन्न व्यक्तींचा समाजाच्या प्रगतीत सिंहाचा वाटा असतो. 'योजक: तत्र दुर्लभ:" (योजक दुर्लभ असतात) या सूत्राप्रमाणे जीवनाच्या विविध क्षेत्रांत अधांनी सुंदर भूमिका बजावली.

ती अधांचा जन्म त्यांचे आजोबा - श्री. ठाकरसीभाई सोमैया यांच्या सामान्य कुटुंबात झाला. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील मालुंजा या गावी प्रवरा नदीच्या किनारी त्यांचे घर होते. नंतर ते मुंबईत आले अन् भरडा हायस्कूलमध्ये मॅट्रीकपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर मालुंजा गावातील बेलापूर या गावात जुनी बारदाने व माचीस यांचा स्वतंत्र व्यवसाय अगदी लहान वयात सुरू केला.

१९२७ च्या आसपास या तरुणाची व्यवसायातील प्रगती लक्षणीय होती. बेलापूरमध्ये साखर उद्योग करणारी पेढी मेसर्स 'सोभाचंद रामनारायण खटोड' यांनी त्यांना वर्किंग पार्टनर बनविले. 'नोकरी नाही, व्यापारच करेन', हा त्यांचा पक्का निश्चय होता. जन्मजात व्यापारी गुण, अन् इंग्रजी, मराठी, मारवाडी भाषांवरील प्रभुत्व या वैशिष्ट्यांमुळे त्यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन केला. प्रभावशाली व्यक्तित्त्व आणि कुशाग्र बुद्धीच्या जोरावर त्यांनी मेसर्स सोभाचंद रामनारायण खटोड यांच्या पेढीला उत्तरोत्तर प्रगतीपथावर नेले. त्यामुळे ती पेढी साखर व्यापारात अग्रणी स्थान मिळवू शकली. तसेच १९३९ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांच्या साखर विक्रीचे काम त्या पेढीला मिळाले.

त्यांची व्यापार-कुशल बुद्धी व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व यामुळे त्यांनी तत्कालीन अग्रणी साखर कारखाना - बेलापूर कंपनीचे (मेसर्स डब्ल्यू.एच.ब्रोड अँड कंपनीचे) साखर व्यापाराचेही सर्व काम मिळविले. त्यांची कामगिरी सर्वत्र संतोषजनक होती, त्यामुळे मेसर्स एस.आर.खटोड यांच्या पेढीचे नाव भारतभर प्रसिद्ध झाले.

१९२७-३७ हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचा काळ! सत्याग्रहाच्या चळवळी, अस्पृश्यता निवारण्याचे प्रयत्न, परदेशी कापडांची होळी, खादीचा प्रचार, श्री. दयानंद सरस्वती यांच्या आर्य समाजाला मिळालेली प्रसिद्धी - या सर्व गडबडीतही अधा विचारपूर्वक मिसळले होते आणि शक्य त्यावेळी चळवळीत भागदेखील घेत होते. अधांनी खादीचा वापर जीवनभर केला. तसेच गो-मातेची सेवा केली. देशातील चळवळीच्या निमित्ताने अनेक कार्यकर्ते आणि देशभक्त घरी येत. ते सौ. आईच्या (साकरबेन) हातचे जेवण जेवून तृप्त होत. खरेपणा, साधेपणा, सहनशीलता हे कुटुंबाचे गुण सर्वांमध्ये आपोआप उतरत.

व्यापारक्षेत्रात अधांना जी प्रसिद्धी व सफलता लाभली ती अकस्मात नव्हती. महात्मा गांधींच्या सूक्तीचे "Customer is your king, your God" त्यांनी शब्दश: पालन केले. 'ग्राहक आपला देव आहे', सर्वांबरोबर सम्यक् व्यवहार; "Fair play"

हा त्यांचा सिद्धांत होता. साखरेचा रोजचा भाव सकाळी ते स्वत: नक्की करत आणि त्याप्रमाणे दिवसभर सौदे करीत. क्वचित काही कारणास्तव सायंकाळी भाव कमी झाला किंवा कमी किंमतीत सौदा झाला तर ते सकाळचा सौदा करून गेलेल्यांना स्वत: भेटून भाव कमी करून देत. ग्राहकांवर कधीही अन्याय होऊ नये याची ते काळजी घेत.

साखर व्यापारात अधांनी प्रामाणिकपणा, साहस तथा दीर्घदृष्टी यांचा समन्वय साधला. त्यांची नीतिमत्ता, कुशाग्र व्यापारी बुद्धी, सच्चेपणा आणि "Fair play" वरील विश्वास यामुळे भारतात व्यापारी क्षेत्रात ते अग्रणी म्हणून गणले जाऊ लागले. (ते "Sugar King" म्हणून ओखळले जात) त्यांची ख्याती अन्य प्रांतात तसेच संपूर्ण देशात पसरली होती. भारतातील अन्य साखर बाजार उदा. कलकत्ता, कानपूर, बाजारदेखील त्यांनी सकाळी नक्की केलेल्या साखरेच्या भावाची प्रतिक्षा करीत असत.

व्यापारक्षेत्रातून ते उद्योगक्षेत्रात आले. १९३८ मध्ये त्यांनी साकरवाडीत तसेच १९४१ मध्ये लक्ष्मीवाडीत (जसे अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात) साखर कारखान्यांची स्थापना केली. डेक्कन कॅनॉल्स, गोदावरी साईट बँक तथा लेफ्ट बँक कॅनॉल्स येथील जे पाणी वापर नसल्याने वाहून जात होते तेथे हळूहळू जमिनी खरेदी करून ऊस उत्पादनासाठी (१२०००) बारा हजार फार्म्स त्यांनी स्थापन केले. ऊस उत्पादनासाठी नवीन पद्धतीने ट्रॅक्टर वापरून "Mechanised Plantations" (यांत्रिक लागवड) उभारले. संशोधन केंद्रातून नवीन उत्तम दर्जाच्या उसांच्या जाती मिळवून गोदावरीच्या शेतांत तसेच बागाईतदारांच्या शेतात त्याचे वितरण केले. या भगीरथ प्रयत्नांमुळे 'गोदावरी फार्म्स' अशी आंतरराष्ट्रीय ख्याती मिळाली. भारताची उत्पादनाची सरासरी दर एकरी १८-२० टनांची होती. जगाच्या ऊस उत्पादन उच्चांकाला मागे सारून 'गोदावरी फार्म्स"ने आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवली. क्यूबा, हवाई, इंडोनेशियासारख्या ऊस उत्पादनात अग्रेसर देशांनाही गोदावरी कारखान्यांनी मागे टाकले.

या सर्वांमागे अधांचे तीन गुण कारणीभूत होते. आत्मबळावरील अतूट श्रद्धा, बुद्धिचातुर्यासोबत शेतीचे उत्तम ज्ञान आणि अथक परिश्रम! शेतीच्या क्षेत्रातील त्यांची ही सिद्धी म्हणजे त्यांच्या कार्यप्रवृत्तीचे ज्वलंत उदाहरण होते. शेतीविषयी त्यांना अतिशय आकर्षण होते. 'उत्तम ऋषी" हे सूत्र त्यांनी जीवनात पाळले होते. शेतीत उत्तम प्रगती करण्यासाठी भारतातील सर्वोत्कृष्ट शेतकी-तज्ज्ञांना आमंत्रित करून ते त्यांना कार्यप्रवण करीत. त्या काळात सर्वात जास्त नूतन शिक्षण मिळविलेल्या व्यक्ती तसेच संशोधन अन् फार्मिंग क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून उत्तम परिणाम मिळविण्याची आकांक्षा असलेले B.Ag. झालेल्या व्यक्ती सर्वात जास्त गोदावरी फार्मवरच होत्या. उत्तम कामगिरी करण्याची महत्त्वाकांक्षा राखणाऱ्या

व्यक्तींची पारख करण्याची अद्‌भूत शक्ती अधांकडे होती. अशा लोकांना ते आकर्षून घेत. जमिनीला भूमाता तिच्याकडून अनन्य देणगी मिळवण्यासाठी सतत प्रयत्नशील असत. फक्त ऊस उत्पादनातच नव्हे तर संपूर्ण वनस्पतीशास्त्रात (Horticulture) त्यांना रस होता.

'कर्मण्येवाधिकारस्ते'- तुला तुझे कर्म करायचे आहे, बाकी सर्व परमेश्वराच्या हाती आहे हा त्यांचा मूलमंत्र होता! पुरुषार्थ करण्यात ते नेहमी उत्साही असत. एखादे काम किंवा संकल्प नक्की केला असेल तर सर्व संकटांना तोंड देत एकाग्रतेने ते पूर्ण करणे असा त्यांचा स्वभाव होता. कचित एखादे काम पूर्ण होऊ शकले नाही तरी ते निराश होत नसत. कदाचित परमेश्वराचीच तशी इच्छा असेल असे समजून 'असेल प्रभुइच्छा!' असे म्हणून समाधान मानीत.

एखाद्या स्वप्नशिल्पकाराप्रमाणे त्यांनी स्वप्नांना साकार करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. प्रबळ पुरुषार्थाच्या बळावर ध्येयनिष्ठ बनून विराट योजना त्यांनी साकार केल्या, तसेच फलद्रूप केल्या. विधिलिखित कोणी टाळू शकत नाही. कधी एखादी अशी अकल्पनीय घटना घडली तरीही ते कोणावर दोषारोप न करता 'हरी इच्छा' मानून नव्या उत्साहाने पुन्हा कामाला लागत. कामात सफलता मिळवण्यासाठी ते कटिबध्द होते.

एक-दोन प्रसंग मनात तरळून जातात-

१९५० मध्ये श्री. नवलभाई फिरोदियाजींच्या घरी अहमदनगरमध्ये आम्ही राहिलो होतो. रात्रीच्या वेळी बातमी आली की, साकरवाडीतील गोदामांना आग लागली आहे. त्यांनी बातमी ऐकली. पुढील उपाययोजना करण्यासाठी कार्यकारी व्यक्तींना सूचना दिल्या व अर्ध्या तासात पुन्हा निद्राधीन झाले. 'प्रभू इच्छा'असे म्हणून प्रभूच्या चरणी मस्तक नमवून पुन्हा आपल्या नित्यक्रमाला लागले.

दुसरा एक प्रसंग अधिक ऊग्र व विनाशकारी झाला होता. १३ डिसेंबर १९७३ रोजी महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमा संदर्भात हा प्रश्न उद्‌भवला होता. 'बेळगाव, निपाणीसह महाराष्ट्र झालाच पाहिजे.' या घोषणांनी दुमदुमलेला तो काळ! १९७१ मध्ये नुकतीच नवीन स्थापन केलेल्या मुधोळ तालुक्यातील (कर्नाटकात- मिरज व बेळगावपासून ६० मैलांच्या अंतरावर) आपल्या समीरवाडी साखर कारख्यान्यात हा प्रसंग घडला. 'मराठी लोकांना इथून हाकलून द्या.' अशा घोषणा देत तीनशे लोकांच्या संतप्त जमावाने समीरवाडी फॅक्टरीची कॉलनी, संपूर्ण स्टोअर्स, वाहने, ट्रॅक्टर वगैरेंना आग लावली. संपूर्ण फॅक्टरी बंद पडली. करोडोंचे नुकसान झाले लोक म्हणू लागले की, दोन-तीन वर्षे फक्टरी सुरू होऊ शकणार नाही. सर्वजण निराश झाले. मुंबई ऑफिसचे कार्यकारी अधिकारी श्री. कावडिया, जे त्यावेळी समीरवाडीतच होते, ते

मुंबईत परत आले आणि अधांकडे हमसाहमसी रडू लागले. अधांनी त्यांना शांत केले आणि सांगितले, 'निराश होऊ नका. असे समजा की, भूकंप झाला आहे. धरणीकंप तुम्ही थांबवू शकाल का?' नंतर ते म्हणाले, 'एक दिवस आराम करा अन् उद्यापासून फॅक्टरी परत सुरू करण्यासाठी कामाला लागा!' जी फॅक्टरी सर्वांच्या म्हणण्यानुसार दोन वर्षे सुरू होऊ शकणार नव्हती ती फक्त ३३ दिवसांत १६ जानेवारी १९७४ रोजी पुन्हा सुरू झाली! विविध घटनांचा आनंदाने स्वीकार करीत, निराशेला तिलांजली देत पुढे पाऊल टाकणाऱ्या ध्येयलक्षी पुरुषाच्या विजयाचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

सतत कार्यशील राहणे हे अधांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते. आपल्या संपर्कातील लोकांनाही ते सतत कार्यरत ठेवीत. एक सूत्र ते नेहमी सर्वांना ऐकवत व स्वत: त्यांचे आचरण करीत. 'चरैवेति, चरैवेति' चालत रहा, चालत रहा! हे सूत्र आपल्याला असे सांगते की, झोपणाऱ्याचे भाग्य नेहमी झोपून असते. फक्त चालणाऱ्याचे भाग्य उजळून निघते. चालणाऱ्यासाठी हे सतयुग आहे, झोपणाऱ्यासाठी कलियुग आहे. गती हेच जीवन आहे आणि तोच प्रगतीचा मार्ग आहे. प्रबळ पुरुषार्थानेच मनुष्याचे प्रारब्ध अनुकूल बनते. प्रारब्ध सर्व काही आहे पण फक्त प्रारब्धावर विसंबून राहणारा सर्व काही गमावून बसतो. पुरुषार्थाशिवाय प्रारब्ध मदत करीत नाही. स्वप्नरंजन करून प्रगती होत नाही. उद्यम, साहस, धैर्य, शक्ती, पराक्रम तथा कृतज्ञता या शक्तीचे जीवंत उदाहरण पूज्य अधा होते आणि त्या सर्वांचा कळस म्हणजे त्यांची प्रभूवरील श्रद्धा 'हरी इच्छा" होती.

त्यांच्या कर्तृत्वसंपन्न जीवनाचे दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे 'मानवसेवा'. 'दरिद्रीनारायणाची सेवा हीच खरी सेवा' हा महात्मा गांधींचा जीवनमंत्र त्यांनी आपल्या जीवनात अंगिकारला होता. 'न मानुषात् परो धर्म:' मानवतेसारखा दुसरा कोणताही महान धर्म नाही. त्यांचे जीवन या उक्तीचे द्योतक होते. या मंत्राचा जप ते सतत करीत असत. परिभ्रमण करताना आपल्या देशबांधवांची परिस्थिती, वनप्रदेशात वात्सल्याशिवाय कोमेजणारी जीवने त्यांनी पाहिली. त्यातूनच 'श्री गिरिवनवासी प्रगती मंडळा'चा जन्म झाला. देशाच्या अन्य प्रगत भागाच्या बरोबरीने येण्यास आतुर असणाऱ्या समाजाला त्यांनी हात दिला. निर्वस्त्र बाळांना आणि निष्कांचन स्त्री-पुरुषांना त्यांनी आधार दिला. परधर्मातील चांगल्या सवयी व गुण त्यांनी आत्मसात करून उपयोगात आणले. मफतलाल ग्रुपतर्फे पूज्य महाराज श्री. रणछोडलाल महाराजांच्या मार्गदर्शनाने योजलेल्या 'मेडिकल कॅम्प' मधून प्रेरणा मिळवून 'मेडिकल कॅम्प' स्थापन केले. गेल्या दोन दशकांपूर्वी त्यांनी केलेल्या या मानवसेवेच्या ध्येयाला सर्वजण कायम स्मरणात ठेवतील.

समाजातील मागास, दलित व गिरिवनवासींसाठी महाराष्ट्रात डहाणू येथील 'नरेशवाडीत' आदिवासी उत्कर्ष केंद्र, हॉस्पिटल, प्रशिक्षण शाळा, गौशाळा वगैरे त्यांच्या उत्कट मानवसेवेचे प्रतीक आहेत. त्या हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रोग्यांना रोगनिदान शिबिरांद्वारे मुंबईतील निष्णात व तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवेचा लाभ मिळतो. त्यांची अविस्मरणीय कार्ये म्हणजे, कच्छमधील विकास कार्य, कच्छमधील दुष्काळग्रस्तांसाठी सुरू केलेली गौसदने, गुजरात सरकारच्या मदतीने कच्छमध्ये केलेली पाण्याची योजना, कूपनलिका कार्य, कुकमामधील मेडिकल कॅम्प, कच्छ नारायण सरोवर तीर्थ येथील अतिथीगृह, माता मढ येथील योगदान वगैरे कितीतरी सांगता येतील. कुकमा येथील 'मेडिकल कॅम्प" एक आदर्श कॅम्प म्हटला गेला. दुष्काळाच्या वेळी सोमैया ट्रस्टकडून योजलेल्या ढोरवाड्याला 'एक उत्तम ढोरवाडा' म्हणून गुजरात सरकारने प्रमाणपत्र दिले होते. 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' हा मंत्र त्यांनी अंमलात आणला आणि दैनिक जीवनातील एक महत्त्वाचे अंग बनवला.

त्यांच्या जीवनात एका वेदवाक्याचा प्रभाव खूप होता. 'मा गृधः कस्यविद् धनम्!' 'समाजाकडून मिळवलेली संपत्ती समाजाला अर्पण करा. ते धन कोणाचे आहे?' हा ध्वनी त्यांच्या सर्व कार्याच्या मागे गुंजत होता. ते म्हणत, 'धनिकांचे धन, ज्ञानी माणसाचे ज्ञान, अन् बलवानाचे बळ" समाजाच्या उन्नतीसाठी वापरले गेले नाही तर व्यर्थ आहे. त्यानंतर १९५१ मध्ये त्यांनी क. ज. सोमैया ट्रस्टची व १९५५ मध्ये सोमैया ट्रस्टची स्थापना केली. लोककल्याणाच्या कार्यात, शिक्षणक्षेत्रात, वैद्यकीय क्षेत्रात इतरांना कसे सहभागी करता येईल, याचा ते विचार करीत. या सत्कार्यात त्यांच्या संस्कारशील सहधर्मचारिणी सौ. साकरबेनचा संपूर्ण सहयोग त्यांना मिळाला.

सोमैया ट्रस्टच्या स्थापनेने सोमैया विद्याविहाराच्या एका अद्वितीय शिक्षण प्रकल्पाला जन्म दिला. आज घाटकोपरच्या विद्याविहाराच्या ६० एकरांच्या विशाल पटांगणात विस्तारीत शैक्षणिक संकुलात ३० संस्था व बावीस हजार विद्यार्थी आहेत. बालमंदिरापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. हे शिक्षण फक्त युनिव्हर्सिटी डिग्रीपर्यंतच मर्यादित नाही तर शारीरिक व सांस्कृतिक पाया येथे घडवला जातो. भारताच्या आदर्श भावी नागरिकांची जडणघडण येथे होते. अशा संस्थांची स्थापना म्हणजे भगीरथ प्रयत्नांना आलेले यश आहे. महाभारतात पुढील श्लोक त्यांनी श्वासोच्छवासाप्रमाणे आपल्या जीवनात अंगीकारला होता. तोच त्यांच्या जीवनाचा मार्गदर्शक होता.

न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं ना पुनर्भवम्।
कामये दुःखतप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम्।।

'हे प्रभो, मला राज्याची, स्वर्ग मिळवण्याची किंवा पुनर्जन्मापासून मुक्ती

मिळवण्याची इच्छा होती. फक्त मी माझ्या दु:खी बांधवांचे अश्रू पुसू शकेन हीच इच्छा मनी आहे!' दुखितांचे दु:ख दूर करण्यासाठी त्यांनी योजना आखल्या. त्यांचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे आज विद्याविहारमध्ये असलेले ७०० बिछाने असलेले नि:शुल्क हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, रिसर्च सेंटर, नर्सिंग स्कूल वगैरे. ही सर्व सत्कार्ये त्यांनी इतर कोणाचीही आर्थिक मदत घेतल्याशिवाय स्वहस्ते केली आहेत, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विशेष बाब आहे.

पू. अधा स्वबळावर पुढे आले आणि त्यांनी 'सेवेला' जीवनात प्रमुख स्थान दिले. त्यांच्या प्रत्येक कार्यात त्यांनी आपल्या बांधवांविषयी सहानुभूती अन् प्रेम दाखवले. १९४४ मध्ये झालेल्या गोदीतील धडाक्याची सर्वांना आठवण असेलच. वडगादीत राहणाऱ्या आपल्या बांधवांवर संकट कोसळले होते, तेव्हा त्यांनी आपल्या बांधवांना इतरांसोबत मदत केली. संपत्ती आणि समृद्धी मिळाली तरीही निष्काम आणि नि:स्वार्थ भावना त्यांनी ठेवली. विवेक आणि विनयाने लक्ष्मीचा उपयोग समाजकल्याण व जनता जनार्दनाच्या सेवेत केला. त्यांच्या प्रेरणादायी जीवनाचे एक वैशिष्ट्य होते. नेहमी दृष्टी उन्नत ठेवा. लक्ष्य उच्च असावे. "Always gaze at a Star" ते नेहमी मोठ्या योजना आखत. कधीकधी आवाक्याबाहेरच्या योजनाही करीत. त्यांच्याबरोबर काम करणारे कधीकधी आश्चर्य व्यक्त करीत. 'हे कसे शक्य आहे?' तेव्हा ते देवावर पूर्ण श्रद्धा ठेवून काम निभावून नेत. त्यामुळे सोमैया ट्रस्टच्या कार्यात सहयोग देणारे भारत सरकारचे उच्च सनदी अधिकारी आणि रेल्वे बोर्डाचे भूतपूर्व चेअरमन स्वर्गीय एम. मेनेझीस नेहमी म्हणत, "I would often wonder how the project Shree K. J. Somaiya suggested could be done. But the old man always proved right!" प्रथम आम्हाला प्रश्न पडे की हे कसे शक्य आहे? पण अधांचा देवावर पूर्ण विश्वास असे. त्याशिवाय ते कुटुंबवत्सलही होते आणि मूलांमध्ये मूल होऊन ते आनंद घेत.

डिसेंबर १९६१ मध्ये आजपासून ३८ वर्षांपूर्वी मृत्यूनंतर वाचायच्या आदेशाबरोबर लिहिलेल्या लिखाणात त्यांचे विचार आणि मनातील भावना तसेच परमेश्वराविषयीची कृतज्ञता दिसून येते.

'मला कोणत्याही प्रकारची इच्छा-आकांक्षा राहिलेली नाही. ईश्वराने मुक्तहस्ते मला खूप खूप दिले आहे. त्याने मला न मागता अनेक सुखे दिली. मग मला दु:ख कशासाठी होईल? विषाद का वाटावा?'

डायरीतील दुसऱ्या एका नोंदीत (डिसेंबर ६१ मध्ये) ते लिहितात, 'मी अंधाऱ्या जागेत बसून कल्पना करीत, आकडेमोड करीत, योजना आखीत होतो. कोणत्याही गोष्टीसाठी योग्य साधने किंवा योगायोग नव्हते, तरीही परमेश्वराने वेळेवर त्याची नोंद घेतली. हुंड्या स्वीकारत गेलो. शेखचिल्लीच्या स्वप्नांना साकार केले. काहीही

माझ्याकडे नव्हते. फक्त परमात्म्याची कृपा होती. त्यातूनच ही नवनिर्मिती झाली. त्या कृपाळू परमात्म्याने अशी समाधानकारक परिस्थिती निर्माण केली असताना मला आनंद का वाटणार नाही ?

अधा नेहमी प्रभूच्या अपरंपार दयेविषयी व करुणेविषयी बोलत. त्याची करुणा भाकत व आभार मानत. 'हे करुणाकरा' हे त्यांचे प्रिय भजन होते. ते भजन ते सर्वांकडून म्हणवून घेत व आपणही सहभागी होत.

'हे करुणाना करनारा, तारी करुणानो कोई पार नथी।'

त्यांच्या जीवनात 'श्री' आणि 'सरस्वती'चा सम्यक् समन्वय झाला होता. वागणुकीत कडक शिस्त, संस्कार पालनात तत्पर, मूल्यांच्या रक्षणार्थ सतत जागृती, ही त्यांच्या तेजस्वी जीवनाची वैशिष्ट्ये होती. प्रामाणिकता, साहसिकता, तथा कार्यदक्षता ही लक्षणे म्हणजे त्यांच्या जीवनातील त्रिवेणी संगम होता आणि तीच त्यांच्या जीवनाची अद्‌भूत सिद्धी होती. दीर्घजीवन ते दिव्यपणे जगले. श्री. हरीभाई कोठारी यांच्या शब्दात सांगायचे तर 'अद्‌भूत मातीचा अद्‌भूत मानव!' अशा आमच्या तीर्थरूप अधांना माझे कोटीकोटी प्रणाम!

❖

पिता-वात्सल्याचा वटवृक्ष - 'आपले अधा'

सौ. लीलाबेन कोटक

माझ्या आई-वडिलांच्या वियोगाचे दु:ख मला या 'मुलीचे पत्र' यातून व्यक्त करावे लागेल याची मला कल्पना नव्हती. हृदय पिळवटून काढणारी ही जाणीव आहे.

न काही उमजे मला,
न कोणी समजावू शके मला,
हाच सल मनी,
तुम्ही आज आमच्यात नाही
हृदयास दिला होता तुम्ही,
मनाचा विसावा तुम्ही,
अंतरात्म्याचा आसराही तुम्ही होता,
माता-पित्याविना जग हे सुने भासे मजला!

पूज्य अधा (श्री. करमसीभाई जेठाभाई सोमैया),
तुम्ही नावाप्रमाणे कर्मशील जीवन जगलात.
न त्वहं कामये राज्यं, न स्वर्गं, न पुनर्भवम् ।
कामये दु:ख तप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम्।।

हे प्रभो, मला राज्याची लालसा नाही, स्वर्ग मिळण्याची, पुनर्जनमची किंवा मुक्तीची आस नाही. माझी प्रार्थना इतकीच,

'हे प्रभो, मी माझ्या दु:खी बांधवाचे अश्रू पुसू शकेन !'

वरील श्लोक आणि कृष्णाची गीता यांचे तुम्ही जीवनात अनुकरण केले.

आईच्या मृत्यूला चार वर्षे लोटत नाहीत तोच बाबा तिला भेटण्यास निघून गेले. आई गेली त्यावेळी बाबा म्हणाले, 'ती माझ्यासाठी कोण होती याची फक्त मलाच कल्पना आहे.' शेवटच्या घटकेपर्यंत बाबांना आईची आठवण सतावत होती. ते म्हणत,

कार्येषु मंत्री, करणेषु दासी, भोज्येषु माता, शयनेषु रम्भा ।
धर्मानुकूला क्षमयां धरित्री, भार्याच षाड्गुण्यं वतीहं दुर्लभ ।।

भारतीय धर्मपत्नीची सहा लक्षणे पुढीलप्रमाणे -

कार्यात सल्लागार, कर्तव्यात दासी, भोजनास माता, शयनगृही रंभा, पतीची आज्ञा पालन करणारी आणि क्षमा करण्यासाठी घरची लक्ष्मी - ती खरी सन्नारी !

खरोखर आमची आई अशीच अद्वितीय होती. दोघेही एकमेकांस पूरक होते. एकमेकांस समजून घेऊन ते जीवन जगले. बाबांना आईची प्रत्येक कार्यात आनंददायी साथ होती. सहकार्य होते. आमची आईदेखील उदारमतवादी होती. परदु:ख त्यांना सहन होत नसे. कित्येकांची त्यांनी स्वत: सेवा केली होती. कितीतरी गुप्तदान त्यांनी केले होते. त्यांच्या स्वत:च्या सात लेकींशिवाय कितीतरी मानलेल्या लेकी होत्या. त्यांतील कित्येकींसाठी वरसंशोधन व लग्नाची जबाबदारी त्यांनी पार पाडली. त्या कर्मकांडाचे त्यांनी अवडंबर माजवले नाही. नुकतीच घडलेली एक घटना. एक स्त्री रडत माझ्यापाशी आली. तिच्या दुसऱ्या मुलीचे लग्न होते. ती म्हणाली, 'मी पहिल्या मुलीच्या लग्नावेळी तुमच्या आईकडे आले होते. त्यांनी मला दोन दिवसानंतर भेटण्यास बोलावले. दोन दिवसानंतर त्यांनी मला एक बॅग दिली. त्यात साडी, मंगळसूत्र, नाकातील फुली व बांगड्या होत्या. मला काहीच घ्यावे लागले नाही.' तिच्या एका कपाटात अशा वस्तू ठेवलेलया असत. तिच्याकडून कोणीही रिक्त हस्ते परत जात नसे.

अधांनी आई व आम्हा भावंडांना घेऊनच देश-परदेशांत परिभ्रमण केले. फक्त १९५८ मध्ये कैलास सरोवर सहलीला, ते आपल्या सांधेदुखीमुळे व डॉक्टरी उपचारांची सोय उपलब्ध होऊ शकणार नसल्याने आले नाहीत. तरीही त्यांनी आईला जोशीमठात भेटण्याचे कबूल केले होते. म्हणून दीड महिन्यानंतर प्रवासी हमालांच्या साहाय्याने दुर्गम पर्वतमय प्रदेश पार करुन ते निश्चित जागी पोहोचले. हे सर्व त्यांनी आईची काळजी मिटविण्यासाठी व त्यानंरतची चारधाम यात्रा करता यावी म्हणून केले. त्यानंतरची यात्रा त्यांनी पन्नास कुटुंबियांसमवेत केली. प्रवासात येणाऱ्या संकटांना त्यांनी धैर्याने तोंड दिले. संकटसमयीदेखील त्यांची विचारशक्ती स्थिर असे. सकाळी तीन-चार वाजताच ते रवाना होत. तत्पपूर्वी आई स्वत: हजर राहून वडिलांसाठी परोठे व गूळपापडी तयार करवून घेत. आईलादेखील स्वत: बनवून खायला घालण्याची खूप हौस होती. ती प्रेमाने सर्वांना खाऊ घाली. लोक त्यांना अन्नपूर्णा म्हणत. तिला जर माहीत झाले की कुणाकडे बाळ येणार आहे, तर बाळंतिणीसाठी पिस्ता लाडू ती पाठवून देई. वेगवेगळे मिष्टान्न बनवण्यात ती निपुण होती.

अधा आहेर कधी खात नसत. त्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्याची ती योग्य काळजी घेई. अधा पहाटे निघाले की, स्वत:च्या स्वाथ्याची पर्वा न करता आई त्यांना निरोप देण्यास खाली जाई. अधादेखील तिची तेवढीच काळजी घेत. आईची प्रकृती जरा बिघडली तरी ते व्याकूळ होत. गरज पडली तर स्वत:चे कार्यक्रम रद्द करीत. शेवटपर्यंत त्यांना तिची आठवण येत होती. आम्ही कितीतरी भावंडे एकत्र वाढलो. शांतिभाई मोठे होते. आम्ही सात बहिणी, आमचे काका, आत्या आणि त्यांच्या मुली, तसेच भागीदाराचा मुलगा व कस्तुरीबेन आम्ही एकत्र वाढलो. कच्छहून कितीतरी लोक येत, पण आम्ही बाबांच्या आदर्शाप्रमाणे एकत्र राहिलो. एक दुसऱ्याबद्दल संपूर्ण श्रद्धा, विश्वास व समाधान हे त्यांच्या गृहस्थाश्रमाचे आदर्श होते. जीवनात आम्ही त्या दोघांना कधीही उच्च स्वरात बोलताना ऐकले नाही. त्यांच्यात समजूतदारपणा व संस्कारयुक्त मर्यादशील संवाद असत. नावाप्रमाणेच गुण होते. महणूनच 'साकर' आणि 'कर्म' एकरुप होऊन अशी उत्तम कामे करु शकले.

पूज्य अधांनी ३२ वर्षात ३२ शैक्षणिक संस्था मुंबईत स्थापन केल्या. मुंबईबाहेरही सध्या अन्य शैक्षणिक संस्था काढलेली आहे. त्यामागे अथक परिश्रम, तत्परता आणि तल्लीनता होती. शिस्तीचे आणि स्वच्छतेचे ते आग्रही होते. त्यात तडजोड मुळीच खपवून घेतली जात नसे. प्रत्येक काम उत्तम झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. त्यांना माणसांची चांगली पारख होती. एकदा घेतलेला निर्णय त्वरीत अमलात आला पाहिजे व आजचे काम आज पुरे झाले पाहिजे, ही त्यांची वृत्ती होती. रात्री झोपायला कितीही उशीर झाला तरी ने नेहमी सहा वाजता उठत. कित्येक वेळा ते ज्या दिवशी झोपत त्याच दिवशी उठत.

१९६० मध्ये ज्यावेळी प्रथम आर्टस्, कॉमर्स कॉलेजची मार्च-एप्रिल महिन्यात विद्यापीठातर्फे अनुमती मिळाली तेव्हा विद्याविहारच्या जमिनीवर एकही घर नव्हते. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या भूमिपूजनानंतर फक्त दीड महिन्यात इमारत उभी राहिली व कॉलेज जून महिन्यात सुरु झाले. जमीन दलदलीची होती. कितीतरी फूट भरणी घालावी लागली. जून महिन्यात कॉलेज कसे सुरु होणार, असे पाहायला येणारे विचारत. रात्रं-दिवसाच्या परिश्रमानंतर व दृढ निश्चयामुळे जून महिन्यात कॉलेज सुरु झाले. अधा स्वत: दिवसातून दोन वेळा तासन्तास येऊन जात. विद्याविहारच्या जमिनीवर ते थेंबभरही पाणी घेत नसत. कारण हे सर्व ट्रस्टचे होते, अपर्ण केले होते. एक पैसादेखील बाहेरचा नव्हता. तरीही एकट्याने शून्यातून विश्व निर्माण करण्यासारखेच हे अद्वितीय कार्य होते. किंमत करणे, वस्तूंची मागणी करणे हे सर्व स्वत: करीत असल्यानेच अशा भक्कम पायाच्या इमारती उभ्या राहू शकल्या. त्याचप्रमाणे इस्पितळाची इमारतही अगदी कमी कालावधीत उभी राहिली. कोणी म्हणाले, 'गिनीज बुकमध्ये लिहिण्यासारखी गोष्ट आहे.' ईश्वरेच्छा हा बाबांचा महामंत्र होता.

या सर्व महत्कार्यानंतरही अहंकार किंवा मी केले, ही भावना त्यांना स्पर्शली नाही. त्यांना मान आवडत नसे. सर्व काही सहज रीतीने केल्याप्रमाणे ते स्वत:ही काम करीत व करवून घेत.

ईश्वरावर व त्यांच्या कृपेवर त्यांची श्रध्दा होती. त्यांच्या संपर्कात राहणारे एक गृहस्थ म्हणत की, मला नवल वाटते, बँकेत एक पैसा नसताना हे कोटींच्या प्रोजेक्टच्या गोष्टी कशा बोलतात? त्यांचे कोणतेही कार्य पैशांसाठी अपूर्ण राहिले नाही. अडचणीच्या वेळी पैसे मिळतच. ते म्हणत की पैशांमुळे कोणतेच काम राहता कामा नये. ईश्वराने त्यांना कित्येक वेळा मदत केली आहे. त्याचे दृष्टांत अधा सांगत. "God helps those who help themselves" या सूत्रावर त्यांची संपूर्ण श्रद्धा होती आणि या सूत्राला त्यांनी जीवनात अंमलात आणले होते.

अधांना कर्तव्यापोटी जितकी श्रद्धा होती तितकीच लहान मुलांविषयी माया होती. पावसाळ्याची सुरुवात झाली की ते भिजण्यासाठी बाहेर जाऊन येत. निसर्गप्रेमाच्या पूर्तीसाठी घोडबंदरला चक्कम मारत. गणेशोत्सव व नवरात्रीत देवदर्शनासाठी आम्ही एकत्र फिरत असू. घरात पाहुणेमंडळी येणार असतील तर अधा रांगोळी घालून घेत, फुलझाडांच्या कुंड्या ठेवत, तऱ्हेतऱ्हेची सजावट करवीत. आम्हा मुलांना रिकामे बसू देत नसत. पोहणे, संगीत, चित्रकला, संस्कृत, शिवणकाम, भरतकाम वगैरे विविध प्रवृत्तींमध्ये आम्हांला सतत गुंतवून ठेवत. ते सांगत, खेळा-नाचा-हुंदडा; पण वेळ वाया घालवू नका. आमच्याकडून नाटके करवून घेत व प्रेमाने पहात. त्यांचे हे प्रेम आम्हांला जीवनभर पुरेल. शिक्षणातही मागे राहिलेले त्यांना खपत नसे. ईश्वरकृपेने आम्ही मुलेदेखील शिक्षणात हुशार होतो.

अधा स्वत: कुटुंबवत्सल होते. कुटुंबीयांसमवेत त्यांनी कितीतरी प्रवास केला. आपल्या भाऊ-बहिणींवर त्यांचे प्रेम होते. आमच्या आत्या उतारवयातही गुलाल उधळत असा. अधा सर्वांना प्रेमपूर्ण नजरेने पाहात. घरात नोकरचाकर मुबलक असूनही स्वावलंबनावर ते भर देत. स्वत:ची कामे स्वत: करीत व करण्यास सांगत.

अधांनी दहा वर्षांपूर्वी सुरु केलेल्या ज्ञानसत्रात जनतेला अच्युत्तम प्रवचनांचा लाभ मिळतो. दर २६ जानेवारीला वयोवृध्दांच्या सन्मानार्थ 'वयोश्रेष्ठी' कार्यक्रम त्यांनी सुरु केला, ज्यामध्ये वृद्ध मुक्तपणे स्वत:चे विचार व भावना व्यक्त करतात. ज्ञातीतील गरीब लोकांची दु:खे जाणण्यासाठी आम्ही लाहनपणापासून आई-अधांबरोबर झोपडपट्टीत जात असू व गरजवंतांना मदत करत असू. कित्येक कुटुंबाना त्यांनी घरे दिली आहेत. पण त्याचा जाहीर उल्लेख कधी केला नाही.

आपल्या मृत्युपश्चात वाचण्यासाठी त्यांनी १९६१ मध्ये जो लेख लिहिला त्यात एके ठिकाणी ते म्हणतात...

'जिवितांसाठी उपयोगी पडण्याची संधी कधी गमावू नका !' यापुढे ते म्हणतात....

'अंधाऱ्या खोलीत बसून कल्पना करणारा, योजना आखणारा मी काहीही साधन आणि परिस्थिती नसताना कार्य करीत होतो, तरीही त्याची नोंद परमेश्वराने वेळेवर घेतली. हुंड्या स्वीकारत गेलो. शेखचिल्लीची स्वप्ने साकार केली. माझ्याकडे काहीच नव्हते. फक्त परमात्यामची कृपा होती. त्यातून ते सर्जन दिले ते परम कृपाळू देवाने! अशा सुखद परिस्थितीत आत्मानंदाचा अनुभव का येणार नाही ?'

आजच्या काळात तिथे आपल्या नशिबाला दोष देण्याची प्रवृत्ती वाढते आहे तिथे त्या परमात्याम्याविषयी किती ही कृतज्ञता! ते साहित्यकार नव्हते पण त्यांचे लिखाण साहित्यकापेक्षा मुळीच कमी नव्हते. संयोगवश शालांत परीक्षा ते देऊ शकले नाहीत, पण प्रथम, द्वितीय क्रमांक कधी सोडला नाही. गणितात सतत शंभरापैकी शंभर गुण ! कच्छी, गुजराती, हिंदी, मराठी, इंग्रजी आण मारवाडी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. या भाषांमध्ये बोलताना त्यांना ऐकणारा त्यांना त्याच भाषेचा समजे! संस्कृतवरसुद्धा प्रभुत्व होते.

त्या अंधाऱ्या पडवीचे दर्शन आम्ही केले आहे. ६' x ८' ची ती पडवी, आई म्हणत असे, रात्री अधा पाय आखडून घेतात तेव्हाच दरवाजा बंद होतो. अशा परिस्थितीतही किती भव्य कल्पना !

त्यांनी ईश्वराजवळ जे मागितले ते त्यांना मिळाले. त्यांच्या कार्याबद्दल आपणा सर्वांना थोडीफार कल्पना आहेच. लहानपणी थोडा त्रास सहन करुन त्यांनी ठरवले की कधी कुणाची नोकरी करणार नाही. ईश्वराने त्यांचे ऐकले आणि साखर कारखाना सुरु झाला. ईश्वराने दिवसेंदिवस त्यांची प्रगती केली. सत्य, निष्ठा आणि सत् संकल्प सुरुवातीपासूनच होते, शेती विकासाचे विविध प्रयोग करुन शेतकऱ्यांना त्यांनी नवीन ज्ञान दिले. हल्लीच काही बागाईतदार आले होते, ते म्हणत होते, 'आम्ही संपूर्ण हताश झालो होतो. आमच्या शेतात एक एकरात जेमतेम वीसेक टन ऊस व्हायचा. अधांच्या मार्गदर्शनामुळे आम्ही ११० टनापेक्षा जास्त उत्पादन घेन आहोत.'

गोदावरी शुगर मिल्सच्या कंपनीफार्मवर ऊस उत्पादनाचा जागतिक रेकॉर्ड त्यांच्यामुळे शक्य झाला, ज्याची आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नोंद घेतली गेली. उस उत्पादनात अग्रेसर असलेल्या हवाई, इंडोनेशिया, क्यूबा या देशांपेक्षाही जास्त उत्पादन त्यांनी घेण्यास मदत केली. मला आठवते, आपले माजी मंत्री श्री. अण्णासाहेब शिंदे एकदा म्हणाले होते, 'भारत देशात आणि महाराष्ट्रात उस उत्पादन जी क्रांती झाली आहे त्यासाठी करमसी सोमैयांचा मोठा हातभार आहे.'

पूज्य अधांना शिक्षणमहर्षी म्हणून गौरविणारे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील विद्यावहार संकुलाच्या मुलाखतीत म्हणाले, 'सोमैया विद्याविहार तर विद्यापीठ झाले पाहिजे.'

त्या सोमैया विद्याविहार परिसराात २२ हजार विद्यार्थी आज शिकत आहेत. आपले विद्यार्थी भारतीय संस्कृतीत घडले पाहिजेत व चारित्र्यसंपन्न झाले पाहिजेत हा त्यांचा विद्याविहारसाठी जीवनमंत्र होता. संस्कृत भाषेचे ते कट्टर निष्ठावंत होते. नवी पिढी या भाषाजननी संस्कृतपासून वंचित राहू नये यासाठी ते प्रयत्नशील होते. ते स्वत: गांधीजींच्या विचारांचे आग्रही देशभक्त होते. जीवनभर खादीचा स्वीकार करुन ते जगले आणि विद्याविहार संकुलात राष्ट्रीय कार्यक्रम सतत राबते ठेवले.

विद्याविहाराच्या बाजूला संस्कृतीविहारचा परिसर आहे. तेथे भारतीय संस्कृतीच्या विकासासाठी अनेक योजना आहेत. मंदिराचा पायाभरणी समारंभही झाला आहे, पण त्या परिसराला आकार घेण्यास थोडा वेळ लागेल.

सोमैया आयुर्विहात स्वास्थ्यासाठी ७०० खाटांचे मोफत इस्पितळ आहे. ज्यावेळी त्या इस्पितळातील डीन आणि चीफ मेडिकल ऑफिसरांची नेमणूक केली तेव्हा त्यांना पहिली अट ही घातली होती की, रुग्णांचे दु:ख समजण्याचा प्रयत्न करुन त्यांच्याशी प्रेमळ वागणूक असावी. अधा आपल्या मृत्युपश्चातच्या इच्छांमध्ये लिहून गेले आहेत, की कधीही रुग्णाला त्याच्या स्वकीयांना भेटण्यास मनाई करु नका. आय.सी.यु.मधील रुग्णालाही आपल्या नातेवाईकांना भेटण्याची इच्छा असल्यास ती पूर्ण व्हावी. त्यांचे एक मित्र मृत्युशय्येवर असताना त्यांना अधांना भेटण्याची इच्छा दर्शवली होती. पण डॉक्टारांची परवानगी न मिळाल्याने अधांना कायमची एक हुरहूर लागून राहिली. मृत्यूशय्येवरील माणसालाही डॉक्टर मानवता दाखवू शकत नाहीत हे कसे? सोमैया आयुर्विहार हॉस्पिटल स्थापण्यापूर्वी बाबा हरकिशनदास हॉस्पिटल, भाटिया हॉस्पिटल व बॉंबे हॉस्पिटलमधील रुग्णांची विचारपूस करण्यास जात असत.

गिरिनिवासी प्रगती मंडळाने आयोजित केलेले मेडिकल कॅम्प तर सर्वपरिचित आहेत. आपल्या गांवामध्ये २०-२५ कि. मी. अंतरापर्यंत जिथे रेल्वेची सोय नाही अशा गावातच कॅम्प करावेत असा अधांचा आग्रह असे. दोन ते तीन हजार वस्तीच्या गावांच्या आजुबाजूच्या ग्राम-विभागातील व्यक्तीदेखील लाभ घेत असत. मुंबईतील जवळजवळ शंभर डॉक्टर स्वेच्छेने चार आठवडे सेवा देत. अशा मेडिकल कॅम्पमुळे गावात नवचैतन्य येत असे. पहाटे भजन-किर्तन, समूह भोजन, दिवसा शुश्रुषा व रुग्णांची विचारपूस रुग्णांच्या नातेवाईकांच्या राहण्याची व्यवस्था आणि वाहनांची सोय या सर्वांमुळे संपूर्ण गाव नवनवीन उपक्रम आणि उत्साहाने भारुन जाई.

सर्वप्रथम कॅम्प महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यात १९७५ च्या जानेवारीत झाला. शेवटचा कॅम्प कच्छच्या कुकमा गावात १९८१ च्या जानेवारीत झाला. या वर्षांमध्ये भारतातील, महाराष्ट्र (सुरगाणा), गुजरात (शामळाजी), राजस्थान (बागीडोरा),

मध्यप्रदेश (अमरकंटक), ओरिसा (जे. के. पूर), बिहार (मेषा) आणि मातृभूमी कच्छ (कुकमा) अशी सात राज्ये सामावली. पूज्य अधांनी स्वत: महनोन्महिने तयारी केली, कॅम्पच्या वेळी स्वत: उभे राहून काम पाहिले. काही वेळा स्ट्रेचरसुद्धा ते उचलत. मानवसेवा हीच ईश्वरसेवा असे ते समजत.

या कॅम्पमध्ये शहरांतील लोकांना न मिळणारे जगातील नामांकित डॉक्टर मोठ्या शस्त्रक्रिया करीत असत, ही केवढी अभिमानास्पद गोष्ट होती! कितीतरी गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया होत असत. एक उदाहरण मी देते, 'एक स्त्री आमच्या काही डॉक्टरांना दिसली जी अतिशय बारीक होती पण तिचे पोट मोठे होते. डॉक्टरांनी चौकशी करता ती म्हणाली, 'अडीच वर्षांपासून गरोदर आहे. बाळंत होत नाही. हे ऐकून सर्वांना आश्यर्च वाटले, तिला कॅम्पमध्ये बोलावण्यात आले. डॉ. पुरंदरे यांनी तिचे निदान केले. ऑपरेशन करुन ५० किलो वजनाच्या त्या स्त्रीच्या शरीरातून २५ किलो वजनाची गाठ काढली. कॅम्प पूर्ण झाल्यानंतरही शुश्रुषेसाठी एक महिना तिला हॉस्पिटलमध्ये ठेवण्यांत आले.

या कॅम्पचा लाभ घेणाऱ्या रुग्णांना कल्पनाही नसेल की आपण विश्वविख्यात डॉक्टरांकडून उपचार घेत आहोत. उदा. डॉ. बी. एन. पुरंदरे, डॉ. एस. एम. मर्चंट, डॉ. जे. एस. महाशब्दे, डॉ. मुकुंद परिख, डॉ. सुधीर जोशी वगैरे.... कॅम्पच्या उद्घाटनप्रसंगी भूतपूर्व प्रंतप्रधान श्री. चरणसिंग, राजस्थानचे भूतपूर्व मुख्यमंत्री श्री. हरिदेव जोशी वगैरेंनी पायधूळ झाडली आहे. पू. रविशंकर दादा, डॉ. दोशीकाका, कै. योगाचार्य पू. ओमानंदजी यांसारख्या अनेक महानुभवांनी वॅ म्पला पावन केले. नंतर सरकारने एक विचित्र नियम काढला की, कॅम्पमध्ये येणारी व्यक्ती मागासवर्गीयच असली पाहिजे. (ब्राह्मण, पटेल, वाणी नाही) तरच सरकार वॅ म्पसाठी जमीन व पाण्याची सोय करील. अशा अव्यवहार्य नियमांमुळे कॅम्प बंद पडला. 'गिरीजनवासी प्रगती मंडळा'तर्फे महाराष्ट्रातील डहाणू आदिवासी विभागत 'नरेशवाडीचे स्थानिक उपक्रम चालू आहेत. त्या ठिकाणी ३०० आदिवासी विद्यार्थ्यांसाठी हॉस्पिटल, शाळा, प्रशिक्षण केंद्र, शेतकी प्रशिक्षण शाळा, हॉस्पिटल, गौशाळा वगैरे चालू आहेत. 'न मानुषात् परो धर्म:' या सूत्राची प्रचिती यापेक्षा वेगळी काय असेल?

अधांनी कच्छच्या दुष्काळात पशुधनासाठी बरीच कामे केली. गुजरात सरकारने कच्छमधील ढोरवाड्याला 'उत्तम ढोरवाडा' म्हणून प्रमाणित केले. कच्छच्या कुकमा येथील मेडिकल कॅम्पमध्ये यु.के.चे. हायकमिशनवर आले होते, त्यांनी प्रसन्न होऊन म्हटले की, परदेशातही असे उपक्रम केले पाहिजेत. कितीतरी मेडिकल कॅम्प अधांनी केले. अतिथीगृह आंधले, समाजासाठी खूप काही केले. देशांच्या सर्वतीर्थांचे

परिभ्रमण केले. भारतीय संस्कृतीच्या उत्थानासाठी अनेक रचनात्मक धोरणे आणि कार्यक्रम केले.

त्यांनी ५८ वर्षांच्या वयात हे सर्व लिहिले तेव्हा त्यांना जाणीव होती की त्यांचे वडील आणि भाऊ-दुसऱ्या काकांचे मुलगे-वयोवृद्ध झाले होते. त्यांनाही आपल्या उतारवयाची जाणीव होऊन ते लिहतात... 'या जीवनात माझ्या हातून जी चांगली कार्ये घडली ती माझ्या प्रेरणेने घली. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष, जाणता-अजाणता, मन, वाचा आणि कर्माने त्यांचे परिणाम भोगण्यासाठी मला मोठा प्रवास करायचा आहे. मानसरोवर प्रवासात जशी प्रेम व काळजीपूर्वक तुम्ही माझी तयारी केलीत, तशीच तयारी 'त्या' प्रवासाचीही करा. ज्यामुळे सर्वांना व स्वत: मला नक्कीच शांती मिळेल.

जैन धर्मांचा महान सिध्दांत क्षमायाचना 'मिच्छामी दुक्कडम्' प्रमाणे ते लिहितात.... 'मी ज्यांच्यावर अन्याय केला असेल, दुखवले असेल, न बोलण्यासारखे काही बोललो असेन तर त्यांची क्षमा मागून निरोप घेतो,'

'मला वाटतं मला आता कोणत्याही प्रकारची इच्छा आकांक्षा राहिलेली नाही. ईश्वराने मुक्त हाताने मला सर्व काही दिले आहे. न मागितलेले सुखही त्याने मला दिले. मग त्याने बोलावले तर शरीर सोडण्याचे दु:ख का करु? विषाद कशाला? मला काय मागायचे राहिले आहे?'

त्यांच्या लिखाणात त्यांच्या जीवनाचे सार आहे. लिखाणाच्या शेवटी ते म्हणतात -

'ज्या व्यक्ती तुम्हांला भेटतील किंवा ज्यांना तुम्ही पत्र लिहाल, तेव्हा माझ्या चुका, बेदरकारी, गैरवर्तन, कोणाबरोबर क्रोधपूर्ण वागणूक, व्यंग केले असेन, दुखवले असेन, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष त्यांचे नुकसान केले असेन, कुणाच्या गरैसमाजाला कारणीभूत झालो असेन, विपरीत वर्तन झाले असेल तर मला क्षमा करण्यास सांगा, ते सर्व विसरण्यास सांगा व ही क्षमायाचना अगदी मन:पूर्वक आहे, एवढे सांगा'.

त्यांनी लिहिले आहे की, मला नातेवाईक, जावई, मित्र, व्याही सर्वच सुसंस्कारी मिळाले. घरच्या व्यक्तींबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले.

खरोखर अधा पूर्ण जीवन जगले. निरोपापूर्वी ते म्हणाले, 'मी खूप सुखी आणि आनंदी आहे.'

पूज्य अधांनी अध्यात्मशक्ती पूज्य डोंगरेजी महाराज, पूज्य पांडुरंगशास्त्री, पंडित तद्रूपानंदजी, बंधुत्रिपुटी, पूज्य मरोरीबापू, पूज्य गंगेश्वरानंदजी, पूज्य प्रमुखस्वामी यांसारख्या महान संतांचा सत्संग, भजन-कीर्तन आण सहवास यांतून आकाराला आली. त्याचप्रमाणे त्यांचे मौन ते संपूर्ण उपवासासहित पाळत असत.

पूज्य स्वामी आनंद, पूज्य मोरारीबापू, पूज्य शंकराचार्य, पूज्य केदारनाथ, पूज्य रविशंकर दादा, पूज्य दलाई लामा यांसारख्या संतांच्या कुलदेवतेवर त्यांची संपूर्ण श्रध्दा होती. जेव्हा ते कच्छमध्ये जात, तेव्हा अचूकता देवतेची पूजा करीत.

अधांच्या जीवनात प्रार्थना हे अविनाशी अंग होते. घरात तर नित्य प्रार्थना असेच. पण बाहेरगावीदेखील समूहप्रार्थना, रामधुन आण सद्वाचन अवश्य असे. सायंकाळचा तोच त्यांचा नित्यक्रम असे. आठवड्याच्या नियमित प्रार्थनेसाठी आराधना पुस्तक छापले होते. भारतभर मेडिकल कॅम्प होत, त्यांत प्रथम रुग्णांना मंदिरात नेऊन प्रार्थना केली जाई. त्यानंतर त्यांच्यावर उपचार होत. रुग्णाला घरी जाताना वस्त्र आणि आहार म्हणजे 'व्यसनमुक्ती' प्रतिज्ञा. प्रत्येक रुगणाला जीवनात कधीही दारु न पिण्याची किंवा कोणतेच व्यसन न करण्याची प्रतिज्ञा घ्यायला लावीत. त्याचमुळे घरातील कोणत्याही व्यक्तिने आजपर्यंत चहाची चव पाहिलेली नाही.

अशा सात्विक, निष्ठावान, धैर्यवान, शौर्यवान, श्रद्धावान, औदार्य असलेल्या आजानबाहू दैवी मातापित्यांच्या पोटी आमचा जन्म झाला. आम्ही भाग्यशाली होतो; पण आता त्यांच्या छत्रछायेला आम्ही पारखे झालो आहोत. जीवनात माता-पित्यांसारखी छाया कधीच मिळत नाही. खेळकर स्वभावाचे, मार्मिक आणि हजरजबाबी, कोमल हृदय, अशा अधांचा चेहरा मुलांना पाहताच खूष होई. घरात स्वयंपाकघर कधीच बंद नसे. कोणीही उपाशी जाऊ नये याची खबरदारी घेतली जाई.

थोड्याच दिवसांपूर्वीची गोष्ट... सुरुचीचे काही कार्यकर्ते रात्री दहा-साडेदहा वाजता आले. त्यांना झोप आली होती. कार्यकत्यांना चहा-फराळ दिला. ते १२ वाजता उठले. भेटण्यासाठी मी अधांच्या खोलीत गेले तेव्हा मला विचारले, 'सर्व जेवले ?' मी उत्तर दले. 'चहा-फराळ दिला.' ताबडतोब अधा म्हणाले, 'समोर काय आहे ?' 'घड्याळ'. तर म्हणाले, 'किती वाजले आहेत ? 'बारा वाजले आहेत', 'तर ही चहा-फराळाची वेळ आहे का ? खाली जा आणि सर्वांना जेवायला वाढ.'

लहान-सहान गोष्टीतही त्यांचे लक्ष असे. सात वाजल्यानंतर घरी आलेले त्यांना चालत नसे. कधी उशीर झाला तर ते जागत राहात. आवाज ऐकून नंतरच झोपत. कधी संसाराच्या कामात उशीर झाला तर त्यांना वाईट वाटे. ते बोलत नसत. त्यांच्या व्यक्तिमत्वात सात्विक शक्ती होती. दुसऱ्याची चूक दाखवून देण्यासाठी शब्दाऐवजी मौन व डोळेच काम करीत. अशी त्यांची शिस्त होती.

अधांना खोटेपणाचा मनापासून राग येई. गैरवर्तन किंवा अप्रामाणिकपणा त्यांना सहन होत नसे. अशी व्यक्ती त्यांच्या मनातून उतरे. त्यांना कोणाची टीका किंवा चुगली करणे पसंत नव्हते. असा विषय निघताच ते विषय बदलत असत. थोड्या दिवसांपूर्वी असेच झाले. अधा बोलत नव्हते. मलाही काहीतरी चुकल्यासारखे

वाटत होते. मी विचारले, 'का? अधा बोलत का नाहीत ? रुसला आहात ?' ताबडतोब म्हणाले, 'तुझ्यासोबत बालेणार नाही ? देव आला तरी प्रथम तुझ्याबरोबर बोलेन, नंतर त्यांच्याबरोबर !' या वाक्याने मी भारावून गेले. आज हे लिहिताना त्यांचा चेहरा समोर दिसतो आहे आणि अश्रू भरुन येताहेत. कोणीतरी मला लिहून पाठविले, 'अधांविना अनाथ लीलाबहेन, पाण्याशिवाय मासा कल्पना करता येईल परंतु अधांशिवाय लाला नाही!' परमशक्तीचे संकेत आणि निर्णय काळजावर दगड ठेवून स्वीकार करावे लागतात. अधा मला 'आई' च्या रुपात पहात. मी पण त्यांच्या गाल आणि डोक्यावर हात फिरवत राही. हल्लीच पूज्य मोरारीबापूंनी एक पुस्तक प्रसिद्ध केले. त्याचे नाव 'मुलगी प्रेमाचा सागर' मी बापूंना विचारले की, मुलगी प्रेमाचा सागर की आई-बाप प्रेमाचा सागर?

माझा चेहरा जरा ओढलेला तरी अधा विचारत 'तुझी तब्येत ठीक नाही का? तू जेवलीस का?' थोड्या दिवसांपूर्वी माझे डोके दुखत होते. अधांना हे कळले तेव्हा ते आपल्या वृद्धापकाळाची पर्वा न करता मला घरी भेटण्यास आले. असे हे प्रेम आणि काळजी पुढे कोण करणार ?

पूज्य अधा जसे आईबद्दल बोलले होते, की ती माझ्यासाठी काय होती ते मलाच माहिती आहे; त्याचप्रमाणे मीही म्हणेन, ते आमच्यासाठी काय होते ते आम्हांलाच ठाऊक आहे. ईश्वराने आम्हांला अशा आईबापांची मुले होण्याची संधी दिली. ईश्वराला आम्ही प्रार्थना करतो की आम्हांला त्यांच्यालायक बनवावे! आमच्यातील उणीवा दूर करुन अशी शक्ती आणि बुद्धी द्यावी की त्यांच्या पाऊलचिन्हांवरुन आम्ही चालावे.'

अनेकांनी अधांच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वाविषयी उल्लेख केला आहे. एका युगप्रवर्तक व्यक्तीच्या जीवनाचे थोडे विचार मी आपल्यासमक्ष मांडले. स्वबळाने समृध्दीच्या पराकाष्ठेला ते पोहोचले पण साधेपणा त्यांच्या जीवनाचा पाया होता. ऐहिक जीवनाविषयी अनासक्ती, समाजकल्याणाची उत्कट भावना, देश, स्वातंत्र्य आणि धर्म, संस्कृतीसाठी त्यांची तळमळ 'न मानुषात् परो धर्मः' या सूत्राचे सैद्धांतिक विश्लेषणच फक्त नाही तर व्यावहारिक पालन आणि आचरण ही सर्व लक्षणे आपणा सर्वांना प्रेरणा देतील आणि त्यांच्या वात्सल्याला आपण लायक बनू, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

आमच्यावर कोसळलेल्या या दुःखात सर्व आप्तस्वकीय, साधुसंत, यांच्या असंख्य आश्वासन संदेशासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत.

शेवटी पूज्य अधांना साश्रुनयनांनी कोटी-कोटी वंदन !

प्रिय आई-अधा तुमच्या चरणी वाहत आहोत हृदयातील काही बोल, अश्रुभरल्या नयनांनी वाहतो श्रद्धांजलीची फुले....

❖

पूज्य करमसी सोमैया :
उद्योगपती, दानशूर, मानवतावादी आणि भवष्यद्रष्टा

पु. मा. कावडिया

परमपूज्य करमसी जेठाभाई सोमैया आज आपल्यात नाहीत. आपल्या जवळजवळ दहा शतकाचे तेजस्वी, नि:स्वार्थी, परहितदक्ष आण स्फुरणदायी ऐहिक जीवन संपवून ते ९ मे १९९९ रोजी निजधामास गेले. त्यांचा पवित्र आत्मा पवित्रतम परमात्म्यात, अनंतात विलीन झाला.

माझे दहा दशकाचे सहाकार्य

पूज्य सोमैया शेठ ज्या कालात वावरले त्या कालात आपण असणे हेच एक भाग्य आहे. पण त्यांच्याजवळ एक कार्यकर्ता, सहकारी या नात्याने जवळजवळ सहा दशके एकत्र काम करण्याचे थोर भाग्य मला लाभले, हा एक दुर्लभ योग आहे. माझ्या आयुष्याच्या वाटचालीत त्यांचे मला सतत आशीर्वाद लाभले. वस्तुस्थिती अशीच आहे की, तेच माझ्या जीवनाचे शिल्पकार ठरले आणि त्यांच्यामुळेच माझ्या जीवनाला स्फूर्ती मिळाली. सार्थकता प्राप्त झाली.

मानवताधर्मापरता धर्म नाही. 'मा गृध: कस्यविद्धनम्' दुसऱ्याच्या धनाची अभिलाषा बाळगू नका हे शास्त्रवचन पूज्य करमसींनी जीवनाचा मार्गदर्शक ध्रुवतारा ठरवून त्यानुसार जीवन व्यतीत केले. अगदी लहानपणापसून त्यांनी आपल्यासमोर स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, स्वामी दयानंद सरस्वती यांच्यासारखे थोर पुरुष आपले आदर्श म्हणून स्वीकारले. त्यांची शिकवण आत्मसात केली आणि 'न मनुषात् परोधर्म्' (There is no religion greater then man) हे जीवनाचे तत्त्वज्ञान स्वीकारले आणि ते कृतीने अंमलात आणले.

उदारमतवादी उद्योगपती

पूज्य करमसी जेठाभाई सोमैया हे एका उदारमतवादी, सुसंस्कृत व्यापारी आणि उद्योगपतींच्या वर्गाचे त्यांच्या काळातील प्रतिनिधी होते. या व्यापारीवर्गाने आणि उदारमतवादी उद्योगपतींनी आपल्या मातृभूमीची सेवा करुन तिला प्रतिष्ठा करुन दिली. भारत देश मोठा केला आणि समाजऋण फेडण्यासाठी जनकल्याणाच्या योजनांमध्ये धन वेचले.

टाटा, बिर्ला, वालचंद, बजाज आणि अन्य उद्योगपतींनी घालून दिलेल्या परंपरेने पूज्य सोमैया पुढे गेले. या उदारमतवादी आणि सुसंस्कृत सेवाभावी औद्योगिक कुटुंबांनी दूरदृष्टीने केलेल्या कार्यामुळे सर्वसामान्य जनतेचा फायदा झालेला आहे. हीच भविष्यवेधी दृष्टी पूज्य सोमैया शेठजींनी जोपासली.

सेवासंस्थांचे जाळे आणि वेगळे पैलू

पूज्य करमसी सोमैया यांनी शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रांत सेवासंस्थांचे एक जाळेच निर्माण केले. गिरिजन आणि वनवासी यांच्यासाठी दूरदूरच्या राज्यांत उपचार केंद्रे उभारली. विद्याविहार आणि आयुर्विहार या दोन नावाजलेल्या संस्था. १९८७-८८ साली कच्छमध्ये भीषण दुष्काळ पडला असता त्यांनी दुष्काळ निवारण्यासाठी पुढाकार घेऊन काम केले. भारतीय प्राचीन परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी त्यांनी 'संस्कृति-विहार' या संस्थेच्या विद्यमाने कितीतरी प्रकल्प आकारत आणले. या सर्व सेवासंस्था म्हणजेच पूज्य करमसी सोमैया यांची शाश्वत आणि चिरंतन स्मारके आहेत. सोमैया शेट आज शरीररुपाने आपल्यात नसले तरी त्यांनी मागे ठेवलेल्या या सेवासंस्था आम्हा सर्वांना, भावी पिढ्यांना सेवेसाठी प्रेरणा देत राहतील.

स्वकर्तृत्वाने घडलेला भाग्यवान पुरुष

त्या काळी एक दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील माळुंजा नावाच्या खेड्यात करमसी यांचा जन्म १६ मे १९०२ मध्ये झाला. त्यावेळी जेमतेम उदरनिर्वाह करण्यापलीकडे कोणतेही साधन हाती नसताना बिकट परिस्थितीत, काबाडकष्ट करुन मेहनतीने करमसींनी नशीब कमावले. सहनशीलता, देवावर विश्वास आण कष्ट करण्याची तयारी यामुळे चाळीस पन्नास वर्षात सोमैया यांनी डोळ्यांसमोर एक औद्योगिक साम्राज्य उभारले.

साखर कारखाने, औद्योगिक अल्कोहोल, रसायने हे त्यांचे कार्यक्षेत्र. पण धनसंचय करीत असतानाच ते नियमितपणे समाजसेवेसाठी वेचीत राहाणे

आणि नीतिमूल्यांशी तडजोड करावयाची नाही हे अखंड व्रत चालविणे ही एक तपश्चर्याच होय.

व्यापार उद्योगात पूज्य करमसी यांनी कशी प्रगती केली याची तपशीलवार माहिती देण्याची ही वेळ नाही, स्थळ पण नाही. फक्त इतकेच सांगता येईल की त्यांनी आपल्या व्यापारी दृष्टीने चोख व्यवहार केला. नाव कमावले. साखर व्यापाराच्या क्षेत्रात तर त्यांचा सल्ला आणि मार्गदर्शन मोलाचे मानले जाई. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून त्यांच्याकडे औद्योगिक बाबतीत विश्वासपूर्वक सल्ला मागणारी पत्रे येत. जिज्ञासूंना योग्य सल्ला देण्याचे संतकार्य त्यांनी अखेरपर्यंत पाळले.

नगर जिल्ह्याचा कायाकल्प

अहमदनगर जिल्ह्यात सोमैयांनी साखर कारखाने उभारले आणि त्यांतून त्या जिल्ह्यांचा संपूर्ण कायाकल्प होण्यास प्रारंभ झाला. पंचवीस वर्षांच्या अवधीत १९५०-६० च्या दशकात गोदावरी शुगर मिल्सच्या यांत्रिक शेतीच्या पध्दतीचा आणि साखर उत्पादनातील गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातदेखील बोलबाला झाला. आंतरराष्ट्रीय दर्जाची साखर नगर जिल्ह्यात निर्माण होऊ लागली. संपूर्ण नगर जिल्ह्यात पथदर्शक शेतीची प्रात्याक्षिके दाखविण्यास गोदावरी मिल्सच्या शेतांची निवड होऊ लागली. एका ओसाड, वाळवंटी प्रदेशाचे सुंदर, हिरव्यागार शेतीमध्ये रुपांतर झाले.

ऊस उत्पादकांच्या २६/०४/१९६६ रोजी दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय परिषदेत भाषण करताना तत्कालीन केंद्रीय कृषिखात्याचे उपमंत्री अण्णासाहेब शिंदे म्हणाले, 'उस पिकविण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी श्री. के. जे. सोमैया आणि गोदावरी कारखान्यातील शेतीतज्ज्ञ यांनी पुढाकार घेऊन जी पुरस्सराची भूमिका पार पाडली ती कायमची स्मरणात राहील.'

औद्योगिक विकासाच्या या अतिविस्तृत आणि मन गुंगवून ठेवणाऱ्या महत्त्वपूर्ण कामात सोमैया यांचा किती मोठा वाटा आहे हे दाखविण्यासाठी सांगितलेला हा एक छोटासा पैलू !

कदापि निराश होऊ नका, तत्त्वनिष्ठा पाळा

तत्त्वांचा आणि सिद्धांताचा प्रसार फक्त प्रवचनांतून करण्यापेक्षा आपले वर्तन हे तत्त्वांना धरुन असणे महत्त्वाचे आहे असे मनोमन ठरवून त्याप्रमाणे वर्तन कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणजेच करमसी सोमैया यांचे संपूर्ण चैतन्यदायी जीवन होय. जी तत्त्वे त्यांनी स्वीकारली, ती प्रत्यक्ष आचरणात आणून दाखविली. त्यांच्या यशाचा पाया या तत्त्वनिष्ठ आचरणावरच आधारलेला आहे. ही मुख्य तत्त्वे

पुढीलप्रमाणे : -

१) कधीही निराश होऊ नका. पुढे कसे होईल याची चिंता बाळगू नका.

२) वेळ घालवू नका. जे काम हाती घेतले ते उत्साहाने करा.

३) सदैव आपल्या तत्त्वांना चिकटून राहा.

दोन व्यक्तिगत अनुभव

त्यांच्या प्रसन्न प्रेरक व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या तत्त्वनिष्ठेची झलक दाखविणारे मला आलेले दोन अनुभव येथे नमूद करतो.

अ. निराश होऊ नका; एक दिवस विश्रांती घ्या. उद्यापासून जोरात काम सुरु करा.

एक दिवस सकाळी जर लौकरच मनाने खचलेल्या, दुर्बल, जवळजवळ रडकुंडीला आलेल्या अवस्थेत मी त्यांच्यासमोर उभा राहिलो. १९७३ च्या १४ डिसेंबरचा तो दिवस. आदल्या दिवशी समीरवाडीवरुन मी परतलो होतो. समीरवाडीस त्यावेळी काय घडले ते मी त्यांना फोनवरून सांगितलेच होते. तेच त्यांना प्रत्यक्ष सांगण्यासाठी त्यांची ही भेट होती.

बेळगाव-मिरज विभागात त्यावेळी सीमातंट्याच्या प्रश्नावरुन चळवळी होत असत. त्याचेच निमित्त होऊन मुधोळ-जामखंडी भागातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आमच्या समीरवाडीच्या कारखान्यावर हल्ला केला. आवाराला आग लागली. तेथील वसाहती, गुदामे, मोटारी यांची मोडतोड केली. चीजवस्तू लुटून सारे होत्याचे नव्हते केले. वस्तुभंडारात एक नट किंवा बोल्ट शिल्लक नव्हता आण पोत्यांच्या साठ्यात एक गोणपाट राहिला नाही. काही तासांच्या आत त्या एका औद्योगिक कारखान्याचे गजबजलेले आवार नष्ट होऊन त्या भूमीला युद्धकालातील 'दग्धभू' चे स्वरुप प्राप्त झाले होते. सुदैवाने ह्या गुंडाचा सारखर कारखान्याच्या आत प्रवेश होऊ शकला नाही. त्यामुळे मुख्य गळिताची यंत्रसामग्री सुरक्षित राहिली. बाहेरच्या संपत्तीची लूटमार असतानाच्या काळात पोलिसांना वर्दी गेल्याने त्यांची कुमक आली आणि हल्लेखोर पळून गेले.

ह्या प्रकारामुळे मला भयंकर धक्का बसला होता. सात कोटींची गुंतवणूक डोळ्यांदेखत नष्ट झाली होती. याबद्दल पूज्य सोमैयाजींची मी कोणत्या तोंडाने क्षमा मागू हे सुचत नव्हते. कारखान्याच्या आवारात माणूस तर सोडाच एक चिटपाखरुही तिथे नव्हते. नंतर भेटीस येणाऱ्यांनी मत व्यक्त केले की, हा कारखाना पुन्हा पुर्वीप्रमाणे चालू करण्यास किमान तीन वर्षे तरी लागतील.

पूज्य सोमैयाजींनी माझ्याकडे वडीलकीच्या आणि सहानुभूतीच्या दृष्टीने पाहिले. मी त्यांना काही सांगण्यापूर्वीच ते जणू काही माझेच सांत्वन करु पाहात होते. काही

क्षणांतच त्यांच्या चेहऱ्यावर आशेची दिप्ती उजळली. त्यांच्यातील शक्ती जागृत झाली. ते म्हणाले, 'कवाडिया, निराश होऊ नकोस. असे समज की, येथे भूकंप झाला! (आणि नष्ट व्हावयाचे ते होऊन गेले) नंतर म्हणाले, 'घरी जा, एक दिवस विश्रांती घे. उद्यापासून कारखाना पुन्हा सुरु करण्यासाठी झपाट्याने कामाला लाग.'

ही दंगल, लुटालूट आणि आगी लावण्याची घटना १३ डिसेंबर १९७३ या दिवशी घडली. नंतर ३३ दिवसांच्या अवधीत सर्व जमवाजमव करुन १६ जानेवारी १९७४ रोजी नव्याने कारखान्यात उत्पादन सुरु करण्यात आले. पूज्य के. जे. सोमैया यांच्या स्फूर्तिदायक मार्गदर्शनाखाली डॉ. एस. के. सोमैया यांनी हे एका मोठ्या औद्योगिक वसाहतीचे पुनर्वसन केले. हा एक या क्षेत्रातील चमत्कारच होता.

या पुन्हा सुरु करण्यात आलेल्या कारखान्याचें उद्घाटन माननीय मोहनलालजी सुखाडिया यांच्या हस्ते झाले. तेहतीस दिवसांत कारखाना पुन्हा सुरु करण्याइतपत प्रगती झाली ते त्यांना खरेच वाटले नाही. कारखाना उत्पादनक्षम झाला आहे किंवा नाही याबाबत प्रत्यक्ष खातरजमा करुन घेण्यासाठी संबंधित उपायुक्त पदावरील अधिकाऱ्याला समीरवाडीस पाठविले होते. नंतरच ते उद्घाटनाच्या समारंभाला आले.

सोमैयांच्या सर्व उद्योगसमूहाच्या संचलनामागे पुढील तीन तत्त्वे होती.

१. जे काही घडले असेल ते ते ईश्वरेच्छेने आणि प्रारब्ध योगाने.
'ती' त्याची इच्छा म्हणूनच घडले आहे.

२. निराश होऊ नका. धीर सोडू नका.

३. पुनर्रचनेचे काम उत्साहाने हाती घ्या.

ब) तत्त्वनिष्ठेला चिकटून रहा

१९६९ मध्ये त्यावेळेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या आदेशावरुन मंत्रालयामध्ये अबकारी खात्याच्या आयुक्ताने सर्व डिस्टिलरी कंपन्यांची एक बैठक बोलाविली होती. या बैठकीस हजर राहून मी परत ऑफिसमध्ये आलो. त्यावेळी पूज्य सोमैया यांचा एक संदेश मिळाला की मी त्यांना काही महत्त्वाच्या कामासाठी त्वरीत भेटावे.

गावठी बेकायदा दारु विकण्याच्या वेगाने पसरणाऱ्या उद्योगाला आळा घालण्यासाठी दारुबंदीचे धोरण सैल करण्याचा निर्णय मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी घेतला होता. डिस्टिलरींना 'देशी दारु' गाळण्यास सांगितले तर बेकायदा धंदा बंद करता येईल आण सरकारचा महसूल बुडणार नाही असा त्यांचा हिशेब होता. सोमैया ऑरगॅनो केमिकल्स डिस्टिलरी ही औद्योगिक अल्कोहोल उत्पादन करणारी कंपनी. देशी दारु गाळण्याच्या धंद्यात आम्हांला रस नव्हता. पण सर्व डिस्टिलरींबरोबर

सोमैया ऑरगॅनो केमिकल्स डिस्टिलरीलाही आमंत्रण होते. म्हणून त्या बैठकीला मी हजेरी लावली. त्यावेळी डॉ. एस. के. सोमैया परदेशांत होते.

संध्याकाळी मी पूज्य करमसी सोमैया यांना भेटलो त्यावेळी मला आपण कोठे गेला होता, असा प्रश्न त्यींनी विचारला. मी त्यांना त्या बैठकीत काय चर्चा झाली हे तपशीलवार सांगितले.

त्यांनी माझ्याकडे एकवार रोखून पाहिले आणि विचारले, 'म्हणजे, कारखान्यात दारु गाळण्याचा तुमचा विचार आहे?'

मी लगेच उत्तर दिले, 'नो सर, मी फक्त बैठकीस हजर राहिलो.'

त्यावर ते म्हणाले, 'त्या बैठकीला आपण हजर राहण्याचे कारण नव्हते. तेथे उपस्थिती लावल्याने दारुबंदी रद्द करण्याच्या निर्णयात आपला सहभाग आहे असे म्हणता येईल. त्याना (इतरांना) जे काय करावयाचे असेल ते करु द्या. आपण फक्त औद्योगक अल्कोहोल तयार करतो. त्यांच्या बैठकींना आपण का जावे?' थोडा वेळ थांबून ते उद्‌गारले, 'नेहमी तत्त्वाला चिकटून राहा.'

मी निरुत्तर झालो. म्हटले, 'होय महाराज, मी तुमच्याशी संपूर्ण सहमत आहे.'

सरपटू नका, भरारी घ्या

तर असे होते श्री. के. जे सोमैया. तत्त्वनिष्ठ. स्वच्छ स्फटिकासारखा पारदर्शी दृष्टिकोन आणि लक्ष्य गाठण्यासाठी कष्ट उपसण्याची तयारी. ते म्हणत, काही लोक यश मिळविण्यासाठी उतावळे असतात. आणि नंतर सांगत, कधीही सरपटत जाऊ नका, प्रत्येकाकडे भरारी मारण्याची आकांक्षा हवी, जिद्द हवी.

ते आम्हांला सांगत की वेळ हाच पैसा आहे. आपण जसा पैसा उधळू नये, असे म्हणतो, त्याचप्रमाणे वेळ दवडू नका, वेळ फुकट घालवू नका.

उदात्त, सर्वोत्तम संस्कृतीचे प्रतीक म्हणता येईल असे त्यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. तरुणांशी ते मृदु जवळकीने वागत. जेष्ठांशी समजूदारपणे ; कष्ट करुन पुढे येऊ पाहणाऱ्यांशी ते सहानुभूतीने वागत आणि दुर्बलांविषयी त्यांच्या मनात अनुकंपा असे. त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये पावलोपावली मानवी दयाबुद्धी असे; आणि इतरही काही त्यांच्याविषयी म्हणतात, त्याचप्रमाणे ते भारतीय संस्कृतीतील उदात्त भावनांचे प्रतीकच होते. इतिहासातील एक चिरस्मरणीय गाथा.

परमेश्वराविषयी कृतज्ञता

परमेश्वराने आपणावर दया केली याबद्दल ते नेहमी कृतज्ञ राहिले. आपल्या संभाषणात ते अनेकदा एका चिनी वाक्‌प्रचाराचा उल्लेख करीत. 'जेव्हा आपण

विहिरीतून पाणी घेऊन पीत असतो, त्यावेळी ज्यांनी ती विहीर खणली त्यांचे स्मरण करा आणि त्यांना मूक श्रद्धांजली वाहा.' मानव जातीविषयी त्यांच्या मनात हृदयात अपार करुणा, दयाभाव होता. व्यक्तिश: प्रत्येक नागरिक ज्या समाजात वावरतो, त्या समाजाचे देणे लागतो. हे ऋण फेडणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ते त्यांनी आपापल्या परीने करीत असावे असे त्यांचे मत होते.

आयुष्याच्या सायंकाळी ते म्हणत असत, 'आपल्या सहप्रवासी बंधुभगिनींच्या संबंधात आपले कर्तव्य करीत राहण्याची संधी मिळणे यापेक्षा जीवनात अधिक महत्त्वाचे आणि समाधानाचे दुसरे काहीही नाही. हे ध्येय साध्य करण्याचे भाग्य सर्वांनाच मिळत नाही. परमेश्वर कृपेने मला कर्तव्य पूर्ण करण्याची ही संधी मिळाली.

आपल्याला जीवनाविषयी काय वाटते हे त्यांनी दैनंदिनीत लिहून ठेवले आणि आपल्या मृत्यूनंतर ती दैनंदिनी वाचावी अशी सूचना केली होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे, अंतर्मनाचे दर्शन घडविणारे त्या दैनंदनीतील हे दोन परिच्छेद पहा -

''माझ्याकडे (एके काळी) काहीही नव्हते. साधने नव्हती. परिस्थिती अनुकूल नव्हती. तरी पण परमेश्वराने माझ्या इच्छेला साद दिली. मी हवेत किल्ले बांधत असे. परमेश्वराने ते सत्यसृष्टीत उतरवले. माझ्याकडे काहीच नव्हते. फक्त परमेश्वराचा आशिर्वाद पाठीशी होता आणि त्यातूनच 'आजचे कार्य' उभे राहिले.

नंतर ते म्हणतात, 'मला कसलीच इच्छा उरली नाही. कसलीच अपेक्षा राहिली नाही. परमेश्वराने माझ्यावर खूपच दया दाखवली. मी न मागतानादेखील त्याने उदार मानाने मला खूप काही दिले. कधीच अपेक्षा केली नव्हती, इतके सुख मला मिळाले आहे. मी जेव्हा जाईन (इतरांनी) दु:ख करण्यासारखे काय आहे?

लेख संपण्यापूर्वी मी सर्वांतर्फे परमेश्वराची प्रार्थना करतो की, पूज्य करमसी सोमैया यांना सद्‌गती लाभो, त्यांच्या जीवनापासून आम्हांस सदैव मर्गादर्शन मिळो.

❖

चित्रमय जगत

"जन्मोजन्मी मी आपल्याला अशीच माळ घालत राहीन." धन्य गृहस्थाश्रमाचा सुवर्णक्षण
- पू. बाई आणि पू. अधा

कुटंबवात्सल्याचा विशाल वटवृक्ष पू. अधा, पू. बाई आपल्या परिवारासह



"आता तरी उतरा, माझे हात दुखतात."
पू. आबा, चि. समीर व चि. जतीन या नातवंडाबरोबर

पू. अधा 'पद्मनाभ' मध्ये वेदांची स्थापना करण्याचा प्रसंगी
प.पू. प्रज्ञाप्रज्ञू गंगेश्वरानंदजींसमवेत

अध्यात्मपथाचे दोन धर्मधुरंधर - पू. अधा आणि स्वामी तद्रूपानंदजी

'बुध्दं सरणं गच्छामि ।' पू. अधा आणि प. पू. दलाईलामा संस्कृतिविहारमध्ये 'बुध्दिस्ट सेंटर' च्या स्थापना प्रसंगी आणि त्यांच्या मागोमाग श्री. समीर सोमैया

पू. अधा आणि डॉ. शांतिलाल सोमैया
स्वामीनारायण पंथाच्या प. पू. प्रमुख स्वामीजींबरोबर

प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांना कुंकुकतिलक लावताना पू. अधा

प. पू. मोरारीबापूजींबरोबर पू. बाई, पू. अधा आणि डॉ. शांतिलाल सोमैया

हे प्रभू! तुझ्या चरणी हे सारे अर्पण!
पू. अधा नेत्रयज्ञ आणि आरोग्य शिबिरांच्या ठिकाणी या प्रतिमेचे पूजन करीत असत.

नेत्रोपचारानंतर आदिवासी रुग्णांच्या व्यथावेदनांची विचारपूस करून
स्नेहोपचार करणारे पू. अधा

वैद्यकिय शिबिरामध्ये रूग्णांची जातीने काळजी घेताना पू. अधा

राजकोटमध्ये दंतयज्ञाच्या वेळी पू. अधा आणि
राजस्थानचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सहदेव जोशी

नेत्रयज्ञ - उपचार आणि उपहार

आदिवासींची आपुलकीने चौकशी करताना पू. अधा आणि श्री. शांतिलाल सोमैया

"अन्न हे पूर्णब्रह्म" - पू. अधा आदिवासींना मायेने वाढताना

यशस्वी पिता-पुत्र श्रीरामपूर येथील अर्पित ऑफिसमध्ये

महाराष्ट्राचे भाग्यविधाता मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांचे सोमैया विद्याविहार मध्ये स्वागत करताना पूज्य अधा व डॉ. शांतिलाल सोमैया

श्री. राजारामबापू पाटील आणि इतर मान्यवर पाहुण्यांना विद्याविहारचा परिसर दाखवताना पू. अधा, डॉ. शांतिलाल सोमैया आणि श्रीमती लीलाबेन

युवासंस्थेच्या उंबरठ्यावर पू. अधांचे एक दुर्मिळ छायाचित्र

ऊसाच्या उत्पादकतेचा आशियाखंडातील उच्चांक प्रस्थापित करणाऱ्या साखरसम्राट
पू. अधांची सम्राटाला शोभणारी प्रभावशाली प्रभावशाली मुद्रा

बहुरत्ना वसुंधरेची ही खरी गोडी!
पू. अधा उसाचा स्वाद घेताना

यात्रिक की योगी ? पू. अधा मानससरोवर यात्रेत

मानससरोवर यात्रेत पू. अधांबरोबर श्रीमती लीलाबेन आणि श्रीमती दिव्याबेन

एका प्रसन्न भावमुद्रेत पू. अधा

एका प्रसन्न भावमुद्रेत पू. अधा

प्राणायामाची साधना दीर्घ स्वास्थ्य देते.
पू. अधांची योगसाधना

या, नमस्कार ....

करमशी जेठाभाई सोमैया
(मरणोपरांत)

मैं, भारत का राष्ट्रपति, के॰आर॰नारायणन्, व्यक्तिगत गुणों के लिए आपके सम्मानार्थ, पद्म भूषण प्रदान करता हूँ।

राष्ट्रपति

नई दिल्ली
दिनांक 10 दिस, 1922
[illegible] 2000

पद्मभूषण पदक व मानपत्र

थोर मानवतावादी, दानशूर, सुप्रसिध्द उद्योगपती आणि
सोमैया विद्याविहार व सोमैया आयुर्विहारचे द्रष्टे संस्थापक
स्वर्गीय श्री. करमसीभाई जेठाभाई सोमैया यांना
२६ जानेवारी २००० या प्रजासत्ताकदिनी
मरणोत्तर 'पद्मभूषण' ही पदवी प्रदान करण्यात आली.

राष्ट्रपतीसदनातील दरबार हॉलमध्ये गुरुवार दि. ३० जानेवारी रोजी झालेल्या
भव्य समारंभात भारताचे राष्ट्रपती श्री. के आर्. नारायणन् यांच्या हस्ते
'पद्मभूषण' सन्मान स्वर्गीय करमसीभाईंच्या वतीने स्वीकारताना
त्यांचे सुपुत्र श्री. शांतिलाल सोमैया वरील छायाचित्रात दिसत आहेत.

पू. अधांची कुंडली व हस्तमुद्रा

पू. अधांच्या हस्तलिखिताची एक दुर्मिळ प्रत